वि

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय विविध
सं. क्र. १२५

RI FBK-0007911

न. र. फाटक

रामदास वाङ्मय आणि कार्य

REFBK-0007911

ग्रे
८२५



केंद्रित करून त्या विचाराच्या धोरणानें समर्थांचें अद्वितीयत्व सिद्ध करण्याची आपल्या स्फुट लेखांतून शिकस्त चालविली होती. श्री. शं. श्री. देवांच्या संशोधनाला राजवाड्यांनीं वाट करून दिली.

श्री. देवांच्या ठिकाणीं समर्थविषयक श्रद्धेचें बीज बालपणींच रुजलें होतें. श्री. देव लहान वयाचे असतां त्यांचे वडील सातार्‍यास राहात होते. तेथून दर शनिवारीं श्री. देवांच्या मातुःश्री सज्जनगडाला समर्थसमाधीच्या दर्शनाकरितां जात व त्यांच्या बरोबर हा मुलगा असे. त्या वेळीं घडणार्‍या सज्जनगडाच्या साप्ताहिक वारीनें समर्थांची भक्ति देवांच्या चित्तास जडविली. १८९० नंतर तीन चार वर्षे पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत शिकण्याच्या काळीं हनुमंतस्वामींनीं लिहिविलेल्या समर्थ-चरित्राच्या बखरीनें देवांची बालवयांतील श्रद्धा वाढीस लागून तीव्रत्व पावली. इतकी तीव्रत्व पावली कीं, त्याचें सारें आयुष्य तिच्या योगानें समर्थकार्यांतच वेंचलें. कै. भा. वा. भट हे देखील याच काळांतले व देवांप्रमाणें धुळ्यासच वकिली करणारे. समर्थांच्या भक्तीपुरते ते देवांचे सहकारी होते. मात्र दोघांच्या भक्तीचा रंग निराळा होता. देवांना राजवाड्यांचीं समर्थविषयक मतें अमान्य नसलीं तरी त्यांचा पाठपुरावा देवांनीं केलेला नाहीं. भटांना राजवाड्यांचीं मतें उचलून सावरून धरण्याची ओढ अधिक होती. कै. ल. रा. पांगारकर हे वारकरी संप्रदायांत मोडणारे. त्यांचा ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम या संतांबद्दल उत्कट जिव्हाळा होता. पांगारकर हे कार्यदृष्ट्या समर्थांना कांहीसें निराळें स्थान देत असले, तरी समर्थांची एकंदर शिकवण ज्ञानोबा-तुकारामांच्या परंपरेंतली, याविषयीं त्यांना केव्हांच संशय नव्हता.

८८११

राजवाड्यांच्या संशोधनाचा सगळा भर राजकीय वृत्तांताच्या कागदपत्रावर होता. हे कागदपत्र शोधतांना जुन्या मराठी संत कवींचें साहित्य नजरेसमोर आल्यास त्यांचाहि परामर्श राजवाडे करीत. परंतु त्यांची समर्थविषयक निष्ठा ज्वाज्वल्य असल्यामुळें समर्थांच्या हालहवालीचा एखादा अर्धामुर्धा कपटा जरी हातीं आला तरी त्या कपट्यांतूनहि आपल्या कल्पनेच्या बळानें एखादें राजकीय रंगाचें गुपित उघडकीस आणण्याला ते झटत असत. आपल्यास जें वाटतें तेंच खरें (मग त्याला वस्तु-स्थितीचा आधार असो वा नसो) असा त्यांचा जबर आत्मविश्वास होता. त्यामुळें

१५००८

आपल्या निराधार मनसोक्ताला प्रमाणशुद्ध निश्चितार्थांच्या दणदणीत शब्दांमध्यें मांडण्याला ते कचरत नसत. समर्थांसंबंधांतील अनेक निराधार विचित्र मतें रूढ होण्याला राजवाड्यांच्या आत्मविश्वासमूलक ठाम लेखनपद्धतीचें फार मोठें पाठबळ आढळतें.

श्री. देवांनीं सामान्य राजकीय इतिहासाचें संशोधन करण्याऐवजीं समर्थ व समर्थ-संप्रदाय यांचें संशोधन स्वीकारलें. १९०२ सालापासून त्यांचें संशोधन सुरू झालें व समर्थसंप्रदायाच्या मठांतील साहित्य हळुहळू त्यांच्याकडे जमूं लागलें. या कामीं त्यांचे धुळ्यांतील एक व्यवसायबंधु कै. गोविंद काशीनाथ चांदोरकर यांची त्यांना थोडी फार मदत झाली. तथापि एकंदर कामाचा भार जास्तींत जास्त देवांनींच उचलला व आतांपर्यंत चिकाटीनें वाहिला. १८९३ सालीं श्री. देवांसह इतर कांहीं समान विचारांच्या तरुणांनीं जी सत्कार्योत्तेजक सभा नांवाची संस्था धुळें शहरीं अस्तित्वांत आणली होती, तिचें नांव राखण्याचें श्रेय देवांनाच आहे. समर्थांच्या व समर्थ-सांप्रदायिकांच्या वाङ्मयप्रकाशनाचा मान सत्कार्योत्तेजक सभेला देऊन त्या संस्थेला देवांनीं विस्मृतीच्या संकटांतून आजवर वांचविलेलें आहे. देवांनीं भारतांत पसर-लेल्या महाराष्ट्रीयांकडून पैसा जमवून जांबेला समर्थमंदिर उभारलें (१९३२), पण महाराष्ट्रानें देवांचें सदैव ऋण मानावें असें त्यांचें धुळें येथील श्रीसमर्थवाग्देवता-मंदिर (१९३५) आहे. समर्थसंप्रदायाच्या मठांतून शेकडों वर्षे नाश पावत असलेला सांप्रदायिक व इतर हस्तलिखित वाङ्मयाचा विपुल आणि बहुमोल संग्रह केवळ सुरक्षितच नव्हे तर व्यवस्थितपणें या मंदिरांत एकत्र ठेवलेला आहे.

संशोधनाचें व मंदिरांच्या पूर्वतयारीचें काम वाढूं लागलें तेव्हां १९१५ सालीं देवांनीं श्री रामदास आणि रामदासी या नांवाचें मासिक काढलें. चर्चात्मक, संशोधनात्मक व प्रकाशनात्मक असें त्या मासिकाचें त्रिविध स्वरूप होतें. याखेरीज कांहीं वाङ्मयांची प्रसिद्धि स्वतंत्रपणेंहि चालू होती. मासिकाचीं चर्चात्मक व संशोधना-त्मक अंगें पुष्ट करण्याची कामगिरी कै. राजवाडे व कै. भट यांनीं बजावली आहे. भटांचें 'महाराष्ट्र-धर्म' हें पुस्तक या मासिकांतून क्रमशः बाहेर पडत होतें. हें मासिक केवळ श्री. देवांच्या स्वार्थत्यागावर १९५३ पर्यंत जगलें. देवांनीं उजेडांत आणलेले अनेक सांप्रदायिक ग्रंथ खपाच्या दृष्टीनें उत्साहजनक स्थितींत नाहींत. १९३५

सालीं श्रीसमर्थवाग्देवतामंदिराची स्थापना झाल्यावर या मासिकांतील चर्चात्मक लिखाणाचे दहा सुमनहार गुंफले गेले. त्यांत कायमच्या संदर्भाचें असें फारच थोडें लिखाण आहे.

श्री. देवांनीं आपल्या संशोधनाचा, चर्चेचा व अभ्यासाचा परिपाक या नात्यानें समर्थविषयक तीन ग्रंथ १९४२, १९४५ आणि १९४९ या वर्षांत अनुक्रमें श्री स म र्थ हृ द य, श्री स म र्थ सं प्र दा य व श्री स म र्था व ता र या नांवांनीं प्रसिद्ध केले. श्री स म र्थ हृ द य हा वाङ्मयपरिचयाचा ग्रंथ असून श्री स म र्था व ता रांत समर्थांचें चरित्र सांगितलें आहे. श्री स म र्थ सं प्र दा यांत व्यवहाराऐवजीं तात्त्विक विवेचन आहे. संशोधनापुरतें पाहिल्यास देव प्रमाणशुद्धीचा मान ठेवण्याला चुकत नाहींत. पण विवेचनामध्यें त्यांच्या समर्थविषयक श्रद्धेचा अतिरेक काय चमत्कार निदर्शनास आणील याचा भरंवसा धरतां येत नाहीं. समर्थांचीं सांप्रदायिक चरित्रें व हनुमंतस्वामीची बखर यामध्यें समर्थगौरवपर असें जें जें कांहीं ग्रथित असेल त्या सर्वांचा डोळे मिटून आदर करावा अशी त्यांची भावना दिसून येते. स्वतः देवांनीं प्रसिद्ध केलेल्या बखरींत जें नाहीं तें त्या बखरीच्या जुन्या मुद्रितामध्यें असेल तर त्याचा त्याग करण्याला देवांचें मन धजत नाहीं. पूर्वींच्या प्रमाणबाह्य समर्थगौरवामध्यें देवांनींदेखील आपल्या कल्पनांची बरीच भर टाकलेली आहे.

कै. भटांनीं म हा रा ष्ट्र-ध र्म या नांवाचें एक पुस्तक लिहिल्याचें पूर्वीं निवेदन केलें आहे. हा ग्रंथ १९२५ सालीं प्रसिद्ध झालेला असून १९२८ मध्यें शिव-समर्थ भेटीच्या वर्षाचा वाद उपस्थित झाल्यावर त्यांनीं शि व स म र्थां चा अ न्यो न्य सं बं ध व रा म दा सी सं प्र दा य (१९४९) अशीं दोन छोटीं पुस्तकें छापून काढलीं. शिव-समर्थांचा अन्योन्यसंबंध सिद्ध करण्यासाठीं भटांनीं जे पुरावे पुढें आणले आहेत ते अगदीं कच्चे आहेत. रा म दा सी सं प्र दा य या पुस्तकाची पुराव्याच्या व युक्तिवादाच्या दृष्टीनें अशीच दुर्दशा दृष्टीस पडते. शहाजी, शिवाजी, समर्थ यांच्या संबंधांत पुरावे म्हणून कांहीं बिनबुडाचीं थोतांडें भटांनीं नवीं निर्माण केलीं. त्यांचा विचार चित्रशाळाप्रकाशित श्री स म र्थ च रि त्रां त भरपूर केलेला आहे.

कै. ल. रा. पांगारकरांनीं १८९४ सालीं दा स बो ध वाचला, १८९५ सालीं रामदासांवर डेक्कन कॉलेजांत पहिलें व्याख्यान दिलें, १८९९ च्या पूर्वीं दा स बो धाचीं १०८

पारायणें झालीं होतीं, वगैरे माहिती त्यांनीं आपल्या चरित्रांत व मराठी वाङ्मयाच्या इतिहासापैकीं रामदासखंडांत (प्रस्ता० पान ९–१०) दाखल केलेली आहे. देव, भट हे ज्या संस्कारक्षम वातावरणांत वाढले त्याच वातावरणांतले पांगारकर हे एक होत, याचें निराळें स्पष्टीकरण नको. १९०८ मध्यें त्यांनीं प्रथम 'रामदासीबुवा' नांवाची एक संवादात्मक लेखमाला आपल्या 'मुमुक्षु' पत्रांत लिहिली व ती लोकप्रिय झाल्याच्या अनुभवामुळें तिला पुस्तकाचें रूप दिलें. पुढें सरकारानें तें पुस्तक जप्त केलें. १९५१ सालीं त्याचें पुनर्मुद्रण करण्यांत आलें, परंतु १९०८ सालांतील लोकप्रियतेला तें पुस्तक आतां मुकलेलें आहे. १९२४ मध्यें पांगारकरांनीं समर्थसंजीवनी या नांवानें समर्थवाङ्मयांतील वेंचे लोकांसमोर लांबलचक प्रस्तावनेनिशीं ठेवले. १९२७ मध्यें समर्थग्रंथभांडार नांवाच्या पुस्तकाचे दोन खंड त्यांनीं संपादून काढले. १९३९ सालीं त्यांचा वाङ्मयेतिहासांतील रामदासखंड प्रसिद्ध झाला. यांतील समर्थवाङ्मयाचा आढावा तेवढा त्यांच्या हातचा आहे. समर्थांबद्दल लिहितांना शिव-समर्थभेटीच्या वर्षाचा व 'राजकारण' या शब्दाच्या अर्थाचा असा दुहेरी वाद पांगारकरांना दृष्टीआड करतां आलेला नाहीं. परंतु १९२४ मध्यें समर्थसंजीवनीच्या प्रस्तावनेंत त्यांनीं जीं विधानें केलीं तीं त्या वेळचा नेट कायम ठेवून पांगारकरांना रामदासखंडांत सांगतां आलेलीं नाहींत. हा १९२९ सालामध्यें उपस्थित झालेल्या वरील दुहेरी हा वादाचा परिणाम समजावा लागतो. प्रस्तुत परिणामाचें एक उदाहरण येथें घेतल्यास पुरें होईल.

दासबोधांतील १९ : ९ हा समास राजकारण या नांवाचा आहे. १३ : ६ आणि १८ : ६ यांच्या बाबतींत जशी बखरींत कथा आहे तशी १९ : ९ या समासाबद्दल नाहीं. तरी पांगारकरांनीं आपलें डोकें चालवून समर्थसंजीवनी तयार केल्यावेळीं कल्पना काढली कीं समासाची रचना चंद्रराव मोऱ्याला उखडण्यासाठीं शिवाजी महाराजांनीं मिळविलेल्या कारस्थानी विजयाला अनुलक्षून झालेली असावी. ही कल्पना कागदावर ठेवतांना त्यांनीं जीं वाक्यें एकापुढें एक लिहून टाकलीं तीं नजरेखालीं घातल्यास पांगारकरांच्या स्वभावाचाहि बोध होऊं शकेल. हा समास समर्थसंजीवनीच्या ४७ पानावर असून आरंभीं कंसांत पुढील वाक्यें आहेत. 'हा महत्त्वाचा समास कोणास कोणत्या प्रसंगीं सांगितला हें नक्की नाहीं. तथापि यांत जावळीच्या

चंद्रराव मोऱ्यास शिवरायाच्या मंडळींनीं नामोहरम केला तें प्रकरण दिसतें. त्या प्रसंगापूर्वीच ही मसलत समर्थांनीं दिली असावी.' प्रस्तावनेच्या २२ व्या पानावर 'हें बहुधा चंद्रराव मोऱ्याच्या कारवाई प्रसंगीं शिवबांस सांगितलें असावें' असा याविषयीं खुलासा आहे. ४७ व्या पानांतील पहिलें वाक्य पुढील दोन्ही वाक्यांना मारक असून हीं दोन वाक्यें एकमेकांचा छेद करणारीं असल्याचें विचार करणारांना दिसून येईल. एखादी गोष्ट नक्की नसेल तर तिच्याविषयीं निराधार अनुमानें करण्याच्या उपद्व्यापांत पांगारकरांनीं पडावयाचें नव्हतें. तसें पडण्याचा मोह आवरेना, तर मग पुढचीं वाक्यें एकाच निश्चित अर्थाचीं लिहिणें जास्त शोभलें असतें. पण त्यांतलें एक वाक्य भूतकालवाचक आहे तर दुसरें भविष्यसूचक आहे. पांगारकरांच्या लेखनांत अशी धरसोड पुष्कळच अनुभवास येते. आपल्या रामदास-खंडांत त्यांनीं या समासाची माहिती सांगतांना चंद्रावप्रकरणाला साफ बगल दिली आहे (रामदास खंड, पान ५९४). चुकीचे आधार बेधडक नमूद करणें हा पांगारकरांचा आणखी एक विशेष आहे. त्याची झडती न घेतां राजकारणाविषयीं त्यांचा अभिप्राय पाहणें योग्य होईल.

'गेल्या ५० वर्षांत कांहीं सुशिक्षितांचें लक्ष समर्थांकडे वेधलें आहे; पण तेहि त्यांच्या राजकारणावरच टोकून बसले आहेत.' (रामदास खंड, पान २६७).

'दासबोध हा परमार्थाचा म्हणजे हरिकथानिरूपणाचा ग्रंथ आहे.... दासबोधावर दासबोधाची किल्ली, कुबडी इ० जे चार दोन छोटे ग्रंथ आहेत त्यांनींहि दासबोध हा अध्यात्माचा ग्रंथ आहे असें म्हटलें आहे. श्रीकल्याण-स्वामींनीं दासबोधाच्या आरतींत 'वेदान्तसंमतीचा काव्यसिंधु भरला। अज्ञान जडजीवां मार्ग सुगम जाला' असें म्हटलें आहे. शिवाय गेल्या २५० वर्षांत ज्या ज्या लोकांनीं दासबोधाचें श्रवणपठण केलें त्यांनींहि दासबोधाकडे परमार्थदृष्टीनेंच पाहिलें आहे.' (कित्ता, पान ३१५).

रामदास खंडांत पांगारकरांनीं 'समर्थांचें राजकारण व राजकारणशास्त्र' ५८० पानापर्यंत पुढें ढकललें आहे. राजकारणांत त्यांनीं अनेक विषय कालवल्यामुळें त्यांना राजकारणाची बतावणी ज्या युक्त्यांनीं रेटावी लागली, त्या युक्त्या पुढील उताऱ्यां-तून दिसतील.

'कार्यकर्ते कसे असावेत, त्यांनीं कोणतें राष्ट्रकार्य कसें करावें, हें त्यांनीं सांगितलें आहे. कार्याची मुख्य मदार कर्त्यांवर, म्हणून त्यांनीं कार्यकर्त्यांस परोपरीनें चेतना दिली आहे. कार्यकर्ते, महंत, राजकारणी, पुढारी, हे जवळ जवळ एकच आहेत व भिन्न असले तरी सर्वांसच हा त्यांचा बोध उपकारक आहे.' (पान ५८१).

'व्यक्तीचा प्रपंच. समुदायाचें राजकारण. प्रपंचांत एका व्यक्तीच्या व कुटुंबाच्या हितसंबंधाचे विचार येतात. राजकारणांत अनेक व्यक्तींच्या किंवा समुदायाच्या हितसंबंधाचे विचार येतात. व्यापक प्रपंच म्हणजे राजकारण.' (पान ५८१-८२).

'अलीकडे ज्याला Politics म्हणतात, त्यापेक्षां समर्थांचें राजकारण अधिक व्यापक दृष्टीचें आहे.' (कित्ता).

'समर्थांनीं प्रत्यक्ष कोणतें राजकारण केलें हें आज सांगणें कठिण आहे. त्याबद्दल निस्संदेह पुरावा आज उपलब्ध नाहीं; पण त्यांनीं राजकारण केलेंच नाहीं असें म्हणणेंहि दुराग्रहाचें आहे. फौज कशी उभारावी, लष्कराच्या हालचाली कशा कराव्या, मंत्रिमंडळांत कोणाला कोणत्या अधिकारावर नेमावें किंवा कोणाला काढावें, शेतीशास्त्र, अर्थशास्त्र किंवा व्यापार कोणत्या धोरणावर चालवावे, किल्ले नवे कोठें बांधावेत व कोणते दुरुस्त करावेत, असल्या व्यावहारिक राजकारणांत समर्थ पडले असतील असें वाटत नाहीं; तथापि त्यांनीं राजास राजधर्म, क्षत्रियांस क्षात्रधर्म व अंमलदार लोकांस सेवाधर्म उत्कृष्ट सांगितले असून त्यांत या धर्मांचीं सूक्ष्म तत्त्वें सांगितलीं आहेत....कार्यकर्त्यांस महाराष्ट्राचें वैभव वाढविण्याविषयीं स्फूर्तिदायक उपदेश केला आहे.' (कित्ता, पान ५८३).

हे उतारे वाचतांना ध्यानीं धरावें कीं पांगारकरांनीं राजकारणाचा आव राखण्यासाटीं कार्यकर्ते, महंत, राजकारणी, पुढारी या सर्वांना एकाच दावणींत बांधलें आहे. प्रत्यक्ष राजकारण केल्याचा पुरावा नाहीं, हें पांगारकरांचें मत लक्षांत घेऊन वाचकांनीं जास्त विचार केल्यास दिसून येईल कीं, समुदायाच्या संदर्भांत समर्थांनीं 'राजकारण' शब्द आणल्याचें पांगारकरांना उमगलें, पण समुदाय कशासाटीं हें सांगण्याची जबाबदारी त्यांना खटकली नाहीं. म्हणून आपल्या मागें भजन चालण्याकरितां समुदाय हवा, त्यानें महोत्सव करावा, ही १२ : १० तील समुदायाच्या आवश्यकतेची समर्थांची भूमिका त्यांना टाळतां आली. समर्थांनीं प्रत्यक्ष राजकारण

केल्याचा जर निस्संदेह पुरावा उपलब्ध नाहीं तर त्यांनीं राजकारण केलें नाहीं, असें म्हणण्यांत दुराग्रह कसा याचा पांगारकरांनीं खुलासा केलेला नाहीं. राजाला राजधर्म, क्षत्रियाला क्षात्रधर्म किंवा अंमलदारांना सेवकधर्म ऐकविल्यानें राजकारण कसें घडतें याचेंहि त्यांच्या लेखनांत स्पष्टीकरण नाहीं. कार्यकर्ते, महंत, राजकारणी, पुढारी हे सगळे जवळ जवळ एकच आहेत व भिन्न असले तरी या सर्वांना सारखाच उपकारक होणारा बोध फक्त राजकारणाचा असूं शकत नाहीं, हें पांगारकरांना कळलेलें दिसत नाहीं. तथापि त्यांच्या वरील मताचें राजकारणाला बाधणारें तात्पर्य झांकलें जाणारें नाहीं.

राजकारणपर चर्चेंत पांगारकरांचे विचार निश्चित व स्थिर नसले, तरी १९:९-बद्दल त्यांनीं म्हटलें आहे : 'दासबोधांत संपूर्ण राजकारणाचा समास म्हणजे १९ व्या दशकाचा ९ वा समास!' हा कुणाला सांगितला हें समजण्याला मार्ग नसल्याचें कबूल करून पांगारकरांचें अधिक स्पष्टीकरण आहे : 'समुदाय अगर संघटना करणाऱ्या धार्मिक महंतास किंवा व्यावहारिक राजकारण करणाऱ्या पुढाऱ्यास त्यांत अगदीं गुलदस्तांतलें राजकारण सांगितलें आहे. शठं प्रति शाठ्यम् हें येथलें सूत्र आहे!' (किता, पान ५९४–५९५)

कै. लो. टिळकांनीं आपल्या गीतारहस्यांत (पान ३६०) हा समास विचारांत घेऊन जो अभिप्राय दिला आहे त्याच्या योगानें पांगारकरांच्या कल्पनेंतील 'शठं प्रति शाठ्यम्'च्या अगदीं गुलदस्तांतील राजकारणाचा उलगडा होण्याला हरकत पुरुष् । नाहीं. स्वार्थपरायण लोकांच्या कल्याणार्थच साधु आपले उद्योग केवळ कर्तव्य म्हणून वैराग्यानें सुरू ठेवीत असतात. 'हेंच तत्त्व मनांत ठेवून श्रीसमर्थ रामदासस्वामी यांनीं दासबोधाच्या पूर्वार्धांत प्रथम ब्रह्मज्ञान सांगून, स्थितप्रज्ञ किंवा उत्तम पुरुष लोकांना शहाणे करून सोडण्यास वैराग्यानें किंवा निःस्पृहपणानें लोकसंग्रहार्थ जो व्याप अगर उद्योग करीत असतात त्याचें वर्णन करण्यास अकराव्या दशकांत सुरवात केली आहे...परंतु या निःस्पृहास लोभी मनुष्यांतच वागावयाचें असल्यामुळें

**घटासी आणावा घट । उद्धटासी पाहिजे उद्धट ।**
**खटनटासी खटनट । अगत्य करी ॥**

असा अखेरीचा समर्थांचा उपदेश आहे (दास० : १९ : ९:३०).' हा उतारा

'सिद्धावस्था आणि व्यवहार' या प्रकरणांतला आहे. " 'शठं प्रति शाठ्यम्' हा सिद्धांत अध्यात्मशास्त्रास शोभण्यासारखा नाहीं, पण व्यावहारिक राजकारणांत त्याचेंहि कधीं कधीं अगत्य पडतें" असें पांगारकर म्हणतात (रामदास खंड, पान ५८०). 'शठं प्रति शाठ्यम्' हा उपाय केवळ राजकारणाच्या व्यवहारांत अवश्य असतो व इतर सामान्य व्यवहारांत त्याची केव्हांहि गरज नसते ही पांगारकरांची समजूत चुकीची असल्याचें टिळकांच्या अभिप्रायावरून ध्यानांत येणारें आहे.

समर्थ व त्यांच्या पूर्वींचे साधुसंत यांच्या मुख्य शिकवणींत फारसा फरक नसल्याचें विवेचन पांगारकरांनीं रामदास खंडाच्या १९४–२०४ आणि २६७–२६८ पानांत केलेलें आहे. १९०५ नंतर देशांत उद्भवलेल्या क्षुब्ध राजकीय वातावरणाच्या परिणामीं धारकरी-वारकरी, परळी-पंढरी वगैरे जे वाद उद्भवले त्याला उत्तर देण्याचा हा प्रयत्न जिज्ञासूंनीं पाहावा. पांगारकरांनीं ज्ञानेश्वर-एकनाथादिकांच्या वाङ्मयाप्रमाणें समर्थ-वाङ्मयाचा अभ्यास केल्याची गोष्ट स्पष्ट व सर्वमान्य असल्यामुळें वारकरी संत व समर्थ यांच्या शिकवणीसंबंधांतील पांगारकरांच्या एकवाक्यतादर्शक विवेचनाला महत्त्व आहे.

पांगारकरांखेरीज इतर जनांकडे नजर टाकतांना प्रथम पांगारकरांच्या वळणांतील कऱ्हाडचे कै. सदाशिव खंडो आळतेकर यांच्या श्री स म र्थ च रि त्रा चा (सन १९३३) उल्लेख करणें अवश्य आहे. या पुस्तकाचा विशेष म्हणजे समर्थचरित्रपर प्रकाशित व उपलब्ध वाङ्मयाची प्रारंभीं दिलेली सटीक जंत्री हा होय. शिव-समर्थ भेटीच्या वर्षाचा व राजकारणाच्या अर्थाचा वाद कै. आळतेकरांनीं चर्चेस घेऊन आपलें स म र्थ च रि त्र रचलें आहे. राजवाडेपक्षाचीं म्हणजे समर्थांच्या अनन्वित गौरवाचीं मतें सप्रमाण असल्याचें दाखविण्याचा खटाटोप आळतेकरांनीं केलेला आहे. या खटाटोपाचें किंचित् स्वरूप कळण्यासाठीं त्याचा एक मासला येथें दिल्यानें काम भागेल. शिव-समर्थांची भेट १६४९ मध्यें झाली हें मत कै. टिळकांनाहि मान्य होतें, असा भास आळतेकरांनीं गी ता र ह स्या च्या ४३५ व्या पानाच्या उल्लेखानें उत्पन्न केला आहे (पान १२९). या पानावर तुकारामबोवांनीं रामदासांना शरण जाण्याविषयीं शिवाजीला सल्ला दिल्याचा मजकूर आहे. त्याचा शिव-समर्थांच्या भेटीचें वर्ष कोणतें या प्रश्नाशीं मुळींच संबंध नाहीं. टिळकांना गी तेच्या तोडीची दा स बो धाची

योग्यता असल्याचें वाचकांना पटवावयाचें आहे. शिवसमर्थ भेटीचें वर्ष त्यांनीं तेथें सुचविलेलें नाहीं. यामुळें आळतेकरांनीं टिळकांचें नांव या वादांत निष्कारण गोवलें असें म्हणणें प्राप्त आहे. 'समर्थांनीं महाराजांना अनुग्रह दिल्याचा काल शके १५७१ वैशाख मास हाच आहे असें कै. लो. टिळक यांचेंहि मत होतें' या आळतेकरांच्या वाक्याला गी ता र ह स्या च्या ४३५ व्या पानावरील मजकुरांत कसलाच आधार नाहीं.

१९२८ सालीं श्री. अनंतदास रामदासी यांनीं समर्थांच्या संकीर्ण कवितांचा एक गाथा प्रसिद्ध करून तिला १४४ पानांची समर्थचरित्रपर प्रदीर्घ प्रस्तावना जोडली आहे. प्रस्तावना कसली, तो लहानसा ग्रंथच आहे. पण त्याचें दुर्दैव असें कीं श्री. देवांनीं आपल्या स म र्था व ता राच्या आधारग्रंथांत त्याला पूर्णपणें उपेक्षिलें असून कै. भटांनीं देखील आपल्या पुस्तकांतून त्याला मान दिलेला नाहीं. या प्रस्तावनेंत कल्पनेच्या खेळाचा अजबखाना भरलेला आहे. वाकेनिशी टिपणांतील शिव-समर्थ-विषयक नोंदींच्या यथार्थतेचें समर्थन करण्यासाठीं श्री. अनंतदासांनीं विलक्षण प्रयास घेतले आहेत. सुतानें स्वर्गाला जाण्याच्या म्हणीचा दारुण प्रयोग लेखकानें केलेला आहे. ऐतिहासिक वस्तुस्थितीचें बारकेंसेंहि सूत न सांपडल्यास आपल्या कल्पनेच्या जाड तंतूंनीं समर्थांच्या राजकारणाचा स्वर्ग साधण्याचा यत्न श्री. अनंतदासांनीं केला आहे. शिवाजीमहाराज हा मुळांतला निर्जीव पुतळा समर्थांच्या चैतन्यप्रेरणेनें वा साह्यानें स्वराज्यसाधनाचा नायक कसा बनविला याची कल्पनाप्रचुर मनोरंजक शहानिशा या प्रस्तावनेंत वाचकांना पहायला सांपडेल.

श्री. ज. स. करंदीकर आणि श्री. अनंतदास यांची शिव-समर्थचरित्र नुसत्या अनुमानधपक्यानें लावण्याची तऱ्हा एकाच नमुन्याची आहे. वाकेनिशी टिपण, स म र्थ प्र ता प, दा स वि श्रा म धा म, प र्णा ल प र्व त ग्र ह णा ख्या न इत्यादि साहित्यांतील हवा तो भाग यथेच्छ घेऊन आपल्यास इष्ट वाटणारी गोष्ट घडल्याचें पटविण्यासाठीं असे निरनिराळ्या ठिकाणचे घेतलेले भाग एकत्र मिसळावयाचे व त्याला भडक शब्दांच्या मसाल्यानें चटकदारपणा आणावयाचा, अशी श्री. करंदीकरांची तऱ्हा आहे. आपण जो पुरावा देतों त्याला आपल्या अनुमानांच्या धडाक्यांत आगापीछा रहातो कीं नाहीं, तो मोडतो कीं चुरगळतो, चालविलेल्या ओढाताणींत जसाच्या तसा शाबूत राहतो कीं निराळेंच रूप धारण करतो, याकडे अनुमानांचें स्वंथ सुरू

झाल्यावर श्री. करंदीकरांचें लक्ष जात नाहीं. ज्याच्या विश्वासावर आपलीं अनुमानें तो कितपत विश्वासार्ह, आपले आधार मुळाबरहुकूम आहेत का त्यांत आपल्या पूर्वग्रहाचा कांहीं विकार बळावलेला आहे, या संबंधाचा विधिनिषेध श्री. करंदीकरांपाशीं नसल्याचीं उदाहरणें नजरेखालीं घालण्याजोगीं आहेत.

पांगारकरांनीं समर्थसंजीवनीमध्यें समर्थवाङ्मयांतील उतारे देतांना कित्येक अत्याचार केले आहेत. १९ : ९ समासाचें नांव मुळांत नुसतें राजकारण असतां त्यास 'धूर्तपणाचें राजकारण' असें पांगारकरांनीं नवें नांव ठेवलें व चंद्रराव-प्रकरणाशीं त्याचा मेळ घातला. तसाच प्रकार त्यांनीं एका कवितेमधील दोन उतारे घेऊन जणूं काय त्या दोन भिन्न कविता आहेत अशा समजुतीनें त्यांवर गयाळ-गचाळ राजा व खबर्दार राजा असे मथळे टाकून केला. सावधता-सावधानता या नांवानें समर्थांच्या वाङ्मयांत प्रसिद्ध केली जाणारी कविता केव्हां कोणत्या कारणामुळें लिहिली याचा कवितेंतील आशयावरून बोध होत नसतां, शिवाजीमहाराजांनीं समर्थांना राज्य अर्पण केल्यावेळची ती कविता आहे, अशी कल्पना त्या कवितेला जोडण्याचा प्रघात पडला आहे. राज्यार्पणाचा प्रसंग शके १५७७ तला असा मजकूर वाकेनिशी टिपणांत असून तें वर्ष चंद्ररावाशीं चाललेल्या कटकटीच्या काळांतलें आहे. एवढ्या आधारावर शिवाजीमहाराज तेव्हां वैतागले होते, म्हणून त्यांनीं राज्यत्यागाचा बेत अंमलांत आणला व सावधतानामक कवितेच्या मात्रेनें समर्थांनीं शिवाजीमहाराजांना ताळ्यावर आणलें, अशी नवी कथा समर्थांच्या चरित्राला जोडली जाऊं लागली आहे. पांगारकर व श्री. अनंतदास यांच्या कथा-मथळ्याचें गौडबंगाल श्री. करंदीकरांनीं डोक्यावर घेतलें आहे. या कथेच्या अनुषंगांतील श्री. करंदीकरांची मौज निराळीच आहे.

श्री. करंदीकर समजून चालले आहेत कीं, 'अखंड सावधान' या शब्दांनीं जिचा उल्लेख श्रीसंप्रदायाचीं कागदपत्रें खंड १ या पुस्तकाच्या ४३ व्या लेखाकांत आहे ती कविता म्हणजे सावधता-सावधानता या नांवानें ओळखली जाणारी कविता. पण एवढ्यानें श्री. करंदीकरांच्या समजुतीची लीला संपलेली नाहीं. ते पूर्वोक्त ४३ व्या लेखांकाला संभाजीस समर्थांनीं पाठविलेलें पत्र म्हणतात, ही त्यांच्या बुद्धीची खरी मौज आहे. संभाजीस लिहिलेलें पत्र ओंवीबद्ध आहे व ४३ वा लेखांक गद्य

आहे. त्या लेखांकांत समर्थांनीं अवतारसमाप्ति जवळ आली असतां उच्चारलेल्या अनेक आठवणींची नोंद आहे. तथापि श्री. करंदीकरांनीं खुशाल लिहून टाकलें आहे कीं, समर्थांनीं संभाजीकडे जें उपदेशपत्र लिहिलें त्या पत्रांतच "पूर्वीं राज- श्रीस राजधर्म क्षात्रधर्म अखंड सावधान ऐसीं पत्रें पाठविलीं होतीं..." (श्री. ज. स. करंदीकर यांचे निवडक लेख व निबंध, खंड २, पान १५८ वर या मजकु- राच्या नोंदीला त्यांनीं संभाजीचें पत्र म्हटलें आहे.) यावरून श्री. करंदीकरांच्या बुद्धीला झपाटणारा संदर्भविषयक बेशुद्धीचा झटका कसा जबर आहे हें लक्षांत येईल. सदर लेखांक शके १६०३ चा असतां श्री. करंदीकरांनीं त्याला अलीकडे १६०२ त ओढलें आहे. 'सावधता—सावधानता' या नांवाची कविता व 'अखंड सावधान' या शब्दांनीं ज्याचा प्रारंभ आहे तें समर्थांनीं संभाजीस पाठविलेलें पत्र यांचा एक- मेकाशीं मुळींच संबंध नाहीं. ४३ व्या लेखांकांतील 'अखंड सावधान' या शब्दांनीं सुचविलेलें पत्र संभाजीस लिहिलेलें ही गोष्ट संशयातीत असतां श्री. करंदीकर त्याला 'सावधता' नांवाची कविता समजतात, हा चमत्कार लहानसान नाहीं. रामदासी संशोधनाच्या एका बाडांत या कवितेला आणखी ११ ओव्या जोडून त्यासकट सबंध कवितेला 'महंतलीळा' असें नांव दिल्याची श्री. करंदीकरांना दाद नाहीं. ४३ व्या लेखांकांतील मजकुराचें मनन केल्यास त्यांना बोध होईल कीं राजधर्म, क्षात्रधर्म व अखंड सावधान हीं तिन्ही पत्रें राजश्रीस म्हणजे एकट्या संभाजीस लिहिलेलीं असावीं. पहिलीं दोन तेवढीं शिवाजीस लिहिलेलीं व अखंड सावधान हें फक्त संभाजीस लिहिलेलें असा पंक्तिप्रपंच करायला नोंदींतील 'राजश्रीस' या शब्दानें अवकाश ठेवलेला नाहीं. ही नोंद छापतांना श्री. देवांनीं त्या शब्दाकडे दुर्लक्ष करून 'शिवाजीस' असा खुलासा तळटीपेंत केला. श्री. करंदीकरांनीं तो डोळे मिटून स्वीकारला व ती नोंद म्हणजे संभाजीस लिहिलेलें पत्र या समजुतीचें ठिगळ लावून पूर्वीच्या घोटाळ्यांत भर टाकली. पण ज्याला वर चमत्कार म्हटलें त्याच्या मागील श्री. करंदीकरांचा अंध आत्मविश्वास जास्त स्पष्ट करायला पाहिजे.

ज्या पुस्तकांतल्या लेखांतून श्री. करंदीकरांच्या विचित्र समजुतीची माहिती येथें सादर केली आहे ते लेख १९३० मध्यें दिलेल्या व्याख्यानांचे अहवाल असून तेव्हां केसरींत प्रसिद्ध झाले व १९५२ सालीं 'निवडक लेख व निबंध' या

पुस्तकाच्या द्वारें लोकांपुढें आले. व्याख्यानांचा अहवाल तयार करतांना आधारांचा खरेखोटेपणा पारखण्याला जी सवड होती, तिचा १९३० मध्यें श्री. करंदीकरांनीं उपयोग केलेला नाहीं. १९५२ मध्यें आपल्या पुस्तकांत त्या अहवालांचा समावेश करतांनाहि १९३० मधील मजकुराची फेरपाहणी करण्याची श्री. करंदीकरांना जरूर वाटली नाहीं. आपण एकदां जें बोललों व लिहिलें त्याचा खरेपणा वज्रलेप असल्याच्या प्रबळ अंध आत्मविश्वासाखेरीज मागें निदर्शनास आणलेल्या बेशुद्धीच्या चमत्काराबद्दल दुसरें कोणतेंच कारण संभवत नाहीं.

वाकेनिशी टिपण समर्थांचा कारभारी असलेल्या दिवाकर गोसाव्यानें स्वतः लिहिलें (पान १५४) ही श्री. करंदीकरांची कल्पना अशीच निर्मूल आहे. दिवाकरानें 'अंताजी गोपाळ वाकेनीस कुडाळकर यास लेहून ठेवावयास सांगितलें' असा टिपणाच्या शेवटीं मजकूर असून टिपणाच्या सुरवातीसहि त्याच अर्थाचीं वाक्यें आहेत. भक्तमंडळींनीं लिहून ठेवलेल्या हकीकती वाकेनिशीस लिहिण्याबद्दल दिवाकरानें सांगितल्यावरून अंताजी गोपाळ देशकुलकर्णी परगणे कुडाळ 'तेहि लिहिले शके दुर्मती नाम संवत्सरे माघ वद्य १३ सौम्यवासरे तद्दिने लिख्यते' असा सुरवातीचा मजकूर आहे. या दोन्ही ठिकाणच्या मजकुरांत दिवाकरानें स्वतः टिपण लिहिलें, हा आशय स्वीकारण्याला लवमात्र जागा नाहीं. तथापि राजवाड्यांनीं त्या टिपणाला जें भाष्य जोडलें आहे तें त्यांच्या निःशंक स्वभावानुसार दडप्या विधानांनीं ठासलेलें आहे. 'स्वतः समक्ष पाहिलेल्या समर्थांच्या लीलांचें टिपण दिवाकर गोसावी त्या त्या वेळीं स्मरणार्थ करून ठेवीत असत. शिवाय, अंताजी गोपाळानें हें टिपण केलें त्या वेळीं ह्या टिपणाच्या विश्वसनीयतेबद्दल समर्थांची ही अनुग्रहलीला प्रत्यक्ष ज्यांनीं पाहिली ते दिवाकर गोसावी हजर होते.' समर्थांनीं शिवबावर ज्यावर्षी अनुग्रह केला त्या वर्षाचें 'विधान अंताजी गोपाळानें दिवाकर गोसाव्यांच्या टिपणावरून केलेलें आहे.' हीं वाक्यें म्हणजे राजवाड्यांचीं स्वैरचेष्टितें होत. वाकेनिशी टिपणाच्या आदिअंतीं असलेल्या खुलाशांत दिवाकरानें टिपण लिहिलें किंवा तें लिहिलें जात असतांना दिवाकर हजर होता किंवा तें लिहिल्यानंतर दिवाकरानें त्याला मान्यता दिली, यांतली एकहि गोष्ट घडल्याचें ठरविण्याला आधार नाहीं. समर्थांच्या अवतारसमाप्तीनंतरच्या आठवड्यांत हें टिपण लिहिलें गेलें

व लिहिण्याचें काम दिवाकराच्या सांगण्यावरून झालें, एवढाच त्या खुलाशाचा इत्यर्थ आहे. परंतु राजवाड्यांनीं दडपून केलेल्या स्पष्टीकरणाच्या बेतालावर श्री. करंदीकरांनीं आपली लेखणी नाचविली आहे.

आपलें लिहिणें, बोलणें साधार असतें, असें लोकांना भासविण्याकरितां श्री. करंदीकर ज्या आधारांचें इतस्ततः प्रदर्शन करतात त्याची वंचकता वाकेनिशी टिपणाच्या संदर्भानें दाखविली. आणखी एक वंचकतेचें उदाहरण पहाण्याजोगें आहे. १९३० सालच्या व्याख्यानवृत्तांमध्यें एका ठिकाणीं त्यांनीं पर्णालपर्वतग्रहणाख्यानाचा निर्देश केला आहे (पान १५५), तो संभाजीचें तथोक्त पत्रांतील गद्य वाक्य आणि वाकेनिशी टिपण दिवाकरानें स्वहस्तें लिहिणें या वंचक प्रकारांपैकींच आहे. पन्हाळा घेतल्याचें कळतांच रायगडाहून शिवाजी महाराज तिकडे जाण्यास निघाले. 'पाठी मागून समर्थहि पन्हाळगडास गेले. तेथें एक दिवस राहून अमात्याच्या घरीं कीर्तन करून समर्थ परतले.' अवतरणचिह्नांकित वाक्याचा आधार काय, तर 'पर्णालपर्वतग्रहण काव्य पहा' असें श्री. करंदीकरांचें कंसांत सांगणें आहे. या काव्याच्या प्रसिद्ध असलेल्या पुस्तकांत जर समर्थांचें नांव देखील नाहीं तर समर्थांचें पन्हाळ्यावर जाणें, रहाणें व अमात्याच्या घरीं कीर्तन करून परतणें ही श्री. करंदीकरांची भाकड कथा त्यांत कशी सांपडणार? काव्यांत एक गोस्वामी आहे व काव्याच्या भाषांतरांत त्याबद्दल समर्थ हा शब्द कंसांत ठेवला आहे. क्षणभर तेथील गोस्वामी व समर्थ हे भाषांतरकर्त्यांच्या भावनेप्रमाणें एकच होत असें गृहीत केलें, तरी तो गोस्वामी पन्हाळयास गेल्याची-राहिल्याची वगैरे माहिती काव्यांत नाहीं. तथापि पन्हाळा घेण्याचें कारस्थान समर्थांनीं शिजविलें या उरुन्या समजुतीच्या अवसानांत श्री. करंदीकरांनीं पर्णालपर्वतग्रहण काव्याचें नांव ठोकून दिलें. त्यांच्या समर्थविषयक लेखनाची जास्त बारकाईनें तपासणी केल्यास असले दडपादडपीचे चमत्कार कितीतरी दाखवितां येतील. तसे आणखी एकदोन चमत्कार या पुस्तकाच्या शेवटीं उघडकीस आणलेले आहेत.

पूर्वीच्या समर्थभक्तांनीं केलेल्या समर्थविषयक लेखनाचें सटीक समालोचन करण्याची काय आवश्यकता होती, असा प्रश्न उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. असें समालोचन टाळणें शक्य असतें तर अवश्य टाळलें असतें. परंतु गेल्या ५०–६०

वर्षांतील समर्थविषयक ज्ञानाची अवस्था लक्षांत येण्याकरितां हें समालोचन करावें लागलें. समर्थविषयक अभिमान व अभ्यास यांमध्यें फार मोठें अंतर आहे, या प्रारंभीं केलेल्या विधानाची सयुक्तिकता आतां पटेल. राजवाड्यांनीं दासबोधांत नसलेल्या गोष्टी आहेत असें सांगितल्याला ५० वर्षे झालीं. परंतु त्यांच्या लेखनाबद्दल एवढ्या मोठ्या कालावधींत आक्षेप उठला नाहीं. उलट, थोड्या फार फरकानें त्यांच्या विचाराचा अनुवादच वाढत्या अविवेकानें होत राहिला. या गतानुगतिकत्वाची जाणीव जिज्ञासू जनतेला झाली पाहिजे. त्याखेरीज समर्थ-विषयक ज्ञानाला योग्य दिशा लागणार नाहीं. या संबंधांतील जे मतभेद आहेत ते समर्थांच्या चरित्राला व वाङ्मयाला भलत्याच अभिमानानें चोपडल्या जाणाऱ्या रंगा-वरून निघालेले आहेत. गेल्या दोन अडीचशें वर्षांतील भाविकांनीं समर्थांचें चरित्र अद्‌भुत दैवी चमत्कारांच्या सामग्रीनें तयार केलें, तर गेल्या पन्नाससाठ वर्षांतील समर्थाभिमानी उजेडांत आलेल्या वाङ्मयांतील कांहीं अंशांची ओढाताण करून शिवाजीमहाराजांचें स्वराज्यसाधन म्हणजे समर्थांचें चरित्र असें भासवीत आहेत. एकदां श्रद्धाशीलांनीं जुन्या चरित्रांचा विश्वास बाळगला; आतां देखील तसाच अंधविश्वास अनुभवास येतो. समर्थांचें चरित्र आणि वाङ्मय हा ज्ञानाचा विषय आहे व तो ज्ञानाच्या कठोर कसोटीवर घासून पुसून जेवढा ग्राह्य ठरेल तेवढाच घेतला पाहिजे. या बाबतींत कसलीच व कोणाचीहि भीडमुर्वत धरण्याचें कारण नाहीं. याच दृष्टीनें येथें अनेक पूर्वलेखकांच्या कामगिरीचें परीक्षण केलें आहे. समर्थवाङ्मयाच्या समालोचनांत वस्तुतः राजकारण, महाराष्ट्रधर्म, इत्यादि प्रकरणें लिहिण्याचें कारण नव्हतें. पण कै. राजवाडे, कै. पांगारकर, कै. भट आणि श्री. देव प्रभृतींनीं त्या विषयांकडे अगत्यानें लक्ष पुरविल्यामुळें त्यांचा विस्तारानें विचार करावा लागला. हा विचार करतांना पूर्वींच्या ग्रंथकारांनीं समर्थवाङ्मयांतून जीं ऐतिहासिक अनुमानें किंवा वस्तुस्थिति मांडण्याचा यत्न केला त्यांतील दोष दाखविणें भाग पडलें. समर्थासंबंधाचें वाङ्मय पुष्कळच असून तें विखुरलेलें असल्यामुळें सामान्य जिज्ञासूला मुद्दाम खटपट केल्याशिवाय उपलब्ध होणारें नाहीं. तथापि ज्याला समर्थांच्या चरित्राचा आणि वाङ्मयाचा सत्यान्वेषणबुद्धीनें अभ्यास करावयाचा असेल, त्यानें तें सर्व वाङ्मय मिळवून बारीक अभ्यास केला पाहिजे व आपल्या अभ्यासाचे निर्णय लोकांना निर्भयपणें सांगितले पाहिजेत. त्याशिवाय

समर्थविषयक खऱ्या ज्ञानाचा—मग तें वाङ्मयासंबंधाचें असो किंवा चरित्राविषयीं असो—प्रसार व्हावयाचा नाहीं व गेल्या ५० वर्षांत चाललेला सावळागोंधळ थांबायचा नाहीं.

प्रस्तुत 'रामदास : वाङ्मय आणि कार्य' यामध्यें कै. पांगारकरांचा रामदास खंड व श्री. देवांचें 'श्रीसमर्थहृदय' या ग्रंथाशीं तुलना केल्यास निराळेपणा कोणत्या बाबतींत आहे, हें जिज्ञासूंना सहज कळणारें आहे. कदाचित् या पुस्तकांतील 'संमार्जन' हा भाग अनवश्यक अथवा कंटाळवाणा वाटण्याचा संभव आहे; परंतु कै. पांगारकर, आळतेकर आणि श्री. देव या तिघांनीं दासबोधांतील शिकवणीचें थोडें फार स्पष्टीकरण स्वमतानुसार केल्याचें न विसरल्यास 'संमार्जना'ची आवश्यकता पटण्याला हरकत नाहीं. दासबोधाची शिकवण समासवारीनें गद्यांत संक्षेपानें देऊन त्यास समर्थांच्या इतर वाङ्मयांतील समान विचार जोडल्यामुळें अभ्यासकांची अधिक सोय झाली आहे. 'अनुष्ठानां'त दासबोधांतील शिकवणीचीं मुख्य मुख्य अंगें एकत्र मांडलेलीं आहेत. समर्थांच्या साऱ्या उपदेशाचें स्वरूप थोडक्यांत समजून घेण्याला त्याचा उपयोग होईल. समर्थांचा 'उत्तम पुरुष' एका स्वतंत्र प्रकरणांत दाखविलेला आहे व त्याच्या मागून विवाद्य विषयांची चर्चा करून नंतर समर्थांच्या दासबोधेतर कवितेचा आढावा दिलेला आहे.

या पुस्तकांत वाचकांना पुनरुक्तीचें प्राचुर्य आढळेल. हा दोष आजच्या समर्थविषयक ज्ञानाच्या स्थितींत टळणें शक्य नाहीं. पूर्वीच्या लेखकांनीं निर्माण केलेली गुंतागुंत दाखवून ती उकलण्याचा यत्न करणाराला पुनरुक्तीचा दोष पत्करावा लागतो. यामुळें तो क्षम्य समजला जाईल, असा भरंवसा आहे.

शेवटीं श्री. भागवतबंधू व त्यांतल्या त्यांत श्री. श्री. पु. भागवत यांचे एकंदर प्रकाशनानिमित्त व प्रा. वसंतराव दावतर आणि चि. बा. न. फाटक यांनीं सूची तयार करून दिली म्हणून मनःपूर्वक आभार मानून ही प्रस्तावना आटोपतों.

विद्यार्थी
आणि जिज्ञासू
यांस—

नि.
०२५

# अ नु क्र म णि का

**जीवनकथा :**

जन्म १; बालपण व एक प्रसंग १-२; त्या प्रसंगाचा संभाव्य अर्थ ३; लग्नांतून पळ, पुरश्चरण, तीर्थयात्रा व कृष्णाकाठीं वास्तव्य ३-४; विद्यार्जन व गायनाभ्यास ४-५; मारुतीची भक्ति ५-६; पिशाच्च-वृत्ति व अरण्यस्थळें : तेथील एकान्त ७-८; मारुतीची स्थापना व लोकस्थिति ८-९; देवाच्या वैभवाचें ध्येय ९-१०; कार्यापूर्वीची लोकसंग्रहाची पद्धति ११; अधिकाऱ्यांच्या ओळखी १२; त्यांचा उपयोग १२-१३; महंताचा आदर्श १३-१४; रामाच्या देवळाची उभारणी १४-१५; देवळाला देणग्या १५-१६; ग्रंथलेखनाचा संकल्प १६; शिष्यसंप्रदाय १६-१७; शिष्यिणी १७; समर्थपंचायतन १८; शेवटचीं कांहीं वर्षें १८-१९; समर्थांच्या पश्चात् १९-२०.

**देवाधर्माचें अराजक :**

अस्मानी सुलतानी : परचक्र २१-२२; भयानक दुष्काळ २३-२४; देवाधर्माच्या व्यवहारांतील बजबजपुरी २५-२९; ब्राह्मणांची अवनति २९-३०; मुसलमान साधूंचा आदर ३१; गुरु, उपदेश, मंत्र, देव यांचा गोंधळ ३१-३४; देवाच्या भक्तीचे विपरीत आचार ३४; समर्थांची खरी चिंता परमार्थाची, स्वराज्याची नव्हे ३५; संप्रदायांच्या उत्पत्तीची मीमांसा ३६; खऱ्या देवाचें तत्त्व ३७; भोळ्या भावाचा निषेध ३७-३८.

**देवकारण :**

देवाच्या वैभवाचा तपशील ३९-४०; दासबोधांतील भक्तिमार्गाची पहाणी ४०-४२; देवासंबंधाचीं कर्तव्यें ४२-४३; त्याची दासबोधा-

बाहेरील पुनरुक्ति ४३-४४; मोक्ष साधणारांचे सर्वत्र उल्लेख ४५-४७; सामान्य ज्ञानविषयांतहि भक्तीच्या पोषणाची दृष्टि ४७-४८; मनुष्य-जीवनाचें त्याच दृष्टीनें परीक्षण ४८; दिनचर्येची आंखणी त्याच दृष्टीची ४९; स्वराज्यसाधनाच्या दृष्टीचा अभाव ५०-५१.

**प्रदक्षिणा :**

ग्रंथावलोकनाची आवश्यकता ५२-५३; ग्रंथरचनेची तऱ्हा ५३-५४; अनेक दासबोध ५४-५५; ग्रंथरचनेचें पौर्वापर्य ठरविणें अशक्य: श्री. देवांचीं दोन भिन्न मतें ५५-५६; सहाव्या दशकाच्या चौथ्या समासांतील कालनिर्देश व तत्संबंधीं कल्पना ५६-५७; दासबोधाच्या लेखनस्थळाचा वाद ५७-५८; बखरींतील माहितीचा विचार ५८-६१; सांप्रदायिक चरित्रकारांचें ज्ञान व त्यांचे निष्कर्ष ६१-६५; श्री. देवांचा सिद्धांत ६५-६६; कै. पांगारकरांचीं मतें ६६; दासबोधांच्या जुळणीचें वृत्त ६७-६८; दासबोधांतील पुनरुक्ति आणि विषयांतर ६८-७३; समासांचा व दशकांचा अन्वय नाहीं ७३-७४; रचनेविषयीं अनुमानें ७४-७९; समर्थांचे आधार-ग्रंथ ७९; अनेक गीता ८०; भागवत पुराण ८०-८१; श्रीमद्भगवद्गीता ८१-८४; वासिष्ठसार ८४-८५.

**संमार्जन :**

**पहिलें दशक : स्तवननाम : ८६-९० : १** ग्रंथारंभ : नाम—दासबोध गुरु-शिष्यांचा संवाद: विषय भक्तिमार्ग—त्याचा तपशील व फलश्रुति ८६-८७; २ गणेशस्तवन : गणेशाची वर्णिलेली मूर्ति शिवथर घळींतली कीं समर्थांच्या प्रतिभेंतली याची चर्चा ८७-८८; ३ शारदास्तवन ८८; ४ सद्गुरुस्तवन ८८; ५ संतस्तवन ८८; ६ श्रोतेस्तवन ८८-८९; ७ कवेश्वरस्तवन ८९; ८ सभास्तवन ८९; ९ परमार्थस्तवन : ज्ञानेश्वरींतील एका कल्पनेचें साम्य ८९-९०; कांहीं शब्दांवरून उमगणारें समर्थचरित्र ८९-९०; १० नरदेहस्तवन ९०-९१; पशूशीं स्त्रियांची समानता ९०.

**दुसरें दशक : मूर्खलक्षण : ९१-९६ :** मूर्खांच्या व उत्तमाच्या

प्रकारांची चर्चा ९१; मूर्ख (१), कुविद्य (२), रजोगुणी (५), तमोगुणी (६) यांच्या अवगुणांचा तारतम्य विचार ९१-९२; चौथ्यांतील भक्त-अभक्तांचे गुणदोष ९३; उत्तम (२), सत्त्वगुण (७), सद्विद्या (८), विरक्त (९) यांत वर्णिलेल्या पुरुषांच्या गुणांची तुलना व चढती पायरी ९३-९६; दहाव्या समासांतील पढत मूर्ख व एकंदर सारांश ९६.

**तिसरें दशक : स्वगुणपरीक्षा : ९७-१०६ : १** जन्मदुःख निरूपण : भर्तृहरीच्या एका श्लोकाची छाया ९७; २ स्वगुणपरीक्षा, लग्न होऊन पहिली बायको मेली व दुसरी केली येथपर्यंतचा इतिहास ९७-९८; ३ दुसरें लग्न केलें पण मुलें होईनात : पुढें व्हावीं आणि मरावीं, असा अनुभव : शेवटीं नवसांना देव पावला व मुलें झालीं, हें वृत्त ९८; ४ घरांतलें द्रव्य संपलें म्हणून कर्ज काढलें : त्यापायीं परदेशीं नीच सेवा करावी लागली : द्रव्य मिळवून घरीं येतांच त्या मिळकतीचा फडशा उडतो व पुनः देशांतराची पाळी येते ९८-९९; ५ फिरून द्रव्यार्जन करून घरीं आला तेव्हां दुष्काळानें खंगलेल्या कांहीं मुलांचा व बायकोचा अंत पहावा लागला : तिसरी बायको केली : बापलेकांचें भांडण : म्हाताऱ्यानें वेगळें बिऱ्हाड थाटलें, तों परचक्र येऊन बायको पळविली गेली : ती भ्रष्ट झाल्याची बातमी आली, इत्यादि माहिती ९९; या कथेविषयीं चर्चा १००; दासबोधाबाहेरील स्वगुणपरीक्षेसारखी संसारकथा १००-१०१; अभिमान किंवा ममत्वाचें समर्थकृत विवरण १०१-१०३; ६ आध्यात्मिक ताप (यांत 'चाळसी' 'चष्मा' आहे) १०३; ७ आधिभौतिक ताप १०३-१०४; स्त्रीजीवनांतील दुःखें १०४; ८ आधिदैविक ताप १०४-१०५; ९ मृत्युनिरूपण : मृत्यूची सर्वभक्षकता १०५; १० वैराग्य, जुन्या दासबोधाचा सहावा समास : संसाराविषयीं महापुराचें रूपक : त्याचें ज्ञानेश्वरीच्या मायानदीशीं व एकनाथांच्या कर्मनदीशीं साम्य १०५-१०६.

**चौथें दशक : नवविधाभक्ति : १०६-११२ : १** श्रवण : जगांतील लोकव्यवहाराच्या नानाविध शास्त्रांचें व परमार्थोपयोगी विषयांचें ज्ञान

संपादावें १०६; २ कीर्तन: कीर्तनाचे विषय व कीर्तनाची पद्धत यांची चर्चा १०६-१०७; जुन्या दासबोधांतील वक्त्याच्या विवेचनाचा निर्देश १०७; ३ स्मरण; ४ पादसेवन म्हणजे देवाच्या पायाची सेवा नसून सद्गुरुसेवा १०७; ५ अर्चन: देवाबरोबर ब्राह्मण, अग्नि, संत यांची पूजा: देवाच्या वैभवाचीं अंगोपांगें, देवाला समर्पण करावयाचे पदार्थ: प्रत्यक्ष पूजा साधत नसेल तर मानसपूजा १०८; ६ वंदन: नमस्काराचें माहात्म्य: शंकर, विष्णु, सूर्य, मारुति या चार देवतांना नित्य वंदावें १०८–१०९; 'अंतर्भाव' प्रकरणांतील नित्य वंदनाचे देव १०९; ७ दास्य: देवाच्या वैभवाचें साहित्य: मानसपूजा १०९; ८ सख्य: देवाशीं सख्य जोडणारी अनन्य निष्ठा: गीतेचा व भागवताचा आधार १०९-११०; ९ आत्मनिवेदन: मीपणाचा निःशेष अभाव, त्यायोगें आत्मनिवेदन साधतें ११०-१११; १० चार मुक्ति: एका ठिकाणीं ज्ञानेश्वरीशीं साद्दश्य १११; या विषयाचे व आत्मनिवेदनाचे दासबोधाबाहेरील निर्देश १११-११२.

**पांचवें दशक: मंत्रनामक ११२-१२४ : १** गुरुनिश्चय: सामान्य व्यवहारांत ब्राह्मण श्रेष्ठ असला तरी ब्रह्मज्ञानासाठीं सद्गुरु पाहिजे ११३; २ गुरुलक्षण (जुन्या दासबोधांतील चौथा समास) सामान्य गुरूहून सद्गुरु निराळा व श्रेष्ठ: नीच यातीचा गुरु नको: स्वयातीच गुरु पाहिजे ११३-११४; नीच म्हणजे मुसलमान याचें विवेचन ११४-११६; ३ शिष्यलक्षण (हा समास जुन्या दासबोधाचा पांचवा समास असून पुनः त्यांत सदर दासबोधाच्या कल्याणप्रतींतील पहिल्या समासापैकीं तीन ओव्या सांपडतात): सच्छिष्यामागून असच्छिष्याचें चरित्र ११६-११७; दासबोधाबाहेरील वाईट गुरु-शिष्यांचे निर्देश ११८; ४ उपदेश: उपदेशाचें विविधत्व ११९; ५ बहुधा ज्ञान: नानाप्रकारचें ज्ञान; ६ शुद्धज्ञान म्हणजे आत्मज्ञान: यांत आत्मज्ञानाचीं साधनें, ते प्राप्त करणारे प्राचीन महात्मे, यांची माहिती आहे ११९-१२२; ७ बद्ध १२२; ८ मुमुक्षु १२२; ९ साधक: त्याच्या सामर्थ्याचें

वैभव १२३-१२४; १० सिद्ध : संशयरहित निःसंदेह तो सिद्ध : संशयाचे अनर्थ : ज्ञानेश्वराशीं साम्य १२४-१२५.

**सहावें दशक : देवशोधन : १२५-१३६ :** १ देवशोधन–देवाला शोधणें : भाषेविषयीं प्रास्ताविक चर्चा : 'मायाब्रह्म वोळखावें' हें अध्यात्माचें लक्षण व मायेचें वर्णन १२६-१२८; २ ब्रह्मपावन–ब्रह्मास पावणें : सृष्टिनाशानंतर उरणारें, नामरूपापलीकडचें तें ब्रह्म : गुरुमुख व अध्यात्मश्रवण हे त्याच्या प्राप्तीचे उपाय : देहातीत भाव हा मोक्ष इत्यादि १२६-१२७; ३ मायोद्भव–माया ब्रह्मांत उदय पावते : तिचा मनुष्यजीवनांत आढळणारा परिणाम देहाभिमान : तो झाडल्यावर मनुष्य ब्रह्मपदीं स्थिरावतो १२७-१२८; ४ ब्रह्मनिरूपण : यांत युगवर्षें, ब्रह्मादि देवांचें आयुर्मान हें सांगून ब्रह्माचें शाश्वत स्वरूप स्पष्ट केलें आहे : कलियुगाचीं ४७६० वर्षें उलटल्याच्या संदर्भानें १५८१ हें शक वर्ष सांपडतें १२८ १२९; ५ मायाब्रह्मनिरूपण–यांत माया व ब्रह्म यांचा विरोध स्पष्ट करून संतांना शरण जाण्याचा उपदेश आहे १२९; ६ सृष्टिकथन–सृष्टि खरी का खोटी हा वाद यांत गोवलेला आहे : खोट्या देवांच्या भक्तीची दुर्दशा : आठ प्रकारची सृष्टि १२९-१३१; ७ सगुणभजन–सगुणभजनाच्या उपयुक्ततेविषयीं उद्धवणाऱ्या संशयाचें निराकरण : रामाच्या भक्तीची प्रशंसा १३१-१३२; ८ दृश्याविषयीं–तें सत्य असल्याची दृढ भावना हा ब्रह्मप्राप्तीचा अडथळा असल्यानें त्याचा प्रभाव वर्णिला आहे १३२-१३३; ९ सारशोधन–दृश्य सारें असार व दृश्याच्या पोटीं लपलेलें तें सार हें या समासाचें सूत्र आहे : तें सार शोधावें, त्याचा अनुभव घ्यावा : तो याच जन्मीं घ्यावा : पुढल्या जन्माची उधारी नको १३३-१३४; १० अनिर्वाच्य–ज्या अनुभवाचा उपदेश पूर्वीं केला तो अनिर्वाच्य, बोलून दाखविणें अशक्य : तरीसुद्धां तो शब्दाच्या आटोक्यांत आणून सोडण्याचा प्रयत्न केला आहे १३४-१३५; जुन्या दासबोधाच्या २१ व्या समासांतून घेतलेल्या ओव्यांचा विचार १३५-१३६.

**सातवें दशक : चतुर्दश ब्रह्मनाम : १३६-१४९ : १** मंगलाचरण–प्रास्ताविक स्वरूपाचा : वंदन, प्राकृत (मराठी) भाषेची तरफदारी, 'मायाब्रह्म वोळखावें' ही अध्यात्माची व्याख्या इत्यादि विषय आहेत १३६-१३८; २ ब्रह्मनिरूपण : ब्रह्मप्राप्तीचा मुख्य उपाय सद्गुरु, देहाभिमान टाकणें हा एक उपाय आहे, ब्रह्माचें समत्व हे विषय आहेत १३८; ३ चतुर्दशब्रह्म : परंतु हीं ब्रह्में मायिक आहेत, नश्वर आहेत, इत्यादि : यांतील एका ओवीचें ज्ञानेश्वरींतील ओवीच्या अर्थाशीं साम्य : चौदा ब्रह्मांच्या नांवांचा संस्कृत श्लोक १३९-१४०; ४ विमलब्रह्म : खऱ्या ब्रह्माचा परिचय १४०-१४१; ५ द्वैतकल्पनानिरसन : माया व ब्रह्म या दोन्ही मुळांत कल्पनाच व त्यांनीं द्वैताला जन्म दिला आहे : तेव्हां ब्रह्माच्या शुद्ध कल्पनेला चिकटून वाढवून ब्रह्म गांठावें १४१-१४२; ६ बद्धमुक्त–यांत ब्रह्मावस्था म्हणजे निष्क्रियता या समजुतीवर हल्ला चढवून मुक्तता म्हणजे निष्क्रियता नव्हे, हें दाखविलें आहे : ज्ञानोत्तर कर्म करावें लागतें, असा निष्कर्ष आहे १४२-१४४; एकनाथी विचारांची छाया १४४; ७ साधनप्रतिष्ठा–ब्रह्मज्ञानाची प्रगति खुंटविणारीं कारणें : मुख्य प्रतिपाद्य श्रवणमननादि साधनांचा निरंतर अभ्यास हें आहे : सिद्धाचा साधनें सोडल्यानें अधःपात होतो १४४-१४६; दासबोधाबाहेरील साधनप्रतिष्ठेचें विवरण १४६; ८ श्रवण–पूर्वीच्या ४ : १ समासांत काय ऐकावें हें सांगितलें, येथें श्रवणाच्या फलश्रुतीची व श्रेष्ठतेची शहानिशा आहे १४७; ९ श्रवण–यांत माणसाच्या आवडीप्रमाणें श्रवण हा विवेक असून मुख्यतः अध्यात्माचें श्रवण करण्याचा आग्रह आहे : त्या अनुरोधानें 'ग्रंथ' शब्दाची व्याख्या आहे १४७-१४८; १० देहान्तनिरूपण–यांत जीवन्मुक्ताच्या देहान्ताचा विचार आहे : मुक्ताला मरणाच्या बाबतींत देशकालाचें बंधन नाहीं १४८-१४९.

**आठवें दशक : मायोद्भव (किंवा रूढ ज्ञानदशक) : १४९-१६२ : १** देवदर्शन : प्रथम शास्त्रें, साधनें व देव यांचें विविध वैचित्र्य वर्णून मग पंचमहाभूतांचा उदय, पृथ्वीवरील दगडांचे देव यांची माहिती दिलेली आहे : शेवटीं खऱ्या देवाचें स्वरूप स्पष्ट केलें आहे १५०-

१५१; २ सूक्ष्म आशंका: खरा देव जर निर्गुण तर माया कुठून आली या प्रश्नाचा यांत खल आहे १५१-१५२; ३ सूक्ष्म आशंका: मागल्या समासांत मूळची आशंका फिटली नसल्यानें पुनः तिचें सूत्र घेऊन आकाशांत वायु स्फुरतो त्याप्रमाणें ब्रह्मांत जें स्फुरण उद्भवलें ती माया अशा रीतीनें आशंकेचें समाधान केलें आहे १५२-१५४; ४ सूक्ष्म पंचभूतें–यांची माहिती मागील समासाच्या शेवटीं थोडीशी आहे, येथें त्यांचा विस्तार केला आहे: हीं भूतें एकमेकांत कशीं मिसळलेलीं आहेत याचाहि उलगडा आहे १५४-१५५; ५ स्थूल पंचमहाभूतें व स्वरूपाकाशभेद: सूक्ष्मांतून व्यक्तावस्थेस आलेल्या पंचमहाभूतांचें वर्णन यांत आहे: आकाश व ब्रह्म यांचा भेद विशद केला आहे १५५-१५६; ६ दुश्चीतनिरूपण: वस्तुतः हा समास, मोक्ष किती दिवसांत मिळतो, या प्रश्नाच्या उत्तरासाठीं आहे, परंतु मोक्षप्राप्तीच्या मार्गांतलें प्रबळ विघ्न दुश्चीतपण असल्यानें समासाला तें नांव दिलें: दुश्चीतपणाच्या अवगुणापायीं मनुष्य पाषाणाहून हीन ठरतो, याची चर्चा आहे: शेवटीं विशेष गुणाच्या माणसाला मोक्ष मिळण्याला कालावधि व प्रयास पडत नाहींत हें उत्तर आहे १५६-१५७; ७ मोक्षलक्षण: मोक्ष म्हणजे बद्धावस्थेंतून सुटका: पुनर्जन्मांतील फलाशा टाकाऊ: यांत अष्ट देह, चार आत्मे यांचाहि निर्देश आहे: जीवपणाची जाणीव नष्ट होणें हा मोक्ष १५७-१५९; ८ आत्मदर्शन: 'सोहं आत्मा' अजन्मा तो तूंच, मिथ्यात्वाचें ज्ञान व मिथ्यात्वाचा अनुभव हें मोक्षाचें लक्षण १५९-१६०; ९ सिद्ध: लक्षण: बाहेरून साधक वृत्तीचा, आंतून निश्चल वृत्तीचा, ब्रह्माप्रमाणें सर्वथैव निर्दोष, निर्विकार, मग त्याचा देह पडलेला असो वा हिंडता-पळता असो, तो सिद्ध १६०-१६१; १० शून्यनिरसन: ब्रह्मावस्था म्हणजे निर्गुण निराकार, तेव्हां ती शून्यावस्था तर नव्हे ना, याचा विचार सामान्यांच्या आणि विद्वानांच्या मतमतांतराचें निरीक्षण करून यांत मांडला आहे १६१-१६२.

**नववें दशक : गुणरूप : १६२-१७१ :** १ आशंका–यांत निराकार निराधार

इत्यादि कित्येक शब्दांचा सरळ वाच्यार्थ सांगितलेला आहे १६२; २ ब्रह्मनिरूपण : भगवंताचें निजरूप तें स्वरूप : तें नामरूपातीत आहे : जवळ असून त्याचा पत्ता लागत नाहीं : कारण तें दृष्टीला अगोचर आहे : त्याच्यांत भेद नाहीं : भेद हा अहंतेचा परिणाम : मीपणाची जाणीव ही स्वरूपस्थितीची उणीव इत्यादि १६२-१६३; ३ निस्संदेहनिरूपण : करून अकर्ता, भोगून अभोक्ता याविषयींचा संदेह यांत निवारला आहे १६३-१६४; ४ जाणपणनिरूपण : जाणत्या-नेणत्याच्या उच्चनीच अवस्थांचें गुणावगुणाच्या परिणामासह विवरण १६४-१६५; ५ अनुमान-निरसन : पिंडब्रह्मांडाच्या ऐक्याची कल्पना म्हणजे अनुमान का अनुभव हा श्रोत्याचा प्रश्न या समासांत आहे १६६; ६ गुणरूप : यांत माया, त्रिगुण, पंचभूतें यांचा विचार आहे : उपाधिरहित आकाश म्हणजे ब्रह्म इत्यादि १६६-१६७; ७ विकल्पनिरसन : स्थूल आधीं का सूक्ष्म आधीं या विकल्पाचें निरसन सूक्ष्म आधीं या उत्तरानें केलें आहे : या उत्तरांतून पुनर्जन्माचा विषय निघाला : त्यावर ज्ञानानें मोक्ष लाभतो याचें प्रतिपादन करण्यांत आलें १६७-१६९; ८ देहान्तनिरूपण यांत वासनात्मक प्राण (वायु) हें पुनर्जन्माचें कारण सांगितलें असून वायूचें सामर्थ्य वर्णिलेलें आहे १३९; ९ संदेहवारण : ब्रह्म व ब्रह्मांड यासंबंधाचा संदेह आहे : वृत्तीच्या विशालत्वानें दृश्य ब्रह्मांडापलीकडचें ब्रह्म गांठलें कीं वृत्ति फाटून ब्रह्मसाक्षात्कार होतो १७०; १० स्थिति म्हणजे ब्रह्मसाक्षात्काराची स्थिति : अंतरनिष्ठा पाहिजे : आपण व ब्रह्म यांच्या आड येणारे सारे भाव नष्ट झाले म्हणजे उरलें तें निखळ निर्गुण आपणच आहों, असें होऊन राहणें ही स्थिति १७०-१७१.

दहावें दशक : जगज्जोती : १७१-१८२ : १ अंतःकरण : एक जीव वांचविण्याची सर्व प्राण्यांमध्यें असणारी जाणीव म्हणजे जगज्जोती १७१-१७२; २ देह आशंका : देह कसा उत्पन्न होतो ही आशंका : तिच्या अनुरोधानें ब्रह्म, माया, ब्रह्माविष्णुमहेश यांबद्दल कांहीं माहिती १७२-१७३; ३ देहआशंकाशोधन : यांत सृष्टीच्या उदयाचा वृत्तांत असून

वायूमध्यें जगज्जोतीचा अंतर्भाव केला आहे १७३; ४ बीजलक्षण: यांत मनुष्यदेहाच्या उत्पत्तीचा विचार असून धर्मस्थापनेच्या माणसांना विष्णूचे अवतार म्हटलें आहे: बाजीगरी वोडंबर या शब्दांचे दासबोधा-बाहेरील निर्देश १७३-१७५; ५ पंचप्रलय: शास्त्रांतील चार प्रलय व पांचवा 'विवेकप्रलय' १७५-१७६; ६ भ्रमनिरूपण यांत नानाविध लोकभ्रमांचा निषेध आहे १७६-१७७; ७ सगुणभजन: मरून गेलेल्या ज्ञात्यांचे चमत्कार भाविकांच्या अनुभवाला त्या ज्ञात्याविषयींच्या श्रद्धे-मुळें येतात: म्हणून भक्तिमार्गाचीं कर्तव्यें बजावीत राहावें १७७-१७८; प्रचीतनिरूपण: साक्षात् अनुभवाचें महत्त्व वर्णिलें आहे १७८-१७९; ९ प्रकृतिपुरुष: वायु ही प्रकृति व वायूंतील जाणीव हा पुरुष आणि तोच जगज्जोती: हें समजायला सद्‌गुरुसेवा, सत्संग, तत्त्वविचार पाहिजे १७९-१८०; १० चळाचळनिरूपण: ब्रह्म अचल व माया चल: तिच्या चलत्वानें उद्भवलेल्या कारण, महाकारण, अव्याकृत, हिरण्यगर्भादि गुंतागुंतीचा विचार १८०-१८१; जगज्जोती, अंतरात्मा याविषयींचे दासबोधाबाहेरील निर्देश १८१-१८२.

**अकरावें दशक: १८२-१९२: भीम:** १ सिद्धांतनिरूपण: सृष्टीची उत्पत्ति, जगज्जोती, अंतरात्मा, या सर्वांची गोळाबेरीज: चार तऱ्हेचे जीव १८२-१८३; २ चत्वार देव: नाना देवदेवतांच्या गोंधळांतून निवड-लेले चार देव: प्रतिमा, अवतार, अंतरात्मा व निर्विकारी १८३-१८४; ३ सिकवण: दिनचर्या: संसारांतील दैन्य व प्रयत्नानें लाभणारें सदेवपण १८४-१८६; ४ सारविवेकब्रह्म: ब्रह्म हें सार: सारज्ञतेचें महत्त्व, असारज्ञतेचें अनिष्ट फळ १८६; ५ राजकारण: चातुर्यार्थी उत्तम गुणांच्या गोतावळ्यांतील राजकारण: शेवटीं विषयतात्पर्य सुचविणारें 'चातुर्य' १८६-१८८; ६ महंतलक्षण: महंत अंतरात्म्याप्रमाणें गुप्ततेनें वागणारा असावा: बहुतांना त्याचा आधार वाटावा १८८-१८९; समर्थांचा चोख लिहिण्यावाचण्याविषयीं कटाक्ष १८९; ७ चंचळ नदी: हें मायेचें एक रूपक आहे: त्याचें ज्ञानेश्वर-एकनाथांच्या अनुक्रमें मायानदी-कर्मनदीशीं सादृश्य

१८९; ८ अंतरात्मा विवरण : अंतरात्म्याच्या योग्य व दृढ परिचयानें ब्रह्मप्राप्ति करून घ्यावी १९०; ९ उपदेश : अंतरात्मा व जगज्जोती यांच्या माहितींत ज्याची प्रतिमा तो परमात्मा ओळखून भजन करावें १९०-१९१; १० निःस्पृह वर्तणूक : अंतरात्मा व महंत यांच्या सादृश्यानें महंताच्या उत्तम पुरुषाच्या वागणुकीचें चित्र १९१-१९२.

**बारावें दशक : विवेकवैराग्य : १९२-२०२ :** १ विमल लक्षण : प्रपंचपरमार्थाचें तारतम्य : प्रपंचांतील गुण परमार्थाला उपयोगी : उत्तम पुरुषाचा विचार आहे १९२-१९३; २ प्रत्ययनिरूपण : उत्तम पुरुषाच्या गुणांची चर्चा : प्रारब्ध प्रयत्नवाद १९३-१९४; ३ भक्तनिरूपण : भक्तानें सद्गुरुसेवा करावी : देव कोण याचा शोध लावून मीपणाच्या हकालपट्टीनें तो खरा देव गांठावा १९४-१९५; दा सबोधाबाहेरील इहलोक-परलोकाचा विचार १९५-१९६; ४ विवेकवैराग्य : विवेकावांचून वैराग्य वायां जातें : विवेकवैराग्य ही जोडी संध्या-भजनादि क्रियांची सफळता होय १९६; ५ आत्मनिवेदन (जुन्या दा स बो धाचा ८ वा समास) : शब्द, वाङ्मय, ॐकार, माया यांचें विवेचन : निश्चळ ब्रह्माशीं एकरूप करणारें आत्मनिवेदन १९६-१९७; ६ सृष्टिक्रम निरूपण : मूळ पुरुष, मूळ माया, इत्यादि सृष्टीची कथा यांत सांगितली आहे १९७; ७ विषयत्याग : वैराग्य हें विषयत्यागाचें लक्षण : जो सकळत्यागी तो ईश्वरी पुरुष, इत्यादि १९७-१९८; ८ काळवर्णन : यांत निरनिराळ्या काळाच्या माहितीनंतर माणसानें काळ सार्थकीं लावावा, जगदीश आपलासा करावा हा उपदेश आहे १९८-१९९; ९ येत्नसिकवण : यांत पुनः दिनचर्येचें कथन असून महंताचीं कर्तव्यें सांगितलीं आहेत १९९-२००; १० उत्तम पुरुष : आपल्या मागून भक्तिमार्ग चोखाळला जावा म्हणून समुदाय करावा; प्रबोधशक्तीनें, सक्रिय उपदेशानें बहुतांचें मनोगत हातीं घेऊन त्यांना शहाणपणा शिकवावा २००-२०१; समर्थांच्या उत्तम पुरुषाच्या गुणांचें विवेचन २०१-२०२.

**तेरावें दशक : नामरूप : २०२-२०९ :** १ आत्मानात्मविवेक : देहाची हालचाल घडविणारें तत्त्व म्हणजे आत्मा : त्याला देहाचा आधार

लागतो: चिंतनमननानें ब्रह्मास जाऊन मिळावें २०३; २ सारासार निरूपण: यांत मागल्या समासांतील विचारांची पुनरुक्ति आहे २०३; ३ उभारणी: सृष्टीच्या उदयाची परिचित कथा २०४; ४ प्रलय: सृष्टिसंहाराचा इतिहास २०४; ५ कहाणी: प्रकृतिपुरुषाच्या संसाराचें हें रूपक आहे २०४-२०५; ६ लघुबोध: यांत पंचमहाभूतांची माहिती, सारासार नित्यानित्याची विचारणा, कर्तृत्व-भोक्तृत्वाचें निरसन, शेवटीं आत्मनिवेदन असे विषय आहेत २०५; ७ प्रत्ययेविवरण: शहाण्यानें ब्रह्मांडापरतें देवाला धुंडीत जावें: म्हणून ब्रह्म दृश्य चंचल निश्चल यांची शहानिशा यांत केली आहे २०६; ८ श्रीकर्तानिरूपण: सृष्टीच्या कर्त्याविषयींच्या नानाविध कल्पना व खऱ्या कर्त्याचा विचार यांत दिलेला आहे २०६-२०७; ९ आत्मविवरण: यांत देहासकट आत्म्याचा विचार, भोजनकथेच्या निमित्तानें आत्म्याच्या हालचालींची माहिती, आत्मा, वायूची तुलना, इत्यादि विषय आहेत २०७-२०८; १० सिकवण: आत्मा कसा सर्वत्र ओतप्रोत भरला आहे, याचें विवेचन आणि व्यवहारांतील भेदाचें दिग्दर्शन असून महंताच्या गुणक्रिया यामध्यें सांगितल्या आहेत २०८-२०९.

**चौदावें दशक: अखंड ध्यान: २०९-२१८:** १ निःस्पृहलक्षण: हा समास ८० ओव्यांचा असून त्यांत निःस्पृहासंबंधांत खाणेंपिणें, हिंडणें, भोजन, पेहराव, लेखन-वाचन यांच्याशिवाय अनेक कर्तव्यांचें एकत्र संकलन आहे २०९-२१२; २ भिक्षानिरूपण: भिक्षेची सर्वप्रकारें महती यांत वर्णिली आहे २१२; ३ कवित्वकला: यांत धीटपाठ प्रासादिक हे कवित्वप्रकार सांगून कवित्वाचा उपयोग भक्तीसाठीं करावा, असा उपदेश आहे: कवित्वाचीं लक्षणेंहि आहेत २१२-२१३; ४ कीर्तनलक्षण: यांत क ख ग घ हीं अक्षरें घेऊन ओव्या रचल्या आहेत व त्यांतून कीर्तनाचे गुण दाखविले आहेत २१३; ५ हरिकथालक्षण: यांत कीर्तनाचे कोणापुढें कोणते विषय मांडावे, कीर्तनांत गायनकलेच्या आहारीं जाऊं नये, हरिदासाची व्याख्या, हे विषय आहेत २१४; ६ चातुर्य:

देहशृंगाराचा निषेध व अंतरशृंगाराचा गौरव, याखेरीज उत्तम पुरुषाचे इतर गुण, भगवद्भजन वाढवावें, असे विषय यांत आहेत २१४-२१५; ७ युगधर्म : वैराग्यसंपन्नाचें जीवन, अविचारानें संसार सोडणाराची दुर्दशा, ब्राह्मणांची अवनति, पीरांची यात्रा व भक्ति, स्वेच्छेनें धर्मांतर, कलियुग या विषयांचा येथें समावेश आहे २१५-२१६; ८ अखंडध्यान : अंतरात्म्याचें अंतरनिष्ठ ध्यान व दंडक सविघ्न ध्यान यांचा विचार यांत आहे २१६-२१७; ९ शाश्वतनिरूपण : शाश्वत म्हणजे ब्रह्म : त्याचें ज्ञान संपादावें, या बाबतींत भीड कामाची नाहीं, इत्यादि उपदेश यांत आहे २१७; १० मायानिरूपण : यामध्यें प्रखर बुद्धिवादानें लोकांतील भ्रामक समजुतींचा धुव्वा उडविला आहे : या वेड्या समजुती म्हणजे माया २१८.

**पंधरावें दशक : आत्मविचार : २१८-२३० :** १ चातुर्य : यांत श्रेष्ठ कर्में करावीं या उपदेशासह संतमहंताच्या कामगिरीची सविस्तर वाच्यता आहे २१८-२२०; २ निःस्पृहव्याप : यांत प्रथम देवाधर्माच्या अस्ताव्यस्त लोकस्थितीचें सविस्तर वर्णन व अशा बिकट स्थितींत निःस्पृहानें कसें वागावें याचा उपदेश २२०-२२१; ३ श्रेष्ठ अंतरात्मा : अवतारी, सदेव, वयानें लहान वडील यांच्या विचारानंतर शहाणपणाची आवश्यकता व उपयुक्तता प्रतिपादिली आहे २२१-२२२; ४ शाश्वत ब्रह्म : ब्रह्माखेरीज बाकीचें सारें नश्वर, चंचल याकरितां भीड न धरतां मायेच्या निःशेष निरसनानें आत्मविवेदन साधावें, या विचारांचा यांत आदर केला आहे २२२-२२३; ५ चंचललक्षण : प्रथम यांत कूटासारखी भाषा असून देऊळ, देव, पुरुषप्रकृति, अंतरात्मा इत्यादि चंचलाची माहिती आहे : चंचलांत उपासना संभवते : निश्चलाला ज्ञानाखेरीज गति नाहीं, असा उपदेश आहे २२३-२२४; ६ चातुर्य : यांत उत्तम पुरुषाच्या मुख्य मुख्य ठराविक गुणकर्मांचा पाढा वाचलेला आहे २२४-२२५; ७ अधोर्धनिरूपण : 'ऊर्ध्वमूलमधःशाखं' या गीतोक्त वृक्षाला वेलीचें रूप देऊन यांत तिचें वर्णन आहे : दैवी-दानवी संपत्तीचा उल्लेख आहे : अंतर ओळखण्याचाहि उपदेश आहे २२५-२२७; ८ सूक्ष्मजीव : सूक्ष्मजीवांच्या माहितीनंतर

माणसाच्या निरर्थक अभिमानाची हजेरी जन्ममृत्यूची दुर्दशा सांगून घेतली आहे २२७; ९ पिंडोत्पत्तिनिरूपण: यांत पाण्याचें महत्त्व, अंतरात्म्यापर्यंतचा सृष्टीचा क्रम इत्यादि विषय आहेत २२८; १० सिद्धांतनिरूपण: उत्तम जाणीवेच्या साह्यानें शाश्वत शोधावें, त्याशीं एकरूप होऊन भक्त वाढवावे हा विषय यांत आहे २२८-२३०;

**सोळावें दशक : सप्ततिन्वय २३०-२३६ :** १ वाल्मीकस्तवन: वाल्मीकिचरित्राचा आढावा २३०: २ सूर्यस्तवन; जगांतील साऱ्या घडामोडी सूर्यामुळें चालतात: सूर्यनमस्कारानें दोष झडतात, स्फूर्ति वाढते २३०; या विषयाचे दासबोधाबाहेरील निर्देश २३१; ३ पृथ्वीस्तवन: पृथ्वीची लोकांकडून होणारी विटंबना, पृथ्वीचे गुण व देखावे, अवतारी महाबळींची धामधूम हे विषय यांत आहेत: एकनाथी विचारांशीं त्यांचें साहश्य २३१; ४ आपनिरूपण: पाण्याचे सृष्टींतील तसेंच माणसाच्या शरीरांतील प्रकार, पाण्याचे लाक्षणिक अर्थ यांचा येथें समावेश आहे २३२; ५ अग्निनिरूपण: जठराग्नि, दीपदीपिका, नानाज्वाळ, तोफांची आग, आतषबाजी, इत्यादि अग्निप्रकारांची यांत नोंद आहे २३२-२३३; दासबोधाबाहेरील निर्देश २३३, ६ वायुस्तवन: वायूचें शास्त्रीय वर्गीकरण, पुढें मारुतीचें चरित्र याप्रमाणें येथील विषय आहेत २३३; ७ महद्भूतनिरूपण: महद्भूत हें अंतरात्मा विष्णूचें दुसरें नांव असून सर्व जीवांच्या व्यापाराचें तें मुख्य आधार असल्याचें विवेचन: स्त्री-पुरुष म्हणून त्यांत भेद नसल्याची ग्वाही यांत आहे २३३-२३४; ८ आत्मारामनिरूपण: मागल्या समासाचा विषय येथें निराळ्या रीतीनें उगाळला आहे २३४; ९ नाना उपासना: देश, भाषा, ऋषि, मतें यांची गर्दी असली तरी गोंधळून जाण्याऐवजीं परीक्षा केली पाहिजे व आपलें निर्गुणांत जाऊन मिळण्याचें ध्येय साधलें पाहिजे असा यांत उपदेश आहे २३५; १० गुणभूतनिरूपण: भूतांत त्रिगुणांचा समावेश: भूतांची क्रमबद्ध उत्पत्ति: आत्माराम सर्वांचा पालक, त्याचें भजन करावें, हा विषय यांत आहे २३५-२३६.

**सतरावें दशक : प्रकृति पुरुष : २३६-२४५ :** १ देव बलात्कार : देव देहाच्या देवळांत राहून जो आपली हेळसांड करील त्याला मारतो, म्हणून माणसें त्याला भजतात, मग देवळांची विविध रचना, त्यांतून देवाची प्राप्ति इत्यादि विषय यांत आहेत २३६-२३७; २ शिवशक्तिनिरूपण : निश्चळ, चैतन्य, गुणसाम्य, ही सृष्टीची प्रक्रिया सांगून यांत पिंडब्रह्मांड, स्त्री, माता, स्त्रीपुरुषाचें आकर्षण हे विषय घेतले आहेत २३७-२३८; ३ श्रवणनिरूपण : आत्मज्ञान हें सर्वश्रेष्ठ : त्याचें श्रवण करावें, विवेकानें पिंडब्रह्मांडाचा संहार करतो, हे विषय यांत आहेत २३८-२३९; ४ अनुमाननिरसन : सारेंच ब्रह्म या अनुमानाचा यांत निरास आहे : सर्व ब्रह्माच्या एकंकाराचा कडक निषेध व व्यवहारांतील भेदाचें समर्थन आहे २३९-२४०; एकंकाराबद्दल दा स बो धाबाहेरील माहिती २४०; ५ अजपानिरूपण : अहोरात्रांत २१६०० वेळां श्वासोच्छ्वास होतो, त्याच्या अनुरोधानें जप करण्याचा उपदेश यांत आहे २४०-२४१; ६ देहात्मनिरूपण : आत्मा देह जगवितो व शेवटीं देह सोडून जातो : देहांत असतांना होणाऱ्या खेळाचें वैचित्र्य व मानवी स्थितीचें तारतम्य यांत दाखविलें आहे २४१-२४२; ७ जगजीवन : मानवी जीवनांतील चढउतार हे प्रयत्न, संगति यावर अवलंबून असतात म्हणून प्रयत्नानें व सत्संगतीनें आत्मकल्याण करून घ्यावें २४२-२४३; ८ तत्त्वनिरूपण : चार वाणी, अंतःकरणपंचक, प्राणपंचक, ज्ञान-कर्म-विषय यांचीं पंचकें : पंचभूतांशीं त्यांचें मिश्रण, चार देह, त्यांच्या निरसनाचें विज्ञान, हे विषय यांत आहेत २४३-२४४; ९ तनुचतुष्टय : अवस्था, अभिमान, स्थानें, भोग, मात्रा, गुण, शक्ति, यांच्या चौकड्यांची यांत माहिती आहे : तिचा दा स बो धाबाहेरील निर्देश २२४; १० टोणपसिद्ध लक्षण : ज्याला गुणावगुणाची परीक्षा नाहीं तो टोणपा व ज्याला तात्त्विक दृष्टीची सूक्ष्म परीक्षा करतां येते तो सिद्ध हा विषय यांत आहे २४४-२४५.

**अठरावें दशक : बहुजिनसी : २४५-२५४ :** १ बहुदेवस्थान यांत अनेक देवतांची माहिती आहे : सर्व देवतांचें मूळ अंतरात्मा : त्याचें

अनुसंधान पाहिजे २४६; २ सर्वज्ञसंग: जाणत्याचे सर्व गुण शिकावे: खरा जाणता अंतरात्मा: त्याचें ज्ञान साधावें, असें यांत सांगितलें आहे २४६-२४७; ३ निःस्पृहसिकवण: यांत निःस्पृहांच्या गुणकर्मांची यादी आहे २४७-२४८; ४ देहेदुल्लभनिरूपण: दुर्लभ देहाच्या प्राप्तीनें पारमार्थिक उन्नति कशी करून घेतां येते याचें यांत विवरण आहे २४८; ५ करंटपरीक्षा: ज्याला सार-असाराची, इष्टानिष्टाची परीक्षा नाहीं तो करंटा: परीक्षेनें तत्त्वसंशोधन करून आत्मनिवेदनाचें समाधान मिळवावें असा यांत उपदेश आहे २४८-२५०; ६ उत्तम पुरुष: यांत देहशृंगारापेक्षां अंतरशृंगार श्रेष्ठ, मूर्खाचा स्वभाव, शहाण्याचा संयम आणि ईश्वरी पुरुषाचें गुणकर्म हे विषय आहेत २५०-२५२; ७ जनस्वभाव: सामान्यतः जनस्वभाव लोभी असतो: तथापि देवाचें खरें ज्ञान मिळवून जीवनाचें सार्थक करावें, असें यांत सांगितलें आहे २५२-२५३; ८ अंतर्देवनिरूपण: धातु-पाषाणाचे देव, अवतार, ब्रह्माविष्णुमहेश या सर्वांच्या पलीकडील जो देव तो अंतर्देव व तेंच परमार्थाचें साध्य असें यांत विवेचन आहे २५३; ९ निद्राविलास: निद्रेचा प्रभाव व पहाटेच्या जागृतीनंतरचे उद्योग यांची माहिती यात आहे २५३-२५४; दासबोधाबाहेरील निद्रावर्णन २५४; १० श्रोता अवलक्षण: यांत श्रोत्याला नडणाऱ्या विघ्नांची माहिती व शहाण्या वक्त्याचीं कर्तव्यें सांगितलीं आहेत २५४.

**एकोणिसावें दशक : सिकवण: २५५-२६२ :** १ लेखनक्रिया: लिहावें कसें याची माहिती आहे २५५; २ विवरण: उत्तम गुणांचें विवरण यांत आहे: हे गुण पूर्वीच्या अनेक समासांतून आलेले आहेत २५५-२५६; ३ करंटलक्षण: अव्यवस्थित वागणुकीचे प्रकार यांत नमूद आहेत २५६-२५७; ४ सदेवलक्षण: पूर्वी वारंवार सांगितलेल्या उत्तम गुणांचा विचार यांत असून महापुरुषाचें वर्णन आहे २५७; ५ देहेमान्य: देहाच्या योगानें देवाचीं कार्यें साधतात, म्हणून खऱ्या देवानिमित्त इतर देवांची भीड सोडावी व खऱ्या देवाच्या ठिकाणीं राहावें २५८; ६ बुद्धिवाद:

कोणीं कोणाला उपदेश करावा : तुर्क गुरु, चांभार शिष्य हा भ्रष्टाकार : या माहितीनंतर नेहमींचे उत्तम गुण व त्यांचे परिणाम यांत वर्णिले आहेत २५८-२५९; ७ येत्ननिरूपण : महंतानें आपली भूमिका यशस्वी होण्यासाठीं कसें वागावें हें या समासांत सांगितलें आहे २५९-२६०; ८ उपाधिलक्षण : उपाधि म्हणजे महंताचा उद्योग, त्याचें विवेचन आधीं करून पुढें अंतरात्मा चंचल म्हणून निश्चलांत विरून जाण्याचा उपदेश आहे २६०; ९ राजकारण : ज्ञानी पुरुषानें समुदाय करावा व तो शिस्तींत वागवावा : शिस्तीच्या व्यवहाराला यांत राजकारण म्हटलें आहे २६०-२६२; १० विवेकलक्षण : येथील विवेक अध्यात्माचा नसून महंतांच्या व्यवहाराचा आहे : हा व्यवहार उत्तम गुणांचा आहे २६२.

**विसावें दशक : पूर्ण : २६३-२७२ :** १ पूर्णापूर्ण : चंचल निश्चलाच्या परीक्षेनें विज्ञानाच्या विदेही अवस्थेस जावें २६३; २ सृष्टित्रिविध-लक्षणाचा : त्रिविध म्हणजे त्रिगुणात्मक : अशा त्रिविध सृष्टीची माहिती यांत आहे २६३; ३ सूक्ष्मनामाभिधान : स्थूलाकडून सूक्ष्माकडे वळावें म्हणजे सिद्धांताशीं पोचतां येतें, असा विषय यांत आहे २६३-२६४; ४ आत्मानिरूपण : यांत अंतरात्म्याची लीला वर्णिली आहे २६४-२६५; ५ चत्वार जिनस : सृष्टीची व नरदेहाची श्रेष्ठता, त्याचें सार्थक असे विषय यांत आहेत २६५; ६ आत्मागुणनिरूपण : पृथ्वी ८४ लक्ष योनी, मनुष्यजीवनांतील अंतरात्म्याची हालचाल : जेवढें दिसतें किंवा माहीत आहे ते सर्व आत्म्याचे गुण : आत्म्याच्या उपासनेनें निरंजन ब्रह्म गांठ-ण्याचें ध्येय यांत सांगितलें आहे २६५; ७ आत्मनिरूपण : ही मागल्या समासाची निराळी आवृत्ति आहे : जड भूतांची उभारणी आत्म्यामुळें झाली तरी तो चंचळ : ब्रह्म एकटें निश्चळ : यासाटीं सारासारविवेक पाहिजे हा उपदेश यांत आहे २६५-२६६; ८ देहेक्षेत्र : देहाचें क्षेत्र : ब्रह्मदेवाच्या सृष्टींतील देह हें एक अपूर्व यंत्र आहे : ऊर्ध्वगतीनें विचार केल्यास भेद मावळतो : याखेरीज आवाहन विसर्जनरूप भजन यांत सांगितलें आहे २६६; ९ सूक्ष्मनिरीक्षण : यांत सृष्टीच्या उत्पत्तीचें सगळें

वृत्त पुनश्च एकवार सांगितलें आहे २६६-२६७; १० विमलब्रह्म: यांत परब्रह्माचें शुद्ध स्वरूप वर्णिलें असून त्याच्या प्राप्तीनें जन्ममृत्यूची कटकट संपते, हें सांगून झाल्यावर ग्रंथाचा उपसंहार केला आहे २६८-२७२; पुढें समर्थांच्या अनेक शब्दांचा आणि विचारांचा मागें सांगण्यांत न आलेला संदर्भ दाखविला आहे व दासबोधांतील एकंदर शिकवणीची ठोकळ पहाणी केली आहे: 'राजकारण' या शब्दाच्या अर्थाचा वाद २७१-२७२ पानांत दाखल केला आहे.

**अनुष्ठान :**

प्रास्ताविक : [१] दासबोधांतील दोन मुख्य प्रश्न: मी कोण व देव कोण, यांतील 'मी कोण'च्या विचारांतील देहनिंदा २७३-२७४; देहाची उपयुक्तता व पराधीनता २७४-२७५; मनुष्यदेहाच्या उत्पत्तीचा इतिहास: मनुष्यजीवाची श्रेष्ठता २७५-२७६; स्त्रीपुरुषांच्या जीवांत जीव-जीवी असा भेद नाहीं: देहांतील भेदाचें मूळ शिवशक्ति २७६-२७७; देहाभिमान, अहंता, मीपणाचा विचार २७७-२७८; मुक्त बद्ध व बद्धाचे पर्याय २७८; मरणविचार २७८-२७९; ब्रह्मज्ञाच्या मरणाला देशकाळाची अटक नाहीं २७९; परमार्थाचीं विघ्नें व साधनें २८०-२८१; साधक व सिद्ध २८१-२८२; सिद्धावस्थेचें स्पष्टीकरण २८२-२८३; मोक्ष-प्राप्तीचा कालावधि २८३; मुक्ति म्हणजे निष्क्रियता नव्हे, ज्ञानोत्तर कर्म २८४. [२] उपदेश, गुरु, मंत्र, संप्रदाय यांची विविधता व खऱ्या आत्मज्ञानाचा निश्चय २८५; गुरूची जात, तो कोणत्या जातीचा नसावा २८५-२८६; प्रापंचिक जीवनाचा कंटाळा हा आत्मज्ञानाच्या लालसेचा पाया, व मुमुक्षु-साधक-सिद्ध या पायऱ्या, श्रवण-कीर्तन हीं साधनें वगैरे २८६; दासबोधांत व अन्यत्र दिसणारा अनेक देवांविषयीं आदर, पण खरा देव ओळखावा हा सिद्धांत २८७; समर्थांचा क्षुद्रदेवता व भूतें-खेतें या संबंधांतील विश्वास २८७; समर्थांची देवमीमांसा २८८-२८९; मूर्ति-अवतार हीं देवळें २८९; अंतरात्मा हा सर्व देवांचा उगम २८९-२९०; अंतरात्म्याच्या ब्रह्माविष्णुमहेशादि प्रादुर्भावांचें गुणकर्म:

विष्णूची महती, इत्यादि २९०-२९१; जगज्जोतीचा परामर्श २९१; पुनः एकदां अंतरात्म्याकडे दृष्टिक्षेप २९१-२९२; सृष्टीच्या उदयास्ताचा वृत्तांत : ब्रह्म, अहंस्फुरण, माया, त्रिगुण, पंचभूतें, प्रलय वगैरे २९२-२९३; पंचभूतांचीं स्थूलसूक्ष्म अंगें, आत्मा ब्रह्म, वायु आत्मा यांची तुलना २९३; पिंडब्रह्मांडाचें ऐक्य-कोष्टक २९३-२९४; स्थूलसूक्ष्मकारणादि इतर घटक, चार आत्मे २९४-२९५; पंचीकरण व चौकड्या २९५; वाणी खाणी इत्यादिकांचें निराळें गणित २९५-२९६.

**उत्तम पुरुष :**

उत्तम पुरुषाच्या भिन्न संज्ञा २९७; मूर्खांचे निरनिराळे पर्याय : उत्तमाचे व मूर्खांचे गुणावगुण २९७-२९८; उत्तम पुरुष हा नेता खरा पण शास्ता नव्हे : त्याच्या व्यवहाराचीं अंगें २९८-२९९; उत्तम पुरुषाचें बोलणें २९९-३००; लोकांशीं भांडूं नये : अंतर जाणावें या उपदेशाचा विचार ३००-३०२; समर्थांचा बहुतांवरील विश्वास : बहुमताचें प्रामाण्य ३०२-३०३; उत्तम पुरुषानें लोकांच्या बोलीनें वागूं नये ३०३; उत्तमानें सदैव हिंडावें ३०३-३०५; भिक्षा हें निर्वाहसाधन, अन्नविषयक वर्ज्यावर्ज्यविचार ३०५; उत्तमाचा वेशपेहराव ३०५-३०६; उत्तमाची अंतरात्म्याशीं तुलना : समुदाय व गुप्तता ३०६-३०७; उत्तमाचें भगवद्भजन हें ध्येय व त्याकरितां समुदाय ३०७; उत्तम-मूर्खांच्या गुणावगुणांची निवड गीता भागवतांतून उचलली आहे ३०७-३०८; लोकशिक्षणाचे उपाय : प्रबोध व अनुभवाचें सक्रिय ज्ञान ३०८-३०९; व्यवहारांतील भेदाचें समर्थन ३०९-३१०; कथा-प्रवचन : समुदायाची व्याख्या ३१०, वक्ता—वक्तृत्व ३१०-३१२; शृंगारिकाचा निषेध ३१२-३१३; कीर्तन केव्हां कोठें करावें ३१३; उत्तमापाशीं लेखन-वाचन-पाठांतर, अर्थांतरज्ञान हे गुण पाहिजेत ३१३-३१४; उत्तमाचा जाणतेपणा व प्रयत्न ३१४-३१५; प्रारब्धा-हून प्रयत्न श्रेष्ठ ३१५-३१६; समुदाय व राजकारण यांचें साहचर्य ३१६-३१७.

**राजकारण :**

राजकारणाच्या वादाचें पूर्ववृत्त ३१८; दासबोधांतील राजकारणाचे एकंदर १५ समास व त्या शब्दाची २७ ही प्रयोगसंख्या : या समासांचीं नावें ३१८-३१९; राजकी व राजिक या शब्दांची चर्चा ३१९-३२१; दासबोधाच्या पहिल्या समासांतील विषयसूचींत राजकारणाचा उल्लेख नाहीं ३२१; रामदासी संशोधनाच्या जुन्या बाडांत १८:६ च्या उत्तम पुरुषाला चातुर्य म्हटलें आहे ३२१-३२२; दासबोधांतील सारे शब्द एकाच निश्चित अर्थानें वापरलेले नाहींत ३२२-३२३; समर्थांच्या ह्यातीमध्यें अगदीं शेवटच्या वर्षांत व नंतर राजकारण शब्दाचा अर्थ पॉलिटिक्स झाल्याचीं उदाहरणें : परंतु दासबोधांतील राजकारणाचा पॉलिटिक्स हा अर्थ नाहीं, याचें विवेचन ३२३-३२५; त्या शब्दाच्या निश्चित अर्थाचा मागोवा ३२५-३२६; उत्तम गुणाशीं साम्य ३२७; दासबोधाबाहेरील 'राजकारण' व त्या संबंधाची माहिती ३२७-३३०; दासबोधाच्या ९:४, १२:२, ११:६, १५:२, १५:३, १६:८, १८:२, १८:६ या आठ समासांतील राजकारणाकडे नजरफेक ३३०-३३१; १८:६ तील विचारांचें मंथन ३३१–३३३; १९:६, १९:८ यांतील राजकारण ३३४; १९:९ या राजकारणसंज्ञक समासांतील विचारांचें निरीक्षण व परीक्षण ३३४-३३६; ११:५ या दुसऱ्या राजकारणसंज्ञक समासाची छाननी ३३६-३३७; 'प्रपंचीं जाणे राजकारण' या वचनाची चिकित्सा; ३३७ तुळजामातेच्या 'अध्यात्मसार'स्तवनाचा सारांश ३३७-३३८; राजकारणसंज्ञक व १८:६ या समासांतील शिकवणीबद्दल समर्थ संप्रदायांतील मुखवस्त्रादिकांची पॉलिटिक्स या अर्थाविरुद्ध साक्ष ३३८-३३९.

**महाराष्ट्रधर्म :**

महाराष्ट्रधर्माची चर्चा ३४१; राजवाड्यांच्या अर्थ-संदर्भाच्या चुका ३४२-३४६; राजवाडे व रानडे याच्या विचारांतील साम्य ३४७; राजवाड्यांच्या व्याख्येंतील शब्दांचा विचार ३४८-३५०; मनजी रामजीची

गोष्ट ३५०-३५१; दासबोधांतील शिकवणीचें स्वरूप: त्यांत स्वराज्य-स्थापना नाहीं ३५२-३५४; क्षात्रधर्माच्या उपदेशाचें कारण.

**कवित्व आणि कविता**

समर्थांच्या कवित्वगुणाचा विचार ३५२-३६२; परदेशी शब्द ३६३; नवे वाक्प्रचार व शब्द ३६३-३६४; कवित्वांतील दोष ३६५; [१] रामायण ३६८-३६९; ओव्यांचीं चौदा शतकें ३६९-३७०; स्फुट ओव्या, षड्रिपु, पंचीकरण, चतुर्थमान, मानपंचक, पंचमान, स्फुट प्रकरणें, तुळजामाता, अध्यात्मसार, आनंदभुवन ३७०-३८०; [२] मनबोध व करुणाष्टकें, पदपदांतरें ३८१-३९६; [३] लघुकाव्यें ३९६-४१०; राजक्षात्रधर्मादि स्फुटें ४११-४२२; दिशाभुलीचीं उदाहरणें ४२२-४३२.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७८९९

## जीवनकथा

हल्लींच्या निजामशाही राज्यांत जांब नांवाचें एक ल्हानसें खेडें आहे. तेथें सुमारें ३५० वर्षांमागें सूर्याजीपंत ठोसर या नांवाचे एक कुळकर्णी होते. त्यांनीं कडकडीत सूर्योपासना करून सूर्याला प्रसन्न करून घेतलें. प्रसन्न झालेल्या सूर्यानें प्रत्यक्ष दर्शन देऊन दोन पुत्र होतील असा आशीर्वाद उच्चारला. हें ठोसरांचें घराणें भगवद्भक्त होतें. या घराण्यांतील रामोपासना सूर्याजीपंतांनीं आपल्या उपास्यदेवतेच्या आज्ञेवरून अंगीकारल्याची आख्यायिका आहे. पूर्वोक्त आशीर्वादानुसार इ. स. १६०८ या वर्षी चैत्री नवमीला (शके १५३०) रामजन्मोत्सव चालू असतां सूर्याजीपंताला द्वितीय पुत्रलाभ घडला. त्याचें नारायण असें नांव ठेविलें. आधींच्या पुत्राचें नांव गंगाधर होतें. हा दुसरा पुत्र नारायण पुढें ३६ वर्षांनीं कृष्णातटाकीं प्रथम 'रामदास' व नंतर 'समर्थ' या नांवानें प्रसिद्धीस आला.

ल्हानपणीं नारायण अतिशय बुद्धिमान, सशक्त व हूड असल्याचें निदर्शनास आणणाऱ्या अनेक आख्यायिका आहेत. त्याचे वडील सूर्याजीपंत हे सत्पुरुष असल्यामुळें जे कोणी श्रद्धेनें उपदेश मागायला येतील, त्यांना मंत्रोपदेश देण्याचें एक कार्य सूर्याजीपंतांना करावें लागत होतें. बाळ नारायण हा प्रकार पहात होता. पुढें एकदां आपल्या थोरल्या भावाला बापानें मंत्र दिल्याचें पहाण्यांत आल्यावर नारायणानें आपल्याला पित्यापासून मंत्रप्राप्ति व्हावी म्हणून हट्ट धरला, पण सूर्याजीपंतांनीं त्याचें म्हणणें ऐकलें नाहीं. पित्याच्या पश्चात् थोरल्या भावाकडून मंत्र मिळावा असा नारायणानें प्रयत्न केला. तो वाया गेल्यावर नारायणाचा उद्वेग अनावर झाला. 'भावास भाऊ उपदेश देती। पुढें पुढें होते फजीती।' (१९ : ६ : ६) हें दासबोधांतील वाक्य वरील अनुभवाच्या अनुरोधानें

पाहिल्यास सूचक वाटल्याशिवाय रहात नाहीं. भावानें मंत्र पढविण्याचें नाकारल्यावर नारायणानें एकान्तवासाची कांस धरली. त्यांतच एक विलक्षण प्रसंग नारायणाच्या वांटणीस आला. हा प्रसंग नारायणानें पुढें सद्‌गुरूच्या नात्यानें शके १५७६ सालीं ज्यावर अनुग्रह केला त्या दिनकरस्वामीच्या 'स्वानुभव दिनकरां'त वर्णिलेला आहे. नारायणाचें वय तेव्हां अकरा वर्षांचें होतें. एके दिवशीं सूर्याजीपंत व गंगाधर हे दोघेहि घरांत नसतां दूतवेषानें कोणी एक जण आला. त्यानें नारायणाला धक्के मारीत फरफटत गांवाबाहेर ओढून नेलें. नारायण भीतीनें गांगरून गेलेल्या स्थितींत पहातो तों एक स्त्रीपुरुषांची जोडी शिबिकेंत बसलेली व भोंवतीं सेवकजन उभे, असा देखावा नारायणाला दिसला. नारायणाला त्या शिबिकेजवळ नेऊन उभें केल्यावर रचपुती (रजपुती–हिंदुस्थानी) भाषेंत 'तुझा बाप कुठें आहे' असा शिबिकेंतील पुरुषानें प्रश्न केला. बापाचें वर्तमान सांगितल्यावर त्यानें नारायणाला जवळ बोलावलें. जवळ गेल्यावर नारायणाचें मस्तक कुरवाळून त्याला एक पत्र दिलें. तें पत्र हातीं येतांच नारायणाची अवस्था पालटली. तो थरथर कांपूं लागला. त्याला उभें राहवेना. बोबडी वळली. घाम सुटला. हंसावें, रडावें, उड्या माराव्या, जमिनीवर पडावें, अशा स्थितींत त्याला राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, मारुति यांचें दर्शन झालें. त्या क्षणीं वावटळीचा वारा वहात होता. रामानें त्याला महावाक्य उपदेशून मारुतीच्या स्वाधीन केलें. नारायण जास्तच घाबरला व इकडे तिकडे पाहूं लागला; तों त्याला 'धुधुकार' (मारुति) दिसला. इतक्यांत त्याच्या अंगाभोंवतीं विजेसारखें लखलखणारें वस्त्र लपेटलें गेलें. एका हातांत पत्र, दुसऱ्या हातांत अर्धचंद्र बाण या वस्तू देऊन राम गुप्त झाला. 'नारायणासी पडिले अंधारें। वाचा स्तब्ध होऊनि येक संवत्सरें। निज समाधीं तटस्त,' नारायणास कोणा दूतानें पकडून नेल्याचें पित्याला व बंधूला घरीं आल्यावर समजतांच नारायणाचा त्यांनीं शोध आरंभला. नारायण त्यांना गांवाबाहेर दाट झाडीच्या भागांत सांपडला. तेथून त्याला घरीं आणलें. अंगावरील वस्त्र व हातांतील वस्तू पाहून पिताभ्रात्याला आश्चर्य वाटलें. पत्र नारायणाच्या मुटींत घट्ट धरलेलें होतें. तें एकान्तांत पहावें म्हणून जमलेल्या लोकांना सूर्याजीपंतानें घालवून मूट उघडली. पत्र वाचल्यावर सूर्याजीपंतांना कायमची समाधि लागली. गंगाधराला देखील समाधि लागली होती. पण तो समाधींतून उठला. नंतर त्यानें आपली

लेखणी देवाला वाहिली. कुळकर्णपणाचें काम सोडलें. नारायणाचें मौन एका वर्षानें सुटलें व तो काव्यें बोलूं लागला. नंतर लग्नांतून पळाला.

रामदर्शनाच्या चमत्काराचें रूप या कथेमध्यें दिसलें तरी तिचा विचार करूं लागल्यास कुळकर्णपणाच्या कामानिमित्त सूर्याजीपंतावर आलेल्या सरकारी (सुलतानी) संकटाचे धागेदोरे या कथेमधून उमगणारे आहेत. नारायणानें या संकटाचा तडाखा अनुभवला व त्याच्या हृदयांतील देवाच्या भक्तीचा अंकुर फोफावून त्यानें लग्नाची बेडी पायांत पडूं न देतां गृहत्याग केला. नारायणाच्या हातांतील पत्र वाचून सूर्याजीपंतांचें देहावसान व्हावें व गंगाधरपंतानें लेखणी देवास वहावी, या दोन्ही गोष्टी अत्यंत सूचक आहेत. ज्यावर कृपा करावयाची त्याला धरून मारहाण करीत फरफटत ओढीत नेण्याचें कारण काय होतें ? 'तूं नाहीं तर तुझा बाप' याच्या उलट 'बाप नाहीं तर तूंच' या न्यायानें नारायणावर त्या वेळीं विपरीत सुलतानी प्रसंग गुदरला. ह्या योगानें बापास मृत्यु आला व भावाला वंशपरंपरागत कामगिरी सोडून द्यावी लागली. नारायण स्वतःवर ओढवलेल्या प्रसंगाचे परिणाम वर्षभर स्तब्धपणें पहात होता. शेवटीं त्यानें देवाच्या उपासनेसाठीं 'जीवलगांच्या तुटी' स्वीकारून घर सोडलें, असा अर्थ या कथेचा विचार केल्यास ध्यानीं उतरतो. सूर्याजीपंतांनीं आपलें कुळकर्णपण सोडल्याची माहिती समर्थांच्या इतर चरित्रांतून-देखील पहायला सांपडते. नोकरींतल्या हालांविषयीं समर्थवाङ्मयांत आढळणारीं वचनें वरील प्रसंगाच्या संदर्भांत पहाण्याला हरकत नाहीं.

नारायण घरांतून पळाल्यानंतर नाशकाजवळ टाकळीस पुरश्चरणार्थ गेला, तेथें बारा वर्षें राहून ह्या पुढचीं बारा वर्षें त्यानें तीर्थयात्रेंत घालविलीं व नंतर घरच्या मंडळींना भेटून कृष्णातटाकीं वास्तव्य आरंभलें, असा त्याच्या वयाच्या पहिल्या छत्तीस वर्षांचा इतिहास प्रसिद्ध आहे. येथून पुढें नारायणाला जनता 'रामदास' या नांवानें ओळखूं लागली. कालांतरानें तो 'समर्थ' या पदवीस चढला. येथून पुढें याच थोर नांवाचा उपयोग करणें चांगलें. त्यांनीं जीं तीर्थासंबंधाचीं पदें केलीं आहेत त्यांच्या आधारें त्यांनीं दक्षिणेकडील तीर्थें जास्त पाहिलीं होतीं, असें म्हणतां येतें. शेवटीं त्यांनीं कृष्णातीराचा प्रदेश आपल्या वस्तीसाठीं कां निवडला, याचें उत्तर त्यांच्या कवितेमध्यें क्वचित् आढळणारें आहे. 'धाकुटा भाग्यास चढला। तरी तुच्छ

करिती तयाला । याकारणें सलगीच्या लोकांला । दुरी धरावें ॥' (दास. १५ : ३ : १३) ज्यांना कांहीं ईर्ष्या-महत्त्वाकांक्षा असेल ते आपला गांव सोडून दूर जातात आणि कर्तबगारीनें भाग्यास चढतात; एका झाडाच्या सावलींत ज्याप्रमाणें दुसरें झाड वाढत नाहीं, त्याप्रमाणें सलगीच्या वातावरणांत एखाद्यानें डोकें वर काढण्याचें मनांत आणल्यास तें साधत नाहीं, म्हणून ईर्ष्येच्या माणसानें आपल्या गांवापेक्षां निराळें ठिकाण स्वतःच्या कर्तृत्वासाठीं निवडावें; अशा तऱ्हेचें समर्थांचें मनोगत इतस्ततः पाहिलें म्हणजे समर्थ गोदाकांठ टाकून कृष्णाकाठीं कां आले याचा उलगडा झाल्याशिवाय रहात नाहीं. 'वोळखीच्या लोकांत महंती । मांडूचि नये' असें समर्थांचेंच वचन आहे (दास. १९ : ६ : ६).

पुरश्चरणाच्या व तीर्थयात्रेच्या काळांत समर्थांनीं आपल्या भक्तीच्या ध्येयाला अवश्य असणारें ज्ञानार्जन केलें असलें पाहिजे हें कळण्याला कठीण नाहीं. नाशिक हें प्रसिद्ध तीर्थस्थान असल्यानें तेथें विद्वानांचें वास्तव्य असणें स्वाभाविक आहे. याशिवाय सिंहस्थासारख्या पर्वणीला इतर ठिकाणचे श्रेष्ठ पुरुष नाशिकास येऊन आपल्या योग्यतेचा लाभ तेथील जनतेला देत असतील, हें जमेस धरावें लागतें. समर्थ पुरश्चरणाचा विधि आटोपून प्रत्यहीं किंवा पुष्कळदां नाशिकास फेरी मारून तेथें चालणाऱ्या विद्वच्चर्चेच्या जागीं जाऊन अज्ञातपणें ज्ञानसंग्रह करीत असतील, असा तर्क चुकीचा ठरणार नाहीं. श्रवणद्वारें त्यांनीं अध्यात्मविद्या आत्मसात् केली असल्याचा संभव श्रवणाच्या साधनाबद्दल त्यांचें जें विवेचन आहे त्यावरून जाणतां येतो. त्यांनीं श्रवणाच्या क्षेत्रांत बहुतेक सारे ज्ञानाचे विषय दाखल केलेले आहेत. जें जें कांहीं आपल्या जाणतेपणांत भर टाकणारें असेल तें सर्व ऐकावें—'परंतु सार शोधून घ्यावें । असार तें जाणोनि त्यागावें ।' (दास ४ : १ : २९) अशी समर्थांच्या विवेकप्रेमाची खूण श्रवणाच्या विवेचनांत न चुकतां आलेली आहे. ज्ञानगुणांच्या संबंधांत इतर संतांपेक्षां समर्थांचा विशेष म्हणजे त्यांचें संगीतकलेवरील प्रभुत्व हा होय. संगीतविद्येंत त्यांचें प्रावीण्य होतें याची खात्री पटविणारी कविता किती तरी आहे. गायनवादनाचा निर्देश साध्या उपदेशांतसुद्धां त्यांनीं अनेकदां केलेला आहे. जिज्ञासूंकरितां त्यांच्या 'धन्य ते गायनी कळा' या पालुपदाच्या एका स्फुट काव्याचें

नांव सांगायला हरकत नाहीं. 'श्रीरामदासांची कविता–प्रथमखंड' या पुस्तकांत ३९७-३९८ पानांत हें प्रकरण छापलेलें आहे. त्यांनीं आपलीं पदें निरनिराळ्या रागांत रचलेलीं असून रागांचीं लक्षणगीतेंसुद्धां त्यांच्या कवितेमध्यें इतस्ततः सांपडतात. कीर्तनासाठीं गायनाचा सामान्य अभ्यास इतर संतांनीं केलेला असेल, परंतु गायनविद्येचें सूक्ष्म ज्ञान व उत्कट प्रेम समर्थांच्या वाङ्मयांत जसें दृष्टीस पडतें तसें तें इतर संतांच्या कवितेमध्यें दिसत नाहीं. समर्थ हे मारुतीचा अवतार ही समजूत प्रचलित होण्याच्या कारणांपैकीं त्यांना अवगत असलेली प्रभावशाली गायनविद्या हें एक कारण जमेस धरतां येतें. मारुति हा संगीताच्या आचार्यांत गणला जातो, हें पुराणाच्या ज्ञात्यांना सांगायला नको. समर्थांना पुस्तकी ज्ञान तर होतेंच, परंतु त्यांचें अनुभवाचें ज्ञानदेखील विलक्षण आहे. रानांतलीं व बागेंतलीं झाडें, जनावरें, किडे, फुलें, फळें, माणसांना भोगाव्या लागणाऱ्या नानाविध मानसिक विकृति व आपत्ति, भौतिक सृष्टींतील नानाविध अनुभव, यांचें वर्णन करूं लागले कीं समर्थांना आपली माहिती आवरत नाहीं. विद्या, अनुभव, वैराग्य, परोपकार-पटुता अशा साधनसंपत्तीची परिपक्वता अंगीं बाणल्यावर कृष्णातटाकीं समर्थांनीं जेव्हां देवाधर्मांचा अभिमान चेतविण्याचें कार्य हातीं घेतलें तेव्हां त्या भागांत एका नव्या युगाला प्रारंभ झाला अशी लोकांची भावना झाली असल्यास तें योग्यच ठरणारें आहे.

तीर्थयात्रा आटपून समर्थ प्रथम कृष्णेच्या उगमाजवळ महाबळेश्वराच्या ब्रह्मारण्यांत कांहीं काळ राहिले. तेथून ते कृष्णेच्या कांठाकांठानें संचार करून आपल्या रामोपासनेची मुहूर्तमेढ रोवण्याला योग्य स्थळ पहात होते. कृष्णातटाकीं कांहीं ठिकाणें पुराणांनीं किंवा स्थलमाहात्म्यांनीं रामचरित्राशीं जोडलेलीं आहेत. या स्थळीं रामाच्या भक्तीचें मूळ रुजलेलें असावें हें स्वाभाविक आहे. मुसलमानी राजवटींत तें मूळ दडपून गेलेलें होतें. लोकांत भक्ति असली तरी उत्सवांच्या साह्यानें ती भक्ति जळती ठेवण्याचें कार्य कुठें अजीबात बंद तर कुठें मंद झालेलें होतें. समर्थांनीं ही भक्ति वाढविण्याचें कार्य हातीं घेतलें. रामभक्तीच्या संप्रदायांत मारुतीची महती विशेष मानलेली आहे. रामभक्तांना मारुतीसारखा दुसरा कोणताच आधार नाहीं. रामानें इहलोक सोडला तेव्हां आपल्या भक्तांच्या

संरक्षणाचें काम मारुतीकडे सोंपविलें व मारुति तें विनचूक बजावीत असतो, अशीं समर्थांचीं कितीतरी वचनें आहेत. बाहेगांवचा मारुति (करुणाष्टकें, ५२) याविषयीं समर्थांची एक कविता असून ती कृष्णाकांठावरील रामोपासनेच्या परिचयाची व मारुतीच्या रामभक्तिविषयक कामगिरीची साक्ष एकत्र पटविणारी आहे.

> **रघूराज वैकुंठधामासि गेले । तवीं मारुती दास हे नीरवीले ।**
> **रघूनाथ उपासकाला प्रसंगें । सख्या मारुती पाव रे लागवेगें ॥**
> **प्रभूचें महावाक्य तां साच केलें । म्हणे दास हे प्रत्यया सद्य आलें ।**

लंकेची मोहीम आटपून राम अयोध्येस परत जातांना कृष्णातटाकीं संध्येस बसलेला असतां नदीचें पाणी एकाएकीं चढूं लागलें. त्याचा लोंढा रामाच्या रोखानें जाऊं लागला. तेव्हां मारुतीनें आपले हात पसरून तो अडविला. ' नदी एक वीभागली दोन बाहे । म्हणोनी तया नांव रे गांव बाहे । ' मारुतीच्या बाहूंनीं नदीचें पात्र दुभंगलें म्हणून तेथील गांवाला बाहे (बाहु) गांव असें नांव पडलें, वगैरे कथा प्रस्तुत कवितेंत स्वतः समर्थांनींच सांगितलेली आहे. ' या गांवच्या मारुतीला बघायला गेलों, पण देवळांत मूर्ति नव्हती; तेव्हां विस्मय वाटून मारुतीला हांक मारतांच पाण्यांतून त्यानें ओ दिली, ' असा या संबंधांतील अनुभव समर्थांनीं निवेदन केला आहे. पुढें समर्थ म्हणतात : ' रघुनाथानें वैकुंठास जातांना मारुतीस बजावलें होतें कीं, जेव्हां आवश्यकता उत्पन्न होईल तेव्हां रामोपासकाला साह्य करीत जा. ' रामाचें तें महावाक्य मारुतीनें खरें असल्याचें दाखवून दिलें, असा समर्थांचा आशय वरील चरणांतून व्यक्त झालेला आहे.

समर्थांची मारुतिविषयक भावना समजण्यासाठीं त्यांचें आणखी एक पद येथें सादर करावेंसें वाटतें :

> **हनुमान नमीत मी भेटवील मज रामीं ।**
> **विघ्नांचिया कोटी शमी अंतराये ॥**
> **पावावया रघुनाथ जया उचंबळे आर्त ।**
> **तेणें ध्यावा हनुमंत करील भेटी ॥ १**
> **रामउपासकावरी प्रीतीपढ भरोवरी ।**
> **होउनिया कैवारी रक्षितसे ॥ २**

**रामी रामदास श्रेष्ठ सिद्धादि सिद्ध वरिष्ठ ।**
**भावाचा भरित घोटे स्मरणमात्रें ॥ २**

मारुतींच्या स्थापनेनें देवाचें वैभव वाढविण्याचें कार्य हातीं घेण्यापूर्वी समर्थ कांहीं काळ पिशाचवृत्तीनें कृष्णातटाकीं फिरत होते. ल्हानपणींच गृहत्याग करून वैराग्यपूर्वक टाकळीचा एकान्तवास त्यांनीं १२ वर्षे संभाळला व नंतर तीर्थयात्रा-देखील बहुधा एकाकी राहूनच केली, यामुळें एकान्ताची रुचि त्यांच्या स्वभावांत उत्कटत्वानें बाणलेली असल्यास तें योग्यच म्हणतां येईल. लोकजागृतीसाठीं देवाचें कार्य करायचें तर एकान्तांतून लोकांच्या गर्दीत वावरणें भाग व एकान्ताची आवड तीव्र, शिवाय एकान्त हा कर्त्या पुरुषाला आपल्या झाल्या कामाची तपासणी करावयाला व नव्या कामाची प्रेरणा होण्याला उपयोगी म्हणून अवश्य, यामुळें समर्थांनीं कामापुरतें लोकांत रहावें आणि काम सुरळीतपणें चालीस लागल्याचें दिसतांच अरण्यांत अज्ञात दुर्गम स्थळीं निघून जावें असा दुहेरी क्रम ठेवला होता. कालान्तरानें त्यांचीं अरण्यांतील किंवा डोंगरांतील स्थळें लोकांना समजलीं तरी तेथें जाणें अवघड असल्यानें समर्थांच्या एकान्ताचा भंग होण्याचें भय नव्हतें. 'घळी' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या लेण्यांतून समर्थांनीं स्वतःकरितां कित्येक लेणीं निवडलीं. समर्थांनीं तीं डोंगर फोडून तयार केलेलीं नव्हतीं. हीं प्राचीन भिक्षुसंन्याशांचीं वस्तीस्थानें रिकामीं पडलेलीं पाहून समर्थांनीं तेथें रहाण्याला प्रारंभ केला. समर्थांमुळें त्यांना ऊर्जितावस्था आली असली पाहिजे हें उघड आहे. समर्थांच्या मागें तीं ठिकाणें फिरून अवदशेच्या फेऱ्यांत सांपडलीं. परंतु समर्थांनीं अरण्यवासार्थ अशीं स्थळें निवडावीं यांत त्यांच्या साधुवृत्तीचा इतरांपेक्षां निराळा विशेष दिसून येणारा आहे. चाफळ, सज्जनगड यांच्याजवळ अशा घळी आहेत. परंतु येथून दूर असलेल्या शिवथर, हेळवाक येथील घळी डोंगरांच्या पोटांत अशा जागीं आहेत कीं, जेथें सहजासहजीं कुणाला जातांच येऊं नये. शिवथरच्या घळीशेजारीं कांहीं अंतरावर चंद्रराव मोरे घराण्याचा वाडा एकदां असल्यानें तेव्हां त्या वाड्याच्या आसपास माणसांची थोडी फार वर्दळ होती असा तर्क करतां येतो. हेळवाकच्या घळीचा प्रकार अगदीं निर्मनुष्य स्थितीचा आहे. अर्थात् ही घळ अधिक एकान्ताची असली पाहिजे.

**कांहीं गलबला कांहीं निवळ । ऐसा कंठीत जावा काळ ।**
**जेणेंकरितां विश्रांती वेळ । आपणासी फावे ॥** (दास १९:८:२९)

या समर्थोक्तीप्रमाणें गर्दीतून एकान्तांत व एकान्तांतून पुनः गर्दीत अशी समर्थांची येजा सुरू असली पाहिजे; व त्याचप्रमाणें ती होती असें त्यांच्या चरित्रावरून दिसून येतें. समर्थांनीं एकान्ताचे लाभ आपल्या वाङ्मयामध्यें अनेक जागीं सांगितले आहेत. अरण्याचा एकान्त हा समर्थांचा विशेष आहे. परमार्थाचें साधन म्हणून त्यांनीं अरण्यवासाची महती गाइलेली आहेच. परंतु सिद्धावस्थेस पोंचल्यावर जेव्हां त्यांचा मठ-मंदिराचा व्याप चालू झाला तेव्हां अरण्याच्या एकांतवासाची सवड कमी झाली तरी ते मधून मधून अरण्यांतील ठराविक अवघड स्थळाकडे निघून जात व आपलें अरण्यवासाचें प्रेम तृप्त करीत. एकान्तावांचून बुद्धीला बिनचूक प्रेरणा मिळत नाहीं. नव्या नव्या 'चाळणा, तजविजा' जर सुचायला हव्या असतील तर एकान्ताचा उपयोग अतिशय होतो. आपल्या परमार्थाची दृढता एकान्तसेवनानें राखतां वाढवितां येते.

**येकांतीं विवेक करावा । आत्माराम वोळखावा ॥** (दास. १९:६:३०.)

असें त्यांचें एक वचन असून परमार्थरक्षणाची खूण त्यांत आहे.

सर्व रामोपासकांच्या चरित्रांत रामाची भेट मारुतीच्या मध्यस्थीनें साधते असा नियम आढळतो. त्याचा उच्चार समर्थांच्या मागें दिलेल्या पदांत आहे. मारुतीच्या मध्यस्थीचें ऋण फेडण्याकरितां रामोपासकांनीं कमींत कमी अकरा मारुतींची स्थापना करावी, असा आणखी एक संप्रदायाचा नियम दृष्टीस पडतो. समर्थस्थापित मारुतींची संख्या अकराच आहे. समर्थांच्या चरित्रांत मारुतीचा संबंध अगदीं बालपणापासून इतक्या दृढत्वानें आलेला आहे कीं, लोक त्यांनाच मारुतीचा अवतार समजूं लागले. 'त्याचा मी, म्हणती जनीं' (चतुर्थमान, ४ थें मान, ५ वा श्लोक) अशी समर्थांचीसुद्धां कबूली आहे. रामाच्या साक्षात्कारानें समर्थ सिद्धावस्थेस पोंचल्यावर त्यांनीं मारुतीच्या ऋणाची फेड कृष्णातटाकीं सुरू केली. त्यांनीं वेगवेगळ्या गांवीं एकंदर अकरा मारुतींची स्थापना केली आणि या देवकार्यावर चाफळास रामाची स्थापना करून कळस चढविला. समर्थांचा कटाक्ष नव्या मूर्ति स्थापण्याऐवजीं लोकांनीं मुसलमानांच्या भीतीनें नदीच्या डोहांतून ठिकठिकाणीं बुडविलेल्या मूर्ति वर काढून

त्यांना त्यांच्या मूळच्या ठिकाणीं पुनः बसविण्यावर अधिक होता. समर्थांच्या काळीं देवाधर्माविषयीं लोकांत पसरलेलें औदासीन्याचें दैन्य समर्थांसारख्या विचारवंतांना उत्कटत्वानें जाणवणारें होतें. त्या काळांत मुसलमानांची राजवट हिंदूंच्या देवाधर्माला उटल्यासुटल्या पायाखालीं तुडविण्याइतकी बलाढ्य राहिलेली नव्हती. तरीसुद्धां परकयांच्या जुलमापेक्षां स्वकीयांची देवधर्मविषयक अनास्था अधिक घातक हें ध्यानांत घेऊन डोहांतून मूर्ति काढण्याचें व त्यांना पूर्वस्थानीं विराजमान करण्याचें साहस आचरून समर्थांनीं लोकांत देवधर्माभिमानाची जागृति चेतविली. मुसलमानांच्या जुलमाची भीति नाहींशी झाल्यावरसुद्धां त्या भीतीपायीं बुडविलेल्या देवांना वर काढण्याची आस्था लोकांनीं दाखविली नाहीं हें त्यांच्या औदासीन्याचें लक्षण अगदीं स्पष्ट होतें. लोकांत देवाधर्माचा अभिमान होता, पण तो सक्रिय नव्हता. देवाधर्मासंबंधांतील इस्लामी जुलमानें त्या अभिमानाच्या कर्तृत्वाला कसलाच अवकाश ठेवला नसल्याप्रमाणें त्या अभिमानाची गति कुंठित झालेली होती. कर्तृत्वाच्या अभावाचें मूळ भयाखेरीज दुसरें नव्हतें. समर्थांनीं देवदेवळांविषयींचें औदासीन्य आपल्या साहसानें झाडून टाकण्याला प्रारंभ केला तेव्हां लोकांत देवधर्माभिमानाचा उत्साह संचरून कृष्णातटाकीं देवाधर्माच्या जयजयकाराचें नवें युग उदयास आल्याचा अनुभव लोक घेऊं लागले असल्यास आश्चर्य वाटायला नको. पहिलें साहस यशस्वी झाल्यावर दुसरीं साहसें लोकांच्या निर्भय आत्मविश्वासानें सुकरतापूर्वक सफल झालीं असलीं पाहिजेत हें समजण्याला कठिण नाहीं.

देवाचें वैभव वाढविणें हें समर्थांनीं आपलें जीवितकर्तव्य निश्चित केलें होतें, याचा पुरावा त्यांच्या वाङ्मयांत अनेक स्थळीं प्रगट झालेला आहे. दासबोधाच्या दुसऱ्या दशकांत एकदां (स. ७) व चौथ्या दशकांत दोनदां (स. ६ व ७) या जीवितकर्तव्याचा उच्चार त्यांनीं केला असून त्यांच्या वाङ्मयाच्या इतर भागांतहि दासबोधांतील विचार कित्येकदां त्याच शब्दांमध्यें – कधीं संक्षेपानें तर कधीं विस्तारानें – व्यक्त झालेले आहेत. दासबोधाच्या दुसऱ्या दशकांत सत्त्वगुणाचें वर्णन चालू असतां देवळें बांधावीं, त्यांचीं शिखरें सांधावीं, देवळाच्या आसपास विहिरी, तळीं, उपवनें निर्माण करावीं, यात्रेकरूंसाठीं धर्मशाळा उभाराव्या, देवाच्या उत्सवांत राजाचें ऐश्वर्य लोकांना दिसावें, देवळाच्या परिवारांत पांखरें, जनावरें

असावीं, देवाच्या भक्तांना भरपूर अन्न लाभावें, इतकेंच नव्हे तर सात्विक विलासांचीदेखील यात्रामहोत्सवांत उणीव भासणार नाहीं अशी व्यवस्था ठेवावी. सत्त्वगुणी पुरुषांचीं हीं कर्तव्यें आहेत, हा समर्थांचा अभिप्राय चौथ्या दशकांतील अर्चन व दास्य या भक्तिप्रकारांच्या विवेचनांत वर सांगितलेल्या तपशीलाच्या न्यूनाधिक्यानें आलेला आहे. समर्थांना या वैभवाचा शून्याकार देवाच्या संबंधांत दृष्टीस पडत असल्याशिवाय त्यांनीं त्याचा आग्रह मनाशीं धरलेला नाहीं. इस्लामी राज्यांतील हिंदु सरदार यथेच्छ धनमानाचा उपभोग घेत होते. देवांची मात्र उपेक्षा चालू होती. देवस्थानें भंगून ओसाड पडल्यास त्याची कोणी विचारपूस करीत नव्हतें. ती उपेक्षा मोडून सर्वांचें लक्ष देवाकडे लागावें, असा समर्थांनीं देवाच्या वैभवाविषयीं बाळगलेल्या आग्रहाचा निष्कर्ष ठरतो. घरोघरीं देवांची पूजाअर्चा होत असली तरी भक्तीच्या सामुदायिक संघटनेला देवळें व देवांचे प्रासंगिक उत्सव यांची आवश्यकता असते, हें तत्त्व समर्थांच्या हृदयांत बाणलेलें होतें. म्हणून त्यांच्या उपदेशांत जागोजाग पुनः पुनः देवळें आणि त्यांची शोभा, उपयुक्तता व प्रतिष्ठा वाढविणारी सामग्री या विषयांचा प्रवेश झालेला आहे. पुरश्चरणाची उमेद-वारी संपली, तीर्थयात्रेनें लोकस्थितीचें ज्ञान होऊन ध्येयाला निश्चित रूप आलें, आतां प्रत्यक्ष ध्येयानुसार कर्तृत्वाला प्रारंभ करायला पाहिजे अशी वेळ येतांच समर्थांनीं देव, देवळें, देवाचे उत्सव आणि वैभव यांकडे दृष्टि वेधण्याजोग्या पद्धतीनें आपल्या ध्येयाच्या कर्तृत्वाचा पसारा मांडला. समर्थांना देवांचें स्वातंत्र्य हवें होतें. त्यांचें उपास्य जो राम तो देवांना रावणाच्या कैदेंतून सोडविणारा देव होता. देवांच्या स्वातंत्र्याकरितां लोकांना उत्सवादि कार्यांची कांस निर्भयतेनें धरायला समर्थांनीं शिकविलें. इस्लामी राज्यकर्तृत्वांतील धार्मिक अन्यायांमुळें भेदरून स्वस्थ बसलेल्या जनतेला देवविषयक वर्तनाचें स्वातंत्र्य संपादन करण्याचा कित्ता समर्थांनीं घालून दिला. इस्लामी राज्यकर्तृत्वाच्या एका बाजूवर ही एक प्रकारची चढाईच होती व तिचा पुढाकार समर्थांनीं घेतलेला होता. आपले देव स्वतः बुडविण्याइतका धाक ज्या राज्यकर्तृत्वानें उत्पन्न केलेला होता, त्या इस्लामी राज्यकर्तृत्वाच्या समर्थकालीन वारसदारांना समर्थांच्या कामगिरीचें रहस्य कदाचित् कळलें असलें, तरी आपल्या अनियंत्रित वर्चस्वावर समर्थांनीं चालविलेले हल्ले थांबविण्याची शक्ति त्यांच्यांत उरलेली नव्हती.

समर्थांनीं कृष्णातीरीं येतांच देवाच्या जयजयकाराचें निशाण लोकांसमोर धरलें असतें तर लोकांनीं त्यांच्या कृत्याचा तात्रडतोब मान करणें मानवी व्यवहारांकडे पहातां शक्य कोटींतलें ठरत नाहीं. कृष्णातीरावरील संचारांत ते जनतेचा आधीं परिचय करून घेत होते व जनतेला आपल्या योग्यतेचा परिचय करून देत होते. निःस्वार्थ परोपकाराच्या साधनानें त्यांनीं लोकांमध्यें आपलें वजन वाढविलें, असें पटवून देणाऱ्या कांहीं आख्यायिका त्यांच्या सांप्रदायिक चरित्रकारांनीं सांगितलेल्या आहेत. ज्या विभागांत ते हिंडत होते तेथील अधिकाऱ्यांशीं ओळखीदेखी होऊन हा कोणी लोकोत्तर योग्यतेचा पुरुष असल्याबद्दल त्यांच्या ठिकाणीं समर्थांनीं विश्वास उत्पन्न केला असला पाहिजे, असें समर्थांच्या कित्येक वचनांवरून व आख्यायिकांवरून समजण्याला अडचण नाहीं. नव्या कर्तृत्वाच्या पुरुषाला उपेक्षा, निंदा, अवहेलना या चढत्या श्रेणीच्या तापत्रयांशीं झगडून विजय संपादावा लागतो. समर्थांनीं असा विजय मिळवितांना किती तऱ्हेचे मानसिक व शारीरिक क्लेश सोसले असतील याची त्यांच्या वचनावरून कल्पनाच करावयाला पाहिजे. लोकांत बरें म्हणून घेण्याकरितां 'भल्यास लागतें सोसणें ।' भल्यांनीं जर सहनशीलता सोडली तर 'भंडवाणें । सहजचि होये' (दास. ११ : २ : १३). लोकांना न मानवणारें कृत्य करूं पहाणारानें 'आपण येकला जन नाना' हें ध्यानांत ठेवावें, म्हणजे त्यांच्याशीं भांडूं नये आणि लोकांच्या 'सांगातीं' राहून त्यांस 'मानत मानत शिकवावें । हळुहळु सेवटा न्यावें । विवेकानें ॥' (१२ : १० : ४१). लोकांना राजी राखावें, हा समर्थांचा उपदेश दासबोधांत व त्यांच्या इतर वाङ्मयांत वारंवार आलेला आहे. लोकांना राजी राखतांना स्वत्व न विसरण्याचीहि ताकीद त्यांनीं देऊन ठेवलेली आहे. लोकांना राजी राखून त्यांना देवाच्या वैभवाचा अभिमान समर्थांनीं शिकविला. कीर्तन हें तात्कालीन लोकशिक्षणाचें प्रमुख व प्रभावी साधन असल्यानें हरिकथानिरूपणाचें स्मरण त्यांच्या उपदेशांत ओतप्रोत भरलेलें आहे. देऊळ हें देवभक्तीच्या शिक्षणाचें व संघटनेचें केंद्र होय अशी खूणगांठ मनाशीं बांधून समर्थांनीं देवाचा महिमा गाइलेला आहे. कीर्तन-प्रवचनाच्या निमित्तानें आपल्या भोंवतीं माणसें गोळा करावयाची व त्यांना भगवद्भजनाचा मार्ग दाखवावयाचा ही समर्थांची आकांक्षा साऱ्या दासबोधांत व अन्यत्र दुमदुमतांना आढळते.

१५१०८ ८९९६९३

आपल्या ध्येयानुसार देवदेवळांच्या उद्धाराचें आणि वैभववृद्धीचें कार्य आरंभण्यापूर्वी समर्थांनीं आपल्या संचारांत लोकांच्या विविध स्वभावाची परीक्षा करून ठेवली होती. भिक्षेच्या निमित्तानें लहानथोरांना पारखलें व जे अडचणींत होते, त्यांना अडचणींतून सोडवून आपल्या भजनीं लावलें. संचारक्षेत्रांतील एका सरकारी हिंदु कामगाराची गोष्ट समर्थांच्या परोपकाराची कल्पना आणून देणारी आहे. हा वसुलीकामगार सरकारी अवकृपेच्या भोंवऱ्यांत अडकला होता. समर्थांनीं आपलें वजन खर्चून त्याची सदर भोंवऱ्यांतून सुटका केली, अशी एक कथा बहुतेक सर्व सांप्रदायिक चरित्रांतून आलेली आहे. मुसलमानी राजवटीच्या वक्रदृष्टींतून एखाद्याला सोडविण्याची कामगिरी समर्थांना कशी करतां आली, याचा विचार करूं लागल्यास दासबोधांतील एके ठिकाणचा उपदेश अशा विचाराचा योग्य निर्णय देणारा आढळतो. ज्या भूभागांत रहावयाचें तेथील अधिकाऱ्यांना भेटून त्यांची ओळख करून ठेवणें अवश्य असतें. अधिकाऱ्यांकरितां दासबोधांत 'प्रभु' शब्द योजलेला आहे. प्रभूची भेट घेण्याचें टाळल्यास आपलें महत्त्व जाण्याला वेळ लागत नाहीं. याकरितां रायापासून रंकापर्यंत 'कोणी येक तरी नायेक। त्यास भेटणें हा विवेक।' असें समर्थांनीं म्हटलें आहे. भेट न घेतली तर वेठीस पकडले जाण्याचा किंवा चोरी न करतांहि चोरी अंगीं चिकटण्याचा संभव असतो. 'या कारणें जो शाहाणा। तेणें प्रभूसी भेटावें जाणा।' तसें न केल्यास संसार दैन्यवाणा होतो (६ : १ : २–७). प्रस्तुत उपदेशानुसार समर्थांनीं मसूर-कऱ्हाडकडील भागांत असणाऱ्या अंमलदारांच्या ओळखी साधल्या असणें व त्यांच्या बळावर सरकारी इतराजीचा तडाखा भोगणारांना मुक्त करणें, हें शक्य असल्याचें ध्यानांत येईल. सामान्य साधुत्वाच्या परोपकारापेक्षां सरकारांतील वजनाचा परोपकार लोकांना वेधून घेण्याच्या दृष्टीनें अधिक प्रभावशाली ठरणारा असल्याचें निराळें विवेचन करायला नको.

अधिकाऱ्यांच्या परिचयाचा कुशल परिणाम सिद्ध करणारें उदाहरण देवाच्या रथाला आडवी येणारी फांदी तोडून टाकण्याविषयींच्या बादशाही हुकुमाचें आहे. मसूर येथें रामनवमीच्या उत्सवांत देवाच्या रथाला बादशाही बागेंतील झाडाच्या फांदीचा अडथळा झाला. तें झाड बादशाही बागेंतील असल्यानें बादशहाच्या परवानगीखेरीज ती फांदी छाटून टाकण्याची शक्यता नव्हती. रथाची अडवणूक

झाल्याक्षणीं समर्थ विजापुरास बादशहापुढें प्रगटले. बादशहानें त्यांचें आदरानें स्वागत करून त्यांना फांदी तोडण्याचा परवाना दिला व समर्थ दुसऱ्याच क्षणीं रथाच्या जागीं परतले. त्यांनीं बादशहाचा हुकूम दाखवून ती फांदी तोडली व देवाचा उत्सव शेवटास नेला, अशी चमत्काराची माहिती त्यांच्या चरित्रांतून गोंवलेली आढळते. फांदी आडवी येतांच क्षणाचाहि विलंब न लावतां तिचा तोडून निकाल करण्याचें आज्ञापत्र समर्थांनीं सर्वांना दाखविलें हा चमत्कार तर खराच, पण तो त्यांच्या 'दीर्घसूचने'चा आहे. क्षणा दोन क्षणांत योगबळानें विजापुरास जाऊन बादशहाला भेटून हुकूम आणण्याचा तो चमत्कार नाहीं. आपल्या कार्यांतील भावी संकट आगाऊ ओळखून त्याच्या निवारणाचा उपाय सिद्ध ठेवणाऱ्या दूरदर्शित्वाला किंवा अनागतविधातृत्वाच्या गुणाला समर्थांनीं 'दीर्घसूचना' म्हटलेलें आहे. रामाचा उत्सव सुरू करण्यापूर्वी रथाच्या मार्गाची पहाणी करून समर्थांनीं ती फांदी आडवी येण्याची अडचण हेरून ती उपस्थित होईल तेव्हां ती बाजूला सारणाऱ्या हुकुमाचें साधन आपल्याजवळ आधींच मिळवून ठेवलें होतें; त्या साधनाच्या उपयोगाची वेळ येतांच त्यांनीं त्याचा उपयोग केला व सर्वांना आश्चर्यांत लोटलें;–असें या चमत्काराचें साधें तात्पर्य आहे. भाविकांनीं मात्र त्या प्रकाराला योगसिद्धीच्या चमत्काराचें रूप दिलेलें आहे.

महंताच्या ठिकाणीं अवश्य असाव्या लागणाऱ्या गुणांच्या उपदेशांत समर्थांनीं 'दीर्घसूचना' या गुणाबरोबरच 'शरीर परोपकारीं लावावें, यथाशक्ति कामास यावें, दुसऱ्याच्या दुःखें दुखवावें, आडलें जाकसलें जाणावें,' या परोपकाराच्या गुणाचा अनेक स्थळीं निर्देश केलेला आहे. येथें दीर्घसूचनेचें एक व परोपकाराचें एक अशीं दोन प्रसिद्ध उदाहरणें दिलीं आहेत. समर्थांच्या दीर्घ आयुष्यांत याच नव्हे तर इतर अनेक लोकोद्धाराच्या गुणांची जनतेला जाणीव करून देणारे प्रसंग अगणित आले असतील. उत्तम, निःस्पृह, महंत, सद्विद्येचा, सत्त्वगुणी, सदेव, साधु, सिद्ध, इत्यादि शब्दांनीं ज्यांचें वर्णन दासबोधांत केलेलें आहे, त्यांचे गुण समर्थांच्या अंगीं अति मोठ्या प्रमाणांत असले पाहिजेत, हें समर्थांच्या चरित्राकडे वरवर पाहिल्यासदेखील दिसून येणारें आहे. विविध प्रकृतीच्या लोकांमध्यें आपल्या प्रेमादराची ओढ निर्माण करण्याचें काम सोपें नाहीं. क्षमा, दया, शांति, शुद्ध चारित्र्य, मधुर वाणी, नम्रता, इत्यादि गुणांमुळें—

२।१८।२१



**सुखरूप संतोषरूप । आनंदरूप हास्यरूप ।**
**ऐक्यरूप आत्मरूप । सर्वत्रांसी ॥** (२ : ८ : २५)

अशा तऱ्हेचा स्वत:संबंधीं समर्थांनीं लोकांना अनुभव आणून दिला असल्याशिवाय त्यांनीं स्वीकारलेलें देवकार्य ज्या मानानें सुकर झाल्याचें दिसतें त्या मानानें तें सुकर झालें नसतें. आधीं आपल्या परोपकारांच्या सद्‌गुणानें लोकांत विश्वास उत्पन्न करून मग देवकार्याचें पुनरुज्जीवन त्यांनीं मारुतींच्या स्थापनेनें आरंभलें.

मारुतीच्या मध्यस्थीचें ऋण फेडीत असतां ज्याच्याकरितां तें ऋण स्वीकारलें त्या मुख्य देवाची कुठें ना कुठें स्थापना करण्याची जबाबदारी पार पाडणें समर्थांना भागच होतें. त्यांनीं या कार्यासाठीं चाफळ हें ठिकाण निवडलें व तेथें गांवकऱ्यांकडे देवळाकरितां जागा मागितली. गांवकऱ्यांनीं नदीपलीकडील उंचवट्याची स्मशानभूमि समर्थांना देऊं केली. पतितांना पावन करणारा जो राम त्याच्याकरितां मिळणारी जागा लोकांच्या दृष्टीनें अमंगळ व भुताखेतांनीं व्यापलेली म्हणून भयानक वाटणारी असली, तरी समर्थांना त्या जागेबद्दल निराश होण्याचें कारण नव्हतें. त्यांनीं त्या स्मशानभूमींतील झाडी तोडून टाकली व तेथें असलेले भुताखेतांचे शेंदरी दगड उपटून नदींत फेकून दिले. एका म्हसोबाखेरीज बाकी सगळ्या भुताखेतांना जलसमाधि मिळाली. म्हसोबानें शरण येऊन समर्थांची कृपा संपादल्यामुळें त्याचा दगड तेवढा शिल्लक उरला. याप्रमाणें त्या स्मशानांतील सारे उपद्रव मिटवून जागा स्वच्छ केल्यावर देऊळ उभारलें जाऊं लागलें. समर्थांच्या चरित्रांतलें हें सर्वांत मोठें साहस आहे. जुन्या देवळांचा उद्धार एक वेळ मुसलमान राजवटींत खपण्यासारखा होता. नवें देऊळ त्या राजवटीला बोचणारें होतें. विजापुरी आदिलशाहीचा तात्कालीन सुलतान महम्मद याचें एक आदेशपत्र उपलब्ध आहे. त्यामध्यें हिंदूंना सार्वजनिक रीतीनें उत्सव करूं देऊं नये, अशा धोरणाचें एक कलम आहे. कर्नाटकाकडील मोहिमांतून या सुलतानानें हिंदूंच्या देवळांची मोडतोड केल्याच्या माहितीवरून चाफळ येथील समर्थांच्या देवळाला त्यानें त्रास दिला असता हा संभव विसरतां येत नाहीं. जेव्हां समर्थांनीं देऊळ बांधण्याला प्रारंभ केला तेव्हां त्याच्या ठिकाणीं संचारी राज्यकर्तृत्वाचें बळ राहिलेलें नव्हतें. तथापि तो आपल्या हुकमतीनें चाफळच्या देवस्थानाला अडथळा

करूं शकला असता. त्याची वक्रदृष्टि समर्थांच्या कार्याकडे वळली नाहीं म्हणून समर्थांच्या साहसाचें महत्त्व कमी ठरत नाहीं. समर्थांचें नवें देवस्थान हें एक प्रकारचें इस्लामी राज्यकारभारांतील परधर्मासहिष्णुतेला आव्हानच होतें. असें आव्हान देतांना समर्थांनीं देवळाचा तो प्रदेश मराठा सरदारांच्या ताब्यांत होता, ही स्थिति ध्यानांत घेतली असेल; पण त्या सरदारांच्या डोक्यावर आदिलशाहीची सत्ता होती व ती कोपली असती तर समर्थांच्या कार्याचें रक्षण करण्याची हिंमत त्या स्वार्थी मराठा सरदारांनीं दाखविली असती कीं नाहीं हा शंकेचा विषय असल्यामुळें, समर्थांच्या कर्तृत्वास लावलेला साहस हा शब्द अस्थानीं ठरण्याचें कारण नाहीं.

समर्थांचें देऊळ निर्विघ्नपणें उभें राहिलें. त्यांत प्रतिष्ठापना करण्यासाटीं समर्थांनीं एका डोहांतील मूर्ति वर काढली. ती मूर्ति सूर्याची कीं रामाची असा इतिहाससंशोधनांतील एक वाद आहे. समर्थांनीं तिची चाफळच्या देवस्थानांत मांडणी केल्यापासून ती रामाची अशी लोकांची समजूत चालू आहे. मूर्ति डोहां-तून काढल्यावर डोहाकांठच्या गांवकऱ्यांनीं मूर्तीवर आपला हक्क सांगून समर्थांची अडवणूक केली. तिचें निवारण झाल्यावर मूर्ति देवळांत विराजमान होऊन तिचीं उत्सवादि कार्यें सुरू झालीं. या देवळाचा व देवकार्याचा काळ इ. स. १६४९, अशी परंपरा आहे. या देवस्थानाला प्रथम कित्येक स्थानिक अंमलदारांनीं साह्य करण्याचें समर्थांना अभिवचन दिलें. पुढें दिनायतराव आणि बाजी घोरपडे यांच्याकडून उंब्रज, कोरटी, चरेगांव, माजगांव या चार ठिकाणीं एकूण तीस बिघे जमिनीचें इनाम मिळालें. या इनामाच्या खटपटीकरितां आपला शिष्य विठ्ठल यास समर्थांनीं चाफळ येथें रहाण्याला सांगितलें. देवाच्या उत्सवाचा खर्च भिक्षेच्या मिळकतीनें करावा, अशी समर्थांची आज्ञा असल्यामुळें त्यांचा एक शिष्य भास्कर इ. स. १६५९ च्या प्रारंभीं शिवाजी महाराजांकडे भिक्षेसाटीं गेला असतां महाराजांनीं विचारपूस करून सालिना दोनशें होनांची रोकड देणगी सुरू केली. इ. स. १६७२ सालीं (शके १५९४ श्रावणानंतर) महाराजांची व समर्थांची भेट झाल्यावर सहा वर्षांनीं महाराजांनीं समर्थांना अतिशय भीड घालून देवस्थानाकरितां अनेक गांवांत विभागलेली फार मोटी जमीन इनाम

दिली. देवस्थानाचें वैभव आतां शिखरास पोंचलें. हनुमंतस्वामीच्या बखरींत देवालय बांधलें जात असतां व नंतर कित्येक वर्षांनीं देऊळ पहाण्यांत आल्यावर शिवराजांकडून ३०० व ५०० होनांच्या याप्रमाणें, इ. स. १६५९ मध्यें सुरू केलेल्या २०० होनांच्या वार्षिक देणगीखेरीज दोन देणग्या मिळाल्याचा उल्लेख आहे.

भास्कर-शिवाजी यांच्या भेटीपूर्वी समर्थांनीं दहा वर्षे ग्रंथलेखनार्थ वेंचण्याच्या संकल्पानें शिवथरच्या घळींत जाऊन रहाण्याचें ठरविलें होतें, असें सिद्ध करणारें एक पत्र उपलब्ध आहे. तें पत्र शके १५७६ (इ. स. १६५४ डिसेंबर) सालांतील असून, चाफळ सोडतांना त्यांचा शिवथरच्या घळींत रहाण्याचा विचार असला तरी सदर ठिकाणीं त्यांचें वास्तव्य फार दिवस नसल्याची साक्ष दिनकरस्वामीच्या स्वानुभव दिनकरांत आहे. इ. स. १६५५ च्या १२ मार्च या दिवशीं दिनकर स्वामीवर अहमदनगर जिल्ह्यांतील वृद्धेश्वर येथें मोठ्या परिवारानिशीं जाऊन समर्थांनीं अनुग्रह केल्याची माहिती स्वानुभव दिनकरांत आहे. अर्थात् आपलें अखंड संचाराचें व्रत सोडून समर्थांनीं ग्रंथलेखनाच्या निमित्तानें स्वतःला एका ठिकाणीं बांधून घेतलें नाहीं हें दिनकरस्वामीच्या लिहिण्यावरून स्पष्ट होत आहे. ग्रंथलेखनाच्या उद्देशानुसार त्यांनीं १६५४ च्या डिसेंबरांत किंवा त्यानंतर कोणते ग्रंथ लिहिले, हें समजण्याला कांहींच मार्ग नाहीं. दासबोधांतील एक समास मात्र शके १५८१ (१६५९ इ.) मध्यें रचला गेला, असें ठरविण्याला उपयोगीं पडणारा एकच कालनिर्देश काय तो त्या समासांत आहे.

स्वानुभव दिनकराच्या कर्त्यानें आपल्या अनुग्रहाच्या काळाची जशी नोंद दिली आहे तशी नोंद दुसऱ्या कोणत्याहि समर्थशिष्याच्या संबंधांत सांपडत नाहीं. समर्थांची स्वारी इ. स. १६४४ मध्यें कृष्णातटाकीं आल्यानंतर थोड्याच अवकाशांत त्यांच्याभोंवतीं शिष्य गोळा होऊं लागले असले पाहिजेत, असा त्यांच्या सांप्रदायिक चरित्रांवरून तर्क करतां येतो. कृष्णातटाकीं जमलेल्या शिष्यांपैकीं अंबाजी हा त्यांचा पट्टशिष्य कल्याण या नांवानें प्रसिद्धीस आला व त्यानें समर्थांचें वाङ्मय लिहून ठेवल्यामुळें त्याचे महाराष्ट्रावर चिरस्मरणीय उपकार झालेले आहेत. समर्थांच्या चरित्रांत इतर कांहीं शिष्यांच्या गोष्टी आहेत; परंतु त्यांचें महत्त्व केवळ भाविकतेलाच वाटेल. समर्थांच्या कार्याशीं त्यांचा कल्याणासारखा भरीव संबंध

नाहीं. अखेरच्या काळांतील शिष्य गिरिधर याला आपल्या बालपणीं समर्थांचें दर्शन घडलें होतें. त्यानें 'श्रीसमर्थप्रताप' हा समर्थविषयक चरित्रग्रंथ लिहिला आहे. त्याखेरीज त्याचें वाङ्मय पुष्कळच आहे. मेरुस्वामी नांवाच्या आणखी एका प्रशिष्याची ग्रंथरचना मोठी आहे. त्याला समर्थांचें दर्शन घडलें असावें असा संशोधकांचा तर्क आहे. समर्थकालीन कागदपत्रांतून व सांप्रदायिक चरित्रांतून बऱ्याच शिष्यप्रशिष्यांचीं नांवें पहायला सांपडतात. परंतु समर्थोपदिष्ट कर्मे निष्ठेनें करून ते आपलें आयुष्य घालवीत असावे, एवढाच त्यांच्या कर्तृत्वाचा निष्कर्ष निघतो. समर्थ-संप्रदायांत कर्तृत्वाच्या योग्यतेनें समर्थांच्या जवळपास चमकून दिसेल असा शिष्य एकसुद्धां दाखवितां येणार नाहीं.

शिष्यिणी हा समर्थांच्या संप्रदायाचा एक विशेष म्हणतां येतो. समर्थांनीं स्त्रियांना आपल्या संप्रदायाची दीक्षा देऊन त्यांच्या आयुष्याला परमार्थाची दिशा लावली व कृतार्थ केलें. यासाठीं त्यांना लोकापवाद सहन करावा लागला; पण समर्थांचें चारित्र्य इतकें निर्मळ होतें कीं, त्यावर लोकापवादाचा कांहींच परिणाम झाला नाहीं. समर्थांच्या शारीरिक जीवनाचा विचार करूं लागलें म्हणजे त्यांच्या ठिकाणीं बाणलेल्या ब्रह्मचर्याच्या गुणाचें स्मरण प्रथम झाल्याशिवाय रहात नाहीं. या ब्रह्मचर्याची खूण त्यांच्या वाङ्मयांतसुद्धां आहे. स्त्रियांसंबंधांत अनुदारपणा तर त्यांनीं कुठेंच दाखविलेला नाहीं, पण ज्या योगानें वाचकाच्या मनांत शृंगाराचा तरंग उठेल असें एकसुद्धां वाक्य त्यांच्या ग्रंथरचनेंत सांपडत नाहीं. वाणीचें ब्रह्मचर्य कडकडीतपणानें पाळणाऱ्या पुरुषाचें हृदय किती स्वच्छ, निर्लेप असेल याचें निराळें वर्णन करायला नको. त्यांच्या संप्रदायांत शिष्यिणी आल्या तेव्हां त्यांचें वयोमान तारुण्याच्या उतारावर होतें, हें ध्यानांत ठेवणें चांगलें. शिष्यिणींमध्यें ज्यांचीं नांवें सांप्रदायिक चरित्रकारांनीं वारंवार घेतलीं आहेत, अशा मुख्य शिष्यिणी दोनच. एक वेणु व दुसरी अक्का. वेणूला समर्थभक्तीपायीं विषप्रयोगाच्या घातकी दिव्यांतून जावें लागलें. वेणु वांचली, परंतु तिच्या प्रकृतीवर त्या विषाचा अनिष्ट परिणाम झाला. वेणूची किरकोळ ग्रंथरचना आहे. तिचीं स्फुट गद्य-पद्य प्रकरणें-देखील आहेत. वेणूच्या कीर्तनाला समर्थांची अनुज्ञा होती. समर्थ-संप्रदायांत शिष्यिणी असल्या तरी त्यांची संख्या शिष्यांच्या मानानें अत्यल्प आहे.

लोकोद्धाराची आकांक्षा असणाऱ्या कर्त्या पुरुषानें ब्राह्मण मंडळ्या, भक्त मंडळ्या, संत मंडळ्या शोधाव्या, असें समर्थांच्या उपदेशांत एक वचन आहे (दास. १९ : ६). समर्थांचें ध्येय लोकांत भक्ति वाढविण्याचें असल्यामुळें आपल्यास अनुकूल असणाऱ्या मंडळ्या शोधाव्या, असा या वचनाचा अर्थ होतो. देवाच्या नांवानें चाललेल्या नानाविध कल्पनांचें व उद्योगांचें समर्थांनीं आपल्या संचारांत निरीक्षण केल्याचा पुरावा दासबोधांत व अन्यत्र विपुलत्वानें पहावयाला सांपडतो. अशी पहाणी करतां करतां ज्यांच्याशीं समानशीलत्वाच्या नात्यानें समर्थांचा स्नेह जडला अशा चार व्यक्ति प्रमुख आहेत. या चौघांच्या साहचर्यामुळें समर्थांचें एक पंचायतन मानलें जाऊं लागलें. जयरामस्वामी वडगांवकर, रंगनाथ निगडी-कर, केशवस्वामी भागानगरकर, आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर, या त्या चार व्यक्ति होत. या सत्पुरुषांच्या परस्पर प्रेमाच्या पुष्कळशा गोष्टी समर्थांच्या चरित्रांतून आलेल्या आहेत. परंतु यांतील एकहि पुरुष समर्थांच्या कर्तृत्वाचा नव्हता. समर्थांचें श्रेष्ठत्व त्या सर्वांना मान्य असल्यामुळें त्यांचा निर्देश ‘ समर्थ पंचायतन ’ या शब्दानें केला जातो. बाकीचे सारे आपल्या जागीं देवाची सेवा करून दिवस काढणारे होते. समर्थांनीं अनेक स्थळीं समुदायाची उठावणी करून देवाचें वैभव वाढविलें. त्यांच्या मठमंदिरांची व अनुयायांची संघटना एखाद्या लहानशा स्वतंत्र राज्यासारखी होती व यामुळेंच त्यांच्या उपदेशांत राजसत्तेचे व राजांच्या परा-क्रमाचे दाखले कुठें कुठें आलेले दिसतात. समर्थांच्यासारखा जयराम-रंगनाथा-दिकांचा उद्योग नव्हता. बाकीची मंडळी भक्त खरी, पण लोकांना जागृत करून, उठवून देवकार्यास जुंपणारी नव्हती. लोकांची देवधर्मविषयक उदासीनता आपल्या उपदेशाच्या आघातांनीं नष्ट करून लोकांत देवाधर्मांचा उत्कट सक्रिय अभिमान उत्पन्न करण्याचें महत्कार्य समर्थांनीं अंगिकारलेलें होतें. त्यांच्या स्नेह्यांत व त्यांच्यांत असा भेद होता व समर्थांच्या स्नेहीवर्गांत त्यांचा समावेश होण्याइतकें भाग्य त्यांचें नसतें तर कदाचित् त्यांचें नांव संतांच्या इतिहासांत शोधावेंच लागलें असतें.

याप्रमाणें देवाधर्मांच्या उद्धाराचें कार्य समर्थांनीं कृष्णातीरीं इ. स. १६४४ ते १६८१ पर्यंत अखंड ३७ वर्षें चालविलें होतें. शेवटचीं चार पांच वर्षें त्यांनीं शिवाजी महाराजांच्या शिष्यत्वामुळें खऱ्या राजयोगांत घालविलीं. या ३७ वर्षांत ते

आपल्या देवस्थानाच्या परिसरभूमीला सदैव चिकटून राहिले होते असें समजण्याचें कारण नाहीं. त्यांच्या सांप्रदायिक चरित्रांतून त्यांच्या संचाराचीं जीं वर्णनें आहेत त्यावरून त्यांची तीर्थयात्रा मधून मधून कांहीं काळ चालत असावी असा तर्क करतां येतो. संप्रदायाचीं कामें ठिकठिकाणीं गेलेले शिष्य नीट करतात कीं नाहीं याचा झाडा समर्थ घेत असत. दर तीन वर्षांनीं शिष्यांनीं आपल्यास येऊन भेटावें आणि आपल्या कामाचा वृत्तांत सादर करावा, असा समर्थांनीं एक नियम घालून दिला होता. समर्थांचा शिष्यांना वचक वाटत असल्यामुळें या नियमाचा भंग शिष्यांच्या हातून घडण्याचा संभव नव्हता. शिष्यांच्या कामगिरीची तपासणी व कृष्णातीरावरील स्वनिर्मित देवस्थानांच्या उत्सवादि कामांची पहाणी, असा व्याप समर्थांच्या आयुष्यांत उत्तरकालीं पुष्कळच वाढला असेल अशी कल्पना करतां येते. हा व्याप संभाळीत असतां समर्थांचा अवतार समाप्त होण्यापूर्वी त्यांचे बंधु गंगाधरस्वामी ऊर्फ श्रेष्ठ यांचा व शिष्या वेणाबाई हिचा अंत त्यांना पहावा लागला. ज्यांच्या शिष्यत्वामुळें समर्थांना राजयोग लाभला ते शिवाजी महाराज इ. स. १६८० मध्यें इहलोक सोडून गेले. त्यानंतर १६८१ च्या फेब्रुवारींत २ तारखेला समर्थांच्या अवताराची सज्जनगडावर समाप्ति झाली.

समर्थांच्या शारीरिक जीवनाचा व संप्रदायाचा वृत्तांत संक्षेपानें येथवर सांगून झाला. समर्थांच्या देहावसानाबरोबर त्यांच्या शारीरिक जीवनाचा इतिहास विराम पावला. शिष्यप्रशिष्यांच्या कर्तृत्वांत शुद्ध चारित्र्याचें व पराक्रमाचें तेज राहिलें नाहीं. समर्थांचें नांव सांगून पोट भरावें आणि स्वार्थासाठीं भाऊबंदकीचे तंटे करावे, अशा थरापर्यंत समर्थसंप्रदाय खालावला. ज्यांच्या हृदयांत समर्थांच्या शिकवणीचें स्मरण उत्कट झालें किंवा होतें, त्यांतल्या कांहींनीं पुष्कळसें शुद्ध परमार्थाचें अथवा रामचरित्रपर वाङ्मय रचलें. कांहींनीं समर्थांचीं चरित्रें लिहून काढलीं; परंतु बहुतेक सर्वांनीं नानाविध जुन्या वाङ्मयाचा संग्रह अभ्यासाकरितां करून ठेवला. हा त्यांचा उपकार धुळें येथें श्रीसमर्थ-वाग्देवता-मंदिराच्या रूपानें आज उभा आहे व वाङ्मयसंशोधकांना साह्य करीत आहे. समर्थांच्या व समर्थ-सांप्रदायिकांच्या वाङ्मयाचें संशोधन गेलीं पन्नास वर्षें चालवून सांप्रदायिकांचे बरेच ग्रंथ धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेनें प्रसिद्ध केले आहेत. त्यांतील परमार्थनिरूपण

आजच्या पिढीला दुर्बोध वाटणारें असल्यामुळें त्या ग्रंथांना लोकप्रियतेच्या दृष्टीनें उठाव मिळाल्याचा अनुभव नाहीं. परमार्थ हा नित्य व्यवहारांतील परिचयाचा विषय नसल्यामुळें सामान्यपणें जनतेला दुर्बोध असतोच. समर्थांच्या ग्रंथांतील परमार्थ दुर्बोध असला तरी त्याला मराठी भाषेंत उतरविणारी प्रेरणा, कल्पकता व प्रचीति सांप्रदायिकांहून निराळी असल्यानें समर्थांचा उपदेश त्यांच्या शिष्य-प्रशिष्यांच्या विवेचनापेक्षां जास्त खणखणीत व परमार्थानुकूल हृदयाला जाऊन भिडणारा अशा थाटाचा आहे. सांप्रदायिकांचे ग्रंथ समर्थांच्या तोलाचे नसले तरी ग्रंथ लिहून त्यांनीं आपल्यापुरती जीवनाची कृतार्थता मिळविली एवढें कबूल करायला हरकत नाहीं. समर्थांचा उपदेश हा त्यांच्या कर्तृत्वांतून जन्मास आलेला असल्यामुळें त्यांतील चैतन्य आजसुद्धां अभ्यासकांना जाणवतें. समर्थांचा अवतार समाप्त होणार असें दिसूं लागल्यावर गुरूच्या भावी चिरवियोगाच्या व्याकुलतेनें जवळच्या मंडळीला ग्रासल्याचें पाहून समर्थांनीं 'आपली काया गेली तरी आत्माराम व दासबोध या दोन ग्रंथांत आपण चिरंजीव आहों' अशा अर्थाचें आश्वासन उच्चारल्याची कथा प्रसिद्ध आहे. दासबोधाची लोकप्रियता ही त्यांच्या आश्वासनाच्या यथार्थतेची साक्ष मानायला हरकत नाहीं व यासाठींच प्रामुख्यानें दासबोध व इतर ग्रंथ यांचा अभ्यास करणें हें एक उपयुक्त कार्य समजावें लागतें.

## देवाधर्माचें अराजक

**दासबोध** व समर्थांचें इतर वाङ्मय पाहिल्यास समर्थांना लोकांचा उद्धार कोणत्या दिशेनें करावयाचा होता याचा बोध होण्याला उशीर लागत नाहीं. समर्थांना इस्लामी राज्यकारभाराचें उच्चाटन करावें आणि हिंदूंचें राज्य स्थापावें या महत्त्वाकांक्षेनें घेरलेलें नव्हतें. इस्लामी राज्यकारभारापेक्षां हिंदूंच्या देवाधर्मावर पडलेल्या दडपणाची समर्थांना जास्त काळजी वाटत होती, असें त्यांच्या उपदेशाचें निरीक्षण केल्यास स्पष्ट दिसून येणारें आहे. हिंदु समाजांत रूढ असलेल्या देवाधर्मांच्या आचारविचारांनीं उडवून दिलेला गोंधळ समर्थांच्या चित्ताला विशेष पीडा देत होता. दासबोधांत व अन्यत्र याचीं प्रत्यंतरें निरनिराळ्या स्वरूपांत पहावयाला सांपडतात. लोकांकडे पहावें तर त्यांच्यामध्यें शेकडों देवांची पूजाअर्चा चाललेली होती; परंतु खरा देव कोणता, त्याच्याशीं भक्ताचा संबंध कसा असावा, याचें बिनचूक निश्चित ज्ञान लोकांत नसल्यामुळें देवाच्या व्यवहारांत जिकडे तिकडे अंदाधुंदी माजलेली होती. समर्थांना देवाधर्माविषयींच्या अराजकाचा उद्वेग अधिक वाटत होता यावरून लोकांच्या एकंदर सामान्य दुर्दशेकडे त्यांचें मुळींच लक्ष नव्हतें, असें म्हणतां येणार नाहीं. महाराष्ट्रांत समर्थांच्या पुरश्चरणकाळीं जी राजकीय धामधूम चाललेली होती तिचें संकलित रूप त्यांच्या कित्येक स्फुट प्रकरणांतून उमटलेलें आहे. हीं प्रकरणें संशोधनकार्यानें अलीकडे उजेडांत आणलेलीं आहेत. समर्थांच्या समग्र वाङ्मयांत त्या प्रकरणांचा सुमारें ४० वर्षांपूर्वी पत्ता नव्हता. त्या प्रकरणांना 'अस्मानी सुलतानी', 'परचक्र' अशीं नांवें संशोधकांनीं किंवा मुळांतल्या लेखकांनीं दिलेलीं आहेत. अवर्षणापायीं पसरलेला दुष्काळ व झालेला महागाईचा कहर, एकमेकांचीं राज्यें घेण्यासाठीं महाराष्ट्रांत सुरू असलेल्या सैन्यांच्या हालचाली व लढाया, अशा तऱ्हेच्या धुमाकुळांत सामान्य जनतेच्या वाटणीस येणाऱ्या जाळपोळ, लुटालूट, घरेंदारें सोडून करावी लागणारी पळापळ, वगैरे आपत्तींचें चित्र समर्थांनीं

सदर स्फुट प्रकरणांतून रेखाटलेलें आहे. एका राज्याचें सैन्य दुसऱ्या राज्यांत घुसलें कीं, तेथील उभीं पिकें कापून किंवा सैन्यांतलीं जनावरें सोडून नाहींशीं करावयाचीं, अशी एक त्या काळांत पद्धत होती. बायका हातीं सांपडल्यास त्यांची विटंबना करणें हें एक तेव्हांच्या इस्लामी पराक्रमाचें भूषण समजलें जात होतें. समर्थांनीं चितारलेल्या लोकस्थितीमध्यें यासारखा सारा तपशील दृष्टीस पडतो :

**किती उत्तमा त्या स्त्रिया भ्रष्टवीती ।**

**किती गुज्रिणी ब्राह्मणी भ्रष्टवील्या ।**
**किती शांमुखी जाहाजीं फाकवील्या ।**
**किती एक देशांतरीं त्या विकील्या ।**
**किती सुंदरा हाल होऊनि मेल्या ॥**

**लोक नीलंड नीलंड काढुनि नेती पोरी ।**

स्त्रियांची ही दशा समर्थांनीं दासबोधाच्या तिसऱ्या दशकांत दाखल केलेली आहे. तत्कालीन सामान्य व्यक्तीचें जीवन सांगतांना 'गल्बला जाला । परचक्र आलें ॥(२७), कांता बंदीं धरून नेली'। (२८) या अनुभवावर 'तुमची कांता भ्रष्टली ।' (३०) या वार्तेनें कळस चढविला, असा प्रकार वर्णायला समर्थ विसरले नाहींत (स. ५). परचक्र म्हणजे राज्याराज्यांची एकमेकांतील चढाई लढाई. ही लोकांच्या इतकी अंगवळणीं पडली होती कीं समर्थांनीं जुन्या दासबोधांत 'कां परचक्र आलें गाढें । सकळ रहाळेचें जालें गुढें' असा दृष्टांतच दिला आहे.

परचक्राच्या तडाख्यांत धरपकड, कैद, लूट, राजदंडाच्या नांवानें भोगावे लागणारे नाना तऱ्हेचे मार यालाहि वरील दशकांत (स. ७) समर्थांनीं स्थान दिलेलें आहे. 'कोणी येकें धरून नेलें' (१६), 'कोणी येकें घातले पाश' (१७), 'परचक्रीं धरून नेलें । नीच यातीस दिधलें ।' (२९), 'दरवडे घालूनियां जना । तस्कर करिती यातना ।' (३८), 'दुःख दारिद्र आणि ऋण । विदेशपळणी नागवण ।' (८१) परचक्राच्या एका स्फुट प्रकरणांत सगळीं माणसें दारिद्र्यामुळें एका पातळीवर आलेलीं आहेत, ज्याच्या अंगीं बळ त्याची दुनिया असा प्रकार अनुभवास येतो, बचावासाटीं दुसऱ्या ठिकाणीं गेलें तरी नागवण चुकत नाहीं, आश्रयासाटीं येणारे लोकसुद्धां चोऱ्या करतात,

लोक भलेसे दिसती खेटरें चोरिती ।
वस्त्रें धोतरें पातरें लपउनी पळती ।

समर्थांनीं ज्या अनुभवाचा पाढा वाचला आहे, तो भारतीयांच्या परिचयांतून गेलेला नसल्यानें त्याचे कांहीं चुटके येथें थोडा विस्तार पतकरून देण्याला हरकत नाहीं :

धान्ये माहाग माहाग तैसें ही मिळेना ।
कैसें होईल होईल होईल कळेना ॥
सुडकें पटकर पटकर न मीळे पांघराया ।
शक्ती नाहीं रे नाहीं रे कोंपट कराया ।
रांडा पोरांच्या पोरांच्या तारांबळी होती ।
मोल मजुरी भीकारी होऊनी वांचती ॥

समर्थ एका ठिकाणीं म्हणतात :

बरें होईल होईल लागलीसे आस ।
बरें होईना होईना आसेची निरास ।
काळ आला रे आला रे जाहालें उदास ।
कांहीं केल्यानें केल्यानें मिळेना पोटास ॥

आणखी एका प्रकरणांत 'पनाळा गर्डी' झालेल्या महागाईची माहिती आहे. पोट भरावें म्हणून लोकांनीं आपल्या व बायकांच्यासुद्धां झाडून सगळ्या वस्तु विकल्या, तरी महागाईला तोंड देववेना, असें या माहितीचें तात्पर्य असून

असे संकटीं रक्षिलें तां दिनासी ।
किती आठऊं प्रत्ययो तो मनासी ।
धरूनी करीं ऊतरीलें अनाथा ।
लिळे पार तां पाववीले समर्था ॥

याप्रमाणें आपल्या रक्षणानिमित्त देवाला शेवटीं धन्यवाद आहे. लोकांच्या उपासमारीचें व दारिद्र्याचें विवेचन करतां करतां

कितेक अनाचारीं पडिलीं । कितेक यातिभ्रष्ट जालीं ।
कितेक ते आक्रंदलीं । मुलें बाळें ॥

कितेकीं विषें घेतलीं । कितेक जळीं बुडालीं ।
जाळिलीं ना पुरिलीं । किती येक ॥

... ... ...

कांहींच पाहतां धड नाहीं । विचार सुचेना कांहीं ।
अखंड चिंतेचा प्रवाहीं । पडिले लोक ॥

अशी लोकांची स्थिति समर्थांनीं निवेदन केली आहे.

दुष्काळ, परचक्र, रोगराई, शिवाय राज्यकारभारांतील जुलूमजबरदस्ती या प्रकारांनीं गांजलेलीं माणसें 'जोगी वैरागी' होऊन भटकत असावीं, अशी कल्पना आणून देणाऱ्या एका पदांत (दासविश्रामधाम, पान ३७७) हाच विषय समर्थांनीं गोविलेला आहे :

वेळे पाऊस पडेना । नासकवणी उघडेना ॥ १
ऐसें कुळवाड्याचें भंड । दुःख जाहलें उदंड ॥ २
बहुपडी आलें सेत । रेड्यापाड्याचें आउत ॥ ध्रु० ॥
कांहीं केल्यानें पिकेना । धान्य वेळेसी विकेना ॥ ३
फाळा लाविला उदंड । आवघे जाहलें थोतांड ॥ ४
वारी रोग्याची वाजती । नाना आभाळ फिरती ॥ ५
ढोक पक्षी मूषकादिक । खाती श्वापदें अनेक ॥ ६
दावेदाराची यातना । चोर चोरटे राहेना ॥ ७
नित्य पोटाचा मजुर । वेठीखाले निघे बुर ॥ ८
घर कोपटें मोडकें । येक पटकर फाटकें ॥ ९
बेरगानें गुरें गेलीं । धारणेनें मुलें मेलीं ॥ १०
सर्व संसार बुडाला । दास म्हणे जोगी जाला ॥ ११

समर्थांच्या दृष्टींतून परचक्रादि संकटें सुटलेलीं नव्हतीं, याची साक्ष वरील उताऱ्यांतून आहे. परंतु या संकटाहून जनतेला देवाधर्मांच्या बाजूनें हीनावस्थेस नेऊन पोंचविणारें संकट धार्मिक बजबजपुरीचें आहे, अशी समर्थांची खात्री असल्यामुळें त्यांनीं त्या संकटाचें वर्णन आपल्या उपदेशामध्यें फार मोठ्या प्रमाणांत केलेलें आहे. अनेक देव, त्यांच्या उपासनेचे अनेक पंथ व मंत्र, नाना शास्त्रें,

नाना मतें, बहुविध गुरु, कोणाचा कोणाशीं मेळ नाहीं, जो तो आपापल्या मताच्या अभिमानानें यथेच्छ चाललेला; या स्थितीला स्वतः समर्थांनीं 'अनायेक जालें' असें म्हटलें आहे. सृष्टि उत्पन्न झाली. नानाविध शरीरें व त्यांचीं भिन्न भिन्न नांवें अस्तित्वांत आलीं. मग 'त्यांचा आपुलाल्या प्रकारें' व्यवहार दिसूं लागला. नाना मतें उदय पावलीं, नाना पाखंडें वाढलीं, नाना प्रकारचीं बंडें उठलीं.

जैसा प्रवाह पडिला । तैसाच लोक चालिला ।
कोण वारील कोणाला । येक नाहीं ॥ १७

... ... ...

आचार बहुकचित पडिला । कित्येक पोटासाठीं बुडाला ।
अवघा वरपंगचि जाला । साभिमानें ॥ १९
देव जाले उदंड । देवांचें माजलें भंड ।
भूतादेवतांचें थोतांड । येकचि जालें ॥ २०
मुख्य देव तो कळेना । काशास कांहींच मिळेना ।
येकास येक वळेना । अनावर ॥ २१

... ... ...

शास्त्रांचा बाजार भरला । देवांचा गलबला जाला ।
लोक कामनेच्या व्रताला । झोंबोन पडती ॥ २२
ऐसें अवघें नासलें । सत्यासत्य हारपलें ।
अवघें अनायेक जालें । चहूंकडे ॥ २४
मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला ।
जो जे मतीं सांपडला । तयास तेंचि थोर ॥ २५

दासबोधाच्या ११ व्या दशकांतील २ ऱ्या समासामधून या ओव्या घेतल्या आहेत. त्याच समासामध्यें 'लोक कोण्या पंथें जाती । कोण्या देवास भजती' (२८) याचाहि खुलासा समर्थांनीं दिलेला आहे.

मृत्तिका धातु पाषाणादिक । ऐसीया प्रतिमा अनेक ।
बहुतेक लोकांचा दंडक । प्रतिमादेवीं ॥ २९

नाना देवांचे अवतार । चरित्रें ऐकती येक नर ।
जप ध्यान निरंतर । करिती पूजा ॥ ३०

१५ व्या दशकाच्या २ ऱ्या समासांत वरील स्थितीचें वर्णन निराळ्या रीतीनें आलेलें आहे. समासाचा आरंभ ११ व्या दशकाच्या २ ऱ्या समासाप्रमाणेंच आहे. पुढें कित्येकांनीं इस्लाम धर्म स्वीकारला ( कित्येक म्लेंच होऊन गेले ), कित्येक फिरंगणांत आटले, कित्येकांची देशभाषेनें अडवणूक केली ( भाषाभेदामुळें ऐक्याला अडथळा झाला ), महाराष्ट्र थोडासा उरलेला आहे पण ज्याच्या त्याच्या स्वार्थी संघटनेच्या चढाओढीमुळें त्याचा कोंडमारा चाललेला आहे (राजकारणें लोक रुधिला ), 'अवकाश नाहीं जेवायाला । उदंड कामें ॥' (४) अशी महाराष्ट्राची दुर्दशा आहे. 'कित्येक युद्धप्रसंगीं गुंतले । तेणें गुणें उन्मत्त जाले ।' (५) एकमेकालगतच्या राज्यांचा परस्पराना जिंकण्यासाटीं निरंतर उद्योग चालू असतां लोक युद्धांत गुरफटावे, नव्हे त्यांच्या ठिकाणीं युद्धाचा उन्माद चढलेला दिसावा, यांत नवल नाहीं. मग ते रात्रंदिवस युद्धचर्चा करूं लागतील हें सरळच आहे. 'युध्य देखावें ऐकावें । स्वयें युध्यचि करावें । मारावें कीं मरावें ।' अशी अवस्था समर्थांनीं तमोगुणांत ( २ : ६ : १६ ) दाखविली आहे. उद्मी व्यापाऱ्यांना त्यांच्या कामापायीं दुसरीकडे लक्ष जाण्याला अवकाश नव्हता. 'अवघा पोटधंदाच लागला निरंतर ॥' (६). लढाऊ आणि व्यापारी लोकांची हालहवाल याप्रमाणें सांगून झाल्यावर देवाधर्माच्या वृत्तांताकडे समर्थ वळले आहेत.

शडदर्शनें नाना मतें । पाषांडें वाढलीं बहुतें ।
पृथ्वीमध्यें जेथतेथें । उपदेसिती ॥ ७
स्मार्थीं आणि वैष्णवीं । उरलीं सुरलीं नेलीं आघवीं ।
ऐसी पाहातां गथागोवी । उदंड जाली ॥ ८
कित्येक कामनेचे भक्त । ठाइं ठाइं जाले आसक्त ।
युक्त अथवा अयुक्त । पाहातो कोण ॥ ९
या गल्बल्यामधें गल्बला । कोणीं कोणीं वाढविला ।
त्यास देखों सकेनासा जाला । वैदिक लोक ॥ १०
त्याहिमधें हरिकीर्तन । तेथें वोढले कित्येक जन
प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान । कोण पाहे ॥ ११

एवढ्या प्रस्तावनेनंतर देव आणि त्याची भक्ति यासंबंधांत समर्थांनीं पाहिलेल्या दुरवस्थेची पाहणी करायला हरकत नाहीं. समर्थांनीं एका स्वतंत्र पदांत किती तऱ्हेच्या वस्तु देवत्वाच्या योग्यतेस लोकांच्या श्रद्धेनें चढविलेल्या आहेत याची यादी सादर केली आहे ( पदपदान्तरें, पान २२५ ).

एका नदीच्या पोटांत शाळिग्राम आहेत, तर नर्मदेच्या वाळवंटांत गणेशांची कमतरता नाहीं; काश्मीरांत स्फटिकांच्या देवांची पूजा चालते; जनावरांचीं शिंगें, लिंगें, रानडुकराचे केस, हरिणवाघांचीं कातडीं, यांचाहि देवकार्यांत मोठा आदर आहे. कित्येक जण सोमयाग करून मांस खातात व सांगतात कीं 'तेणें होतसे गती।'

**दाढ्या डोया बोडाव्या । हातीं खापऱ्या घ्याव्या ।**
**उदंड बोंबा माराव्या । पूर्वज पावती पदव्या ॥ ८**

... ... ...

**अघोर मंत्राचीं ढालें । येक करितीं कवटालें ।**
**चाटें पोरें बटवाले । पाप उदंड केलें ॥ ११**

**येक पूजिती देवतें । जनासी घालिती भूतें ।**
**येक राखती प्रेतें । तेणें द्रव्य साधतें ॥ १२**

अशा रीतीच्या वागणुकीवरून 'ज्ञानेविणें तो पशु । जेथें तेथें विश्वासु' या शब्दांनीं समर्थांनीं अंध भाविकांची संभावना केलेली असून पदाच्या शेवटीं

**देव ध्यानीं भाविजे । ज्ञानें मोक्ष पाविजे ।**
**जन्म सार्थक कीजे । कानकोंडें न कीजे ॥ १४**

**दास म्हणे उदास । धरा देवाची कास**
**भक्तिमार्ग विशेष । तेणें पावे जगदीश ॥ १५**

असा उपदेश केला आहे. प्रस्तुत पदांतील शाळिग्रामादि देवांचा निर्देश दासबोधांतहि आलेला आहे. समास ( ६ : ६ ).

**नर्बदागंडिकातीरीं । देव पडिले लक्षवरी**
**त्यांची संख्या कोण करी । असंख्यात गोटे ॥ ३८**

चक्रतीर्थीं चक्रांकित । देव असती असंख्यात ।
नाहीं मनीं निश्चितार्थ । येक देव ॥ ३९
बाण तांदळे तांब्रनाणें । स्फटिक देव्हारां पूजणें ।
ऐसे देव कोण जाणें । खरे किं खोटे ॥ ४०
देव रेसिमाचा केला । तोहि तुटोनियां गेला ।
आतां नवा नेम धरिला । मृत्तिकेचा ॥ ४१

... ... ...

धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ठ देखा ।
तेथें देव कैंचा मूर्खा । भ्रांति पडली ॥ ४४
हे आपुली कल्पना । प्राप्ताऐसीं फळें जाणा ।
परि त्या देवाचि या खुणा । वेगळ्याचि ॥ ४५

समर्थांनीं केलेल्या या समारोपाच्या मागील दोन ओव्यांत 'आमचा देव खरा; तो आकांतीं आम्हाला पावतो, सर्व काळ मनोरथ पूर्ण करतो, पण आतां त्याचें सत्त्व गेल्यामुळें आमच्या नशिबीं जें होतें तें भोगावें लागत आहे,' असें श्रोत्यांचें मनोगत घातलेलें आहे. तें ऐकून धातुपाषाणमृत्तिकेच्या ठिकाणीं देव असल्याची कल्पना समर्थांनीं झिडकारिली आहे.

मातीचे देव धोंड्याचे देव । सोन्याचे देव रुप्याचे देव ।
काशाचे देव पितळेचे देव । तांब्याचे देव चित्रलेपे ॥ १
रुविच्या लाकडाचे देव पोंवळ्यांचे देव । बाण तांदळे नर्मदे देव ।
शालिग्राम काश्मिरी देव । सूर्यकान्त सोमकांत ॥ २
तांब्रनाणीं हेमनाणीं । कोणी पूजिती देवार्चनीं ।
चक्रांगीत चक्रतीर्थांहुनी । घेऊन येती ॥ ३
उदंड उपासनेचे भेद । किती करावे विशद ।
आपलाले आवडीचा वेध । लागला जनीं ॥ ४

... ... ...

मुळीं द्रष्टा देव तो येक । त्याचे जाहाले अनेक ।
समजोन पाहातां विवेक । उमजों लागे ॥ ६

(१९ : ५) सहाव्या दशकांतील वरच्या उताऱ्यापूर्वी देवांच्या कल्पनेचा समर्थांनीं जो ऊहापोह केला आहे, तो नजरेखालीं घालण्यासारखा आहे.

कल्पनेचा केला देव । तेथें जाला दृढ भाव ।
देवालागीं येतां खेव । भक्त दुःखें दुःखवला ॥ ३२
पाषाणाचा देव केला । येके दिवसीं भंगोन गेला ।
तेणें भक्त दुखवला । रडे पडे आक्रंदे ॥ ३३
देव हारपला घरीं । येक देव नेला चोरीं ।
येक देव दुराचारीं । फोडिला बळें ॥ ३४
येक देव जापाणिला । येक देव उदकीं टाकिला ।
येक देव नेऊन घातला । पायातळीं ॥ ३५
काय सांगों तीर्थमहिमा । मोडूनि गेला दुरात्मा ।
थोर सत्त्व होतें तें मा । काय जालें कळेना ॥ ३६
देव घडिला सोनारीं । देव वोतिला वोतारीं ।
येक देव घडिला पाथरीं । पाषाणाचा ॥ ३७

वरील उताऱ्यांत इस्लामी राज्यकारभाराच्या अनर्थांमुळें देवासंबंधांत येणाऱ्या अनुभवांची 'देव चोरीस जाणें, दुराचारी लोकांनीं देव फोडणें, इस्लामच्या भीतीनें देवांना लोकांनीं खोल पाण्यांत ढकलणें किंवा एखाद्या वेळीं हिंदूंच्या देवावर मुसलमानी इमारतीच्या पायांत गाडले जाण्याची पाळी येणें, तीर्थें उध्वस्त स्थितींत आढळणें,' याप्रमाणें वाच्यता झालेली असली, तरी आपल्यांतील नाना शास्त्रें, मतें, यंत्र इत्यादिकांचा माजलेला गलबला समर्थांच्या परमार्थविचाराला जास्त बोचत असल्याचें सहज कळणारें आहे.

वस्तुतः 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः' या वचनानुसार ब्राह्मणांनीं पुढाकार घेऊन देवाधर्माच्या अराजकांतून लोकांची सुटका करावयास हवी होती, परंतु इतरांप्रमाणें ब्राह्मणांनींसुद्धां आचारविचारांच्या बाबतींत पूर्णपणें ताळतंत्र सोडल्याचें समर्थांना दिसत असल्यामुळें १४ व्या दशकांतील 'युगधर्मनिरूपणा'च्या समासांत (७) त्यांनीं ब्राह्मणांच्या दुर्दशेची हजेरी घेतली आहे. ब्राह्मण मार्गदर्शक या नात्यानें सर्वांच्या गुरुस्थानीं रहाण्याऐवजीं 'गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ॥' (३१)

नीच यातीकडे गुरुत्व गेलें; शूद्र ब्राह्मणांचा आचार बुडवीत आहेत; राज्य म्लेंच्छ व क्षत्रिय यांनीं आटोपलें; गुरुत्वाचाच काय तो अधिकार ब्राह्मणांचा, तथापि तो-सुद्धां कुपात्रांनीं (अयोग्य लोकांनीं) बळकावला; राज्य नाहीं, गुरुत्व नाहीं याप्रमाणें ब्राह्मण दोहीकडून नागविले गेले आहेत; अशा अर्थाच्या ओवींत

> कित्येक दावलमलकास जाती। कित्येक पीरास भजती।
> कित्येक तुरुक होती। आपले इच्छेनें॥ ३२

ही ओवी आलेली आहे. तिचा अर्थ सर्व समाजाला लावतां येण्याजोगा व्यापक असला, तरी ब्राह्मणांच्या संदर्भात ती आलेली असल्यानें दावलमलकाच्या दर्शनाला जाणारे, पीरास भजणारे व स्वेच्छेनें इस्लामला मिठी मारणारे ब्राह्मणच होत, या-विषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं. येथें समर्थ लोकांचा आपखुशीचा व्यवहार सांगत आहेत. तथापि दुसरीकडे सक्तीनें इस्लामी धर्माची दीक्षा दिली जात असल्याचाहि उल्लेख सांपडतो.

> येकें वाढविले येकें लुंचिले। येकें भादरिले सावकाश॥ १
> अंतर वेगळें रे वेडिया अंतर वेगळें॥ ध्रु०
> विभूती लाउनी जंगम जाला। इंद्रिये कापुनी तुरुक केला॥ २
> अंतर शोधितां अंतरचि जाला। दास नवाजीला राघवानें॥ ३

(पद-पदांतरें, पान १७५) या पदांत केस वाढविणारे (जोगी, बैरागी), केस तोडणारे (जैन), केस भादरणारे (संन्यासी), जंगम इत्यादि वर्गांसोबत तुर्कांचा उल्लेख आहे. त्यांच्या वर्णनावरून हिंदूंना तुर्क करण्याचा विधि लक्षांत येतो. इस्लामी धर्माच्या बलात्काराचा प्रकार समर्थांच्या ग्रंथांत मुद्दाम शोधावा लागतो. अधिक परिचयाच्या व नित्यपाठाच्या दासबोधांत समर्थ तुर्क होण्याच्या स्वेच्छेची ज्या अर्थी वाच्यता करतात त्या अर्थी स्वेच्छेच्या धर्मभ्रंशाविषयीं त्यांचा कटाक्ष असल्याचें तात्पर्य स्वीकारण्याला हरकत नाहीं. म्लेंच्छांसंबंधांत आपल्या विरोधी वृत्तीचा स्पष्ट इशारा समर्थांच्या उपदेशांत एकदांच आलेला असून समर्थांचा गुणगौरव प्रामुख्यानें करण्याच्या अर्वाचीन लोकधाटीमुळें तो विशेष परिचित आहे. १८ व्या दशकांतील 'उत्तम पुरुषा'च्या वर्णनांत (६)

**म्लेंच दुर्जन उदंड । बहुतां दिसाचें माजलें बंड ।**
**याकारणें अखंड । सावधान असावें ॥ १२**

इस्लामचे सामान्य अनुयायी जुलूम-जबरदस्तीचे प्रकार राज्यसत्तेच्या भरंवशानें बहुत दिवसांपासून समर्थांच्या काळापर्यंत अधून मधून करीत असल्यामुळें त्यांच्या-बद्दल सावध रहाण्याची सूचना वरील ओवींत आहे; परंतु तिच्या आधारें सांप्रत समर्थांच्या स्वधर्माभिमानाविषयीं ज्या कल्पना उराशीं बाळगण्याचा व अत्युक्तीनें बोलण्याचा प्रघात पडला आहे तो अर्वाचीन समर्थभक्तांच्या मनोवृत्तीचा खेळ असल्याचें गळीं उतरविणारी एक ओवी समर्थांच्या 'निर्गुणध्यान' ह्या स्फुट प्रकरणांत आलेली आहे. 'श्रीसमर्थांचीं लघुकाव्यें, भाग २' या सत्कार्योत्तेजक सभेच्या अधिकृत पुस्तकांत हें १७७ ओव्यांचें प्रकरण १०९ ते १२८ पानांतून पसरलेलें आहे. देवाच्या सेवेंत ज्या मार्गानें भक्तांचा उद्धार होतो, त्या मार्गानें ज्यांचा उद्धार झाला किंवा होतो त्यांच्या मालिकेंत

**जोगी जंगम सोपी । फकीर कलंदर नानारूपी । १५८**

योगी, विरागी, उदास, संन्यासी यांच्या पंक्तीला सोपी (सूफी), फकीर, कलंदर या मुसलमान भक्तवर्गाची समर्थांनीं सन्मानपूर्वक सोय लावावी हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. ज्या मार्गानें हिंदु भक्तांना मोक्ष लाभतो त्याच मार्गानें सोपी, फकीर, कलंदर हेदेखील 'स्वरूपीं पावन होती' असें सदर ओवीच्या उत्तरार्धांत समर्थांनीं म्हटलें आहे. 'म्लेंच दुर्जन उदंड–' या ओवीबरोबर अतिपवित्र ठरण्याजोग्या निर्गुण ध्यानांतील ही ओवी न विसरल्यास समर्थांचें मुसलमानांसंबंधांतील नेमकें मनोगत उमजूं शकतें.

देवाविषयीं लोकांत निश्चित ज्ञान नसल्यामुळें देवाच्या भक्तीचें विकृत रूप विविध आचारांच्या द्वारें समर्थांना पहायला सांपडलें व त्याचा विस्तार त्यांनीं दासबोधांत केलेला आहे. दासबोधांतील गुरु, उपदेश, आणि बहुधाज्ञान (५:२-४ व ५) या समासांतून लोकांत आढळणाऱ्या समजुतींचा भरपूर निर्देश असल्यानें ते समास जिज्ञासूंनीं मुळांतून पहावे. गुरु, मंत्रगुरु, तंत्रगुरु, वस्ताद गुरु (हा बहुधा व्यायामाचा किंवा गायनाचा गुरु असावा), राजगुरु, कुलगुरु, 'येक मानिला गुरु' विद्यागुरु, कुविद्यागुरु, असद्गुरु, यातिगुरु (याच्या मागें दंडकर्तें, असें विशेषण

असल्यानें जातीच्या दृष्टीनें घडणाऱ्या प्रमादाबद्दल शिक्षा देण्याची योग्यता असलेले जातींतले जे श्रेष्ठ पुरुष त्यांना हा शब्द लागू पडणारा आहे), माता गुरु, पिता गुरु, राजा गुरु, (राजगुरु व राजा गुरु असे दोन भिन्न गुरु समर्थांनीं मानले आहेत) देवगुरु, जगद्गुरु, याप्रमाणें एकूण १७ गुरूंची वाच्यता केली, तरी कांहीं जण त्यांतून निसटल्याचें लक्षांत येऊन समर्थांनीं स्वप्नगुरु, दीक्षागुरु, प्रतिमागुरु व स्वयंमन्यगुरु–'येक म्हणती स्वयें गुरु। आपला आपणा'–अशा आणखी चार गुरूंना उजेडांत आणलें आहे (५ : २).

**जे जे यातीचा जो व्यापारु। ते ते त्याचे तितके गुरु।**
**याचा पाहातां विचारु। उदंड आहे ॥ ७१**
**असो ऐसे उदंड गुरु। नाना मतांचा विचारु।**
**परी जो मोक्षदाता सद्गुरु। तो वेगळाचि असे ॥ ७२**

गुरूसारखीच मंत्राची अवस्था असल्याचें समर्थांनीं दासबोध, ५ : ४ मध्यें दाखविलें आहे. शिव, भवानी, विष्णु, महालक्ष्मी, अवधूत, गणेश, मार्तंड, मत्स्यकूर्मादि अवतार, भैरव, मल्लारि, हनुमंत, शेष, गरुड, वायु, वेताळ, झोटिंग, बाळा, बगुळा, काली, कंकाळी या प्रत्येक देवदेवतेचा निराळा मंत्र, सारांश

**पृथकाकारें स्वतंत्र। जितुके देव तितुके मंत्र।**
**सोपे अवघड विचित्र। खेचर दारुण बीजाचे ॥ ८ ॥**
**पाहों जातां पृथ्वीवरी। देवांची गणना कोण करी।**
**तितुके मंत्र वैखरी। किती म्हणौनि वदवावी ॥ ९**
**असंख्यात मंत्रमाळा। येकाहूनि येक आगळा।**
**विचित्र मायेची कळा। कोण जाणे ॥ १०**

तरीसुद्धां समर्थांनीं २० व्या ओवीपर्यंत निरनिराळ्या मंत्रांची आणखी माहिती देऊन पुनः एकदां

**हे किती म्हणौनि सांगावें। शिवशक्तीचीं अनंत नांवें।**
**इच्छेसारिखीं स्वभावें। उपदेशिती ॥ २१**

असें म्हटलें आहे. पण या वर्णनांत आसनें, मुद्रा, दृष्टिवेध, अनाहत ध्वनि, पिंडज्ञान, कर्ममार्ग, उपासनामार्ग, अष्टांगयोग, नानाचक्रें, अजपा, तत्त्वें, सगुण-

निर्गुण, तीर्थाटन, तप, महावाक्याचा जप, शाक्त, मुक्त, इंद्रियपूजन, वशीकरण, असे कांहीं प्रकार न आल्यामुळें २२ ते २९ ओव्या त्यांच्या नामावळीला दिल्या आहेत.

**ऐसी उपदेशाची स्थिति । पुरे आतां सांगों किती ।**
**ऐसे हे उपदेश असती । असंख्यात ॥ ३०**

'ऐसे उपदेश अनेक । परी ज्ञानेंविण निरार्थक ।' (३१) ज्ञानावांचून हे उपदेश टाकाऊ हा सिद्धांत पटवून देण्यासाठीं ज्ञानाच्या व्याख्यानाकडे वळण्यापूर्वीं समर्थांनीं विद्याकलांची झडती घेतली आहे. भूतभविष्यवर्तमानाची माहिती; पशुपक्षी, माणसें, त्यांत पुनः स्त्रीपुरुष यांची माहिती; भूतें, वाहनें, वस्त्रें, शस्त्रें, पात्रें, धातु, नाणीं, रत्नें, दगड, लाकूड, जमीन, पाणी, उजेड यांची बारीक माहिती; बीजें, अंकुर, पुष्पें, फळें, यांची माहिती; रोगदुःखांची माहिती; शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, यांची माहिती; स्वर, वर्ण, भाषा, अर्थ यांची माहिती; अशा माहितीच्या किती तरी तऱ्हा आहेत. या सर्वांना ज्ञान हाच शब्द लावण्यांत येतो.

**असो सकळकळाप्रवीण । विद्या मात्र परिपूर्ण ।**
**तरी ते कौशल्यता परी ज्ञान । म्हणोंचि नये ॥** (३२ : ५ : ५)

मोक्षप्राप्तीचें ज्ञान, सायुज्यप्राप्तीचें ज्ञान, आत्मज्ञान म्हणतात तें निराळेंच असल्याचें बजावून पुढल्या समासांत (६) 'ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान'

**पहावें आपणासि आपण । या नांव ज्ञान ॥ ६**

या प्रस्तावनेनें जें ज्ञान लोकांत दृढत्वानें वाढावें अशी समर्थांना तळमळ लागलेली होती त्याचीं लक्षणें समर्थांनीं स्पष्ट केलीं आहेत.

देवांचा विचार समर्थांनीं दासबोधांत १३ व्या दशकाच्या ८ व्या समासामध्यें लोकांपुढें ठेवलेला आहे. सृष्टीचा कर्ता कोण हा प्रश्न घेऊन त्याच्या उत्तरांत लोकांच्या परिचयांतील बहुतेक साऱ्या देवदेवतांचीं नांवें सांगितलीं आहेत. सृष्टीचें कर्तृत्व धरित्री, पर्जन्य, वायु, प्रयत्न, प्रारब्ध, स्वभाव इत्यादिकांकडे असल्याचें बोलणारे लोक त्या काळांत होते, असें दिसतें.

**ऐसा कर्त्याचा विचार । पुसतां भरला बाजार ।**
**आतां कोणाचें उत्तर । खरें मानावें ॥ २१**

जेहि जो देव मानिला । कर्ता म्हणती तयाला ।
ऐसा लोकांचा गल्बला । वोसरेना २२

आपुलाल्या साभिमानें । निश्चयेंचि केला मनें ।
याचा विचार पाहाणें । घडेचिना ॥

हाच विषय दासबोधाच्या ८ व्या दशकाच्या १० व्या समासांत ४० ओव्यांनीं वर्णिलेला आहे. लघुकाव्यांतील सगुणध्यानाच्या ५० ते ७५ ओव्यांत असेंच देवसाधनाच्या नानाविधतेचें चित्र आहे. देवविषयक यथार्थ ज्ञानाच्या अभावीं देवाच्या सेवेचे आचार विचित्र असावे यांत नवल वाटण्यासारखें कांहींच नाहीं. तमोगुणाच्या स्पष्टीकरणांत (दासबोध, २ : ६) त्या आचारांचा वृत्तांत आलेला आहे.

केले गळाचे नवस । राडिबेडीचे सायास ।
काष्ठयंत्र छेदी जिव्हेस । तो तमोगुण ॥ २९

मस्तकीं भदें जाळावें । पोतें आंग हुरपळावें ।
स्वयें शस्त्र टोचून घ्यावें । तो तमोगुण ॥ ३०

देवास सिर वाहावें । कां तें आंग समर्पावें ।
पडणीवरून घालून घ्यावें । तो तमोगुण ॥ ३१

निग्रह करून धरणें । कां तें टांगून घेणें ।
देवद्वारीं जीव देणें । तो तमोगुण ॥ ३२

निराहार उपोषण । पंचाग्नी धूम्रपान ।
आपणास घ्यावें पुरून । तो तमोगुण ॥ ३३

सकाम जें कां अनुष्ठान । कां तें वायोनिरोधन ।
अथवा रहावें पडोन । तो तमोगुण ॥ ३४

नखें केस वाढवावे । हस्तचि वर्ते करावे ।
अथवा वाग्सुन्य व्हावें । तो तमोगुण ॥ ३५

नाना निग्रहें पीडावें । देहदुःखें चर्फडावें ।
क्रोधें देवास फोडावें । तो तमोगुण ॥ ३६

हाच विषय देवदेवता, तीर्थेंव्रतें यांच्यासहित समर्थांनीं स्फुट ओव्यांच्या ५ व्या गुच्छांत (श्री रामदासांची कविता, प्रथम खंड, पानें २००-२०२) संक्षेपतः वर्णन केलेला आहे.

दासबोधांत व इतरत्र आलेल्या लोकस्थितिदर्शक वर्णनाचें तात्पर्य समर्थांना देवाच्या कार्याची व परमार्थशुद्धीची चिंता लागलेली होती, असें आहे. राज्याराज्यांतील युद्धें, राज्यकारभारांतील अन्याय, प्रसंगीं देशाच्या कांहीं टापूंत कुणाचीच सत्ता नाहीं म्हणून तेथें 'बळी तो कान पिळी' अशा तऱ्हेचा येणारा अनुभव, या दुर्दशेचा उपयोग त्यांनीं लोकांना परमार्थाची आस्था उत्पन्न व्हावी म्हणून आपल्या विचारपरंपरेंत करून घेतलेला आहे. एखाद्या ईर्ष्येच्या हिंदूनें स्वराज्यप्राप्तीचा साहसी उद्योग हातीं घ्यावा किंवा तसा उद्योग कोणीं आरंभिला असल्यास त्याला उत्तेजन मिळावें, असें धोरण त्यांच्या शिकवणींत कुठेंच नाहीं. समर्थांची शिकवण कवितारूपानें कागदावर उतरली जाऊन तिचा प्रसार संप्रदायांत होत असतां शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसाधनाला तेज चढूं लागलें होतें. परंतु त्यांच्या कर्तृत्वाचें ज्ञान समर्थांच्या शिकवणींत कुठेंहि चमकूं नये, यावरून योग्य बोध पूर्वग्रहरहित जिज्ञासूंच्या लक्षांत येण्याला हरकत नाहीं. पूर्वीं म्हटल्याप्रमाणें समर्थांना देवाधर्माचा अभिमान लोकांत उत्पन्न करावयाचा असल्यामुळें त्यांचें लक्ष त्या अभिमानाला कुंठित करणाऱ्या आचारविचारांकडे गेलें व त्याचाच त्यांनीं आपल्या शिकवणींत खल केला. 'श्रीराम' हा एक देव लोकांना मान्य व्हावा आणि त्याच्या निमित्तानें देवाच्या वैभवाला चढती कळा लाभावी हा उद्देश सिद्धीस नेण्याला संप्रदायाची स्थापना हें साधन समर्थांनीं स्वीकारलें. संप्रदाय स्थिरावण्याकरितां आपल्या शिकवणीचे ग्रंथ लिहिले, त्याचा अभ्यास शिष्यांकडून करविला. अनेक देवदेवतांचें अराजक कसें माजतें असा प्रश्न उपस्थित झाल्यास त्याचें समर्पक उत्तर शिष्यांना देतां येण्यासाठीं त्यांनीं जागोजाग या अराजकाचीं कारणें सादर केलीं आहेत. तीं कारणें मागें दिलेल्या उताऱ्यांतून आलेलीं असलीं तरी पुनः त्यांची परिस्फुटता विषयपूर्ततेसाठीं करणें अवश्य आहे.

देवानें पृथ्वी निर्माण केली, तिच्यांतल्या पाषाणांना विवेकहीन माणसें देव म्हणतात (८:१), याची उपपत्ति समर्थांनीं पुढीलप्रमाणें लावली आहे :

बहुविध उपासना । ज्याची जेथें पुरे कामना ।
तो तेथेंचि राहिला मना । सदृढ करूनि ॥ २९

... ... ...

जयास जैसें भासलें । तेणें तैसें कवित्व केलें ।
परी हें पाहिजे निवडलें । प्रचीतीनें ॥ ३२

ही ओवी ९ : ५ मध्यें आहे.

जैसा प्रवाह पडिला । तैसाच लोक चालिला ।
कोण वारील कोणाला । येक नाहीं ॥ १७
मतामतांचा गल्बला । कोणी पुसेना कोणाला ।
जो जे मतीं सांपडला । तयास तेंचि थोर ॥ २५

या ११ व्या दशकाच्या २ ऱ्या समासांतील ओव्या मागें उद्धृत झालेल्या आहेत.

जेणें जैसा परमार्थ केला । तैसाच पृथ्वीवरी दंडक चालला ।
साता पांचाचा बळावला । साभिमान ॥ ४७

ज्याचा स्वार्थ ज्या उपासनापद्धतीनें सफळ झाला, त्यानें त्या पद्धतीचा अभिमान धरला व त्याच्या उपासनेचा एक नवा संप्रदाय उभा राहिला; आणखी एखाद्याला निराळेंच कांहीं भासलें, तेव्हां त्यास अनुसरून त्यानें तसें कवित्व करून लोक नादीं लावले, याप्रमाणें आणखी एक नवा फड जन्मास आला. ९ व्या दशकांत एखाद्या मताचा प्रवाह पडून लोक त्यांतून वहात जातात अशी कल्पना समर्थांनीं पुढें केली आहे. कुणाच्या तरी परमार्थानें दंडक सुरू होतो; त्याचा अभिमान बाळगणारे लोक असले कीं त्या परमार्थाचा सवता सुभा दृष्टीस पडूं लागतो.

जें जें जेथें निर्माण जालें । तें तें तयास मानलें ।
अभिमान देऊन गोविलें । ठाइं ठाइं ॥ १६
आपुल्याला अभिमानें । लोक चालिले अनुमाने ॥ १९

अभिमानाच्या सोबतीस अनुमान देऊन समर्थांनीं १४ : ८ मधील ओवीचा विषय स्पष्ट केला आहे (१५ : १). आणखी एक कारण म्हणजे भीड हें होय (१९ : ५).

भूमंडळीं देव नाना । त्यांची भीड उलंघेना ।
मुख्य देव तो कळेना । कांहीं केल्या ॥ २३

देवाच्या संबंधांत कसें वागावें याची प्रस्तावना म्हणून समर्थांनीं दासबोधाच्या शेवटीं (२० : ९) प्रकट केलेले विचार पहाणें अवश्य आहे :

> मृत्तिकापूजन करावें । आणि सवेंचि विसर्जावें ।
> हें मानेना स्वभावें । अंतःकर्णासि ॥ १
>
> देव पूजावा आणि टाकावा । हें प्रशस्त न वाटे जीवा ।
> याचा विचार पाहावा । अंतर्यामीं ॥ २
>
> देव करिजे ऐसा नाहीं । देव टाकिजे ऐसा नाहीं ।
> म्हणोनि याचा कांहीं । विचार पाहावा ॥ ३
>
> देव नाना शरीरें धरितो । धरूनी मागुती सोडितो ।
> तरि तो देव कैसा आहे तो । विवेकें ओळखावा ॥ ४
>
> नाना साधनें निरूपणें । देव शोधायाकारणें ।
> सकळ आपुले अंतःकर्णें । समजलें पाहिजे ॥ ५

ब्रह्मज्ञान हा देव ओळखण्याचा एक उपाय आहे. परंतु तो ज्याच्या अंगीं पात्रता असेल त्यालाच सांगतां येईल. 'मज प्रत्यक्ष भेटवावा देव' असा सर्व लोकांच्या अंतरींचा भाव असला तरी विवेकाचा मार्ग निराळा असून लोक शुद्ध विचारानें । आकलन होणाऱ्या देवाला देव मानायला तयार नसतात. मग त्यांच्याकरितां मूर्तीचा अवलंब करावा लागतो.

> थोर लोक मरोनि जाती । त्यांच्या सुरता करूनि पाहाती ।
> तैसीच आहे हेहि गती । उपासनेची ॥ ९

मोठा टोलेजंग व्यापार साधेना म्हणून जर एखाद्यानें शाईच्या कारखान्यासारखा क्षुद्र धंदा सुरू केला तर त्याला ज्याप्रमाणें राज्यसंपत्तीची आशा धरतां येणार नाहीं, त्याचप्रमाणें चिमुकल्या मूर्तीत मन गढवून बसलेल्या उपासकाला ब्रह्मज्ञानाचें सौख्य मिळणार नाहीं. तथापि कित्येक जण भोळ्या भावाला देव भाळतो, असें प्रतिपादन करणारे भेटतात. त्यांचा निषेध समर्थांनीं पुढील ओवींत केला आहे.

> म्हणोनि जितुका भोळा भाव । तितुका आज्ञानाचा स्वभाव ।
> अज्ञानें तरी देवाधिदेव । पाविजेल कैचा ॥ ११

यापूर्वी ९ : ७ मध्यें वरील आशय पुढीलप्रमाणें आला आहे :

**भोळा भाव सिद्धी जाव । हा उधाराचा उपाव**
**रोकडा मोक्षाचा अभिप्राव । विवेकें जाणावा ॥ ४९**

समर्थांच्या वाङ्मयांत मनुष्याच्या कर्तृत्वाचीं जीं अंगोपांगें सांगितलेलीं आहेत, त्यांची तपासणी केल्यास त्यांचा रोख प्रामुख्यानें परमार्थाच्या दिशेचा असल्याविषयीं शंका रहात नाहीं. नवविधा भक्ति, चतुर्विधा मुक्ति, हरिकथा, कवित्व, लेखन, सदाचार, (चातुर्य, राजकारण) सिद्ध, मुक्त, सदेव, यत्नशील, निःस्पृह, विरक्त, सद्गुरु, उत्तम पुरुष, महापुरुष, यांचीं सुलक्षणें; करंटा, टोणपा, दुश्चित, तमोगुणी, कुविद्य, झोपाळू, आळशी यांचीं अवलक्षणें; या सर्वांना समर्थांच्या ग्रंथांत परमार्थदृष्ट्या समावेश करण्यांत आलेला आहे. इस्लामी राज्यबळामुळें ज्ञानेश्वरकालापासून हिंदूंच्या देवाधर्मावर–पर्यायानें परमार्थावर–जें दडपण पडलें होतें तें उटवून लोकांत देवाधर्माच्या उठावणीचें अवसान उत्पन्न करणें हें जसें पूर्वीच्या संतांचें तसेंच समर्थांचें ध्येय असल्यामुळें त्यांनीं नाना प्रकारच्या देवदेवतांचें जें बंड माजलें होतें, त्याविरुद्ध आपल्या उपदेशाची मोहीम चालू करावी हेंच संत या नात्यानें त्यांना आपलें कर्तव्य वाटलें. त्यांनीं पारखलेल्या लोकस्थितींचें तात्पर्य देवदेवतांचें, उपदेशउपासनेचें, मंत्रतंत्राचें अराजक हें होय व त्याचें स्पष्टीकरण येथें केलेलें आहे.

## दे व का र ण

जो विषय एखाद्याच्या उपदेशांत वारंवार येत असेल तो विषय त्याच्या अत्यंत जिव्हाळ्याचा असें समजलें जातें. या नियमाच्या अनुरोधानें समर्थांच्या उपदेशाचा परामर्श केल्यास त्यांच्या जीवनाची महत्त्वाकांक्षा सहज ध्यानांत येऊं शकते. दा स बो ध हा त्यांचा मुख्य ग्रंथ. इतरत्र आहे तें तर त्यांत आहेच, परंतु त्यांत उपदेशाचीं आणखी अशीं पुष्कळ अंगें आहेत कीं जीं त्यांच्याच वाङ्मयांत अन्यत्र सांपडत नाहींत. दा स बो धाच्या प्रारंभीं हा ग्रंथ भक्तिमार्गाचा असल्याविषयीं स्पष्ट विधान आहे. भक्ति, ज्ञान, वैराग्य या त्रयीच्या अनुषंगानें उत्पन्न होणाऱ्या दुसऱ्या पुष्कळशा प्रश्नांचीं उत्तरें त्यांत आहेत व तीं सर्व भक्तिमार्गांतील अडचणींच्या निरसनाचीं आहेत. दा स बो धांतीलच नव्हे तर दा स बो धाच्या बाहेरचें कोणतेंहि प्रकरण घेतल्यास त्यांत भक्तीला आवश्यक असलेल्या विचारांखेरींज दुसऱ्या कोणत्याहि विचाराचा आदर केलेला दिसत नाहीं. भक्तीला देव म्हणजे उपास्य पाहिजे व उपास्याला देवळासारखें स्थळ पाहिजे. उपास्य व देऊळ यांच्या मागोमाग उत्सव, यात्रा हीं उपास्याचीं नित्यनैमित्तिक महती वाढविणारीं कर्तव्यें उत्पन्न होतात. उत्सवासाठीं किंवा यात्रा म्हणून शेंकडों माणसें गोळा व्हावयाचीं तर त्या माणसांच्या रहाण्याबसण्याची, निजण्याउठण्याची, खाण्यापिण्याची व्यवस्था करणें अवश्य, हें निराळें सांगायला नको. उपास्याची पूजाअर्चा, मिरवणूक या कामासाठीं निराळा सरंजाम असावा लागतो. उत्सव, यात्रा पार पडून गर्दी ओसरल्यावर ज्या कुणाला देवासंनिध राहून पठण, चिंतन करण्याची इच्छा असेल किंवा योग्यता असेल त्यांच्याकरितां देवळानजीक निराळ्या स्वतंत्र जागा निर्माण करणें ओघानेंच प्राप्त आहे. देवळाच्या आजूबाजूस जिवंत पशुपक्ष्यांना ठेवण्याची योजना असल्यास अधिक चांगलें. देवाच्या पूजेसाठीं व नैवेद्यासाठीं फुलांफळांच्या बागा असाव्या लागतात. सारांश, राजाच्या निवासस्थानाशीं सुख, सौंदर्य आणि उपयुक्ततेच्या दृष्टीनें स्पर्धा

करणारीं, किंबहुना राजाच्या ऐश्वर्याला मागें टाकणारीं देवस्थानें निर्माण करावीं, अशी समर्थांची महत्त्वाकांक्षा होती. ही महत्त्वाकांक्षा त्यांनीं अनेकदां त्याच त्याच शब्दांनीं आपल्या वाङ्मयांत गोवलेली आहे. देवकारण हें त्यांचें ध्येय होतें. दुसरें एखादें 'कारण' त्यांच्या वाङ्मयांत दृष्टीस पडलें तर त्याचा देवकारणाच्या संगतीनें उलगडा केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. समर्थांच्या देवकारणाचें विवेचन पूर्वीं झालें असलें तरी फिरून त्याची निराळ्या रीतीनें मांडणी करण्याची आवश्यकता आहे.

समर्थांच्या शिकवणीचा मुख्य ग्रंथ जो दासबोध त्यामध्यें आरंभींच 'येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ॥' (१ : १ : २) असें एकदां खडखडीत सांगून

> **भक्तिचेन योगें देव । निश्चयें पावती मानव**
> **ऐसा आहे अभिप्राव । ईये ग्रंथीं ॥ ४**

असें समर्थांनीं हडसून खडसून बजावलें असतां, 'देवकारण' हें समर्थांचें एकमेव ध्येय होतें, या मुद्द्याचा विस्तार त्यांच्या कार्यासंबंधांत जे नानाविध प्रवाद बोकाळले आहेत त्यांच्या हकालपट्टीसाठीं करावा लागत आहे. तो विस्तार जितक्या अंगांनीं करतां येईल तितका केल्याशिवाय समर्थांच्या ध्येयाला झांकून टाकणारीं कुतर्कांचीं अभ्रें नाहींशीं होणार नाहींत. येथें यासाठींच दासबोधाचें थोडेंसें पारायण करावयाचें आहे. दासबोधाच्या सुरवातीस 'येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ॥' आणि 'भक्तिचेन योगें देव । निश्चयें पावती मानव' हा अभिप्राय स्पष्ट आहे व त्यालाच पोषक अशीं समर्थांचीं पुढील नमनें आहेत. गणपतीविषयीं समर्थांनीं 'कलौ चंडी विनायकौ' या पुराणांतील वचनाचा आधार घेऊन 'सप्रचीत भजन स्वार्थ' साधण्याची आशा व्यक्त केली आहे (१ : २ : २९). मंगलमूर्ति गणेशाची परमार्थाची चित्तीं वांच्छा धरून स्तुति केली, असें त्यांचें म्हणणें आहे (३०). शारदेच्या वंदनांत (१ : ३) तिला माया ठरवून मायेचें सारें कर्तृत्व वर्णिलें आहे. त्या वर्णनांत योग्यांची समाधि, धारिष्ठांची कृतबुद्धि, तुर्यावस्था, महंतांची शांति, नाटकाची अंतर्कळा, जाणीव, निर्मळ स्फूर्ति, ज्ञानशक्ति, सत्रावी जीवनकळा, सद्विद्या, स्वरूपस्थिति, निर्गुणाची ओळख, अनुभवाची खूण, हरिभक्तांची भक्ति, जीवन्मुक्तांची मुक्ति अशीं शारदेचीं नानाविध रूपें आलेलीं आहेत. सायुज्यमुक्ति देणारे काय ते संत सज्जन म्हणून समर्थांनीं त्यांचा गौरव केला आहे. इहलोकीं स्वराज्य देणारा

कोणी संतसाधु असतो, हें त्यांच्या ध्यानींमनींहि नाहीं. सायुज्यमुक्ति देतां येत नाहीं म्हणून समर्थांनीं 'माहांराजे चक्रवर्ती' (१ : ५ : २३) खालच्या प्रतीचे ठरविले आहेत. समर्थांचे श्रोतेसुद्धां संतसज्जनांच्या मालिकेंतील आहेत. सत्त्वाचे सागर, बुद्धीचे आगर, नाना शब्दरत्नांचे वैरागर, अर्थामृताचे भोक्ते (येथें अर्थ म्हणजे द्रव्य, संपत्ति नव्हे), प्रसंगीं वक्त्याचे वक्ते, संशयाचे छेदक, निश्चयी पुरुष, इत्यादि स्तुतिवाचक शब्दांची समर्थांनीं वृष्टि केली आहे (१ : ६). कवींच्या स्तवनांत अध्यात्म, मोक्ष, सायुज्य, परलोकींचा निजस्वार्थ, योग्यांचा गुप्त पंथ (येथें 'गुप्त' शब्दाचा संबंध कोणी स्वराज्यविषयक कामगिरीशीं जोडणार नाहीं, असा विश्वास वाटतो) ज्ञान्याचा परमार्थ याप्रमाणें कितीतरी शब्द आहेत (१ : ७). पुढें परमार्थाच्या विवेचनांत पुनः वरच्यापैकीं अनेक शब्द असून शेवटीं (१ : ९) स्वच्छ सांगून टाकलें आहे कीं,

**भल्यानें परमार्थीं भरावें । शरीर सार्थक करावें ।**
**पूर्वजांस उद्धरावें । हरिभक्ती करूनी ॥ २७**

नमनाचें पहिलें दशक संपल्यावर समर्थांनीं माणसाच्या भलेबुरेपणाचा विषय विवेचनास घेतलेला आहे. मूर्खांच्या लक्षणांत 'देवलंड पितृलंड' (२ : १ : २७), 'देवद्रोही गुरुद्रोही । मातृद्रोही पितृद्रोही । ब्रह्मद्रोही स्वामीद्रोही' (२ : १ : ४४) या मालिकेंत पहिलें स्थान देवविषयक अनिष्ट प्रवृत्तीला दिलेलें आहे. पुढें (२ : ३ : २५) माता, पिता, ब्राह्मण यांच्या जोडीला आत्मा, स्त्री व गाय यांस बसविलेलें आहे. आत्महत्यारा म्हणजे आत्मघातकी; अर्थात् पर्यायानें त्याचा देवाशीं संबंध पोचतो. (आत्महत्या करणारा व आत्मज्ञानाच्या अभावीं पारमार्थिक दृष्ट्या जो आपला घात करून घेतो तो आत्महत्यारा.) घरसंसाराच्या ममत्वानें देवाला आपल्या व्यवहारांत टाळणारा तो रजोगुणी (२ : ५ : ८). याच संदर्भात 'देवकारण' (२ : ५ : ३०) हा शब्द समर्थांनीं घातलेला आहे. रजोगुणाची कथा संपवितांना विरक्ति न साधली तरी भगवद्भक्ति करावी; 'काया वाचा आणि मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें' ईश्वराला अर्पून सार्थक करावें (कित्ता ३७); यथाशक्ति दान-पुण्य करतांना 'भगवंतीं अनन्य' रहावें; सुखदुःखें भोगतांनाहि देवाचेंच चिंतन करावें (कित्ता ३८);—असा उपदेश समर्थांनीं केला आहे. रजोगुणामागून

तमोगुणाची माहिती देतांना मत्सरानें भक्ति मोडणें, देवाल्यांना इजा पोंचविणें या कृत्यांचा निर्देश केलेला आहे (२ : ६ : १७). क्रोधानें देवास फोडणें व देवाची निंदा करणें यांचीहि तमोगुणाच्या तपशीलांत वाच्यता आहे (किता ३६–३७). रजोगुणानें किंवा तमोगुणानें घडणाऱ्या सर्व दोषांचा वचपा सत्त्वगुणाच्या वर्णनांत काढलेला आहे (२ : ७).

तीर्थीं अर्पी जो अग्रारें । बांधे वापी सरोवरें ।
बांधे देवाळयें शिखरें । तो सत्वगुण ॥ १९
देवद्वारीं पडशाळा । पाईरीया दीपमाळा ।
वृंदावनें पार पिंपळा । बांधे तो सत्वगुण ॥ २०
लावी वनें उपवनें । पुष्पवाटिका जीवनें ।
निववी तापस्यांचीं मनें । तो सत्वगुण ॥ २१
संध्यामठ आणी भुयेरीं । पाईरीया नदीतीरीं ।
भांडारगृहें देवद्वारीं । बांधे तो सत्वगुण ॥ २२

याखेरीज वाद्यें, छत्रें, सूर्यपानें, सुखासनें, दिंड्या, पताका, निशाणें इत्यादि सामग्री देवाला सत्त्वगुणी पुरुष वाहतात. तिथि, पर्व, महोत्सवादिकांच्या ठिकाणीं त्याचा ‘अंतर्भाव’ असतो – त्याचा जीव लागलेला असतो. सत्त्वगुणी पुरुषाला प्रातःस्नान, पुराणश्रवण, देवतार्चन अशीं कामें आवडतात.

पर्वकाळीं अतिसादर । वसंतपूजेस तत्पर ।
जयंत्याची प्रीती थोर । तो सत्वगुण ॥ ७३

विरक्ताच्या कर्तव्यांत (२ : ९)

पर्वें करावीं अचाटें । चालवावीं भक्तांची थाटें ।
नाना वैभवें कचाटें । उपासनामार्गें ॥ १७
हरिकीर्तनें करावीं । निरूपणें माजवावीं ।
भक्तिमार्गें लाजवावीं । निंदक दुर्जनें ॥ १८

... ... ...

स्नान संध्या जप ध्यान । तीर्थयात्रा भगवद्भजन ।
नित्यनेम पवित्रपण । अंतरशुद्ध असावें ॥ २०

... ... ...

**विरक्तें करावीं पुरश्चरणें। विरक्तें फिरावीं तीर्थाटणें।**
**विरक्तें करावीं नाना स्थानें। परम रमणीय ॥ २५**

इतर कामांसोबत वरील गोष्टींची समर्थांनीं जोड दिलेली आहे. दशक ४ : ५ व ७ यांमध्यें सत्त्वगुणाच्या लक्षणांतील कितीतरी मजकूर त्याच शब्दांनीं आलेला आहे. पडदे, मंडप, चांदोवे, रत्नांचे गुच्छ, हत्ती, घोडे, गाड्या, 'शुक शारिका मयोरें। बदकें चक्रवाकें चकोरें। कोकिळा चितळें सामरें।' 'सुगंधमृगें आणि मार्जरें। गाई म्हैसी वृषभ वानरें' आणि लेकुरें यांचा समावेश अर्पण करावयाच्या पदार्थांत केलेला आहे (४ : ५ : २७–२८). दास्यभक्तीच्या विवेचनांत पूर्वोक्ताची पुनरुक्ति कांहीं नव्या गोष्टींच्या भरतीनें झालेली आहे (४ : ७).

**देवाचें वैभव सांभाळावें। न्यूनपूर्ण पडोंचि नेदावें।**
**चढतें वाढतें वाढवावें। भजन देवाचें ॥ ३**

... ... ...

**जयंत्या पर्वें मोहोत्साव। असंभाव्य चालवी वैभव।**
**जें देखतां स्वर्गींचे देव। तटस्त होती ॥ १८**
**ऐसें वैभव चालवावें। आणि नीच दास्यत्वहि करावें ॥ १९**

या समासाच्या शेवटीं हें प्रत्यक्ष घडणें शक्य नसेल तर मानसपूजा करावी, म्हणजे देवाच्या वैभवाचें दृश्य मनांत उभारावें (ओ. २७–२८), असें दोनदां समर्थांनीं बजावलें असल्यामुळें त्यांनीं रचलेल्या मानसपूजा प्रकरणाकडे दृष्टिक्षेप केल्यास अनुचित होणार नाहीं.

या प्रकरणाच्या पहिल्या समासांत देवस्थानाच्या इमारतींचें व तेथील सुखसोयींचें वर्णन आहे. हा समास अवघ्या ११ ओव्यांचा असून जो कोणी साधु पुरुष अशीं स्थळें निर्माण करील तो धन्य असा त्याचा गौरव समर्थांनीं गाइला आहे.

**ऐसीं स्थळें परोपरीं। नाना युक्ती कळाकुसरी।**
**निःकाम बुद्धीनें करी। धन्य तो साधु ॥ ११**

रामायण युद्धकांडाच्या अखेरीस रामराज्यामध्यें भुयेरी, मठ्या, पर्णशाळा, देवळें, शिखरें यांची कमतरता नसल्याचें समर्थांनीं वर्णन केलें आहे. तें वाचल्यावर रामराज्यांतलें ऐश्वर्य समर्थांनीं दासबोधांत व इतर कवितेंत संकलितपणें

आणलेलें असून त्या ऐश्वर्यानें नटलेलीं देवस्थानें आपल्या देशांत सर्वत्र उठावानें दिसावीं, असा त्यांचा उद्देश त्यांच्या वाङ्मयांत सर्वत्र दिसणारा आहे. जिज्ञासूंची खात्री पटण्यासाठीं समर्थांच्या स्फुट कवितेमधील थोड्याशा लिखिताचें दर्शन करायला हरकत नाहीं. श्रीरामदासांची कविता–प्रथम खंड या पुस्तकांत 'स्फुट प्रकरणें' या सदराखालीं जे विषय आले आहेत त्यांत तीन ठिकाणीं ठळकपणें समर्थांचें ध्येय प्रतिबिंबलें आहे.

**पुण्यमार्ग प्रतिष्ठावा । लावावी धर्मवासना ।**
**देवाल्यें करावीं मोठीं । वापी कूप सरोवरें ॥ २०**

**वाटीका वृक्ष लावावे । पुष्पें फळें परोपरीं ।**
**करावीं कपाटें टाकीं । भुयरीं विवरें गव्या ॥ २१**

**वृंदावनें दीपमाळा । धर्मशाळा बहुविधा ।**
**पाईऱ्या चोवऱ्या वोटे । यात्रा धबके हरीकथा ॥ २२**

... ... ...

**वैभवें सर्व देवाचें । वाद्यें छेत्रें परोपरीं ।**
**किती म्हणोनि सांगावीं । सांभाळावीं समस्तहि ॥ २४**

हा उतारा स्फुट प्रकरण ३ (पानें ३६२–३६३) मधून घेतलेला आहे. स्फुट प्रकरण ५२ (पानें ४११–४१२), स्फुट प्रकरण ५९ (पानें ४२६ ते ४२८) यांतसुद्धां हाच विषय आहे. करुणाष्टकांतील 'समुद्रेश्वर' नामक कवितेमध्यें (पान ७४) या पूर्वोक्ताचीच पुनरुक्ति आहे.

देवस्थानें म्हटलीं कीं त्यांचीं कार्यें ठरलेलीं आहेत. पूजा, आरती, नैवेद्य, कीर्तन, पुराण, अध्यात्माची व अवतारचरित्रांची चर्चा, उत्सवयात्रादि प्रसंगीं देवाची मिरवणूक, अन्नसंतर्पण अशीं देवस्थानांचीं कार्यें प्रायः निश्चित असून समर्थांनीं त्यांचीच वाच्यता आपल्या वाङ्मयांत विपुलतेनें केलेली आहे. 'आनंदवनभुवन' कवितेंत म्लेंच्छसंहाराचा हर्ष व्यक्त करतांना समर्थांनीं

**उदंड जाहालें पाणी । स्नानसंध्या करावया ।**
**जपतपअनुष्ठानें । आनंदवनभुवनीं ॥ ३६**

**नाना तपें पुरश्चरणें। नाना धर्म परोपरीं।**
**गाजली भक्ति हे मोठी। आनंदवनभुवनीं ॥ ३७**
**बंड पाषांड उडालें। शुद्ध अध्यात्म वाढलें।**
**राम कर्ता राम भोक्ता। आनंदवनभुवनीं ॥ ३९**

असा धार्मिक जीवनाचा निर्देश केलेला आहे. देवानें व रामवरदायिनी देवीनें नष्टचांडाळांचा नाश केल्यावर पुढील स्थिति उदयास आली :

**देवभक्त येक जाले। मिळाले जीव सर्वहि।**
**संतोष पावले तेथें। आनंदवनभुवनीं ॥ ४६**
**वेदशास्त्र धर्मचर्चा। पुराणें माहात्में किती।**
**कवित्वें नूतनें जीर्णें। आनंदवनभुवनीं ॥ ५०**
**गीत संगीत सामर्थ्यें। वाद्य कल्लोळ उठिला।**
**मिळाले सर्व अर्थार्थी। आनंदवनभुवनीं ॥ ५१**

ज्या पुरुषाला धर्माच्या व अध्यात्मज्ञानाच्या जीर्णोद्धाराची आकांक्षा असेल त्याला जीर्णोद्धाराच्या आड येणाऱ्या विघ्नांचा फडशा पडूं लागल्यावर यापेक्षां निराळ्या तऱ्हेच्या हर्षोर्मी उचंबळणें शक्य नाहीं. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसाधक उद्योगाचा झपाटा कृष्णेच्या प्रदेशांत शिरल्यानंतर तेथें इस्लामी सामर्थ्याच्या ठिकऱ्या उडालेल्या पहाण्याची समर्थांना संधि मिळाली व त्यांना जें कवित्व स्फुरलें त्यांत देवाधर्माचीं कार्यें उंचावल्याचे विचार प्रकट व्हावे, यांत त्यांच्या ध्येयाशीं विसंगत असें कांहीं नाहीं. उलट त्या ध्येयाच्या कल्पनेला बळकटी आणणारेंच हें कवित्व आहे.

देवाधर्माच्या व्यवहारांत पडलेल्या माणसांचीं सांप्रदायिक नांवें दा स बो धांत पुष्कळदां आलेलीं आहेत त्यांचादेखील समर्थांचें ध्येय काय होतें या प्रश्नाचें निश्चित उत्तर काढण्याला उपयोग होतो. उदाहरणार्थ, दा स बो धाच्या पहिल्या दशकांतील सभेचें वर्णन पहा (स. ८). प्रेमळ भक्तांचीं गायनें, भगवत्कथा, हरिकीर्तनें, वेद-व्याख्यान-पुराण-श्रवणें ज्या सभेंत निरंतर चाललेलीं आहेत ती सभा समर्थांनीं वर्णिली आहे. या सभेंत सभासद कोण, तर कर्मशील, आचारशील, दानशील, धर्मशील, शुचिष्मंत, पुण्यशील, अंतरशुद्ध, कृपाळू अशा स्वभावाचे किंवा योगी, वीतरागी, संयमी, निग्रही, तापसी, विरक्त, निःस्पृह, अरण्यवासी अशा वृत्तीचे

किंवा दंडधारी, जटाधारी, नाथपंथी, मुद्राधारी, बाळब्रह्मचारी, पुरश्चरणी, मनस्वी, जनस्वी, असे भिन्न भिन्न पंथांचे आणि व्रतांचे लोक समर्थांनीं सभेसाठीं निवडले आहेत. सिद्ध, साधु, साधक, मंत्रयंत्रशोधक, एकनिष्ठ उपासक, पंडित, पुराणिक, विद्वांस, वैदिक, भट, पाठक, यजुर्वेदी, अग्निहोत्री, याज्ञिक, यांच्याबरोबर त्रिकालज्ञानी, वैद्य, पंचाक्षरीसुद्धां समर्थांनीं सभेकरितां निवडले आहेत. पण राज्यकार्याच्या उलाढालींतल्या कोणत्याहि प्रकारच्या व्यक्तीचें समर्थांनीं सभेनिमित्त स्मरण केलेलें नाहीं.

> **जेथें श्रवणाचा उपाये । आणी परमार्थसमुदाये ।**
> **तेथें जनासी तरणोपाये । सहजचि होये ॥ २१**

नरदेहाच्या गौरवांत (१ : १०) नरदेहानें तीर्थाटन, पुरश्चरण, नामस्मरण, योग, तप, वेदशास्त्राध्ययन, हीं कार्यें साधतात. देहाच्या आधारानें कोणी विख्यात भक्त महानुभाव झाले. कोणीं आकाशांत, कोणीं तेजांत, कोणीं पाण्यांत मिसळून जाण्याचा, तर कोणीं वायुरूपानें अदृश्य होण्याचा चमत्कार केला. कोणीं आपली जागा न सोडतां निरनिराळ्या ठिकाणीं किंवा समुद्रावर भटकण्याचा चमत्कार दाखविला.

> **येक भयानकावरी बैसती । येक अचेतनें चालविती ।**
> **येक प्रेतें उठविती । तपोबळेंकरूनी ॥ ९**
>
> **येक तेजें मंद करिती । येक जळें आटविती ।**
> **येक वायो निरोधिती । विश्वजनाचा ॥ १०**

या कर्तृत्वाचें साधन नरदेहच होय. संत, महंत, ऋषि, मुनि, सिद्ध, साधु, समाधानी, भक्त, मुक्त, ब्रह्मज्ञानी, विरक्त, योगी, तपस्वी, तत्त्वज्ञानी, योगाभ्यासी, ब्रह्मचारी, दिगंबर संन्यासी, षड्दर्शनी, तापसी ‘नरदेहींच जाले ॥’ (२३). नरदेहाच्या कर्तृत्वांत येथें स्वराज्यसाधनाचा उल्लेख नाहीं, तसा तो अन्यत्रहि नाहीं. नरदेहाचें कार्य दासबोधांत आणखी पुष्कळ समासांतून सांगितलेलें आहे. द. ३ स. १० मध्यें तर आपल्या देहाच्या साह्यानें भजनरत्नें ईश्वराला अर्पून आनंद लुटावा, असें म्हटल्यावर

> **हरिभक्त वैभवें कनिष्ट । परी तो ब्रह्मादिका वरिष्ठ**
> **सदा सर्वदा संतुष्ट । नैराशबोधें ॥ २८**

याप्रमाणें हरिभक्ताची सर्व श्रेष्ठता वाखाणली आहे. कवित्व, अध्ययन, ग्रंथलेखन, लिपीओळखण, पुरश्चरण, अनुष्ठान, गोरांजन, धूम्रपान, पंचाग्निसाधन, विषयोपभोग, भक्ति, मुक्ति, दानधर्म, इत्यादिकांना देहाखेरीज दुसरा आधार नाहीं. या नानाविध प्रकारांमध्यें इस्लामी राज्यें खणून काढण्याच्या गुप्त वा प्रकट व्यवहारांतील एकाहि साधनाची नोंद नाहीं. १९ : ५ मध्यें फिरून एकवार देहाच्या योगानें काय करतां येतें याचा खल आहे. देहावांचून भक्ति फावत नाहीं, देव पावत नाहीं, 'याकारणें मूळ भजना। देहेचि आहे ॥' (७). देह जर नसेल तर 'भजनासी कैंचा ठाव ?' असा समर्थांचा प्रश्न आहे. देहावांचून देव कैसा भजावा, देव कैसा पुजावा, महोत्सव कैसा करावा, अत्तर गंध पत्र पुष्प फळ तांबूल धूप दीप असा नाना भजनाचा साक्षेप देहावांचून कुठें करतां येईल; सारांश 'देह्याकरितां घडतें। भजन कांहीं ॥' विसाव्या दशकाच्या पांचव्या समासांत मनुष्याच्या ज्ञानाचे विषय सांगितले आहेत. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, वस्त्रें, शस्त्रें, विद्याकलाशास्त्रें, इहलोक-परलोक, विवेक, ब्रह्मांडरचना, अष्टभोग, नवरस, विलास, या ज्ञानविषयांत धर्माभिमानानें स्वधर्मशत्रूंचें निर्दालन करण्याच्या उपायाचा निर्देश नाहीं. हें सारें ज्ञान 'देव नाहीं वोळखिला। विवेकबळें ॥' तर व्यर्थ, असा समर्थांनीं निष्कर्ष काढला आहे (२७). युद्ध, मुत्सद्देगिरी, तह, चढाई, लढाई, स्वारी, मोहीम, हल्ले, गोलंदाजी, किल्ले, वाडे, मैदानें, चतुरंग दळें, दरबार, खलबतें असल्या राज्यविषयक घटनांचा वारा समर्थांनीं आपल्या उपदेशास लागू दिलेला नाहीं. दृष्टांताकरितां राजा, फौज, तोफेचा गोळा यांचा चार पांच ठिकाणीं उपयोग केला आहे. पराक्रमी, कपटकर्मी, संग्रामी, कुळवंत राजे, शस्त्रधारी, प्रतापी, नीतिवंत राजे, भूपति, चक्रवर्ती, हयपति, गजपति, नरपति, महाराजे, वरिष्ठ, वेतनी, देसाई, व्यवसायी, पुंड राजे, व्यापारी, मुद्राधारी यांचीं नांवें समर्थांनीं मृत्युनिरूपणांत (३:९) उच्चारलीं आहेत व त्यांतच 'राजकारणी' (ओ. १३) हा शब्द प्रथम आलेला आहे. समर्थांच्या ध्येयविवेचनांत यांपैकीं एकाचादेखील आदर झालेला नाहीं.

ज्ञानार्जनाच्या विषयांकडे दृष्टिक्षेप केल्यास असाच अनुभव येतो. कर्म, उपासना, ज्ञान, सिद्धान्त, योग, वैराग्य, व्रतें, तीर्थें, दानें यांचें ज्ञान संपादावें; परमार्थानिमित्त आहाराचे पदार्थ व नियम यांची माहिती मिळवावी; उन्हांत, पाण्यांत,

भूगर्भात, आकाशांत, उन्हाळ्यांत, हिंवाळ्यांत, अरण्यांत कसें रहावयाचें याचे उपाय समजून घ्यावे; निरनिराळ्या पंथांचीं शास्त्रें तशींच वेदपुराणें अभ्यासावीं; पिंडज्ञान, तत्त्वज्ञान यांचा बोध आदरावा; भूगोल, खगोल, देवादिकांचीं स्थानें यांचा श्रवणाच्या साह्यानें मागोवा घेतलेला असावा; यक्ष, गंधर्व, किन्नर, नारद, तुंबरु यांचें ज्ञान असावें; आपल्या ज्ञानाच्या क्षेत्रांतून वैद्यक, ज्योतिष, सामुद्रिक, मंत्रतंत्र, यांनासुद्धां वगळूं नये. संगीत ही समर्थांची आवडती कला असल्यामुळें तिला त्यांनीं रागज्ञान, तालज्ञान, नृत्यज्ञान, वाद्यज्ञान, या शब्दांनीं श्रवणसाध्य ज्ञानाच्या विषयांत बसविलें आहे. चौदा विद्या, चौसष्ट कला, हें आमच्या विद्याकलांचें गणित समर्थ विसरलेले नाहींत; परंतु समर्थोक्त ज्ञानाच्या विविधतेंत राजनीतीचें किंवा तत्संबंधीं ग्रंथांचें नांव एकदेखील नसावें, यावरून समर्थांच्या ध्येयाचें स्वरूप निश्चित करतां येतें.

एका माणसाचें जन्मापासून मरेपर्यंतचें वृत्त समर्थानीं दासबोधाच्या तिसऱ्या दशकामध्यें पहिल्या पांच समासांत वर्णिलें आहे. त्यांत राजकीय उलथापालथीच्या संकटांत – परचक्रांत – मनुष्य सांपडल्यास त्यावर बायको गमावण्याचा प्रसंग येतो, असा राज्याच्या संदर्भाचा लहानसा उल्लेख दृष्टीस पडतो. परंतु तेवढा परोक्ष स्वरूपाचा-देखील राज्यविषयक संबंध माणसानें – विशेषतः ब्राह्मणानें – स्वीकारावयाच्या दिन-चर्येंत समर्थांनीं येऊं दिलेला नाहीं. दिनचर्येंची चर्चा ११ : ३ मध्यें आहे. बहुधा जन्माच्या शेवटीं प्राप्त होणारा नरदेह नीतिन्यायानें वागून सार्थकीं लावावा अशी प्रस्तावना करून पुढें चिंतेचे निरनिराळे प्रकार व आळस यांचा दुष्परिणाम सांगितला आहे. मग दिनचर्येंचा प्रारंभ आहे. सकाळीं उठावें, कांहीं पाठान्तर करावें, देवाला स्मरावें. नंतर शारीरिक शुद्धीचीं कामें आटोपून 'संध्या तर्पण देवतार्चन ।' पुढें यथासांग वैश्वदैव-उपासना हीं कर्तव्यें उरकावीं. मग थोडा फळाहार घेऊन संसारधंद्याकडे वळावें. 'सुशब्दें राजी राखावा । सकळ लोक ॥' (१८). आपल्या व्यापारांत खबरदार रहावें. योग्य प्रकारें धंदा चालविला म्हणजे अन्न गोड लागतें. भोजन झाल्यावर 'कांहीं वाची चर्चा करी ।' (२२). एकान्तीं जाऊन नाना ग्रंथ विवरावे, तरच मनुष्य शहाणा होतो. यानंतर समर्थांनीं 'सदेवपणाचीं' लक्षणें दिलीं आहेत. एकहि क्षण रिकामा जाऊं देऊं नये, प्रपंचव्यवसायाचें ज्ञान उत्तम असावें, कांहीं मिळवावें मग जेवावें, गुंतल्या लोकांना सोडवावें; सारांश, कोणत्या तरी रीतीनें शरीर कारणीं लावावें.

**कांहीं धर्मचर्चा पुराण। हरीकथा निरूपण।**
**वायां जाऊं नेदी क्षण। दोहींकडे॥ २६**

दिनचर्येंत इतक्या गोष्टी आहेत, पण एकदांसुद्धां चुकून देशाच्या राजकीय स्थिती-कडे लक्ष द्यावें, असा उपदेश केलेला नाहीं. १२ : ९ हा दिनचर्येंचा आणखी एक समास आहे. त्यामध्यें वरच्या मजकुराबाहेरचा जो तपशील आहे त्यांत 'सुंदर अक्षर ल्याहावें। पष्ट नेमस्त वाचावें।' (१४) असल्या कर्तव्याबरोबर

**आलियाचें समाधान। हरिकथा निरूपण।**
**सर्वदा प्रसंग पाहोन। वर्तत जावें॥ १७**

**ताळ धाटी मुद्रा शुद्ध। अर्थ प्रमये अन्वये शुद्ध।**
**गद्यपद्यें दृष्टांत शुद्ध। अन्वयाचे॥ १८**

**गाणें वाजवणें नाचणें। हस्तन्यास दाखवणें।**
**सभारंजकें वचनें। आडकथा छंदबंद॥ १९**

**बहुतांचें समाधान राखावें। बहुतांस मानेल तें बोलावें।**
**विलग पडों नेदावें। कथेमध्यें॥ २०**

**लोकांस उदंड वाजी आणूं नये। लोकांचें उकलावें हृदये।**
**तरी मग स्वभावें होये। नामघोष॥ २१**

या उताऱ्यांत लाठी, दांडपट्टा, बंदूक, या हत्यारांचें शिक्षण दिसत नाहीं. कारण तीं सर्वथैव त्याज्य अशा तमोगुणाचीं लक्षणें आहेत (२ : ६ : २७). कीर्तनांतलें नाट्य, नृत्य, कवित्व यांचा मात्र येथें पुरस्कार आहे. बहुतांचें समाधान राखावें, बहुतांना मानेल तें बोलावें, कशाकरितां तर कथेचा बेरंग होऊं नये म्हणून. लोकांना कंटाळा येईल असें वागूं नये, लोकांचें हृदय उकलावें असें वर्तन नाम-घोष सहज रीतीनें सर्वत्र गाजण्यासाठीं ठेवावें, हा समर्थांच्या उपदेशाचा उद्देश अगदीं स्पष्ट आहे. लोक जमवावे, त्यांना आपल्या आकर्षणांत राखावें; पण हा प्रयोग 'म्लेंच दुर्जन उदंड। बहुता दिवसाचें माजलें बंड।' त्याचा निःपात उडविण्यासाठीं नसून लोक हरिकथेंत, नामघोषांत मग्न व्हावे याकरितां चालवावयाचा, ही समर्थांची महत्त्वाकांक्षा झांकली जाण्यासारखी नाहीं. सामान्य माणसानें आपला

पोटाचा धंदा उत्तम प्रकारें संभाळून देवकारण साधावें, असें या दिनचर्येचें तात्पर्य आहे.

देवाधर्मांतील अराजकाचें उच्चाटन करूं इच्छिणाराच्या शिकवणींत देवाधर्माचें खरें स्वरूप लोकांना समजावून देणाऱ्या सिद्धान्तांचें विवेचन प्रामुख्यानें असावें, हें स्वाभाविक आहे. समर्थांच्या वाङ्मयांत जिकडे तिकडे ब्रह्म, माया, पंचमहाभूतें, प्रलय, देहाची व देहात्मबुद्धीची निंदा, निरनिराळ्या परमार्थघातकी स्वभावदोषांचा निषेध, त्यांच्या मतें परमार्थाला श्रेयस्कर असलेल्या गुणांची स्तुति, इत्यादि विषय दिसतात, याचें मूळ त्यांनीं स्वीकारलेल्या ध्येयवादांत आहे. सत्क्रिया प्रतिष्ठावी, धर्मस्थापना करावी, परमार्थ उजळावा, भाविकें सांभाळावीं, मोडला परमार्थ उभारावा, अध्यात्म वाढवावें, लोकांना भजनपंथ दाखवावा, अशीं कांहीं कर्तव्यें विरक्ताचीं म्हणून समर्थांनीं सांगितलीं आहेत (२ : ९). दासबोधाच्या तिसऱ्या दशकांत सामान्य माणसाच्या जीवनाची कथा निवेदन केलेली आहे. तिच्यांत परचक्र येणें, त्याच्या तडाख्यांत बायको पळविली जाणें व पुढें ती भ्रष्ट झाल्याचें कळणें, असे प्रकार आलेले आहेत. परंतु परचक्र आलें असतां लढाऊ लोकांचा जमाव घेऊन त्याच्या प्रतिकाराला सज्ज होण्याच्या गुणाला त्या कथेंत स्थान नाहीं. उलट जुन्या एकवीस समासी दासबोधांत परचक्राच्या भीतीनें पळणाऱ्या लोकांच्या अग्रभागीं रहाण्याचें समर्थांनीं कौतुक केलें आहे (११ : ५३). देशांत चाललेल्या राज्यविषयक उलथापालथीमध्यें भाग घेऊन आपलें नशीब काढणारे हिंदु समर्थांना दिसत असल्यामुळें त्यांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. पूर्वी होऊन गेलेल्या अवतारांचीं व ऋषिमुनींचीं अद्‌भुत कृत्यें सांगून झाल्यावर सप्तसमासी प्रकरणाच्या दुसऱ्या समासाच्या शेवटीं

> आतांहि उदंड होतें । कल्पिल्यासारखें घडतें ।
> काळ साह्य होत जातें । इच्छेसारिखें ॥ ३३
> रंकाचे होती राजे । सामर्थ्य भूमंडळीं गाजे ।
> अद्‌भुत कीर्ति उदंड माजे । देखत देखतां ॥ ३४

अशी माहिती समर्थांनीं दिलेली आहे. ही माहिती कोणत्या पुरुषाला अनुलक्षून लिहिली हें कळण्याला मार्ग नाहीं. रंकाचा राजा झाला तरी देवाधर्मांचें दैन्य

जाणारें नव्हतें. तें लोकांनीं जागृत होऊन स्वावलंबी उद्योगानें घालविल्याशिवाय जाणार नाहीं, असा समर्थांचा विश्वास होता. त्या विश्वासास अनुसरून त्यांनीं आपल्या कार्याचा पाया घातला आणि उपदेशाची मांडणी केली. लोकजागृति करायची तर लोकांचा आपल्यावर रोष न होऊं देण्याची खबरदारी घेणें अवश्य होतें. लोकांना संतुष्ट राखून ते आपला उपदेश ऐकण्याची तत्परता आपल्या ज्या गुणांमुळें दाखवितील त्या गुणांच्या उपदेशाला त्यांनीं कुठें 'चातुर्य' तर कुठें 'राजकारण' किंवा दुसरीं कित्येक नांवें दिलीं आहेत.

दा. क्र.

## प्र द क्षि णा

माझी काया गेली खरी। मी तों आहे सर्वांतरीं
ऐका स्वहितउत्तरें। सांगईन ॥ १

राहा देहाच्या विसरें। वर्तों नका वाईट बरें।
तेणें भक्तिमुक्तीचीं द्वारें। चोजवीती ॥ २

नका करूं वटवट। पाहा माझा ग्रंथपट।
तेणें सायोज्यतेची वाट। ठाईं पडे ॥ ३

बुद्धि करावी स्वाधीन। मग हें मजूर आहे मन।
हेंचि करावें साधन। दास म्हणे ॥ ४

समर्थांचें शरीर क्षीण होत जाऊन त्यांचा अंतसमय लांब नसल्याच्या कल्पनेनें जवळचे शिष्य व्याकुळ झाल्याचें समर्थांना दिसलें तेव्हां त्यांनीं शिष्यांना जो उपदेश केला तो वरील कवितेंत सांठवलेला आहे. अंतकालीन उपदेशाचीं हीं वचनें दा स वि श्रा म धा मा चा कर्ता आत्माराम स्वामी यानें उद्धृत केलीं आहेत (दा० वि० धाम, पान ८९३ ). समर्थांच्या अवतारसमाप्तीनंतर एकदां त्यांचें शिष्यमंडळ सज्जनगडास जमलें असतां आपल्याला मार्गदर्शक कोणी नाहीं, या जाणिवेनें भांबावलें, तेव्हां समर्थांच्या समाधींतून उपदेशाचे वरील शब्द उठले, अशी दा स वि श्रा मधा मकर्त्याची समजूत असल्यामुळें त्यानें तशी प्रस्तुत उपदेशाची कथा दिली आहे. या मरणोत्तर उपदेशाला 'माझी काया गेली' या भूतकालवाचक वाक्याचा आधार दाखवितां येईल; परंतु तो बुद्धिवादाला पटणारा नाहीं. 'माझी काया आणि वाणी। गेली म्हणाल अंतःकर्णीं' अशा सुरुवातीचीं जीं दुसरीं आ त्मा रा म, दा स बो ध या ग्रंथांची शिफारस करणारीं उपदेशवाक्यें आहेत, त्यांतसुद्धां भूतकालवाचक प्रयोग आहे. म्हणून शरीर पडण्यापूर्वीचीं तीं वाक्यें आहेत असें मानून त्यांतील

भावार्थाप्रमाणें समर्थांच्या ग्रंथपटाची प्रथम बाहेरून व नंतर आंतून पहाणी करणें आणि समर्थांचें साकल्यानें यथामति दर्शन घेणें-घडवणें या उद्योगास हात घालावा हें योग्य ठरतें. ग्रंथपटाच्या बहिरंगाचें ज्ञान करून घ्यावयाचें असल्यानें त्याला प्र द क्षि णा असें नांव दिलें आहे.

बहिरंगाच्या विचारांत पहिला प्रश्न उपस्थित होतो तो दा स बो ध या नांवाचा. दुसरा प्रश्न दा स बो ध म्हणून प्रसिद्ध असलेला वीस दशकी दोनशें समासांचा ग्रंथ केव्हां, कुठें व कसा निर्माण झाला हा होय. समर्थांच्या सांप्रदायिक चरित्र-कारांचा हे प्रश्न सोडवितांना उपयोग होत नाहीं. अलीकडे चाळीस पन्नास वर्षांत झालेल्या संशोधनामुळें जी गोष्ट निश्चितपणें निदर्शनास आलेली आहे ती ही कीं समर्थ आपल्या प्रत्येक उपदेशकांडाला ' दा स बो ध ' असें नांव देत असत. याची साक्ष सत्कार्योत्तेजक सभेच्या अधिकृत लघुकाव्यांतील स प्त स मा सी प्रकरणाच्या पहिल्या समासाच्या अखेरीस पहावयाला सांपडते. प्रसिद्ध दोनशें समासांच्या दा स बो धाप्रमाणें तेथें ' इति श्री दासबोधे गुरुशिष्यसंवादे ' असे शब्द आहेत. असाच प्रकार पं च मा न या प्रकरणाच्या अखेरीस दिसतो. तेथें अगदीं अखेरचा चरण 'दासबोधीं समाप्यते' असा आहे. पं च मा न म्हणजे दा स बो ध हा समर्थांचा अभिप्राय तेथेंहि स्पष्ट आहे. सर्व समासांच्या शेवटीं 'दासबोध' हे शब्द नाहींत, याकडे लक्ष दिल्यास ज्यांच्या शेवटीं हे शब्द नाहींत ते प्रथम विषयाचें नांव देऊन लिहिलेले सुटे स्वतंत्र प्रबंध होते व मागून त्यांची जमेल तशी जुळणी आतांच्या दा स बो धासाठीं करण्यांत आली असा तर्क अवलंबावा लागतो. एकंदर विषय-निरूपणाची योजना संकल्पून विषयविभागानुसार जे समास समर्थांनीं लिहिले त्यांच्या संग्रहाला विषयाचें नांव दिलें. उदाहरणार्थ, अं त र्भा वाकडे पाहिलें तर त्याचे सहा समास आहेत. विषयाची कल्पना नसती तर त्याला पं च स मा सी, स प्त स मा सी किंवा ए क वी स स मा सी याप्रमाणें समासांच्या संख्येवरून ष ट् स मा सी हें नांव पडलें असतें. आ त्मा रा मा चे पांच समास आहेत, परंतु ते समास योजनाबद्ध असल्यामुळें त्यांची आ त्मा रा म या नांवाखालीं व्यवस्था करतां आली. नाहींतर पं च स मा सीप्रमाणें समासांच्या संख्येवरून त्याला ओळखावें लागलें असतें. ग्रंथाच्या विभागाकरितां फार मोठ्या प्रमाणांत समर्थांनीं ' समास '

हेंच नांव स्वीकारलें आहे. 'मान' या शब्दाचाहि उपयोग केला आहे 'शतक' हा शब्द त्यांनीं रामायणाच्या विभागास आणि १४०० ओव्यांच्या एकेका विभागास लावलेला आहे. 'शतक' म्हटलें म्हणून नेमकी शंभर ही संख्या समजावयाची नाहीं. किंचित् न्यूनाधिक्यानें शंभर ही संख्या घ्यावी लागते.

दासबोध असें नांव समर्थांनीं आपल्या शिकवणीच्या सर्व अंशांना देण्याचा प्रघात ठेवला असला तरी कालान्तरानें त्यांच्या एकाच ग्रंथाला लोक दासबोध या नांवानें ओळखूं लागले. वीस दशकी दोनशें समासी दासबोध सिद्ध होण्यापूर्वी समर्थ आपल्या शिष्यांना अभ्यासाकरितां कोणता ग्रंथ देत होते याची विवंचना वीस दशकी दोनशें समासी दासबोधाकडे वळण्यापूर्वी करणें अवश्य आहे. या विवंचनेचें समाधान दोन तऱ्हांनीं करतां येतें. वीस दशकी दोनशें समासी दासबोध उभारला जाण्यापूर्वी एकवीस समासी जुना दासबोध समर्थांचे शिष्य वाचीत होते असें एक समाधान आहे, तर वीस दशकी दोनशें समासीमधील सातव्या दशकाचा दासबोध त्यांच्या समोर होता असें दुसरें समाधान आहे. एकवीस समासीला अनुलक्षून बहुतेक सांप्रदायिकांच्या हस्तलिखितांतून जुना दासबोध, जुनाट दासबोध असा त्याच्या नांवाचा निर्देश आढळतो, यामुळें तो एक पहिल्या काळांतला दासबोध असें धरून चालावयाला हरकत नाहीं. वीस दशकी दोनशें समासींतील सातव्या दशकाला एकदां नुसतेंच दासबोध म्हणत असल्यानें व तो केव्हां रचला गेला याबद्दल कालदृष्ट्या कांहींच अनुमान करतां येत नसल्यानें त्यालादेखील जुन्यांतच गणणें भाग आहे. देशांतरींचे महंत निःस्पृह–अर्थात् समर्थांचे शिष्य–भेटायला आले म्हणजे त्यांच्याजवळचीं पुस्तकें समर्थ आपल्या ताब्यांत घेऊन 'दशक समास व्यस्ताव्यस्त लाऊनि' त्यांची परीक्षा घेत.

**सध्या ग्रंथ महंते विल्हे लाविला । तरी शुद्ध विवरणें पूर्ण परमार्थ केला ।**
**विलंबें ग्रंथ विल्हे लावित बैसला । तरी ग्रंथपूजन मात्र संपादिलें ॥ ७**

(श्रीसमर्थप्रताप, समास ९) ग्रंथाची व्यवस्था महंताला चटकन (सध्या – सद्यः) लावतां आली तर त्यानें चांगलें पारायण, मनन केलें असें ठरे; व ग्रंथप्रकरणांचा अनुक्रम लावतांना ज्याची धांदल, दिरंगाई दिसेल त्यानें ग्रंथ अभ्यासला नाहीं तर केवळ ग्रंथपूजन केलें याबद्दल समर्थांना शंका रहात नसे. वेणाबाईचा प्रशिष्य

गिरिधर यानें आपल्या श्री स म र्थ प्र ता प ग्रंथांत ही माहिती दिली आहे. त्यानें ग्रंथ असा मोघम शब्द घातल्यामुळें ग्रंथ म्हणजे काय याचा नीट बोध होत नाहीं. अंदाजानें एकवीस समासी किंवा सातवा दशक समजून निर्वाह करणें भाग आहे.

कोणता ग्रंथ पहिला व कोणता दुसरा याचा छडा लावण्याचें साधन उपलब्ध नसल्यानें कांहीं प्रकरणांतून आलेल्या संदर्भान्वयें व परंपरेंतील कल्पनांच्या आधारें समर्थांच्या लेखनाचा पूर्वापर संबंध अतिशय ठोकळपणें लावावा लागतो. लेखनाच्या विविधतेवरून मनांत उठणाऱ्या अनुमानांची वाच्यता लांबणीवर टाकून येथें अगोदर वीस दशकी दोनशें समासी दा स बो धाच्या रचनेची मीमांसा करावयाची आहे. हा ग्रंथ कसा तयार झाला याबद्दल एका अर्वाचीन समर्थभक्त संशोधकाचीं दोन मतें आहेत. धुळ्याचे श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांनीं शके १८२७ (इ. स. १९०५) या वर्षी कल्याणस्वामीच्या हस्तलिखित दा स बो धाची प्रत साक्षेपानें प्रकाशांत आणून दा स बो धाच्या अभ्यासाला कांहींसा शास्त्रीय मार्ग दाखविला. त्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत श्री. देवांनीं पहिल्या सात दशकांना आठवा ज्ञानदशक जोडून जेवढा ग्रंथ तयार झाला तेवढाच दा स बो ध अशी कल्पना समर्थांच्या नांवावर घातली आहे (प्रस्तावना, पान १३२, आवृत्ति आठवी, शके १८७२). श्री. देवांचा श्री स म र्थ हृ द य ग्रंथ शके १८६४मध्यें म्हणजे आठव्या आवृत्तीच्या प्रकाशनाआधीं सुमारें सात आठ वर्षें बाहेर पडला होता. त्यांत दा स बो धाच्या रचनेचा वृत्तांत निराळाच दिलेला आहे, तरी १८२७ च्या प्रस्तावनेंतील समजुती १८७२ मध्यें बदललेल्या नाहींत. १८२७ नंतर संशोधन व अध्ययन चालू राहिल्यानें जें १८२७ मध्यें आकलन झालें नव्हतें, तें श्री. देवांच्या ध्यानांत नव्यानें आलें. दा स बो धाच्या सातव्या दशकाला एकदां दा स बो ध हें नांव असल्याचीं प्रमाणें श्री. देवांच्या पहाण्यांत येऊन त्यांनीं वीस दशकी दोनशें समासी दा स बो धाचे तीन अवतार कल्पिले आहेत. पहिले सहा दशक हा पहिला अवतार. ७ वा दशक हा दुसरा अवतार. श्री. देवांनीं 'एकवीस समासी' ही पहिली आवृत्ति ठरविली असल्यानें येथें निर्देशिलेल्या पहिल्या व दुसऱ्या अवताराला त्यांच्या क्रमांत दुसरें व तिसरें स्थान आहे. परंतु एकवीस समासी, सहा दशकी, सातवा दशक यांना जर तीन अवतार समजावयाचें, तर वीस दशकी हा दा स बो धाचा चौथा अवतार



१५००८

आपोआपच ठरणारा आहे. श्रीसमर्थ हृदय लिहिते वेळीं ज्ञानदशकाचा उल्लेख चौथ्या दशकाच्या व पांचव्या दशकाच्या १० व्या समासांत आलेला आहे, हें श्री. देवांच्या लक्षांत येऊन हा दशक केव्हां तरी स्वतंत्रपणें ज्ञानदशक या नांवानें लिहिला गेला असें त्यांना म्हणावें लागलें. १८२७ च्या प्रस्तावनेंत हा मजकूर नाहीं. सातव्या दशकाला एकदां दासबोध म्हणत असत याची माहिती श्री समर्थ हृदय लिहितांना झाल्यामुळें त्याचें स्वतंत्र अस्तित्व मान्य करणें श्री. देवांना भागच होतें, परंतु तशा धोरणाची दुरुस्ती दासबोधाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं केलेली नाहीं.

श्रीसमर्थ हृदयांत व दासबोधाच्या प्रस्तावनेंत ६ व्या दशकांतील १० व्या समासांत एकवीस समासी जुन्या दासबोधाच्या २१ व्या समासांतील १६ ओव्या आणि कल्याणस्वामीच्या एकवीस समासींत आढळणाऱ्या ४ थ्या समासांतील ११ ओव्या (हे निराळे चार समास सत्कार्योत्तेजक सभेच्या एकवीस समासीच्या शेवटीं परिशिष्ट म्हणून छापले आहेत) घेतलेल्या आहेत, ही माहिती गाळलेली आहे. संपूर्ण ६ वा दशक आधीं त्याच्या दहाहि समासांचे विषय निश्चित करून लिहिलेला नसल्याचें हें एक प्रमाण आहे. तिसऱ्या दशकाचे १०, पांचव्या दशकाचे २ व ३, आणि बाराव्याचा ८ हे एकंदर चार समास एकवीस समासींतून अनुक्रमें ६, ४, ५ आणि ८ याप्रमाणें सामील केल्याचें पाहिलें कीं, तिसरा, पांचवा हे दशक प्रथम आज दिसणाऱ्या स्वरूपाचे नव्हते, याबद्दल शंका रहात नाहीं. सप्तसमासीचा ६ वा समास लिहितांना समर्थांसमोर २० वा अर्थात् नव्या दासबोधाचा अंतिम दशक होता. श्री रामदासांची कविता – प्रथम खंड या पुस्तकांतील ५५ व्या स्फुट प्रकरणांत 'दासबोध' असा उल्लेख असून श्री. देवांच्या तळटीपेवरून तो ७ व्या दशकाच्या संदर्भाचा ठरतो (पान ४१७). या माहितीचा उपयोग कोणते दशक कशा रीतीनें तयार झाले हें कळण्यापुरता आहे. कालनिर्णयाला त्याचें साह्य होणारें नाहीं. तथापि कित्येक समजुतींच्या प्रेमानें केल्या जाणाऱ्या कालनिर्णयाच्या यत्नांतील दोष उमगण्याला या माहितीचा उपयोग खचित आहे.

शके १५७६ च्या उत्तरार्धांत समर्थांनीं १० वर्षेंपर्यंत आपल्या देवस्थानांच्या परिसराबाहेर दूर अंतरावर ग्रंथलेखनार्थ जाऊन रहाण्याचा संकल्प शिष्यांच्या

कानीं घातला व शिवथरच्या घळींत वास्तव्य केलें, अशा अर्थाचें एक पत्र उपलब्ध आहे. त्याच्या आधारें श्री. देव यांनीं १९०५ पासून अशी एक समजूत आपल्या मनाशीं घट्ट धरली आहे कीं, नव्या दा स बो धाची रचना शिवथरच्या घळींत झाली. ६ व्या दशकाच्या चौथ्या समासांत कलियुगाच्या ४७६० वर्षांचा उल्लेख आहे. त्यावरून तो समास लिहिला जात असतां शकाचें वर्ष १५८१ होतें, असा हिशोब करतां येतो. हें वर्ष अफझलखानाशीं झालेल्या हातघाईच्या प्रसंगाचें आहे. हनुमंत-स्वामीच्या बखरींत १८ व्या दशकाच्या ६ व्या समासाविषयीं एक गोष्ट वाचावयाला सांपडते. गोष्टीमध्यें अफझलखानाच्या प्रसंगाचा साक्षात् किंवा परोक्ष संबंध जोडतां येणारा नसला तरी तसा संबंध कल्पून त्या वेळीं समर्थ शिवथरच्या घळींत होते, असा निश्चितार्थ सांगण्याची एक रीत अर्वाचीन समर्थभक्तीनें उत्पन्न केली आहे. या रीतीस धरून समर्थ शके १५८१ सालीं शिवथरच्या घळींत होते असें श्री. देवांनीं श्री स म र्थ हृ द यां त म्हटलें आहे. ज्या अर्थीं शके १५८१ मध्यें १८ व्या दशकाच्या ६ व्या समासापर्यंत दा स बो धरचनेची मजल आली होती, त्या अर्थीं उरलेला दीड दशक त्यांनीं त्याच वर्षांत संपूर्ण केला असला पाहिजे. तस्मात् दा स बो ध शके १५८१ या वर्षीं लिहिला किंवा जुळविला गेला, अशी श्री. देवांची लाडकी कल्पना आहे. 'श्री रामदास आणि रामदासी' मासिकांतील 'वृत्त, चर्चा वगैरे' प्रकरणांत (खंड ३ रा) पुण्याचे एक वकील कै. वामनराव तळवलकर यांच्या दा स बो धां तील ७ व्या दशकाची रचना स्वतंत्र असल्यासंबंधाचा एक लेख प्रसिद्ध झालेला आहे. त्यांत त्यांनीं कलियुगाच्या वर्षसंख्येवरून निघणारें शक वर्ष दा स बो धा च्या कालनिर्णयाला उपयोगी पडणारें नाहीं असें म्हटलें आहे. त्यास उत्तर देतांना श्री. देवांनीं शक १५८१ मध्यें शिवथरच्या घळींत दासबोध ग्रंथाची समग्र उभारणी झाली हें मत दाखल केलें आहे; परंतु कारणांची चर्चा नाहीं.

सहाव्या दशकाच्या चौथ्या समासाचें वर्ष शके १५८१ हें स्पष्ट आहे, पण तेव्हां समर्थ शिवथरच्या घळींत होते याला आधार नाहीं. शके १५७६ व्या मार्गशीर्षांत समर्थ त्या घळींत होते; पण १० वर्षें तर राहोत, १० महिनेसुद्धां ते तेथें राहिलेले नाहींत. शके १५७६ च्या फाल्गुनांत पौर्णिमेला ते दिनकरस्वामीच्या तिसगांवीं (अहमदनगर जिल्ह्यांत) असल्याची साक्ष स्वा नु भ व दि न क रांत आहे.

श्री. देवांनीं स्वानुभव दिनकरांतील दिनकरास झालेल्या अनुग्रहाची हकीकत विचारांत घेतलेली नाहीं. १५८१ त समर्थ शिवथरच्या घळींत होते या विधानाचा आधार दाखविलेला नाहीं. समर्थांनीं त्या घळींत दोन पुरुष उंचीची एक गणपतीची मूर्ति स्थापन केली होती हीं श्री समर्थप्रतापांतील आख्यायिका जमेस धरून तोच गणपति गणेशवंदनाचा दासबोधांतील समास लिहितांना त्यांच्यासमोर असला पाहिजे, या कथाकल्पनांचा १५८१ मध्यें समर्थ घळींत होते व दासबोधाची रचना करीत होते, हें सिद्ध करण्याला उपयोग नाहीं. १५८१ मध्यें समर्थ त्या घळींत होते व दासबोधाची जुन्या नव्या प्रकरणांची संगति लावून जुळणी करीत होते हें ठरवायला स्वतंत्र पुरावा पाहिजे. आजची पुराव्याची स्थिति ६ व्या दशकाचा चौथा समास एवढाच काय तो शके १५८१ तला असें दाखविणारी आहे. ब्रह्माविष्णूचें आयुर्मान सांगण्याच्या क्रमांत कलियुगाचीं वर्षें समर्थ सहज सांगून गेले व त्या योगानें त्या समासाचें वर्ष समजण्याची सोय झाली. तेवढ्यावर समाधान मानण्याऐवजीं त्या वर्षांचा दासबोधरचनेच्या दृष्टीनें अधिक फायदा घेण्याचा यत्न करणें म्हणजे निष्कारण आधींच्या घोटाळ्यांत भर टाकण्यासारखें आहे.

आधींचा घोटाळा समर्थांच्या सांप्रदायिक चरित्रकारांनीं केलेला आहे. वर हनुमंतस्वामीच्या बखरींतील गोष्टीचा उल्लेख झाल्यामुळें तेथूनच सुरवात करणें चांगलें. सत्कार्योत्तेजक सभेनें प्रकाशिलेल्या हनुमंतस्वामीच्या बखरींत पान ११०-१११ वर १८ व्या दशकाबद्दल पुढील माहिती आहे :

"कोणी येके समईं समर्थ रामघळीस ग्रंथ लिहीत बसले आहेत, त्या समईं माहाराज छेत्रपती यांची स्वारी आली. येऊन साष्टांग प्रणाम करून, हात जोडून उभे राहिले. त्या समईं ग्रंथ अठरावा दशक, पांचवे समासाची समाप्ति, सहावे समास प्रारंभ. त्या समईं माहाराज पुढें पाहून राजश्रीची रीत, गुण, औदार्य, सामर्थ्य समर्थांनीं मनांत आणोन ग्रंथासलग्न राजश्रीचे वर्णन म्हणोन समासाचें नांव ठेवून माहाराजाकडे अवलोकन केलें."

महाराजांच्या गुणांशीं ग्रंथांत (६ व्या समासांत) वर्णिलेले गुण जुळतात हें ध्यानांत येऊन समर्थांनीं त्या समासाला तसें नांव (उत्तम पुरुष) दिलें, असा

या मजकुराचा अर्थ आहे. ग्रंथ जेथें लिहिला ती रामघळ होती, शिवथरची घळ नव्हती. रामघळ व शिवथरची घळ हीं दोन स्थळें निराळीं आहेत. शिवथरच्या घळींत दासबोधाची रचना झाली, या अर्वाचीन कल्पनेशीं हनुमंतस्वामीच्या बखरलेखकाची माहिती जुळत नाहीं. या माहितीनंतर जें घडलें तेंसुद्धां बखरींतून पहाणें अवश्य आहे. कारण त्याचा संबंध अफझलखानाच्या वधाशीं लावला जातो.

"'शिवबा बसावें' म्हणौन आज्ञा केली. त्या काळीं पुनः नमस्कार करून जवळ बसले. त्या काळीं स्वामींनीं विचारलें कीं, 'आवडीचे व्यवहारांतून कसें पार पडलां ?' त्या काळीं हात जोडून विनंति केली, 'स्वामींच्या प्रतापें पार पडलों.' विस्तारें वर्तमान निवेदन केलें. तें ऐकोन 'पराक्रम बहुत केलात.' 'स्वामी, आपली कृपा. तेणें करूनच पार पडलो. ते समईं मनुष्य मात्र प्राणी मुंगीप्रमाणें आपल्यास दिसले. सर्वहि प्रताप श्रीचरणाचा' हें ऐकोन, 'बापा, ही गोष्ट मानवी कृत्यांतील नव्हे. मुळींचा संकल्प श्रीचा आहे." श्रीचा संकल्प महाराजांना कळविण्यासाठीं पंचवटीस असतां कृष्णातीरीं जाण्याविषयीं श्रीची आज्ञा झाली वगैरे स्वतःविषयींच्या गोष्टी समर्थांनीं महाराजांच्या कानीं घातल्या. आपणास येथें वरील संवादांत अफझलखानाच्या वधाचा कांहीं सुगावा लागतो कीं काय तें पहावयाचें आहे. 'आवडीचे व्यवहारांतून कसें पार पडलां ?' हा समर्थांचा प्रश्न, आवडीचा व्यवहार म्हणजे अफझलखानाचा वध, असा अर्थ ध्वनितानेंहि दर्शवीत नाहीं. राज्यसाधनाची साहसी धडपड ही महाराजांची कायमची आवड होती. त्या आवडीच्या व्यवहारांत मोऱ्यांचा पाडाव, अफझलखानाचा वध, शाइस्तेखानाच्या गोटांत शिरून केलेला हल्ला, सुरतेची लूट, कर्नाटकांतील मोहीम या साऱ्या गोष्टींचा समावेश होऊं शकतो. 'मनुष्य मात्र प्राणी मुंगीप्रमाणें दिसणें' हा प्रकार वीरश्रीच्या उत्साहातिरेकानें कोणत्याहि युद्धप्रसंगीं महाराजांच्या ठिकाणीं अनुभवास येणारा असल्यामुळें 'बहुत पराक्रम,' 'आवडीचा व्यवहार,' हे शब्द एकट्या अफझलखानाच्या वधाकडे योजण्याचें कांहीं कारण नाहीं. अफझलखानाचा वध हा 'बहुत पराक्रम' असें बखरलेखकाच्या मनांत असतें तर त्याला तसें स्पष्ट लिहिण्याची चोरी वाटण्याची कांहींच आवश्यकता नव्हती. बखरलेखकाला महाराजांच्या पराक्रमाचा निश्चित प्रसंग ठाऊक नव्हता. महाराजांचा पराक्रम सदैव अविश्रांत चाललेला

असल्यानें भेटीचें वर्णन करतांना समर्थांनीं महाराजांच्या पराक्रमाबद्दल चर्चा केली असण्याचा संभव ध्यानांत आणून त्याला शोभणारे अगदीं सामान्य मोघम शब्द आपल्या लेखनांत त्यानें घातलेले आहेत. रामघळींत समर्थांचें वास्तव्य असतां ग्रंथरचना चालू होती, १८ व्या दशकाच्या सहाव्या समासापर्यंत ग्रंथरचना पोचली होती, अशा वेळीं महाराज भेटीला आले,–असें वृत्त बखरलेखकाच्या कानावर परंपरेनें आलेलें होतें. तें आपल्या कल्पनेनें जुळवून त्यानें बखरींत दाखल केलें आहे. याहून अधिक खोलांत शिरण्याला निदान बखरीच्या मजकुरांत अवकाश नाहीं. त्यांत मुद्दाम लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे रामघळीचा निर्देश ही होय. श्री. देवांच्या शिवथरघळीला त्यांच्या मानसोक्ताखेरीज दुसरा आधार नाहीं. बखरीच्या मागें संप्रदायाच्या परंपरेचा तरी आधार आहे.

सत्कार्योत्तेजक सभेच्या अधिकृत बखरींत ज्या मजकुराला थारा मिळालेला नाहीं, तो अफझलखानाच्या संदर्भाचा मजकूर शके १७९२ मध्यें छापलेल्या बखरींत पहायला सांपडतो. त्या मजकुरांत रामघळीचा व १८ व्या दशकाचा ५ वा समास लिहून झाल्याचा निर्देश आहे. या शके १७९२ च्या बखरींत ‘ राजश्रींची रीत, गुण, औदार्य व सामर्थ्य समर्थांनीं मनांत आणून चालल्या ग्रंथासलग्न त्यांचें वर्णन करून तो समास समास केला, आणि उत्तम पुरुषवर्णन म्हणून त्या समासाचें नांव ठेवून महाराजांकडे अवलोकन केलें ’ (पान १४१). अधिकृत प्रतींतील माहिती असें सुचविणारी आहे कीं, १८ व्या दशकाचा ६ वा समास लिहिण्यास प्रारंभ झाला होता. त्यांतील वर्णन महाराजांच्या गुणसंपत्तीस जुळणारें म्हणून समासाला तसें नांव दिलें. नांव कोणतें हें मात्र तेथें स्पष्ट लिहिलेलें नाहीं. १७९२ च्या प्रतींत त्या समासाचें नांव सांगितलें आहे, परंतु त्या समासांत महाराजांचेंच वर्णन असल्याबद्दल या प्रतीचें निवेदन आहे. १७९२ च्या बखरीच्या लेखकानें हा समास लिहून संपेपर्यंत महाराजांना उभें ठेविलें आहे. तो समास पुरा केल्यावर स्वामींनीं त्यांच्याकडे आपली दृष्टि वळविली व शिवबास बसण्याची अनुज्ञा दिली, अशी कल्पना १७९२ च्या प्रतींत आहे. ‘ अबदुल्या नामक यवन चढाई करून आला होता, त्या संकटांतून कसा पार पडलास ? ’ असा प्रश्न १७९२ मधील प्रतीच्या विधात्यानें समर्थांच्या तोंडीं घातला आहे. या प्रश्नाचें कृत्रिम रूप

'अब्रदुल्या नामक' या शब्दांमुळें उघडकीस आल्याशिवाय रहात नाहीं. अफझलखानाच्या स्वारीबद्दल बोलतांना स्वामींनीं महाराजांना त्या खानाचें नांव माहीत नसल्याप्रमाणें 'अब्रदुल्या नामक' हा शब्दप्रयोग करावा हें चमत्कारिक वाटतें. हा पूर्वींच्या बखर-प्रतींत घुसलेला अब्रदुल्या नव्या संशोधित प्रतींतून हाकलला गेला असला, तरी त्याला धरून रहाण्याची प्रवृत्ति मात्र अर्वाचीन समर्थभक्तांनीं सोडलेली नाहीं. उलट त्या प्रवृत्तीला 'शिवथरच्या घळींत म्हणजे सुंदरमठांत वीस-दशकी दा स बो ध समर्थांनीं पूर्ण केला,' असल्या नव्या निराधार कल्पनांची जोड या समर्थभक्तांनीं दिलेली आहे. सारांश, १८ व्या दशकाच्या ६ व्या समासाची रचना रामघळींतली, एवढेंच या नव्याजुन्या बखरींच्या तुलनेनें हातीं लागणारें तथ्य आहे. दा स बो धाच्या कालनिर्णयाला हें तथ्य निरुपयोगी असल्याचें निराळें सांगायला नको.

बखरीच्या लेखकानें दा स बो ध व शिवाजी महाराज यांचा संबंध आणखी एका ठिकाणीं आणलेला आहे. महाराज-स्वामींची पहिली भेट झाल्यावेळीं "राजाची धारणा पाहोन आत्मानात्मविचार थोडक्यांत सर्व समजावें म्हणौन सांगितला. तो समास तेरावे दशकांत सहावे समासीं लघुबोध सांगितला आहे ते सांगोन राजाची धारणा पाहोन बहुत मर्जी संतोष होऊन, मस्तकीं वरदहस्त ठेवून प्रसाद नारळ दिल्हा." (पान ५४–५५). येथें १३ व्या दशकांतील ६ व्या समासाचा विषय आहे. राजांना पहिल्या भेटींत उपदेश कसला केला, तर आत्मानात्मविचाराचा, स्वराज्यसाधनाचा नव्हे, हा बोध जिज्ञासूंच्या दृष्टींतून सुटण्यासारखा नाहीं. १३ व्या दशकाच्या हकीकतीनंतरची १८ व्या दशकाच्या ६ व्या समासाची माहिती आहे. अवतारसमाप्ति होण्यापूर्वींच्या मार्गशीर्ष महिन्यांत "कल्याण गोसावी दर्शनास आले. त्या समयीं ग्रंथ विसावा दशक समाप्त केला. तो दशक कल्याण गोसावी यांणीं लेहून, कांहीं दिवस राहून जाण्याची आज्ञा श्रीची जाहाली. आज्ञेप्रमाणें डोमगांवास गेले." बखरलेखकाच्या मतें शके १६०३ च्या मार्गशीर्षांत (१६८१, डिसेंबर) दासबोध संपूर्ण करण्यांत आला.

हनुमंतस्वामीचा समकालीन लेखक शिरगांव मठपति भीमस्वामी आपल्या भ क्त ली ला मृ ताच्या २० व्या अभंगांत शिरगांवीं मठ केल्यावर समर्थांना

कवित्व करण्याची आज्ञा देवाकडून झाल्याचें सांगतो. शिरगांवास दासबोधाचें लेखन कल्याणानें केलें.

> कल्याणस्वामीनीं लिहिला दासबोध ।
> संख्या हे प्रसिद्ध ऐका किती ॥ ५
> दिवसामाजीं सात शत ओव्या लिहाव्या ।
> स्वामीनीं पाहाव्या आनंदानें ॥ ६

दिवसाला ७०० ओव्या या हिशोबानें दासबोध साडे अकरा दिवसांत लिहून संपला.

उद्धवसुतकृत समर्थचरित्राच्या २७ व्या अध्यायांत सगळा दासबोध एका रात्रींत लिहिला गेला व त्या लेखनाच्या श्रमानें कल्याणाची दृष्टि गेली, समर्थांच्या कृपेनें कल्याणाच्या डोळ्यांची शक्ति पुनः ताबडतोब आली, अशी माहिती आहे.

संतविजयकार महीपती उद्धवसुताच्या काळांतला होता. शिवाजी महाराजांना एकदां अध्यात्मनिरूपण ऐकून समाधि लागली. समाधि दोन दिवसांनीं उतरली. हा प्रकार योग्य नव्हे असें जाणून समर्थांनीं राजाच्या कानीं अध्यात्मचर्चा न पडूं देण्याच्या इच्छेनें दासबोधलेखनास आरंभ केला, अशी माहिती सांगून, एका अहोरात्रांत दासबोध लिहावा लागल्यामुळें कल्याणाच्या डोळ्यांना दिसेनासें झालें, समर्थांनीं त्याच्या डोळ्यांवरून हात फिरवितांच कल्याणाचे डोळे सुधारले, वगैरे हकीकत उद्धवसुताप्रमाणेंच महीपतीनें आपल्या समर्थचरित्रांत गोविली आहे (अ. १४). दासबोधांतून राजनीतीचे सात समास निराळे काढून शिवाजी महाराजांस दिल्याची कथा संतविजयांत जास्त आहे.

समर्थप्रतापकार गिरिधरानें दासबोध सज्जनगडावर लिहिला, असें लिहिलें आहे. 'मार्तंड भैरव यात्रा करूनी । समर्थ सज्जन पर्वता पातले' (४०) नंतर संतसज्जन गुरुपदीं सादर झाल्यामुळें इहपरलोकाचीं विवरणें सुरू झालीं तेव्हां 'अध्यात्मयोग विस्तारिती भले । श्रीदासबोधग्रंथार्थें' (४१) अशी माहिती (स. ८) देऊन मग सगळ्या दासबोधाचा मथितार्थ गिरिधरानें निवेदन केला आहे. अर्वाचीन समर्थभक्तांच्या अत्यंत विश्वासू चरित्रकाराची ही अशी दशा पहायला सांपडते.

बखरीच्या काळांतला लेखक एकेहळ्ळीचा आत्मारामस्वामी यानें आपल्या दा स- वि श्रा म धा मांत (पान ४८३-४८४) दा स बो धलेखनाची माहिती देतांना पुष्कळशा आख्यायिकांना खोटें ठरविलें आहे. राजा फार दुश्चीत झाला तेव्हां त्याकरितां ग्रंथ लिहिला, एका रात्रींत तो लिहून काढल्यानें कल्याणाचे डोळे मंदले, राजालयीं लिहिला, शिरगांवीं लिहिला, चाफळ मठाच्या देवघरांत लिहिला, दा स बो धापासून समर्थांच्या ग्रंथरचनेला आरंभ झाला, दा स बो ध पूर्ण केल्यावर २० वर्षांनीं समर्थांचा अवतार संपला, या साऱ्या गप्पा, त्यांमध्यें सत्यांश मुळींच नाहीं, असा अभिप्राय देऊन आत्मारामस्वामीनें विश्वसनीय म्हणून जी माहिती सांगितली आहे ती अशी: 'कल्याणाला बरोबर घेऊन स्वामी अरण्यांत गेले. रमणीय स्थानीं विसावा घेऊन समर्थांनीं दा स बो ध सांगावा आणि कल्याणानें लिहून काढावा. याप्रमाणें एकांतवासांत ग्रंथरचना झाली. डोळ्याचे पातें पात्यास न लागूं देतां ८०० ते १००० पर्यंत ओव्या प्रति दिवशीं लिहिल्या जात होत्या. एकदां मेरु पर्वताचें वर्णन चालू असतां समर्थ अदृश्य झाले. वर्णनांत चूक राहूं नये म्हणून ते प्रत्यक्ष पर्वत पहाण्याकरितां अदृश्य झाले होते. असें पुष्कळदां घडलें. लिहावयाला सांगावें किंवा ध्यानस्थ बसावें, असाहि प्रकार मधून मधून चाले. केव्हां केव्हां समर्थ दा स बो धाहून निराळी कवितासुद्धां कल्याणाकरवीं लिहवीत असत. आठ दशकांपर्यंत ग्रंथ लिहिल्यावर समर्थ चाफळास आले. नंतर त्या गांवीं येऊन जाऊन ग्रंथाचें काम पुढें चालविलें.' किती दिवस व केव्हां चालविलें याची दाद आत्माराम-स्वामीला नाहीं. दासबोधलेखनानें कल्याणाचे डोळे गेले ही कथा दा स वि श्रा म-धा मकारानें नाकारली असली तरी इतर ग्रंथ लिहिण्यांच्या श्रमातिरेकानें ते एकदां गेले, असें त्यानें अन्यत्र लिहून ठेवलें आहे (पान ८४५).

दा स बो धरचनेचा हा वृत्तांत ध्यानीं घेऊन कालगणना करूं लागल्यास ज्ञान-दशकाइतका दा स बो ध दिवसास ८०० ओव्यांच्या हिशेबानें उण्यापुऱ्या पांच दिवसांत संपला असा निर्णय करावा लागतो. १००० ओव्या दिवसाला धरल्यास साडेतीन दिवसांतच आठ दशकी दा स बो ध संपला असें मानण्याची पाळी येते. अरण्यांत रमणीय स्थळीं विश्रांति घ्यावी, ग्रंथ सांगावा, मध्येंच गुप्त किंवा ध्यानस्थ व्हावें, या व्यवहाराकडे पाहिल्यास जास्तींत जास्त अवघे पांच दिवस हा

कालावधी अत्यल्प वाटतो. महिन्या दोन महिन्यांच्या मुदतीला तो व्यवहार शोभला असता. परंतु एवढ्यावर आत्मारामस्वामीनें दासबोधरचनेचें कथानक आटपलेलें नाहीं. दासबोध लिहून झाल्यावर एकदां चांदण्या रात्रीं समुदायापुढें दासबोधांतील वैराग्याचें प्रकरण वाचलें गेलें. कल्याण वाचीत होता. समर्थ 'विमलार्थ' सांगत होते. त्या प्रवचनाचा समुदायावर विलक्षण परिणाम घडला (पान ४८६).

**गुरुवरदें सकळा बिंबलें रहस्य । उठोन श्रवणांतीं चलिले दास ।**
**समुदाव चालिला लागोन पाठीस । संसारहव्यास न स्मरे त्या ॥ १०५**
**विसरलेती पगडी शाल तरवार । पायतन भूषण अंगवस्त्र ।**
**मान अभिमान वहन संसार । त्यागोन विदेही जालेती ॥ १०६**
**बागडे अवघे वर्णी गोसाई । देखोनि फिरले समर्थ निस्पृही ।**
**नवल मानोन बोलिले जीवीं । अपक्वदशा हे बरी नव्हे । १०७**

लोकांची ही स्थिति पाहून समर्थांनीं कल्याणाला तो वैराग्य-प्रकरणाचा भाग पाण्यांत बुडवून नाहींसा करावयाला सांगितलें. कल्याणानें तावडतोब आपलें काम बजावलें, पण दासबोधाचा अखंडपणा भंगल्याची त्याला हुरहूर लागली. तेव्हां प्रपंच, परमार्थ हे दोन्ही चालवावे, अशा अर्थाचा नवा समास लिहून कल्याणाची काळजी स्वामींनीं दूर केली.

एकच रात्र, एक अहोरात्र, तीन ते पांच दिवस, साडेअकरा दिवस असें दासबोधलेखनाचें कालमान जुन्या सांप्रदायिकांनीं निवेदन केलेलें आहे. शिरगांव, सज्जनगड, अरण्याचा एकांत व नंतर चांफळगांवास येतांजातां, याप्रमाणें दासबोधरचनेचीं भिन्न भिन्न स्थळें व तऱ्हा त्या सांप्रदायिकांच्या समर्थचरित्रांतून आलेलीं आहेत. नक्की शकवर्ष त्यांतील कोणताच लेखक सांगत नाहीं. दासबोधाची रचना बहुत काळ चालू असावी, शके १६०३ च्या मार्गशीर्षांत २० दशकांचा ग्रंथ पूर्ण करण्यांत आला अशी माहिती हनुमंत स्वामीच्या बखरींत व तंजावरकर भीमस्वामीच्या लेखनांत पहावयाला सांपडते. श्री. देवांनीं एकदां शके १५८१ मध्यें दासबोध पुरा झाला, असें लिहिल्यावर श्री समर्थ हृदयांत भीमस्वामीच्या मार्गशीर्ष शके १६०३ च्या माहितीचा आदर केला आहे (पान ३२२). भीमस्वामीच्या म्हणण्याला मान द्यावयाचा होता तर आधीं शिवथरच्या घळींत शके १५८१ मध्यें दासबोधाची

संपूर्ण उभारणी झाली, ह्या निराधार मनःपूताची आग्रहानें मांडणी करण्याची काय आवश्यकता होती? ही मांडणी १८२७ च्या प्रस्तावनेहून भिन्न असल्यामुळें प्रस्तावनेंत एकवाक्यता दिसण्यासाठीं जशी दुरुस्ती करावयास हवी होती, तशी श्री. देवांनीं केलेली नाहीं. श्री. देवांनीं कित्येकदां शक १६०० हें दा स बो धसमाप्तीचें वर्ष असेंहि लिहून ठेवलेलें आहे. सारांश जुन्या सांप्रदायिक चरित्रकारांच्या विविध कल्पनांमध्यें श्री. देवांनीं आपल्या कल्पनेची भर घालली एवढेंच म्हणतां येतें.

दा स बो धाच्या प्रस्तावनेंत श्री. देवांनीं लिहून ठेवलें आहे: 'दशक ८ पर्यंतच काय तो दा स बो ध ग्रंथ अशी एकवार श्रीसमर्थांची कल्पना असावी.' या कल्पनेचे एकूण जे तीन आधार दिले आहेत, त्यांपैकीं दुसऱ्या व तिसऱ्या आधाराचें खंडन श्री. देवांच्या श्री स म र्थ हृ द यांत आहे. सातव्या दशकाच्या अखेरीस 'सरली शब्दाची खटपट। आला ग्रंथाचा सेवट।' हे चरण आहेत. त्यावरून 'आणि खरोखरच आतां ज्ञानदशक सांगून (समर्थांना) ग्रंथ संपूर्ण करावयाचा होता,' असें श्री. देवांचें म्हणणें आहे (प्रस्तावना, पान १३२). शके १८२७ सालानंतर सातवा दशक हा दा स बो ध नांवाचा दहा समासांचा स्वतंत्र ग्रंथ होता, म्हणून 'आला ग्रंथाचा सेवट' असें समर्थांनीं म्हटल्याचें श्री. देवांच्या निदर्शनास आल्यामुळें सातव्या दशकाला आठवा ज्ञानदशक जोडून ग्रंथ समाप्त करण्यासंबंधाची समर्थांवर लादलेली कल्पना देवांना श्री स म र्थ हृ द यांत सोडून द्यावी लागली. नवव्या दशकाच्या ६ व्या समासांतील दुसऱ्या ओवींत दा स बो ध व ज्ञानदशक या दोन्हींचा उल्लेख आला आहे. त्याच्या अनुरोधानें ९ वा दशक दा स बो धाबाहेरचा असा निष्कर्ष निघतो. श्री. देवांनीं ८ व्या दशकाअखेर समर्थांच्या मूळ कल्पनेंतील दा स बो ध संपला हा आपला ग्रह मजबूत करण्यासाठीं ९ व्या दशकांतील पूर्वोक्त उल्लेखाचें प्रमाण पुढें केलें आहे. ७ वा दशक दा स बो ध या निष्पत्तीनें या ९ व्या दशकांतील दा स बो ध-निर्देशाच्या तिसऱ्या प्रमाणांत अवसान उरलेलें नाहीं. परंतु श्री. देवांनीं १८२७ तला ग्रह श्री स म र्थ हृ द य प्रसिद्ध केल्यानंतरच्या दा स बो धाच्या आवृत्तींत कायम ठेवला आहे, याचें नवल वाटल्याशिवाय रहात नाहीं.

आठ दशकांअखेरपर्यंतचा मूळ दा स बो ध या कल्पनेचें श्री. देवांनीं पुढें केलेलें पहिलें प्रमाण दुसऱ्या व तिसऱ्या प्रमाणासारखेंच बारीक तपासणी केल्यास भ्रामक

ठरतें. 'आठ दशकांच्या अखेरपर्यंत ग्रंथाचा प्रवाह एकसारखा चाललेला दिसतो. त्यांत कोठेंहि पुनरुक्ति नाहीं. अनेक वेळां पुनरुक्ति करण्यांत आली आहे ती आठव्या दशकानंतर. श्रीसमर्थांना मुख्यतः अध्यात्मनिरूपण करावयाचें होतें. अध्यात्माशिवाय आठ दशकांच्या अखेरपर्यंत दुसरा विषय नाहीं.' (प्रस्तावना, पान १३२). कै. पांगारकरांनीं श्री. देवांच्या मताचाच स्वतंत्रतेच्या डौलानें अनुवाद केला आहे. शके १५८१ मध्यें ७ दशक अधिक ८ वा दशक असा दासबोध सिद्ध झाला, असें श्री. देवांनीं म्हटलें, तर पांगारकर प्रतिपादतात कीं, शके १५८०-८१ मध्यें सात दशकी दासबोध तयार झाला व १५८१ मध्यें आठ दशकींची सिद्धता करण्यांत आली. प्रयाणापूर्वी शके १६०० मध्यें वीस दशकी दासबोध समर्थांनीं संपूर्ण केला. 'समर्थ शके १५७६-१५८६ पर्यंत बहुधा शिवथरच्या घळींत होते; तेथें सात दशकी दासबोधाची उभारणी झाली यांत शंका नाहीं' (पान ३११) असेंहि पांगारकरांचें आणखी एक मत आहे. पांगारकरांच्या वर्षांना उपलब्ध सांप्रदायिक व ऐतिहासिक साहित्यामध्यें मुळींच आधार नाहीं. 'आठ दशकांच्या अखेरपर्यंत ग्रंथाचा प्रवाह एकसारखा चाललेला दिसतो' वगैरे श्री. देवांच्या मतांचा अनुवाद पांगारकरांनीं शब्द बदलून केला आहे तो असा : 'त्यांत समासांचा व दशकांचाहि अन्वय आहे. विचारांची अत्रुटित सांखळी आहे.' यानंतर पांगारकरांनीं उडविलेल्या गोंधळाचाहि मासला पाहणें अवश्य आहे. शके १५७५ च्या सुमारास ज्ञानदशक समर्थांनीं लिहून ठेवला होता, असें सांगणारा लेखक चार पांच ओळी कागदावर उतरल्यानंतर म्हणतो : 'यावरून (चवथ्या, पांचव्या दशकांत ज्ञानदशकाचे उल्लेख सांपडतात म्हणून) वीस दशकीनंतर व सप्तदशकीपूर्वी मध्यंच हा ज्ञानदशक केव्हां तरी समर्थांनीं स्वतंत्रपणें लिहिला होता हें उघड दिसतें.' हें वाक्य लिहितांना 'ब्रह्मानंदीं लागली टाळी' या अवस्थेंत पांगारकर असावे. १५७५ हें एकट्या (आठव्या) ज्ञान दशकाचें वर्ष, १५८१ हें आठ दशकी दासबोधाचें वर्ष, १६०० हें वीस दशकीचें वर्ष, अशीं वर्षें त्यांनींच लिहिलेलीं असल्यानें, शके १६०० नंतर शके १५७५ मध्यें ज्ञानदशकाची रचना झाली, हें विलक्षण कोडें कोणत्याहि सामान्य बुद्धीच्या माणसाला सुटणारें नाहीं. या कोड्याचा चमत्कार एकाच पानांतला आहे (पान ३०९, मराठी वाङ्मयाचा इतिहास : रामदास खंड).

आतां 'आठ दशकाच्या अखेरपर्यंत ग्रंथाचा प्रवाह एकसारखा चाललेला आहे. त्यांत कोठेंहि पुनरुक्ति नाहीं,' किंवा 'त्यांत समासांचा व दशकांचाहि अन्वय आहे, विचारांची अत्रुटित सांखळी आहे,' या देव-पांगारकरांच्या एकगोत्री विधानांचा भ्रामकपणा उघडकीस आणावयाला हरकत नाहीं. एकसारखा प्रवाह, पुनरुक्तीचा अभाव किंवा दशक-समासांचा अन्वय व विचारांची अत्रुटित सांखळी या कल्पनांच्या विरुद्ध जाणारी पहिली वस्तुस्थिति एकवीस समासींतून भरतीस घेतलेल्या समासांची आहे. प्रवाह जेव्हां अडतोसें वाटलें तेव्हां एकवीस समासींतल्या समासांची मदत घेऊन तो चालू केला, हें सहज समजणारें आहे. दा स बो धाच्या ३ ऱ्या दशकाच्या शेवटीं एकवीस समासीचा सहावा समास आहे. तर पांचव्या दशकाचे दुसरा व तिसरा हे दोन समास एकवीस समासींतील चवथा व पांचवा असे आहेत. सहाव्या दशकाच्या १० व्या समासांत एकवीस समासीच्या एकविसाव्या समासांतील १९ ओव्या – त्याहि क्रमानें नव्हेत तर क्रम सोडून – जोडलेल्या आहेत. त्या समासाच्या १६ व्या ओवीपासून एकवीस समासीच्या ओव्यांना प्रारंभ होतो. १६,१७,१८ या ओव्या एकवीस समासीच्या एकविसाव्या समासांतून ३३, ३४, ३६ याप्रमाणें घेतलेल्या आहेत. पुढें पुनः दा स बो धांतील २३ वी ओवी दुसरीकडे ३७ वी ओवी आहे. नंतर २४ ते २७ ओव्या सोडून २८ वी ओवी जुनी ३९ वी आहे. २९ व ३० या ओव्या सोडल्यावर ३१, ३२, ३३, ३५ या ओव्या एकवीस समासीच्या ४०, ४१, ४२, ५४ याप्रमाणें आहेत. मध्यें ३४ वी ओवी बदललेली नाहीं. ३६ पासून ४५ पर्यंत क्रम न सोडतां ५५ ते ६४ ओव्या एकवीस समासीच्या आहेत. नव्याजुन्यापैकीं कांहीं ओव्या सोडणें हें एकसारख्या प्रवाहाचें लक्षण खास म्हणतां येणार नाहीं. एकवीस समासीची जी प्रत कल्याणस्वामींच्या संग्रहीं होती, तिच्यांत इतरांच्या संग्रहांतील एकवीस समासीच्या प्रतींत न सांपडणारे चार निराळे समास आहेत. दा स बो धाकरितां ज्यांची उसनवारी समर्थांनीं केली असें समजतात, तेच समास कल्याणस्वामींच्या प्रतींत, म्हणजे डोमगांवच्या पोथ्यांत, नाहींत. श्री स म र्थां चीं ल घु का व्यें – द्वितीय खंड या पुस्तकांत श्री. देवांनीं ते एकवीस समासीच्या परिशिष्ट-रूपानें छापले आहेत. पण कौतुक हें कीं, दा स बो धांतील ६ व्या दशकाच्या १० व्या समासामध्यें सदर परिशिष्टाच्या एका ( चौथ्या ) समासांतून १२ ते १९ अशा ८ ओव्या दा स-

बोधाच्या वरील समासांत ५० ते ५७ याप्रमाणें आलेल्या आहेत. ही आंकडेवारी कंटाळवाणी वाटली तरी अभ्यासाच्या दृष्टीनें असलेलें तिचें महत्त्व नाकबूल करतां येण्यासारखें नाहीं. जुन्या ओव्यांची क्रमरहित निवड ग्रंथप्रवाहाच्या अस्खलितपणाला बाधक असल्याचें निराळें सांगावयाला नको. श्री. देवांनीं ६ व्या दशकाच्या दहाव्या समासांतील ही स्थिति साफ नजरेआड टाकली आहे. संप्रदायाच्या साहित्याचे साक्षेपी संशोधक अशा श्री. देवांचें जिकडे दुर्लक्ष झालें तिकडे पांगारकरांचें लक्ष जाईल अशी त्यांच्यासंबंधानें कुणाचीच अपेक्षा नसल्यानें त्यांच्याविषयीं जास्त लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

एकट्या ६ व्या दशकाच्या १० व्या समासांत घालमेल झाली असें नसून पुढें सातव्या आणि आठव्या दशकांत डोमगांवच्या एकवीस समासींतील कित्येक ओव्या शिरलेल्या दृष्टीस पडतात. ७ व्या दशकाच्या १० व्या समासांत देहान्ताचा विषय असून मरण कुठें व केव्हां आल्यास इष्ट किंवा अनिष्ट या प्रश्नाच्या विवेचनांत एकवीस समासीच्या डोमगांव प्रतीच्या चौथ्या समासांतून ३५ ते ४० इतक्या ओव्या दासबोधाच्या वरील समासांत ९ ते १३ व १६ याप्रमाणें घेतलेल्या आहेत. ८ व्या दशकाच्या ८ व्या समासांत १९–२० या ओव्या एकवीस समासीच्या अंतिम समासांतील ५२–५३ या ओव्या होत. समासांतील ओवीओवीचा, समासासमासाचा किंवा निरूपणास घेतलेल्या विषयाच्या अंगोपांगांचा परस्परसंबंध तर्काच्या कसोटीनें तावूनसुलाखून पारखूं लागल्यास 'एकसारखा प्रवाह, अत्रुटित सांखळी' इत्यादि अभिप्राय अतिशयोक्तीचे ठरतात.

एकाच समासांत पुनरुक्तीचीच नव्हे तर विषयान्तराची ठेंच अभ्यासकांना लागते, अशीं उदाहरणें दाखल केल्यास पुनरुक्तीचें आणि एकसारख्या प्रवाहाचें विधान किती भाबडें आहे, याचा नीट परिचय होईल. 'रजोगुणलक्षणनाम' समासांत (२ : ५)

**असो ऐसा रजोगुण । लोभें दावी जन्ममरण ।**
**प्रपंची तो सबळ जाण । दारुण दुःख भोगवी ॥ २४**

या ओवीनें रजोगुणाचें विवेचन संपवून त्यांतून सुटण्याचा उपाय म्हणून समर्थांनी भगवद्भक्तीचा महिमा ३५–३९ या पांच ओव्यांत गाइला आहे. तमोगुण, कुविद्या

या विषयांच्या विवेचनाचा शेवट भगवद्भक्तीच्या गौरवानें केलेला नसल्यामुळें २ : ५ मधील भक्तिमहिमा खटकल्याशिवाय रहात नाहीं. पण एवढ्यानें अडचण भागत नाहीं. २ : ५ ची ३९ वी ओवी लिहून झाल्यावर

**ऐसा सबळ रजोगुण । संक्षेपें केलें कथन ।**
**आतां शुद्ध तो तूं जाण । परमार्थिक ॥ ४०**

याप्रमाणें पुनः रजोगुणलक्षणांच्या समारोपाची भाषा आलेली आहे. यावरून साहजिकच तर्क करावा लागतो कीं, भगवद्भक्तीच्या पांच ओव्या विषयान्तराच्या आहेत. त्या घालून टाकल्यावर समर्थांनीं पुनः रजोगुणाचें सूत्र हातीं घेतलें. तें घेतांना त्यांच्या मनांतून सत्त्वगुणाकडे आधीं वळावयाचें होतें, अशी खूण

**त्याचे वोळखीचें चिन्ह । सत्त्वगुणीं असे जाण ।**
**तो रजोगुण परिपूर्ण । भजनमूळ ॥ ४१**

या ओवींतील सत्त्वगुणाच्या उल्लेखांत दिसून येते. परंतु ही खूण सोडून

**ऐसा रजोगुण वोलिला । श्रोतीं मनें अनुमानिला ।**
**आतां पुढें परिसिला । पाहिजे तमोगुण ॥ ४२**

अशा रीतीनें समर्थ तमोगुणाच्या विवेचनाकडे वळले आहेत.

येथें आठ दशकांपर्यंतच 'एकसारख्या प्रवाहाचा' विचार करावयाचा असल्यामुळें ८ व्या दशकाच्या पहिल्या समासांतील एक अडचणीची जागा निदर्शनास आणावीशी वाटते. या समासाची

**येथें आशंका उठिली । ते पुढिलिये समासीं फिटली ।**
**आतां वृत्ती सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ २५**

ही ओवी समासाचा शेवट सुचविणारी आहे. येथें जी आशंका उद्भवली त्या आशंकेचे शब्द समर्थांनीं दुसऱ्या समासाच्या प्रारंभीं 'निरावेवीं कैसें जालें । चराचर ॥' याप्रमाणें स्वीकारून आशंकानिरसनाला प्रारंभ केला आहे. हा दुसरा समास वरील २५ व्या ओवीपुढें यावयाला हवा ही अभ्यासकांची अपेक्षा

**पैस अवकाश आकाश । कांहींच नाहीं जें भकास ।**
**तये निर्मळीं वायोस । जन्म जाला ॥ २६**

या ओवीनें भंग पावते आणि मनांत आल्याशिवाय रहात नाहीं कीं, सदर ओवीनें ज्याचा प्रारंभ केला असा एखादा स्वतंत्र निराळा समास समर्थांनीं येथें पहिल्या समासांत २५ व्या ओवीनंतर जोडलेला आहे. अशा तऱ्हेचीं उदाहरणें दासबोधांतून आणखी काढून दाखविणें शक्य आहे.

समासांतल्या अन्वयाचें, सुसंबद्धतेचें स्वरूप कसें आहे तें थोडक्यांत मागें दाखविलें. एखाद्या दशकाच्या नांवानें जो विषय सुचविला जात असेल तोच विषय त्या दशकाच्या समासांतून भरलेला आढळतो, अशा समजुतीनें दशक व त्याचे समास यांचा मेळ पाहूं लागल्यास ही समजूत खरी नसल्याचा अनुभव येतो. प्रत्येक दशकाचे कांहीं समास एकमेकांच्या संगतीचे आढळतात व कांहीं समास दशकाच्या भरतीसाठीं घेतलेले आहेत असें दृष्टीस पडतें. पहिल्या आठ दशकांपैकीं कोणताहि दशक, त्याचें नांव जमेस धरून, समासवारीनें तपासल्यास वरील विधानाची यथार्थता पटण्याला हरकत नाहीं. उदाहरणादाखल पांचवा दशक पहावा. याचें नांव 'मंत्राचा' दशक असें आहे. परंतु मंत्राचा समास चवथा आहे. पहिल्या समासांत ब्राह्मणांची महती व त्याहून सद्गुरूची श्रेष्ठता, असे दोन विषय असून, एकवीस समासींतून घेतलेल्या पुढच्या दोन समासांत गुरु, सद्गुरु, शिष्य, असच्छिष्य यांचा विचार आहे आणि मग 'उपदेश' या नांवानें मंत्राची विविधता वर्णिलेली आहे. नंतर सामान्य ज्ञानाचें व आत्मज्ञानाचें विवेचन संपवून बद्ध, मुमुक्षु, साधक, सिद्ध यांच्या माहितीनें दशक संपविला आहे. दशकाला नांव मात्र 'मंत्राचा' असें दिलें आहे. एखाद्या समासांतील प्रमुख वाटणाऱ्या विषयाला मनांत धरून त्याच्या आगेमागें जे विषय कांहींशा अनुकूलतेनें बसवितां येतील, त्याचे समास जोडण्यांत आले, असें अनेक दशकांच्या संबंधांत म्हणतां येतें. ११ व्या दशकाला 'भीम' हें मारुतीचें नांव एकादश रुद्राच्या कल्पनेस अनुसरून योजलें असल्याचें सहज ध्यानांत येईल. दशक व त्याचे समास यांसारखाच प्रकार दशकादशकांच्या अन्वयाचा आहे. पांगारकरांनीं दिलेल्या अभिप्रायाचें तथ्य तपासून झालें. आठ दशकाअखेरपर्यंतच्या ग्रंथांत 'कोठेंहि पुनरावृत्ति नाहीं' या श्री. देवांच्या मताचें परीक्षण यापुढें करावयाचें आहे. श्री. देवांनीं हें मत श्रीसमर्थहृदयांत उच्चारलेलें नाहीं, यामुळें तत्संबंधीं त्यांना विश्वास उरला नसावा, असें वाटतें. परंतु दासबोधाच्या प्रस्तावनेंत तें कायम असल्यामुळें ह्याचा विचार करणें प्राप्त आहे.

दा स बो धाच्या पहिल्या आठ दशकांत विचार, कल्पना, विशिष्ट शब्दसमूह यांप्रमाणें अनेक प्रकारांची पुनरुक्ति आहे व तसें घडणें अगदीं स्वाभाविक आहे. समर्थांनीं आपल्या शिकवणीचीं कांहीं ठळक तत्त्वें आपल्या मनाशीं निश्चित ठरवून निरनिराळ्या वेळीं स्वतंत्रपणें त्यांच्या विवेचनाचे प्रबंध लिहिले. या तत्त्वांपैकीं कित्येक तत्त्वें इतरांहून सर्वस्वीं भिन्न नसल्यामुळें त्यांचें स्पष्टीकरण आपली मर्यादा सोडून दुसऱ्या समान अंश असलेल्या तत्त्वांच्या स्पष्टीकरणाशीं एकरूप व्हावें, हें सरळच आहे. अशा संमिश्र विषयांच्या निरूपणांत पुनरुक्ति झालेली आहे. लेखकांचा किंवा उपदेशकांचा आणखी एक विशेष लक्षांत घेतल्यास पुनरुक्तीचा उलगडा होऊं शकतो. प्रत्येक लेखकाच्या भाषाशैलीमध्यें कित्येक ठराविक लकबी असतात; कित्येक आवडते शब्दसमुदाय किंवा वाक्यप्रयोग असतात. त्यांच्या योगानें पुनरुक्ति घडते. दा स बो धाच्या पहिल्या आठ दशकांतील पुनरुक्तीचें मूळ समर्थांच्या लेखनशैलीनें स्वीकारलेल्या नित्य सवयींतील भाषेच्या गुणधर्मांत जिज्ञासूला दिसून येईल. वस्तुतः समर्थांच्या पुनरुक्तीचा विचार करण्याचें कारण नव्हतें. परंतु पहिल्या आठ दशकांत 'कोठेंहि पुनरुक्ति नाहीं,' या श्री. देवांच्या अतिव्यापक सिद्धांतवाक्यामुळें त्यांचा विचार करण्याचा प्रसंग उत्पन्न झाला आहे.

'पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण' (१ : १ : २२) हें प्रसिद्ध वाक्य 'समूळ ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण' असें एकाच शब्दाच्या फरकानें पुनः २ : १० : ८ येथें आलें आहे. हें उदाहरण दा स बो धाच्या दोन निराळ्या विभागांत दिसणाऱ्या पुनरुक्तीचें आहे. परंतु एकाच समासांत थोड्याशा अंतरानें आलेल्या पुनरुक्तीचें उदाहरण दिल्यास हा मुद्दा जास्त स्पष्ट होईल. हें उदाहरण पांचव्या दशकांतील दुसऱ्या समासाचें आहे. या समासाच्या प्रारंभीं मातागुरु, पितागुरु, कुलगुरु, विद्यागुरु, मंत्रगुरु, यातिगुरु इत्यादि अनेकविध गुरूंचें वर्णन असून फिरून शेवटीं त्यांचा निर्देश आहे. तिसऱ्या दशकाच्या १० व्या समासांत २५ व्या ओवीपासून पुढच्या उपदेशांत नरदेह व आयुष्य हीं सार्थकीं लावण्यासंबंधाचीं वचनें आहेत. नुसत्या नरदेहाला कांहींच किंमत नाहीं. नरदेहाच्या सजीवतेचा इहलोकीं खरा उपयोग असून या सजीवतेलाच आयुष्य असें म्हणतात. यामुळें नरदेह सार्थकीं लावणें किंवा आयुष्य सार्थकीं लावणें या दोन्हींचा

अर्थ एकच ठरतो. म्हणूनच 'आयुष्य हेचि रत्नपेटी,' असें २७ व्या ओवींत म्हटल्यावर ३३ व्या ओवींत 'नरदेहपेटी' हा शब्द वापरला आहे. पहिल्या ओवींतील 'आयुष्याच्या रत्नपेटींत गोमटीं भजनरत्नें' सांठविलेलीं असल्याची कल्पना दुसऱ्या ओवींत 'नरदेहपेटी फावली तर ईश्वराचें सांनिध्य जोडावें,' अशा रीतीनें आणलेली आहे. नरदेहाच्या सदुपयोगाचें विवरण पहिल्या दशकाच्या १० व्या समासांत असतां पुनः तोच विषय तिसऱ्या दशकाच्या १० व्या समासांत यावा ही विषयाची पुनरुक्ति तर आहेच, परंतु त्याच्या अनुषंगानें झालेली कल्पनेची पुनरुक्तिदेखील लक्षांत ठेवण्यासारखी आहे. पहिल्या स्थळीं 'या नरदेहाचेनि संमंधें। बहुत पावले उत्तम पदें।' (१९) असें म्हटलें आहे, तर दुसऱ्या जागीं 'या नरदेहाचेनि संगतीं। बहुत पावले उत्तम गती।' (३७) याप्रमाणें त्या कल्पनेचा अर्थ निराळ्या शब्दांत मांडला आहे. विषयाच्या पुनरुक्तीचें आणखी एक उदाहरण सिद्धाच्या वर्णनाचें आहे (५ : १० व ८ : ९). देवस्थान व देवाचें वैभव यांच्या वर्णनाची माहिती मागें आलेली आहे. तथापि त्या वर्णनांतील कल्पनांची व शब्दसमूहाची पुनः एकदां वाच्यता केल्याशिवाय पुनरुक्तीचा विषय पक्का व्हावयाचा नाहीं.

तीर्थस्थानीं अग्रहारें अर्पावीं; वापी, सरोवरें, देवालयें, शिखरें बांधावीं; देवद्वारीं पायऱ्या, दीपमाळा, वृंदावनें, पिंपळाचे पार, अशा वस्तू निर्माव्या; संध्यामठ, भुयारें, नदीवर घाट, देवद्वारीं भांडारगृहें अशीं ठिकाणें अस्तित्वांत आणावीं; देवस्थानीं वाद्यें, भूषणें, भोजनपात्रें, यांच्या बाबतींत उणीव राहूं देऊं नये; बागबगीचे लावावे इत्यादि विचार सत्त्वगुणाच्या प्रकरणांत (२ : ७) आलेले आहेत. ते जसेच्या तसेच पण थोड्याशा विस्तारानें व निराळ्या क्रमानें चौथ्या दशकाच्या ५ व्या आणि ७ व्या समासांत प्रगटले आहेत. दास्य व अर्चन भक्तीचे ते समास होत. दास्य तेंच अर्चन असें ठरवून समर्थांनीं त्या भक्तीचीं व सत्त्वगुणाचीं कर्तव्यें सारखींच हें दाखविलें आहे. देवस्थानाच्या स्थिर वैभवांत भुयारें, विवरें, धर्मशाळा, विहिरी, तलाव, पिंपळाचे पार, नदीचे घाट, बागबगीचे इत्यादि गोष्टी मोडतात. जंगम वैभवांत शिबिका, छत्रें, सुखासनें, माही मेघडंब्रे, सूर्यापानें, दिंड्या, पताका, निशाणें, नानाविध वाद्यें इत्यादि पदार्थांचा समावेश होतो. दासबोधाचे २ : ७, ४ : ५ व ४ : ७ हे समास परस्परांशीं ताडून पाहिल्यावर त्यांतील पुनरुक्ती-

विषयीं संदेह रहाणार नाहीं. दुसऱ्या दशकांत मूर्ख, रजोगुणी, तमोगुणी, कुविद्य, पढतमूर्ख, या वर्गांतील माणसांच्या स्वभावाचीं लक्षणें सांगतांना तींच तींच लक्षणें शब्दांतरांनीं दाखल केलीं आहेत. पांचव्या दशकाच्या ३ ऱ्या समासांतील असच्छिष्य आणि ७ व्यांतील बद्ध यांची वरील वर्गांशीं तुलना केल्यास पुनरुक्ति वाटण्याजोगीं साम्यस्थळें किती तरी सांपडतील. दुसऱ्या दशकाच्या ४ थ्या समासाचें नांव आहे 'भक्तिनिरूपण'; यामुळें बद्धाचे अवगुण तेथें आढळतील, असें सहसा मनांत येत नाहीं. परंतु तेथें, 'ते जीतचि प्रेतासमान' असा ज्यांच्याविषयीं समर्थांनीं उद्गार काढला, त्यांचें वर्णन आधीं १५ ते २५ ओव्यांत केलेलें आहे. त्याचा एक बद्धाच्या वर्णनाशीं जुळणारा लहानसा अंश मासल्यादाखल सादर करण्याला हरकत नाहीं. 'दया नाहीं करुणा नाहीं। आर्जव नाहीं मित्री नाहीं। शांति नाहीं क्षमा नाहीं। या नाव बद्ध ॥' (५ : ७ : १९) असा बद्धाचा स्वभाव सांगितला आहे. 'भक्तिनिरूपणा'तील 'शांती नाहीं क्षमा नाहीं। दीक्षा नाहीं मीत्री नाहीं।' या २१ व्या ओवीच्या पहिल्या दोन चरणांचें त्यांत सादृश्य आहे.

'समासांचा व दशकांचा अन्वय' असल्याच्या पांगारकरी विधानाची चांचपणी करूं लागल्यास दुसऱ्या दशकाच्या आरंभींच एक ठेंच लागते. दुसऱ्या दशकाचा पहिला समास मूर्ख-लक्षणांचा आहे. त्या समासाच्या ओवींत 'येक मूर्ख, येक पढतमूर्ख' अशी वर्गवारी करून 'पढतमूर्खांचें लक्षण। पुढिले समासीं निरूपण।' असें पांचव्या ओवींत आश्वासन आहे. त्यावरून 'पुढिले समासीं' म्हणजे दुसऱ्या समासांत पढतमूर्खांचीं लक्षणें सांगितलीं जाणार, असा अर्थ मनांत येतो. सामान्यपणें समर्थ जेव्हां 'पुढिले समासीं' हे शब्द वापरतात तेव्हां चालू समासाच्या पुढचा समास त्यांना विवक्षित असल्याचा अनुभव येतो. परंतु या समासाच्या शेवटीं ते ५ व्या ओवींतील आश्वासन विसरले व शेवटच्या ७४ व्या ओवींत त्यांनीं 'उत्तम लक्षणां'चा निर्देश केला आहे. शेवटीं १० व्या समासांत त्यांनीं पढतमूर्खांच्या लक्षणांचा पाढा वाचला आहे. पहिल्याच्या 'पुढिले समासीं' म्हणजे दुसऱ्या नव्हे तर १० व्या समासीं, या प्रकाराला समासांचा अन्वय ठरविणें शक्य नाहीं. दुसऱ्या दशकांत तिसऱ्या समासानंतर आलेलें चौथ्या समासांतलें भक्तीचें निरूपण सुसंगत नाहीं. पहिल्यांदा मूर्ख, नंतर उत्तम,

पुढें कुविद्येचीं माणसें आलीं, तेव्हां साहजिकच मनांत येतें कीं, त्यांच्यामागोमाग सद्विद्येच्या पुरुषांचें वर्णन क्रमप्राप्त आहे. पण भक्तिनिरूपण दिसल्यामुळें त्यांत अन्वय नाहीं, असें वाटणें स्वाभाविक आहे. भक्तिनिरूपणामागून राजस-तामस-सात्त्विकांची व्यवस्था लावण्यांत आली. त्यानंतर सद्विद्येच्या लोकांचा विषय घेतला आहे. यालाहि समासांचा अन्वय समजणें कठिण आहे. कारण मूर्ख, उत्तम या सुरुवातीच्या क्रमानें उद्भवणाऱ्या अपेक्षेचा त्यामुळें भंग झाल्याशिवाय रहात नाहीं. तिसऱ्या दशकाचा दहावा समास एकवीस समासींतील ६ वा समास असून त्याच्या शेवटीं मूळचे 'पुढिले समासीं' हे शब्द तसेच दासबोधांत आल्यामुळें श्री. देवांनासुद्धां शंका आली. वास्तविक 'पुढिले समासीं'च्या ऐवजीं 'पुढिले दशकीं' असे शब्द लिहिले जावयास हवे होते. एकवीस समासींतील पांचवा समास दासबोधाच्या पांचव्या दशकांत तिसरा समास या नात्यानें घेतांना १०४ थ्या ओवींतील 'आतां उपदेशाचें लक्षण। सांगिजेल ॥' या मजकुरास अनुसरून चौथ्या समासांत उपदेशाच्या बहुविधतेचें वर्णन आहे. असा सावधपणा तिसऱ्या दशकाची एकवीस समासांतील ६ व्या समासानें पूर्तता करतांना राहिलेला नाहीं, म्हणून श्री. देवांना शंका आली. शंका येण्यासारखें आणखी एक स्थळ सहाव्या दशकाच्या ६ व्या समासाच्या शेवटीं आहे. सृष्टी मिथ्या हें समजलें–'परी हें अवघें नाथिलें। तरी दिसतें कां ॥' (५७)–या प्रश्नाचें उत्तर 'पुढिले समासीं' (५९) असें अभिवचन असूनसुद्धां सातव्या समासांत नाहीं, तर आठव्या समासांत आहे. मधल्या समासांत 'सगुणभजन' हें विचारलेल्या प्रश्नाला सोडून निराळेंच प्रकरण आहे. त्याच्या शेवटीं मागच्या समासांतील प्रश्न वक्त्याला स्मरतो आणि वक्ता ८ व्याच्या पहिल्याच ओवींत 'दृश्य मिथ्या तरी कां दिसतें। याचें उत्तर बोलिजेल' असें बजावून मग उत्तराचा प्रपंच करतो. ६ व्या समासाच्या शेवटीं सगुणभजनाच्या पुरस्कारार्थ 'एवं सृष्टी मिथ्या जाण। जाणोनि रक्षावे सगुण।' (६०) ही ओवी संदर्भ पाहिल्यास मुद्दाम नवी तयार करून घातल्याचा निश्चित बोध होणें कठिण नाहीं. ती ओवी ७ व्या समासाच्या शेवटीं अधिक जुळणारी आहे.

दासबोधाच्या ८ दशकांच्या रचनेविषयीं प्रचलित असलेल्या मताचें निरीक्षण केल्यावर त्या मतांहून निराळे असे कांहीं टोकताळे सांपडत असल्यास ते

जिज्ञासूंच्या दृष्टीसमोर ठेवणें अवश्य आहे. यासंबंधांत पहिली गोष्ट जी लक्षांत येते ती ही कीं, समर्थांनीं वीस दशकी दा स बो धाची संपूर्ण योजना आपल्या मनाशीं आगाऊ ठरवून त्याची रचना आरंभली, असें निश्चितपणें मानण्याला दा स बो धांत आधार नाहीं व तसें कोणी मानीतहि नाहीं. नवव्या दशकापासून पुढचा सारा भाग निरनिराळ्या वेळीं प्रसंगानुसार लिहून ठेवलेल्या किंवा लिहाव्या लागलेल्या समासांची संगति पाहून एकत्र केला, याविषयीं दुमत नसल्यामुळें येथें केवळ आधींच्या आठ दशकांचा विचार पुरेसा आहे. आठवा दशक चौथ्या व पांचव्या दशकांच्या १० व्या समासापूर्वीं तयार होता, हें सिद्ध असल्यामुळें त्याकडे लक्ष देण्याचें तूर्त कारण नाहीं. सातव्या दशकाला हाच न्याय लागू करतां येतो. वीस दशक व १९९ समासांची सांखळी जुळल्यावर प्रस्तावना आणि विषयपरिचय असें ज्याविषयीं म्हणतां येतें तो अगदीं सुरुवातीचा समास लिहिला असणें संभवतें, यांतदेखील दुमत होण्यासारखें कांहीं नाहीं. शेवटच्या समासांतील ३० ते ३७ या ओव्या उपसंहारादाखल मागून लिहिल्या गेल्या असें सहज लक्षांत येणारें आहे. त्यापूर्वींच्या ओव्यांतून ग्रंथसमाप्तीच्या खुणा आहेत, परंतु बारकाईनें पाहिल्यास

**भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें ।**
**समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध ॥ ३०**

ही ओवी कांहींशी अकल्पितपणें पुढें येते व नंतर दशकसंख्या, फलश्रुति आणि ग्रंथकर्तृत्वाच्या अभिमानाचें निरसन, असे विषय अत्यंत संक्षेपानें सांगितलेले दृष्टीस पडतात.

शिष्यसंप्रदाय वाढून आपले शिष्य ठिकठिकाणीं स्वतंत्रपणें राहूं लागल्यावर आपल्या शिकवणीचें स्वरूप शक्य तेवढें जास्तींत जास्त व स्पष्ट दिसेल असा ग्रंथ लिहिण्याची आवश्यकता समर्थांना वाटणें स्वाभाविक आहे. वारकऱ्यांपाशीं ज्ञा ने श्व री व ए क ना थी भा ग व त असे दोन ग्रंथ होते; या ग्रंथांतील मतांचे नामदेवांच्या मुखांतून निघालेले अभग त्या संप्रदायामध्यें होते. समर्थांना आपल्या संप्रदायाकरितां तशा तऱ्हेचें वाङ्मय निर्माण करणें वारकऱ्यांचा दाखला पाहतां भाग होतें. समर्थांच्या अंगीं आपलें ज्ञान व त्याच्या योगानें हृदयांत उठणारे विचाराचे तरंग वाङ्मयरूपानें चिरंजीव करून सोडण्याचें बळ होतें. म्हणून त्यांनीं भक्तिपंथाला

अपरिहार्य असणारा एकेक विषय तारतम्यानें निवडून त्याचें स्पष्टीकरण आरंभलें. परमार्थाचें महत्त्व गळीं उतरण्यासाठीं अगोदर माणसाला आपला दैनंदिन वर्तनक्रम किती सदोष आहे याची जाणीव करून देणें अवश्य व इष्ट, म्हणून त्यांनीं मूर्खांची झडती घेतली. ही झडती योग्य प्रकारें शेवटास जाण्याकरितां समर्थांनीं गणेश, शारदा, सद्गुरु, उपास्य दैवत यांचें प्रारंभीं नमनस्मरण केलें आहे. मूर्खांच्या जातीला बरींच नांवें वेदान्तानें ठेवलेलीं आहेत. कुविद्य, रजोगुणी, तमोगुणी, पढतमूर्ख, करंटा, टोणपा, दुश्चित, हीं नांवें भिन्न दिसलीं तरी मुळांत हे सर्व वर्ग एकाच जातीचे, असें समर्थांनीं दाखवून दिलेलें आहे. या वर्गांतील माणसाचा जीवनव्यापार सामान्यतः कसा असतो हें नीट उलगडण्यासाठीं तिसऱ्या दशकाच्या पांच समासांत एका माणसाच्या सबंध आयुष्याचा तपशीलवार आराखडा मांडलेला आहे. मनुष्याच्या आयुष्यांत ओढवणारीं संकटें तीन प्रकारचीं असल्याचें वेदान्त सांगतो. एका माणसाला या साऱ्या संकटांचा अनुभव आपल्या आयुष्यांत घेतां येणारा नसल्यानें तापत्रयांचें निरूपण समर्थांनीं केलें. सर्वांत मोठें दुःख मृत्यूचें हें ओळखून त्याच्या वर्णनाची तापत्रय-निरूपणाशीं सांगड घातली; तरी दशकाची भरती होत नाहीं, असें पाहून जुन्या एकवीस समासींतील ६ वा समास मदतीला घेतला. त्यांत संसार, भक्ति, नरदेह, अनर्थकारक ममत्व, इत्यादिकांचा साकल्यानें थोडक्यांत परामर्श आहे. नंतर भगवद्भजन म्हणजे काय, भजनाचा व्यवहार कसा करावयाचा असे प्रश्न उपस्थित झाल्यामुळें समर्थ नवविधा भक्तीच्या विवरणाकडे वळले. हा विषय नवा म्हणून पुनः त्यांनीं गणेश-शारदेला नमन अर्पून तो दशक लिहिला आहे. भक्तीच्या नऊ प्रकारांमुळें नऊ समास भरले व भक्तीचें फळ मुक्ति याचा बोध होण्याकरितां तिच्या चतुर्विधत्वाच्या विवरणानें हा दशक निर्विघ्न पूर्ण झाला.

पांचव्या दशकाची स्थिति निराळी आहे. त्याला प्रारंभीं नमन आहे व तें एकट्या सद्गुरूला आहे. कारण या दशकांत परमार्थाचें तत्त्वज्ञान आणि तें शिकणें-शिकविणें याचें निदर्शन आहे. या दशकांत ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व, सद्गुरूची आवश्यकता, सद्गुरूचीं आणि शिष्य-कुशिष्यांचीं लक्षणें, नानाविध देवदेवता, त्यांचे मंत्रतंत्र, संप्रदाय यांची माहिती आधींच्या पांच समासांमध्यें सांगून आत्म-

ज्ञानाच्या स्पष्टीकरणाला समर्थांनीं सहाव्या समासांत प्रारंभ केला आहे. या दशकाच्या उभारणींत एकवीस समासींतील दोन समासांचा समावेश आहे; आणि सहाव्या समासांतील आत्मज्ञानाच्या अंतरंगांत शिरल्यास तोसुद्धां केव्हां तरी स्वतंत्र लिहून ठेवला होता असा प्रत्यय आल्याशिवाय रहात नाहीं. दशकाच्या संपादणी-करितां आणखी चार समासांची गरज होती. ती गरज ६ व्या समासाच्या शेवटीं एका ओवींत निराळ्या संदर्भानें व अर्थानें आलेल्या 'बद्ध' शब्दाचा संदर्भ धरून समर्थांनीं भागविली आहे. सिद्धावस्थेस पोंचलेल्या पुरुषानें साधन सोडूं नये, आपण सिद्ध आहों, या जाणिवेचा गर्व चढल्यास सिद्धाचा अधःपात होतो, याकरितां त्यानें व्यवहाराची शिस्त कसोशीनें पाळली पाहिजे, असें समर्थांच्या उपदेशाचें एक निश्चित अंग आहे. त्यास अनुसरून

**साधन न मने जयाला । तो सिद्धपणें बद्ध जाला ।**
**त्याहून मुमुक्ष भला । ज्ञानाधिकारी ॥ ७३**

येथें सिद्धाची बद्धावस्था व मूळचा बद्ध यांमध्यें अर्थदृष्ट्या अंतर असूनहि शिष्यानें बद्ध, मुमुक्षु, साधक, सिद्ध यांची ओळख पटविणारीं लक्षणें सांगण्याबद्दल प्रश्न केला व पुढील चार समासांचे विषय सांपडून त्या दशकाची पूर्तता झाली. सहावा समास स्वयंपूर्ण आहे. बद्धावस्थेचा किंवा बंधनाच्या प्रश्नाचा निर्णय आधींच्या ओव्यांतून लावलेला आहे. तथापि बद्धमुक्तांच्या माहितीचे समास जोडून घेण्याच्या सोयीकरितां समासाच्या शेवटीं त्यासंबंधाचा प्रश्न उत्पन्न केला आहे. हे चार समास केव्हां तरी स्वतंत्र होते याची साक्ष त्यांचा प्रारंभ ज्या पद्धतीनें केला आहे त्या पद्धतींत आहे. मागल्या समासांतील श्रोत्याचा प्रश्न प्रथम सांगून मग त्याचें उत्तर देण्याच्या दा स बो धांतील सामान्य प्रघाताकडे कानाडोळा होऊं न दिल्यास या समासाचा प्रारंभ त्याचा स्वतंत्रपणा पटविणारा असल्याबद्दल शंका रहात नाहीं. 'चराचर सृष्टींत जीवांची अपार दाटी आहे, पण त्यांचे चार विभाग बोलले जातात. बद्ध, मुमुक्षु, साधक आणि सिद्ध अशीं त्या विभागांचीं नांवें आहेत. या चौघांविरहित सगळ्या चराचरांत कोणीहि पांचवा नाहीं. आतां हे सर्व विशद करूं.' ही प्रस्तावना स्वतंत्र रचनेची दर्शक आहे. सिद्धाच्या वर्णनाला ज्ञानदशकां-तील सिद्ध-लक्षणाच्या समासाचा अडथळा उद्भवला. तो दशक आधींच लिहिलेला

व संप्रदायांत प्रसिद्धि पावलेला होता, यासाठीं त्याचा हवाला देऊन सिद्धाचें वर्णन समर्थांनीं आटोपलें.

या विवेचनाचा रोंख कळण्याला अवघड नाहीं. ज्या समासाला नमन असेल तो स्वतंत्र समजावा. नमन हें स्वतंत्र निराळ्या लेखनाचें चिन्ह आहे. या चिन्हाच्या आधारानें सातव्या दशकाचा स्वतंत्रपणा ठरविण्यांत आला आहे. संस्कृत व मराठी भाषासंबंधांतील संस्कृताभिमानी पंडितांच्या विषम वृत्तीचा जेथें उल्लेख असेल तेथें स्वतंत्र रचना आहे, असें मानावें. अशी रचना उपदेशकानें नव्यानेंच आपलें कार्य आरंभल्याची साक्ष होय. ७ व्या दशकाच्या पहिल्या समासांत संस्कृत-मराठीच्या द्वैताचा विषय आलेला आहे. तसाच तो ५ व्या दशकाच्या ६ व्या समासांत दिसतो (ओ.३३, ३४). पहिल्या दशकांतील प्रास्ताविक प्रकरणांत या भाषाविरोधाला समर्थांनीं मुळींच स्थान दिलेलें नाहीं. संस्कृत-मराठीच्या झगड्याकडे दृष्टिक्षेप हें उपदेशकाच्या लेखनारंभाचें लक्षण मानलें तर वीसदशकी दासबोधासाठीं पहिल्या दशकांतील बरींच नमनें लिहिलीं गेलीं असा तर्क करतां येतो. बरींच म्हणण्याचें कारण त्या दशकाच्या ६ व्या समासाच्या शेवटीं 'दासानुदास' असा शब्द आहे. या समासांत विषय श्रोत्यांचा आहे. 'दासानुदास' हा विनयातिशयाचा शब्द पाहून अनुमान करवतें कीं, कवित्वाच्या सुरुवातीला हें वंदन लिहून ठेवलेलें असावें. 'रामदास', 'दास' नांवाची खूण ज्या समासांत दिसेल तो समास एकदां स्वतंत्र लिहून ठेवला असें गृहीत धरावयाला प्रत्यवाय नाहीं. 'दासानुदास', 'रामदास' व 'दास' यांत श्रोत्यांची भीड कमी होऊन समर्थांचा आत्मविश्वास वाढत गेल्याचे टप्पे आहेत. 'दासानुदासा'-चा समास मागें सांगितला. ८ व्या दशकाच्या ९ व्या, १२ व्याच्या ४ थ्या आणि १६ व्याच्या पहिल्या याप्रमाणें तीन समासांत 'रामदास' शब्द आहे. 'दास' हा एकूण सहा समासांत आहे ( ११ : ६ व ७, १२ : ३ व ४, १३ : ५, १६ : १०, १८ : ३). १२ : ३ च्या शेवटीं 'पतित पावनाचे दास' असें आहे. १३ : ५ ची एक मौज येथें नोंदून ठेवण्यासारखी आहे. या समासाच्या २० व्या ओवींत 'दास म्हणे जग्गोधार। तेचि करिती' असा 'दास' शब्दाचा संकेत आहे. एकंदर विवेचन पाहिल्यास प्रथम लिहिला त्या वेळीं तो समास वीसच ओव्यांचा होता, परंतु दासबोधांत त्याची वर्णी लावतांना पुढें जो समास जोडला, त्यांतील

आशयाची ओळख करून देण्यासाठीं आणखी पांच ओव्या लिहून काढल्या, हा निष्कर्ष टाळतां येत नाहीं. हा समास एका लहानशा कूटस्वरूप वेदान्ती कहाणीचा आहे. 'आमची कहाणी सरो । तुमचे अंतरीं भरो ॥' ही कहाणी चुकत माकत जशी आठवली तशी संकलित रीतीनें बोलून टाकली; उणेंअधिक तिच्यांत असेल तर श्रोत्यांनीं क्षमा करावी; या मजकुरानंतर विवेकपूर्वक ही कहाणी जे ऐकतील, तेच जगाचा उद्धार करतील, असें समर्थांचें २० व्या ओवींत आश्वासन आहे. जेव्हां समास स्वतंत्र होता तेव्हां त्याच्यापुढील ओव्यांची आवश्यकता नव्हती. दा स- बो धाच्या रचनाकाळीं तशी आवश्यकता उत्पन्न झाली, हें स्पष्ट आहे.

अगदीं वर वर पाहिलें तरी समर्थांच्या ज्ञानार्जनांत श्री म द्भ ग व द्गी ता या ग्रंथाचें वर्चस्व इतर सर्व ग्रंथांहून अधिक असल्याचें कुणालाहि सहज दिसणारें आहे. श्री म द्भ ग व द्गी ता, भा ग व त पुराण (त्यांतल्या त्यांत सदर पुराणाचा एकादश स्कंध) आणि वा सि ष्ठ सा र (यो ग वा सि ष्ठाची संक्षिप्त आवृत्ति) या तीन ग्रंथांचा— निराळ्या नांवांनीं सांगावयाचें तर ज्ञा ने श्व री, ए क ना थी भा ग व त आणि मोगरीकर रंगनाथाची यो ग वा सि ष्ठा वरील टीका—यांचा प्रभाव म्हणतां येईल. एकनाथ व रंगनाथ हे समर्थांच्या अगोदर थोडींच वर्षें होऊन गेलेले, समर्थांच्या जन्मस्थानाला व पुरश्चरणस्थानाला जवळचे; यामुळें समर्थांच्या ज्ञानार्जनकाळीं या दोघांचे ग्रंथ समर्थांच्या दृष्टीखालून जावे व त्यांतील विचारांचा पगडा समर्थांच्या बुद्धीवर बसावा हें स्वाभाविक आहे. एकनाथ-समर्थांविषयींची एक आख्यायिका हा विषय उलगडून दाखविण्याला उपयोगी पडणारी आहे. इ. स. १६०८ मध्यें समर्थ जन्मास आले व इ. स. १५९९ मध्यें एकनाथांचा अवतार संपला. दोघांच्या जन्म-मृत्यूमध्यें ९ वर्षांचें अंतर आहे. तरीसुद्धां आख्यायिका आहे कीं, समर्थांना शैशवावस्थेंत (एक वर्षाचे असतां) त्यांच्या वडिलांनीं एकनाथांच्या दर्शनास नेलें. बालकाकडे पाहून हें बालक माझें कार्य पुढें चालवील, असा एकनाथांच्या हृदयांत विश्वास बाणला व त्यांनीं आपली जीवनयात्रा इ. स. १६०९ मध्यें संपविली. या आख्यायिकेला वस्तुस्थिति ठरवून कोणी अर्वाचीन समर्थभक्त समर्थांच्या शिशु-देहावर एकनाथांची आशापूर्ण कृपादृष्टि फिरली, असें श्रद्धेच्या आग्रहानें सांगणारे भेटतात. एकनाथांच्या व समर्थांच्या वाङ्मयांतील आणि कार्यांतील एकरूपतेच्या

बहुतांशाकडे लक्ष वेधलेल्या मर्मज्ञ सांप्रदायिकांमध्यें या एकरूपतेवरून एकनाथ-समर्थांच्या भेटीची कथा निर्माण झाली असावी, हा संभव विचारांत घेतल्यास, एकनाथांच्या वाङ्मयाची छाप समर्थांच्या वाङ्मयांत कां दिसावी, याची निराळी मीमांसा करायला नको. ज्ञानेश्वर, एकनाथ, रंगनाथ यांच्या जोडीनें गीतार्णवकार दासोपंत यांच्या वाङ्मयाचा निर्देश करायला पाहिजे. सुदैवानें दासोपंत व समर्थ यांच्या वाङ्मयदृष्ट्या दिसणाऱ्या सादृश्याबद्दल अर्वाचीन समर्थभक्तांमध्यें दुमत नाहीं.

दासबोधाच्या पहिल्या समासामध्यें आपल्या उपदेशाचा आधार म्हणून ज्या ग्रंथांचीं नांवें दाखल केलीं आहेत, त्यांत शिवगीता, रामगीता, गुरुगीता, गर्भगीता, उत्तरगीता, अवधूतगीता, भगवद्गीता, ब्रह्मगीता, हंसगीता, पांडवगीता, गणेशगीता, यमगीता अशा बारा गीता आणि वेद, वेदान्त, उपनिषदें, तसेंच भागवत ( पुराण ) इतक्या साहित्याचा उल्लेख आहे ( ओ. १८–१९). ७ व्या दशकाच्या ७ व्या समासांत कोणत्या गीता कुणाच्या याबद्दल लहानसा खुलासा आढळतो तो असा : शंकरानें पार्वतीला जो अद्वैतज्ञानाचा उपदेश केला ती गुरुगीता (या गीतेचा उल्लेख दासबोधांत ६ : ६ आणि ७ : १० मध्यें आला आहे). गोरक्षीला प्राप्त झाली तीं अवधूतगीता. विष्णूनें राजहंसाचें रूप धारण करून ब्रह्मदेवाला ऐकविलेल्या उपदेशाला हंसगीता म्हणतात. ब्रह्मदेवानें नारदाला चतुःश्लोकी भागवत निवेदन केलें. कृष्णानें अर्जुनाला सांगितली ती सप्तश्लोकी गीता (ही गीता बृहत्स्तोत्ररत्नाकरांतील क्रमांक १६९ वें प्रकरण आहे.).

भागवत पुराणाच्या द्वितीय स्कंधाच्या ९ व्या अध्यायांत चतुःश्लोकी भागवत आहे. तृतीय स्कंधांतील कपिल-देवहूति संवादाचा कांहीं भाग सृष्टिनिर्माणाच्या विवेचनांत आला आहे. सातव्या स्कंधांत नवविधा भक्तीचा श्लोक आहे. अकराव्या स्कंधांतील ११ व्या अध्यायाचा पहिला श्लोक बद्धमुक्तांच्या माहितीसाठीं जसाच्या तसा घेतला आहे (७ : ६). याच स्कंधाच्या दुसऱ्या अध्यायांतील २१ वा श्लोक —‘ कविर्हरिरन्तरिक्षः ’—नऊ नारायणांच्या नामावळीचा — दासबोधाच्या ७ : ६ समासांत दाखल केलेला आहे. ८ व्या दशकाच्या ७ व्या समासांत भागवतामधील ‘ नृदेहमाद्यं — ’ हा विसाव्या अध्यायाचा १७ वा श्लोक पहायला सांपडतो. हे सगळे

संदर्भ एकत्र करून पाहिल्यास स्थूलमानानें ठरवितां येतें कीं, समर्थांनीं हा सगळा स्कंध दृष्टीखालून घातलेला होता. पां ड व गी तेंतील एक परमभागवतांच्या स्मरणाचा पहिला – 'प्रल्हाद-नारद-पराशर-पुंडलिक –' हा – श्लोक ६ : ६ मध्यें दृष्टीस पडतो. गु रु गी ता व शि व गी ता या दोन्ही गीता शंकरानें उपदेशिल्या आहेत. गु रु गी ता पार्वतीनें ऐकली व शि व गी ता रामानें श्रवण केली. ज्या गीतांचे श्लोक दा स बो धांत उतरून घेतलेले नाहींत, त्या गीतांमधील विचार मूळ ग्रंथांतील वचनसादृश्याच्या आधारें ओळखून काढण्याखेरीज गत्यंतर नाहीं. अशा रीतीनें तपासणी केल्यास मानसपूजेची कल्पना समर्थांनीं ग णे श गी तेंतून घेतल्याचें दिसतें. दक्षिणउत्तर अयनांतील मरणाचे नियम ब्रह्मज्ञ पुरुषांना लागू नसल्याचा निर्णय शि व गी ते च्या आधारें समर्थांनीं केल्याचें आढळतें (दास. ७ : १०). या संबंधांतील बऱ्याच ओव्या जुन्या दा स बो धाच्या कल्याणप्रतीमधून वीस दशकी दा स बो धांत घेतलेल्या आहेत.

दा स बो धांत इतरत्र समर्थांनीं ज्यांचा वारंवार उच्चार केलेला आहे ते ग्रंथ गी ता, भा ग व त, वा सि ष्ठ सा र (यो ग वा सि ष्ठा ची अतिसंक्षिप्त आवृत्ति) हे होत. त्यांतल्या त्यांत गी तेचीं वचनें विशेष आधिक्यानें पहायला सांपडतात. कुविद्येच्या विवेचनांत (२ : ३) 'दंभो दर्पोऽभिमानश्च' (गीता १६ : ४) हा सगळा श्लोक घेतला आहे. 'ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्थाः–' हा गीतेचा (१४ : १८) सगळा श्लोक रजोगुणाच्या वर्णनांत (२ : ५) आरंभीं दिला आहे. दशक ४ समास ८ मध्यें 'ये यथा मां प्रपद्यन्ते' (गीता ४ : ११) हा श्लोक आहे. यज्ञकर्त्यांना स्वर्ग लाभतो, परंतु पुण्याई संपल्यावर त्यांना पुनः खालीं मर्त्यलोकीं उतरावें लागतें, या गी तार्थाची (९ : २१)

**सुकृत आहे तो भोगिती। सुकृत सरतांच ढकलून देती॥ ४ : १०२६**

या ओवींत छाया आहे. दशक ६ समास ६ मध्यें 'जीवभूतः सनातनः' (१५ : ७), 'अश्वत्थः सर्ववृक्षाणां' ( १० : २६), 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि' हा संपूर्ण श्लोक (२ : २३), इंद्रियाणां मनश्चास्मि (१० : २२) याप्रमाणें गी तावचनें घेऊन समर्थांनीं श्रोत्या-वक्त्यांचा वाद मार्मिकपणानें निकालांत काढला आहे. जीवरूपानें ईश्वर सृष्टीमध्यें भरलेला असतां सृष्टि मिथ्या मानावयाची म्हणजे देवावर खोटेपणाचा आरोप करावयाचा, ही धृष्टता सहन कशी व्हावी, असा श्रोत्यानें आक्षेप काढला. यावर वक्त्यानें उत्तर केलें, 'देवानें गी तेंत म्हटलें आहे कीं, सर्व वृक्षांत

अश्वत्थ वृक्ष म्हणजे मी. पण वृक्ष तुटतो, अर्थात् देवावर तुटण्याफुटण्याचा प्रसंग आला. पण शस्त्रें तोडीत नाहींत, अग्नि जाळीत नाहीं, पाणी भिजवीत नाहीं, वारा सुकवीत नाहीं, असें आपलें स्वरूप असल्याचें देवानें गीतेमध्यें निक्षून सांगितलें आहे. या स्वरूपाशीं अश्वत्थाच्या स्थितीचा मेळ कसा बसणार?

**पिंपळ तुटे शस्त्रानें। पिंपळ जळे पावकानें।**
**पिंपळ कालवे उदकानें। नाशिवंत ॥ २१**
**तुटे जळे बुडे वुडे। आतां ऐक्य कैसें घडे।**
**म्हणोनि हें उजेडे। सद्गुरुमुखें ॥ २२**

असलीं कोडीं सोडविण्याकरितांच सद्गुरु हवा. इंद्रियांतील मन हें आपलें रूप असल्याचें देवानें म्हटलें आहे—

**'इंद्रियाणां मनश्चास्मि'। कृष्ण म्हणे मन तो मी।**
**तरि कां आवरावी उर्मी। चंचळ मनाची ॥ २३**
**ऐसें कृष्ण कां बोलिला। साधनमार्ग दाखविला।**
**खडे मांडूनि सिकविला। वोनामा जेवी ॥ २४**

गीतेंतील ठिकठिकाणचीं वचनें वाच्यार्थानें पत्करल्यास अनवस्था प्रसंग ओढवेल, त्यांमध्यें आढळणाऱ्या विसंगतींचा उपदेशग्राहकाच्या अधिकाराचें तारतम्य लक्षांत घेऊन निरास करतां येतो. ल्हान वयाच्या विद्यार्थ्याला खडे मांडून अक्षरओळख करून द्यावी लागते. कच्च्या बुद्धीकरितां कोणतें, पक्व बुद्धीकरितां कोणतें याचा विवेक संभाळला पाहिजे, असा येथें समर्थांच्या बुद्धिवादाचा निष्कर्ष आहे.

दासबोधांतील गीतेचा उपयोग पहावयाचा असल्यानें वरील संवादाच्या प्रसंगापुढें सरकणें अवश्य आहे. पूर्वींच्या दशक-समासांप्रमाणें पुढेंहि ७,८,९,१०,११ या दशकांतून कधीं साक्षात् वचनें घेऊन तर कधीं त्यांचा अर्थ देऊन समर्थांनीं आपल्या उपदेशांत गीतेचा प्रभाव असल्याचें उघडकीस आणलें आहे. ७ व्या दशकाच्या १ ल्या समासांत 'अध्यात्मविद्या विद्यानां' (१० : ३२) याखेरीज 'व्यवसायात्मिका बुद्धिः—' हा सगळा श्लोक (२ : ४१), तर दशक ८ समास १ मध्यें 'सहस्रामध्यें कोणी येक। पाहे देवाचा विवेक।' (१३) याप्रमाणें एका गीता-श्लोकाचा (७ : ३) भावार्थ सादर केला आहे. 'कार्यकारणकर्तृत्वे हेतुः

प्रकृतिरुच्यते ' (गी. १३ : २०) हा श्लोकार्ध ८ : ३ मध्यें घेतला आहे.

**देवास भजतां देवलोक । पित्रांस भजतां पित्रलोक ।**
**भूतांस भजतां भूतलोक । पाविजेतो ॥ १०**

ही ९ : १० मधील ओवी ' यांति देवव्रता देवान् पितृन्यान्ति पितृव्रताः । ' (९ : २५) या श्लोकाचें भाषांतर असल्याचें समजण्यास कठीण नाहीं. १० व्या दशकाच्या दोन समासांत (७ व १०) 'ददामि बुद्धियोगं–' हा श्लोकांश (१० : १०) आणि 'द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ' हा संपूर्ण श्लोक (१० : १६) असें गीतेचें ऋण दृष्टीस पडतें. ११ व्या दशकांत एकदां (११ : १) 'विद्याविनयसंपन्ने ' (५ : १८) हा सगळा श्लोक, तर एकदां 'यो यच्छ्रद्धः स एव सः ' (१७ : ३)– 'जो जयास भजेल । तो तद्रूप जाणावा ॥ ' (११ : २ : ३७) असे गीतेचे आधार आहेत. पंधराव्या दशकाच्या ७ व्या समासांत गीतेच्या १६ व्या अध्यायांतील दैवी-दानवी (आसुरी) संपत्तीचा उल्लेख आला आहे. आसुरी संपत्तीच्या वर्णनपर श्लोकावरच 'कुविद्ये'चीं लक्षणें आधारलेलीं असल्याचें मागें सांगितलेलें आहे.

**आपला आपण करी कुडावा । तो आपला मित्र जाणावा ।**
**आपला नाश करी तो समजावा । वैरी ऐसा ॥ ८**

या ओवींतील (१७ : ७) अर्थाचा शोध घेतल्यास गीतेच्या 'आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ' (६ : ५) या श्लोकाचें स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं. या श्लोकाचा पहिला चरण ८ : ७ मध्यें आलेला आहे.

समर्थांच्या स त स मा सी प्रकरणाच्या दुसऱ्या समासांत हं स गी तेचा उल्लेख (१६) असून पांचव्यांत गी ता–द्वितीयाध्यायांतील ६२-६३ श्लोकांचें समग्र भाषांतरच पहायला सांपडतें.

**संगाकरितां काम उठतो । कामाकरितां क्रोध येतो**
**क्रोधाकरितां झळंबतो । मोहो पुढें ॥ १४**
**मोहाकरितां विस्मरण । विस्मरणें बुधी क्षीण ।**
**बुधी नासतां पतन । पावला प्राणी ॥ १५**

गी ता, भा ग व त, वा सि ष्ठ सा र यांच्यांतील विचारभांडारावर समर्थांची मोठी भिस्त असल्याचें मागें सुचविलें. त्याची यथोचित पूर्तता होण्याकरितां दा स बो धाबाहेरचे

आणखी कांहीं दाखले नमूद करावेसे वाटतात. समर्थांच्या स्फुट किंवा संकीर्ण वाङ्मयांत ओव्यांचीं १४ शतकें आहेत. तेथें ओवी हा शब्द वापरला असला तरी ती अभंगरचना आहे. सदर ओव्यांच्या तिसऱ्या शतकांत एकदां भागवत व एकदां गीतासारनिरूपण याप्रमाणें उल्लेख आहे (ओव्या १२–१३). आटव्या शतकांत गुरुगीतेचें (१६) व स्फुट ओव्यांमध्यें (क्रमांक ४९) गीतेचें व गर्भगीतेचें स्मरण आहे. ओव्याशतकें संपल्यावर अनियमित संख्येच्या ओव्यांचा संग्रह असून त्यांवर क्रमांक आहेत (श्रीरामदासांची कविता–प्रथम खंड). स्फुट ओव्या क्रमांक २९६ मध्यें 'गीता भागवतीं उपदेश केला। अर्जुना दाविला देव कृष्णें ॥' अशी माहिती आहे. स्फुट ओव्यांनंतर स्फुट प्रकरणें आहेत. त्यांपैकीं क्रमांक १८ मध्यें (पान ३७८)

> **दोनी पुरुष ये लोकीं। क्षेराक्षेरची बोलिजे।**
> **क्षर तें सर्वही भूतें। साक्षी कूटस्त अक्षरु ॥ ३**
> **उत्तमु ईश तो अन्य। परमात्मा बोलिजे तया।**
> **नाम रूप नसे तेथें। निर्विकारी गुणातीतु ॥ ४**
> **छेदेना छेदितां शस्त्रें। जळेना पावकें कदा।**
> **उदकानें कालवेना तो। शोपेना वात लागतां ॥ ५**

याप्रमाणें गीतोक्त 'द्वाविमौ पुरुषौ लोके' (१५:१६–१७) आणि 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि' (२:२३) या भिन्न अध्यायांतील तीन श्लोकांची एकत्र सांगड घातलेली दृष्टीस पडते. श्रीरामदासकृत कविता भाग १ मध्यें चतुर्थमान या गीतोक्तीचा (१५:१) ओझरता अनुवाद आलेला आहे.

योगवासिष्ठांतील कल्पना दासबोधांत सांपडतात, त्याचें दिग्दर्शन केलें म्हणजे गीता, भागवत, वासिष्ठसार (किंवा सार) या तीन ग्रंथांचा अनेकदां समर्थ-वाङ्मयांत येणारा उल्लेख सार्थ असल्याचें दिसून देईल. दशक ८ समास ६ मध्यें 'किती दिवसांत मोक्ष मिळतो?' या प्रश्नाचें उत्तर देतांना, 'मोक्षप्राप्तीचा कालावधि शिष्याच्या बुद्धीवर अवलंबून आहे,' या वाक्यांतील शिष्यबुद्धीचा निर्देश 'शिष्य-प्रज्ञा' या शब्दानें करण्यांत आलेला आहे. योगवासिष्ठांत 'ज्ञतेस्तु कारणं शुद्धा शिष्यप्रज्ञैव केवलम्' असें वचन असून 'येथें शिष्यप्रज्ञाच केवळ। ४५' याप्रमाणें

त्या वचनाचें भाषान्तर समर्थांनीं दिलेलें आहे. गुरुसेवा किंवा सत्संगति, शास्त्राभ्यास आणि स्वानुभव किंवा आत्मप्रचीति यांच्या ऐक्यानें परमार्थ साधावा या कल्पनेची वाच्यता यो ग वा सि ष्ठां त प्रामुख्यानें असून समर्थांनीं तिचा स्वीकार केला आहे. दा स बो धा च्या तिसऱ्या दशकांतील स्वगुणपरीक्षेच्या कहाणींत मराठी यो ग- वा सि ष्ठा मधील कांहीं छटा उतरलेल्या आढळतात. आत्मा व देह यांच्या परस्पर-संबंधांतून उद्भवणाऱ्या घडामोडींच्या दा स बो धां तील विवेचनामागें यो ग वा सि ष्ठा चा आधार असल्याचें दाखविणें शक्य आहे. यो ग वा सि ष्ठां तील दोनतीन श्लोकहि दा स बो धां त उतरलेले आहेत.

# संमार्जन

**समर्थांच्या** ग्रंथरचनेला प्रदक्षणा घालीत असतां असें दिसून आलें कीं, त्या रचनेचा स्थळकाळ निश्चित करणें अशक्य आहे. फक्त एक समास शके १५८१ सालीं लिहिला गेला. त्याच्या आधारानें बाकीच्या रचनेविषयीं कांहींच निष्कर्ष काढतां येत नाहीं. म्हणून प्रदक्षिणा आटपून ग्रंथांतील विषयाकडे वळणें बरें. ग्रंथ-विषयाचा झाडा घेतांना दासबोधाची पहाणी विस्तारानें करणें योग्य ठरतें. दासबोध हा समर्थांचा मुख्य महत्त्वाचा लोकप्रिय ग्रंथ असून त्यामध्यें इतर सर्व ग्रंथांतील विवेचन एकवटलेलें आहे. त्याची माहिती सांगतांना अन्य ग्रंथांतील साहश्यें दाखविल्यानें त्या ग्रंथांचाहि परिचय जिज्ञासूंना घडेल.

## •१•

पहिला दशक स्तवनाचा आहे. त्याच्या **पहिल्या** समासांत (ग्रंथारंभ नाम) दासबोधांतील विषय व फलश्रुति यांचा समावेश आहे. दासबोध म्हणजे गुरुशिष्यांचा संवाद असून 'येथ बोलिला विशद। भक्तिमार्ग ॥ २' नवविधा भक्ति, ज्ञान, वैराग्याचें लक्षण, बहुधा अध्यात्मनिरूपण (३) यांची चर्चा असून भक्तीच्या योगानें मानवाला निश्चयानें देव पावेल, असा अभिप्राय या ग्रंथांत सांठविलेला आहे. भक्ति, शुद्ध ज्ञान, आत्मस्थिति, उपदेश, सायुज्यमुक्ति, मोक्षप्राप्ति, शुद्ध स्वरूप, विदेहस्थिति, अलिप्तपणा, मुख्य देव, भक्त, जीवशिव, ब्रह्म यासंबंधाचा निश्चय ग्रंथांत आढळेल, असें समर्थांचें आश्वासन आहे. उपासना, कवित्व, चातुर्य, मायोद्भव, पंचभूतें, कर्ता कोण, यांचीं लक्षणें, असे इतर विषय असून त्यासंबंधांत निघणाऱ्या शंका, किंतु, संशय यांचें निरसन आहे. वीस दशक दोनशें समास एवढ्या मोठ्या ग्रंथाची संपूर्ण तपशीलवार ओळख करून देणें शक्य नाहीं हें ध्यानांत घेऊन समर्थांनींच 'ग्रंथगर्भीं जें बोलिलें। तें अवघें चि अनुवादलें। न वचे किं कदा ॥ १३' अशी स्वतःची

सोडवणूक करून घेतली आहे. नंतर ज्यांचें साह्य प्रामुख्यानें घेतलें त्या ग्रंथांची यादी दिलेली आहे. ज्यांचा आधार घेतला तीं भगवंताचीं वाक्यें असल्यामुळें त्याबद्दल अविश्वास दाखवूं नये असें सुचवून समर्थांनीं मत्सरी दुरभिमानी टीकाकारांचा स्वभाव वर्णिला आहे. ग्रंथाच्या श्रवणानें 'क्रिया पालटे' व 'संशयाचें मूळ तुटे ॥ २८' इत्यादि लाभ घडतो. परंतु 'जयाचा भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा ॥ ३८' असा अगदीं शेवटीं इशारा देऊन ठेवण्याला समर्थ विसरले नाहींत.

फलश्रुति एकदां अवघी २८–३० या तीनच ओव्यांची होती व मागून ग्रंथ वाढल्यावर आठ ओव्या जोडण्यांत आल्या अशी एक कल्पना पूर्वी सांगितली गेली आहे (श्री स म र्थ हृ द य, पान ३२७); परंतु ती खरी समजण्याला पुरेशीं सबळ कारणें दिसत नाहींत. या कल्पनेला अनुसरून विचार केल्यास पहिल्या चार ओव्यांत दा स बो धाची विषयानुक्रमणिका संपली व पुढच्या आठ ओव्या मागून लिहिल्या असें मानावें लागेल.

**दुसऱ्या** समासांत गणेशस्तवन आहे. यांत वर्णिलेली गणेशाची मूर्ति समर्थांनीं शिवथरच्या घळींत जी स्थापना केली ती असल्याची एक कल्पना श्री स म र्थ हृ द यांत नमूद आहे (पान ३२०). गिरिधरानें स म र्थ प्र ता पा मध्यें त्या घळींत गणपतीची मूर्ति स्थापन केल्याची कथा देऊन तिचें जें वर्णन केलें आहे तेंच अंशतः समर्थांच्या स्तवनांत आढळतें, यावरून काढलेलें अनुमान टिकणारें नाहीं. समर्थांच्या लेखनांत भव्य उत्कटाचा मान विशेष असल्यामुळें त्यांनीं गणेशाच्या भव्य रूपाचें चित्र रेखाटावें यांत नवल नाहीं. समर्थांचा त्या घळींतील गणपति आज आपल्या जागीं शिल्लक नाहीं. गिरिधरानें समर्थांच्या वर्णनांतील शब्द उचलून आपलें वर्णन सजविण्याची शक्यता विसरणें योग्य नव्हे. समर्थांचीं सारीं गणेशवर्णनें दा स बो धांतल्याच थाटाचीं आहेत. 'वितंड रूप साजिरें । प्रचंड दंडलें बरें । धगधगीत सिंधुरें । गुणी समस्त किंकरें ॥ १' (श्री रा म दा सांची क वि ता, प्रथम खंड, पान ४४५), प द प दां त रें (पान ६ व ७), क रु णा ष्ट कें वगैरे (पान १००) यांतील गणेशवर्णनें दा स बो धांतील स्तवनाशीं ताडून पाहिल्यास त्यांतील साम्य लक्षांत येऊन समर्थांचा गणपति एकच, असा बोध घडतो. दा स-बो धांतील गणेशस्तवनांत 'फडके दोंदिचा फणीवर । धुधूकार टाकी ॥ १७'

असें म्हटलें आहे, त्याचा अनुवाद 'दोंदावरी धुधुकारती सर्प। १' याप्रमाणें पदपदांतरांत आलेला आहे.

**तिसरा** समास शारदास्तवनाचा आहे. समर्थांची शारदा ही विश्वजननी महामाया आहे (१). दासबोधांत अन्यत्र मायेचें खंडन असलें तरी येथें तिचें स्तवन आहे. मायेचें स्तवन सकृद्दर्शनीं विचित्र वाटतें. परंतु 'आत्माराम' प्रबंधाच्या दुसऱ्या समासांत मायेची समर्थांनीं वर्णिलेली महती पाहिल्यास शारदा-महामाया हें दासबोधांतील समीकरण आश्चर्याचें वाटणार नाहीं.

**चौथा** समास सद्गुरुस्तवनाचा आहे. सद्गुरुमहिमा अवर्णनीय असतांहि तो जिज्ञासूंना सांगायचें धाष्ट्र्य करतांना प्रथमच 'दुरूनि माझा नमस्कारु' अशी लीनता समर्थांनीं दर्शविली आहे. आपल्या मनोभावानुसार मनुष्य देवाचे गुण गातो, तोच प्रकार अवलंबावा हें श्रेयस्कर असें म्हणून समर्थांनीं वर्णनाला हात घातला आहे. सूर्य, परिस, गंगा, सागर, मेरु, पृथ्वी, आकाश, शेष यांची उपमा सद्गुरूला साजत नाहीं. सूर्य कांहीं काळ प्रकाश पुरवून मावळतो; परिस लोखंडाचें सोनें बनवितो, परंतु आपली योग्यता तो देऊं शकत नाहीं; गंगेंत मिसळलेला ओघ वेगळा करून दाखवितां येत नाहीं; समुद्र पहावा तर खारट पाण्यानें भरलेला; मेरु हा तर सांगून सवरून 'जड पाषाण कठोरु'; आकाशांत सगुणाचा दोष म्हणून त्याची उपमा टाकाऊ; पृथ्वींत धीरत्वाचा गुण असला तरी ती नश्वर आहे; शेष भारवाही; पाणी कालांतरानें आटणारें; सारांश, सद्गुरूच्या थोरवीला तोड नाहीं. हाच सिद्धांत अमृत, कल्पतरु, चिंतामणी, लक्ष्मी, हरिहरब्रह्मा, यांचीं वैगुण्यें दाखवून बळकट केला आहे.

संतस्तवन हा **पांचव्या** समासाचा विषय आहे. संत हे परमार्थाचें अधिष्ठान, ब्रह्माचें ज्ञान सुलभ करून देणारे म्हणून स्तुतीला योग्य. चंद्रसूर्यांच्या प्रकाशाचा ज्या संबंधांत उपयोग नाहीं, जेथें आक्षेप, यत्न, तर्क, विवेक, मनाची ओढ हीं सर्व लटपटतात, त्याची गांठ घालून देण्याचें बळ संतांच्या ठिकाणीं असतें. विश्रांति, तृप्ति, भक्ति, धर्म, पुण्य, समाधि, विवेक, सायुज्यमुक्ति या सर्वांना आश्रय संतांखेरीज दुसरा नाहीं, असा या समासाचा भावार्थ आहे.

**सहावा** समास श्रोत्यांच्या स्तुतीचा आहे. समर्थांचे श्रोते सद्गुरुसंतांच्या

योग्यतेचे आहेत. भक्त, ज्ञानी, विरक्त, योगी, गुणसंपन्न, सत्यवादी अशीं त्यांचीं श्रेष्ठ लक्षणें समर्थांनीं पहिल्याच ओवींत गोविलीं आहेत. त्या लक्षणांचें स्पष्टीकरण पुढच्या ओव्यांतून आहे. 'ज्यांचे दृष्टीखालून गेलें। ऐसें कांहीं च नाहीं उरलें। ९' किंवा 'जें जें कांहीं आठवावें। तें तें तयास पूर्वींच ठावें। १०' असा अनुभव असूनसुद्धां त्यांच्यापुढें आपल्या ज्ञानाची उजळणी करावीशी वाटते, कारण ते गुणग्राहक आहेत, 'म्हणौन बोलतां निःशंक। ११' असें समर्थांनीं म्हटलें आहे. 'माझीं वचनें प्राकृत (पराकृतें)' असलीं तरी तीं चवपालट होण्याला उपयोगीं पडतील, असा समर्थांचा विश्वास आहे. 'न्यून तें पूर्ण करावें' हा प्रीतीचा गुण श्रोत्यांच्या ठिकाणीं वसत असल्याचें समर्थांनीं मानलें आहे. शेवटीं 'दासानुदास' हा आपल्या ओळखीचा शब्द आहे म्हणून हा समास स्वतंत्रपणें केव्हां तरी लिहिला गेलेला, असा तर्क करण्याला हरकत नाहीं.

**सातवा** समास 'कवेश्वरस्तवना'चा आहे. हा समास लोकांच्या परिचयाचा असल्यामुळें त्याचा विस्तारानें उलगडा करण्याची आवश्यकता नाहीं. कवि म्हणजे ग्रंथकार. जगाचा उद्धार त्यांच्या योगानें घडतो, असें सांगून समर्थांनीं वाल्मीकि-व्यासादिकांचा निर्देश केला आहे. असे अनेक कवीश्वर झाले. पूर्वींच्या काव्यामुळें विद्वत्ता प्राप्त होऊन 'पंडिताआंगीं' योग्यता बाणली म्हणून जे होऊन गेले व जे पुढें होतील त्या सर्वांना समर्थांनीं नमन केलें आहे (२३–२५). पूर्व कवींचीं नांवें न घेतल्याबद्दल आक्षेप काढला जातो, या कल्पनेचें थोडेंसें उत्तर समर्थांच्या या खुलाशांत सांडेल.

**आठवा** समास 'सभास्तवना'चा आहे. समर्थांची सभा भगवद्भक्तांची असल्यानें भगवद्भक्तांचे भिन्न भिन्न प्रकार या सभावर्णनांत दाखविले जावे हें सरळच आहे. कलियुगांत कीर्तन वरिष्ठ मानलें गेलें असल्यामुळें तें जेथें घडत असेल 'ते सभा श्रेष्ठ' हा समर्थांचा अभिप्राय शेवटच्या ओवींत स्पष्ट आहे.

**नववा** समास 'परमार्थस्तवनाचा'चा आहे. परमार्थ म्हणजे रोकडा ब्रह्मसाक्षात्कार. तो सर्वत्र आहे पण प्रत्ययास येत नाहीं. 'आकाश मार्गीं गुप्त पंथ। जाणती योगिये समर्थ। ५' ही ओवी ज्ञानेश्वरींतील 'पैं योगिवृंदें वहिली। आडवी आकाशीं निघाली।' (६:१५४) या ओवीचें स्मरण करून देणारी आहे.

परमार्थाला तस्कराचें, राजाचें, श्वापदाचें किंवा अग्नीचें भय नाहीं (६–७). यांतील 'तयास नाहीं राजभये' या वचनांत समर्थांच्या कर्तृत्वाची साक्ष सांपडेल. देव-देवळांची उभारणी करून परमार्थाला राजभय नसल्याबद्दल समर्थांनीं स्वकालीन जनतेची खात्री पटविली. अरण्यांत वस्ती करून श्वापदादिकांचें भय परमार्थाला बाधत नसल्याचें लोकांना दाखवून दिलें. पुढील भागांत परमार्थाचें अधिक स्पष्टीकरण आहे. परमात्म्याशीं एकरूप होण्याच्या परमार्थाला आपलासा करून शरीराचें सार्थक करावें, पूर्वजांचा उद्धार करावा.

**दहावा** समास 'नरदेहस्तवना'चा आहे. एकंदर सगळें तत्त्वज्ञान मानवाकरितां अर्थात् नरदेहाच्या उन्नतीसाठीं असल्यामुळें नरदेह एरवीं कितीहि निंद्य वाटला तरी त्याची स्तुति करावी लागते. देहच नसेल तर कांहींच करणें शक्य नाहीं. देहाच्या साह्यानें तीर्थाटन, पुरश्चरण, नामस्मरण, जप, तप, योग इत्यादि कर्मं करतां येतात. योगबळानें सिद्धि स्वाधीन करून कोणी आकाशांत, तर कोणी तेजांत, पाण्यांत जातात. कित्येक वायुरूप होऊन अदृश्यत्व साधतात. 'येक भयानकावरी बैसती। येक अचेतनें चालविती' हे चांगदेव-ज्ञानेश्वरांचे चमत्कार समर्थांनीं प्रस्तुत विवेचनांत इतर चमत्कारांसमवेत दाखल केले आहेत. असलें सामर्थ्य पशुदेहांत नाहीं. नरदेहाचा आणखी एक विशेष म्हणजे तो स्वतंत्र आहे. बंधनांत रहाणाऱ्या गाईम्हशींसारख्या पशूंच्या दावणींत समर्थांनीं 'स्त्रिया दासी' (२६) यांना ढकललें आहे यावरून नरदेह म्हणजे पुरुषांचा देह अशी त्यांच्या मनांतील या शब्दाची मर्यादा समजते. नरदेह सर्वप्रकारें धड असेल तरच त्याचा उपयोग होतो. परमार्थ हा त्याचा खऱ्या उपयोगाचा मार्ग असून तो सोडण्यांत सर्वांना धन्यता वाटते. देह कामाला लावण्याऐवजीं त्याला जपणारांसाठीं घराचा दाखला समर्थांनीं घेतला. मनुष्य म्हणतो घर माझें; परंतु त्यावर माशा, पाली, मुंग्या, साप, विंचू, झुरळें, मांजरें, मुंगुसें, पिसा, ढेकूण वगैरे प्राणी जसा घर आपलें म्हणून हक्क गाजवितात, तसाच गुरेढोरें, दासदासी, पाहुणे, मित्र, चोर व प्रसंगीं राजाचे लोक आणि कधीं अग्नीदेखील, याप्रमाणें इतर अनेक त्यावर हक्क चालवितात. घरासारखीच देहाची अवस्था आहे. डोक्यांतल्या उवा, जखमेंतले कृमि, पोटांतले जंत, असे नानाविध सूक्ष्म प्राणी देहावर आपली सत्ता असल्याविषयीं शंका राहूं देत नाहींत. याखेरीज वाघ-लांडग्याच्या अथवा चोरांच्या तावडींत सांपडून देह गमा-

वण्याचा संभव असतो तो निराळाच. 'ऐसें शरीर बहुतांचें । मूर्ख म्हणे आमुचें। ६०' हा मूर्खपणा टाकून 'देह परमार्थी लाविलें । तरी च याचें सार्थक जालें । ६१' हें ध्यानांत वागवावें.

## • २ •

या दशकाला 'मूर्खलक्षण' असें नांव असलें तरी यांत केवळ मूर्खांचा बाजार नाहीं. मूर्खांतसुद्धां कांहीं प्रकार आहेत व ते उठून दिसण्याकरितांच कीं काय, समर्थांनीं त्यांच्या जोडीला उत्तम पुरुषांचे गुण सांगितले आहेत. पहिल्या समासांतील 'मूर्ख' हा सर्वत्र रोजच्या व्यवहारांत आढळणारा आत्मज्ञानरहित प्रापंचिक मनुष्य आहे. तिसऱ्या समासांतील 'कुविद्ये'चा पुरुष हा दुर्गुणांचा पुतळा असून त्याच्या खालचा मूर्ख सहाव्या समासांत 'तमोगुणी' या नांवानें वर्णिलेला आहे. चौथ्या समासाचें नांव 'भक्तिनिरूपण' असलें तरी भक्ति ज्याच्याकरितां सांगितली तो व पांचव्या समासांतील 'रजोगुणी' हे पुनः सामान्य प्रापंचिक मूर्ख आहेत. दुसऱ्या समासांतील उत्तम पुरुषाहून सातव्यांतील 'सत्त्वगुणी' व आठव्यांतील 'सद्विद्येचा' हे पुरुष कांहींसे तरतम कोटींतील आहेत. याप्रमाणें मूर्खासाठीं चार व उत्तमासाठीं चार असे समास वांटले गेल्यावर उरलेल्या दोन समासांपैकीं नवव्यांत विरक्ताचीं लक्षणें व कामगिरी दिलेली असून दहाव्यांत 'पढतमूर्खा'ची संभावना केली आहे. 'विरक्त' हा उत्तम पुरुषाचा पर्याय असल्याचें ध्यानांत घेतलें व 'पढतमूर्ख' हा शिकलेला मूर्ख अशी खूणगांठ मनांत बाळगली कीं या दशकांत मूर्ख व उत्तम यांच्याकरितां समासांची सारखी वांटणी असल्याचें कळण्याला अडचण नाहीं.

मूर्खांच्या वर्णनांत साध्या व्यवहारांतील कित्येक दोष भिन्न आहेत, परंतु कित्येक सर्वांमध्यें सारखेच दाखविले आहेत. त्यावरून समर्थांच्या हृद्गताचा रोख गळीं उतरतो. प्रापंचिक व्यवहारांत लग्न झाल्यावर बायकोच्या प्रेमानें आईबापांची उपेक्षा करण्याचा दोष माणसाच्या अंगीं साधारणपणें संचरतो, ह्यास अनुलक्षूनच मूर्खलक्षणाला **पहिल्या** समासांत प्रारंभ झाला आहे. नंतर पुत्रकलत्राच्या आहारीं जाऊन देवास विसरणें (४०) हा दोष उद्भवतो. हे दोष प्रथम 'देवलंड, पितृलंड' (२७) या शब्दांनीं प्रगटले आहेत व पुढें 'देवद्रोही, गुरुद्रोही, मातृद्रोही, पितृद्रोही, ब्रह्मद्रोही,

स्वामीद्रोही ' (४४) असा त्याचा पर्याय आणि विस्तार पहायला सांपडतो. ' देवीं ब्राह्मणीं सत्ता करी । ६८ ' ही प्रस्तुत दोषाची छोटी आवृत्ति समजावी लागते. पहिल्या समासांतील मूर्खाचे हे दोष मानसिक स्वरूपाचे आहेत. तिसऱ्या समासांत ते आत्महत्यारा, स्त्रीहत्यारा, गोहत्यारा, ब्रह्महत्यारा, मातृपितृहत्यारा—गाई, बायका, ब्राह्मण, आई-बाप यांना ठार करणाऱ्या शब्दांचें उग्र रूप पावले आहेत. या दोषाचा निर्देश पुनः २ : ६ च्या तमोगुणांत पहायला सांपडतो. यामध्यें आईबापांचा वध वगळला आहे तर बालहत्येची भरती आहे (१२). कुविद्येच्या पुरुषाला निर्माण करतांना समर्थांच्या पुढें गीतेंतील आसुरी संपत्तीचा श्लोक होता. यामुळें त्यांनीं त्याच्या ठिकाणीं मानसिक दोषांबरोबर शारीरिक दोषहि सपाटून लादले आहेत. आंत दुष्ट विकार भरलेले आणि बाहेरून सर्वप्रकारें कुरूप असें त्याचें चित्र आहे. याच्या वर्णनांत देवाचा संबंध नाहीं. पहिल्या समासांतील देवलंडपणा किंवा देवद्रोह देवाला शिव्या देऊन थांबतो. तमोगुणी मूर्खाचा देवद्रोह देवाला फोडण्याइतका तीव्र दाखविलेला आहे (३६). देवनिंदा किंवा देवफोड यासारखा आणखी एक मूर्खपणा आत्महत्येचा आहे. हा प्रकार पहिल्या समासांत ' आपणास आपण वधी ' (३७) अशा रीतीनें आला आहे. ' आपला आपण स्वयें (प्राण) द्यावा ' (४), ' आपला आपण शस्त्रपात ' (६), ' स्वयें आत्महत्या करणें ' (१०), किंवा ' देवद्वारीं जीव देणें ' (३२). असे आत्महत्येचे उल्लेख तमोगुणी मूर्खाच्या (२ : ६) दोषविवरणांत आहेत. कुठें मारामारी होत असल्यास ती सोडविण्याऐवजीं तिचें कौतुक पाहण्याचा मूर्ख पहिल्या समासांत (६७) सांगितला आहे. तमोगुणी मूर्खांत हा दोष (२ : ६) ' डोळां युध्य चि पाहावें । रण पडिलें तेथें जावें । ७ ' ' कळह व्हावा ऐसें वाटे । झोंबी घ्यावी ऐसें उठे । १५ ' आणि ' युध्य देखावें ऐकावें । स्वयें युध्य चि करावें । मारावें कीं मरावें । १६ ' याप्रमाणें व्यक्त झाला आहे. पहिला मूर्ख आपोआप चाललेला कलह कौतुकानें पाहतो तर तमोगुणी मूर्ख ' भांडण लावून द्यावें । स्वयें कौतुक पाहावें । २२ ' अशा वृत्तीचा असतो. कुविद्येचा मूर्ख हा सर्व तऱ्हेच्या उन्मादाचा अवतार असल्यामुळें त्याच्याविषयीं असा तपशील सांगण्याची गरज समर्थांना वाटली नाहीं. येथें वेगवेगळ्या मूर्खांची तुलना त्यांची खरी स्थिति उघड होण्यासाठीं केली आहे. इतर दोष विचारांत घेतल्यास त्यांच्या संज्ञा भिन्न असल्या तरी थोड्याफार फरकानें ते एकच होत असें दिसून येईल.

मूर्खांची येथें जशी तुलनेनें परीक्षा केली तशीच उत्तम पुरुषांची केल्यास समर्थांच्या मान्यतेचा उत्तम पुरुष कोण, याचा शोध लागतो. यासाठीं प्रस्तुत दशकांतील चौथ्या समासाचा उत्तरार्ध उपयोगीं पडणारा आहे. त्यांत 'ऐसे प्रकारीचे पाहातां जन । ते जीत चि प्रेमासमान' (२६) असा ज्यावर कोरडा ओढला आहे त्यांचे अवगुण आधीं नोंदले आहेत. स्नान, संध्या, भजन, देवतार्चन, मंत्र, जप, ध्यान, मानसपूजा, भक्ति, प्रेम, निष्ठानेम, देवधर्म, अतीतअभ्यागताचा आदर, सद्बुद्धि, कथा, श्रवण, अध्यात्मनिरूपण, भल्याची संगति, नीति, न्याय, पुण्याचा उपाय, युक्तायुक्त क्रिया, विद्या, वैभव, चातुर्याचा भाव, कला, रम्य सरस्वतीचें लाघव (मृदु कल्याण वाणी), शांति, क्षमा, दीक्षा, मैत्री, कर्म, उपासना, ज्ञान-। वैराग्य, योग, धारिष्ट, त्याग, समता, आदर, प्रीति, परगुणाचा संतोष, इत्यादि गुण ज्याच्या ठिकाणीं मुळींच नाहींत (१५-२५) 'तो मृत्यप्राय वर्ते जनीं । जन्मा येऊन तेणें जननी । वायांच कष्टविली ॥ १४' असें त्याबद्दल समर्थांनीं आधीं बजावून ठेवलें आहे. समर्थांना देवाधर्माच्या उद्धाराची काळजी लागलेली होती. ही काळजी निवारण होण्याकरितां जनतेच्या प्रत्येक घटकांत ज्या गुणांचा जास्तींत जास्त उत्कर्ष व्हावा म्हणून ते तळमळत होते, त्या गुणांची यादी वर एका प्रकरणांतून एकत्र दिलेली आहे. पहिल्या समासांतील मूर्खांमध्यें यांपैकीं अनेक गुणांचा अभाव असल्याचें दृष्टीस पडतें. धारिष्ट (३१), विद्या, वैभव, पुरुषार्थ, सामर्थ्य, मान (३२) यांचा अभाव तेथें निर्देशिला आहे. भल्याची संगति नसल्याची गोष्ट 'नीच यातीसीं सांगात । २९' या वाक्यानें उघडकीस आणली आहे. असेंच वाक्य रजोगुणाच्या माहितींत आहे (५:२८). 'अल्प अन्याय क्षमा न करी। ५६' या माहितीनें क्षमागुणाची उणीव दाखविली आहे. कुविद्येच्या वर्णनांतील ओव्या। ३४–३८ नजरेखालीं घातल्यास वरील गुण कुविद्येपासून साफ दूर पळाल्याचा अनुभव येतो. प्रस्तुत गुण ज्याच्या ठिकाणीं जेवढ्या जास्त प्रमाणांत असतील तेवढा तो जास्त उत्तम असा समर्थांचा अभिप्राय आहे. रजोगुणाच्या विवेचनांत पूर्वोक्त गुणांपैकीं अनेकांचा अभाव पहायला सांपडतो. ११–१२ ओव्या याची कल्पना आणून देण्याला पुरेशा आहेत.

**दुसऱ्या** समासांतील उत्तम पुरुष हा सामान्य व्यवहारांतील प्रापंचिक आहे, तरी त्याच्या गुणमालिकेंत सभेचा उल्लेख येतो व तो समर्थांना देवाधर्माची उन्नति

करण्याचा ध्यास लागलेला होता, या स्थितीचा दर्शक ठरतो. समर्थांच्या काळीं सभा म्हणजे परमार्थाच्या चर्चेसाठीं किंवा कीर्तनासाठीं एखाद्या स्थळीं बसणारा जमाव, असा ह्या शब्दाचा अर्थ होता. समर्थांनीं सभा हा शब्द जेव्हां वापरला तेव्हां गांवकीच्या उठाठेवीची वाटाघाट करणाऱ्या गोतसभेसारख्या सभा किंवा राजाचे दरबार त्यांच्या मनापुढें नव्हते. अध्यात्मनिरूपणाकरितां किंवा हरिकथेकरितां उपस्थित होणारा समुदाय त्यांच्या मनांत असल्याचें प्रमाण त्यांचें सभास्तवन आहे. ही सभा मूर्खाच्या व उत्तम पुरुषाच्या संदर्भात आल्यामुळें त्यांच्या मनोगतावर चांगला प्रकाश पडतो. 'जयाचेनि सभा विटे' (१ : ५७), 'ज्याची सभा निर्नायेक।' (१ : ५८) तो मूर्ख. 'सभेमध्यें लाजों नये। बाष्कळपणें बोलों नये।' (२ : १५), 'सभा देखोन गळों नये। समई उत्तर टळों नये।' (२ : ३८) या सूचना उत्तम पुरुषासाटीं आहेत. सभेसारखीच समर्थांच्या मनोगताची दुसरी खूण गुरुनिर्देशाची आहे : 'गुरुविरहित असों नये। नीच यातीचा गुरु करूं नये।' (२ : ३९)

सत्त्वगुणी (२ : ७) हा पहिल्या उत्तम पुरुषाहून वरच्या दर्जाचा मानल्यास त्याच्या चरित्रांत मागें नमूद केलेल्या सर्व गुणांचा समुच्चय दृष्टीस पडतो. स्नान (कार्तिक-स्नानें, माघस्नानें), दान, प्रेम, भक्ति, भजन, विवेक, यजनयाजन, अध्ययन, अध्यापन, देवळांचा उद्धार इत्यादि गुण व कार्यें त्याच्या द्वारें व्यक्त होतात. देवासाठीं तो जें करतो त्याचें एकूण १८ ओव्यांत (१९–३६) वर्णन आहे. त्यानंतर मृदु वाणी, नेम, ध्यान, वैराग्य, धारिष्ट, शांति, क्षमा, दया, इत्यादि गुणांची नोंद आहे. अतिथिअभ्यागतांना तो कधीं भुकेल्या स्थितींत दवडीत नाहीं. घरांत अन्नाची अडचण असली तरी तो त्यांचा यथाशक्ति आदर करतो. आर्जव, नम्रता, अहंकार-शून्यता, नैराश्य, परोपकाराची तत्परता, संतसंगतीची आतुरता इत्यादि गुणांची त्याच्या स्वभावांत कायम वस्ती असते. ज्याकडे संतकृपा वळली त्याचा वंश उद्धरला, 'तो ईश्वराचा अंश। सत्त्वगुणें॥ ७८'. पहिल्या समासांतला मूर्ख 'अक्षरें गाळून किंवा पदरचीं घालून' पुस्तकें वाचतो; 'पुस्तकें आपण वाचीत नाहीं व दुसऱ्याला देत नाहीं' अशा प्रकृतीचा असतो. हा पुस्तकाचा धागा 'ग्रंथसामग्री जो करी। ८१' याप्रमाणें सत्त्वगुणाच्या विवेचनांत निदर्शनास आणला आहे.

सत्त्वगुणाहून सद्विद्येचा उत्तम पुरुष (२ : ८) अधिक वरचढ म्हणून त्याला शुद्ध

गुणांचा पुतळा म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्याच्यामध्यें दोपाचा वासदेखील सांपडायचा नाहीं. कुविद्येच्या पुरुषांत आसुरी संपत्तीच्या दोपांचा कहर उडालेला दिसतो. तर सद्विद्येचा पुरुप हा दैवी संपत्तीनें ओतप्रोत भरलेला आढळतो. तो अंतर्बाह्य सुंदर आहे. त्याच्या ठिकाणीं पूर्वीं सांगितलेले सारे गुण असून कित्येक तर त्यापेक्षां अधिक आहेत. कुविद्येच्या अगदीं उलट सद्विद्या असल्यामुळें दोन्ही वर्णनांतील विरोध उत्कटपणें जिज्ञासूंना जाणवतो. 'कठिणवचनी कर्कशवचनी (२ : ३ : २१) असें कुविद्येचें लक्षण पाहिल्यावर त्याच्या नेमकें उलट 'सत्यवचनी शुभवचनी कोमळवचनी येकवचनी' (२ : ८ : १७) असें सद्विद्येचें वर्णन दृष्टीस पडतें. विद्याहीन, वैभवहीन, कुळहीन, लक्ष्मीहीन इत्यादि शब्द सद्‌विद्येच्या पुरुषाकरितां योजलेले आहेत. विद्यावंत, कुळवंत, लक्ष्मीवंत, शक्तिवंत, कळावंत या शब्दांनीं सद्‌विद्येचा गौरव केलेला आहे. तेव्हां आर्जव, सख्य, मैत्री, नम्रता, आचारविचार, जप, तप, ध्यान, योग, कथानिरूपण, श्रवण, वैराग्य, विवेक इत्यादि गुण त्याच्या ठिकाणीं असतात हें निराळें सांगायला नको.

विरक्ताचें (२ : ९) सत्त्वगुणी पुरुषांशीं अधिक साम्य आहे. विरक्तावर देवाधर्माच्या उद्धाराची मोठी जबाबदारी समर्थांनीं टाकलेली आहे. क्षमा, दया, शांति, भक्ति, भजन, ब्रह्मज्ञान, धारिष्ट, अभ्यास, साक्षेप, इत्यादि गुण त्यामध्यें असणें अवश्य आहे. विरक्तें अध्यात्म वाढवावें, साधन राखावें, भजन लावावें, ब्रह्मज्ञान प्रगटवावें; भक्ति वाढवावी, निवृत्ति विस्तारावी, धर्मस्थापना करावी, नीति अवलंबावी; परमार्थ उजळावा, विचार शोधावा, सन्मार्ग सत्त्वगुण संनिध ठेवावा; भाविकें सांभाळावीं, प्रेमळें निववावीं, शरणागत साबडीं रक्षावीं, परमार्थाचा कैवार घ्यावा, अभ्यास करावा, साक्षेप धरावा, मोडला परमार्थ उभारावा, भलेपणाचा जीर्णोद्धार, पुण्यमार्गाचा विस्तार बळेंच साधावा; समय जाणावा, प्रसंग ओळखावा, तो सर्वप्रकारें चतुर असावा. 'पर्वें करावीं अचाटें । चालवावीं भक्तांचीं थाटें ।' (२ : ९ : १७) या उपदेशाचा भावार्थ 'पर्वकाळीं अतिसादर । वसंतपूजेस तत्पर । जयंत्याची प्रीती थोर ।' (२ : ७ : ७२) या सत्त्वगुणाच्या ओवींत सविस्तर आहे. सादृश्याचीं उदाहरणें पाहूं गेल्यास आणखी पुष्कळच आढळतील. देवळें, शिखरें, पडशाळा, दीपमाळा, पायऱ्या, वृंदावनें, पिंपळाचे पार, नदीतीरीं घाट, मठ इत्यादि बांधकामें सत्त्वगुणी पुरुप सिद्धीस नेतो. असलीं कामें विरक्ताकडे समर्थांनीं सोपविलेलीं

नाहींत. विरक्त हा बोलून चालून कफल्लक, त्याच्याजवळ वरच्यासारखीं बांधकामें करायला, बागा उठवायला किंवा देवाच्या वैभवार्थ लागणारीं आसनें, उपकरणें, वाद्यें इत्यादि साधनें जुळवायला द्रव्य नसणार हें जाणूनच कीं काय, समर्थांनीं निर्जीव कामापेक्षां अधिक उपयोगाचीं कामें त्याला करायला सांगितलें आहे.

विरक्ताच्या तेजस्वी दर्शनानंतर पुढें येणारा पढतमूर्ख (२ : १०) एकदम अगदीं मिळमिळीत वाटावा हें स्वाभाविक आहे. पढतमूर्ख हा नांवाप्रमाणें पुस्तकी पंडित आहे, पण त्याचा व्यवहार विपरीत आहे. हा गुरुबाजीकडे झुकलेला दिसतो. तो वक्ता असेल तेव्हां अधिकारावांचून बोलतो व श्रोता असेल तेव्हां वाचाळपणानें वक्त्याला उणें आणतो. माहिती भरपूर पण त्याला जिज्ञासूचें समाधान करतां येत नाहीं. शिष्याची अवज्ञा व्हावी किंवा तो संकटांत पडावा, अशी त्याची वागणूक असते. निरूपणाच्या वेळीं चांगल्यांतले श्रोते असतील तर त्यांचीं छिद्रें पाहून तो उघडकीस आणतो. अनधिकारी माणसाला शिष्यत्व देतो व त्यानें उपमर्द केल्यासहि त्याची आशा धरतो. लोकांना भविष्य सांगतो. ज्ञानाचा विकरा करून पैसा जोडतो, गुरुपरंपरा चोरतो. वैभवाच्या तोऱ्यांत सद्गुरूची उपेक्षा करतो. या पढतमूर्खाचीं दुसरीं पुष्कळ लक्षणें इतर मूर्खांच्या लक्षणांशीं जुळणारीं आहेत. जिज्ञासूंना त्यांचें परस्परांतील साद्दश्य सहज उमगेल.

या दशकाचें निरीक्षण संपलें. समर्थांचा मूर्ख हा पारमार्थिक व्यवहाराकडे पाठ फिरवून प्रापंचिक व्यवहारांत नीति, न्याय, ब्रह्मज्ञान, देवधर्म, खरें-खोटें, शिष्टाचार इत्यादिकांची भीति न बाळगतां स्वार्थप्रियतेनें यथेच्छ वागणारा मनुष्य आहे. उत्तम पुरुषाच्या लक्षणांत देवाधर्माची आस्था विपुलत्वानें आणि तीव्रतेनें पहायला सांपडते. दुसऱ्या दशकांत मूर्ख, पढतमूर्ख, कुविद्येचा, रजोगुणी, तमोगुणी अशीं ज्याचीं नांवें आहेत तो पुढें बद्ध, आळशी, दुश्चित, टोणपा, करंटा या नांवानें भेटतो, तर उत्तम, सद्विद्येचा, सत्त्वगुणी, विरक्त हा निःस्पृह, चतुर, सदेव, यत्नाचा, देवाचा भक्त, इत्यादि निराळ्या नांवानें आढळतो. तिसऱ्या दशकाच्या पहिल्या पांच समासांत मूर्खाचेंच चरित्र समर्थांनीं विस्तारानें निवेदन केलेलें आहे. आपल्या फुटकळ कवितेंतसुद्धां त्याची सोय लावून लोकांना सावध रहाण्याविषयीं समर्थांनीं सूचना दिलेल्या आहेत.

## • ३ •

दुसऱ्या दशकांत मूर्ख-उत्तम यांचा विवेक झाल्यावर माणसाची प्रपंचाच्या वेढ्यांत कशी अवनति होत जाते याची समग्र कल्पना येण्याकरितां स्वगुणपरीक्षा हें दशक आणलें आहे. दशकाच्या नांवाचा विषय पहिल्या पांच समासांत ग्रथित केलेला आहे व पहिला सोडून बाकीच्या समासांना 'स्वगुणपरीक्षा' हेंच एक नांव आहे. वेदांताच्या अभ्यासकांना हा विषय मुळींच अपरिचित नाहीं. जन्म, बाल्य, तारुण्य, वृद्धावस्था आणि मरण हे आयुष्याचे मुख्य दुवे असून त्या त्या दुव्यांचा मनुष्य कसा दुरुपयोग करतो किंवा होऊं देतो याची माहिती सांगून मनुष्याचें लक्ष देवाच्या भक्तीकडे किंवा ब्रह्मज्ञानाकडे वेधून घ्यावयाचें हा उद्देश तत्त्वज्ञानाच्या पौराणिक उपदेशांत प्रायः न चुकतां आढळतो. समर्थांनीं त्याचा अवलंब करून स्वगुणपरीक्षा साधलेली आहे.

**पहिल्या** समासाचें नांव 'जन्मदुःखनिरूपण' असें आहे. जन्म हें माणसाच्या आयुष्यांतलें पहिलें दुःख असून पूर्वसंचितामुळें तें अवश्यमेव भोगण्याचा प्रसंग ओढवतो. १० ओव्यांत जन्माचें मूळ सांगून झाल्यावर नंतर देहाचें मूळ व अंतः-स्वरूप २८ पर्यंतच्या १८ ओव्यांत वर्णिलेलें आहे. त्यांत एका ठिकाणीं भर्तृहरींच्या एका सुभाषिताचें स्मरण करून देणारी ओवी आहे. 'मुखं श्लेष्मागारं तदपि च शशांकेन तुलितम्' या चरणाचा अर्थ 'लाळ थुंका आणी मळ। पीत श्लेष्मा प्रबळ। तयास म्हणती मुखकमळ। चंद्रासारिखे ॥ २२' या ओवींत दृष्टीस पडतो. पुढें गर्भवास (२९–३४) व जन्मकालीन यातना यांचें वर्णन असून त्यांत मूल आडवें आल्यास त्याला तुकडे करून म्हणजे मारून मोकळें करावें लागतें, इकडे केव्हां केव्हां त्याची आई मरणाधीन होऊन जाते अशीं दुहेरी संकटें सांगितलीं आहेत (३७–५१). भगवंताचा भक्त जन्मबंधांतून सुटतो म्हणून शेवटीं 'भगवंतासी शरण जावें' अशी समर्थांची विनवणी आहे.

**दुसरा** समास लग्न होऊन पहिली बायको मरेपर्यंतच्या इतिहासाचा आहे. शैशवावस्थेंत मुलाला आईचें वेड असतें. बाल्यावस्थेंत खेळाचें वेड असतें. पण आई मरून खेळांत देहाला इजा होऊन दुःख भोगावें लागतें. कधीं रोग जडल्यास त्याची तऱ्हेतऱ्हेची पीडा सोसण्याची पाळी येते. यांतून वांचला तर त्याला शहाणा

व्हावा म्हणून आईबाप चोपतात. पुढें मोठ्या थाटानें लग्न झाल्यावर 'मन रंगोन गेलें । सासुरवाडीकडे ॥ ३६ ' असा अनुभव येतो. 'श्वशुरगृहीं वास करी ' (१०) हें लक्षण पहिल्या मूर्खाच्या अंगीं असल्याचें (२:१) जिज्ञासूंना सांगायला नको. आतां बायकोचें वेड सुरू झालें (३९-५८). दुर्दैवानें ती मरते तेव्हां शोकभरांत 'जोगी महात्मा ' होण्याची हा वडबड चालवितो. तथापि हें वैराग्य फार दिवस टिकत नाहीं. दुसरें लग्न करून तो आनंद मांडतो.

द्वितीय संबंधापायीं होणाऱ्या घडामोडींचा **तिसरा** समास आहे. देवधर्म, तीर्थव्रत, न्यायनीति, श्राद्धपक्ष, स्नानसंध्या, कथानिरूपण यांना तुच्छ लेखून प्रापंचिक गर्वानें वागतो. दुसरी बायको केली, पण ती वयानें लहान यामुळें स्त्रीसुखाचा लोभ अनावर होऊन बाहेरख्यालीपणा सुरू करतो. केव्हां त्यापायीं राजदंड भोगावा लागतो. नाहीं तर बाहेरख्यालीपणाचे रोग सगळें शरीर पोखरून काढून दैना उडवितात. इतक्यांत दरवडा पडून सर्वस्वीं नागवला जातो. नंतर सुदैवानें प्रकृति सुधारते व त्याच्या संसाराचा गाडा चालूं लागतो. मग मुलें नसल्याची काळजी वाटते. मुलांसाठीं नवससायासाची धडपड करणें भाग पडतें. मुलगा नाहीं तर मुलगी चालेल, ही हुरहूर अखेर मूल झाल्यानें मिटली. पण तें जगण्याचा योग नव्हता. अर्थात् मुलें व्हावीं, मरावीं या तापानें जीव होरपळत राहिला. निखाऱ्यावरून चालण्याचे, गळ टोचून घेण्याचे, विंचू गिळण्याचे नवस बोलले गेले. मुलांकरितां झाडाखालीं स्नानें करावीं, त्यानें फळतीं झाडें करपावीं, तरी मूल नाहीं. अखेर खंडेराव कुळ-स्वामिनी हीं दैवतें पावलीं. मुलें झालीं.

'लेंकुरें उदंड जालीं । तों ते लक्ष्मी निघोन गेली । ' असें नव्या दुःखपरंपरेचें सूतोवाच **चौथ्या** समासाच्या प्रारंभीं केलेलें आहे. घरांतली पुंजी संपली तरी लोकलाजेसाठीं कर्ज काढून मुलामुलींचीं लग्नकार्यें उरकणें प्राप्त झालें. वस्त्रभार, गुरेंढोरें गहाण टाकलीं, विकलीं; तरी कर्ज वाढत राहिलें म्हणून परदेशीं प्रयाण केलें. दोन वर्षे पत्ता नव्हता. नीचसेवा कष्टानें करीत कांहीं पैसा गांठीस मारला व घरीं आला. घरचीं माणसें वाटच पहात होतीं. त्यांनीं आणलेल्या मिळकतीवर हात मारला. त्यामुळें पुनश्च तातडीनें घर सोडावें लागलें. जड अंतःकरणानें बायको-मुलांचा निरोप घेऊन तो निघाला. त्या वेळीं त्याला आईची निरपेक्ष ममता आठवली.

बायकोला आईची सर येणार नाहीं हें मत पटलें. पुनः बायकोमुलांच्या आठवणीनें गहिंवरला. अशा रीतीनें मनाच्या ओढाताणींत त्यानें विदेश गांठला.

**पांचव्या** समासांत शेवटची दुर्दशा टप्प्याटप्प्यांनीं दाखविलेली आहे. परदेशांत हा आमचा कथानायक व्यासंगांत (उद्योगधंद्यांत) गुंतला. दोनचार वर्षे अखंड राबून कांहीं द्रव्यानिशीं तो घराकडे निघाला. इकडे त्या सुमारास अवर्षण पडून घरचीं माणसें उपासमारीनें मरणाच्या दारीं जाऊन पोंचलीं होतीं. आपला पोशिंदा आल्याचें पाहून त्याच्या गांठोड्यावर या मरणासन्नांनीं झडप टाकली. जें मिळालें तें पोटांत ढकलण्याच्या परिणामीं बहुतेक मुलें मेलीं. बायकोचाहि अंत झाला. अवर्षण संपून सुभिक्ष झाल्यावर उरलेलीं मुलें बायकोच्या अभावीं संभाळण्याचा भार यावर पडला. लोकांनीं भरीस घातल्यामुळें तिसरें लग्न केलें. पुनः द्रव्यार्जनार्थ विदेशीं जावें लागलें. इकडे नवी बायको व तिचीं सावत्र मुलें यांच्यांत भांडण जुंपलें. बायको वयांत आली तर हा म्हातारा झालेला. मुलांचें भांडण तोडण्याकरितां वांटणी केली; पण मुलांना ती रुचली नाहीं म्हणून त्यांनीं एकदां बापाला झोडपलें. फिरून गांवकऱ्यांनीं मध्यस्थी केली व भांडण मिटविलें. हा निराळ्या झोपडींत नव्या बायकोसह राहिला. स्त्री सुंदर, चतुर, गुणी यामुळें सारें दुःख विसरला. मोठा आनंद भोगीत होता. हा दुःखाला विसरला तरी दुःख त्याला विसरलें नव्हतें. अकस्मात् परचक्र आलें. त्या धाडींत बायको व संपत्ति हीं दोन्ही गेलीं. या दुःखावर ती भ्रष्टल्याच्या बातमीनें कळस चढविला. आतां त्याला देवाचें स्मरण झालें. येथून पुढें म्हातारपणांतल्या पीडेचें वर्णन आहे (३६–५०). शेवटीं भगवद्भजनाची महती उपदेशिली आहे.

'जन्म मृत्यु जरा व्याधि दुःखदोषानुदर्शनम्' असें ज्ञानी पुरुषाचें कर्तव्य गीतेंत सांगितलेलें आहे. पुराणांतून जन्म, बाल्य, तारुण्य, वृद्धत्व आणि मृत्यु या अनर्थांचा खल आढळतो. भारतीय तत्त्वशास्त्रकारांनीं मानवी जीवन हें दुःखमय असल्याचें बौद्धमत स्वीकारून माणसाला ब्रह्मसाक्षात्काराचा मोक्ष मिळविण्याची इच्छा उत्पन्न होण्याकरितां जन्मापासून मरेपर्यंतचा नैसर्गिक क्रम दुःखांनीं व्यापल्याच्या कल्पनेचा जो बोलबाला केला त्याची छाया साधुसंतांच्या वाङ्मयांत पसरलेली दृष्टीस पडते. ज्ञानेश्वरांनीं गीतेच्या तेराव्या अध्यायांतील अज्ञानाचें भाष्य करतांना जन्म-व्याधि-

जरादिकांचें विवेचन केलें आहे. एकनाथांच्या वाङ्मयांत तसाच प्रकार आहे. स्त्रीच्या लोभाचें समर्थनिर्मित चित्र पहातांना (३ : २ : ३९–५८) ज्ञानेश्वरांनीं रेखाटलेल्या तसल्याच चित्राचें (गीता १३ : ८८८–९०३) स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं. तरीसुद्धां समर्थांच्या चित्रांत निराळें वैशिष्ट्य आहे. समर्थांच्या कृतींत बारीकसारीक तपशील जेथल्या तेथें ठेवलेले असल्यामुळें त्याला एकप्रकारें परिपूर्णता आलेली आहे. समर्थांच्या भाषेंतील सुबोधता व स्पष्टता या दोन गुणांमुळें त्यांनीं मांडलेल्या चित्राला इतरांशीं तुलना करतां वेगळी मोहकता असल्याचा अनुभव येतो. स्वगुणपरीक्षेच्या पांच समासांत एक सर्वकाळीं उपयोगीं पडण्याजोगी मनोवेधक जीवनकथा गोविलेली आहे. या कथेंत प्रत्येक माणसाला समर्थकाळीं तीन लग्नें करावीं लागत होतीं किंवा द्रव्यप्राप्त्यर्थ घर सोडून अन्यत्र जाऊन वर्षानुवर्ष रहावें लागत होतें, असें समजण्याचें कारण नाहीं. गृहप्रपंचाचे निरनिराळे अनुभव या कथेंत समर्थांनीं एकत्र केले आहेत, हें ध्यानांत उतरणें कठीण नाहीं.

समर्थांच्या या सर्वांगपूर्ण मूर्खांच्या चरित्रांतील कांहीं अंगें पूर्वींच्या दशकांतील मूर्खलक्षणांत आहेत. स्वगुणपरीक्षेंत माणसाच्या दिनचर्येंतील वागणूक निवेदिलेली नाहीं. पूर्वींचे मूर्ख दाखवितांना आयुष्यांतील सर्व ठळक घटनांची माहिती दिलेली नाहीं; परंतु विवाह, स्त्रीचें अतिरिक्त प्रेम, आईबापांची अवहेलना, देवाधर्माची हेळसांड, द्रव्य टिकण्याचा विश्वास, इत्यादि गोष्टी त्यामध्यें सांपडतात. स्वगुणपरीक्षेंत एकामागून एक तीन लग्नें झाल्याचा वृत्तांत आहे. पहिल्या मूर्खाबद्दल–'पुरुषाचेनि अष्टगुणें। स्त्रियांस ईश्वरी देणें। ऐशा केल्या बहुत जेणें। तो एक मूर्ख ॥४२' असें समर्थांनीं म्हटलें आहे (२ : १). 'परस्त्रीसीं प्रेमा' (१०), 'सप्त वेसनीं जयाचें मन' (१६), 'घरीं असोनि सुंदरी। जो सदांचा परद्वारी।' (६०) या वचनांत बाहेरख्यालीपणाचा उल्लेख आहे. आईबाप, बायको, सुना, लेकी, यांची काळजी वाहणें (९), 'बाळकावरी ममता। प्रीतीनें आवडे कांता। (१८)' हीं रजोगुणी मूर्खाचीं लक्षणें आहेत (२ : ५). याप्रमाणें साम्यें जुळविणाऱ्यास स्वगुणपरीक्षेंतील मनुष्य व पूर्वींचा मूर्ख हे एकाच माळेंतले मणी असल्याबद्दल शंका रहात नाहीं.

दासबोधाबाहेरच्या वाङ्मयांत हा स्वगुणपरीक्षेचा विषय समर्थांनीं सोडलेला नाहीं. ओव्यांच्या दुसऱ्या शतकांत दरिद्री दांपत्याचा संसार कसा जिकिरीचा होतो याची

स्वगुणपरीक्षेंतल्यासारखीच बारीक माहिती दिलेली आहे. बायको प्रत्यहीं कांहीं तरी जिन्नस आणायला सांगते. अमुक आणा, तमुक आणा, असा 'आणा' मागे लागतो. रोज त्यावरून नवराबायकोचीं भांडणें चालतात. लोक धिक्कारतात. पाहुणे घर बुडवतात. नंतर 'दोघेंजणें होतीं बहुजणें जालीं ॥ ३२' घरोघरीं भिक्षा मागण्याची पाळी आली. तेव्हां विदेशीं जावेंसें त्या पुरुषाला वाटूं लागलें. 'भांडतां भांडतां निघोनियां गेला । जाउनियां आला किती वेळ ॥ ४८' किती तरी वेळां रोगानें पछाडला गेला, पण वांचला; अशा स्थितींत 'पोर झाला थोर । मारमारूं बुर काढीतसे ॥ ५१' पोरांनीं बापालाच ठोकून समाधान मानलें नाहीं तर आईला देखील चोपलें. नंतर 'बोलतां बोलतां लाविला गळफांस । आस्त्री कासावीस होत असे ॥ ५४' संसाराचें सुख म्हणतात त्याचा हा असा मासला आहे, याप्रमाणें पुकारून देवाच्या भक्तीची श्रेयस्करता समर्थांनीं श्रोत्यांच्या कानीं घातली आहे (श्रीरामदासांची कविता भाग १, पान १३६-१३९) षड्रिपूंमध्यें प्रपंच हा शेवटचा रिपु असून त्याच्या वर्णनांत समर्थांनीं थोडक्यांत हीच कथा सांगितली आहे. (कित्ता, पान ३१५-३१६) प्रपंचांत बायकोचा 'आणा आणा' हा लकडा सदैव पाठीस लागतो त्याविषयीं 'आरंभीं नोवरी म्हणे आणा आणा । रात्रदिस आणा आरंभील्या ॥ ८' असें ओव्याशतकांत एक वाक्य आहे. 'तेलमीठ आणा भाजीपालें आणा । धान्य घरा आणा कांहीं तरी ॥ १०' या ओवीचें पुढील श्लोक-रूपांतर पाहिलें म्हणजे समर्थांची कल्पना व भाषा कशी निश्चित स्वरूपाची होती हें ध्यानांत येईल (करुणाष्टकें वगैरे, पान ९८):

सदा तेल आणा सदा मीठ आणा । सदा धान्य आणा सदा द्रव्य आणा ।
सदा वस्त्र आणा सदा शाख आणा । सदा सर्वदा सर्व आणाचि आणा ॥ २८

अभिमान किंवा ममत्व हें मूर्खाचें लक्षण येथवर विचारांत घेतलेलें नाहीं. तें लक्षण दुसऱ्या दशकांतील मूर्खवर्णनांत एकदांच स्पष्टपणें डोळ्यांसमोर येतें. बाकीच्या ठिकाणीं तें अत्यंत अस्पष्ट आहे. रजोगुणी मूर्ख (२ : ५) 'मी तरुण मी सुंदर । मी बळाढ्य मी चतुर । मी सकळांमध्यें थोर । १४' आणि 'माझा देश माझा गांव । माझा वाडा माझा ठाव । १५' याप्रमाणें अहंकार व ममत्व व्यक्त करतो. 'आपली आपण करी स्तुती ।...सांगे वडिलांची कीर्ती ।' (२:१:१२) या

दोन वाक्यांमुळें पहिल्या मूर्खांत हे दोन अवगुण उमगतात. प्रस्तुत अवगुणांचा विस्तार 'एकवीस समासी'च्या किंवा जुन्या दासबोधाच्या २० व्या समासांत ३४-५० ओव्यांमध्यें दृष्टीस पडतो. 'मी बलाढ्य तरुण सुंदर। मी विद्यावंत जाणता चतुर। मी लक्ष्मीवंत माहा थोर। सकळाहुनी॥' (३४) असा भाग तेथें असून 'माझी माता पिता ऐसी कोण्ही हि कोठें सर्वथा नसतील' (३६), 'माझे पुत्र अतिशाहाणे। त्यांचा महिमा कोण जाणे। माझा बंधु होता तेणें। सृष्टी वेढा लाविला॥ (३७)'. माझी बायको कुलीन, मुलगी तर अशी गुणी कीं तिला जावई नांवाजतो, माझा चुलत चुलता थोर होता पण मेला (३८). समर्थांनीं या अभिमानाची 'ऐसा जितामेल्याचा अभिमान। या नांव कुळाभिमान। ३९' अशी व्याख्या केली आहे. समर्थ म्हणतात: कुळाचें राहो, याला आपल्या साहेबाची स्तुति गाण्याची अडचण वाटत नाहीं—'म्हणे माझा साहेब थोर', साहेबाचा परिवारसुद्धां तसाच' (४०). जन्मभूमीचा गांव जसा उत्तम तसाच तेथला पाटील (४१). हीं माणसें अडाणी म्हणून त्यांच्याकडे कानाडोळा करावा तर ज्ञाते पुरुष देखील अशा अभिमानानें ग्रासलेले दिसतात. त्यांना आपल्या उदंड शिष्यसंख्येचा अभिमान असतो. त्याचा ईश मी आहें अशी ज्ञाता बढाई मारतो (४३). 'माझ्या गुरूचें मुळीं नांवच काढायला नको. त्याचें सामर्थ्य काय वर्णावें ? उभा उभी साक्षात्कारु। ब्रह्म दाखवी डोळां॥ (४४)' माझा गुरुबंधु मोठा वादप्रिय आहे; थोर ज्ञाता पण क्रोध फार (४५). माझ्या पट्टशिष्याबद्दल विचाराल तर त्याचा विद्याभ्यास जबर असून थोर थोर त्याला मानतात. त्याला झोटिंग प्रसन्न आहे (४६). माझा आजे गुरु करामती पुरुष होता. सभामोहनाची विद्या त्याला अवगत होती. थोरांथोरांना त्यानें आपलेंसें केलें होतें; फार कशाला, 'तयासी मुख्य अविंध जाणे॥' (४८). आमच्या समुदायांत भेद नाहीं; सर्वांना अभेदानें वागण्याची मोकळीक आहे (४९). या विवेचनांतील समर्थांची मर्मग्राही दृष्टि जिज्ञासूंना सहज पटणारी आहे.

अभिमानाच्या मूर्खपणाचें एकप्रकारें अतिकठोर विडंबन समर्थांच्या 'करुणाष्टकें वगैरे' नांवाच्या पुस्तकांत (पान ४२) पहायला सांपडतें. देह वेष, काळ योग, बुद्धि युक्ति, पुष्टि कांति, हात पाय, दांत ओठ, कुळ गोत, गांव घर, शेत वित्त हें सर्व माझ्या संबंधांत चांगलें आहे, असें अभिमानातोंडीं वदवितां वदवितां समर्थांनीं पुढील श्लोकांच्या द्वारें निष्ठुर विनोदानें या अभिमानाला फजीत केलें आहे :

> बरीं चीपडें मेकडें सर्व माझीं । खतें खांडकें तें बरीं भव्य माझीं ।
> पित्तें फेंकसें चारटें सर्व माझीं । बरीं अंतडीं कातडी मंद माझी ॥ २
> बरा घर्म माझा बरा मूत्र माझा । बरा पू बरा वाहतो कान माझा ।
> बरा वोक माझा बरा नर्क माझा । बरा खोकला दाट सेंबूड माझा ॥ ३

मानवी जीवाला भोगाव्या लागणाऱ्या दुःखाचा पाढा मूर्खलक्षणांत आणि स्वगुण-परीक्षेंत वाचला गेला असला, तरी तीं दुःखें किती प्रकारचीं आहेत याची निराळी वाच्यता करण्याचा वेदान्ताचा परिपाठ आहे त्यास अनुसरून **तिसऱ्या दशकाच्या ६, ७ व ८ या समासांत** त्यांचें स्वरूप मांडलेलें आहे. शास्त्रीय दृष्ट्या या दुःखांचे दोनच वर्ग पडतात. एक शारीरिक व दुसरा मानसिक, परंतु जुन्या शास्त्रांनीं आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक अशी दुःखांची त्रिविधता मानल्यामुळें ती वर्गवारी समर्थांनीं स्वीकारली आहे. **सहाव्या** समासांत आध्यात्मिक तापाचें निरूपण आहे. परमार्थाचा अधिकार त्रिविध तापानें पोळल्याशिवाय येत नाहीं. याकरितां समर्थांच्या मतें त्यांचें ज्ञान अवश्य आहे. देह, इंद्रियें, प्राण यांच्या योगानें जें दुःख येईल तें आध्यात्मिक (१३-१४). एखादा विषय निघाला कीं, त्याचा विस्तारानें खल करणें हा समर्थांच्या उपदेशपद्धतीचा विशेष असल्यानें त्यांनीं त्या त्या विषयाचें वेळोवेळीं आपल्या बुद्धींत सांठविलेलें ज्ञान विवेचनप्रसंगीं अनावर होऊन बांध फुटलेल्या प्रवाहाप्रमाणें त्यांच्या वर्णनाचा ओघ वेगशाली दिसूं लागतो. या समासांत शरीराचे सारे रोग व दोष उच्चारले आहेत. या रोगांत 'आळशी, मूर्ख, अपेशी, विसराळू, दुश्चित्त' यांचाहि समावेश आहे (२८). दुश्चित्त भ्रमिष्ट, आणि खुळे (४०), मत्सरी, तापट, संतापी, अनुतापी, मत्सरी, तिरस्कारी (४४–४५), चिंतेची काजळी (५२), ही मानसिक स्वरूपाच्या दोषांची हजेरी आहे. समर्थांच्या बारीक नजरेची ओळख पटविणारीं कांहीं उदाहरणें येथें सांपडतात. एखाद्याच्या हाताला सहा बोटें असतात हें व्यंग सहसा सुचणारें नाहीं. पण समर्थांनीं 'शडांगुळें'(४२) म्हणून त्याचा बोज राखला आहे. डोळ्याला चाळिशी (उपनेत्र, चष्मा) लावण्याची पाळी येणें हा आध्यात्मिक तापाचा प्रकार 'चाळसी लागे प्राणियां । या नाव आध्यात्मिक ॥ ४९' याप्रमाणें दाखल केला आहे.

**सातव्या** समासाचा विषय 'आधिभौतिक ताप' हा आहे. भूतांच्या संयोगानें

जें दुःख उद्भवतें त्याचें नांव आधिभौतिक ताप (२). घरांतलीं-रानांतलीं जनावरें, पांखरें, बारीक किडे, कित्येक वनस्पति यांच्यापासून होणाऱ्या सर्व उपद्रवांची यादी या समासांत आहे. घरें-झाडें पडणें, शाप, चेटकें, फसवणूक, धरपकड, बाटवा-बाटवी, विषाचे व फांसाचे प्रयोग, खोटा आळ येणें, झाडें घरें कडे यांवरून कोसळणें, विहिरींत नदींत तळ्यांत बुडणें, न कळतां तोंडांत उष्ण पदार्थ जाऊन तोंड भाजणें, दांतांखालीं जीभ सांपडणें, हीं सारीं आधिभौतिक दुःखें होत. यांतच समर्थांनीं बायकांच्या हालअपेष्टांना जागा दिली आहे (२४–२९). माहेर दूर अंतरतें व सासरचे दुर्जन चिमटे-गालगुचे घेऊन किंवा टोसे मारून स्त्रियांना छळतात. 'चुकतां कान पिळिती । कां तो डोळां हिंग घालिती ।' किंवा 'कर्ण नासिक विंधिले । बळें चि धरून गोंधिलें । खोडी जालिया पोळविलें ।' तसेंच 'परचक्रीं धरून नेलें । नीच यातीस दिधलें ।' हे स्त्रियांचे आधिभौतिक ताप आहेत. रोग बरे होण्याकरितां जे कडक औषधोपचार केले जातात, ते आधिभौतिक तापाच्या वर्गांत मोडतात. चोऱ्या, आगी, दरवडे, लुटालूट, मारहाण, अवर्षण, अतिवृष्टि, वादळें, महापूर, हिंवाळ्याचा कडाका, विद्युत्पात, दुःस्वप्नें, अपशकुन, ग्रहांची व भूतांची पीडा, इतकें सांगून झाल्यावर राजदंडाच्या नाना प्रकारांकडे वळून समर्थांनीं ६३–७८ या ओव्यांत राजांकडून होणारी गांजणूक सादर केली आहे. आणखी एक प्रकार उरला. मुलें हरवणें व मरणें किंवा जवळ राहिल्यास दुर्गुणी ठरणें असें त्याचें स्वरूप आहे. 'कुरूप कर्कश स्त्री क्रूर । विधवा कन्या मूर्ख पुत्र ।' (५४) किंवा 'बाळपणीं मरे माता । तारुण्यपणीं मरे कांता । वृद्धपणीं मृत्य सुता ।' (८०) हे आधिभौतिक ताप होत.

**आठव्या** समासांत 'आधिदैविक तापांची' माहिती आहे. हे ताप मरणोत्तर परलोकीं भोगावयाचे असल्यानें त्यांना 'आधिदैविक' असें नांव देण्यांत आलें आहे. त्यांचा यमाशीं–एका देवाशीं–संबंध आहे म्हणून ते आधिदैविक. 'आंगबळें द्रव्यबळें । मनुष्यबळें राजबळें ' मनुष्य नीति सांडून करूं नये तें करतो (४–५), असल्या वागणुकीचें मरणोत्तर प्रायश्चित्त म्हणजे आधिदैविक ताप. ग्रामाधिपति, देशाधिपति, त्याहून मोठा राजा, राजाला शिक्षा देणारा देव. राजाच्या कर्माकर्मांचें नियंत्रण केवळ यमाच्या हातीं व यमाची शक्ति राजा मेल्यावर काय ती उपयोगीं, राजाला इहलोकीं कोणी शास्ता नाहीं, असा समर्थांचा अभिप्राय येथें स्पष्ट आहे. राज्यकारभाराच्या इतिहासांतील क्रांति, बंडाळी, सशस्त्र किंवा निःशस्त्र प्रतिकाराची

उठावणी या घटना समर्थांच्या विचारसरणींत नव्हत्या याचा निराळा पुरावा शोधायला नको. आधिभौतिक ताप प्रत्यक्ष अनुभवाचा यामुळें पूर्वीच्या समासांतील राजदंडाची प्रखरता आणि वास्तवता आधिदैविक यमदंडाच्या वर्णनांत सांपडत नाहीं. राजदंडाहून यमदंड उदंड, तेथील यातना प्रचंड दारुण भोगरूप, या विशेषणाच्या संस्कारांनीं सदर तापाची विल्हेवाट लावलेली आहे.

**नवव्या** समासांत मृत्यूची सर्वभक्षकता सांगितली आहे. वय, बळ, द्रव्य, रूप, विद्या, जप, तप, योग, उद्योगधंदा, शास्त्र, कला, व्यापार, अधिकार, अवतार, देश, काळ, वर्ण आश्रम, जात, स्त्रीपुरुष, शौर्य, धैर्य, पराक्रम, इत्यादिकांची क्षिति न बाळगतां मृत्यु सर्वांना गट्ट करतो, असा या समासाचा सारांश आहे. 'च्यारीखाणी च्यारी वाणी । चौऱ्यासी लक्ष जीवयोनी । जन्मा आले तितुके प्राणी । मृत्य पावती ।। ३७' जे आत्मज्ञानी स्वरूपाकार झाले 'ते येक चि राहिले'.

**दहावा** समास म्हणजे जुन्या एकवीस समासी दासबोधाचा सहावा समास होय. संसार म्हणजे महापूर हें रूपक पहिल्या नऊ ओव्यांत खेळविलें आहे. ज्ञानेश्वरीच्या सातव्या अध्यायांतील मायानदीच्या रूपकाचा हा संक्षेप म्हणावा लागतो. देवाचा धावा करणारे या महापुरांत वांचतात. देव भावाचा भुकेला खरा, पण 'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्' या न्यायानें 'जैसा भाव जयापासीं । तैसा देव तयासी । १३' भाव जर मायिक असेल तर देवासारखा महाठक दुसरा कोणी नाहीं (१४) ही कल्पना आरशांतील प्रतिबिंबाच्या दृष्टान्तानें समर्थांनीं खुलविली आहे. चेहऱ्यावर जो विकार असेल तोच आरशांत दिसेल. 'दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जैस्यास तैसें भासे । तयाचें सूत्र असे । आपणा च पासीं ।। १६' म्हणून खऱ्या भावार्थानें देवाला शरण जावें. यानंतर नरदेहाचें आयुष्य ही रत्नपेटी भजनाच्या रत्नांनीं भरून 'ईश्वरीं अर्पूनिया लुटी । आनंदाची करावी ।। २७' असें म्हटलें आहे. ईश्वरी जिव्हाळा हा स्वानंद-सोहळ्याचा अक्षय ठेवा आहे, तो मिळवून आयुष्य सफळ करावें. नरदेह फुकट दवडला तर पुनः नरदेहच लाभेल अशी खात्री नाहीं. सारे नातलग, घरदार, संपत्ति, हीं सर्व नश्वर आहेत. त्यांचें ममत्व तोडून 'येक भगवंत साचार । धरीं भावार्थबळें ।। ५३' पोटाला देणाऱ्या नीच धन्याची प्रसंगीं शरीर विकून चाकरी करावी लागते, मग ज्यानें जन्मास

घातलें, ज्याची विश्वावर सत्ता त्या देवाला विसरून कसें चालेल ? यासाठीं सर्व सत्ताधारी श्रीरामाची कास धरावी. ‘जयास वाटे सुख चि असावें । तेणें रघुनाथ-भजनीं लागावें । स्वजन सकळ हि त्यागावे । दुःखमूळ जे ॥ ६३’ हा उपदेश ऐकून भाविकानें भगवद्भजन कसें करावें हा प्रश्न विचारला. या प्रश्नाचें उत्तर ‘नवविधाभक्ति’ नामक पुढल्या दशकांत आलेलें आहे. ‘वैराग्यनिरूपण’ हें या समासाचें जुनेंच नांव येथें कायम ठेवलें आहे.

• ४ •

चौथा दशक नवविधा भक्तीचा आहे. याला प्रारंभीं गणेश-शारदा-सद्गुरूंचें नमन असल्यामुळें या दशकांतील भक्तीचे नऊ प्रकार स्वतंत्रपणें समर्थांनीं ग्रथित केले असावे, हा तर्क मागें निदर्शनास आणलेला आहे. श्रवणकीर्तनादि भक्तीचे नऊ प्रकार सांगणारा श्लोक भागवतपुराणांतील प्रल्हादाच्या आख्यानांत (७ : ५ : २३) आलेला असून त्याच्या आधारें समर्थांनीं आपले विचार या दशकांत मांडले आहेत.

**पहिला** समास श्रवणभक्तीचा. भक्तीचा हा एक प्रकार असल्यामुळें श्रवण म्हणजे देवाच्या गुणांचें व चरित्राचें श्रवण असा अर्थ मनांत येणें स्वाभाविक असतां समर्थांनीं विद्या, कला, शास्त्रें, तीर्थव्रतदान, मंत्र इत्यादि परमार्थसाधनें आणि परमार्थाचे नाना पंथ, जलारण्यभूगर्भादि निवासस्थानें यांची माहिती यांचा श्रवण-कार्यांत समावेश करून भक्ति आंधळी नसावी, तिच्यांत नानाविध ज्ञानाचा डोळस-पणा असावा, असें निदर्शनास आणलें आहे.

**दुसरा** समास कीर्तनभक्तीचा. कीर्तन म्हणजे हरिकथा. हा समर्थांच्या ध्येयांतला विषय असल्यामुळें आरंभापासून त्याच्या विवरणांत उत्साह दिसून येतो. ‘भगवत्कथा निरंतर । करीत जावी ॥ ३’ ‘केली च करावी हरिकथा । हरिकथेविण सर्वथा । राहोंचि नये ॥ ४’ ‘हरिकीर्तनें भरावा । ब्रह्मगोळ अवघा ॥ ५’ अशी प्रस्तावना करून कीर्तनांत काय काय असावें याचा तपशील घातला आहे. ‘ब्राह्मण्य रक्षावें आदरें ।’ (२०) हें वाक्य याच विवेचनांत आलेलें आहे. कीर्तनांत सगुण व निर्गुण या दोन्हीचा मेळ असावा. ‘सगुण रक्षून निर्गुण । बोलत जावें ॥ २३’ वक्ता

अनुभवाचा पाहिजे (२४). एवढेंच एक वाक्य वक्त्याबद्दल आहे. शेवटीं पांच ओव्यांत कीर्तनमाहात्म्य गाइलें आहे.

वक्त्याच्या गुणांची वीसदशकी दासबोधांत विशेष विवेचना कुठेंच नाहीं. जुन्या एकवीस समासी दासबोधाच्या तिसऱ्या समासांत वक्ता आणि श्रोता या दोघांच्या गुणावगुणांची दीर्घ परिस्फुटता आहे. वक्त्याची–उपदेशकाची व गुरूची भूमिका एकच असल्यामुळें गुरूचे सद्गुण वक्त्याच्या ठिकाणीं असायला पाहिजेत हा समर्थांचा कटाक्ष जुन्या दासबोधांत स्पष्ट आहे. वक्त्याचीं सुलक्षणें तेथें ५–१० इतक्या ओव्यांत असून दुर्गुणाची झडती ११–१८ या ओव्यांत घेतली आहे. वक्ता रागीट असेल तर काय घडतें याचा मनोरंजक वृत्तांत १९–२५ या ओव्यांत पहायला सांपडतो. रागाचें पर्यवसान आपसांतल्या मारामारींत होऊन शेवटीं फिर्यादीपर्यंत मजल जाते. वक्ता अनुभवाचा पाहिजे (२९) हा सिद्धांत एकवीस समासींतहि आहे.

**तिसऱ्या** समासांत स्मरणभक्तीचा विचार आहे. नामस्मरणाला काळाची अडचण नाहीं. मनुष्य कोणत्याहि स्थितींत असो, त्याला नामस्मरण करतां येतें. नामस्मरणानें संकटांचा, विघ्नांचा परिहार घडतो, उत्तम गति लाभते; भूतपिशाच्च, ब्रह्मग्रह, ब्रह्मसमंध, मंत्रचळ, चेटकें, विषबाधा या उपद्रवांतून नामनिष्ठ सुटतो (११–१३). शंकर नामस्मरणाचा पुरस्कर्ता आहे, वाल्मीकीला उलटा नामोच्चार तारक झाला, नाना आघातांपासून प्रल्हाद वांचला, अजामीळ पावन ठरला, फार काय, 'नामें पाषाण तरले' (१८). परमेश्वराचीं हजारों, नव्हे, अनंत नामें आहेत, त्यांतल्या एखाद्याच्या आधारानें सार्थक घडतें. नामस्मरणाला जाति-वर्ण हे आडवे येत नाहींत, वरिष्ठ-कनिष्ठ हा भेद नडत नाहीं (२४).

**चौथा** समास पादसेवनाचा आहे. देवाच्या पायाची सेवा करायची असा त्या शब्दाचा साधा अर्थ असतां त्याला सद्गुरुसेवेचें गंभीर स्वरूप दिलें आहे. सद्गुरूशिवाय परब्रह्माचें यथोचित ज्ञान साधत नाहीं, असें सांगून समर्थ एकदम खोल विचारांत शिरले आहेत. जोंवर ब्रह्माचा अनुभव आपण घेत आहों, असें आपल्या निराळेपणानें समजण्याच्या अवस्थेंत साधक असतो तोंवर अहंपणाचा संग सुटत नाहीं. अहंपणाचा संग सुटला कीं आपण अनुभव घेत आहों हें भान संपतें. साधक

अनुभवांत बुडून जातो. संगत्याग, निवेदन, विदेहस्थिति, अलिप्तपण, सहजस्थिति, उन्मनी, विज्ञान या साऱ्या शब्दांचा अर्थ एकच (८); सद्गुरुसेवेनें हें सर्व गळीं उतरतें. पुढें या स्थितीची आणखी थोडीशी चर्चा समर्थांनीं केली आहे. सद्गुरुसेवा ही चौथी भक्ति असें पुनः पुनः बजावून ती अतिश्रेष्ठ असा समर्थांचा अभिप्राय व्यक्त झालेला आहे.

**पांचवा** समास अर्चनभक्तीचा असून यांत देवब्राह्मण, अग्नि, साधुसंत यांचें पूजन करावें, हें सांगितल्यावर देव म्हणून मानल्या जाणाऱ्या सर्व दगडाधातूच्या मूर्तींचा व क्षेत्रदेवतांचा पाढा समर्थांनीं वाचला आहे. यांत नाणींदेखील आहेत. १०–११ या ओव्यांत संख्येंतील २४ नांवांचा भरणा पहायला सांपडतो. जाखमाता, मायराणी यासारख्या लहान लहान देवतांना समर्थ विसरलेले नाहींत. अर्चनांत कुळधर्मालाहि स्थान आहे. नंतर सत्त्वगुणांतील वर्णनाप्रमाणें देवळाच्या वैभवाचीं अंगोपांगें निर्देशिलीं आहेत. देवाला अर्पावयाच्या पदार्थांत 'लेकुरें देवाळईं समर्पावीं ॥ २८' असेंहि वाक्य आढळतें. देवासारखीच सद्गुरुसेवा करावी (३०). पूजेचा असा प्रत्यक्ष व्यवहार शक्य नसेल तर मानसपूजा करावी. 'मनें भगवंतास पूजावें। कल्पून सर्व हि समर्पावें।' (३२) ही मानसपूजेची व्याख्या आहे. 'जें जें आपणास पाहिजे। तें तें कल्पून वाहिजे। ३३' या क्रियेला मानसपूजा म्हणतात.

**सहावा** समास वंदनभक्तीचा आहे. देवाला जसें नमन करावयाचें तसेंच साधुसंत-सज्जनांना करावें, सूर्याला नमस्कार करावे. (या अनेकवचनी प्रयोगावरून सूर्यनमस्काराच्या व्यायामाचा विचार मनाला स्पर्श केल्याशिवाय रहात नाहीं.) सद्गुरूला 'साष्टांग भावें' नमस्कार करावा. साष्टांग नमस्काराचा मान फक्त प्रतिमा, देव आणि गुरु यांचाच आहे. शंकर, विष्णु, सूर्य आणि मारुति या चार देवांना मात्र नित्य नियमानें नमस्कार करावा. सद्गुरु ओळखण्याची एक खूण 'जेथें दिसती विशेष गुण। तें सद्गुरूचें अधिष्ठान। ९' अशा रीतीनें समर्थांनीं सांगितली आहे. देव आणि सत्पात्र सद्गुरु हा नमस्काराचा द्विविध मार्ग आहे. नमस्कार ही एक बिनखर्चाची, विनकष्टाची व बिनसामग्रीची क्रिया आहे (२२). परंतु तिचा परिणाम मात्र मोठा आढळतो. लीनता, विकल्पत्याग, सख्य हीं नमस्काराचीं फळें आहेत. अन्यायाची क्षमा नमस्कारानें मिळवितां येते. या विवेचनांत समर्थांनीं एक

कौतुकास्पद कोटी केली आहे. नमस्कारासाटीं माणसाला आपलें डोकें खालीं वांकवावें लागतें. डोकें छाटलें जाऊन खालीं पाडणें ही शिक्षेची परमसीमा समजली जाते. 'सिसापरता नाहीं दंड । ऐसें बोलती उदंड । १६' आपण स्वयंप्रेरणेनें व नम्रतेनें डोकें खालीं लववून नमस्कार केल्यानें वरील शिक्षा भोगल्यासारखें होऊन दुसऱ्याची प्रसन्नता, कृपा आपल्या पदरांत पडावी हें सरळ आहे. 'परम अन्याय करूनि आला । आणी साष्टांग नमस्कार घातला । तरी तो अन्याये क्षमा केला । पाहिजे श्रेष्ठीं ॥२०' शेवटच्या ओवींत (२५) नमस्कार ही भक्ति श्रेष्ठ; कारण 'नमस्कारें बोळती वरिष्ठ' असें म्हटलें आहे.

या समासांत चार देवांना नेहमीं नमस्कार करण्याचा उपदेश आहे; परंतु 'अं त र्भा व' प्रकरणांत फक्त मारुति सूर्याचें दर्शन घेण्याविषयीं दोन वेळां समर्थांनीं सांगितलें आहे. अंतर्भावाच्या तिसऱ्या समासांत 'त्रिकाळ घ्यावें दर्शन । मारुति सूर्याचें ॥ ११' असें एकदां बजावलें असतां पुनः शिष्याला या संबंधाचा विसर पडल्याचें पाहून 'त्रिकाळ दर्शनीं साक्षेप । आदित्य मारुतीचें रूप अवलोकावें ॥२०'। असें समर्थांनीं म्हटलें आहे. पुढें मारुति न पाहिल्याचा खेद वाटण्याची आवश्यकता प्रतिपादिली आहे (२४).

**सातवा** समास 'दास्यभक्ती'चा आहे. या भक्तीच्या विवेचनांत फिरून एकदां देवाच्या वैभवाचें साहित्य आणलेलें आहे. सत्त्वगुण, अर्चन, या प्रकरणाशीं तुलना केल्यास समर्थांच्या ध्येयाचा स्वच्छ सुगावा लागतो. दुसऱ्या ओवीपासून सोळाव्या ओवीपर्यंत देवाच्या वैभवासाठीं काय काय करावें याची वाच्यता असून शेवटीं 'देवाचें वैभव वचनें । किती म्हणौनि बोलावें ॥१६॥' असें समर्थांनीं टेकीस आल्याप्रमाणें उद्गार काढले आहेत. जयंत्या, पर्वें वगैरे महोत्सवाच्या प्रसंगीं वैभवाचा असा उत्कर्ष करावा कीं ज्या योगानें स्वर्गीच्या देवांनासुद्धां तटस्थ व्हावें लागेल. 'ऐसें वैभव चालवावें' (१९). यानंतर फिरून वैभवसाहित्याची नामावळि दिलेली आहे. देवाचें दास्य तर करावेंच पण तसेंच सद्गुरूचेंहि करावें, 'प्रत्यक्ष न घडे तरी मानसपूजेचें । करित जावें ॥२८' समर्थांच्या हृद्गतानें येथेंहि आपला प्रभाव गाजविला आहे.

**आठवा** समास 'सख्यभक्ती'चा आहे. देवाशीं सख्य जुळवायचें तर जें देवाला

रुचतें त्यासारखें वागणें हाच एक उपाय आहे. देवाच्या सख्यत्वासाठीं आपल्या सौख्यावर पाणी सोडावें, इतक्यानें न भागलें तर 'अनन्यभावें जीवें प्राणें । शरीर तें हि वेंचावें ॥६' देवाची काळजी करावी, देव हाच बोलण्याचा विषय असावा (७). याच संदर्भांत 'देवाच्या सख्यत्वासाटीं । पडाव्या जिवलगांसी तुटी । सर्व अर्पावें सेवटीं । प्राण तो हि वेंचावा ॥८' ही प्रसिद्ध ओवी रचली गेली आहे. देवाचें सख्य राखण्याचें मर्म आपल्याच हातीं असतें. हें स्पष्ट करण्यासाटीं 'ये यथा मां प्रपद्यन्ते–' हें गीतावचन आधारास घेतलें आहे. पूर्वी (३ : १० : १३–१४) एकदां याचें विवेचन आलें आहे. तेव्हां आरशांतल्या प्रतिबिंबाचा दाखला दिला आहे. 'जैसें जयाचें भजन । तैसा चि देव हि आपण । म्हणौन हें आवघें जाण । आपणा चि पासीं ॥१४' आपल्या मनासारखें होत नाहीं म्हणून निष्ठा मोडते तेव्हां देवापासून दुरावण्याचा दोष आपल्याकडेच येतो (१६). मेघचातक, चंद्रचकोर यांच्याप्रमाणें आपलें भगवंतावरील ममत्व बळकट असावें. 'सखा, माता, पिता, विद्या, लक्ष्मी, वित्त 'सकळ परमात्मा' या ओवींत (१८) 'त्वमेव माता पिता त्वमेव त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव' या विख्यात श्लोकार्थाचा अंतर्भाव केलेला आहे. 'देवाचें जें मनोगत । तें चि आपुलें उचित ॥२२' या ओवींत 'अगा जयाचेंवि हित । तें ईश्वराचें मनोगत' या ज्ञानेश्वरवचनाचा (१८ : ९११) अनुवाद आढळतो. देवाची कृपा मातेच्या वत्सलतेहून वरचढ, कारण विपत्तिकाळीं 'माता वधी बाल्कासी' (२४) पण 'देवें भक्त कोण वधिला । कधीं देखिला ना ऐकिला । २५' नंतर देवाच्या कृपेचा खुलासा असून शेवटीं 'जैसा देव तैसा गुरु' म्हणून 'सख्यत्वाचा प्रकारु । सद्गुरूसीं असावा ॥३२' या ध्रुवपदाची वाच्यता आहे.

'आत्मनिवेदन' ही भक्तीची पराकाष्ठा नवव्या समासांत चर्चेला घेतलेली आहे. निविद् या शब्दाचें निवेदन हें एक रूप असून निवेद्य नैवेद्य हा त्याचा दुसरा पर्याय आहे. देवाला जें समर्पण करावयाचें त्याला नैवेद्य म्हणतात. आत्मनिवेदन म्हणजे स्वतःचें समर्पण करणें. देवमय होऊन जाणें, देवाहून आपली कोणत्याहि प्रकारें भिन्नता नसणें. या कल्पनेंतूनच समर्थांनीं भक्त म्हणजे विभक्त नव्हे (६) ही कोटी निर्माण केली आहे. 'भक्त ऐसें म्हणावें । आणी विभक्तपणेंचि भजावें' हा प्रकार विलक्षण ठरतो. विभक्तपणा नष्ट होण्यासाठीं 'आपण कोण' याचा निवाडा प्रथम करावा लागतो. 'मी' या शब्दानें ज्याचें ग्रहण केलें जातें तो देह पंचभूतांचा, पंच-

भूतें मायेंतून निघालीं, मायेचा जन्म ब्रह्माच्या ठिकाणीं स्फुरण पावणाऱ्या संकल्पांतून होतो, असा माग काढीत गेलें म्हणजे 'मी' या नांवाचें निराळें अस्तित्वच उरत नाहीं. मुख्य परमेश्वर, दुसरी जगदाकार प्रकृति तेव्हां 'तिसरा आपण कैंचा चोरु। आणिला मधें ॥ ११' हाच विचार समर्थांनीं या समासांत अनेक प्रकारें सांगून देवाभक्ताच्या अनन्यभावाला आत्मनिवेदन म्हणतात, असें तात्पर्य शिकविलें आहे. नवविधाभक्तीनें सायुज्यमुक्तीचा लाभ होतो. ही मुक्ति अविनाशी आहे. सलोकता, समीपता, स्वरूपता या तिन्ही मुक्ती नश्वर आहेत.

**दहावा** समास 'चार मुक्तीं'च्या विवेचनाचा आहे. पहिल्याच ओवींत 'ज्ञान-दशका'चा उल्लेख करून पृथ्वीची माहिती दिली आहे. सात समुद्र, मेरु पर्वत, लोकालोक पर्वत, हिमाचल यांचीं नांवें दाखल करून हिमाचलाबद्दल म्हटलें आहे कीं, येथें धर्म व कृष्ण याखेरीज सारे पांडव गळून पडले, त्यावर जातां येत नाहीं, तेथें महासर्प थंडीनें सुखावून सुस्तावून पर्वतप्राय पसरलेले आहेत. बद्रिकाश्रम, बद्रीनारायण या ठिकाणीं महातापसी निर्वाण देहत्यागार्थ जातात. अलीकडच्या। बद्रीकेदाराला लहानथोर लोक जाऊन येतात. हा सगळा मेरूचा विस्तार समजावा. मेरूच्या तीन शिखरांना कैलास, वैकुंठ, सत्यलोक अशीं नांवें असून त्यांवर अनुक्रमें शंकर, विष्णु व ब्रह्मदेव हे रहातात. इंद्राचें स्थळ अमरावती हें त्यांच्या खालीं आहे. समर्थांच्या अमरावतीवर्णनांत ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायांतील अमरावती-वर्णनाच्या छटा दिसतात. कामधेनूंचीं खिल्लारें, कल्पतरूंच्या बागा, चिंतामणींची विपुलता, गंधर्वांचीं गाणीं, इत्यादि मजकुरांत शब्द निराळे असूनहि साम्य दिसतें. ज्या देवाचें भजन त्या देवाच्या स्थानीं रहाण्याची संधि ही सलोकतामुक्ति, देवाच्या समीप रहातां येणें हें समीपतामुक्तीचें लक्षण, देवासारखें रूप प्राप्त होणें ही स्वरूपतामुक्ति, पण विष्णूचें रूप लाभलें म्हणजे श्रीवत्स, कौस्तुभ, लक्ष्मी यांचाहि लाभ होतो, असें मात्र समजूं नये. पुण्याई असेल तोंवरच देवलोकीं रहातां येतें. पुण्याई संपतांच देवलोकांतून हकालपट्टी होते, हें लक्षांत ठेवावें (गीता ९ : २१). सायुज्यमुक्ति ब्रह्मांडाच्या नाशाबरोबर विलय पावत नाहीं. सद्गुरु केल्यानें याचा स्पष्ट बोध होतो.

दासबोधाच्या या दशकांत नवविधाभक्तीचें विवरण सविस्तर असल्याचें निदर्शनास

आलेंच आहे. समर्थांच्या इतर वाङ्मयांत आलेले नवविधा भक्तीचे उल्लेख येथें नमूद केल्यास या विषयाची सांगता होईल. ओव्याशतकांतील पांचव्या शतकांत नवविधा भक्ति, चार मुक्ति व शेवटीं पांच प्रलय इतके विषय एकत्र दिलेले आहेत. भक्तीचें अंतिम साध्य जें मुक्ति तें भक्तीच्या सोबतीनें सांगण्याचा समर्थांचा संकेत सदर ओव्याशतकांत दिसून येतो. स्फुट ओव्यांच्या ७ व्या आणि २३५ व्या गुच्छांत नवविधा भक्ति आहे, मुक्तीचें नांव तेथें नाहीं. यांपैकीं दुसऱ्या गुच्छांत या भक्तीचा अगदींच त्रोटक विचार आहे. पंचमानांत (श्रीरामदासांची कविता, खंड १, पान २५१) असाच प्रकार असून पंचसमासीच्या ४ थ्या समासांत त्याचीच आवृत्ति दृष्टीस पडते (श्रीरामदासांची कविता, द्वितीय खंड, लघुकाव्यें, पान ६६) समर्थांच्या अंतरंगांत कित्येक कल्पना कशा दृढमूल होत्या याचें एक उदाहरण येथें पहाण्याला हरकत नाहीं. चौथ्या दशकाचा तिसरा समास स्मरणभक्तीचा आहे. नामाचा महिमा शंकर जाणतो व तसा तो त्याचा उपदेश करतो. रामनामामुळेंच वाराणसी क्षेत्राला मुक्तिक्षेत्र समजतात, ही कल्पना ' रामन्नामें मुक्त क्षेत्र वाराणसी । सीव उपदेसी रामन्नाम ॥ २६ ' याप्रमाणें ओव्याशतकांत दाखल झालेली आहे.

आत्मनिवेदन ही सर्वांत श्रेष्ठ भक्ति. तिचा गौरव जसा दासबोधांत अनेक स्थळीं केलेला आहे तसाच समर्थांच्या इतर ग्रंथांतूनहि पहायला सांपडतो. ओव्याशतकांत ' निजभक्ती जेथें विभक्ती नाढळे ' या शब्दांनीं ' भक्त म्हणिजे विभक्त नव्हे ' हा अर्थ उघड केला आहे. पंचीकरणयोगाच्या पांचव्या योगांत ' ऐसें निर्गुण जाणिजे ' या पालुपदाच्या दहा श्लोकांपुढें ' आत्मनिवेदनी क्रिया ' या पालुपदाचे दहा श्लोक आहेत. तेथेंहि ' अभेद भक्तीच्या योगें । आत्मनिवेदनी क्रिया ॥ १८ ' असें म्हटलें आहे ( श्रीरामदासांची कविता, भाग १, पान ३२५ ).

• ५ •

पांचव्या दशकाला ' मंत्राचा ' असें नांव आहे. प्रारंभीं सद्गुरूला नमन आहे. त्यामुळें एकदां हा पहिला समास स्वतंत्रपणें रचला गेला व नंतर त्याला पुढचे समास जुन्या एकवीससमासी दासबोधांतून घेऊन जोडले असें म्हणावें लागतें. या दशकांत गुरु, सद्गुरु, शिष्य यांची प्रथम तात्त्विक चर्चा करून समर्थांनीं स्वकालीन संप्रदायांचा, उपदेशांचा विचार मांडला आहे. सहाव्या समासांत आत्म-

ज्ञानाज्ञानाचा ऊहापोह आहे व अखेरचे चार समास बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध या चौघांच्या वर्णनानें व्यापलेले आहेत.

**पहिला** समास गुरुनिश्चयाचा आहे. सामान्य व्यवहारांत शास्त्रानें ब्राह्मणांना गुरुत्व दिलें असल्यामुळें सुरुवातीस ६–१८ ओव्यांत ब्राह्मणांचा महिमा गाइला आहे. ब्राह्मण क्रियाहीन असला तरी त्यालाच अनन्यभावें शरण जावें (६), ब्राह्मणा-करितां नारायणानें अवतार घेतला, ब्राह्मणांच्या वचनानें शूद्रांनादेखील ब्राह्मणत्व येतें, धातुपाषाणांना देवपणाला पोंचविण्याचें सामर्थ्य ब्राह्मणाचें आहे, साऱ्या कर्ममार्गाचा मुख्य आधार ब्राह्मणच होत. ब्राह्मणांची अशी योग्यता लक्षांत घेऊन ‘जरी ब्राह्मण मूढमती । तरी तो जगद्वंद्य ॥ १५’ तथापि त्याच्या मोठेपणाला मर्यादा आहे. स्वधर्मकर्मी ब्राह्मण पूज्य असला तरी तो ब्रह्मज्ञान सांगण्याला अधिकारी नाहीं. तो अधिकार एकट्या सद्गुरूचा आहे. यासाठीं सद्गुरूचीं पावलें धरावीं. सद्गुरु व साधु हे एकच असल्यामुळें ‘जयास वाटे देव पाहावा । तेणें सत्संग धरावा । २३’ असें समर्थांनीं म्हटलें आहे. स्नान, दान, तीर्थाटन, विद्या-भ्यास, कीर्तन, पुराण, मोठ्या थाटाचें देवार्चन, यज्ञयाग, उपोषणनियम, इत्यादि सारीं कर्में व त्यांचीं ऋद्धिसिद्धींच्या प्राप्तीसारखीं फळें यांचा खऱ्या स्वहिताच्या दृष्टीनें उपयोग नाहीं. सद्गुरूच्या वाटाडेपणाखेरीज हा सारा कारभार आंधळ्या-प्रमाणें समजावा. पूर्वीं थोराथोरांनीं सद्गुरूचा आश्रय केल्याचीं उदाहरणें आहेत. रामकृष्णादि अवतार व हरिहरब्रह्मादिक हे सारे सद्गुरुपदीं रंक होऊन राहिले होते. एवढ्यासाठीं ‘जयासि मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरु करावा । ४४’

**दुसरा** समास (एकवीस समासींतील चौथा) ‘गुरु’ शब्दानें ओळखल्या जाणाऱ्या नानाविध व्यक्तींच्या माहितीकरितां लिहिलेला आहे. जन्म देणाऱ्या आईबापांपासून तो एखादी लहानसान विद्याकला शिकविणारापर्यंत वाटेल तेवढ्यांना ‘गुरु’ म्हणतां येतें. पण त्यांना सद्गुरूची सर येणार नाहीं. जो ब्रह्मज्ञान उपदेशून ब्रह्मात्मैक्य, जीवशिवाचें अद्वैत, देवाभक्ताची एकरूपता हीं घडवितो, जो मायाजाळांत, वासनेच्या महापुरांत सांपडलेल्यांना तारतो, जो वेदाचा रहस्यार्थ शिष्याच्या हृदयांत ठसवितो, त्यालाच सद्गुरु ही पदवी शोभते (९–१८). संदेहाचा समूळ नाश करणारा, स्वधर्माचें आदरानें पालन करणारा, वेदाच्या मर्यादेंत रहाणारा,

तोच सद्गुरु. जो स्वेच्छाचारानें वागेल तो सद्गुरु नव्हे. ज्ञानाचा उपदेश, अविद्येचा उच्छेद करून शिष्यांना जितेंद्रियत्वाची शिस्त लावील तो सद्गुरु (२२). द्रव्याला विकलेला, शिष्यांचा अंकित असा जो असेल तो अधमाहून अधम, 'चोरटा मैंद पामरु । द्रव्यभोंदु' (२५) असा त्यावर समर्थांनीं कुशब्दांचा भडिमार केला आहे व पुनः सद्गुरूच्या गुणांकडे समर्थ वळले आहेत. परंतु लगलीच त्यांनीं असद्गुरूकडे कटाक्ष टाकला आहे. अद्वैताच्या निरूपणकाळीं वक्तृत्व अगाध असूनहि जो विषयलुब्ध असेल, निरूपणाचें प्रसंगमान पाहून जो तसें बोलेल, चमत्कारानें ज्याची बुद्धि डळमळेल तो असद्गुरु असें समर्थांचें विवेचन आहे. सद्गुरूच्या बुद्धींत कसलीच दुराशा वसत नाहीं. यापुढें सद्गुरूच्या गुणांची समर्थांनीं यादी जोडली आहे (४५–५०). सद्गुरूनें उचित विहित कर्में केलीं पाहिजेत. ब्रह्मज्ञानाला भजनाची जोड पाहिजे. म्हणून 'ज्ञान वैराग्य भजन स्वधर्मकर्म साधन कथा निरूपण श्रवण मनन नीति न्याय मर्यादा।' (५२) यांत जर एक उणें असेल तर तेवढ्या मानानें सद्गुरु कच्चा, 'म्हणौन सर्व हि विलसे । सद्गुरुपासीं ॥ ५३'. सद्गुरु हा बहुतांचा पालनकर्ता असतो, त्याला बहुतांची चिंता करावी लागते. त्यामुळें त्याच्याजवळ नाना साधनें सज्ज असावीं लागतात. परमार्थाला साधनांचा (भजनादि कर्मांचा) आधार असतो. जे आचारउपासना सोडतील ते भ्रष्ट अभक्त–'जळो तयांची महंती ॥' (५६). नीच यातीचा गुरु करूं नये. अशा गुरूचा प्रसाद घेण्याची चोरी, प्रसाद टाळला तर गुरुसेवेला बट्टा लागतो, गुरूची मर्यादा राखावी तर ब्राह्मण क्षोभतात, ब्राह्मण्य सांभाळायला जावें तर गुरुक्षोभ घडतो. नीच यातीला गुरुत्व न देणें हाच एक या दुहेरी पेंचांतून सुटण्याचा मार्ग आहे. त्यांतून एखाद्याला असा गुरु सेवावासें वाटलें तर त्यानें एकट्यानें भ्रष्टता स्वीकारावी, इतरांना आपल्याबरोबर भ्रष्टाचारांत लोटूं नये (५८–६३). 'स्वयातीचा पाहिजे गुरु । ६४' हा पर्याय सर्वांत उत्तम. शेवटीं पुनश्च एकवार विविध गुरूंचा पाढा वाचून त्याहून सद्गुरु निराळा असें म्हटलें आहे.

'नीच यातीचा गुरु करूं नये' हें समर्थांचें मनोगत पाहून त्यांच्याविषयीं बरेच कुतर्क बोलले गेल्याचें व बोलले जात असल्याचें जाणत्यांना सांगायला नको. 'नीच' हा शब्द समर्थांनीं कुणाला अनुलक्षून वापरला आहे याचा नीट विचार केल्यास निघणाऱ्या कुतर्कांना विशेष आधार उरण्याचा संभव नाहीं. दासबोधाच्या येथवरील

समासांत 'नीच' हा शब्द थोड्याच वेळां आलेला आहे. दुसऱ्या तिसऱ्या दशकांत तो त्यांतल्या त्यांत जास्त वेळां आढळतो. दुसऱ्या दशकाच्या पहिल्या समासांत 'नीच यातीसीं सांगात । २९', 'नीच जनास वंदी । ३८', याप्रमाणें तो दोनदां दृष्टीस पडतो. दुसऱ्या समासांत 'नीच यातीचा गुरु करूं नये । ३९' अशी स्पष्ट शिकवण आहे. नीच यातीचा गुरु केल्यानें कोणत्या भानगडी उपस्थित होतात याची चर्चा पांचव्या दशकांत विस्तारशः केलेली आहे. पहिल्या दोन उल्लेखांवरून 'नीच' कोण हें गूढ उकलत नाहीं. तें उकलण्याचें साधन तिसऱ्या दशकाच्या पांचव्या व सातव्या समासांत आहे. 'स्वगुणपरीक्षे'च्या कथानकांतील नायकाची तरुण सुंदर बायको परचक्राच्या धाडींत पळवून नेली जाते व नंतर ती भ्रष्टली असें त्याला कळतें. बायकांच्या बाबतींतला हा व्यवहार त्या दशकाच्या सातव्या समासांतहि सांगितलेला आहे. बायकांना भोगाव्या लागणाऱ्या आधिभौतिक तापांत 'परचक्रीं धरून नेलें । नीच यातीस दिधलें । दुर्दशा होऊन मेलें । २९' असें वर्णन आहे. परचक्रांत सांपडणाऱ्या बायकांची विटंबना करण्याचा प्रकार मुसलमानांचा हें ध्यानांत घेतलें म्हणजे समर्थांचा 'नीच' कोण याचा बोध होतो. स्वगुणपरीक्षेंतील बायको भ्रष्टविणारासुद्धां तोच. १४ व्या दशकाच्या ७ व्या समासांत 'नीच' गुरूच्या माहितीमध्यें दावलमल्क, पीर व स्वेच्छेचें धर्मांतर, अशा तीन गोष्टी एकत्र असल्यामुळें नीच म्हणजे कोण याविषयीं शंका रहात नाहीं. १९:५६:१३ मध्यें तुर्क गुरु, चांभार शिष्य वगैरेंचा स्पष्ट उल्लेख आहे. त्या काळांत मुसलमानांचा बडेजाव असल्यामुळें द्रव्यासाठीं त्यांची सेवा करण्याची पाळी हिंदूंवर ओढवत होती असें स्वगुणपरीक्षेच्या चौथ्या समासांतील 'नीच सेवा अंगीकारिली । १६' या वाक्यावरून समजावें लागतें. 'येका दुर्भराकारणें । नाना नीचांची सेवा करणें' (३:१०:५४) या वाक्यांत पहिल्यांतलाच अर्थ आहे. ही चाकरी अति कष्टाची, केव्हां केव्हां तिच्या पायीं शरीर विकावें लागतें हा खुलासा ज्याची चाकरी त्यावर जास्त प्रकाश टाकणारा आहे. त्यालाच डोळ्यांपुढें ठेवून 'नीच यातीसीं सांगात' व 'नीच जनास वंदी' हीं कृत्यें समर्थांनीं मूर्खलक्षणांत घातलीं आहेत. जेथें असा विवक्षित नीच त्यांच्यासमोर नव्हता तेथें त्यांनीं साधा 'हीन' शब्द योजला आहे.

नीच म्हणजे मुसलमान नव्हे, असा अर्थ फक्त एकाच ठिकाणीं संभवतो. दुसऱ्या दशकाच्या सातव्या समासांत 'नीच कृत्य आंगीकारी' असें ३५ व्या ओवींत म्हटलें

आहे. तेथें देवदेवळांच्या सेवेचा विषय असल्यामुळें लोकांतील आपल्या थोरवीकडे लक्ष न देतां हा भक्त अति निकृष्ट वाटण्याजोगें कृत्य करायला मागेंपुढें पहात नाहीं, असें समजणें भाग आहे.

**तिसरा** समास शिष्यलक्षणाचा असून फार मोठा म्हणजे १०४ ओव्यांचा आहे. सद्गुरूला सच्छिष्याखेरीज शोभा नाहीं व सफलता नाहीं. खताळ जमीन व उत्तम बीज यांच्यासारखा सद्गुरुशिष्यांचा संबंध आहे. जमीन सुपीक व बीज सकस अशा सुयोगानें शेत पेरलें-उगवलें तरी त्याची निगा करावी लागते, नाहीं तर पीक हातचें जातें; त्याप्रमाणें शिष्याच्या बुद्धींत गुरूची शिकवण रुजली, उगवली, तरी शिष्यानें साधनें चालवून ती शिकवण पिकविली पाहिजे. जेवण आटोपलें तरी जेवणाच्या साहित्याची हेळसांड करून चालत नाहीं तसाच हा प्रकार आहे. सत्कर्म, सद्वासना, सदुपासना, स्वधर्म, सत्संग, नित्यनेम हीं एकत्र असतील तर ज्ञान निवळतें, नाहीं तर समुदायांत पाखंड संचरतें. सद्गुरु असच्छिष्याला सुधारूं शकतो, पण सच्छिष्य असद्गुरूला ताळ्यावर आणूं शकत नाहीं. यापुढें सच्छिष्याचीं लक्षणें १९–३३ ओव्यांत गोविलेलीं आहेत. ३४ वी ओवी एखाद्या शब्दाच्या फरकानें ३:६ मध्यें आलेली आहे (७). जो संसारदुःखें दुखवला । त्रिविध तापें पोळला । तोचि अधिकारी जाला । परमार्थविषीं ॥ ही ओवी जुन्या एकवीस समासी दासबोधाच्या कल्याणकृत प्रतीमध्यें पहिल्या समासांत आहे. येथील ३५ वी आणि ३८-वी या ओव्याहि त्या प्रतीच्या सदर समासांत थोड्याशा फरकानें आढळतात. हा सगळा समासच जुन्या दासबोधांतला आहे. त्याची रचना चालतांना कांहीं समान विचाराचे दोन समास लिहिले गेले या कल्पनेनें कल्याणप्रतींतल्या ओव्या इकडे आल्या असा उलगडा मानण्याखेरीज गत्यंतर नाहीं. ज्याला संसार त्रासाचा वाटतो तोच सद्गुरूचा विश्वास धरतो. सद्गुरूविषयीं दृढ विश्वास हें सच्छिष्याचें मुख्य लक्षण आहे. सद्गुरूपेक्षां देव ज्याला मोठा वाटेल तो करंटा समजावा. यानंतर सद्गुरु देवाहून श्रेष्ठ कसा, हें स्पष्ट केलें आहे (४१–४६). सद्गुरुकृपेचीं फळें ४७-५२ मध्यें सांगितलीं आहेत.

येथवर सद्गुरु, असद्गुरु व सच्छिष्य यांची पहाणी केली. ५४ व्या ओवीपासून असच्छिष्याची हजेरी घेतलेली आहे. ५४ व्या आणि ६७ व्या ओवींत त्याला 'पढत-

मूर्ख' हा शब्द लावला असल्यामुळें हा शिष्य दुसऱ्या दशकांतील मूर्खांच्या कोटींतला हें ध्यानांत येण्याला अडचण पडत नाहीं. हा सद्गुरूला शरण जातो तरी त्याची प्रपंचाकडील ओढ सुटलेली नसते. परमार्थाचा त्यानें विनोद चालविलेला असतो. या लफंग्या शिष्यावर डुकर, रेडा, गाढव, घुब्रड, कुत्रें, डोंबकावळा यांच्या दाखल्याचे कोरडे समर्थांनीं ओढले आहेत. याला पश्चात्ताप झाल्यास प्रायश्चित्त घेतां येतें. त्यानें सद्गुरूला शरण जाऊन त्याचा संतोष साधावा, त्याच्या कृपादृष्टीनें तो शुद्ध होऊं शकतो (७२). स्वामीचा (सद्गुरूचा) संतोष हाच एक त्याला तरणोपाय आहे. नाहीं तर यावच्चंद्रदिवाकरौ नरकवास हें त्याचें भवितव्य ठरलेलें आहे (७३).

कधीं तरी त्याला स्मशानवैराग्य उत्पन्न होऊन तो गुरूपुढें लोटांगण घालतो, पण ही खरें ज्ञान संपादण्याची तयारी समजू नये. गुरूच्या हातावर तुरी देण्याच्या इच्छेनें तो गुरूचा मंत्र घेतो. दोन दिवस त्याच्या सेवेंत घालवितो व दुसऱ्या गुरूकडे जातो. याप्रमाणें उदंड गुरु करून मिळवितो काय तर शब्दज्ञान व पाखंड. क्षणभर रडावें, तसेंच पडून रहावें; दुसऱ्या क्षणीं पहावें तर त्याच्या अंगीं वैराग्य चढलेलें दिसतें; तिसऱ्या क्षणीं ज्ञातेपणाच्या अहंभावानें तो ताठलेला आढळतो. विश्वासाच्या आविर्भावांतहि तो विरोधाची गुरगूर करायला चुकत नाहीं. पिसाटाप्रमाणें त्याचे नाना छंद चालू रहातात. येथें त्याची खरड कुविद्येच्या वर्णनांतील शब्दांनीं काढलेली आहे. कुविद्येच्या स्पष्टीकरणांतील (२:३) ४ व ६ या ओव्यांची रचना बहुतांशीं शब्दशः प्रस्तुत प्रकरणांत ७९ व ८३–८४ ओव्यांमध्यें उतरलेली आहे. तिकडचे अनेक दोषवाचक शब्द ८०–८२ ओव्यांत पसरलेले आहेत. दुसऱ्या दशकांतील मूर्खांचीं लक्षणें ८७–९७ या ओव्यांतून जिज्ञासूंना थोडयाशा प्रयत्नानें हुडकतां येतील. यासारखा सच्छिष्य नसतो. पुनः एकदां १०१ ओवींत पूर्वीच्या पढतमूर्खाचा उच्चार करून असच्छिष्य म्हणजे कोण याविषयीं शंका राहू दिलेली नाहीं. जगांत प्रापंचिकांची संख्या अतिप्रचंड असून ते सारे मूर्ख, त्यांच्यासाठीं समर्थांचें कळकळीचें सांगणें आहे कीं—

**प्रपंच सुखें करावा । परी कांहीं परमार्थ वाढवावा ।**
**परमार्थ अवघा चि बुडवावा । हें विहित नव्हे ॥ १०३**

समर्थांचें हें गुरु-सद्गुरु प्रकरण पंचमानांत 'गुरुशिष्यलक्षण' या नांवानें

आलेलें आहे. गुरुशिष्यांच्या लक्षणांचा विशेष विस्तार नसल्यामुळें त्याचा उतारा येथें सादर केल्यास समर्थांच्या विचाराची दिशा कळायला उपयोग होईल.

असद्गुरु :

शाक्त मुक्त अनाचारी । मंत्र येंत्र करामती ।
नाटकी चेटकी भोंदु । तो गुरु न मने मना ॥ १७
कर्मठु नित्य संदेही । ज्ञानहीण तमोगुणी ।
अवैरागी माहांडंभी । तो गुरु न मने मना ॥ १८
तीर्थें व्रतें तपें दानें । बहुधाशास्त्रनिश्चईं ।
प्रत्ययो नाडळे जेथें । तो गुरु न मने मना ॥ १९
असार कोण तें नेणे । सार तें तों कळेचिना ।
सर्व सार वदे लोकां । तो गुरु न मने मना ॥ २०
कर्ता कोण तो नेणे । नेणे चंचळ निश्चळु ।
त्रिगुण कोण ते नेणें । तो गुरु न मने मना ॥ २१

असच्छिष्य :

निष्ठाहीण अविश्वासी । वेसनी परघातकु ।
भ्रमिष्ट आळसी मंदु । तो शिष्य न पवे पदा ॥ २२
लालची तामसी वेडा । नष्ट भ्रष्ट बहुचकु ।
प्रज्ञाहीण प्रेत्नहीण । तो शिष्य न पवे पदा ॥ २३
सुखवासी गोडग्रासी । निकामीच निसंगळु ।
कदापी धारणा नाहिं । तो शिष्य न पवे पदा ॥ २४
विवरेना विचारीना । श्रवणीं मननीं कदा ।
प्रत्यय पाहिल्यावीण । तो शिष्य न पवे पदा ॥ २५
तत्त्वज्ञानें ब्रह्मज्ञानें । पिंडब्रह्मांडनायेकु ।
विवेकें चोजवीना जो । तो शिष्य न पवे पदा ॥ २६

अनेक गुरु, सद्गुरु, शिष्य, असच्छिष्य यांची माहिती एकनाथी भागवत अ. ३ श्लोक २१ च्या व अ. २९ श्लोक ३० च्या टीकेंत आलेली आहे. समर्थ व एकनाथ यांच्या विचारांची तुलना करण्याला ती उपयोगी आहे.

**चौथा** समास 'उपदेशा'चा आहे. यांत समर्थांचा उपदेश नसून त्यांनीं आपल्या काळांत देवाविषयीं जे मंत्र किंवा नामजप व योगसाधनें, किंवा जे संप्रदाय, पंथ किंवा ग्रह रूढ होते, त्यांची माहिती दिली आहे. 'ऐसी उपदेशांची स्थिती। पुरे आतां सांगों किती। ३०' ते असंख्यात आहेत. हे उपदेश ज्ञानावांचून व्यर्थ असल्याचें सिद्ध करण्यासाठीं कांहीं संस्कृत श्लोक नमूद केलेले असून 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिदमुत्तमम्' हा गीताश्लोकार्ध घेतला आहे. 'नानाशास्त्रं पठेल्लोकः' व 'शैवशाक्तागमाद्या' या शब्दांनीं सुरुवात असलेले दोन श्लोक समर्थांच्या विशेष पाठांतले असावे. कारण त्यांतल्या एकाचा पंचमानाच्या पहिल्या मानांत उल्लेख आढळतो (श्री रा म दा सां ची क वि ता, भाग १, पान ३५४). हे सर्व पंथ, संप्रदाय व उपदेश टाळून आत्मज्ञान संपादावें. आत्मज्ञान म्हणजे काय हें सांगण्याचें आश्वासन या समासाच्या अखेरीस आहे, परंतु उपदेशांप्रमाणेंच ज्ञान या संज्ञेनें ओळखले जाणारे जे व्यवहार आहेत, त्यांचा समर्थांनीं प्रथम आढावा घेतला आहे.

**पांचवा** समास 'बहुधा ज्ञाना'चा अर्थात् नानाविध ज्ञानाचा आहे. सृष्टींतील प्रत्येक पदार्थाच्या माहितीला ज्ञान समजणें ही सर्वथैव चूक होय, असा या समासाचा तात्पर्यार्थ आहे. एखाद्याला दुसऱ्याच्या मनांत काय चाललेलें आहे हें कळतें, त्याला परमज्ञाता म्हणतात, 'परंतु जेणें मोक्षप्राप्ती। तें हें ज्ञान नव्हे ॥३६'. हीं ज्ञानें मागच्या समासांतील उपदेशांप्रमाणेंच वाटेल तेवढीं आहेत, पण 'सायोज्यप्राप्ति होये जेणें। तें ज्ञान वेगळें ॥३७' असें सांगून मग त्या ज्ञानाचें विवेचन केलेलें आहे.

**सहावा** समास 'शुद्धज्ञाननिरूपण' या नांवाचा आहे. या समासाचा एक विशेष 'प्रदक्षिणा' भागांत मागें निवेदन केलेला आहे. जेथें संस्कृत-प्राकृताच्या तारतम्याची चर्चा असेल तें प्रकरण एकदां स्वतंत्र लिहिलेलें, या नियमान्वयें पाहिल्यास या समासाच्या स्वतंत्रतेचा आधार ३३-३५ या ओव्यांत सांपडतो. जे सांगतांना पुराणें, वेदवाणी हीं शिणलीं तें या क्षणीं गुरुकृपेनें बोधीन (३२). संस्कृत पाहिलेलें नाहीं व 'मन्हाष्ट ग्रंथीं' प्रवेश नाहीं, तेव्हां हृदयस्थ गुरुकृपामूर्तीच्या विश्वासानें बोधकार्याची शक्यता आहे. गुरुकृपा असल्यावर संस्कृत-प्राकृतांतील ज्ञानाच्या अभावाचा धाक नको असें म्हणून समर्थ आत्मज्ञानाच्या निरूपणाला प्रवृत्त झाले आहेत.

स्वानुभवाचा आविष्कार ही या समासाच्या स्वतंत्रतेची दुसरी खूण आहे. 'माझ्या स्वामीच्या वचनानें माझें समाधान झालें. तें माझ्या जीवीचें हितगुज तुला सांगतों' (४१-४२) ही स्वानुभवाची परिस्फुटता आहे. तिसरी खूण ४६ व्या ओवींत आहे. चौथ्या दशकाच्या उपान्त्य समासांत आत्मनिवेदनाचा विचार झालेला असतां सदर ओवींत 'नवविधा प्रकारें भजन। त्यांत मुख्य तें आत्मनिवेदन । तें समग्र प्रकारें कथन। कीजेल आतां ॥' असें म्हटलें आहे. हा समास लिहिला गेला तेव्हां नवविधा-भक्तीचा दशक सिद्ध झालेला नव्हता हा, किंवा त्यांतल्या आत्मनिवेदन प्रकरणाचें समर्थांना प्रस्तुत प्रसंगीं स्मरण नव्हतें हा, यांतील कोणता तरी एक तर्क स्वीकारावा लागतो. समर्थांवर विस्मरणाचा दोष लादण्यापेक्षां तो दशक या समासरचनेच्या काळीं लिहिला गेला नव्हता हा तर्क जास्त प्रशस्त ठरणारा आहे. या समासाच्या शेवटीं बद्धादि चार प्रकारांचा प्रश्न शिष्यानें उपस्थित केला आहे व पुढच्या समासांतून त्या संबंधाचें विवेचन आहे. दहाव्या समासांत 'ज्ञानदशका'चा निर्देश आहे तेव्हां तें दशक त्या समासापूर्वी लिहिलेलें होतें हें निर्विवाद आहे. म्हणून आणखी एक तर्क करावासा वाटतो कीं सहाव्यापासून दहाव्या समासापर्यंतची एक स्वतंत्र पंचकडी रचलेली होती. याविरुद्ध एक आक्षेप चौथ्या समासांतील २७ व्या ओवींतून निघण्यासारखा आहे. 'येक महावाक्यें सांगती। त्यांचा जप करावा म्हणती।' अशी माहिती त्या ओवींत आहे. 'माहांवाक्य उपदेश भला । परी त्याचा जप नाहीं बोलिला। ११' असें या सहाव्या समासांत म्हटलेलें आहे. यावरून चौथ्याच्या त्या ओवींतील माहितीचें निरसन होण्यासाठीं या समासांत वरील ओवी घातली म्हणजे त्यानंतर हा समास लिहिला असा वाद करतां येईल, परंतु या समासाची स्वतंत्र रचना दर्शविणाऱ्या पूर्वोक्त खुणा मान्य केल्यास या आक्षेपांत आणि वादांत फारसें अवसान उरत नाहीं. समासांचें पूर्वापरत्व सिद्ध करायला या आक्षेपाचा उपयोग नाहीं, हें थोड्याशा विचारानें कळण्याजोगें आहे. आतां प्रस्तुत समासांतील उपदेशांचें निरीक्षण करायला हरकत नाहीं.

देव कोण, सत्यस्वरूप म्हणजे काय, नित्य कोणतें, अनित्य कोणतें, या प्रश्नांचें बिनचूक उत्तर म्हणजे ज्ञान. याच्या प्रभावानें दृश्य प्रकृति, पंचभूतांची सृष्टि, द्वैत-भावना यांचा निरास होतो. हें ज्ञान मानवबुद्धीला अगोचर असून तर्क तेथें पोंचत नाहीं. चारी वाणींच्या तें पलीकडे असतें. दृश्य नाहीं, भान किंवा भास नाहीं, जेथें

जाणीव अर्थात् शब्दपांडित्य हें अज्ञान ठरतें, त्याला विमल शुद्ध स्वरूपज्ञान म्हणतात. सर्वसाक्षी तुर्यावस्था म्हणतात ती व ज्याला ज्ञान म्हटलें तें, हीं दोन्ही एकच कीं काय असा एक प्रश्न उपस्थित करून तुर्यावस्थेच्या सर्वसाक्षीत्वाला स्वरूपज्ञानांत अवकाश नाहीं असें त्याचें निराकरण केलें आहे. जेथें कांहींच उरलें नाहीं तेथें साक्षीत्व हा पहाण्याच्या क्रियेचा वाचक शब्द वायां जातो. तुर्यावस्थेंत द्वैतभाव वावरतो आणि शुद्ध स्वरूपज्ञान हें तर पूर्ण अद्वैत, तेव्हां या दोघांचा मेळ कसा जमणार? अहं-ब्रह्मास्मि, तत्त्वमसि इत्यादि महावाक्यांनीं व्यक्त होणाऱ्या स्थितीला ज्ञान समजतात म्हणून त्या वाक्यांचा उपदेश केला जातो. उपदेश ठीक आहे, पण त्याचा जप करावा ही कल्पना सपशेल चुकीची आहे. ती स्थिति बुद्धींत मुरविण्याचा अभ्यास केला पाहिजे. त्या स्थितीप्रमाणें निरंतर सावध राहून वर्तन करणें, अशी महा-वाक्याच्या विचाराची दिशा आहे. 'त्याचा जप करितां वृथा। शीण चि होय ॥१३' 'माहावाक्याचें विवरण। हें मुख्य ज्ञानाचें लक्षण ॥ १४.' जेथून हें सर्व उद्भवलें व हें जेथें लय पावणार त्याचें ज्ञान झाल्यावर कसलीच भ्रांति शिल्लक रहात नाहीं. सारांश, आपलें मूळस्थान शोधावें. मी कोण या शोधाचें पर्यवसान देहातीतत्व हें आहे. पूर्वीं व्यास वसिष्ठ शुक नारद जनक वामदेव वाल्मीकि अत्रि शौनिक सनक आदिनाथ मीन गोरक्ष इत्यादि मुनिज्ञानी ऋषीश्वरांनीं ज्ञानाच्या बळानें पैल पार गांठला. सिद्ध मुनि महानुभावांचा जो राजा तो महादेवदेखील या ज्ञानाच्या सुखांत गुंग असतो. साधनें, ग्रंथ यांचा हाच एक गहनार्थ आहे. येथून पुढें संस्कृत-प्राकृत भाषा, सद्गुरुकृपा यांचा विचार केलेला आहे. मागें गहनार्थ सांगितला, पण गहनाचें गहन म्हणजे आपल्या गुरूचें वचन. अहं ब्रह्मास्मीच्या अनुभवाला आत्मनिवेदन म्हणतात. कल्पांतीं सर्व सृष्टीचा नाश झाल्यावर ब्रह्म उरतें. सगळ्या सृष्टीबरोबर आपलादेखील नाश होतो. दुसरें कांहीं जर नाहींच, तर आपला पत्ता कुठें लागायचा? आहे तें सर्व खोटें म्हणून त्याला विवेकवंताची वृत्ति पाठमोरी झाली कीं दृश्य असून नसल्यासारखें होतें व विचारी पुरुष दृश्यापलीकडे अस-लेल्या ब्रह्मतत्त्वाशीं एकरूप होऊन जातो. हेंच आत्मनिवेदन. 'देह मी' असें ज्याला वाटतें तो आत्मघातकी (आत्महत्यारा). देहाभिमान हाच एक परमार्थाचा अति प्रबळ शत्रु आहे. एकांतांत स्वरूपस्थितीनें विश्रांति घेणें हें देहाभिमान जिंकण्याचें साधन आहे. वैराग्य पाहिजे; त्यावांचून समाधान मिळत नाहीं. 'जया पुरुषास

जें ध्यान। तयासि तें चि प्राप्त ॥६३ ' हा नियम ध्यानांत ठेवावा. यापुढें अविद्या, अज्ञान या शब्दांचा उपयोग करून दृश्यमिथ्यात्वाचें विवेचन केलें आहे. दृश्य हें दुःस्वप्न ज्ञानाच्या जागृतीनें नाहींसें होतें. विरक्ति ही जागृतीची किल्ली आहे. जागृति श्रवणमननानें संपादावी. अंगीं विरक्ति न बाणलेला पुरुष साधक मानावा. त्यानें साधन करावें. ज्याला साधन मानवत नाहीं तो सिद्ध असूनहि बद्धच गणावा लागतो. याप्रमाणें साधक, सिद्ध हे शब्द पुढें येतांच शिष्यानें हे कोण अशी पृच्छा केली व पुढच्या समासांना विषय फावले.

**सातवा** समास ' बद्धलक्षणा ' चा आहे. मागें एकदां सुचविलें आहे कीं, बद्ध व प्रारंभीं सांगितलेलें प्रपंचासक्त मूर्ख हे निराळे नव्हत. ' अंधारांतला आंधळा ' या दाखल्यानें पहिल्या झटक्यास बद्धाची ओळख करून देण्यांत आली आहे. ह्या दाखल्यास धरून पुढें त्याला काय दिसत नाहीं, याचें वर्णन केलें आहे. मग त्याला कळत काय नाहीं तें सांगितलें असून त्याच्या अंगीं कोणते गुण नसतात याचा पाढा नंतर वाचला आहे. तीर्थ व्रत दान पुण्य दया करुणा आर्जव मैत्री शांति क्षमा भक्ति ज्ञान वैराग्य, इत्यादि गुणांचा त्याच्या ठिकाणीं अभाव असतो हें वाचल्यावर पूर्वीच्या मूर्खांत व यांत भेद नसल्याचें सहज लक्षांत येतें. मध्यें एका ओवींत ' जयासि नाहीं आत्मज्ञान। हें मुख्य बद्धाचें लक्षण। १८ ' असें वाक्य आहे. नंतर तो कोणत्या दोषाचा ' बहु ' त्वानें धनी असतो याचें २२–३५ ओव्यांत स्पष्टीकरण आहे. त्याला द्रव्यदारेशिवाय दुसऱ्या कशाचा ध्यास नसतो याची माहिती ३९–४८ ओव्यांत आहे. बद्धाच्या अवगुणांत ' येककार ' (२८) हा प्रकार आलेला आहे.

**आठवा** समास ' मुमुक्षुलक्षणा 'चा आहे. आपल्या दुर्गुणांच्या व अपकर्मांच्या घोर पश्चात्तापानें ज्याचें हृदय अखंड होरपळत असतें तो मुमुक्षु. आपलें प्रत्येक कृत्य आठवून त्यांतील दोषाच्या जाणिवेनें मुमुक्षूचा जीव अहोरात्र हळहळतो. मग तो पुण्यमार्ग चोखाळूं लागतो, सत्संगाची वांच्छा धरतो, संसाराला विटतो. प्रतिक्षणीं तो मनांतल्या मनांत आत्मनिंदा करीत असतो. तीर्थयात्रा व शमदमादि साधनें यांकडे तो वळतो. समाधानासाठीं ग्रंथावलोकन करूं लागतो. संसाराचा स्वार्थ सांडून परमार्थाच्या हव्यासानें सज्जनांच्या अंकित व्हावें व मोक्ष साधावा असा निश्चय मुमुक्षूच्या अंगीं बाणतो.

**नववा** समास 'साधकलक्षणा 'चा आहे. ज्यानें अवगुण टाकले, संतसंग धरला, संतांनीं ज्याला आश्वासून जवळ केलें तो साधक असें ग्रंथांचें अभिवचन आहे. आत्मज्ञान बुद्धींत उमजून निवळलें तरी तें टिकण्याकरितां साधन करावें लागतें. श्रवण, अद्वैतनिरूपण, अर्थांतराचें मनन, इत्यादि अभ्यासांत तो दंग असतो. संदेह-निरसनार्थ तो सत्संगति धरतो. शेवटीं आपल्या, शास्त्रांनीं सांगितलेल्या व गुरूनीं दाखविलेल्या अशा त्रिविध अनुभवांची एकवाक्यता त्याला सिद्धीस नेतां येते. इतकी मजल गांठल्यावर त्याच्या अंतरंगांत बळावणाऱ्या परमार्थाच्या वैभवानें तो कसा झळकूं लागतो याचें समर्थांनीं केलेलें वर्णन अत्यंत आवेशाचें आणि वक्तृत्वसंपन्न आहे. विशेषतः ३५ पासून पुढच्या ओव्यांत साधकाच्या पराक्रमी बलाढ्यतेचें जें प्रदर्शन समर्थांनीं उघडलें आहे तें जिज्ञासूंनीं मुळांत पहावें. साधकाचा हा पराक्रम अंतर्गत आत्मशुद्धीचा आहे व त्या पराक्रमाचें प्रत्येक तेजस्वी अंग निवडक दणकेदार शब्दांच्या कोंदणांत बसवून समर्थांनीं जास्त आकर्षक बनविलें आहे. मासल्याकरितां त्या भागांतील कांहीं ओव्या पुढें दिल्या आहेत :

**अविद्येपासून फडकला । प्रपंचापासून निष्टला ।**
**लोभाचे हातींचा गेला । अकस्मात ॥ ३७**
**थोरपणासि पाडिलें । वैभवासि लिथाडिलें ।**
**महत्त्वासि झिंजाडिलें । विरक्तिबळें ॥ ३८**
**भेदाचा मडघा मोडिला । अहंकार सोडून पाडिला ।**
**पाईं धरून आपटिला । संदेहशत्रु ॥ ३९**
**विकल्पाचा केला वधु । थापें मारिला भवसिंधु ।**
**सकळ भूतांचा विरोधु । तोडून टाकिला ॥ ४०**
**भवभयासि भडकाविलें । काळाचें टांगें मोडिलें ।**
**मस्तक हाणोनि फोडिलें । जन्ममृत्याचें ॥ ४१**
**देहसमंधावरी लोटिला । संकल्पावरी उठावला ।**
**कल्पनेचा घात केला । अकस्मात ॥ ४२**
**आपधाकासि ताडिलें । लिंगदेहासि विभांडिलें ।**
**पाषांडास पछ्याडिलें । विवेकबळें ॥ ४३**
**गर्वावरी गर्व केला । स्वार्थ अनर्थीं घातला ।**

हें नांव आहे. सदर शेवटचा समास प्रचलित जुन्या एकवीस समासी दासबोधांतील व त्याच्याच कल्याणप्रतींतील अनेक ओव्या भरून तयार केलेला आहे.

**पहिला** समास 'देवशोधना'चा असून तेंच नांव सबंध दशकाला दिलेलें आहे. माणसाला एखाद्या गांवांत किंवा देशांत रहावयाचें असेल तर तेथील प्रभूला भेटणें अवश्य असतें, नाहीं तर सुखानें राहणें कठिण जातें. म्हणून त्याची भेट श्लाघ्य ठरते. प्रभूची भेट घेतल्यानें मान्यता लाभते. भेट न घेतल्यास महत्त्व जायला वेळ लागत नाहीं. राजापासून रंकापर्यंत कोणता तरी एक नायक असतो; त्याची भेट घेण्याचें महत्त्व विवेकी माणसें जाणतात. भेटीवांचून त्याच्या टापूंत राहिल्यास वेगारीला धरलें जाणें किंवा चोरीचा आळ येणें या गोष्टी नशिबीं येण्याचा संभव असतो. ग्रामाधिपति, देशाधिपति, नृपति, राष्ट्राचा पति तो राजा, बहुराष्ट्र तो महाराजा, महाराजांचा राजा तो चक्रवर्ती, याप्रमाणें इहलोकींच्या राज्यकर्त्यांची चढती श्रेणी दाखवून चक्रवर्तीचा निर्माणकर्ता ब्रह्मा व त्यासकट हरिहरांना जन्मास घालणारा परमेश्वर हा सर्वांहून थोर, त्याला ओळखावा, नाहीं तर यमयातना ओढवतात; अशा युक्तिवादानें देव ओळखण्याचें महत्त्व येथें निदर्शनास आणलें आहे. देवाच्या ओळखीनें जन्माचें सार्थक घडतें; त्याकरितां संतसंग धरावा व संत कुणाला समजायचें या प्रश्नाचें तोंड 'जो जाणेल भगवंत। तया नाव बोलिजे संत। १६' या व्याख्येनें बंद केलें आहे. 'चळेना ढळेना देव। ऐसा ज्याचा अंतर्भाव। १७' तो साधु, तो संत असें संताविषयीं आणखी स्पष्टीकरण दिलें आहे. 'जो जनामधें वागे। परि जनावेगळी गोष्टी सांगे। १८' अशा संतपुरुषाच्या अंतरीं ज्ञान जागृत असतें. यावर 'ज्ञान' म्हणजे काय, असा प्रश्न उद्भवतो. 'जाणिजे परमात्मा निर्गुण। त्यासी च म्हणावें ज्ञान। १९', असें या प्रश्नाला समर्थांचें उत्तर आहे. पोट भरायला उपयोगीं पडणाऱ्या विद्यांना ज्ञान म्हणतां येत नाहीं. आणखी एक गोष्ट हटल्यानें ध्यानांत ठेवायची ती ही कीं, 'देव वोळखावा येक। २१' करंट्याला करंटा, रोग्याला रोगी, निर्बळाला निर्बळ, अशीं समान स्थितींतलीं माणसें परस्परांना भेटल्यानें कल्याण होऊं शकत नाहीं, एवढ्यासाटीं खरा ज्ञाता गांठावा, त्याचा अनुग्रह घ्यावा, आपण स्वतः सारासार विचार करावा म्हणजे मोक्ष प्राप्त होतो (३१).

**दुसरा** समास 'ब्रह्मपावन' या नांवाचा आहे. एकंदर समास पाहिल्यावर

वाटतें कीं, ब्रह्म 'पावणें' याला ब्रह्मपावन असें कांहींसें प्रौढ रूप देण्यांत आलें आहे. सायोज्यप्राप्ति ज्या योगानें होईल असा उपदेश ऐका, अशी समासाची सुरुवात आहे. 'ब्रह्मज्ञानेंविण उपदेश' म्हणजे 'धान्येंविण जैसे भूंस।' ही कल्पना निरनिराळ्या दृष्टांतांनीं स्पष्ट करून ब्रह्माच्या रोखानें विवेचन आरंभिलें आहे. सृष्टि पंचभूतांची ती विनाशी, तिच्या आधीं व मागून ब्रह्म शिल्लक असतें ही शाश्वताची खूण समजावी. भूतांतच देवाला गणावें तर माणसाला विषाद होतो. पंचभूतांच्या आंतबाहेर जगदीश भरलेला आहे. पंचभूतें नाश पावतात, 'आत्मा अविनाशरूपी ॥ १२'. नामरूप हा केवळ भ्रम असून खरें वर्म नामरूपातीत आहे. पंचभूतें व त्रिगुण ही अष्टधा प्रकृति व तिलाच दृश्य म्हणतात (१४). दृश्य विनाशी आणि निर्गुण ब्रह्म शाश्वत, असा ज्ञानी पुरुषांचा निश्चय आहे. त्या सिद्धांताचें विवरण 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि' या गीताश्लोकाच्या (२ : २३) 'जें शस्त्रें तोडितां तुटेना। जें पावकें जाळितां जळेना। १६' इत्यादि शब्दशः भाषांतरानें केलेलें आहे. नंतर ब्रह्माला वर्ण नाहीं, तें सर्वांपेक्षां निराळें आहे, दिसलें तरी तें सर्वत्र खेंचून भरलेलें आहे. 'दृष्टीस लागली सवे। जें दिसेल तें चि पाहावें। २०', पण हें दृष्टीला आकलन होणारें नाहीं. जें इंद्रियांना अगोचर म्हणजे एकप्रकारें गुप्त आहे, तेंच सार असल्याविषयीं खात्री बाळगावी. तें समजून घ्यावें, दिसत नसलें तरी पहावें. पण हें साधायचें कसें? याला दोन उपाय आहेत. एक गुरुमुख व दुसरा अध्यात्मश्रवण. जें पृथ्वी आप तेज वायु यांपैकीं नाहीं, ज्याला वर्णव्यक्ति नाहीं, अर्थात् जें अव्यक्त 'तयास म्हणावें देव। वरकड लोकांचा स्वभाव। जितुके गाव तितुके देव। जनाकारणें ॥ २७'. यापुढें देहाचीं तत्त्वें जिकडच्या तिकडे विवेकानें दवडून देहातीत होण्यासंबंधाची पूर्वीं आत्मनिवेदन भक्तीच्या निरूपणांत जी विचारसरणी स्वीकारली, तिचाच ३०-३६ ओव्यांत अनुवाद आहे. देहातीत भाव हाच मोक्ष, हेंच आत्मनिवेदन (३९), अध्यात्म-श्रवण, सद्गुरुपादसेवन, पुढें सद्गुरुप्रसादानें आत्मनिवेदन असा क्रम आहे (४०). ब्रह्मत्व पावल्यावर माणसाच्या ठिकाणीं संसारखेद उरत नाहीं, देह मात्र प्रारब्धानुसार वर्तत रहातो. 'आतां होणार तें होयेना कां। आणि जाणार तें जायेना कां' अशी जन्ममृत्यूचें भय गेल्यानें त्याची वृत्ति बेदरकार बनते (४४).

**तिसरा** समास 'मायोद्भव' नांवाचा आहे. त्याकरितां प्रथम ब्रह्माचें स्वरूप पांच ओव्यांत दाखवून अविनाशी निर्गुण ब्रह्मांत विनाशी सगुण माया कालवली

गेली. सगुणनिर्गुणाच्या काल्यांतून राजहंसाच्या नीरक्षीर न्यायानें दोन्ही द्रव्यांची निवड केली पाहिजे. आत्मा दृष्टांतांच्या आटोक्यांतला नाहीं असें सुचवून आकाशांत वायूची झुळूक उठावी तशी आत्मस्थितींत माया उद्भवली. मग तेज, आप, पृथ्वी, तिच्यावर जीवोत्पत्ति, असा प्रकार घडत चालला. 'परंतु ब्रह्म आदिअंतीं। व्यापूनी आहे ॥ १४', ही गोष्ट विसरूं नये. 'जें जें कांहीं निर्माण जालें । तें तें अवघेंचि नासलें ॥ १५', तथापि हा नियम ब्रह्मास लागू नाहीं. 'सर्व नाशतां उरलें। अविनाश ब्रह्म ॥ १८'. पुनः तत्त्वांच्या मिश्रणाचा देह असल्यामुळें तत्त्वाच्या नश्वरतेचा विवेक हृदयांत विकसित करून देहाभिमान निःशेष झाडावा, वगैरे (आत्म-)निवेदनाचें वर्म उगाळलें आहे. आपल्या कल्पनेचें 'मीपण' उडवून लावल्यावर 'मीपण गेलियां निर्गुण। आत्मा स्वयें ॥ २९'. सोहंभावानें आत्मनिवेदनाचा प्रत्यय येतो. देवाभक्तांचें ऐक्य साधतें. निर्गुणाला जन्ममरण नाहीं, पापपुण्य नाहीं, तेव्हां आपण निर्गुणी अनन्य झाल्यावर मुक्तावस्थेस पोंचतों हें निराळें सांगायला नको. जें एकदां सांगितलें त्याची पुनः पुन्हां उजळणी कशाला, असें कोणी विचारील म्हणून 'संदेहवृत्ति ते न भंगे । म्हणोनि बोलिलें चि बोलावें लागे ॥ ३७', असा शेवटच्या ओवींत समर्थांचा खुलासा आहे.

चौथ्या समासाचें नांव आहे 'ब्रह्मनिरूपण', परंतु जवळ जवळ त्याची अर्ध्याइतकी ओवीसंख्या युगवर्षें, ब्रह्मादिकांचें कालमान, त्यांचें लोकांच्या कल्पनेंतील तारतम्य, या विषयांत खर्ची पडली आहे. यांतच कलियुगाचीं ४७६० इतकीं वर्षें संपल्याचा निर्देश आल्यामुळें शके १५८१ मध्यें हा समास लिहिल्याचें कळतें. मध्येंच 'पुढें सव्रगोलंकारी वर्णसंकर होणार आहे' असें भविष्य समर्थांनीं बोलून टाकलें आहे. ब्रह्मादि अतिश्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या देवांवर जशी काळाची सत्ता आहे तशी ती आत्म्यावर नाहीं. त्या देवांचा विनाशी या नात्यानें मायेंत म्हणजे नश्वरतेच्या परिवारांत समावेश होतो; ज्यांची कालाच्या दृष्टीनें अवस्था एक त्यांमध्यें लहानथोर असा भेद कल्पायचें कांहीं कारण नाहीं. जन्मास येणारा प्रत्येक जण 'मी थोर' अशी बढाई गात गात मरतो हें ध्यानांत बाळगावें. म्हणून 'जयांसि जालें आत्मज्ञान । ते चि थोर महाजन । १९'. ज्याच्यामध्यें हरिहर येतात जातात तो एक परमेश्वरच सकळांहून थोर ठरतो. तो निर्गुण निराकार असल्यानें 'तेथें नाहीं उत्पत्ति विस्तार । स्थानमानाचा विचार। ऐल्किडे ॥ २१'. नामरूप, स्थानमान

र्हीं केवळ अनुमानें असल्याचें निदान ब्रह्मप्रलयाच्या वेळीं होत असतें. ब्रह्माला मात्र प्रलय बाधत नाहीं. 'ब्रह्म कोणी येका काळें (सदासर्वदा) । जैसें तैसें ॥ २३'. अखेरच्या ओवींत ब्राह्मण कुणाला समजावें याचा निर्णय आहे.

**करिती ब्रह्मनिरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण ।**
**ते चि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद ॥ २४**

श्रीरामदासांची कविता प्रथम खंडांत (स्फुट प्रकरणें क्र. १७, पान ३७७)

**ब्राह्मणु ब्रह्मवेत्ता तो । ब्राह्मणु ब्रह्मनिश्चई ।**
**ब्राह्मणु ब्रह्मस्थितीचा । ब्राह्मणु म्हणिजे गती ॥ १०**

अशी व्याख्या झालेली आहे.

**पांचवा** समास 'मायाब्रह्मनिरूपणा'चा आहे. यामध्यें माया आणि ब्रह्म यांचा विरोध स्पष्ट केला आहे. 'ब्रह्म निर्गुण निराकार । माया सगुण साकार । २' 'ब्रह्म निर्मळ निश्चळ । माया चंचळ चपळ । ३' 'माया दिसे ब्रह्म दिसेना । माया भासे ब्रह्म भासेना । ४', या मासल्यांवरून समर्थांची मांडणी जिज्ञासूंना समजायला हरकत नाहीं. 'ब्रह्म अखंड घनदाट । माया पंचभूतिक पोचट । ब्रह्म तें निरंतर निघोट । माया ते जुनी जर्जरी ॥ १७' याप्रमाणें वर्णन करतां करतां जेवढें चराचर म्हणून चाललेलें आहे, 'तितुकी माया परमेश्वर । सबाह्यअभ्यंतरीं ॥ २३' असें म्हटलें आहे. परंतु परमात्मा सकळ उपाधीवेगळा निराळा आहे, 'जळीं असोनि नातळे जळा । आकाश जैसें ॥ २४' हा सिद्धांत विसरूं नये. मायाब्रह्माच्या विवरणानें माणसाची जन्ममृत्यूच्या चक्रांतून सुटका होते. संतांना शरण गेल्यास मोक्ष लाभतो.

**अरे या संतांचा महिमा । बोलावया नाहीं सीमा ।**
**जयांचेनि जगदात्मा । अंतर चि होये ॥ २६**

**सहावा** समास 'सृष्टिकथना'चा आहे. सृष्टि मिथ्या असें म्हटलें जातें, परंतु ती प्रत्यक्ष दिसते, तेव्हां ती सत्य कीं मिथ्या या प्रश्नाचा खल प्रस्तुत समासांत आहे. 'जीवभूतः सनातनः' (१३:७) या गीतावचनानुसार सृष्टि सत्य ठरते. या वचनाला 'यद् दृष्टं तन्नष्टम्' हें सूत्रवाक्य मारक आहे. या विरोधांतून पुढील विवेचनांत समर्थांनीं युक्तीचा मार्ग काढला आहे. जगांत माणसांचे सज्ञान, अज्ञान असे दोन वर्ग असून अज्ञानी पुरुष सृष्टीचीच नव्हे तर देव-धर्म-तीर्थ-व्रत

या सर्वांची खऱ्यांतच गणना करतात. मूर्खांनीं प्रतिमापूजन करावें असें सर्वज्ञांचा राजा म्हणतो व प्रतिमा हाच देव या कल्पनेला उडवूनहि लावतो. पण अज्ञानी मनुष्य न अडतां चटकन पुनः विचारतो कीं, संध्या-स्नान, गुरुभजन, तीर्थाटन हें कशा-करितां करावयाचें ? सज्ञानानें तीर्थाटन, गुरुभजन या कृत्यांना आधार असल्याचें दाखविलें तेव्हां अज्ञानी श्रोता खवळून अधिक वादास पेटला. 'जीवभूतः सनातनः' हें श्रीकृष्णाचें वाक्य वस्तुतः अयथार्थ असल्याचें विधान उच्चारणारा हा वक्ता श्रीकृष्णा-पेक्षां शहाणा झाला म्हणायचा, असा त्याचा अभिप्राय पाहून वक्त्यानें गीतेंतलीं निरनिराळीं वाक्यें घेऊन श्रोत्याची समजूत करायला सुरुवात केली. गीतेंत देव म्हणतो कीं, 'मी अश्वत्थ आहें' (१०:२६), पण अश्वत्थ तोडतां येतो; यासाठीं स्वतंत्र माणसाची गरज नाहीं. दुसरीकडे तोच देव बजावतो कीं, आत्म्याला हत्यार, आग, पाणी, वारा यांपासून मुळींच बाधा पोंचत नाहीं. या दोन वचनांची एक-वाक्यता कशी व्हायची ? देवानें दुसरीकडे 'इंद्रियाणां मनश्चास्मि' (१०:२२) असें सांगितलें आहे. मन ही ईश्वराची विभूति म्हणून तेथें उठणारी ऊर्मि आवरल्यास देवाचा उपमर्द होईल अशी कल्पना करणें भाग पडेल. नाहीं तर देवाच्या पदरीं विसंगतीचा दोष बांधावा लागेल. यासाठीं देवाच्या वाक्यांचा विरोध काढायचा तर लहानपणीं खडे मांडून ओनामा ज्याप्रमाणें शिकवितात त्याप्रमाणें देवांनीं प्रस्तुत वाक्यांचे खडे मांडले आहेत, असें समजावें. 'अश्वत्थःसर्व वृक्षाणाम्', 'इंद्रियाणां मनश्चास्मि' हीं वाक्यें खड्यासारखीं आहेत असें सुचवून वक्त्यानें सांगितलें कीं, हीं भांडणें जुनीं व अमर्याद आहेत म्हणून त्यांचा वादविवाद टाकून संवाद करावा, संवादाच्या योगानें 'स्वानुभवें ब्रह्मानंद होये' (३०) कल्पनेंतून सृष्टीचा प्रादुर्भाव होतो, यामुळें ती खरी कशी ठरणार ? कल्पनेच्या देवापायीं भक्ताला जीं दुःखें भोगावीं लागतात त्याची माहिती ३२-४४ इतक्या ओव्यांत असून त्यांत धातुपाषाणाच्या देवांची विटंबना समर्थ-कालीं कशी होत असेल याचाहि थोडासा पुरावा पहायला सांपडतो. देव हरवला, चोरीस गेला, फोडला, बुडाला, गाडला; तीर्थस्थानांची अशीच दुर्दशा उडाली आहे; एकदां देव आमच्या आकांताला पावत असे, पण आतां त्याचें सत्त्व गेलें; अशी हाकाटी करणारांना वक्ता तितक्याच जोरानें म्हणतो : 'धातु पाषाण मृत्तिका। चित्रलेप काष्ठ देखा। तेथें देव कैंचा मूर्खा। भ्रांति पडिली ॥ ४४'. हे देव कल्पनानिर्मित आहेत. खऱ्या देवाच्या खुणा निराळ्याच आहेत. नंतर वेदशास्त्रपुराणें सृष्टि

मिथ्या असें सांगत आलीं. साधुसंतांचा असाच अनुभव आहे. ‘सृष्टीपूर्वीं सृष्टि चालतां। सृष्टि अवघी संव्हारतां। शाश्वत देव तत्त्वता। आदिअंतीं ॥४८ ऐसा सर्वांचा निश्चयो। येदर्थीं नाहीं संशयो ॥४९’. कल्पनेच्या पोटीं एकूण सृष्टी आहेत तरी किती? त्याचें उत्तर एकूण आठ सृष्टी असें आहे: १ कल्पनेची, २ शाब्दिक, ३ प्रत्यक्ष, ४ चित्रलेप, ५ स्वप्नसृष्टि, ६ गंधर्वसृष्टि, ७ ज्वरसृष्टि, ८ दृष्टिबंधन. हीं त्या आठ सृष्टींचीं नांवें आहेत. सृष्टि नाशवंत खरी पण निश्चयाकरितां (नाशवंत) सगुणाचें भजन करावें हेंदेखील तितकेंच खरें आहे. सगुणाच्या भजनाचा हा संदर्भ सोडून शिष्यानें आक्षेप घेतला कीं, सृष्टि मिथ्या हें कळतें. ती जर मुळांत नाहींच तर दिसते कां? याचें प्रत्युत्तर पुढल्या समासांत देऊं या आश्वासनानंतर सगुणभजनाचें प्रकरण क्रमांत बसण्याकरितां ‘सृष्टी मिथ्या हें जाणून सगुण रक्षावें’ असा खुलासा जोडावा लागला आहे. येथें सांगितलेल्या अष्टविध सृष्टीचा विचार स्फुट ओव्या क्र.७८ मध्यें आला आहे. (श्री रा म दा सांची क वि ता, प्रथम खंड, पान २४८)

**सातवा** समास ‘सगुणभजना’चा असल्याचें कळलेंच आहे. ज्ञानाच्या मानानें उपासना कनिष्ठ. सगुण नाशवंत असें पटवून पुनः गुरुजी भजन करा म्हणतात. हा उपदेश ऐकून शिष्याला बुचकळ्यांत पडल्याप्रमाणें झालें. गुरूचें वचन तर मोडतां येत नाहीं; आणि भजन कां करायचें तें समजत नाहीं. उपकार काय झाला, साक्षात्कार काय घडला, का प्रारब्धांतलीं अक्षरें देवानें पुसून टाकलीं? ‘होणार हें तों पालटेना। भजनें काय करावें जना ॥ १३’ याचा उलगडा होत नाहीं. शिष्याची ही अवस्था पाहून गुरूनें त्याची कित्येक उलट प्रश्न विचारून अडवणूक केली आहे. ज्ञान झालें कीं ज्ञात्याचें खाणेंपिणें हे देहधर्म किंवा हा आपला हा परका वगैरे बुद्धीचे व्यवहार सुटतात असा तर अनुभव नाहीं ना? मग भजनांत असें काय पाप आहे कीं ज्यासाठीं त्याचा त्याग करावा? पोटाकरितां साहेबांपुढें लोटांगण घालावें लागतें, नीचासारखें व्हावें लागतें, ‘आणि देवास न मनावें। हें कोण ज्ञान ॥ १९’ हरिहरब्रह्मादिकांच्या तुलनेंत तू एक मानवी रंक आहेस. ते ज्याचे आज्ञाधारक त्याचें भजन केल्यानें तुझें काय बिघडणार आहे? या प्रश्नानंतर समर्थांनीं थोडीशी आत्मकथा सादर केली आहे. आमच्या कुळांत रघुनाथ हाच आमचा परमार्थ असून तो समर्थांचा समर्थ ‘देवां सोडविता ॥ २१’ असा आहे, त्याचे आम्ही सेवक असून सेवेकरितांच आम्हांस ज्ञान प्राप्त झालें आहे. त्याविषयीं

अभाव मानल्यास पतनाखेरीज दुसरी गति नाहीं. गुरु जें सारासारविवेकानें सांगतील तें असार मानूं नये. ज्याला मी थोर असें वाटेल तो ब्रह्मज्ञानी नसून देहाभिमानी ठरतो. म्हणून संशयाला थारा न देतां ' रघुनाथभजनीं लागावें। २८ '. यापुढें समर्थांनीं आपल्या उपास्याचा महिमा गाइला आहे (२९–३३). आपली ह्यात दोन दिवसांची तर ' देव बहुतां काळांचा '; आपल्या ओळखीचें क्षेत्र अगदीं संकुचित तर ' देवासि त्रैलोक्य जाणे ॥ ३८ ' ज्ञानबळानें आम्हीं उपासना टाकली तर अधःपात नशिबीं येणार यांत संशय नाहीं. उलट देव थोरपणानें भक्ताची उपेक्षा करील तर तें त्याला शोभणार नाहीं. सृष्टि मिथ्या हें रामभजनानें कळतें याप्रमाणें सृष्टीच्या मिथ्यात्वाचा धागा रामभजनाकडे जोडून आठव्या समासाची प्रस्तावना केली आहे.

**आठवा** समास ' दृश्यनिरसन ' अर्थात् दृश्यत्वानें अनुभवास येणाऱ्या सृष्टीचें मिथ्यात्व प्रतिपादन करणारा आहे. जें दिसेल तें सत्य मानणें, हें जडमूढ अज्ञानाचें लक्षण आहे. ' हें ज्ञात्याचेंदेखणें नव्हे । २ '. मृगजळ, स्वप्न, मातीच्या पाषाणाच्या लाकडाच्या मूर्ति, नटांचें स्त्रीरूप, डोळ्यांतली बाहुली, बुडबुड्यांतलीं प्रतिबिंबें, एखादें शस्त्र वेगानें हलविल्यास त्याचें भासणारें अनेकत्व, टणत्काराच्या वेळचें तंतूचें द्विधात्व, हे सर्व प्रकार खऱ्याप्रमाणें दिसतात, परंतु ते मुळांत खरे नसतात,—यांसारख्या दृष्टांतांनीं जें दिसतें तें खरें नसतें हें पटवून दिलें. माया ही जादू आहे. अविद्येची लीला आहे. लटक्याला जर खरें मानूं लागलें तर आपण मोठे परीक्षक ही घमेंड मारण्यांत हंशील काय ? मनुष्याची जादुगिरी (बाजीगरी) क्षणभर खरी वाटते. राक्षसांची मायासुद्धां पुष्कळदां खोट्याला खरें भासविते. पंचवटिकेंत मारीच राक्षसानें हरिणाचें रूप घेऊन रामाला फसविलें हें उदाहरण प्रसिद्धच आहे. राक्षसांना कायापालट करतां येतो. रक्तबिंदूतून ते जन्म पावतात. कृष्णाला कपटी रूपाचे राक्षस मारावे लागले. रावणानें कृत्रिम शिर केल्याची कथा आहे. कपटी राक्षसांना मारण्यासाठीं देवांना शक्ति निर्माण कराव्या लागल्या. मनुष्याच्या कृत्रिमाला बाजीगरी असें नांव आहे तर राक्षसांच्या कृत्रिमाला वोडंबरी म्हणतात. तशीच ' भगवंताची नाना परी । विचित्र माया ॥ ३२ ' बाजीगरी-वोडंबरीचा निर्देश समर्थांनीं पुष्कळदां केलेला आहे. जें मुळांत साफ खोटें आहे तें व्यवहारांत खरें कां वाटतें याचें कारण अविद्या. जें दिसतें तें अविद्यात्मक असून

मनुष्याचा देह तसाच असल्यामुळें त्याच्या परिणामीं लिंगदेह तयार होतो. अविद्येनें अविद्येला खरें समजावें हें सरळ आहे. देह मी या भावनेमुळें बाकीचें सर्व खरें वाटणें क्रमप्राप्तच आहे. देहबुद्धि आणि दृश्याची असत्यता यांच्या दरम्यान संदेह पसरला असल्यामुळें देहबुद्धीनें ब्रह्म पाहूं लागल्यास दृश्य सत्य ही भावना मनुष्याला ब्रह्मापर्यंत पोचूं देत नाहीं. दृश्य सत्य वाटणें हा फार मोठा धोका आहे. सारांश, देहबुद्धीनें ब्रह्मप्राप्ति होणें कदापि शक्य नाहीं. हाडाच्या देहांतील मांसाचा डोळा ब्रह्म पहाण्याला समर्थ नसतां त्याचा विश्वास बाळगणाराला ज्ञाता म्हणण्यापेक्षां आंधळा मानणें हेंच योग्य. दृष्टीला दिसतें, मनाला भासतें, तें कालांतरीं नाश पावतें; 'म्हणोनि दृश्यातीत असे। परब्रह्म तें ॥ ४७'. आतां देहबुद्धि व तिला भोवणारा धोका यांची विवंचना करूं असें आश्वासन देऊन हा समास पूर्ण केला आहे.

**नववा** समास 'सारशोधन' या नांवाचा आहे. 'प्रगट तें जाणावें असार। आणी गुप्त तें जाणावें सार। ६:२:२१' हें सूत्र या समासांत आणलें आहे. एखाद्या घरांत पुरून ठेवलेल्या द्रव्याची जागा जशी एकट्या घरमालकालाच ठाऊक असते, नोकरचाकर फक्त वर बाहेर असणारा पदार्थ पाहूं शकतात व त्यांतच वावरतात, तशीच गोष्ट परमार्थाची आहे. परमार्थ अंतरंगांत लपलेला असतो व शहाणीं माणसें त्याचा छडा तेथेंच लावतात. ते दृश्यांत न गुरफटतां दृश्याच्या पोटांत शिरतात. ज्ञाते परमार्थ ओळखून काढतात. बाकीचे दृश्याच्या स्वार्थांतच दुर्दैवानें गर्क असतात. तरीसुद्धां त्यांना आपल्या वागणुकीचा विलक्षण अभिमान असतो. 'सार सेविजे श्रेष्ठीं । असार घेयिजे वृथापुष्टीं। १०' या विधानाच्या स्पष्टीकरणार्थ अनेक उदाहरणें सांगितलीं आहेत (११–१५). ज्ञानी योगेश्वर हा गुप्तार्थ लाभाचा ईश्वर असून नाना मतें धुंडण्याची भ्रमंती करणारे हे पोटाचे किंकर ठरतात. गुप्त धन पहाण्याला जसें अंजन तसें गुप्त परमात्मा पहाण्याची शक्ति लाभण्याचें सत्संग हें साधन आहे. सत्संगानें सद्वस्तु आपलीशी होते. मग 'परमात्मा अच्युत अनंत। तो या दृश्यावेगळा ॥ २२ दृश्यावेगळा दृश्याअंतरीं। सर्वात्मा तो सचराचरीं। विचार पाहातां अंतरीं। निश्चय बाणे ॥ २३' यासाठीं संसारत्याग करायला नको, प्रपंचोपाधि सोडायला नको, 'जनामध्यें सार्थकता। विचारें चि होय ॥ २४'. हें प्रचीतीचें बोलणें आहे. विवेकानें प्रचीति पहावी. पाहील तोच खरा शहाणा. प्रचीति ही रोकड्या धनासारखी असून अनुमानाच्या व्यवहाराला

उधारी म्हटल्यास शोभेल. अनुमान व प्रचीति यांमध्यें मानसपूजा व प्रत्यक्ष दर्शन यासारखा फरक आहे. 'या जन्मीं नाहीं तर पुढल्या जन्मीं' या कल्पनेचा समर्थांनीं 'पुढें जन्मांतरीं होणार। हा तों अवघा च उधार ।। २७' याप्रमाणें निषेध केला आहे. त्यांची 'या चि जन्में येणें चि काळें। संसारीं होइजे निराळें। मोक्ष पाविजे निश्चळें। स्वरूपाकारें ।। २९' अशी प्रतिज्ञा आहे. या प्रतिज्ञेला जो खोटी म्हणेल त्याला समर्थांनीं आपल्या उपासनेची शपथ घातली आहे.

**दहावा** समास 'अनु (नि) र्वाच्य' नांवाचा आहे. कोणताहि अनुभव हा शब्दांच्या साह्यानें पटवून देतां येत नाहीं. गुळाची गोडी शब्दांनीं सांगतां न आली तरी गूळ खायला देऊन ती पटवितां येते. ब्रह्माचा अनुभव हा गुळाच्या गोडीसारखा नाहीं. गोडीसाठीं गूळ या पदार्थाचा आधार दाखवितां येतो. ब्रह्मासंबंधांत तसा कांहींच आधार नसल्यामुळें तो शब्दांच्या शक्तीला यथार्थपणानें आटपत नाहीं. म्हणून तो 'अनिर्वाच्य' म्हणावा लागतो. तरीसुद्धां त्यांच्यासाटीं शब्दांचा उपयोग करावा लागतोच. 'सांगतां नये तें सांगणें।...हें सद्गुरुविणें। होणार नाहीं ।। १०'. जो स्वतःचा शोध करील त्याला सद्गुरुकृपा कळेल व मग वस्तु (ब्रह्म) अनुभवास येईल. म्हणून 'दृढ करूनियां बुद्धी। आधीं घ्यावी आपशुद्धी। १२' आपण मायिक आहों, हें समजल्यानें पुढें वस्तूपर्यंत पोंचून समाधान घडतें. आत्मा सर्वसाक्षी हा पूर्वपक्ष आहे. ह्याचें विवरण केल्यास आत्मा हा सर्वसाक्षी अवस्थेच्या पलीकडचा असल्याचें उमगतें. पदार्थज्ञान सर्वस्वीं निरर्थक असल्याचें कळून द्रष्टा द्रष्टेपणाला मुकतो तेव्हां 'मीपणा'च्या भावनेची गांठ ओसरते. 'मीपण' झडणें ही अनुभवाची खूण आहे. अनिर्वाच्य समाधान तें हेंच. अर्थाकरितां शब्दांचा आश्रय करावा लागतो. अर्थ हृदयांत पक्का ठसल्यावर शब्दाला किंमत नाहीं. शब्द व अर्थ यांचा विचार भूस व कण यांच्या दृष्टान्तानें बऱ्याच ओव्यांतून (१८–२४) स्पष्ट केला आहे. शब्द ज्या अर्थाला व्यक्त करतो तो लक्ष्यांश. स्वानुभव झाला कीं शब्द व त्याचा अर्थ याचें कार्य संपतें. अनुभवाला बोलून दाखविण्याची धडपड करूं लागल्यास अनुभव ढळतो, यासाठीं त्याला 'अनिर्वाच्य'—बोलून दाखवितां येण्याजोगा नव्हे,—असें म्हणावें लागतें. वस्तु (ब्रह्म) निराळी, आपण तिच्याहून निराळे, असा प्रकार असता तर अनुभव शब्दांनीं स्पष्ट करणें शक्य होतें. अनुभव शब्दातीत असल्याचें कळून देखील तो सांगण्याची ओढ आवरत नाहीं. म्हणून एक

ल्हानशी कथा समर्थांनीं सादर केली आहे. मुळांत जो अजन्मा आहे तो जन्माच्या रूपानें झोपीं जातो. झोपेंत प्रपंचाचें स्वप्न पाहतो व त्याच्या दुःखानें सद्गुरूस शरण जातो. सद्गुरुकृपेनें संसार खोटा हें ज्ञान झालें. जें आहेसें वाटत होतें तें नाहींसें ठरलें. मग नाहीं म्हणायला कांहींच उरलें नसल्यानें नाहीं हा शब्दसुद्धां गतार्थ झाला. आहे-नाहीं हा शब्दव्यवहार ज्याच्या संबंधांत थांबला तें पुनः उरतें असा येथें चमत्कार आहे (३८). ज्ञानाची चर्चा ही जागृति, परंतु ब्रह्मैक्याची समाधि नव्हे. शब्दज्ञान हा एक स्वप्नाचा भाग समजावा. श्रोत्यानें 'अर्थीं घालावें मन। ४१' तर त्याला समाधान मिळेल. खऱ्या जागृतींत शब्दाला जागा नाहीं हें निरूपण शिष्याला उमजलें नाहीं, तेव्हां त्यानें अजन्मा कोण, त्याचें स्वप्न म्हणजे काय, असे प्रश्न केले. 'तूंच अजन्मा' हें पहिल्या प्रश्नाचें उत्तर असून, स्वप्न म्हणजे संसार असें दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर आहे. सद्गुरूला शरण जाऊन शुद्ध निरूपणाच्या द्वारें याची ऊणखूण केली कीं अनुभव येतो व अनुभवाच्या दशेंत शब्द विरमून जी निवांत विश्रांति मिळते तिला जागृति म्हणतात. परंतु अनुभवाच्या जागृतावस्थेची जाणीव ही झोपेचा अंमल मोडला नसल्याची खूण आहे. खरी जागृति यापलीकडची एवढेंच सांगणें शक्य आहे. '—तें समाधान। बोलतां चि न ये ऐसें जाण। ६०' याप्रमाणें समासाच्या शेवटीं दोनदां बजावून ठेवलें आहे.

या समासांत जुन्या दासबोधाच्या प्रचलित २१ व्या समासांतून एकूण २० ओव्या घेतल्या असून कल्याणप्रतीच्या चौथ्या समासांतील १२ ओव्या सांपडतात. नव्या म्हणजे चालू दासबोधांत १६ व्या ओवीपासून या भरतीला प्रारंभ केलेला आहे. १६,१७,१८,२३,२७,२८ या जुन्या दासबोधाच्या एकविसाव्या समासांतील ३३,३४,३६,३७,३८,३९ अशा ओव्या आहेत. पुढें ३१–३३ या ओव्या जुन्या दासबोधाच्या ४०–४२ ओव्या आहेत. ३५ पासून ४५ इतक्या नव्या दासबोधांतील ओव्या जुन्या दासबोधाच्या क्रमानें ५४–६४ अशा आहेत. ४७–५९ या ओव्या कल्याणप्रतींतील ९–२० अशा एकूण १२ आहेत. बहुधा सगळ्या ओव्या जुन्या दासबोधांतून जशाच्या तशा नकललेल्या असल्या तरी कांहीं ओव्यांत पाठभेद केलेला आहे. नव्या दासबोधाच्या १७ व्या ओवीचा तिसरा–चौथा चरण 'अनुर्वाच्य समाधान। या कारणें बोलिजे' असे आहेत. 'खूण पाहाव्या आपण। डोकवूं लागे' असे चरण जुन्या दासबोधांत आहेत. तेथील ४२ व्या ओवीच्या पहिल्या चरणांतील

'तर्क' हा पहिला शब्द नव्या दासबोधाच्या ३३ व्या ओवींत गाळलेला आहे. नव्या दासबोधाच्या ४१ व्या ओवीचा दुसरा चरण 'अर्थी घालावें मन' असा आहे, त्याच्या जागीं जुन्या दासबोधांत 'अत्यंत कठिण निरूपण' हे शब्द आहेत. नव्याच्या ४५ व्या ओवीचे पहिला सोडून बाकीचे तीन चरण जुन्यांत अगदीं निराळे आहेत. तसाच प्रकार कल्याणप्रतीच्या ओव्या नव्या दासबोधांत दाखल करतांना कांहीं ओव्यांसंबंधांत घडलेला दिसतो. नव्यांतील ५७ व्या ओवीचा तिसरा-चौथा हे चरण 'जागेपणें स्वप्नउर्मी । गेली च नाहीं ॥' याप्रमाणें आहेत. त्याऐवजीं 'ते उर्मी गेलिया वर्मीं । वर्मचि अवघे ॥' या शब्दांचे चरण आहेत. नव्याच्या ५९ व्या ओवींतील दोन चरण कल्याणप्रतींत निराळे आहेत. ते असे: 'जेथें हें सकळ मोडे । मोडलेपणेसी ॥'

जुन्या दासबोधाच्या दोन प्रतींच्या निरनिराळ्या समासांतून घेतलेल्या ३२ ओव्या वजा जातां उरणाऱ्या २९ ओव्यांचें वाचन करूं लागल्यास त्यांत अस्खलित अर्थसंगति नाहीं, असें म्हणतां येत नाहीं. परंतु समर्थांनीं आपल्याच दुसऱ्या ग्रंथांत जेथें हा विषय अधिक विस्तारानें व स्पष्टतेनें मांडला होता तेथून इष्ट वाटणाऱ्या ओव्या या २९ ओव्यांच्या समासांत क्वचित् शब्दांतर घालून हा समास अधिक परिपूर्ण केला असा तर्क स्वीकारावा लागतो.

• ७ •

हें दशक एकदां समर्थांनीं स्वतंत्रपणें लिहून त्याला 'दासबोध' असें नांव दिल्याचा मुद्दा आतां सर्वमान्य झाला आहे. मात्र त्याचा हल्लींच्या दासबोधांत समावेश करतांना त्याचें नांव 'चतुर्दशब्रह्म' असें ठेवलें आहे. इतर दशकांना ज्याप्रमाणें एखाद्या विशेष समासावरून नांव दिलें गेलें त्याप्रमाणें येथेंहि घडलें आहे. या दशकांतील तिसरा समास काय तो चतुर्दशब्रह्मांच्या विचाराचा आहे. इतर समास आनुषंगिक आहेत. शेवटच्या समासांत जुन्या दासबोधाच्या कल्याण-प्रतींतील चौथ्या समासाच्या कांहीं ओव्या घेतलेल्या आहेत.

**पहिला** समास प्रास्ताविक स्वरूपाचा आहे. पहिल्या १९ ओव्यांत गणेश, शारदा, सद्गुरु व श्रोते यांस नमन आहे. २० व्या ओवीपासून कथानुसंधानाला

प्रारंभ करून पुढें अद्वैतग्रंथ सर्वांत श्रेष्ठ या विचाराच्या संदर्भांत ३२–४४ ओव्यांतून संस्कृत-प्राकृताच्या वादाकडे लक्ष पुरविलें आहे. ५२–५३ ओव्यांत देखील या वादाचे पडसाद आहेत. अखेरीस मायेचें स्वरूप सांगितलें आहे. संसार हें एक दीर्घ स्वप्न असून त्या स्वप्नापायीं लोभी माणसें भलभलतें बरळतात. ज्ञानसूर्य मावळला आहे. सत्त्वाचें चांदणें नाहीं. स्वप्नांत गुरफटलेलीं माणसें देहबुद्धि-अहंकारानें सपाटून घोरत पडलीं आहेत. विषयसुखार्थ त्यांचें आक्रंदन सुरू आहे. हीं माणसें झोपेंतच मरतात व जन्मास येतांच झोपीं जातात. असे किती आले व गेले यांचें गणित सांगणें अशक्य आहे. हा झोपाळूपणा व त्याचे कष्ट नाहींसे करावयाचे तर आत्मज्ञान पाहिजे. म्हणून हें अध्यात्माचें निरूपण आहे. जो कोणी आपल्या सर्वांगाचे कान बनवील तोच हें निरूपण ऐकायला समर्थ होईल. चंचळ हृदयाच्या माणसानें या ग्रंथाला स्पर्शच करूं नये. त्याला हा विषय अगम्य आहे. ज्यानें परमार्थ जोडला त्यानें हा ग्रंथ पहावा. यावर कोणी म्हणतील कीं या निरूपणाची भाषा मराठी, ती भल्यांना ऐकवूं नये. तर हे आक्षेपक मूर्ख समजावे. त्यांना अर्थान्वयाचें रहस्य कळत नाहीं. भाषा प्राकृत असली तरी विषय वेदांताचा आहे इकडे दुर्लक्ष करून मंदबुद्धीचा भ्रांत मनुष्य ज्ञानाला आंचवतो. आपल्याला द्रव्याचें कर्तव्य आहे. मग तें द्रव्य कोणत्या पात्रांत ठेवलें आहे, याचा विधिनिषेध कशाला ? प्राकृतांत जर अद्वैताची शिकवण अनुभवाची आणि सुगम असेल तर ती अवश्य स्वीकारावी. विद्वत्तेच्या श्रमाखेरीज सगळा शास्त्रार्थ सत्समागमानें सुगम होतो. भाषा कोणतीहि असली तरी तिच्यांतला अर्थ कांहीं वायां जात नाहीं. अर्थ हाच कार्यसिद्धीचा उपाय आहे. पण त्याबरोबर हेंसुद्धां लक्षांत ठेवावें कीं, प्राकृतामुळें संस्कृताला कांहीं सार्थकता आहे. प्राकृतामुळें संस्कृतांतला गुह्यार्थ उघड होऊन लोकांना त्याचें ग्रहण करतां येतें. प्राकृत नसतें तर संस्कृत भाषेंतला गुह्यार्थ कुणाला कळणार होता ? तेव्हां भाषा कोणती हा विचार सोडून अर्थाकडे लक्ष द्यावें यांत कल्याण आहे. इतकें सांगून देखील समर्थांना प्राकृतांतून ज्याला आपल्या निरूपणाचें यथार्थ ग्रहण करतां येईल असा श्रोता मिळण्याचा भरंवसा वाटत नाहीं. 'मऱ्हाटें चि उमजेना । कांहीं केल्यां ॥ ५२'. आपले निरूपणाचे बोल अनुभवाच्या जिव्हाळ्याचे आहेत. संस्कृतापेक्षांसुद्धां ते खोल आहेत अशी खात्री समर्थांना होती. 'मायाब्रह्म वोळखावें । तयास अध्यात्म म्हणावें ॥ ५४' अशी अध्यात्माची

व्याख्या देऊन त्यांनीं पुढें मायेचें स्वरूप वर्णिलें आहे.

**दुसरा** समास ब्रह्मनिरूपणाचा आहे. मागल्याच्या शेवटीं मायेचें रूप उघडकीस आणलें. यामुळें ब्रह्माची माहिती दुसऱ्या समासांत आली. ६ व्या ओवींत ब्रह्माची ओळख करून दिल्यावर शब्दांनीं त्यांचा कितीहि काथ्याकूट केला तरी तें आकलन होण्याकरितां श्रवणाभ्यास अवश्य आहे. ब्रह्माला नांवें अनंत आहेत. पण तें नामातीत आहे. ब्रह्मासारखी कोणतीच वस्तु नसल्यानें तें दृष्टांतानें स्पष्ट करतां येत नाहीं. वाणी त्यापुढें लटपटते, तशीच मनाची वाट खुंटते. मनाचा धर्म कल्पना, तिला ब्रह्मांत थारा नाहीं, म्हणून मनाचें बळ ब्रह्मासंबंधांत चालत नाहीं. मनाला जें अप्राप्त तें प्राप्त करून घेण्याचा उपाय एक—सद्गुरु. तोच या भांडाराची किल्ली आहे. त्या किल्लीनें बुद्धींत प्रकाश पसरतो, द्वैताचीं दारें धडाधड उघडतात. मग सुखाची कमतरता नाहीं. तें ब्रह्म पर-वाचेपलीकडचें व मन-बुद्धीला अगोचर खरें, पण संग सोडतांच पावतें. आपला संग सोडावा (देहासक्ति सोडावी), आणि मग त्याला पहावें. 'आपण म्हणिजे मीपण । मीपण म्हणिजे जीवपण । जीवपण म्हणिजे अज्ञान । संग जडला ॥ २० '. तो संग तोडला कीं निःसंगाशीं ऐक्य होतें. कल्पनेविना प्राप्तीचा अधिकार मिळत नाहीं. 'मी कोण ऐसें नेणिजे । तया नांव अज्ञान बोलिजे ।'; हें अज्ञान गेलें कीं, 'परब्रह्म पाविजे । २२ '. ब्रह्मभाव म्हणजे अहंभावाचें निर्वाण. तेथें देहबुद्धीच्या थोरपणाला जागा नाहीं. कारण ब्रह्मांत उंचनीच, राजारंक, स्त्रीपुरुष, गुरुशिष्य इत्यादि भेद नाहींत. 'ब्राह्मणाचें ब्रह्म तें सोंवळें । शूद्राचें ब्रह्म तें वोवळें। २५ ' असा प्रकार तेथें नाहीं. सर्वांकरितां ब्रह्म एकच. पण आधीं देहाचा संबंध तोडला पाहिजे. 'साधु दिसती वेगळाले। परि ते स्वरूपीं मिळाले। ३१ ' सगळे मिळून एकच देहातीत वस्तु होत. यापुढें देहाभिमानाचे दुष्परिणाम सांगितले आहेत. विषयाचा समारोप करतांना वक्त्याच्या तोंडून सत्यब्रह्म हा शब्द निघतांच, सत्यब्रह्म म्हणजे काय, असा श्रोत्यानें प्रश्न विचारला. ब्रह्म एकच, पण प्रत्येकाला अनुभव निराळे येतात, असें उत्तर देऊन वक्ता म्हणतो : 'जें जें जया अनुभवलें। तें चि तयासि मानलें। तेथें चि त्याचें विस्वासलें । अंतःकर्ण ॥ ४४ '. आणि नंतर ४५–५१ ओव्यांत ब्रह्माचीं विविध नांवें उच्चारून 'ऐसीं नामें असंख्यात। परी तो परेश नामातीत। त्याचा करावा निश्चितार्थ । ठेविलीं नामें ॥ ५२ ' असें त्या नांवांचें कारण दिग्दर्शित केलें आहे.

**तिसरा** समास चौदा ब्रह्मांचा आहे. ब्रह्म एकच पण त्याची ज्या शब्दांनीं वाच्यता केली जाते ते शब्द चौदा असून ब्रह्माविषयीं भ्रम उत्पन्न करणारे आहेत. 'आधीं मिथ्या उभारावें। मग तें वोळखोन सांडावें। पुढें सत्य तें स्वभावें। अंतरीं बाणे ॥ ४' चौदा ब्रह्मांचा संकेत हा ब्रह्मविषयक अंतिम सिद्धांत कळण्यासाठीं आहे. १ शब्द, २ मितिकाक्षर, ३ खंब्रह्म, ४ सर्वब्रह्म, ५ चैतन्य, ६ सत्ता, ७ साक्ष, ८ सगुण, ९ निर्गुण, १० वाच्य, ११ अनुभव, १२ आनंद, १३ तदाकार, १४ अनुर्वाच्य. अनुभवरहित भ्रम हें पहिल्याचें, एकाक्षर हें दुसऱ्याचें, खं म्हणजे आकाश हें तिसऱ्याचें, पंचभूतांच्या सांखळींतल्या प्रत्येक तत्त्वाला ब्रह्म समजणें हें चौथ्याचें, पंचभूतांना चेतविणारें हें पांचव्याचें, चैतन्याला ज्याची सत्ता हें सहाव्याचें, त्या सत्तेला जाणता हें सातव्याचें, साक्षत्वाला गुणांत गुंतविणारें हें आठव्याचें, गुणवार्ता नसणें हें नवव्याचें, वाचेनें बोलतां येणें हें दहाव्याचें, जें अनुभवानें बोलतां येण्याजोगें हें अकराव्याचें, आनंद हें बाराव्याचें, अभेद हें तेराव्याचें, संवाद करायला जागा राहूं न देणारें हें चौदाव्याचें, असें प्रत्येकाचें एक एक वर्म किंवा लक्षण आहे.

२२ ओव्या चौदा ब्रह्मांचीं नांवें व लक्षणें यांनीं व्यापल्या आहेत. 'ब्रह्म जाणावें शाश्वत ॥ २३' ही कसोटी भक्कम धरून तिच्यावर यांपैकीं प्रत्येक ब्रह्माचा कस पाहूं लागलें कीं त्यांचें मायिक स्वरूप उघडें होऊन त्यांच्या थोतांडाविषयीं शंका रहात नाहीं. समर्थांनीं प्रत्येकांतील नश्वरता व अपूर्णता निदर्शनास आणून त्याचा निकाल लावला आहे. याप्रमाणें सर्वांची व्यवस्था करून खऱ्या ब्रह्माच्या परिचयाकडे ते वळले आहेत. त्याचें वर्म अनुभवी माणसाला स्वानुभवानें जाणतां येतें असें समर्थांचें आश्वासन आहे (४७). निर्विकल्पाची कल्पना करूं लागलें कीं कल्पना मोडून जातात, 'मग नसोनि असावें। कल्पकोटी ॥ ४९' या कल्पनेचा एक गुण अत्यंत प्रशंसनीय व ग्राह्य आहे, कल्पनेचें तोंड जिकडे फिरवावें तिकडे ती धाव मारते. स्वरूपांत तिचा शिरकाव करून दिला कीं, ती निर्विकल्प स्थितीपर्यंत जाऊन पोंचते. निर्विकल्पाची कल्पना करूं लागल्यास कल्पनाच ठिकाणावर रहात नाहीं. 'निःसंगास भेटों जातां। निःसंग होइजे ॥ ५१' समर्थ म्हणतात: 'पदार्थाऐसें ब्रह्म नव्हे। मा तें हातीं धरून द्यावें। असो हें अनुभवावें। सद्‌गुरुमुखें ॥ ५२' यांतली 'कल्पनेचें येक बरें। मोहरितां च मोहरे। ५०' ही ओवी 'कां जे यया

मनाचे एक निकें। देखिले गोडीचिया ठाया सोके। म्हणोनि अनुभवसुखचि कवतिकें। दावीत जावें ॥' या ज्ञानेश्वरकृत ओवीशीं समर्पकपणें जुळणारी आहे. कल्पना हें मनाचें कार्य असल्यामुळें समर्थांच्या 'कल्पना' शब्दाऐवजीं ज्ञानेश्वरांचा 'मन' शब्द पाहून बिचकण्याचें कारण नाहीं. अशीच संगति अर्थदृष्ट्या इतर शब्दांचीहि लावतां येते.

समर्थांनीं हीं चौदा ब्रह्में कुठून आणलीं, याविषयीं कित्येकांनीं चर्चा केली आहे. वेदांतामध्यें ब्रह्मांची नेमकी चौदा ही संख्या आढळत नाहीं. म्हणून वादाला जागा सांपडते. या ब्रह्मांवरून समर्थांचा एखाद्या पंडिताशीं कडाक्याचा वाद झाल्याच्या आख्यायिका समर्थांच्या सांप्रदायिक चरित्रांतून पहायला सांपडतात. आत्मारामस्वामीच्या दासविश्रामधामांत (पान ६२७) गागापंडिताची चौदा ब्रह्मांसंबंधाची शंका मिटविण्यासाठीं समर्थांनीं चौदा ब्रह्मांच्या नामावलीचे दोन श्लोक जुन्या ग्रंथांतून काढून दाखविल्याची कथा सांगितली आहे. ते श्लोक ज्यांतून काढले त्या ग्रंथाचें नांव मात्र दिलेलें नाहीं. ते श्लोक पुढीलप्रमाणें :

**शब्दौमित्येकाक्षरं च खंमयं सर्वतोमुखम्।**
**चैतन्यं च सत्ता एव साक्षं सगुणमेव च ॥ १**
**निर्गुणं च वाचकं च अनुभवं च रुद्रकम्।**
**आनंदं च तदाकारं अनिर्वाच्यं चतुर्दश ॥ २**

रचनेच्या शिथिलपणावरून हे श्लोक समर्थ संप्रदायांतच जन्मास आले असले पाहिजेत असें म्हणतां येतें.

**चौथा** समास 'विमल ब्रह्म' या विषयाचा आहे. तिसऱ्या समासांत ब्रह्मविषयक नानाविध कल्पनांचें निरसन केल्यावर ब्रह्माची स्थिति खरोखरी आहे तरी काय, याचें विवेचन अवश्य असल्यामुळें तें या समासांत पार पाडलें आहे. विश्व म्हणून जें जें कांहीं आहे—स्वर्ग, पाताळ, जळ, स्थळ, काष्ठ, पाषाण वगैरे—त्या सर्वांला ब्रह्मानें आंतून बाहेर व्यापलेलें आहे. जळचराला जसें पाणी तसें जीवमात्राला ब्रह्म आहे. परंतु 'जळावेगळा ठाव आहे। ब्रह्माबाहेरी जातां नये। ६' म्हणून पाण्याच्या उपमेनें ब्रह्माच्या एकमेवाद्वितीय विशाल व्यापकत्वाची कल्पना करतां येत नाहीं. आकाशाचा दृष्टांत ब्रह्माच्या व्यापकतेची थोडीशी कल्पना आणून

देऊं शकतो म्हणून ७–११ ओव्यांत त्याचीं निरनिराळीं अंगें व्यक्त केलीं आहेत. झोपेंत खरें वाटणारें स्वप्न जागृतीनें खोटें ठरतें तसेंच मायारूप स्वप्न अनुभवसिद्ध ज्ञानाच्या जागृतीनें खोटें असल्याचें उमगतें, इत्यादि कोडें उलगडून दाखविण्याचा यत्न केलेला आहे. ब्रह्मांडाच्या अणुरेणूंत ब्रह्म अंशमात्रानें भरलेलें असूनसुद्धां तें बाहेर किती आहे याची मर्यादा सांगणें अशक्य आहे. थोडा बोध होण्याकरितां लहानशा कमंडलूंतलें आकाश व बाहेरचें आकाश यांचा दाखला देतां येईल. ब्रह्माला दृष्टांत पुरेसे पडत नाहींत. केवळ आकाशाचा दृष्टांत कांहींसा उपयोगी पडतो. आकाश शून्य आहे, निव्वळ पोकळी आहे; हा दोष नसलेल्या आकाशासारखें ब्रह्म समजावें. या गगनांत वायूप्रमाणें माया आहे. वारा समजतो, पण दिसत नाहीं; तसाच मायेचा खेळ आहे. ब्रह्म हें पदार्थमात्रांना भेदून त्यांत असणारें असलें तरी त्यांत कठिणत्व नाहीं. वायु सर्वांत मृदु; त्याहून ब्रह्म मृदु आहे. तें पृथ्वींत असून पृथ्वीबरोबर नाश पावत नाहीं, तें पाण्यांत असून पाण्याबरोबर आटत नाहीं, तेजांत असून जळत नाहीं, वायूंत असून चळत नाहीं. 'शेरीर अवघें व्यापलें। परी तें नाहीं आडळलें। ३३' 'तयामधें चि आपण। आपणा सबाह्य तें जाण। ३५'. त्याला नांव नाहीं, रूप नाहीं. आकाशांत धुक्याचे डोंगर दिसतात तसें मायादेवी हें (नामरूपाचें) 'वोडंबर' दाखवितें (४०). माणसांच्या इंद्रियांत व कर्मांत ब्रह्म असतें, मात्र त्याला जाणण्याचा उद्योग करूं गेल्यास इंद्रियांची हाव मोडते. सृष्टीचा अभाव बुद्धींत निर्माण करण्याच्या अनुभवानें तें जाणतां येतें, पावतां येतें. 'ज्ञानदृष्टीचें देखणें। चर्मदृष्टी पाहों नेणें। ४८' या अंतर्वृत्तीच्या खुणा अंतरवृत्तीलाच ओळखतां येतात. माया, ब्रह्म, अनुभवाचें स्थान यांचें (पृथक्त्वानें) ज्ञान बाळगणारी जी स्थिति ती सर्वसाक्षिणी तुर्यावस्था. हिच्यापलीकडची सर्वप्रकारें निवृत्त ती उन्मनी. ह्या अवस्थेंत ज्ञातेपणाची जाणीव उरत नाहीं, म्हणून तिला विज्ञान म्हणतात. प्रथम अज्ञानाचा, मग ज्ञानाचा व शेवटीं विज्ञानाचाहि परब्रह्मांत लोप होतो.

**पांचवा** समास 'द्वैतनिरसना'चा आहे. ब्रह्म आणि माया यांच्या द्वैताच्या निरसनाचा यांत प्रामुख्यानें विचार आहे. ब्रह्म सत्य हा संकल्प व माया मिथ्या हा विकल्प हे मनाचे खेळ आहेत. ब्रह्म व माया यांचें पृथक्त्वानें योग्य ज्ञान असणें ही सर्वसाक्षिणी तुर्यावस्था. एक प्रकारें या अवस्थेला सर्वज्ञता असें म्हणतां येईल.

परंतु खोल बारीक पाहणी केल्यावर सर्व म्हणून जर कांहीं नाहींच तर या सर्वज्ञतेची—तुर्यावस्थेची—मातब्बरी काय? संकल्पविकल्पाचें मूळ जें मन तेंच खोटें ठरल्यावर साक्षीपणाला अर्थच उरत नाहीं. साक्षत्व, चैतन्यत्व, सत्ता हे ब्रह्मसंबंधांत वृथा आरोप आहेत. आकाशाला घटाकाश, मठाकाश अशीं नांवें देतात तशींच मायेच्या खरेपणानें ब्रह्माला नांवें प्राप्त होतात. माया सत्य मानल्यानें ब्रह्म सर्वसाक्षी ठरतें, पण माया अविद्येचा निरास झाल्यावर हें द्वैत मावळतें. सर्वसाक्षी मन उन्मन झालें (मनाचे रोजच्या व्यवहारांतील सामान्य धर्म नाहींसे होऊन तें त्या धर्मांहून भिन्न अशा वरच्या पायरीवर चढलें), कीं तुर्यारूप ज्ञानाची स्थिति संपते. द्वैतग्राही मन उन्मन झाल्यावर द्वैताद्वैताचें अनुसंधान सुटतें. द्वैताद्वैत हे वृत्तीचे संकेत आहेत. ती वृत्ति हरपून तिची जागा निवृत्तीनें घेतली कीं, बुद्धींतून द्वैताचें उच्चाटन घडतें. 'वृत्तिरहित जें ज्ञान। तें चि पूर्ण समाधान। १२४' यापुढें मायाब्रह्म या मनानें कल्पिलेल्या संकेतावरून कल्पनेचा ऊहापोह केला आहे (१६–२६). कल्पनेमध्यें विकार जन्मास घालण्याचें जसें सामर्थ्य आहे तसेंच विचाराला चालना देण्याचेंहि सामर्थ्य आहे, याची बूज राखून शुद्ध कल्पनेची प्रशंसा समर्थांनीं केली आहे. 'कल्पना जन्माचें मूळ।' असा तिचा दोष दाखविल्यावर, 'कल्पना भक्तीचें फळ। २४', तीच मोक्षदायक, असेंहि समर्थांनीं सांगून ठेवलें आहे. कल्पना निर्मूळ केल्यानें ब्रह्मप्राप्ति होते. श्रवण, मनन, निदिध्यास हीं विकृत कल्पनांचें जाळें उडविण्याचीं साधनें आहेत (२७). कांट्यानें कांटा काढायचा त्याचप्रमाणें कल्पनेच्या साह्यानेंच कल्पनेचा नायनाट साधावा. ३३–४० इतक्या ओव्यांत शुद्ध कल्पनेच्या व्याख्यानाचा विस्तार आहे. अद्वैत, निर्गुण या शुद्ध कल्पना आहेत. या कल्पना बुद्धींत अढळपणें बळावल्यास द्वैत, सगुण इत्यादि कल्पना उडून जातात. 'शुद्ध कल्पनेचें रूप। तें चि जें कल्पी अरूप। स्वरूप कल्पितां तद्रूप। होय आपण॥ ३९' हें तद्रूपत्व, हा निश्चय चळूं नये म्हणून अखंड श्रवण चालवावें.

**सहावा** समास 'बद्ध मुक्ता'चा आहे. कल्पनारहित अद्वैत ब्रह्माचें निरूपण ऐकून श्रोत्याला क्षणभर तदाकारत्व आलें, पण ही स्थिति टिकत नाहीं. पुनः मन आपल्या साहजिक वृत्तीवर येऊन एकदां ब्रह्माकार तर एकदां वृत्तिरूप असें रहाटगाडगें चालूं लागतें. ब्रह्म होऊन संसार करणें हें विपरीत वाटतें, वगैरे शंकांनीं

श्रोत्याला ग्रासलें. ना धड ब्रह्म ना धड संसार या विचित्र गतीचें रडगाणें १५ ओव्यांत पसरलें आहे. या रडगाण्याचें मर्म ओळखून वक्त्यानें उत्तर दिलें आहे. ब्रह्म आणि संसार यांचें साहचर्य संभवत नाहीं, हें श्रोत्याच्या गाऱ्हाण्याचें मुख्य मर्म आहे. 'ब्रह्म चि होऊन जे पडिले। ते चि मुक्तपदास गेले। येर ते काये बुडाले। व्यासादिक ॥ १८'. 'ब्रह्म चि होऊन पडिले' या शब्दांतील खोंच जिज्ञासूंच्या लक्षांत येईल. ब्रह्मावस्था म्हणजे निष्क्रियता या कल्पनेसाठीं 'पडिले' (पडून राहिले, हालचाल करीनासे झाले) हा शब्द वापरला आहे. वक्त्याच्या प्रतिप्रश्नावर 'शुको मुक्तो वामदेवो वा' ही श्रुति टाकून श्रोत्यानें सुचविलें आहे कीं, ज्याअर्थी वेदाच्या मतें शुक, वामदेव हे दोघेच मुक्त आहेत, त्याअर्थी बाकीचे सारे बद्धच समजण्याशिवाय गत्यंतर नाहीं. आजवर ऋषिमुनि, सिद्धयोगी, आत्मज्ञानी (यासाठीं 'प्रऱ्हादनारदपराशर' हा व 'कविर्हरिरंतरिक्षः' हा असे दोन श्लोक दिले आहेत) किंवा ब्रह्मा विष्णु महेश्वर आदिकरून जे कोणी थोरथोर होऊन गेले त्यांकडे दुर्लक्ष करून 'शुक वामदेव मुक्त झाले। येर हे अवघे चि बुडाले। या वचना विश्वासले। ते पढतमूर्ख ॥ २५' असें ठणठणीत उत्तर देऊन वक्ता म्हणतो : 'वेदानें पूर्वपक्ष केला आहे, तो साधु व्युत्पन्न दक्ष यांना संमत नाहीं. पण याचा अर्थ वेदाचा अधिक्षेप करावा असें नाहीं.' याकरितां वेदशास्त्रपुराणांचा महिमा सांगितला आहे (२९–३४). तथापि दोन मुक्त म्हणजे दोनच, तिसरा नव्हे, असा अर्थ चतुरांना मान्य नाहीं. क्षणभर श्रोत्याचा अर्थ स्वीकारून विचार करूं गेल्यास काय निष्पन्न होतें ? जो निष्क्रिय तो मुक्त असें म्हटलें तर लाठीच्या मारानें बेशुद्ध पडणाराला मुक्त समजावें लागेल. मुक्त म्हणजे निष्क्रिय असा अर्थ असता तर शुकानें भागवताचें परिक्षितीपुढें प्रवचन करण्याची काय जरूरी होती ? शुक मुक्त म्हणजे अचेतन, निश्चल ब्रह्माकार झालेला नव्हता. 'क्षण येक ब्रह्म चि व्हावें। क्षण येक दृश्य धांडोळावें। नाना दृष्टांतीं संपादावें। वगतृत्वासी ॥ ४२' भागवताचा प्रवक्ता म्हणून शुक बद्ध ठरत नाहीं. 'म्हणोनी बोलतां चालतां। निचेष्टित पडले नस्तां। मुक्ति लाभे सायोज्यता। सद्गुरुबोधें ॥ ४४'. याप्रमाणें मुक्तावस्था आणि लोकोद्धार यांचा सहयोग विशद करून पुढें १ मुक्त, २ नित्यमुक्त, ३ जीवन्मुक्त, ४ विदेहमुक्त असे मुक्तांचे चार वर्ग सांगितले आहेत. 'सचेतन ते जीवन्मुक्त। अचेतन ते विदेहमुक्त। ४६' याहून वेगळे नित्यमुक्त होत. स्तब्धता ताटस्तता ही मुक्तांच्या अंतरंगांत

असते. तिच्याशीं देहाचा संबंध आहे. ब्रह्मानुभवाची जी अखंड तृप्ति, जिच्या योगानें बाह्य व्यवहारांत चंचलता, गडबड, डळमळ उत्पन्न होत नाहीं ती स्तब्धता. ती तटस्थता. बद्धमुक्त या शब्दांचा संबंध देहाकडे आहे. ब्रह्मानुभव हा देहभानापलीकडचा असल्यामुळें तेथें बद्ध, मुक्त हे शब्द निरर्थक आहेत. 'मी मुक्त आहें किंवा झालों' ही जाणीव बंधनाची द्योतक आहे. यासाटीं 'मीपणापासून सुटला। तो चि येक मुक्त जाला। ५४'; मग तो मौनी असो वा बोलका असो, तो मुक्तच. ब्रह्मावस्थेंत बद्ध, मुक्त या शब्दांना अवसर नाहीं, असें पुनः बजावून 'मीपणाची जाणीव' हें बंधन, असें फिरून एकवार सांगितलें आहे. येथें भागवत एकादश स्कंधांतील ११ व्या अध्यायाचा पहिला श्लोक आधारास घेतला आहे. मायामूलक गुणांच्या प्रभावानें बद्ध, मुक्त अशा व्याख्या लावल्या जातात. वस्तुतः (ब्रह्मदृष्ट्या) त्या खऱ्या नाहींत, असा त्या श्लोकाचा अर्थ आहे. शेवटीं 'बद्ध मुक्त हा संदेहो। धरी कल्पनेचा देहो। साधु सदा निःसंदेहो। देहातीत वस्तु ॥ ६४' असा या प्रतिपादनाचा समारोप केला आहे.

या समासांत एकनाथी विचारसरणीची छाया बरीच उतरलेली असल्यामुळें समर्थांना एकनाथी वाङ्मयाचा परिचय होता व त्यांतून त्यांनीं कांहीं मतें आपल्या चित्तावर ठसवून ठेवलीं होतीं, याविषयीं शंका रहात नाहीं. ज्ञानोत्तर कर्म कीं नैष्कर्म्य या प्रश्नांत शिरून निष्क्रियता व मुक्तावस्था यांना कायमचें तोडून टाकलें आहे. एकनाथांनीं मुक्तावस्था हा शब्द न वापरतां समाधि हा शब्द उपयोगांत आणलेला आहे. बाकीचें विवेचन एकनाथांच्या मताशीं समान आहे. ताटस्थ्य, ताटस्थता हे शब्द एकनाथी वाङ्मयांत आहेत. बेशुद्धि, अचेतनत्व, मूर्छा इत्यादि शब्द दृष्टांतासाटीं एकनाथांनीं योजले आहेत. काष्ठी लागोन पडला—मूर्छावस्था, किंवा काष्ठ होऊन पडिला—स्तब्धता, तटस्थता यासंबंधांत एकनाथ व समर्थ यांचें मतैक्यच नव्हे तर कांहीं अंशीं शब्दैक्यसुद्धां दृष्टीस पडतें. एकनाथांचे स्फुट ग्रंथ आणि भागवतटीका पहाणारांना याविषयीं शंका वाटणार नाहीं.

**सातवा** समास 'साधनप्रतिष्ठा' नांवाचा आहे. सतत श्रवणमननादि साधनांचा अभ्यास केल्याखेरीज ब्रह्मज्ञान स्थिरावत नाहीं, सफल होत नाहीं, अशा रीतीनें साधनांची महती दाखविलेली आहे. परंतु साधनांचा विषय अगदीं शेवटीं

थोड्याशा ओव्यांत आला असून सुरुवातीपासून बऱ्याच ओव्या ब्रह्मविषयक कल्पनांचें वैफल्य निदर्शनास आणणाऱ्या आहेत. ब्रह्मासंबंधीं ज्या ज्या कल्पना कराव्या त्या त्या खोट्या ठरतात. निर्गुण, गुणातीत, अदृश्य, अव्यक्त, अचिंत्य, चिंतनातीत असा जो परमपुरुष त्याला ओळखायचें, जाणायचें कसें, या प्रश्नाची व्याकुळता पहिल्या अनेक ओव्यांतून भरलेली आहे. अचिंत्याचें चिंतन, निःशब्दाचा अनुवाद, निर्विकल्पाची कल्पना, अद्वैताचें ध्यान इत्यादि क्रिया होऊं लागल्या कीं, तद्विरोधी गोष्टींचा मनांत उठाव होतो व या क्रिया बारगळतात आणि आपली ब्रह्मज्ञानाच्या दिशेनें प्रगति होत नाहीं. याला 'सवे लावितां सवे पडे। सवे पडतां वस्तु आतुडे। १५' असा संवय लावण्याचा उपाय सांगितला आहे. वरील क्रिया निर्विघ्नपणें सिद्धीस जात नाहींत म्हणून जर विघ्नांना कंटाळून त्या मध्येंच सोडून दिल्या तर कांहींच हातीं लागणार नाहीं. 'तें साधूं जातां साधवेना। नातरी सोडितां सुटेना। लागला समंध तुटेना। निरंतर ॥ २१' ही ब्रह्माची रीत १९–२७ ओव्यांत वर्णून पुनः मूळच्या अडचणींचा निराळ्या शब्दांनीं प्रपंच केलेला आहे. ब्रह्माचा अभाव जीवानें स्वीकारल्यास 'बहुतीं निर्मिलें तें काये। मिथ्या म्हणावें ॥ ३२' हा दोष वांट्याला येतो. 'बहुतीं निर्मिलें' याचें स्पष्टीकरण होण्यासाठीं प्रथम व्यासांचा उल्लेख असून पुढें गुरुगीता, अवधूतगीता, हंसगीता, चतुःश्लोकी भागवत, वसिष्ठसार, सप्तश्लोकी गीता यांचीं नांवें दाखल केलेलीं आहेत (३३–३७). 'बहुत ऋषी बोलिले बहुतीं। ३८' 'म्हणौनि मिथ्या आत्मज्ञान। म्हणतां पाविजे पतन। ३९' जर आपल्याला तें ज्ञान उमजत नसेल तर सद्गुरुमुखें सुदृढ करावें. नंतर या सर्व घोटाळ्याचें मूळ जें 'मीपण' त्याचें बळ व दुष्परिणाम निवेदन केलेले आहेत (४५–५१). हें दुष्ट 'मीपण' नीट ओळखल्याशिवाय त्याचीं पाळेंमुळें खणून काढतां येत नाहींत. 'मीपण' त्यागून ब्रह्माचा अनुभव घ्यावा. आणखी एक बारीक गोष्ट ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. 'मीपणा' गेला म्हणून साधनाभ्यास सोडूं नये. 'मीपणेंविण साधन। करूं जाणे तो चि धन्य। समाधानी ॥ ५३'. मी तर आतां ब्रह्म झालों, आतां साधनाची गरज काय, ही भावना अधःपाताची खूण आहे. ब्रह्मपदारूढानें आपलें स्थान कायम राखून साधनोपाय करीत रहावें, 'तरी च सांपडे सोये। अलिप्तपणाची ॥ ५९'. साधन ही देहाची जबाबदारी आहे. ब्रह्मावस्थेंत देहबुद्धीला जागा नाहीं. देहाचीं कर्में देह करील, त्यांचा मीपणानें

अभिमान धरला नाहीं कीं करून अकर्तेपणा असा अलिप्तपणा साधतो. साधन देह याच्याशीं आपला संबंध नाहीं, इतकी योग्यता बुद्धीनें गांठल्यास 'देहीच असोन विदेह। स्थिति ऐसी ॥ ६३' ही अवस्था सिद्ध झाली असें म्हणतां येतें. साधन सुटल्यानें काय घडतें याचा खुलासा ६४–६७ ओव्यांत आहे. साधनांच्या अभावीं देहममता अंगीं जडते, ब्रह्मज्ञानमिसें आळस प्रबळे, परमार्थमिसें अर्थ (द्रव्याभिलाष) डोकें वर काढतो, ध्यानमिसें निद्रा लागते, मुक्तिमिसें स्वैराचार माजतो, निरूपणमिसें निंदा घडे, संवादमिसें विवाद उद्भवतो, उपाधिमिसें अभिमान बळावतो, ब्रह्मज्ञानमिसें आळस अंतरांत संचरून साधनाचें वेड हवें कशाला, असें वाटूं लागतें. काय करावें, कुठें जावें, काय घ्यावें, काय सोडावें; प्रलयकालीं पाण्यानें जसें विश्व भरून जातें तसें सर्व आत्म्यानें व्यापलेलें आहे (आपल्याला कांहींच करायला नको), अशा अर्थाच्या श्लोकाचा अर्थ उलटवून ब्रह्मज्ञानमिसें आळसाच्या आहारीं गेलेला मनुष्य स्वतःचा घात करून घेतो. साधन सोडणारा मनुष्य मुक्त नव्हेच, तो 'मुक्तपणें बद्ध' (६९) असतो. त्याला वाटूं लागतें कीं, साधन जर करायचें तर मी सिद्ध कसला? साधनांमुळें मी सिद्धपणाला मुकेन. साधनांच्या योगानें लोक आपल्याला साधक मानतील, सिद्ध समजणार नाहींत याची लाज त्याच्यावर अंमल गाजविते. पण ब्रह्मादिक देखील साधन करतात, हें ध्यानांत ठेवावें. अभ्यासानें विद्या तेजस्वी व कार्यक्षम रहाते. अभ्यासानेंच पूर्णब्रह्म गांठतां येतें. आतां अभ्यास म्हणजे काय करावयाचें हा प्रश्न आला. त्याचें उत्तर पुढील समासांत आहे.

समर्थांना साधनांचें महत्त्व नेहमींच अतोनात वाटत असल्याचें प्रमाण हा साधनप्रतिष्ठेचा समास असून पुढें आणखी प्रमाणें दृष्टीस पडतील. मुक्त या शब्दाचा अर्थ 'मोकळा', ज्याला बंधन नाहीं तो, असा होतो. परंतु समर्थांना शिस्त प्रिय होती. बेशिस्त वर्तनावर त्यांनीं कोरडे ओढले आहेत. ह्याचा एक मासला 'सप्तसमासी'च्या तिसऱ्या समासांत पहायला सांपडतो. बंधनावांचून व्यवहार करणाऱ्या प्राण्याच्या संसाराची घाण इतकी होते कीं, त्याच्या घरचें पाणी पिणेंसुद्धां प्रशस्त वाटत नाहीं (९). पवित्रपणाचा ज्याला कंटाळा तो अपवित्र (१०). याप्रमाणें प्रस्तावना करून समर्थांनीं 'मोकळेपणा म्हणजे मुक्ति' असा अर्थ केल्यास 'अंत्यज मोकळे असतात, कुत्रीं घरोघर स्वैरतेनें फिरतात' म्हणून तीं मुक्तच म्हणावीं लागतील (११), या दाखल्यानें मोकळेपणाचा निषेध केला आहे.

**आठवा** समास 'श्रवण' या साधनाच्या चर्चेचा आहे. श्रवण हा विषय नवविधा भक्तीच्या विचारांत येऊन गेला असतां (४:१) पुनः त्याचें निरूपण येथें पाहिलें म्हणजे हा दशक व पूर्वीचा दशक हे स्वतंत्रपणें निरनिराळ्या वेळीं लिहिले गेल्याबद्दल शंका रहात नाहीं. पूर्वीच्या समासांत 'काय श्रवण करावें' सांगण्याकडे अधिक लक्ष आहे तर या समासांत 'श्रवणाचीं फळें व श्रेष्ठता' याची शहानिशा मोठ्या प्रमाणांत केलेली आहे. मध्यें ओव्या २३–२६ यामध्यें श्रवणाचे विषय थोडक्यांत दिलेले आहेत. मानवी जीवाला पंचमहाभूतांची जेवढी आवश्यकता आहे तेवढीच श्रवणाची आहे. श्रवणाचें फल तीर्थव्रताच्या फळाप्रमाणें कालावधीनें हातीं येणारें नाहीं, तर तात्काळ प्राप्त होत असतें. 'तीर्थी व्रतांची फळश्रुति। पुढें होणार। सांगती। तैसें नव्हे हातीचा हातीं। सप्रचित श्रवण ॥ ३६'. जेथें श्रवणकार्य चालत नसेल तेथें साधकानें क्षणभरसुद्धां राहूं नये. श्रवणावांचून परमार्थ अशक्य आहे. श्रवण कितीदां करावें असा प्रश्न उपस्थित करून समर्थांनीं खाण्यापिण्याच्या दाखल्यानें तें नेहमीं करावें असें उत्तर दिलें आहे 'सेविलें च सेवावें अन्न। घेतलें चि घ्यावें जीवन। तैसें श्रवणमनन। केलें चि करावें ॥ ४७' आळसानें जर कोणी श्रवणाचा अनादर करील तर त्याच्या हिताचा अपहार घडेल. आळसाचें संरक्षण म्हणजे परमार्थाची बुडवण होय. 'याकारणें श्रवण। केलें चि पाहिजे ॥ ४९'.

**नववा** समास 'श्रवणा'चाच आहे. त्याला नांवसुद्धां मागल्या समासाचें 'श्रवणनिरूपण' असेंच आहे. परंतु 'श्रवणाचें पथ्यापथ्य' याची माहिती प्रस्तुत समासांत आहे. श्रवण करावें पण कसें करावें हें पूर्वी सांगितलेलें नाहीं. त्याची मीमांसा येथें केलेली आहे. श्रवण म्हटलें कीं वक्तृत्वाचें स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं. वक्तृत्वाच्या जोडीनें श्रवण चालतें. तेव्हां कोणत्या वक्तृत्वाला श्रवणानिमित्त आपला कान द्यावयाचा याचा प्रथम निर्णय केला आहे. संशय उत्पन्न करणाऱ्या वक्तृत्वापासून दूर रहावें. 'जेथें संशय तुटती। होये आशंका-निवृत्ति। अद्वैत ग्रंथ परमार्थी। श्रवण करावें ॥ ५'. सर्वांची आवड सारखी नसते. प्रत्येकाची आवड निरनिराळी असते. 'आवडीसारिखें मिळे। तेणें सुख चि उचंबळे। ९' नाहीं तर मनुष्य कंटाळतो. उपासनेप्रमाणें आवड असा नियम आहे. पाणी पाणवाटेनें जसें स्वयमेव धावतें तसेंच प्रीतीचें लक्षण आहे. ती 'अंतरीं उठे अनायासें। ११'. आत्मज्ञानाच्या भक्ताला सारासार विचारणा रुचते.

देवीचे भक्त सप्तशतीचा आदर करतात. अनंताचें व्रत पाळणारांना भगवद्गीता निरुपयोगी वाटते. अलंकार ठराविक अवयवालाच शोभतात. 'जेथील तेथें चि गोड' या नियमान्वयें 'ज्ञानीयांस चाड । अद्वैत ग्रंथाची ॥ १८'. पुढें 'जेथील तेथें चि गोड' हें सूत्र स्पष्ट होण्यासाठीं कांहीं उदाहरणें दिलेलीं आहेत (२१-२५). नंतर ज्यांना स्वहित साधावयाचें असेल त्यांनीं अद्वैत ग्रंथाची कास धरावी, असा समर्थांनीं आपला सिद्धांत सांगून 'ग्रंथ' शब्दाची व्याख्या केली आहे (३०-३४). त्या व्याख्येच्या ओव्या प्रसिद्ध आहेत. 'जेथें नुपजे विरक्ती भक्ती । तो ग्रंथ चि नव्हे ॥ ३५'. आणखी बजावून ठेवलें आहे कीं 'मोक्षेंविण फळश्रुती । ते दुराशेची पोथी ॥ ३६'. फिरून एकदां समर्थांनीं कुणाला काय आवडतें याचा विस्तारानें खल केलेला आहे (३९–५५). 'ऐसें सांगावें तें किती । आवडीसारिखें ऐकती । नाना पुस्तकें वाचिती । सर्वकाळ ॥ ५६'. परंतु परत्रसाधन ज्यांत नाहीं त्याचें श्रवण करूं नये. निरूपणामध्यें ज्ञान हा एकच एक विषय पाहिजे. 'आतां असो हें बहुत । ऐकावा परमार्थग्रंथ । परमार्थग्रंथेंविण वेर्थ । गथागोवी ॥ ५९'. याच अर्थाच्या आणखी एका ओवीनें हा समास संपविलेला आहे.

**दहावा** समास 'देहान्तनिरूपणा'चा आहे. मायेच्या सापळ्यांत सांपडून भांबावलेल्या बुद्धीचें १–६ ओव्यांत विवेचन करून पूर्वीच्या उपदेशानें परमार्थाची खूण सांपडली, समाधान झालें, चित्त चैतन्यांत मिसळून गेलें, ब्रह्माला आपलेंच रूप म्हणून ओळखलें, इत्यादि माहिती दिल्यावर 'देहाची गति काय' हा प्रश्न विचारास घेतला आहे. ब्रह्मज्ञानी पुरुष देह प्रारब्धाच्या हवालीं करून जिवंत रहातो. त्याला कसलाच संदेह बाधत नाहीं. देह मिथ्या या धारणेमुळें 'आतां चि पडो अथवा राहो' असा त्या विषयीं उदासीन असतो. ज्ञानी पुरुषाचें शरीर जेथें पडेल तेंच पुण्यस्थळ बनतें. तथापि देह पुण्यनदीच्या तीरावर पुण्यक्षेत्रीं पडल्यास उत्तम अशी एक समजूत आहे. ही समजूत चुकीची आहे. साधूंच्या दर्शनानें जर तीर्थें पावन होतात तर त्यांनीं तीर्थावर मरण्याची अपेक्षा कां बाळगावी ? पुण्यक्षेत्रीं देहावसान झाल्यास मनुष्य मुक्त होतो, परंतु जो आधींपासूनच नित्यमुक्त आहे, त्याला तीर्थक्षेत्रीं मरण आल्यानें आणखी कोणती मुक्ति मिळायची असते ? उत्तरायण, दक्षिणायन हे विकल्प त्याच्याकरितां नाहींत. 'देहाचा अंत बरा आला । देह सुखरूप गेला । त्यासी म्हणती धन्य जाला । अज्ञान जन ॥ १६'. येथें ९–१३

व १६ इतक्या ओव्या एकवीससमासी जुन्या दासबोधाच्या कल्याणप्रतींतील चौथ्या समासांतून घेतलेल्या आहेत. देह तीर्थावर पडावा या समजुतीचा निकाल झाला. दुसरी समजूत 'अंतीं भेटतो भगवंत' हीसुद्धां चुकीची ठरते. सारी हयात व्यर्थ दवडून शेवटच्या क्षणीं देव आठवेल ही कल्पनाच मुळीं निराधार आहे. धान्य पेरलें असेल तर तें उगवण्याची आशा धरतां येते. जेथें पेरणी नाहीं तेथें पीक कसें निघणार ? देवाणघेवाणीसारखा हा व्यवहार आहे. चाकरी केल्याशिवाय ज्याप्रमाणें मुशाहिरा मिळत नाहीं त्याप्रमाणें 'अंतीं अभक्त नरां। स्वहित न घडे ॥ २१'. वरील खुळ्या समजुतीस अनुसरून 'जरी आलें बरें मरण। तरी भक्तीविण अधोगति॥ २३'. जीवन्मुक्त ज्ञानी पुरुषाचें शरीर रानीं पडो वा स्मशानीं पडो, तो धन्यच. 'साधूचा देह खितपला। अथवा श्वानादिकीं भक्षिला। २६' हें लोकांना मंदबुद्धीस्तव प्रशस्त वाटत नाहीं. पण हें लक्षांत ठेवावें कीं, विवेकबळानें साधुपुरुष जन्ममृत्यू ओलांडून जिवंत असतो. तो मरणास मारून कृतार्थ झालेला असतो. तो जनांत दिसतो तसा वागणुकीनें नसतो. 'दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शला चि नाहीं॥ ३१' असे जे साधुपुरुष त्यांच्या भजनानें इतर जन पावन होतात. म्हणून सत्संगति व सद्गुरुसेवा यांचा महिमा सांगितला आहे (३२–४२). सद्गुरुभजन हें या ग्रंथाचें तात्पर्य उपसंहारांत गुरुगीतेचा आधार देऊन स्पष्ट केलें आहे. हा ग्रंथ साधकानें विवंचून पाहिल्यास त्याच्या ठिकाणीं ज्ञानाचा एक एक निश्चय उदय पावेल, अशी या ग्रंथाची फलश्रुति आहे. ज्या ग्रंथांत अद्वैताचा विचार असेल त्याला प्राकृत म्हणून हिणवणें उचित नव्हे. ज्यांतील वेदांत इतर शास्त्रग्रंथांशीं जुळतो व समाधान पुरवितो, ज्यांत ज्ञानाचा उपाय निवेदन केलेला असतो, त्याला प्राकृत म्हणणारे मूर्ख होत, असा अभिप्राय लिहून समर्थांनीं प्राकृताची अर्थात् मराठी भाषेची तरफदारी केली आहे.

• ८ •

'ज्ञानदशक' ह्या नांवानें समर्थांनीं ज्याचा अन्यत्र निर्देश केला आहे त्याचा वीसदशकी दासबोधांत समावेश करतांना त्याला 'मायोद्भव' असें निराळें नांव देण्यांत आलें. मुळांत ज्ञान सांगण्यासाठीं समर्थांनीं प्रस्तुत दशकाला प्रारंभ केला, हें पहिल्या ओवीच्या दुसऱ्या चरणावरून लक्षांत येणारें आहे. 'विमळ ज्ञान बाळबोध।

अति सुगम परियेसा ॥ १' असें तेथें म्हटलें आहे.

**पहिला** समास 'देवदर्शन' या नांवाचा आहे. देवाच्या प्रातीकरितां अनेक शास्त्रें आहेत; तीर्थ, तप, दान अशीं बहुत साधनें आहेत; परंतु शास्त्रें व साधनें यांतून सफलतेनें पार पडावयाचें म्हटल्यास आयुष्य पुरण्याचा संभव नाहीं. बरें, ज्याकरितां शास्त्रसाधनांची आटापीट करायची तो देव तरी एक आहे का? देव-सुद्धां असंख्य आहेत. मग एक देव नेमका सांपडण्याची आशा करायला नको. 'बहुविध उपासना । ज्याची जेथें पुरे कामना । तो तेथें चि राहिला मना । सुदृढ करूनि ॥ ९'. यामुळें बहु देव बहु भक्त यांची गर्दी उडाली आहे. ऋषींचें मतैक्य नाहीं; शास्त्रांचे वाद आहेत; या गोंधळांत बहुतेकांचा फडशा उडतो. 'मनुष्याणां सहस्रेषु' या न्यायानें हजारांत एखादा कोणी देवाचा विवेक पहायला जातो तर अहंतेच्या दोषामुळें त्याला देवाचें कौतुक आढळत नाहीं. याप्रमाणें या विषयाची दिशा दाखवून पुढें देवाची व्याख्या सविस्तर दिलेली आहे. ज्यानें हें चराचर विश्व उत्पन्न केलें—विश्वांत चंद्र, सूर्य, मेघ, शेष, तारा, अंतरिक्ष, ब्रह्मा, विष्णु, महेश हे सर्व प्रकार झाले—त्याला देव म्हणतात. देव्हाऱ्यांतहि देव असतात, पण त्यांना जीव उत्पन्न करतां येत नाहीं. मग ते ब्रह्मांड घडवतील ही अपेक्षा धरण्यांत हंशील काय? ठिकठिकाणीं देव आहेत, परंतु पृथ्वी, चंद्र, सूर्य, तारा, मेघ यांना ते निर्माण करूं शकत नाहींत.

'येथें आशंका उठिली । ते पुढिलीये समासीं फिटली । २५' या वाक्याच्या योगानें एकदां हा समास २५ ओव्यांत संपविला होता, असें दिसतें. पण नवा दासबोध तयार करतांना आणखी एक स्वतंत्रपणें लिहून ठेवलेला समास २५ ओव्यांपुढें जोडला आणि सगळा विषय एकाच समासांत पूर्ण केला. पहिल्या वेळचे शब्द तसेच राहून गेले. पुढील ओव्यांत सृष्टीच्या उभारणीचा क्रम सांगितला आहे.

आकाशांत वायु, वायूपासून अग्नि, त्यापासून पाणी, पाण्यापासून पृथ्वी, असा सृष्टीच्या मुख्य घटकांचा वृत्तांत आहे. पृथ्वीच्या पोटांत पाषाण असतात, त्या पाषाणांनाच विवेकहीन देव म्हणतात. मडक्यांच्या आधीं त्यांना घडविणारा कुंभार असतो, त्याप्रमाणें सृष्टीच्या आधीं तिला निर्माण करणारा असला पाहिजे, हें अगदीं स्पष्ट आहे. देव सृष्टिकर्ता खरा, पण त्याच्यांत सृष्टिभाव नसतो. तो जीव उत्पन्न

करतो म्हणून त्याला जीव मानल्यास चूक होईल. 'जें जें जया करणें पडे। तें तें तो हें कैसें घडे। ३८' 'तैसें जग निर्मिलें जेणें। तो वेगळा पूर्णपणें। ४०' तरीसुद्धां कांहीं मूर्ख म्हणतातच कीं 'जग तो चि जगदीश॥ ४०' तो सृष्टींत असून पुनः निराळा आहे. पंचभूतांच्या चिखलापासून तो अलिप्त असतो. अविद्येमुळें मायेचा भ्रम सत्य वाटतो. म्हणून जग मिथ्या, आत्मा खरा; सर्वांहून पलीकडचा जो परमात्मा तो अंतरात्मा अंतर्बाह्य व्यापून असतो. त्याला देव म्हणावें (४४–४५). बाकीचें सर्व थोतांड असें समजावें. सृष्ट पदार्थ नाशवंत असतो, हा प्रत्यक्ष अनुभव आहे. म्हणून परमेश्वर नाशवंतावेगळा आहे हें निराळें सांगायला नको. देव विमळ व निश्चळ असल्याचें सर्व शास्त्रें सांगतात. देव आला, देव गेला, देव उपजला, देव मेला, या भाषेसारखें दुसरें पाप नाहीं. उपजणें-मरणें, येणें-जाणें, दुःख भोगणें, हें त्या देवाचें करणें, तो करणारा वेगळा (५०). देव चळणरहित व कल्पनारहित आहे. इतका उपदेश ऐकल्यावर शिष्यानें गुरुजींपुढें एक पेंच टाकला. उपजणें, मरणें याचा कर्तेपणा देवाकडे लावला जातांच तो कार्यकारणाच्या सांखळींत अडकतो. द्रष्टेपणानें द्रष्टा जसा दृश्यांशीं लिप्त होतो, त्याप्रमाणें कर्तेपणानें कार्याशीं संबंध येऊन देवाचा अलिप्तपणा निकालांत निघतो. तेव्हां ब्रह्मांडकर्ता कोण, तो सगुण आहे का निर्गुण आहे, ही सगळी माया आली कोठून, या प्रश्नांचें समाधान करण्याबद्दल शिष्यानें गुरुजींना विनविलें व गुरुजींनीं आपले विचार सांगायला प्रारंभ केला.

**दुसरा** समास 'सूक्ष्म आशंके'चा आहे. ब्रह्म निराकार, मुक्त, अक्रिय, निर्विकार असतां त्याच्या ठिकाणीं माया उद्भवते कशी हीच मुख्य सूक्ष्म आशंका आहे. ब्रह्म अखंड निर्गुण आहे असें एकीकडे म्हणायचें, दुसरीकडे तो कर्ता असल्याचें बोलून पुनः तोच अकर्ता असाहि दावा मांडायचा, हें विचित्र आहे. सृष्टि ईश्वराच्या इच्छेनें झाली अशी एक युक्ति या वादांत पुढें केली जात असते; परंतु निर्गुणांत इच्छा कशी उद्भवली या प्रश्नाचें उत्तर सदर युक्तींत नसल्यामुळें तिचा आदर करतां येत नाहीं. सृष्टि आपोआपच जन्मास आली असें म्हटल्यास मग देवाचा अभावच सिद्ध होतो. देव सृष्टिकर्ता मानल्यास त्याचा निर्गुणपणा कोसळून पडतो. माया स्वतंत्र आहे हा सिद्धांत स्वीकारल्यास देवाची काय वाट लावायची हा प्रश्न सोडवायला पाहिजे. मायेवर सृष्टीचा कर्तेपणा लादल्यास मग भक्तांचा वाली कोण? माया स्वयंभू नाहीं, तिचा निर्माणकर्ता ईश्वर व तो एकच आहे, हा सिद्धांत पटवायचा

असेल तर तो कसा आहे, त्याचा व मायेचा संबंध काय, हें सारें नीट उलगडून दाखविलें पाहिजे. गुरुजींनीं या शंकेचें मूळ जीं नाना मतें त्यांची सटीक यादी सांगण्यांत पुढील सर्व ओव्या खर्चीं घातल्या आहेत. मध्येंच एका ओवींत 'साहित्य भंगलें येणें बोलें। म्हणती येक ॥ ३९' अशी माहिती आहे. समर्थ पुष्कळदां औचित्य या वाङ्मयगुणाला अनुलक्षून 'साहित्य' हा शब्द वापरतात. कोणी म्हणतात कीं माया म्हणून कांहीं चीजच नाहीं. तुपाच्या घट्ट-पातळपणासारखा हा प्रकार आहे. घट्ट तुपासारखें ब्रह्म असून त्याच्या पातळपणासारखी माया आहे. अनेक मतांपैकीं हें एक मत दाखल करून त्यासंबंधाचा आक्षेप दाखवितांना 'थिजलें आणि विघुरलें' हे शब्द स्वरूपाच्या—ब्रह्माच्या—ठिकाणीं लागू पडणारे नाहींत. तेव्हां 'साहित्य भंगलें येणें बोलें' असें त्या आक्षेपाचें मर्म समर्थांनीं उघडकीस आणलें आहे. आक्षेप दुसऱ्याचा पण त्याची मांडणी समर्थांची असल्यामुळें व पुढें कांहीं ठिकाणीं 'साहित्य' शब्दाचा उपयोग समर्थांनीं असाच केल्यामुळें त्याच्या अर्थाची परिस्फुटता येथें केली आहे.

**तिसरा** समास पुनः 'सूक्ष्म आशंका' याच नांवाचा आहे. पहिल्या ओवींत 'अरे जे जालें चि नाहीं। त्याची वार्ता पुससी काई।' असा शंकिताला टोला मारून दोरीमुळें साप, पाण्यामुळें तरंग, सूर्यामुळें मृगजळ, अशी आठ ओव्यांत दृष्टांतांची माळ गुंफली आहे. अद्वैताला द्वैत नाहीं तरी द्वैताखेरीज अद्वैत बोलतां येत नाहीं, इत्यादि उदाहरणें सांगून 'विचित्र भगवंताची करणी। ११' या प्रस्तावनेनें वक्ता निरूपणाकडे वळला आहे. परमात्मा परमेश्वर सर्वकर्ता जो ईश्वर त्याच्यापासून हा सगळा विस्तार झालेला आहे (१२). येथें थोडींशीं नांवें दाखविलीं. पण त्रीं अनंत आहेत. त्याची शक्तीसुद्धां अनंत आहे. त्याला 'मूळपुरुष' म्हणतात. जास्त ओळखीसाठीं त्यालाच 'मूळमाया' हें नांव द्यावें. सगळ्या कर्तेपणाचा उगम तेथें आहे. आधारादाखल येथें 'कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते।' हा गीताश्लोक (१३:२१) नमूद केला आहे. नंतर अधिक स्पष्टतेकरितां जीव, शिव, देव यांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. 'अविद्यागुणें बोलिजे जीव। मायागुणें बोल्जिे शिव। मूळमायागुणें देव बोलिजेतो ॥ १७'. मूळ माया हें कारण सिद्ध झालें. पण याचा अर्थ आकलन करायला अनुभवी पाहिजे. मूळमाया, मूळपुरुष, अनंत नांवांचा जगदीश हीं सर्व एकच. माया विस्तारली, पण तिला खऱ्या अर्थानें अस्तित्वच

नाहीं, या वचनांची खोली एखाद्यालाच उमगते. स्वानुभव किंवा सत्संग हे दोनच उपाय हा विषय गळीं उतरण्याला उपयोगीं पडतात. अजून 'निराकारीं कैसी जाली। मूळमाया ॥ २५' ही शंका फिटलेलीच नाहीं. निश्चळ आकाशांत वायु चंचल व्हावा 'तैसी जाणावी केवळ। मूळमाया ॥ २७'. वायूच्या चंचलतेनें आकाशाची निश्चळता भंगत नाहीं; त्याचप्रमाणें मूळ मायेच्या उदयानें निर्गुणतेचा (निश्चल) संचय हलवला ढवळला जात नाहीं. तो आकाशाप्रमाणें जसाच्या तसा स्थिर असतो. वायु जसा पुरातन नाहीं तशीच मूळ माया पुरातन नाहीं. खरी मानायला जावें तर ती स्वस्थानीं लीन झाल्याचा अनुभव येतो. वायूसारखेंच मूळ मायेचें रूप आहे. तें भासतें, पण दिसत नाहीं, हातीं लागत नाहीं. वायु पहायला गेल्यास त्याच्याऐवजीं धुरळा दिसतो. मूळ माया भासते पण दिसत नाहीं. तिचा विस्तार म्हणजे अविद्या. जग दिसणें हा अविद्येचा परिणाम आहे. आकाशांत एकाएकीं जसे ढग दिसूं लागतात तसें जग मायेच्या प्रभावानें दिसूं लागतें. ढगांच्या संचारानें आकाश हलतेंसें वाटतें, पण त्याची निश्चलता कायमच असते. मायेमुळें निर्गुण हें सगुण झाल्याचें भासलें, तरी निर्गुण जसेंच्या तसेंच असते. एखाद्या जागीं आकाश टेकल्यासारखें दिसतें. त्यावर निळा रंग दिसतो. असेंहि वाटतें कीं आभाळ हें विश्वावर पडलेल्या झांकणाप्रमाणें पालथें आहे. पण हें सर्व प्रकारचें दिसणें जसें मुळांत खरें असत नाहीं तसेंच निर्गुण ब्रह्मासंबंधांत समजावें. पुढें असेच कांहीं खोट्या देखाव्याचे दाखले देऊन निर्गुण जसेंच्या तसें असतें हा सिद्धांत स्पष्ट केला आहे. मायेचा जास्त खुलासा होण्याकरितां 'अहं ऐसी स्फूर्ति जाली। ते चि माया ॥ ५१' असें म्हटलें आहे. हा गुणमायेचा खेळ आहे. निर्गुणामध्यें त्या योगानें मुळींच फरक पडत नाहीं. सृष्टीसंबंधांत अनेक तत्त्वांचा पाल्हाळ केला जातो. पण हीं तत्त्वें मायेच्या पोटांतलींच होत. ओंकार ही वायूची गति असल्याचें दक्ष ज्ञानी लोकांना माहीत आहे. 'मूळमायेचें चळण। तें चि वायोचें लक्षण। ५६'. सूक्ष्म तत्त्वें जडत्व पावलीं, व्यक्त झालीं. पंचभूतें हें मायेचें लक्षण आहे. आकाश-वायूच्या संसर्गांत इच्छा जन्मास आली. इच्छा म्हणजे तेज, मृदुत्व हें पाणी, जडत्व ही पृथ्वी, असा सूक्ष्म भूतांचा आविष्कार असून हीं भुतें सुटीं निराळीं एकेकटीं नाहींत; प्रत्येकांत बाकीच्या चौघांचा अंतर्भाव असतो. योगवासिष्ठांतील एक श्लोक आधाराला घेऊन येथें निश्चय केला आहे कीं, स्वर्ग, मृत्यु, पाताळ, अवघें चराचर, यांमध्यें

पंचभूतांखेरीज सहावें तत्त्व नाहीं. आतां शंका निघाली कीं, पंचभूतें हीं तमोगुणाचीं संतानें आहेत व मूळ माया तर गुणापलीकडची समजली जाते, तेव्हां तमोगुणी पंचभूतें व गुणरहित मूळ माया यांचा मेळ कसा घालावयाचा ?

समर्थांनीं सृष्टिरचनेच्या तत्त्वज्ञानाचे कांहीं मुद्दे आपल्या मनांत असे पक्के ठसविले होते कीं ते या विषयाच्या विवेचनांत दासबोधाबाहेरसुद्धां दृष्टीस पडतात. 'आत्माराम' प्रकरणाच्या दुसऱ्या समासांत 'अहं ऐसें जें स्फुरण । तें चि मायेचें लक्षण । तये मायेपासून त्रिगुण । गुणापासून भूतें' अशी सृष्टिरचनेची हकीकत देऊन (११–१२) प्रकृति–पुरुष या नांवानें एकच माया दोन ठिकाणीं कशी वांटली आहे हें समजण्याकरितां दिवसगणनेंत जो 'परवा' शब्द वापरला जातो त्याचा दाखला दिला आहे व त्याचें कौतुक वाटल्याशिवाय रहात नाहीं. कालच्या व उद्यांच्या पलीकडल्या दिवसाला 'परवा' म्हणण्याची पद्धत आहे. तिला अनुलक्षून 'जैसी दो दिसांची बोली । येकचि परवा ॥ १३' असें म्हटलें आहे.

**चौथा** समास 'सूक्ष्म भूतां' च्या स्पष्टीकरणाचा आहे. मागें जी शंका निघाली तिचें निराकरण यांत केलें आहे. पहिली मूळ माया, नंतर माया, ती गुणांना प्रसवली तेव्हां गुणक्षोभिणी झाली. सत्त्व, रज, तम असे तीन गुण असून तमोगुणापासून पंचमहाभूतें जन्मास आलीं. यांचीं लक्षणें ध्यानांत ठेवावीं म्हणजे सगळा उलगडा होईल. जड व कठिण हें पृथ्वीचें, मृदु व ओलेपण हें पाण्याचें, उष्ण व प्रकाश हें तेजाचें, चैतन्य व चंचल हें वायूचें आणि शून्य व निश्चल हें आकाशाचें, याप्रमाणें प्रत्येकाचीं लक्षणें आहेत. पांचांत पांची भूतें कशीं असतात तें नंतर सांगितलें आहे. आकाशाचें जें शून्य लक्षण, त्याला अज्ञान म्हणतात; अज्ञान म्हणजे जडत्व आणि हें जडत्व पृथ्वीचें लक्षण असल्यानें त्या लक्षणानें आकाशांतील पृथ्वीतत्त्वाचा बोध होतो. आकाशाचें मृदुत्व हें पाणी. अज्ञानानें जो भास अनुभवास येतो, तेथें प्रकाशक तेज असल्याबद्दल खात्री पटते. आकाश आणि वायु हीं एकच. आकाशाची पोकळी रिकामी नाहीं. तिच्यांत कांहीं तरी दाट असें सांटलेलें असतें. तें माणसाच्या हालचालीच्या वेळीं समजतें. तो जो दाटपणा, सूक्ष्म प्रतिबंध किंवा 'निरोध' जाणवतो तो वायु. आकाशांत आकाश आहे हें निराळें सांगायला नको. वायु हलका, अतिशय पातळ असतो हें खरें, पण त्यांतला दाटपणा, त्याच्या सोसा-

त्यानें झाडें मोडून पडतात तेव्हां सिद्ध होतो. हा दाटपणा म्हणजे वायूंतील पृथ्वीचा कठिण गुण ठरतो. वायूंतील पृथ्वीचें लक्षण ध्यानांत येण्यासाठीं झाडांचें उदाहरण दिलें. तें लक्षण वायूमध्यें त्याच्या जन्मापासूनच आहे. वायूचें मृदुत्व हा त्यातील पाण्याचा गुण, तो भासतो हें त्यांतील तेज. तेजाच्या भासण्यांत कठिण आणि मृदुत्व असे दोन गुण आढळतात, ते अनुक्रमें तेजांतील पृथ्वी आणि पाणी यांचे दर्शक आहेत. तेजाचें चंचलत्व आणि निश्चलत्व हीं त्यांत वायु व आकाश वसत असल्याची साक्ष देतात. पाणी हें तर सांगून सवरून मृदु असतें. पण त्याची कठिणता न समजण्यासारखी अवघड नाहीं. पाण्याच्या मृदुत्वांतच तेज असतें. मृदुत्वाचा स्तब्धपणा हा वायूचा अंश होय. पृथ्वी आपल्या मृदुकठिणत्वानें पाणी, वायु आणि तेज या तिन्ही भूतांची ओळख करून देते. कठिणत्वाचा भास हें पृथ्वींतील तेज. आकाशानें सर्वांनाच व्यापलेलें आहे म्हणून त्याचें निराळें वर्णन नको. ही पंचभूतांची मीमांसा भ्रांतीच्या अहंतेनें संशयांत सांपडते, हेंसुद्धां विसरून चालणार नाहीं. पंचभूतात्मक सूक्ष्म वायु ही मूळ माया. पंचभूतें व त्रिगुण मिळून अष्टधा प्रकृति. हीं भूतें त्रिगुणांच्या प्रभावानें व्यक्त दशेस आलीं म्हणजे त्यांना तत्त्वें म्हणतात. हा भूतकर्दम (एकमेकांच्या कालवाकालवीचा चिखल) ब्रह्मांडाच्या जन्माआधींच घडलेला असतो. सप्तकंचुक ब्रह्मांड, माया, अविद्या, ब्रह्मा, विष्णु, महेश, पृथ्वी, मेरु, सात समुद्र इत्यादि गोष्टी अलीकडच्या म्हणजे भूतकर्दमानंतरच्या आहेत. हें सर्व दृश्य ओलांडून देवदर्शन घ्यावें.

**पांचवा** समास 'स्थूळ पंचभूतां'च्या वर्णनाचा आहे. स्थूळ पंचभूतें परिचयाचीं असल्यामुळें खरें पाहिल्यास त्यांच्याविषयीं बोलण्याची आवश्यकता नाहीं; पण 'केवळ मूर्ख तें नेणे। म्हणौन घडलें सांगणें। १' याप्रमाणें मूर्खांची संभावना करून स्थूल पंचभूतांचा नानाविध विस्तार समर्थांनीं सांगितला आहे. २–११ पृथ्वीचें वर्णन आहे. १२–२४ पाण्याचें, २५–२८ तेजाचें, २९–३३ वायूचें, ३४–३५ आकाशाचें, याप्रमाणें प्रत्येक भूताचें स्वरूप स्पष्ट केलें आहे. आकाश ब्रह्मासारखें आहे (३६) असें वाक्य वक्त्याच्या तोंडून उच्चारलें जातांच, मग त्याला स्वरूप किंवा ब्रह्म कां म्हणत नाहीं, असा श्रोत्यानें प्रश्न टाकला. तेव्हां आकाश व ब्रह्म यांतील भेद उघड करावा लागला. ब्रह्म निर्गुण व पुरातन आहे. आकाशाअंगीं काम, क्रोध, शोक, मोह, भय, अज्ञान, शून्यत्व असे सात गुण आहेत. म्हणून त्याला भूतांत गणणें

प्राप्त आहे, असें उत्तर देऊन वरवर अगदीं सारख्या दिसणाऱ्या गोष्टी कशा एकमेकांहून भिन्न असतात याचीं उदाहरणें वक्त्यानें सांगितलीं, तरी श्रोत्याचा संशय गळून पडला नाहीं. त्यानें म्हटलें: 'आकाश अरूप आहे, त्याला नाश नाहीं, म्हणून तेंच ब्रह्म समजायला हरकत नाहीं.' वक्त्यानें पुनः आकाश व ब्रह्म यांतील भेद आणखी विशद केला. आकाश तमोगुणाचें; त्यांत कामक्रोधादि दोष आहेत. नकार हें शून्याचें लक्षण असून त्यावरून हृदयशून्य हा शब्द अज्ञान प्राणी वापरतात. शून्य म्हणजे अज्ञान, अज्ञान म्हणजे कठिणत्व. या विकारवंताला नाश आहे. आकाशांतील अज्ञानाचा ज्ञानानें नाश घडून येतो. आकाश व ब्रह्म यांमध्यें शून्यत्वाचा विक्षेप आहे. आकाश वेगळेपणानें अनुभवास येतें. 'स्वरूपीं स्वरूप चि व्हावें ॥ ६६' 'भिन्नपणें नवचे अनुभविली। स्वरूपस्थिति ॥ ६७' स्वरूप आणि आकाश यांतील भेद संत जाणतात (६९). त्यांचा समागम केल्यानें मोक्षपदवी लाभते (७०).

**सहावा** समास 'दुश्चीतनिरूपण' या नांवाचा आहे. सत्संगतीनें मोक्ष मिळतो, हें आश्वासन ध्यानीं घेऊन श्रोत्यानें 'मोक्ष किती दिवसांत मिळतो?' असा प्रश्न विचारला. मोक्ष मिळायला विलंब लागत नाहीं, पण मनाची चंचलता हें एक मोठें विघ्न आहे. मनाच्या स्वैरतेला 'दुश्चीतपण' म्हटलें आहे. मनाच्या ओढी तोडून एकाग्रतेनें श्रवण करावें, मध्येंच मन दुसरीकडे जाऊन विषयसंगति भंगल्यास पुनः श्रवण करावें. अर्थांतर पाहिल्यावांचून उगीच श्रवण करणारा मनुष्य श्रोता नव्हे, तर पाषाण होय, असें वक्ता आवेशानें बोलून गेला. पण तात्डतोब चरकला. या श्रोत्याशीं पाषाणाची तुलना केल्यामुळें पाषाणाची अप्रतिष्ठा घडली असें त्याला वाटून त्यानें पाषाणाची थोरवी सांगितली, व म्हटलें कीं माणसाच्या मानानें पाषाण गोटा हा महाभला ठरतो. ज्याचे अवगुण कांहीं केल्या जात नाहींत तो मनुष्य पाषाणाहून उणा. पाषाण श्रेष्ठ या अभिप्रायाचें समर्थन करण्यासाठीं अनेक तऱ्हेच्या रत्नांची व दगडाच्या उपयोगाची माहिती समर्थांनीं दिली आहे. आणि 'मनुष्य तें काये पामर। पाषाणापुढें ॥ १७' असें पुनः एकदां ठासून सांगितलें आहे. १९–२८ ओव्यांत दुश्चीताचीं लक्षणें वर्णून पुढें २९–३४ आळसाची हजेरी घेतली आहे. आळसाचा एक परिणाम झोंप. म्हणून 'निद्रा आळस दुश्चीतपण। हें चि मूर्खाचें लक्षण। ३६' त्यांच्या योगानें

अभ्यास होत नाहीं. विवेकाला ठाव सांपडत नाहीं पण, 'अज्ञानास यापरतें। सुख चि नाहीं ।। ३७'. भूक लागली कीं यथेच्छ जेवावें, जेवून आळस आला म्हणून झोपावें, झोपून उठल्यावर पहावें तर चित्त ठिकाणावर नाहीं, या प्राण्याला स्वहित साधूं नये हें सरळच आहे. आतां वक्त्याला मूळ प्रश्नाची आठवण होऊन तो त्याकडे वळला आहे. परिसाचा स्पर्श झाल्यावर लोखंडाचें सोनें व्हायला क्षणसुद्धां लागत नाहीं, त्याप्रमाणें 'सावध साक्षपी आणि दक्ष। तयास तत्काळ चि मोक्ष। ४४' अशी खात्री ठेवावी. मात्र हें शिष्याच्या प्रज्ञेवर अवलंबून आहे. प्रज्ञा व अनन्य-निष्ठा यांचा संयोग होतांच मोक्षप्राप्तीला क्षणाचासुद्धां उशीर लागत नाहीं. 'अनन्य भावार्थेंविण। प्रज्ञा खोटी ।। ४६'. प्रज्ञा व श्रद्धा ह्या असतील तर देहाभिमान मावळतो. 'सत्संगें सद्गती। विलंब चि नाहीं ।। ४८'. आधीं सावध, साक्षपी, दक्ष यांची वाच्यता केली; नंतर प्रज्ञा आणि विश्वास (श्रद्धा) यांचा उल्लेख झाला; तेव्हां त्यांना एकत्र घेऊन 'सावध साक्षपी विशेष। प्रज्ञावंत आणी विश्वास। तयास साधनीं सायास। करणें चि नलगे ।। ४९' असा समारोप केला आहे. मग साधनें कुणासाठीं याचें उत्तर 'इतर भाविक साबडे। तयांस हि साधनें मोक्ष जोडे। ५०' असें दिलें आहे. यापुढें 'मोक्ष आहे कैसा। कैसी स्वरूपाची दशा। त्याचे प्राप्तीचा भर्वसा। सत्संगें केवी ।। ५२' असे प्रश्न निघाले. त्याकडे वळण्यापूर्वीं मनुष्य पाषाणाहून हीन वगैरे जी कडक भाषा वापरली तिच्या जाणिवेनें वक्ता विनवून म्हणतो: 'अवगुण त्यागावयाकारणें। न्यायनिष्ठुर लागे बोलणें । ५४'. या बोलण्याचा श्रोत्यांनीं राग धरूं नये.

**सातवा** समास 'मोक्ष लक्षण' या नांवाचा असला तरी पूर्वींच्याप्रमाणें यांत इतर कांहीं विषय आलेले आहेत. प्रारंभीं 'किती दिवसांत मोक्ष मिळतो' या प्रश्नाचा संदर्भ घेतला आहे. मोक्ष हा शब्द ओघानें 'बंध' शब्दाचा सूचक असल्यामुळें या दोन्ही शब्दांचे अर्थ सांगितले आहेत. 'बद्ध म्हणिजे बांधला। आणी मोक्ष म्हणिजे मोकळा जाला । ३'. संकल्प व जीवपण हीं दोन बंधनें विवेकाच्या जोरावर साधुपुरुष तोडून टाकतात. 'मी जीव' या संकल्पाच्या बंधनांत मनुष्य कल्पानुकल्प घालवीत असल्यानें तो 'अल्प देहबुद्धीचा बनतो (५)'. मी जन्मास आलों, मी मरणार आहें, अमुक केल्यानें पुण्य लागेल व तमुक केल्यानें पाप घडेल; पापपुण्याचा भोग सुटेना अर्थात् गर्भवास चुकेना, 'ऐसी जयाची कल्पना। दृढ जाली ।। तया नांव बांधला।

जीवपणें बद्ध जाला । ८–९'. बंधाच्या कांचणींत मनुष्य दानधर्माचा विचार करूं लागतो; परंतु या विवंचनेंतदेखील स्वार्थाचें प्राबल्य कसें आढळतें हें समर्थांनीं मार्मिकपणानें दाखविलें आहे. आतां केलेल्या दानाचा पुढल्या जन्मीं आधार होईल, संसार सुखानें चालेल. पूर्वीं दान केलें नाहीं म्हणून आतां दारिद्र्य आलें; यासाठीं दान कसें करतो तर एखादें जुनें वस्त्र किंवा तांब्याचें नाणें हातचें सोडतो. तरी आशा धरून 'म्हणे आतां कोटिगुणें । पावेन पुढें ॥ १३ '. तीर्थक्षेत्रीं दान केल्याचें पुण्य फार असें ऐकून तेथें दान करतो. याचें दान कितीहि क्षुद्र असो, 'आशा धरिली अभ्यांतरीं । कोटिगुणांची ॥ १४ '. रुक्याअडक्याचें दान करावें, अतिथीपुढें तुकडा ठेवावा आणि 'म्हणे माझा ढीग जाला । कोटि टुकड्यांचा ॥ १५'. असल्या स्वार्थी दानधर्माचा समर्थांनीं निषेध केला आहे. 'आतां मी जें देईन । तें पुढिले जन्मीं पावेन । ऐसें कल्पी तो अज्ञान । बद्ध जाणावा ॥ १७ '. यानंतर सृष्टींतील नरदेहाची दुर्लभता चर्चेस घेतली आहे. हा एकदां हातचा गमावल्यास पुन: नरदेहच मिळेल असा विश्वास बाळगतां येत नाहीं. मानवाखेरीज इतर पुष्कळ योनी आहेत, त्यांत जावें लागणार नाहीं अशी हमी कोण घेणार ? पापपुण्याच्या समतेनें नरदेह मिळतो. येथें भागवत ११:२०:१७–नृदेहमाद्यम्–हा श्लोक उद्धृत केलेला आहे. याच्या साह्यानें जो भवसागर तरून जाणार नाहीं तो आत्मघातकी–आत्महत्यारा. ज्ञानाच्या अभावीं चौऱ्यांशीं लक्ष जन्म घ्यावे लागतात. जितके जन्म तितक्या आत्महत्या, 'म्हणौन आत्महत्यारा ॥ २४ '. किती प्रकारचे जन्म आहेत याची थोडीशी यादी देऊन नरदेह पुन: मिळण्याची दुराशा न धरण्याचा उपदेश केला आहे. संकल्पाच्या बंधनापायीं मनुष्य आपला आपणच शत्रु ठरतो. येथें 'आत्मैव-ह्यात्मनो बंधुः' (गीता ६:५) हा श्लोक दाखल केला आहे. पंचभूतांपासून जगदाकार निर्माण झाला. देह, अवस्ता, अभिमान हीं लक्षणें तेथें अवतरतात. अशा पिंडब्रह्माचा विचार करतांना भांबावून नाना मतें उत्पन्न झालीं. त्यांचें तात्पर्य म्हणजे देहामध्यें कारण या नात्यानें वसणारा आत्मा ओळखावा. परंतु देहाबरोबर नाश पावेल तो आत्मा नव्हे. अंतःकरण, प्राण, बुद्धि इत्यादिकांहून आत्मा अगदीं निराळा आहे. १ स्थूळ, २ सूक्ष्म, ३ कारण, ४ महाकारण, ५ विराट, ६ हिरण्य, ७ अव्याकृत, ८ मूळप्रकृति, असे आठ देह असून त्यांतले चार पिंडाचे व चार ब्रह्मांडाचे अशी त्यांची विभागणी आहे. यांच्यांत पुरुष प्रकृति हे मिळविले कीं

त्यांची संख्या दहा होते. कार्य, कर्ता, कारण, दृश्य, जीवशिव, पिंडब्रह्मांड, माया, अविद्या यांहून आत्मा निराळा आहे. चार आत्मे अशी जी भाषा आहे तिचा खुलासा पुढीलप्रमाणें : १ जीवात्मा, २ शिवात्मा, ३ विश्वात्मा किंवा परमात्मा ४ निर्मळात्मा. नांवाचा व योग्यतेचा भेद दिसला तरी हे सारे एकच. दृष्टांतच हवा तर घटाकाश, मठाकाश, महदाकाश, चिदाकाश यांचा देतां येईल. नांवें निराळीं पण आकाश एकच. पिंडीं व्यापक जो ब्रह्मांश तो जीवात्मा, ब्रह्मांडीं जो ब्रह्मांश तो शिवात्मा, ब्रह्मांडाबाहेरील ब्रह्मांश तो परमात्मा, जो उपाधिवेगळा तो निर्मळात्मा याप्रमाणें आत्म्याचा विचार केल्यास जीवपण उरत नाहीं. संकुचित 'जीवपणें येकदेसी। अहंकारें जन्म सोसी। विवेक पाहातां प्राणीयांसी। जीव कैंचा ॥ ५६'. अशा रीतीनें जन्ममृत्यूपासून सुटणें हा मोक्ष. ते चि वस्तु ते आपण—तत्त्वमसि—हें महावाक्याचें लक्षण साधूंनीं सांगितलें. अनुग्रह केला कीं त्याच क्षणीं मोक्षलाभ होतो. याचें जास्त स्पष्टीकरण देऊन, विवेकाखेरीज बाकीचे उपाय हे व्यर्थ श्रम होत, 'विवेक पाहातां आपण। आत्मा च असे ॥ ६५' असें म्हटलें आहे.

**आठवा** समास 'आत्मदर्शना'चा आहे. 'तूंच परमात्मा' असें मागें सांगितल्यामुळें परमात्मा कसा आहे याचें ज्ञान करून देणें वक्त्याला भाग होतें व त्यासाठीं परमात्म्याचें स्वरूप पहिल्या ४ ओव्यांत सांगितलें. निर्गुण, निराकार, निरंतर, व्यापक, अतर्क्य इत्यादि परमात्म्याचीं लक्षणें सर्वांच्या परिचयाचीं आहेत. हा परमात्मा भक्तीनें प्राप्त करून घेतां येतो. नववी आत्मनिवेदनाची भक्ति साधल्यानें परमात्मा आपलासा होतो. महापूजेच्या अंतीं देवाला स्वतःचें मस्तक तोडून वहाण्या-सारखा आत्मनिवेदनभक्तीचा प्रकार आहे. मस्तक वहाण्याच्या दृष्टांतामुळें तसलें कृत्य म्हणजे आत्मनिवेदन कीं काय असा प्रश्न उपस्थित होईल; म्हणून सांगितलें आहे कीं 'मी कोण' याचा तपास करून मग निर्गुण परमात्मा ओळखावा. देवाभक्तांच्या शोधनांत आत्मनिवेदन आपोआप घडतें. भक्ताला मग कळतें कीं, देव पुरातन आहे. त्याला ओळखणें याचा अर्थ तद्रूप होऊन जाणें. देवभक्तांचा दुजेपणा नाहींसा होणें हें आत्मनिवेदन. विभक्त नव्हे म्हणून भक्त ही समर्थांची आवडती कोटी येथें पुनः प्रकटली आहे. देवाभक्तांच्या अभेद भक्तीला सायुज्यता म्हणतात (१९). देवाभक्तांचें ऐक्य कधींच नाश पावत नाहीं. फिरून विभक्त नसण्याची कोटी आली आहे (२२). देव, भक्त एक असा विवेक मोक्षदायक मानलेला आहे. भक्तपणानें देव पाहिल्यास

त्याचें ऐश्वर्य अंगीं बाणतें. देहातीतत्व हेंच परब्रह्म. येथें देहातीतत्व म्हणजे काय, ऐश्वर्याचीं लक्षणें कोणतीं या प्रश्नांचा विचार निघाला. देहसंग असह्य वाटणें ही एक देहातीत असण्याची खूण आहे. देहातीतत्वरूपानें ब्रह्मभाव ज्या ठिकाणीं व्यक्त होऊं लागतो, त्याचे पोवाडे वेद गातात, हेंच त्याचें ऐश्वर्य. यासाठीं साधुवचनावर विश्वास ठेवावा. आतां साधुवचन कोणतें ही विवंचना उद्भवली. 'सोहं आत्मा स्वानंदघन । अजन्मा तो तूं चि जाण । हें चि साधूचें वचन । सुदृढ धरावें ॥ ३३'. 'तूंच निरंतर ब्रह्मरूप आहेस' हें महावाक्याचें रहस्य विसरूं नये. देह पडल्यावर देव भेटेल, या कल्पनेला थारा देऊं नये. माया नासेल, देह नाश पावेल तेव्हां परब्रह्म होतां येईल, हें बोलणें प्रमाणशुद्ध नाहीं. माया किंवा देह असून नसून सारखेच इतका ज्ञानाधिकार संपादन केल्यास खऱ्या समाधानास उणीव पडणार नाहीं. एरवीं माया फार भयानक वाटली. विवेकानें तिचा खोटेपणा बुद्धींत उतरतो व तिचा धाक उरत नाहीं. मायेचें बळ कल्पनेंत आहे. आपण कल्पनातीत झाल्यावर मायेच्या आक्रमणाला वावच रहात नाहीं. आतां अंतकालीन मतीबद्दल साशंकता शिल्लक रहात नाहीं. चार देहाचा अंत, जन्ममुळाचा प्रांत, या अंताप्रांताहून अलिप्त असा तूं आत्मा आहेस. यानंतरच्या ओव्यांतून ब्रह्मभावाच्या श्रेष्ठत्वाचें प्रतिपादन आहे. एके ठिकाणीं 'मिथ्या मिथ्यत्वें पाहिलें । मिथ्यापणें अनुभवा आलें । ५६' याचें नांव मोक्ष, अशी मोक्षाची व्याख्या आली आहे. सद्गुरुवचन जो हृदयांत घट्ट धरून ठेवतो, अत्यादरानें श्रवणमनन पुनः पुनः करतो तोच मोक्षाधिकारी. यानंतर अत्यंत उत्साहाच्या भाग्रेंत आत्मज्ञानावस्थेचें वर्णन करून 'तया पुरुषाचें लक्षण' सांगण्याच्या आश्वासनानें समास पूर्ण केला आहे.

**नववा** समास 'सिद्धलक्षणा'चा आहे. मुक्ति, स्वरूपस्थिति वगैरे शब्दांनीं ज्या घटनेचें मागील कित्येक समासांतून वर्णन आलें आहे, त्या स्थितीस पोंचलेल्या पुरुषाच्या ठिकाणीं कोणते गुण दिसतात, त्यांची माहिती या समासांत आहे. 'ज्याच्या पोटांत अमृत गेलेलें आहे त्याचें शरीर बाहेरूनसुद्धां लखलखीत दिसूं लागतें' या विधानानें सिद्धाच्या लक्षणांविषयीं कांहीं कल्पना आणून दिलेली आहे. ज्ञानेश्वरांनीं गीतेच्या १३ व्या अध्यायांतील ज्ञानी पुरुष कसे ओळखावे, हा प्रश्न उपस्थित करून जसें उत्तर काढलें आहे तसाच हा प्रकार आहे. 'सिद्ध म्हणजे स्वरूप'च (३). 'स्वरूप होऊन राहिजे । तया नाव सिद्ध बोलिजे ॥ ४'. स्वरूपानु-

संधान जनीं असोन आपण जना वेगळा, संसार चिंता नाहीं, निरूपणाची ममता आहे (९–१०) इतकें वर्णन करून 'साधन कधींच सुटूं नये' हें अनेक स्थळीं व्यक्त झालेलें समर्थांचें मत येथेंहि दाखल आहे. सिद्ध हा वरून साधकाप्रमाणेंच दिसायला पाहिजे (१२). तो आंतून निश्चल असतो. त्याचा देह चंचल असतो (१५).तो पडून राहो वा उठून पळो, त्याची अंतःस्थ निश्चलता भंगत नाहीं (१६). 'अंतर लागलें भगवंतीं। तो चि साधु॥ १७'. येथून पुढें काम (२४), क्रोध (२५), मद (२८), तिरस्कार (२९), मत्सर (३०), दंभ (३१), प्रपंच (३२), लोभ (३४), शोक (३५), मोह (३८), भय (३९), भेद (४२), खेद (४३), स्वार्थ (४४), अविवेक (४५), आशा (४६), कर्कश वाणी (४७), राग-आकर्षण (४८), चिंता (४९), उपाधि (५०), मानापमान (५१) इत्यादि दोष त्याच्या बुद्धींतून समूळ नष्ट होतात, याचें वर्णन आहे. या दोषांचा उपद्रव त्याला कधींच होत नाहीं. 'स्वरूपीं राहिल्या मती। अवगुण अवघे चि सांडती। परंतु यासी सत्संगती। निरूपण पाहिजे॥ ५८'. सिद्धावस्था संपादन करावी असें जरी म्हटलें तरी लोकांमध्यें अनेक प्रकारच्या भिन्नभिन्न कल्पना प्रचलित असतात. त्या समजण्याकरितां पुढील समासाची रचना आहे.

प्रस्तुत समासाच्या शेवटीं 'रामदास म्हणे' हें वाक्य असल्यामुळें हा समास एकदां स्वतंत्र लिहून ठेवला होता असें समजायला जागा आहे.

**दहावा** समास 'शून्यनिरसन' या नांवाचा आहे. पहिल्या चाळीस ओव्या लोकांचीं देव आणि भक्ति या संबंधाचीं नाना मतें सांगण्याकडे लावल्या आहेत. हीं मतें प्रापंचिकांचीं झालीं. ज्ञात्यांची देखील याविषयीं एकवाक्यता नसल्यामुळें त्यांच्या मतांची पाहणी पुढें केली आहे, व शेवटीं समर्थांनीं आपला सिद्धांत आणखी एकदां स्पष्ट केला आहे. सिद्धावस्था ही एकप्रकारें ब्रह्मावस्था असल्यामुळें त्या अवस्थेच्या खऱ्या असंदिग्ध अनुभवांत ज्ञात्यांच्या मतमतांतराला अवसर नसतो. ब्रह्माशीं एकरूप झाल्यावर निराळेपणा उरेल तर भेदाची भाषा करणें शक्य आहे. ही भाषा ब्रह्मैक्याची पराकाष्ठा न गांठल्याची खूण ठरते. प्रापंचिकांचीं मतें यादीवजा आहेत. तीं विविध मतें येथवर दासबोध वाचलेल्यांना समजण्याजोगीं आहेत म्हणून त्यांचा खुलासा येथें केलेला नाहीं. समासाच्या नांवांतील 'शून्यत्व' हा

विषय शेवटच्या भागांत ज्ञात्यांचीं मतें सांगतांना आला आहे. 'ज्ञानदशक' संपला. न्यूनपूर्णाची श्रोत्यांनीं क्षमा करावी, अशीं समाप्तिदर्शक वचनें अगदीं शेवटच्या ओव्यांत आहेत. समर्थांच्या मनोगतानुसार हें केवळ ज्ञानाचें दशक असल्याचें शेवटच्या निर्देशावरून स्पष्ट आहे. त्याला 'मायोद्भव' हें नांव कसें व केव्हां पडलें हें सांगणें कठिण आहे.

• ९ •

या दशकाला 'गुणरूप' असें नांव दिलेलें आहे.

**पहिला** समास 'आशंका' या नांवाचा असून त्यांत निरनिराळ्या शब्दांचे सरळ वाच्यार्थ सांगितलेले आहेत. त्याची कल्पना येण्यासाटीं कांहीं उदाहरणें दिल्यानें काम भागेल. 'निराकार म्हणिजे आकार नाहीं। निराधार म्हणिजे आधार नाहीं। २'; 'निःप्रपंच म्हणिजे प्रपंच नाहीं। निःकळंक म्हणिजे कळंक नाहीं। ६'; 'निःसंग म्हणिजे संग चि नाहीं। निर्मळ म्हणिजे मळ चि नाहीं। १२'. प्रथम 'निराकार म्हणिजे काये।' अशी प्रश्नाची ओवी आणि नंतर उत्तराची ओवी याप्रमाणें या समासाची रचना असून शेवटीं 'परब्रह्म म्हणिजे सकळांपरतें। तयास पाहातां आपण चि तें। हें कळे अनुभवमतें। सद्‌गुरु केलियां॥ २९'. असा समारोप आहे.

**दुसरा** समास 'ब्रह्मनिरूपणा'चा आहे. जें जें कांहीं साकार तें कल्पान्तीं नाश पावतें, स्वरूपाला मात्र केव्हांहि धक्का लागत नाहीं, असा या समासाचा प्रारंभ असून 'जें भगवंताचें निजरूप। त्यासि बोलिजे स्वरूप। ३'. अशी स्वरूपाची व्याख्या केलेली आहे. नांवेंच सांगायला गेलें तर त्यांची संख्या करतां येणार नाहीं. त्यांचा उपयोग केवळ सांकेतिक टरतो. स्वरूप हें नामाच्या पलीकडचें आहे. विचार केल्यास तें नाहीं अशी जागाच सांपडायची नाहीं, तरी 'तें विश्वास चोरलें'—विश्वाला त्याचा पत्ता नाहीं. जवळ असून त्याचा ठाव लागत नाहीं. देवाचें हें वर्णन ऐकून कोणी आपली दृष्टि—पाहण्याची शक्ति—चालवील तर त्याला दृश्याखेरीज कांहींच दिसणें शक्य नाहीं व तेवढ्यानें कोणी संतोष पावल्यास त्यानें खरोखरी कांहीं पाहिलेंच नाहीं, असें म्हणावें लागेल (७). दृष्टीस जें दिसतें तें स्वरूप नव्हे. वस्तु, ब्रह्म किंवा स्वरूप हें दृश्यावेगळें, तथापि 'सन्निध चि असे' (११). आकाश असा कांहीं प्रकार निराळा दिसतो. विचार केल्यास आकाश सर्वत्र भरून राहिल्याचें

पटतें. त्याप्रमाणें ‘ जगदीश सबाह्य अभ्यांतरीं ’ आहे (१३). देव पाण्यानें भिजत नाहीं, पृथ्वीमुळें झिजत नाहीं, आगीनें शिजत नाहीं, रेंद्यांत बुडत नाहीं, वायूनें उडत नाहीं. सुवर्णात देव असतो, पण सुवर्णाला जसा आकार देतां येतो, तसा त्याला आकार देतां येत नाहीं. तरीसुद्धां भेद कां प्रत्ययाला येतो ? भेदाचें कारण ‘अहंता’ होय. ‘अभेदामाजीं वाढवी भेदा। ते हे अहंता ॥ १५ ’. यापुढें अहंतेचें विवेचन आहे. ‘आतां मी च स्वरूप । १८ ’. किंवा ‘स्वयें मीच आहे ब्रह्म । १९ ’. असें वाटणें ही अहंता. स्व-रूपांत अहंतेला जागा नाहीं. नंतर वाच्यांश, लक्ष्यांश यांचा विचार असून सर्वब्रह्म, विमलब्रह्म हा वाच्यांशाचा अनुक्रम सांगितला आहे. लक्ष्यांशाचें वर्म सांपडलें कीं वाच्यांश उडून जातो. ब्रह्मास लावले जाणारे सर्व, विमल हे शब्द वाच्यांशांतच आटतात, विराम पावतात, लोपतात. लक्ष्यांशाचा अनुभव आला कीं वाणीचें सामर्थ्य खुंटतें. अनुभव शब्दांनीं व्यक्त करतां येत नाहीं. शब्द उच्चारला कीं संपला, हा प्रत्यक्ष अनुभव आहे. सर्व, विमल हे शब्द कांहीं हेतु दर्शवितात; मर्यादित अर्थाचे वाचक आहेत. (ब्रह्माच्या) अनुभवाला मर्यादा नाहीं. या अनुभवाचें लक्षण समर्थांनीं ‘अनुभव म्हणिजे अनन्य जाण । २९ ’, ‘अनन्य म्हणजे अन्य नसे । आत्मनिवेदन जैसें । ३० ’. याप्रमाणें सांगितलें आहे. ‘आत्म्यास नाहीं आत्मपण । हें चि निःसंगाचें लक्षण । ३१ ’ ही बोलण्याची भाषा आहे. परंतु या भाषेचें लक्षण सांगतां येण्याजोगें नाहीं. तत्त्वविवरण करावें, निर्गुण ब्रह्म शोधावें, आपणांस आपण पाहावें, तेव्हां या विषयाचा बोध होतो. न बोलतां बुद्धीनें विवरावें, विवरोन विरोन (विलीन होऊन) ग्हावें, मग महापुरुषाला मौनच शोभा देतें (३३-३४). या स्थितींत जें सारें प्रथम खरें वाटत होतें तें लटकें वाटूं लागतें. प्रकृति खोटी, पुरुष खोटा, यामुळें ‘मीपण’ हा जो विशेष तो कसा शिल्लक रहाणार ? एखाद्या मौनधारकानें ‘मी मौनी आहें’ असें बोलतांच त्याचें मौन भंगतें, त्यासारखीच ‘मीपणा’च्या विशेषाची अवस्था आहे. मीपणाची जाणीव ही स्वरूपस्थितीची उणीव ठरते.

**तिसरा** समास ‘ निःस्संदेह ’निरूपणाचा आहे. करून अकर्ता, भोगून अभोक्ता हें काय गौडबंगाल आहे ? ज्याचा निरास या समासांत केला तो संदेह या गौड-बंगालाचा आहे. जो पुरुष करून अकर्ता, भोगून अभोक्ता अशा स्थितीस पोंचतो त्याला येथें ‘योगी, योगेश्वर’ असे शब्द योजलेले आहेत. वक्त्यानें आधीं ‘ही

स्थिति ओळखण्याची पात्रता पाहिजे,' असा टोमणा मारला आहे. 'ज्याचा अनुभव जैसा। तो तो बोलतो तैसा। ९'. अज्ञानाच्या दारिद्र्यांत लोळणाराला ज्ञानाचें ऐश्वर्य कसें कळावें? नुसत्या देहावस्थेकडे पाहिल्यास ज्ञानी व अज्ञानी हे दोघे सारखेच दिसतील. पण त्यांतील भेद ओळखतां आला पाहिजे. याविषयीं कांहीं दृष्टांत सांगून वक्त्यानें आपला मोर्चा मुख्य संदेहाकडे वळविला आहे. ज्ञानी पुरुष हा देहानें प्रगट असला तरी तो आंत गुप्त असतो. 'दिसतो तरी देहधारी। परी कांहीं च नाहीं अंतरीं। तयास पाहातां वरिवरी। कळेल कैसा ॥ २०'. 'देह भावितां देह चि दिसे। परी अंतर अनारिसें असे। तयास शोधितां नसे। जन्ममरण ॥ २४'. जो ब्रह्मरूप झाला त्याला जन्ममरण नाहीं. 'ज्ञानी तो सत्यस्वरूप। अज्ञान देखे मनुष्य-रूप ॥ २९'. देव जसा असायचा तसाच असतो, परंतु पाषाणाच्या नानाविध आकारांनीं लोक त्याची बहुविध कल्पना करतात; ज्ञानी पुरुषासंबंधांत लोक अशाच विविध कल्पना रचतात. यापुढें काष्ठाग्निसंयोग, जळता कापूर, गंगेंत मिसळणारे प्रवाह इत्यादि दृष्टांत दिले आहेत. साधूला जन्म नाहीं, अर्थात् मरणसुद्धां नाहीं, असें या दृष्टांतांचें तात्पर्य आहे. दोरी दिसतांच तिला साप समजून एकजण घाबरून जातो व दुसरा ती दोरी आहे असें ओळखून आपल्या जागीं स्वस्थ राहतो. हा अज्ञानाचा व ज्ञानाचा भिन्न परिणाम जसा व्यवहारांत आढळतो तसाच आत्म्याच्या ज्ञानाज्ञानाचा परिणाम अनुभवास येतो. याची गुरुकिल्ली ज्ञान असून तिच्या अभावीं जन्ममृत्यूच्या रहाटगाडग्यांत सांपडून माणसाला कष्टी व्हावें लागतें. हा विषय पुढल्या समासांत जास्त स्पष्ट व्हावयाचा असल्यानें वक्ता श्रोत्यांना 'सावधान सावधान' अशी सूचना देऊन ठेवतो.

**चौथा** समास 'जाणपणनिरूपणा'चा आहे. मागल्या समासांत (आत्म) ज्ञान ही गुरुकिल्ली असें म्हटलें व हा विषय पुढें स्पष्ट करण्याचें आश्वासन दिलें. आतां तें ज्ञान म्हणजे काय हें ध्यानांत येण्याकरितां लोकांत दिसून येणाऱ्या उत्तम, अधम इत्यादि वर्गवारीची प्रस्तावना करून ही वर्गवारी गुणावगुणावर अवलंबून असल्याचें निदर्शनास आणलें आहे. 'सगुण भाग्यश्री भोगिती। अवगुणास दरिद्रप्राप्ती। ४'. हें ठरलेलेंच आहे. 'जो जो जेथें उपजला। तो ते वेवसाईं उमजला। तयास लोक म्हणती भला। कार्यकर्ता ॥ ५'. ज्यानें त्यानें आपापला जन्मसिद्ध व्यवसाय त्यांतील खांचाखोचा ओळखून चोखपणें

चालविला कीं त्याला लोक भला कार्यकर्ता म्हणतात, हें सांगायला नको. जाणता कार्य करतो, नेणता हातपाय हलवीत नाहीं; परिणामीं एकाचें पोट भरतें व दुसऱ्याच्या वांटणीस भीक येते. 'हें तों प्रगट चि असे । ७'. विद्या न शिकल्यास भीक मागावी लागेल, असें वडील माणसें नेहमींच बोलत असतात. कित्येकदां वडील मनुष्य करंटा व धाकटा समर्थ असल्याचें दृष्टीस पडतें; 'कां जे विद्येनें मोठा । म्हणोनिया ॥ ९'. विद्या, बुद्धि, विवेक, साक्षेप, कुशलता, व्याप हे गुण ज्याच्या-पाशीं नाहींत तो करंटा (१०). सदर गुण ज्याच्या अंगीं असतील, त्याच्या पाठीस वैभव लागतें. जशी विद्या, तशीच हांव (महत्त्वाकांक्षा), जसा व्याप तसें वैभव, 'तोलासारिखा हावभाव । लोक करिती ॥ १३'. विद्या आणि वैभव यांच्या अभावाचा मनुष्य 'करंटपणें वोखटा दिसे । वोंगळ आणी विकारी ॥ १४'. यासाठीं उत्तम गुण हें भाग्याचें लक्षण समजावें. यापुढें जाणतेनेणतेपणाचें वर्णन आहे. जाणत्याला लोक मानतात, विद्येनें माणसाला महत्त्व लाभतें. यांतच 'समर्थ' या शब्दाची व्याख्या आली आहे. 'प्रपंच अथवा परमार्थ । जाणता तो चि समर्थ । १९'. नेणतेपणाचे व्यवहारांतील अनर्थ (२०–२३) सांगून झाल्यावर वक्त्यानें मायाब्रह्म, जीवशिव, सारासार, भावाभाव, कर्ता कोण, बंधमोक्ष इत्यादि विषयांच्या ज्ञानानें जन्ममरणांतून मनुष्य सुटतो, असें बजावून देव, मुक्त, यांचीं अतिसंक्षिप्त लक्षणें दाखल केलीं आहेत. 'जितुकें जाणोन सांडिलें । तितुकें दृश्य वोलांडिलें । जाणत्यास जाणतां तुटलें । मूळ मीपणाचें ॥ २७'. ज्ञानाव्यतिरिक्त जेवढीं साधनें तेवढीं सारीं व्यर्थ. 'जाणतां समर्थाचें अंतर । प्रसंगें वर्ते तदनंतर । भाग्य वैभव अपार । तेणें चि पावे ॥ ३० म्हणौन जाणणें नव्हे सामान्य । ३१'. येथून पुनः जाणत्या-नेणत्याच्या वर्तनांतील भेद विचारास घेतला असून त्यांत 'राजकारण' शब्द आला आहे. 'नेणतां कांहीं राजकारण । अपमान करून घेती प्राण । ३५'. यासाठीं जाणणें हा खरा उपाय आहे. त्यानें परलोकाची सोय सांपडते. 'जाणणें म्हणिजे स्मरण । नेणणें म्हणिजे विस्मरण । ४०'. असें जाणणें-नेणणें स्पष्ट केलें आहे. ज्ञानाची छाननी झाली. विज्ञानाची माहिती शिल्लक राहिली. ती भरून काढण्यासाठीं 'जेथें जाणपण खुंटलें । तेथें बोलणें हि तुटलें । हेतुरहित जालें । समाधान ॥ ४२'. याप्रमाणें विवरण केलें आहे. यावर आपली शंका पूर्णपणें फिट-ल्याची श्रोत्यानें कबुली दिली व 'पिंडब्रह्मांड ऐक्य' कसें हा प्रश्न वक्त्यापुढें ठेवला.

**पांचवा** समास 'अनुमान' निरसनाचा आहे. पिंडब्रह्मांडाचें ऐक्य हें अनुमान आहे, का हा अनुभव आहे, या प्रश्नांतून समासाचा विषय निघाला. श्रोत्याचें म्हणणें असें कीं हें एक जुनाट अनुमान लोकधाटीनें आजवर तगविलेलें आहे. लोकधाटीसारखीच चार देह पिंडाचे व चार देह ब्रह्मांडाचे ही शास्त्रधाटी आहे. पिंडाच्या देहांना स्थूळ, सूक्ष्म, कारण, महाकारण अशीं नांवें असून विराट, हिरण्य, अव्याकृत, मूळ प्रकृति हें ब्रह्मांडांतील देहांचें शास्त्रीय नामकरण आहे. श्रोत्याला याविषयीं प्रत्यक्ष प्रमाणाची अपेक्षा आहे. पिंडांतील अंतःकरण व ब्रह्मांडांतील विष्णु हे एकच. पिंडांतील जें मन तें ब्रह्मांडांत चंद्र या नांवानें ओळखलें जातें. ब्रह्मा, रुद्र, नारायण यांच्या संबंधांत अशाच कल्पना आहेत. श्रोत्याला विष्णूचें अंतःकरण, चंद्राचें मन, रुद्रअहंकाराचा हेतु यांचा खुलासा हवा होता. वक्त्याची प्रचीतीनें बोलण्याविषयीं प्रतिज्ञाच असल्यामुळें 'प्रचीतीवीण जें बोलणें । तें अवघें चि कंटाळवाणें । १५'. अशी वक्त्याला इशारत देऊन ठेवली आहे. साधारणपणें या समासाचें सगळें स्वरूप श्रोत्याच्या शंकेचें आहे. ब्रह्मदेवानें सृष्टि निर्मिली, तर ब्रह्मदेवाला कोणीं निर्माण केलें, अशा तऱ्हेचे प्रश्न श्रोत्यानें विचारले आहेत. पिंड-ब्रह्मांड यांमध्यें खरोखरीच ऐक्य असेल, तर ब्रह्मांडांत असणारे झाडून सगळे पदार्थ पिंडामध्यें दाखवितां आले पाहिजेत, तेव्हां या कल्पनेचा विश्वास ठेवतां येईल. ब्रह्मांड पंचभूतांचें तसाच पिंडहि पंचभूतांचा, इतकेंच काय तें साम्य या तिघांत दिसतें (३८). बाकीचें साम्य हें केवळ अनुमानच आहे. 'जितुकें अनुमानाचें बोलणें । तितुकें वमनप्राये त्यागणें । ३९'. असें श्रोता आणखी एकदां निक्षून सांगतो.

**सहावा** समास 'गुणरूपा'चा आहे व या समासांतील विषयाचें नांव सबंध दशकाला दिलेलें आहे. येथें सृष्टीच्या उभारणीचा सातव्या आणि आठव्या दशकांत आलेला वृत्तांत पुनः एकदां संक्षेपानें दाखल केलेला आहे. निराकार आकाशाप्रमाणें ब्रह्म, आकाशांत वायूचा विकार तशी ब्रह्मांत माया. मूळ मायेंतून पंचभूतांचा प्रादुर्भाव झाला. जाणीव तो सत्त्वगुण, मध्य तो रजोगुण, नेणीव हा तमोगुण, हें श्रोत्यांनीं लक्षांत ठेवावें. पिंडाची जी सर्वसाक्षिणी अवस्था तिला महाकारण म्हणतात. ब्रह्मांडाचा महाकारण देह म्हणजे मूळ माया. अर्थात् जाणिवेचा अंतर्भाव मूळ मायेंत आहे. मूळमायेंतच त्रिगुण गुप्त असतात. ते स्पष्ट होऊं लागले कीं गुणक्षोभिणी हें नांव मूळ मायेला प्राप्त होतें. मूळ माया वायुस्वरूप आहे. जाणीव,

मध्यस्थ व नेणीव ही गुणक्षोभाची प्रगट स्थिति आहे. या अवस्थेंत शब्द उत्पन्न होतो. शब्द हा आकाशाचा गुण म्हणून प्रसिद्ध आहे. पिंडाच्या व्यवहारांतसुद्धां वेदशास्त्राचा आधार शब्दच असल्याचें दिसून येतें. त्रिगुणमिश्रित पंचभूतें हा वायूचा खेळ आहे. वायु नसेल तर जाणीव-नेणीव या दशा संभवत नाहींत. चलन हें जाणिवेचें मूळ असून तें वायूचें मुख्य लक्षण आहे. मूळ मायेपासून वायूच्या बळानें येथवर आलें; परंतु हा एक प्रकारचा कर्दम आहे. त्यापासून अग्नि, आप, पृथ्वी हीं उदय पावलीं. ही कथा ऐकतांच भूतें व जाणीव यांचें साहचर्य असणें असंभवनीय अशी शंका उद्भवली. 'भूतांत जाणीव हे ऐकिली। नाहीं वार्ता ॥ १८'. यावर वक्त्यानें वायूचे सारे गुण व कर्तृत्व पूर्वी वर्णिलें असल्याबद्दल हवाला देऊन आपलें निरूपण पुढें चालविलें. जाणीव सर्व भूतांत आहे; पण कुठें दिसत नाहीं. उदाहरणार्थ, आपण आकाशांतील निरोधवायूचा – शांत वायूचा – विचार करावा. चलन होईल तेव्हां वायु अनुभवास येतो. 'तैसी जाणीव न दिसे। न दिसे परी ते असे। भूतरूपें ॥ २३'. पुनः एकदां ब्रह्म, मूळमाया, गुणमाया, तीन गुण या क्रमाची वाच्यता केली आहे. नंतर शिकविलें तरी कळत नाहीं अशा श्रोत्यांची थोडीशी हजेरी घेतली आहे (२९–३०). आकाश पाहूं गेल्यास निर्विकार आहे, परंतु 'आकाश। भूत हा विचार। उपाधीकरितां ॥ ३४'. 'उपाधी नस्ता जें आकाश। तें चि ब्रह्म ॥ ३७'. पुढें पंचभूतांपैकीं जीवनाच्या (पाण्याच्या) परिणामांचा विस्तार सांगितला आहे. ही सारी प्रकृतीची लीला असल्यामुळें 'ये प्रकृतीचा निरास। विवेकें वारावा सावकास। मग परमात्मा परेश। अनन्यभावें भजावा ॥ ५४'. असा उपदेश शेवटीं केला आहे.

**सातवा** समास 'विकल्प'निरसनाचा आहे. श्रोत्यानें प्रश्न केला कीं, स्थूलावांचून सूक्ष्माला आधार नसेल तर स्थूलापूर्वी अंतःकरणपंचकाला कोणती जागा होती? त्याला वक्त्यानें अगदीं व्यवहारांतील अनुभवाचें उत्तर दिलें आहे. प्राणी आधीं का त्याचें वस्तीस्थान आधीं हा प्रश्न चर्चेला घेतल्यास आधीं प्राणी जन्मास येतात व मग ते आपलीं वस्तीस्थानें तयार करतात असें दृष्टीस पडतें. 'तैसें आधीं सूक्ष्म जाण। मग स्थूळ होतें निर्माण। ७' हें पक्कें लक्षांत ठेवावें. यावर प्रश्न निघाला कीं, जन्मास कोण घालतें, फिरून कोण जन्मास येतें, ब्रह्मास कोणीं निर्माण केलें, विष्णूचें पालन कोण करतें, रुद्राचा संहार करणारा कोण? (ब्रह्मा-विष्णु-महेशाचा

प्रश्न पूर्वी ९:५:२४–२५ येथें आलेला आहे) म्हणून सगळा सृष्टिभाव हा मायेचा स्वभाव असून देव निर्गुण-निर्विकारी तेव्हां त्याला सृष्टीचें कर्तृत्व देतां येत नाहीं. माया कांहीं नवीन उत्पन्न करते असें म्हणण्यापेक्षां तीच विस्तारली, असें मानणें जास्त सोयीचें; पण ती विचारापुढें थारत नाहीं हें देखील खरें आहे. याप्रमाणें स्वतःच समाधान काढून जन्म, संचित, पापपुण्य इत्यादिकांची परिस्फुटता करावी, अशी गळ श्रोत्यानें घातली आहे. वासनेच्या योगानें जन्म होतो म्हणतात, पण ती दिसत नाहीं, आकलन होत नाहीं. हें सगळें जाणीवयंत्र समजावयाचें; जाणीव म्हणजे जर स्मरण, तर त्या स्मरणाला जन्मसूत्र कसें चिकटलें? अधिक खोलांत शिरल्यास जन्मच नाहीं या निष्कर्षावर यावें लागतें. पण यांतहि एक अडचण आहे. जन्म नसेल तर सत्संगाची प्रतिष्ठा काय उरली? एकदां स्मरण-विस्मरण यांतलें कांहींच नव्हतें. मध्येंच स्मरण उद्भवलें. स्मरण जाणें यालाच मरण असें नांव आहे. मरणोत्तर कोण कुणाला जन्मास घालतो? सारांश, 'मरोन गेलें तें जन्मासी । मागुतें न ये ॥ २८' इतकी श्रोत्याच्या शंकेनें मजल मारली. यांतून जन्ममृत्यूच्या दृष्टीनें अज्ञान, सज्ञान सारखेच असा ध्वनि उत्पन्न होतो.

वक्त्यानें हा पूर्वपक्ष ऐकून त्याच्या निवारणाला प्रारंभ केला. जेवल्यावांचून पोट भरत नाहीं, याच न्यायानें ज्ञानाखेरीज मुक्ति नाहीं. एकटा जेवला म्हणून सर्वांची भूक शमत नाहीं, हें लक्षांत घेऊन सर्वांच्या सुटकेची काळजी केली पाहिजे. ज्ञानावांचून मोक्ष नाहीं, अशी वेदशास्त्रविचाराची व महानुभाव मंडळींची साक्ष असतां आपल्या मताचा आग्रह धरण्यांत हंशील काय? आत्मज्ञानानें दृश्य खोटें ठरलें तरी त्यांत सर्व प्राणी गुरफटलेले आहेत. सारें दृश्य खोटें हें हृदयांत बाणत नाहीं, म्हणून सुटका नाहीं. या विवेचनांत समर्थांचा बुद्धिवाद एके ठिकाणीं चमकला आहे. 'भोळा भाव सिद्धी जाव । हा उधाराचा उपाव । रोकडा मोक्षाचा अभिप्राव । विवेकें ज़ाणावा ॥ ४९'. प्राण्याला सुटका हवी असेल तर आधीं जाणीव-कळेचें भांडवल त्याच्यापाशीं असणें अवश्य आहे. जाणीवकळेच्या योगानें त्यानें सकळ जाणलें कीं तो 'निराळा । सहज चि होये ॥ ५०'. 'कांहीं च नेणिजे तें अज्ञान । सकळ जाणिजे तें ज्ञान । जाणीव राहातां विज्ञान । स्वयें चि आत्मा ॥ ५१'. आपण ज्ञानी आहों याचें भान जाणें या स्थितीला विज्ञान म्हणतात, हें येथें निदर्शनास आणलें आहे. विवेकी पुरुष बद्धाला हिणवूं शकेल, त्याला बद्धावस्था

आकलन होणार नाहीं. 'विवेक दुरी ठेऊन पाहावें । लक्षण बद्धाचें ॥ ५४'. परंतु या भानगडींत पडाच कशाला ?

**आठवा** समास 'देहान्तनिरूपण' या नांवाचा असला तरी त्यामध्यें प्राधान्यानें पुनर्जन्माचा विचार केलेला आहे. मेल्यावर पुनः जन्म कसा होतो, हा प्रश्न उपस्थित झाला असूनहि त्याला येथवर उत्तर मिळालेलें नाहीं. ज्ञाता सुटला, परंतु अंतकाळीं बद्धाचें काय जन्मतें, अशा रीतीनें या प्रश्नाची प्रस्तावना करून, प्राण गेले तरी ते अगदीं निर्लेप स्थितींत जात नाहींत, 'वासनामिश्रित प्राण जाती । देह सोडुनियां ॥ ४'. वायूसरशी वासना गेली, तीच वायुरूपांत राहून हेतुपरत्वें पुनः जन्मास कारणीभूत होते. हा प्रकार सिद्ध करण्यासाठीं समर्थांनीं ज्यांना आजच्या भाषेंत लोकभ्रम म्हणतां येईल अशा कित्येक श्रद्धामूलक समजुतींचीं उदाहरणें घेतलीं आहेत (६-१०). 'म्हणोन वायोरूप वासनेला । जन्म आहे ॥ ११'. मनाच्या ज्या नाना वृत्ती, त्यांत वासना जन्म घेते. ती दिसत नाहीं म्हणून तिचें अस्तित्व नाकारतां येत नाहीं. वासना हा जाणिवेचा हेतु. मनुष्याच्या जाणिवेंत किंवा ज्ञानांत अनेक संकल्प अथवा हेतु घर करून रहातात. वासना या शब्दांतच संकल्पाच्या कायम वस्तीचा अर्थ आहे. जाणीव हा सृष्ट्यारंभाचा तंतु असून तो अत्यंत सूक्ष्म आहे. तो वायुरूप आहे. येथून पुढें वायूचा प्रभाव सांगितलेला आहे. वायूच्या योगानें मेघ, नक्षत्रें चालतात. 'सकळ सृष्टीची वर्तती गती । सकळ तो वायो ॥ १९'. या विवेचनांत पुनः एकवार कांहीं लोकभ्रमांचा निर्देश आहे (२०–२२). वायूमुळें गाण्यांतील रागदारीचा उद्धार होतो. 'दीप लागे मेघ पडे हा चमत्कार । रागोद्धारीं ॥ २१'.

सहाव्या समासाच्या एकोणिसाव्या ओवींत 'वायोआंगीं सकळ गुण । मागां निरोपिले ।' असें म्हटलें आहे. या 'मागां 'चा पूर्वीच्या दशकांत व समासांत शोध घेऊं लागल्यास 'वायोआंगीं सकळ गुण ।' या वचनाची यथार्थता पटवून देणारा भाग या समासाप्रमाणें अन्यत्र सांपडत नाहीं. पहिल्या समासांत दासबोध (७ वा दशक ) व ज्ञानदशक (८ वा) यांचा उल्लेख आहे. परंतु त्या दोन्ही दशकांत 'वायोआंगीं सकळ गुण । ' या वचनाला शोभणारें विवेचन आढळत नाहीं. सहाव्या समासाचा आरंभ एखाद्या स्वतंत्र समासाप्रमाणें दिसतो. तिकडे लक्ष दिल्यास वीसदशकी दासबोधाच्या रचनेवर प्रकाश पडल्याशिवाय राहात नाहीं.

**नववा** समास ' संदेहवारण ' नांवाचा आहे. ब्रह्म व ब्रह्मांड या संबंधाचा पहिला संदेह आहे. ब्रह्मांत ब्रह्मांडाचा शिरकाव कसा झाला ? वक्त्यानें उत्तरास प्रारंभ केला. ब्रह्मांड नाहीं म्हणावें तरी दिसतें, आहे म्हणावें तर नाश पावतें हें श्रोत्यांना कोणत्या रीतीनें उमगतें ? उत्तराच्या सुरुवातीस हा प्रश्न ऐकतांच श्रोत्यांनीं कान टवकारून म्हटलें : ' आम्ही सावध आहों. प्रसंग येईल तेव्हां या प्रश्नाचा चांगला योग्य समाचार घेऊं. ' वक्ता पुढें बोलूं लागला. आप, तेज, पवन हीं आकाशांत आहेत, पण आकाशाला सारूं शकत नाहींत. पृथ्वी कठिण म्हणतात, तरी ' गगनें केली चाळणी । पृथ्वीचें सर्वांग भेदुनी । राहिलें गगन । १५ '. उपाधिरहित आकाशच ब्रह्म होय, ही कल्पना पुन्हा येथें ग्रथित झालेली आहे (१७–२१). ' भूतांतरीं जो ब्रह्मांश । तेंचि गगन ।। २१ ' खोटें आलें गेलें तरी त्या योगानें खरें भंगत नाहीं. भ्रमावस्थेंत जें प्रत्यक्ष दिसतें तें जसें खरें नसतें तसेंच जगाचें दृश्य समजावें. दृश्य व ब्रह्म यांची तुलना करूं गेल्यास दृश्य हें ब्रह्माच्या पासंगासहि लागणार नाहीं. दर्यामें खसखस—' सागरामधें खसखस । तैसें परब्रह्मीं दृश्य । २९ '. हें आपल्या बुद्धीवर अवलंबून आहे. बुद्धि विशाल केल्यास अंतराळ कवळतां येतें, ब्रह्मगोळ कवठासारखा भासतो. याहून वृत्ति विशाल केली तर सगळें ब्रह्मांड बोराएवढें असल्यासारखें वाटेल. बुद्धीच्या किंवा वृत्तीच्या विशालत्वानें ब्रह्माकार प्राप्त करून घेतला कीं मग ' कांहीं च नाहीं ।। ३१ '. भ्रमानें ल्हानाळ-ल्यास ब्रह्मांड कवळतां येणार नाहीं. म्हणून ' वृत्ति ऐसी वाढवावी । पसरून नाहीं च करावी । पूर्णब्रह्मास पुरवावी । चहूंकडे ।। ३५ '. ब्रह्माची आणि वृत्तीची गांठ पडतांच वृत्ति फाटून वितळते व निर्गुण आत्मा जसाच्या तसा निवळतो. वृत्ति फाटून वितळतांच निर्मळ ब्रह्माचा साक्षात्कार उरतो. विवेकानें अनुमान तुटतें, समाधान लाभतें, आत्मनिवेदन मोक्ष प्राप्त होतो. शेवटीं ' हे प्रचीतीचीं उत्तरें । कळती सारासारविचारें । मननध्यासें साक्षात्कारें । पावन होईजे ।। ४१ '. असें आश्वासन व आशीर्वचन आहे.

**दहावा** समास ' स्थितिनिरूपणा ' चा आहे. स्थिति म्हणजे ब्रह्मसाक्षात्काराची स्थिति. ही स्थिति बाह्याकारानें समजणारी नाहीं, हें ध्यानांत येण्यासाठीं पहिल्या सात ओव्यांत दृष्टांत आहेत. ' येथें पाहिजे मुख्य येक । अंतरनिष्ठा ।। १८ '. बाहेर भलेपणा मिळविला, पण अंतर्यामीं सावध नसल्यामुळें मुख्य देवास अंतरून मनुष्य

आत्मघातकी ठरतो. ‘जेणें जयास भजावें। तेणें त्या लोकासी जावें। निर्गुणीं भजतां व्हावें। निर्गुणची स्वयें ॥ ११’. निर्गुणी अनन्यत्व हें निर्गुणाचें भजन असून ‘अनन्य होतां होईजे धन्य। निश्चयेंसीं ॥ १२’. सगळ्याचें सार्थक काय तर ‘देव वोळखावा येक। १३’. त्याबरोबरच आपण कोण हा विवेक केला पाहिजे. आपली गणना मायिकांत आहे, असें कळल्यावर ‘सोहं आत्मा हा निर्धार। बाणोन गेला। १४’. आतां देहभाव धुंडाळला तरी सांपडायचा नाहीं. ‘साधनें जें कांहीं साधावें। तें तों आपणचि स्वभावें ॥ १७’. म्हणून साधकत्व उरलें नाहीं. आत्मा, जीव, माया ‘ऐसें अवघेंचि आहे। आणी आपण हि कोणी येक आहे। हें सकळ शोधून पाहे। तो चि ज्ञानी ॥ २४’. जो सर्वांचा शोध करतो, पण स्वतःला ओळखीत नाहीं, ‘ऐसा ज्ञानी येकदेसी। वृत्तिरूपें ॥ २५’. या एकदेशी वृत्तिरूपाचा झाडा घेतला कीं, ‘तरी मग कांहींच नाहीं उरलें। २६’. म्हणजे भेददृष्टीमुळें अनुभवास येणारा पसारा नाहींसा झाला. नंतर ‘उरलें तें निखळ निर्गुण। विवंचितां तें चि आपण। ऐसी हे परमार्थाची खूण। अगाध आहे ॥ २७’. फळ निराळें, आपण कोणी तरी त्याहून वेगळे असा प्रकार नसून ‘फळाचें फळ कोणीयेक। स्वयें चि होईजे ॥ २८’. अशी स्थिति झाल्यावर ‘करणें न करणें वाउगें। कांहीं च नाहीं ॥ ३१’. यापुढें कित्येक दृष्टांत सांगून हें प्रकरण संपविलेलें आहे.

**• १० •**

या दशकाला ‘जगज्जोती’ असें नांव असून ‘पुरुषप्रकृती’ नामक ९ व्या समासांत त्याचें स्पष्टीकरण आहे. पुरुषप्रकृतीच्या जोडींतील पुरुष म्हणजे ‘जगज्जोती’. पुरुषाला भगवद्गीतेंत ‘क्षेत्रज्ञ’ अशी संज्ञा आहे. या शब्दांतील ‘ज्ञ’ हें अक्षर जाणण्याच्या क्रियेचें व फलाचें दर्शक असल्यामुळें त्यावरून प्राण्यांच्या अंतर्गत जाणीवस्थितीला किंवा प्रकाशाला ‘जगज्जोती’ असें नांव समर्थांनीं योजलेलें दिसतें. हा शब्द समर्थांनीं दासबोधाबाहेर अनेक स्थळीं उपयोगांत आणलेला आहे.

**पहिला** समास ‘अंतःकरण एक’ यासंबंधाचा आहे. श्रोत्यानें ‘सर्वांचें अंतःकरण एकच कीं प्रत्येकाचें निराळें?’ असा प्रश्न विचारला आणि वक्त्यानें ‘समस्तांचें अंतःकर्ण येक। निश्चयो जाणावा नेमक। ३’ असें तत्काळ उत्तर दिलें.

हा निश्चय प्रत्यक्ष अनुभवाचा आहे असें बजावलें असतांहि श्रोत्याच्या मनांतील शंका थंडावण्याऐवजीं उसळल्या. ‘अंतःकरण सर्वांचें एक हें म्हणणें ठीक आहे. परंतु एक मेला कीं सगळे मेले, एकाच्या जेवणानें सर्वांची भूक निवाली, असें आढळत नाहीं. उलट लोकांत भिन्न भावनांचा बुजबुजाट दृष्टीस पडतो. अंतःकरण एक असतें तर एकाचें मनोगत दुसऱ्याला समजून गुह्य, गौप्य असें कांहींच उरलें नसतें. साप चावेल म्हणून मनुष्य भिऊन पळतो, या विरोधाचा परिहार झाल्याखेरीज सर्वांचें अंतःकरण एक हा निर्णय मान्य करतां येत नाहीं.’ यावर वक्त्याचें उत्तर आहे कीं, प्राण्यांच्या बाह्य वर्तनांत भेद, विरोध हे प्रकार दिसले तरी सर्वांचें अंतःकरण एक या निश्चयाला बाधा होत नाहीं. अंतःकरण म्हणजे जाणीव. जाणता स्वभाव ही जाणीव. प्रत्येक प्राण्यामध्यें देहरक्षणाची जाणीव सारखीच आहे. साप चावेल या भीतीनें त्यापासून दूर पळणें, ही गोष्ट दोन्हीकडे एकाच तऱ्हेची आढळेल. सापाला ज्यापासून भय वाटेल, त्यापासून तोसुद्धां पळेल. ‘देहरक्षणाचा उपाव। जाणती कळा ।। १२’. पाहणें, चाखणें, स्पर्शणें, वास घेणें, हीं ‘सर्वत्रास येक ।। १६’. पाणी, आग यांचा अनुभव सर्व प्राण्यांना सारखाच येतो. आवडनावड हे देहधर्म आहेत. परंतु ‘जाणणें तितुकें येका। अंतःकर्णाचें ।। २१’. हा नियम ब्रह्मदेवापर्यंत सर्वांना सारखाच लागू आहे. जाणीव म्हणजे अंतःकरण हा विष्णूचा अंश असल्यानें त्याच्याकडे पालनाची कामगिरी आली. नासधूस हा नेणिवेचा व्यवहार असून त्याला तमोगुण म्हणतात. रुद्र तमोगुणाच्या प्रभावानें संहार करतो. सृष्टींतील जीवांमध्यें कांहीं जाणीव कांहीं नेणीव असें मिश्रण असतें, हें रजोगुणाचें लक्षण आहे. जाणिवेचें सुख हें फळ, तर दुःख हें नेणिवेचें फळ आहे. बुद्धींत जाणीव-नेणीव या दोन्हींचा प्रभाव आहे, म्हणून जीवांच्या देहांतील बुद्धि हा ब्रह्मा होय.

**दुसरा** समास ‘देहआशंका’ नांवाचा आहे. या समासांत ज्या शंका प्रदर्शित केल्या आहेत त्यांत ब्रह्मा, विष्णु, महेश यांचीं रूपें व कार्यें प्रत्ययास येत नाहींत, ही शंका आहे. देव, माया यांचा परस्परसंबंध किती व कोणता, ब्रह्म अकर्तृक तर त्याच्यांत मायेचा प्रादुर्भाव होतो म्हणतात तें कसें, इत्यादि शंकांचें जाळें १–१८ ओव्यांत श्रोत्यानें पसरलें आहे. यांत एक धागा देह कसा निर्माण होतो या शंकेचा असल्यानें त्याला धरून ‘देहआशंका’ असें नांव समासाला

देण्यांत आलें. या शंका पूर्वी एकदां घेतल्याचें जिज्ञासूंना सांगायला नको. २० व्या ओवीपासून वक्त्याचें उत्तर सुरू झालें, परंतु या शंकांचें त्यांत निरसन नसून लोक-धाटी, शास्त्रें यांच्याकडे पाहूं लागल्यास तीं आपल्या विचारभेदानें गोंधळांत भर घालतात असें विवेचन आहे. शेवटीं 'तथापि बोलों कांहीं येक। शास्त्र रक्षून कौतुक। श्रोतीं सादर विवेक। केला पाहिजे ॥ २५'. असें आश्वासन आहे.

**तिसरा** समास 'देहआशंकाशोधना'चा आहे. येथें ब्रह्म, मूळ माया, पंच-भूतें, त्रिगुण इत्यादि सृष्टिविस्ताराच्या प्रारंभाची माहिती आहे. उपाधिविरहित जें आकाश तें ब्रह्म; त्यांत वायुस्वरूप मूळ मायेचा जन्म झाला. त्रिगुण व पंचभूतें वायूच्या अंगीं असतात. वायुपासून अग्नि, त्यापासून आप. तें नारायणाचें स्वरूप असून आपांतच पृथ्वीचें रूप बीजाकार असतें. पृथ्वीच्या पोटांतील पाषाण अनेक देवांना उदयास आणतात. 'नाना प्रचित प्रमाण। पाषाणदेवीं ॥ ५'. हे सारे देव वायूंतच राहतात. त्यांचा आधार वायूच. त्यांना स्त्री, पुरुष, नपुंसक अशीं तिन्ही तऱ्हेचीं नांवें आहेत (७–८). येथें देव, देवता, देवतें, भूतें, या संबंधांतील समर्थांचा विश्वास जसा प्रगटला आहे तसाच तो सप्तसमासी प्रकरणांतहि पाहायला सांपडतो (६–१५). देव, देवता, देवतें, भूतें हीं गुप्त होतात, प्रगट होतात, प्रसंगीं नाना देह धरतात, अशी समर्थांची श्रद्धा येथें व्यक्त झाली आहे. या देवदेवता वायुस्वरूपच असतात. वायूमध्येंच जगज्जोती आहे. जाणती कळा, वासनावृत्ति हे सारे भेद तिचेच पर्याय होत. वायूचे दोन प्रकार आहेत. एक वारा. तो सर्वांच्या परिचयाचा आहे. दुसरा प्रकार म्हणजे जगज्जोती. ही देवदेवतांच्या अनंत मूर्तींचें उगमस्थान आहे. वायूप्रमाणें तेजाचे दोन प्रकार आहेत. तेज केवळ उष्णच नाहीं तर शीतल देखील आहे. एकाचीं सूर्य, अग्नि, वीज अशीं रूपें आहेत. दुसऱ्याचीं रूपें पाणी, अमृत, चंद्र, तारा इत्यादि आहेत. पृथ्वीचीं दगड व माती हीं कठिण व मृदु रूपें प्रसिद्धच आहेत. याखेरीज सुवर्ण, परिस, नाना रत्नें यांचा समावेश पृथ्वींतच होतो. येथवर पंचभूतांची चर्चा झाली. मनुष्यदेह कुठून आला ही मुख्य शंका शिल्लक राहिली. तिचा विचार पुढील समासांत आहे.

**चौथा** समास 'बीजलक्षणा'चा आहे. मनुष्यदेह कसा उत्पन्न होतो या प्रश्नाचें उत्तर 'मनुष्यापासून मनुष्यें होती।' असें पहिल्याच ओवींत आहे. एका

शरीरानें दुसऱ्या शरीराला उत्पन्न केलें, पण पहिलें शरीर कसें झालें याचा निर्णय वरील उत्तरानें होत नाहीं हें ध्यानांत घेऊन मूळ माया, भूतें, त्रिगुण यांचा निर्देश केला आहे. वायूंत जी जाणीव आहे तीच इच्छा; तथापि तिचा आरोप 'ब्रह्मीं न घडे । १० '. या संबंधांत आग्रह धरूं नये. धरल्यास तो आकाशाला धोंडा मारण्याच्या प्रयत्नाप्रमाणें वायां जाईल. ब्रह्मांत मायेचा वारा उठला (समीर); त्यांत जो जाणतेपणा असतो तो ईश्वर सर्वेश्वरहि तोच (१६). त्याला गुणांच्या संदर्भानें पाहिलें तर सत्त्वादि गुणानुसार त्याचीं विष्णु, ब्रह्मा, महेश रूपें आढळतात. जाणता विष्णु भगवान, जाणतानेणता चतुरानन, आणि नेणता महेश पंचानन अशीं हीं रूपें आहेत. वायूंतील विष्णु चतुर्भुज देहधर्ता झाला. ब्रह्मा, महेश हे असेच अवतरले. ते मनास वाटेल तेव्हां गुप्त किंवा प्रगट होऊं शकतात. येथें पुनः समर्थांनीं मनुष्येंसुद्धां 'गुप्त (होती व) प्रगटती । २३ '. हा एक स्वकालीन प्रचलित लोकभ्रम आधारास घेतला आहे. 'झोटिंग वायोस्वरूप असती । सवें च खुळखुळां चालती । खोबरीं खारिका टाकून देती । अकस्मात ॥ २५ '. हें अविश्वास ठेवण्या-सारखें नाहीं; कारण 'आपुलाल्या अनुभवें । विश्वलोक जाणती ॥ २६ '. असा समर्थांनीं हवाला देऊन वरील विश्वास दृढ केला आहे. माणसाला भिन्न वेश, भिन्न रूपें धारण करतां येतात, इतकेंच नव्हे तर तो परकायाप्रवेशहि करूं शकतो. तेव्हां 'तो परमात्मा जगदीश । कैसा न धरी ॥ २७ '. ब्रह्मादिकांचा जन्म केवळ इच्छेनें होत असतो. सर्व प्राण्यांचे पहिले देह ब्रह्मदेवाच्या इच्छेपासून झाले. हे देह नर-मादी अशा जोडीचे होते. अंडज, जारज, स्वेदज आणि वायूंतून निघाले ते उद्भिज (३२–३३). समर्थ पुष्कळदां माया ही देवाची जणूं काय जादू असल्याच्या कल्पनेनें 'मनुष्यांची गौडविद्या । राक्षसांची वोडंबरीविद्या । ब्रह्मयाची सृष्टिविद्या । येणेप्रकारें ॥ ३४ '. हा किंवा अशा अर्थाचा दाखला देत असतात. मनुष्यापेक्षां राक्षसाची विद्या वरचढ, तिच्याहून ब्रह्मदेवाची वरचढ असा त्यांचा क्रम आहे. सारांश, पहिलीं शरीरें (ब्रह्मांतील चंचलतेनें) इच्छेनें झालीं व पुढें शरीरापासून शरीरें अशी सृष्टि वाढली. माणसांना वेदाच्या द्वारें योग्य वर्तनाचा मार्ग दाखविला (३६). या प्राण्यांचें संरक्षण 'मूळरूपें जाणोन' (जाणत्या विष्णूनें) केलें (४०). दैत्यांचा त्यानें संहार केला. नाना अवतार घेऊन, दुष्टांचा संहार करून धर्माची स्थापना करण्यासाठीं विष्णूचा जन्म आहे.

**म्हणोन धर्मस्थापनेचे नर। ते हि विष्णूचे अवतार।**
**अभक्त दुर्जन रजनीचर। सहज चि जाले ॥ ४२**

जन्मलेल्यांचा संहार रुद्र 'मूळरूपें' करतो. रुद्र खवळला कीं जीवसृष्टीबरोबरच ब्रह्मांडाचासुद्धां संहार घडतो. त्या संहाराची कथा पुढल्या समासांत सांगितली आहे.

माया खोटी असून दिसते अर्थात् खरी वाटते ती कां, या कोड्याचा उलगडा होण्यासाठीं समर्थांनीं माणसांच्या जादूचें व राक्षसांच्या कपटविद्येचें उदाहरण ६ : ८ मध्यें प्रथम घेतलें असून ७ : ४ : ४० मध्यें मायादेवी वोडंबर (अवडंबर) दाखविते असें म्हटलें आहे. 'माया वोडंबर' ८ : २ : ४ येथें आलें असून नजरबंदीच्या—दृष्टिबंधनाच्या—खेळाचा दाखला सांगून ८ : ३ : ४८ मध्यें पुनः एकदां मायेचें कोडें सोडविलें आहे. मंत्रांत वायूचें बळ असतें म्हणून 'मंत्रें देव प्रगटती। मंत्रें भूतें अखरकिती।' असे मंत्राचे परिणाम बोलून 'बाजीगरी वोडंबरी करिती। मंत्रसामर्थ्यें ॥ ९ : ८ : ३३'. असा बाजीगरी वोडंबरीचा संदर्भ आणला आहे. १० : ४ या प्रस्तुत समासांत तो दृष्टांत फिरून आल्याचें वाचकांनीं पाहिलेंच आहे. समर्थांनीं मायेचें गूढ उकलण्यासाठीं जी तोड काढली ती त्यांच्या बुद्धींत कशी खिळून गेली होती हें यावरून लक्षांत येईल.

**पांचवा** समास 'पंचप्रळया'चा आहे. पिंडाचे प्रळय दोन. एक निद्रा व एक मृत्यु. ब्रह्मा, विष्णु, महेश जेव्हां निजतात तेव्हां ब्रह्मांडाचा निद्राप्रळय ओढवतो. या तिन्ही मूर्तींचा अंत होतो तेव्हां ब्रह्मांडाचा कल्पांत म्हणजे पूर्ण शेवट होतो. आणखी एक प्रळय आहे. त्याला विवेकप्रळय म्हणतात. यानंतर या चारी प्रळयांचें क्रमशः वर्णन आहे. त्यांतल्या एका प्रलयाकडे लक्ष देणें अवश्य आहे. ब्रह्मदेवाच्या झोपेचा प्रलय सुरू झाला कीं, 'मृत्यलोक गोळा जाला। अवघा व्यापार खुंटला। प्राणीमात्राचा ॥ १०'. या वेळीं प्राण्यांचे सूक्ष्मांश वायुचक्रांत रहातात. ब्रह्मदेव झोपेंतून उठतांच 'पुन्हा मागुती सृष्टि रची। विसंचिले जीव मागुतें संची। १२'. ब्रह्मदेवाचें आयुष्य संपतांच खऱ्या ब्रह्मप्रलयाला प्रारंभ होतो. त्याची माहिती पुराणांतून पाहावयाला सांपडते तशीच आहे. अवर्षण, सूर्याची पराकाष्ठेची प्रखरता, यांत अग्नीचा उठाव, वर अग्नि व खालून शेषाचें विष, असा

दोहींकडून भूगोल जळूं लागतो. पृथ्वी, आप, तेज यांच्या मागून वायूचा नाश झाला कीं, ज्याला ईश्वर म्हटलें तो आपलें अधिष्ठान सोडून निर्विकल्पांत विलीन होतो. अखेरीस 'शुद्ध सारांश उरली। स्वरूप स्थिति॥ २६'. विवेकप्रळय हें जीवन्मुक्तावस्थेला दिलेलें दुसरें नांव आहे. प्रकृतीवर विवेकाचा जय म्हणजे विवेकप्रळय.

समर्थांनीं जो 'विवेकप्रळय' नांवाचा एक प्रकार सांगितला तो खास त्यांच्या विचारपरंपरेंतून निघालेला व त्या योगानें जुन्या तत्त्वज्ञानांत एका नव्या सिद्धांताची भर टाकण्याचें श्रेय समर्थांच्या पदरांत टाकतां येतें, असा दावा एकदां मांडला गेला होता. परंतु या प्रलयाची कल्पना एकनाथांच्या ग्रंथांतून सांपडणारी असल्यामुळें हा दावा कोलमडतो. या प्रलयाचा निर्देश समर्थांच्या स्फुट प्रकरणांतून दृष्टीस पडतो. श्रीरामदासांची कविता प्रथम खंड यांतील स्फुट ओव्या क्र. ५६ व ५८, पान २३८–२३९ मध्यें पांची प्रलयांचे उल्लेख आहेत. 'सप्तसमासी' प्रकरणाच्या चौथ्या समासांत २६ व्या ओवीमध्यें 'विवेकप्रळय' आलेला आहे.

**सहावा** समास 'भ्रमनिरूपणा'चा आहे. या समासांत समर्थांचें बुद्धिप्रामाण्य उत्कृष्ट रीतीनें उघडकीस आलें आहे. बुद्धिप्रामाण्याचे किंवा प्रत्ययप्रामाण्याचे पुरस्कर्ते असूनहि समर्थ अनेक लोकभ्रमांचा उल्लेख विश्वास असल्यासारखा इतरत्र कां करतात याचें आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाहीं.

उत्पत्ति-स्थिति-संहाराच्या गडबडीचा ब्रह्माशीं संबंध नाहीं. 'परमात्मा निर्गुण निराकार। जैसा तैसा॥' (१). परंतु सृष्टीमध्यें या विषयाचा उमज असणारे फारच विरळा, बाकीचे सारे भ्रमिष्ट. महापुरुष मात्र त्याहून वेगळा असतो (६-७). परब्रह्माव्यतिरिक्त सारें भ्रमरूप आहे. मी, तूं, ईश्वरभाव, उपासना इत्यादि सर्व भ्रम होत. दूरदेशीं फिरतांना दिशाभूल होते, जिवलगांच्या ओळखी ऱ्हास पावतात, मादक पदार्थांच्या सेवनानें बुद्धि ठिकाणावर राहात नाहीं, नाटकांतील स्त्रीवेषधारी पुरुष, नजरबंदीचा खेळ (बाजीगरी), रस्ता चुकणें, शहराच्या गर्दींत भांबावणें, जवळ वस्तु असतां ती हरवल्याच्या कल्पनेनें धुंडाळणें, स्वदुःख पाहून घाबरणें, वृक्षकाष्ठ दिसतांच त्याला भूत समजणें, इत्यादि भ्रमाच्या मालिकेंत बुद्धि-प्रामाण्याच्या दृष्टीनें महत्त्वाचे वाटणारे समर्थनिर्दिष्ट भ्रम दुश्चिन्हें, अपशकुन, मेलें

माणुस भोजना येतें, या जन्माच्या सुकृताचें फळ पुढील जन्मीं मिळण्याची आशा, आतां द्यावें पुढें घ्यावें अशी वासना, मेलें माणुस स्वप्नांत येऊन कांहीं मागतें हा विश्वास, 'ब्रह्मा लिहितो अदृष्टीं। आणि वाचून जाते सटी। ३४' इत्यादि आहेत. देहाभिमान, कर्माभिमान, जात्यभिमान, कुळाभिमान, ज्ञानाभिमान, मोक्षाभिमान या विविध अभिमानांना समर्थांनीं भ्रमांच्या दावणींत बांधलें आहे (२९). भ्रमांची यादी सांगतांना समर्थांच्या वाणींतून 'गत ज्ञात्याचे चमत्कार। या नांव भ्रम ॥ ३७' असे शब्द बाहेर पडले; व शंका निघाली कीं, अशा ज्ञात्यांच्या समाधीची पूजा करतात व अनुभव येतो तें खोटें म्हणावें लागेल. या शंकेचा निरास पुढल्या समासांत आहे.

**सातवा** समास 'सगुणभजननिरूपणा'चा आहे. ज्ञाते पुरुष मरून गेल्यावर त्याचें सामर्थ्य अनुभवास येतें. याचें रहस्य त्यांनीं कमावलेल्या पुण्याईचा विचार केल्यास उमगतें. भजन हा पुण्यसंपादनाचा उपाय असल्यामुळें त्याचेंच पुष्कळसें विवेचन या समासांत आहे. 'सगुणभजननिरूपण' या समासनामाची उपपत्ति अशा रीतीनें लागते.

ज्ञात्यांच्या मरणोत्तर सामर्थ्याविषयीं श्रोत्यांची खात्री पटवितांना ज्यांना आज लोकभ्रम म्हणतां येईल व पूर्वींच्या समासांत ज्या गोष्टींची समर्थांनीं 'भ्रम' या शब्दानें वासलात केली आहे, त्या सारख्याच गोष्टी आधारास त्यांनीं घेतलेल्या आहेत. ज्ञाते पुरुष जीवंत असतांना होणाऱ्या चमत्कारांत 'तो तरी आपण नाहीं गेला। लोकीं प्रत्यक्ष देखिला। ६' हा चमत्कार दाखल केला आहे. आपल्याला रुचणाऱ्या गोष्टी स्वप्नांत दिसतात, त्यांतलाच गत किंवा विद्यमान ज्ञात्यांच्या चमत्काराचा प्रकार समजावा, 'हा लोकांचा भावार्थ। भाविकां देव येथार्थ। ७'. ज्ञात्यांचा चमत्कार हा भाविकांचा भावार्थ मानून निर्वाह करावा. ज्ञानी मुक्त होऊन गेले, त्यांचें सामर्थ्य मागें चालतें, 'कां जे पुण्यमार्गें चालिले। म्हणोनियां ॥ ११'. हें मनांत वागवून पुण्यमार्गानें चालावें, देवाचें भजन वाढवावें, न्याय सोडूं नये. पुरश्चरणें करावीं, तीर्थाटणें फिरावीं, वैराग्यबळानें नाना सामर्थ्यें वाढवावीं. ब्रह्मविषयक निश्चय असेल तर वाममार्गहि सामर्थ्य देतो. मात्र एकांत (एकाग्रता) मोडणार नाहीं, अशी काळजी घ्यावी. 'येक गुरु येक देव। कोठें तरी असावा भाव। भावार्थ नस्तां वाव। सर्व

कांहीं ।। १५’. निर्गुणाचें ज्ञान झाल्याच्या भरंवशानें सगुणाची उपेक्षा केल्यास दोन्हीकडून नागवण भोगण्याचा प्रसंग येतो. भक्ति नाहीं, ज्ञान नाहीं; मध्येंच केवळ अभिमान मात्र बळावतो; यासाठीं जप, ध्यान अखंड चालू पाहिजे. जो सगुण भजन टाळतो तो ज्ञाता असला तरी अपेशीच समजावा लागतो. सगुण भजन निष्काम हवें. त्या योगानें भगवंत लाभतो. सकाम भजनाचीं फळें देव देतो, पण कामनेच्या सिद्धीमागें लागल्यास देव अंतरतो. उलट निष्काम भजनाचा परिणाम पाहिल्यास ‘भक्तें जें मनीं धरावें ! तें देवें आपण चि करावें । तेथें वेगळें भावावें । नलगे कदा ।। २३’. देवभक्तांचीं सामर्थ्यें एकवटलीं तर तीं काळालासुद्धां भारी होतात. निष्काम भजन, त्यांत भरीला ब्रह्मज्ञान असा योग साधला तर त्याच्या तुलनेला त्रिभुवन पुरणार नाहीं. निरूपण, हरिकथा, शुचिर्भूत राहणी, निश्चयाचें अढळ समाधान, न्यायान्यायपरीक्षा, सारासारविवेक या गुणांच्या प्रसन्नतेनें ईश्वर बुद्धि देतो व ती चळणारी नसते. सारांश, सगुण भजन, त्यांत पुनः ब्रह्मज्ञान, अनुभवाचें समाधान यांचा एकत्र वास जगांत दुर्लभ आहे.

**आठवा** समास ‘प्रचीतनिरूपणा’चा म्हणजे प्रत्यक्ष अनुभवाच्या माहात्म्याचा आहे. ‘प्रचित पाहेल तें शहाणें । १’ या सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ सुरवातीस व्यवहारांतील उदाहरणें घेऊन त्याच कसोटीनें परमार्थविषयाचें ग्रहण करायला सांगितलें आहे. नाणीं, रत्नें, जनावरें, धान्यें, औषधें यांची आधीं परीक्षा करून मग त्यांचा स्वीकार वा त्याग करण्याची माणसांची रीत आहे. परीक्षेचें साधन प्रचीतीखेरीज दुसरें नाहीं. नुसत्या अनुमानावर विसंबल्यास तोंडघशीं पडण्याची पाळी येते. ‘म्हणोनी अनुमानाचें कार्य । भल्यानीं कदापि करूं नये । ९’. यापुढें आणखी विनपरीक्षेच्या अपघाताचीं उदाहरणें आहेत. परमार्थसुद्धां इतर व्यवहारांतल्याप्रमाणें अनुभवाच्या कसोटीवर उतरल्यास घ्यावा. पाप ओसरलें, जन्मयातना चुकली ‘ऐसी स्वयें प्रचीत आली । म्हणिजे बरें ।। २१’. परमेश्वर ओळखला, आपण कोण तें कळलें, याउपर ‘आत्मनिवेदन जालें । म्हणिजे बरें ।। २२’. ब्रह्मांड कोणीं कशाचें उभारलें, याच्या यथार्थ ज्ञानानें ‘मुख्य कर्त्यास वोळखिलें । म्हणिजे बरें ।। २३’. या संबंधांत जर अनुमानच कायम राहिलें तर सारा केला परमार्थ वाया जातो. हें परमार्थाचें वर्म लटकें म्हणेल तो अधम आणि लटकें मानील तो अधमाधम, असें येथें समर्थांनीं निकराचे शब्द उच्चारून ‘मी जें सांगतों तें

असत्य नाहीं, याचा साक्षी हे सर्वोत्तमा तूं आहेस' असा देवास कौल लावला आहे (२६). समर्थ पुढें कळवळ्यानें म्हणतात : 'ज्ञान सांगावें हीच तर माझ्या उपासनेची थोरवी आहे. मी खोटें बोलेन तर त्याचा दोष प्रभूस लागेल. म्हणून कर्त्यास ओळखलें पाहिजे, मायोद्भवाचें मूळ पाहिलें पाहिजे इत्यादि जें कांहीं सत्य तेंच येथें बोललों आहे' (२७–२८). नंतर एकच विचार पुनः पुनः कां सांगावा लागतो याचीं कारणें दिलीं आहेत. निरूपण सूक्ष्म असेल तर पुनरुक्ति करणें भाग पडतें. 'श्रोत्यांस पाहिजे उमजलें । म्हणौनियां ॥ ३०'. अनुभवापुढें—प्रचीतीपुढें—परिपाठाचें, लोकप्रवादाचें बळ लटपटतें. 'म्हणोनि हे खटपट । करणें लागे ॥ ३१'. प्रचीतीनें परिपाठाला धक्का बसतो तर परिपाठाला चिकटून राहिल्यास प्रचीतीचें समाधान दुरावतें; 'ऐसी सांकडी दोहींकडे । म्हणौन बोलिलें चि बोलणें घडे । ३३'. समर्थांचा विश्वास असा कीं, 'परिपाठ आणि प्रचित प्रमाण । दोनी राखोन निरूपण ॥ ३४' करतां येतें.

**नववा** समास 'पुरुषप्रकृति'विवेचनाचा हें या दशकाच्या प्रारंभीं सांगितलें आहे. आकाशांतील वायूप्रमाणें ब्रह्मांत मूळ माया जन्मास येते. बीजरूप मूळ माया पुढें विस्तार पावते. मूळ मायेचे घटक दोन. एक वायु व दुसरा जाणीवकळा—जगज्जोतीचा जिव्हाळा. 'निश्चळीं जे चंचळ स्थिती । तो चि वायो ॥ ४'. मूळ मायेला पुरुष-प्रकृति हें नांव आहे. वायु ही प्रकृति व पुरुष ही जगज्जोती. पुरुष-प्रकृति व शिव-शक्ति हीं एकच. वायु ही शक्ति आणि जाणीव हा ईश्वर मिळून अर्धनारीनटेश्वर. वायूंतली जाणीव हें ईश्वराचें लक्षण असून त्यापासून त्रिगुण झाले. (हा विचार मागें १०:४:१६ मध्यें आलेला आहे.) निखळ जाणीव तो सत्त्वगुण, त्याचा देहधारी विष्णु आणि त्याच्या अंशानें जग चालतें याला भ ग व द्‌ गी तेचा आधार आहे (१०:४२). सर्व प्राण्यांच्या ठिकाणीं जाणीव वाटली गेली असून तिच्या योगानें 'जाणजाणों वांचविली । सर्वत्र काया ॥ १४'. प्राण्यांच्या जीवंतपणाचें कारण ही जगज्जोती आहे. (हें विवेचन प्रस्तुत दशकाच्या पहिल्या समासांत जसेंच्या तसें, एकदोन जागीं शब्दशः, आलेलें आहे.) 'आवघ्या जगास वांचविती । म्हणोनि नामें जगज्जोती । १८'. ती गेली कीं प्राणी जिथल्या तिथें मरून जातात. देवदेवता, देवतें, भुतें यांना खोटें मानूं नये. हीं अज्ञान्याला पिडतात; ज्ञात्याला कसलाच संकल्प नसल्यानें तीं ज्ञात्याच्या वाटेस जात नाहींत. आत्मज्ञानानें कर्माचें खंडन

घडतें. ज्ञानप्राप्तीला सद्गुरु पाहिजे. सद्गुरु करावा, सत्संग शोधावा, अंतर्यामीं तत्त्वविचार विवरावा. 'तत्वें तत्व निरसोन जातां । आपला आपण चि तत्वता । अनन्य भावें सार्थकता । सहज चि जाली ।। २६'. विचार करायला शिकलें पाहिजे. 'विचार पाहेल तो पुरुषु । विचार न पाहे तो पशु ।। २८'. असें ईश्वरानें जागजागीं बजावलें आहे. सिद्धांताकरितां पूर्वपक्ष उडवावा लागतो. पण साधकाला निरूपणानें साक्षात्कार होतो. सायास नको असतील तर 'श्रवण मनन निजध्यास । प्रचितीनें बाणतां विश्वास । रोकडा साक्षात्कार सायास । करणें चि नलगे ।। ३०'.

**दहावा** समास 'चळाचळनिरूपणा'चा आहे. यांत सृष्टीच्या रचनेंतील चल तत्त्वें कोणतीं व अचल तत्त्व कोणतें याची मीमांसा आहे. विषय ब्रह्ममायेचा असल्यानें प्रथम ब्रह्माचा, नंतर त्यांत उत्पन्न झालेल्या चंचलत्वाचा, याप्रमाणें मुख्य गोष्टींचें विवेचन झाल्यावर समर्थ देवाच्या नानाविध नांवांकडे वळले आहेत. मूळमाया, मूळ प्रकृति, मूळ पुरुष, शिवशक्ति अशीं कितीतरी नांवें आहेत. परंतु ज्याला नांव दिलें त्याला आधीं ओळखणें अवश्य आहे. 'रूपाची न धरितां सोये । नामासरिसें भरंगळों नये । ९'. निश्चळांतील जें चळण तें इच्छा, स्फूर्ति, स्फुरण होय. अहंपणाची जी जाणीव तिला मूळ प्रकृति म्हणतात. ब्रह्मांडाची महाकारण काया पण तीच. ती अव्याकृत असल्यानें महामाया, मूळ प्रकृति, सूक्ष्म, हिरण्यगर्भ अशीं तिचीं आणखीं नांवें आहेत. विराट ही स्थूलाची संज्ञा आहे. याप्रमाणें विस्तार झाला तरी जाणीव ही मूळ माया याचा विसर पडूं देऊं नये. पुढें देवाच्या स्त्री-पुरुषवाचक व नपुंसकवाचक नांवांची यादी देऊन कुठें कुठें एखाद्या नांवाचें स्पष्टीकरण केलेलें आहे. 'सर्व लोकांचें अंतर । तो सर्वांतरात्मा बोलिजे ।। २०'. चंद्र, सूर्य, तारामंडल, मेघमंडल, भूमंडल, 'येकवीस स्वर्गें सप्त पाताळें । अंतरात्मा च वर्तवी ।। २१'. अंतरात्म्याचें हें स्पष्टीकरण येथें मुद्दाम नमूद केलें आहे. अंतरात्मा हा जगज्जोतीसारखाच समर्थांच्या शब्दभांडारांतला एक विशेष शब्द आहे. पुढें दासबोधांत व इतर स्फुट प्रकरणांतून तो आपल्या कर्तृत्वाच्या पसाऱ्यानिशीं भेटतो. नांवें उदंड असलीं तरी जगज्जोती, सर्वांतरात्मा, आत्मा, सर्वज्ञपण हीं सारीं एकाचींच नांवें आहेत. ३५–४४ ओव्यांत अंतरात्म्याची लीला वर्णिलेली आहे. 'तो कळतो परी दिसेना । प्रचित येते परी भासेना । शरीरीं असे परी वसेना । येके ठाईं ।। ३७'. त्याची गति वायूपेक्षां चंचल आहे. पाहणें, चालणें, ऐकणें, वास घेणें, शीतोष्ण

जाणणें, हे सगळे खेळ त्याचे. 'सकळामधें परी निराळा।', त्याची लीला तोच जाणे (४२). स्त्रीपुरुषनपुंसकांचा देहधारी असूनसुद्धां स्त्रीपुरुषनपुंसकत्व त्याच्या ठिकाणीं आढळणार नाहीं. क्षेत्रज्ञ, क्षेत्रवासी, देही कूटस्थ असें त्याविषयीं म्हणतात. येथें गीतेचा 'द्वाविमौ पुरुषौ लोके' हा संपूर्ण श्लोक कूटस्थ शब्दाच्या अनुरोधानें घेतलेला आहे. 'उत्तमः पुरुषस्त्वन्यः' याचें भाषांतर 'उत्तम पुरुष तो आणीक' या ओवींत आलें आहे (४६). चारी देह निरसून साधकानें देहातीत व्हावें. मग तो अनन्य भक्त झाला. देहमात्राचें निरसन झाल्यावर अंतरात्मा उरत नाहीं. निश्चळ काय तें एक परब्रह्म असून बाकीचें सर्व चंचळ हें मायिक असल्याचा निश्चय विवेकानें करावा. साहजिकच मग जें असार असेल तें टाकून देणें प्राप्त आहे. जेथें ज्ञानाचें विज्ञान आणि मनाचें उन्मन झालें तेथें आत्म्याच्या ठिकाणीं चंचलत्व राहणार कसें ? कोणी ग्रह करून घेतील कीं, हें सांगोवांगीचें काम आहे, तर ती त्यांची चूक ठरेल. येथें जें सांगितलें त्याचा अनुभव घ्यावा. अनुभवाखेरीज जे श्रम ते पापरूप ठरतात. 'सत्यायेवढें सुकृत नाहीं। असत्यायेवढें पाप नाहीं। प्रचितीविण कोठें चि नाहीं। समाधान॥ ५४'. स्वरूप हें सत्य; जेवढी माया तेवढें असत्य, अशी सत्यासत्याची दुसरी व्याख्या आहे. 'दृश्य पाप वोसरलें। पुण्य परब्रह्म उरलें। ५६'. आपण स्वतःसिद्ध वस्तु (ब्रह्म) आहों, आपला देहाशीं कांहीं संबंध नाहीं, अशा निश्चयाचें जीवन सुरू झालें कीं पाप संपलें. ब्रह्मज्ञानाखेरीज इतर सगळीं साधनें निष्फळ आहेत. मुंडन, दंडन, खंडन, मातीनें आंग घासून काढणें, देहावर मुद्रांचे ठसे उठविणें, शेण खाणें, गोमूत्र पिणें, काष्ठमण्यांच्या वा रुद्राक्षांच्या माळा धारण करणें, इत्यादि प्रकार हे बाह्यवेष असून त्या योगानें अंतरंगाच्या दोषांचें निर्मूलन होत नाहीं. 'त्या दोषाच्या दहनाला। आत्मज्ञान पाहिजे ॥ ६३'. नंतर आत्मज्ञान, ज्ञानी, अनुभव यांची प्रशंसा गाऊन शेवटीं समर्थ अनुभवी लोकांना हाक देऊन म्हणतात : 'आगा ये प्रचितीचे लोक हो। प्रचित नस्तां अवघा शोक हो। रघुनाथकृपेनें राहो। प्रत्यय निश्चयाचा ॥ ६८'.

पूर्वीच्या व प्रस्तुत समासांतून जगज्जोती व अंतरात्मा हे शब्द व त्यांचें कांहीं व्याख्यान आलेलें असल्यामुळें त्याविषयीं थोडी अधिक माहिती येथें सादर करण्याला हरकत नाहीं. श्री राम दा सां ची क वि ता, प्रथम खंड या पुस्तकांत 'पंचीकरणयोग' या नांवाचें एक स्फुट प्रकरण आहे. त्याच्या तिसऱ्या योगांत (पान ३२१–३२२)

अंतरात्म्याचें वर्णन आहे. तेथें अंतःकरण–विष्णु, मन–चंद्रमा, बुद्धि–ब्रह्मा इत्यादिकांसह अंतरात्मा आढळतो. अंतरात्मा व आकाश हीं एकच असें या प्रकरणांत म्हटलें आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश हें पांचवें भूत –'अंतरात्माचि पांचवें। १८'. 'महद्भूत अंतरात्मा। मुळींची जाणती कळा। १९' असा त्याचा आणखी खुलासा आहे. त्याच पुस्तकांतील 'मानपंचक' प्रकरणांत (पान ३३८) अंतरात्म्याचा निर्देश आहे. 'पंचमान' प्रकरणांत प्रारंभीं वायूची प्रशंसा असून 'जगजोती' व 'अंतरात्मा' हे शब्द त्यांच्या व्याख्येसह आढळतात (पान ३४७). स्फुट प्रकरणें क्रमांक १६, १८, ४० यांमध्यें अंतरात्मा आपल्या कर्तृत्वाच्या कांहीं दाखल्यासह भेटतो. स स स मा सीच्या पहिल्या व पांचव्या समासांत अनुक्रमें ज्ञान हा 'अंतरात्म्याचा प्रकाश' व 'आत्मा अंतरात्म्यास म्हणती' असें म्हटलें आहे. अंतरीं स्फुरणाऱ्या ज्ञानाची ज्योत दिसत नाहीं, पण तिला जगजोती म्हणतात असा विषय आहे (श्री राम दा सां ची क वि ता, द्वितीय खंड, पान ७४ व ८९). श्री स म र्थ कृ त क रु णा ष्ट कें वगैरे या पुस्तकांत 'जगज्जोति' (पान ३), 'परी अंतरात्मा चि नाना विकारी' (पान ५६) व 'मोठा चितारी' (पान ५८) या कविता समर्थांच्या आवडत्या विषयांपैकीं वरील दोन विषय असल्याचें दर्शवितात. समर्थकृत प द प दां त रें यांतहि 'अंतरात्मा' (पान १०२) आलेला आहे.

## • ११ •

या दशकाला 'भीमदशक' असें नांव आहे व त्याचा संबंध संख्येशीं असून विषयाशीं नाहीं. समर्थांना अकरा हा आंकडा प्रिय होता. हा दशक अकरावा एवढ्याकरितां या दशकाला 'भीम' हें नांव पडलें, हा सांप्रदायिकांचा तर्क मान्य होण्यासारखा आहे.

**पहिला** समास 'सिद्धांतनिरूपण' असा आहे. मागील दशकांचे कांहीं विषय यांत पुनः विवरून पक्के केले आहेत. विषय पूर्वींचे असले तरी त्यांच्या स्पष्टीकरणांत थोडा निराळेपणा असल्यामुळें या समासाचा वीसदशकी दा स बो धरचनेंत संग्रह झाला. सुरवातीस आकाश, वायु इत्यादि पंचभूतांची माहिती आहे. आकाशापासून वायु प्रगटल्यावर त्याची जी कठिण घिसणी तिनें अग्नीला जन्म दिला. वायूं-

तील मंद अंशापासून पाणी झालें. पाण्यापासून पृथ्वी आणि पृथ्वी हें नानाविध बीजांचें माहेर असल्यानें तिच्यांतून नानाविध उत्पत्ति व्हावी हें स्वाभाविक आहे. तथापि ही सारी कल्पनाच समजावी लागते. मात्र या कल्पनेचा उगम मूळमाया असल्याचें विसरू नये. प्रस्तुत कल्पनेंतून देवत्रयांना देह मिळाले. निश्चळामध्यें चंचल हीसुद्धां कल्पनाच. अष्टधा प्रकृति ही कल्पना असल्याचें निराळें सांगायला नको. पांच भूतें व तीन गुण म्हणजे अष्टधा प्रकृति. सूक्ष्म मूळ मायेच्या जड स्थूलावताराला सृष्टि म्हणतात. तिच्यांतून चार खाणी (जारज, अंडज इत्यादि), चार वाणी (परा, पश्यंती इत्यादि), नाना योनि, नाना व्यक्ति पुढें आल्या. हा इतिहास सृष्टीच्या उभारणीचा आहे असें सांगून मग संहारणीचा वृत्तांत आलेला आहे (१३-१८). त्यामध्यें ‘ विवेकप्रलय ’ घातला आहे. सृष्टींतील कर्तेपणा चंचलाकडे असून त्या चंचल कर्तृत्वाचें वर्णन १९-२९ इतक्या ओव्यांत असून ‘ विद्याविनयसंपन्ने–’ (गीता ५:१८) या श्लोकाच्या आधारें जगज्जोतीचा निर्देश केलेला आहे व तो कांहींसा चिंत्य आहे. श्लोकांतील ‘ समदर्शी ’ हा शब्द प्राणिमात्रांचें अंतर एक असें सुचविणारा नाहीं. पण समर्थांनीं तसा अर्थ स्वीकारला आहे. पंडित लोक देहाऐवजीं त्यांतील तत्त्व पाहून समदर्शी होतात असेंहि म्हटलें आहे. सर्व प्राण्यांच्या वागणुकीची जी एक कला ती ‘ जाणती ’ असल्यामुळें ‘ जगज्जोती ’ असें नांव तिला प्राप्त झालें आहे. २९ व्या ओवींत ‘ अंतरात्मा ’ दिसतो. १०:१० येथील ३५-४५ ओव्यांमध्यें केलेल्या वर्णनाशीं येथील वर्णनाचें सादृश्य पाहण्यासारखें आहे. अंतरात्मा म्हणजे परब्रह्म नव्हे (३१). नंतर चार तऱ्हेचे जीव निदर्शनास आणले आहेत. ‘ जातो जीव तो प्राण । नेणे जीव तो अज्ञान । जन्मतो जीव तो जाण । वासनात्मक ॥ ३४ ’. चौथा जीव ब्रह्मांश. हें सारें चंचल नाशवंत आहे. जीवाची उपाधि गेली कीं तो शिवाशीं एकरूप होतो. निवृत्तीची, निर्गुणाची प्राप्ति विवेकानें होते. श्रवणाहून मनन श्रेष्ठ; मननानें सारासार कळतें. त्याहून निदिध्यास श्रेष्ठ, कारण त्यानें साक्षात्कारच घडतो. ‘ निर्गुणीं जे अनन्यता । ते चि मुक्ति सायोज्यता । ४२ ’. मायिक उपाधीच्या गराड्यांत पूर्ण अलिप्तत्व ही सहजसमाधि (४३).

**दुसरा** समास ‘ चत्वार देव ’ या नांवाचा आहे. प्रतिमा, अवतार, अंतरात्मा व निर्विकारी याप्रमाणें देवांचे चार प्रकार आहेत त्यांचीं नांवें ३४ व्या

ओवींत असून तोंवर देवासंबंधांतील गोंधळाची माहिती सांगितली आहे व ती समर्थकालीन देवाधर्मांचें अराजक समजावून घेण्याला उपयोगी आहे. आरंभाला निश्चल-चंचलाचें सूत्र मांडलें असून 'चंचळीं गुंतले सकळ । १' परंतु 'निश्चळ तें निश्चळ । जैसें तैसें ।।१'. निश्चलाकडे लक्ष देणारा लाखांत एखादा. निश्चलाची बडबड करणारे पुष्कळ, परंतु पुनः ते चंचलांत शिरतात. चंचलाचा वेढा फोडून पार जाणारे विरळा. चंचलांत जन्म, जन्मलें तेंहि चंचल, चंचलांतच त्याचें वास्तव्य, यामुळें चंचलाच्या गुंतागुंतींतून सुटणें फार कठिण आहे. नित्यानित्यविवेकानें कांहीं समजतें, पण तें ज्ञान फार वेळ टिकत नाहीं. चंचलांत संदेह, अनुमान, भ्रमादिकांच्या प्राबल्यामुळें श्रम होतात. मात्र हातीं कांहीं लागत नाहीं. चंचल तेवढें मायिक समजावें. अनेक शरीरें, त्यांचीं अनेक नांवें, नाना भाषा, नाना दंडक, नाना रीति, नाना आचार, नाना मतें, तशींच बहुविध पाखंडें, यांच्या गर्दीत 'जैसा प्रवाह पडिला । तैसा च लोक चालिला । कोण वारील कोणाला । येक नाहीं ।। १७'. देव तरी थोडे आहेत का ? तेदेखील असंख्य आहेत. 'भूतादेवतांचें थोतांड । येक चि जालें ।। २०'. कुणालाच सारासार कळत नाहीं. शास्त्रांचा बाजार भरला असून देवांचा गलबला माजलेला दिसतो. लोक कामनेच्या व्रतांमध्यें गर्क आहेत. मतांचासुद्धां गलबला सुरू असून 'जो जे मतीं सांपडला । तयास तें चि थोर ।। २५'. ज्ञात्याला मात्र लोकांचा व्यवहार स्पष्ट कळतो. प्रतिमा, अवतार, अंतरात्मा असे लोकांचे त्रिविध देव आहेत. कांहीं थोडे या चंचल देवांना सोडून निर्मळ निश्चळ देवाशीं एकरूप झालेले आढळतात. 'जो निर्मळास ध्याईल । तो निर्मळ चि होईल ।' कारण 'यो यच्छ्रद्धः स एव सः' या न्यायानें 'जो जयास भजेल । तो तद्रूप जाणावा ।। ३७'. निश्चळाच्या उपासनेनें निश्चलत्वाशीं एकरूप होतां आलें तरी प्रकृति सुटत नाहीं. म्हणून 'प्रकृतीसारिखें चालावें । परी अंतरीं शाश्वत वोळखावें । सत्य होऊन वर्तावें । लोकांऐसें ।। ४०'. असा उपदेश शेवटच्या ओवींत आहे.

**तिसरा** समास दिनचर्येचा असून त्याला 'सिकवण' असें नांव दिलेलें आहे. ही दिनचर्या प्रामुख्यानें ब्राह्मणाची आहे. नरदेह मिळाला तेव्हां त्याचा नीतिन्यायानें वागून सदुपयोग करावा. प्रपंच नेमक (माफक, जेवढ्यास तेवढा) करावा, परमार्थ विवेक पहावा, म्हणजे उभय लोक सफळ होतात. शंभर वर्षांचें आयुष्य: त्यांतलें

बालपण अज्ञानांत गेलें, तारुण्य विषयसुखांत गडप झालें, वृद्धपणाचा रोगांनीं स्वाहाकार केला. सारांश, भगवंताकडे लक्ष देण्याला फावलेंच नाहीं. 'राजिक'(राज्यकार-भारांतून उद्भवणाऱ्या) तशाच देविक चिंता, अन्न-वस्त्र-देहममता, यांच्या ओढा-ताणींत ध्यानीं मनीं नसतां आयुष्य निघून जातें. सभोंवतीं माणसें मरतांना दिसतात. वडील माणसें मरून गेल्याचा अनुभव असतो, पण मनावर कांहीं इष्ट परिणाम नाहीं. घर आगीनें पेटलें असतां खुशाल घोरत पडण्यासारखा हा आत्मघातकी प्रकार आहे. पापाचा सुकाळ, पुण्याचा दुष्काळ ही स्थिति ओळखून माणसानें सावध व्हावें, आळस झाडावा आणि उद्योगास लागावें. समर्थांचा आळसावरील रोष दोन तीन ओव्यांत प्रगटला आहे. आळसाचा परिणाम काय तर जांभया व झोप. आळश्यांना झोपेचें अति प्रेम. 'आळस उदास नागवणा। आळस प्रेत्न बुडवणा। आळसें करंटपणाच्या खुणा। प्रगट होती ॥ १२'. उद्योग करतांना कष्ट झाले तरी 'खाती जेविती सुखी होती। येत्नेंकरूनी ॥ ११'. आळस टाकून उद्योग केल्यानें वैभव मिळतें हें खरें, पण उद्योगाचें स्वरूप काय, या प्रश्नाचें उत्तर प्रस्तुत समासाच्या उत्तरार्धांत आहे. प्रातःकाळीं उठावें, कांहीं पाठांतर करावें, देवाला स्मरावें, मग दिशेकडे जावें (जे कोणासि च नव्हे ठावें), स्वच्छ पाण्यानें शौच आचमन करावें; मुखमार्जन, प्रातःस्नान, संध्या, तर्पण, देवतार्चन, वैश्वदेव इत्यादि आन्हिकें यथासांग उरकून फलाहार घ्यावा आणि नंतर संसारधंद्यांत लक्ष घालावें; गोड बोलून लोक राजी राखावे, 'ज्या ज्याचा जो व्यापार। तेथें असावें खबर्दार। १९', नाहींतर एखादें पोर देखील नागवून जाईल. चुकणें, फसणें, विसरणें, हरवणें, आठवण झाल्यास चडफडणें असा दुश्चीतपणा आळसापोटीं अनुभवास येतो. याकरितां मन सावध एकाग्र ठेवावें. 'तरी मग जेवितां भोजन। गोड वाटे ॥ २१'. भोजन झाल्यावर 'कांहीं वाचीं चर्चा करी। येकान्तीं जाऊन विवरी। नाना ग्रंथ ॥ २२'. असें केल्याखेरीज माणूस शहाणा होत नाहीं. येथें 'सदेवपण' हा शब्द आला असून सदेवपणाचे गुण सांगितले आहेत. 'रिकामा जाऊं नेदी येक क्षण' हें त्याचें पहिलें लक्षण आहे. प्रपंच-व्यवसायाचें ज्ञान चांगलें पाहिजे; कांहीं मिळवून मग जेवावें, अडचणींत सांपडलेल्या लोकांना सोडवावें; शरीर कारणीं लावावें. धर्मचर्चा, पुराण, हरिकथानिरूपण या कर्तव्यांबरोबरच पुनः एकदां 'वायां जाऊं नेदी क्षण। २६' हें कर्तव्य घेतलें आहे. जो सर्व सावध त्याला कधीं खेदाचा

धनी व्हावें लागत नाहीं. विवेकानें देहबुद्धीचा संबंध तोडावा. जें आहे तें सर्व देवाचें अशा निश्चयाचें वर्तन असेल तर उद्वेगाचें नांव काढायला नको. याच संदर्भांत 'प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थीं पंचिकर्ण ।२९' हें प्रसिद्ध वाक्य आलें आहे. परमार्थाचें जें कोणतें साधन असेल त्याचें सदैव श्रवण करावें.

**चौथा** समास 'सारविवेकनिरूपणा'चा आहे. ब्रह्म आणि अंतरात्मा यांपैकीं ब्रह्म हें सार असल्यानें त्याचा विवेक या समासांत प्रतिपादिलेला आहे. आकाशाच्या सादृश्यानें ब्रह्माचें रूप दाखवून 'अंतरात्मा' चंचल स्वभावाचा याची वाच्यता केली आहे. अंतरात्मा हा देव सगळें विश्व चालवितो. विश्वांतच माणसाचे व्यवहार आले. परमार्थ समजायला अंतरात्म्याचा उपयोग होतो. खरा देव अंतरात्म्या-पलीकडचा असून तो निर्विकार, निश्चळ आहे. पंचीकरण महावाक्याच्या असंदिग्ध ज्ञानानें परमार्थ साधतो. उत्पत्ति-स्थिति-संहाराच्या पलीकडील देव आकलन होण्याला सारासार विचार हा उपाय आहे. त्याची कांस धरली म्हणजे 'जो येक चि विस्तारला । तो अंतरात्मा बोलिला । नाना विकारीं विकारला । निर्विकारी नव्हे ॥ १५' याचा उमज पडतो. न्यायनीतीच्या अभावाला देखील लोक सार म्हणतात. सोनें, धोंडा, अन्न, माती यांतील भेद जर कळतो तर इतर बाबतींत सगळेंच सार असें मानण्याचा बाष्कळपणा कशाला करावा ? 'सगट सारिखा स्वभाव । लौंदपणाचा ॥ २३'. 'उंचनीच वोळखावें । या नांव ज्ञान ॥ २४'. सारासारज्ञ यथेच्छ लाभ करून घेतात आणि करंटे फसवणुकीपायीं दिवाळखोर बनतात. 'जाणत्यानें ऐसें न करावें । सार तें चि शोधून घ्यावें । २६', पण 'जेहिं जैसें संचित केलें । तयास तैसें चि घडलें । जें अभ्यासीं पडोन जडलें । तें तों सुटेना ॥ २८' हेंदेखील खरें आहे. सारांश, विवेकरहित बोलणें हा निवळ शीण असल्यामुळें प्रत्येकानें श्रवण-मनन 'केलें चि करावें ॥ ३०'.

**पांचवा** समास 'राजकारण' नांवाचा आहे. त्याचा तपशील पाहिल्यानें 'राजकारण' शब्दाचा अर्थ विशद होईल. एकच विषय पुनः पुनः सांगावा लागतो 'कां जें विघडलें चि घडलें । पाहिजे समाधान ॥ २'. समुदाय अनन्य रहावा व इतरांना भाव उपजावा, असा उपायाचा अभिप्राय आहे. १ हरिकथानिरूपण, २ राजकारण, ३ सर्व विषयीं सावधपण, ४ साक्षेप येथवर कर्तव्यांचा क्रम आहे.

नंतर क्रमसंख्या सोडून कर्तव्यें मांडलीं आहेत. नाना आक्षेपांचें निरसन, ल्हान-मोठ्या अन्यायासंबंधांत क्षमावृत्ति, दुसऱ्याचें हृद्गत ओळखणें, निरंतर उदासीनता, नीतिन्यायाला बाधा होऊं न देणें, यांच्यापुढें संकेतें लोक वेधावा, येकून येक बोधावा, यथाशक्ति प्रपंच सावरावा, प्रपंचसमय ओळखावा, धीर बहुत असावा, अति-परिचयाचा संबंध टाळावा, उपाधीसी विस्तारावें पण उपाधींत न सांपडावें, नीचत्व आणि मूर्खपण आधींच घ्यावे, दोष पाहून झांकावे, अवगुण न बोलावे, दुर्जन पकडून उपकार करून सोडावे, तऱ्हेवाईकपणानें (एककल्लीपणानें) भरंगळूं नये, नाना उपाय सुचावे, दीर्घ प्रयत्नानें अवघड काम करून दाखवावें, फड नासूं देऊं नये, पडला प्रसंग सावरावा, कुणाशीं अतिवाद करूं नये, दुसऱ्याचें अभिष्ट जाणावें, बहुतांचें बहुत सोसावें, सोसेनासें झाल्यास दिगंतरीं निघून जावें, याप्रमाणें ५–१८ ओव्यांपर्यंत उपदेश असून १९ व्या ओवींत पुनः 'राजकारण' शब्द आलेला आहे. येथें 'राजकारण बहुत करावें । परंतु कळों च नेदावें' असें त्याचें पथ्य सांगितलें आहे. लोक पारखून सोडावे, 'राजकारणें अभिमान झाडावे' असें राजकारणाचें एक कार्य २० व्या ओवींत दाखविलें आहे. २२ व्या ओवींत दोनदां 'राजकारण' शब्दाला स्थान देण्यांत आलें आहे. राजकारण सांगायला असाधारण आहे. अंतःकरण सुचित असेल तर राजकारण जाणतां येतें, असा त्या ओवीचा अर्थ आहे. समर्थांचें अन्यत्र विस्तारानें व्यक्त झालेलें एक मनोगत येथें 'पाहातां तरी सांपडेना । कीर्ति करूं तरी राहेना । आलें वैभव अभिळासीना । कांहीं केल्या ॥ २४' या ओवींत उतरलेलें आहे. लोकहिताच्या उद्योगानें प्रख्यात व्हावे, पण लोकांच्या दृष्टीआड रहावें, तसेंच सर्वदा वैभवाविषयीं निरपेक्ष असावें, अशी वागणूक समर्थांना रुचत होती. शेवटीं एकाची पाठ राखणें व दुसरा डोळ्यांत सलणें या अतिरेकी वर्तनपद्धतीचा निर्देश करून 'ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । चातुर्याचीं ॥ २५' याप्रमाणें चातुर्य शब्द समारोपार्थ योजिला आहे. कळूं न देतां 'राजकारण बहुत करावें' याला शोभणारा भाव १७ व्या ओवींत आहे. कुणाला अपाय करायचा असेल तर त्याची वाच्यता न होऊं देतां त्याला तो परभारेंच अनुभवास आणून द्यावा, असा व्यवहार त्या ओवींत सांगितलेला आहे. पण ह्याबरोबरच हिरवटाला दूर ठेवावें, कचरटाशीं बोलूं नये व संबंध आलाच तर त्याला सोडून दूर एकीकडे (कुठें तरी) निघून जावें, हा उपदेश असल्याचें लक्षांत ठेवणें बरें.

'मुख्य हरिकथानिरूपण' येथपासून सुरू झालेली कर्तव्याची यादी आपला समुदाय अनन्य रहावा (मतमतांतराच्या प्रभावानें फुटूं नये), त्याचा कित्ता इतरांनीं गिरवावा (इतर जनास उपजे भाव) हें प्रयोजन समोर ठेवून सांगितलेली आहे. क्षमा, दया (परोपकार), शांति इत्यादि गुणांच्या जोडीनें राजकारण हा शब्द आल्यामुळें त्याचा अर्थ इतर गुणांच्या संदर्भानें लावला पाहिजे. शेवटीं 'चातुर्याचीं लक्षणें' हे शब्द असून ते बाकीच्या गुणांप्रमाणें राजकारण हें चातुर्याचेंच एक अंग असल्याचें समर्थ सुचवितात असें म्हणावें लागतें.

**सहावा** समास 'महंतलक्षणा'चा आहे. समर्थांनीं येथें एक आदर्श महंत दाखविलेला आहे. अगोदर शुद्ध व नीट लिहावें, लिहून शुद्धाशुद्ध तपासावें, नंतर शुद्ध वाचावें, वाचतांना चुका करूं नयेत, असा समासाचा प्रारंभ आहे. दुसऱ्या ओवींत तोच विषय घेतला आहे. विस्कळित अक्षरें नीट करावीं, इत्यादि. जी गोष्ट समजून घ्यावयाची असेल ती सांगतां येत नाहीं, जें सांगायचें तें पद्धतशीर सांगणें कठिण जातें, परंतु विषय समजलाच नाहीं तर ग्रहण कशाचें होणार? समजणें हें मुख्य वर्म आहे. पुनः मागील समासांतील हरिकथानिरूपण, राजकारण, वर्तायाचें लक्षण हीं कर्तव्यें आलेलीं आहेत. विचारणें, सांगणें, कांहीं निराळा अर्थ असेल तर तो आकलन करणें, सर्वांचें समाधान राखणें, दीर्घ सूचना (दूरदर्शीपणा), तर्क, जाण जाणून यथायोग्य असंदिग्ध अर्थाची संपन्नता, इत्यादि गुणांचा महंत बुद्धिवंत असतो; व तोच टिकतो. तो सभाचतुर, गायनवादनांत व काव्यरचनेंत निपुण, एकान्तप्रिय, विद्याव्यासंगी असा पाहिजे. 'आधीं च सिकोन जो सिकवी। तो चि पावे श्रेष्ठ पदवी। गुंतल्या लोकांस उगवी। विवेकबळें ॥ १०'. त्याचें अक्षर, वाचन, बोलणें, चालणें, भक्ति, ज्ञान, वैराग्य असें सर्व कांहीं सुंदर असतें, त्याला यत्नाची आवड असते, तो प्रसंगीं अघाडीस धावतो, धीटपणानें एकदां पुढें सरसावायचें व नंतर मागें हटून लपायचें असा त्याचा स्वभाव नसतो; तो अडचणीशीं योग्य प्रकारें झगडतो, उपाधींत मिसळून पुनः स्वतःचा अलिप्तपणा राखूं शकतो; तो सगळीकडे वावरतो, पण पाहूं गेल्यास सांपडत नाहीं, 'जैसा अन्तरात्मा ठाईंचा ठाईं। गुप्त जाला॥ १४'. अंतरात्म्याप्रमाणें गुप्त राहून लोकांना निरनिराळीं कामें करावयास लावणें ही 'जाणतेपणाची महंती' (१७) असें समर्थांनीं म्हटलें आहे. शेवटीं आपल्या उपास्य देवतेचें स्मरण करून समर्थांनीं आपला उद्गार ग्रथित केला आहे:

'ऐसा पुरुष धारणेचा । तो चि आधार बहुतांचा । दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ॥ १९'. समासाचें नांव 'महंतलक्षण' असून मधल्या विवेचनांतहि महंत, महंती हे शब्द असल्यामुळें समासाच्या नांवाला दुजोरा मिळतो. हरिकथानिरूपण व त्याच्या सोबतीचें राजकारण हीं महंताचीं लक्षणें आहेत, हा प्रस्तुत समासांतील विशेष लक्षांत ठेवला पाहिजे.

लिहिणें, वाचणें या कर्तव्यांचा खल समर्थांनीं अनेक स्थळीं केला आहे. सुंदर अक्षराचें लिहिणें तसेंच शुद्ध बिनचूक वाचणें यांवर समर्थांचा भर आहे. दासबोधाच्या प्रारंभीं मूर्ख लक्षणांत अशुद्ध किंवा असंबद्ध वाचण्याच्या दोषाचा निर्देश आहे. सुंदर शुद्ध लिहिण्यावाचण्याला आपल्या उपदेशांत बऱ्याच ठिकाणीं आद्यस्थान दिलेलें आहे. श्रीरामदासांची कविता प्रथम खंडांतील स्फुट प्रकरणें १,३,२३, २५,४० यांत लिहिण्या-वाचण्याविषयीं दासबोधांतल्याप्रमाणेंच वचनें आहेत. दासबोधांत पुढें हे विषय जास्त विस्तारानें आले आहेत.

**सातवा** समास 'चंचळनदीनिरूपणा'चा आहे. याच्या शेवटीं 'दास' हें समर्थांचें नांव आहे म्हणून तर्क करतां येतो कीं, हें प्रकरण एकदां स्वतंत्र लिहून ठेवलें होतें व नंतर त्याचा दासबोधांत समावेश करण्यांत आला. चंचल नदी, गुप्त गंगा हे शब्द ज्ञानेश्वरांच्या माया नदीला (ज्ञानेश्वरी अ. ७) व एकनाथांच्या कर्मनदीला (भागवत, ११) अनुसरून येथें योजलेले आहेत. ज्ञानेश्वर-एकनाथांचीं रूपकें जशींच्या तशीं न स्वीकारतां समर्थांनीं केवळ नदीच्या प्रवाहाचें वर्णन केलें आहे. प्रवाह आणि त्याच्या पोटीं किंवा आसपास असणाऱ्या गोष्टी समर्थांच्या वर्णनांत दिसतात. या प्रवाहांत पडलेल्या मानवी जीवांची दुर्दशा या वर्णनांत आहे. परंतु 'ब्रह्मादिकांचीं भुवनें । ब्रह्मांडदेवतांचीं स्थानें । ११' यावरून ज्ञानेश्वर-एकनाथांच्या कल्पनांचा सुगावा काढतां येतो. उगमापलीकडे जाऊन मागें पाहणारांना पाणी आटून जाण्याचा – न दिसण्याचा – अनुभव येतो. जे मला सर्व भावानें भजतात 'तयां ऐलीच थडी सरले । मायाजळ ॥ ९७' असें ज्ञानेश्वर म्हणतात (अ. ७). सगळे उपाय लाथाडून 'जो अति आवडीं भजे मातें । कर्मनदी त्यातें कोरडी ॥' (भागवत, ११:१०:७५) अशी एकनाथांची साक्ष आहे. समर्थांनीं या वचनांचा भावार्थ आपल्या वर्णनांत आणला आहे. या समासांतील बाकीचें वर्णन कुठल्याहि अपार व अगाध जलसंचयाला शोभणारें आहे.

**आठवा** समास ‘अंतरात्माविवरण’ असा आहे. नमनानें प्रारंभ हें स्वतंत्र प्रकरणाचें चिन्ह या समासांत आहे. सकल कर्ता, समस्त देवांचा जो भर्ता त्याचें भजन करा असें सांगून मग त्याच्या सकल कर्तृत्वाचा विचार आहे. तो गुप्तेश्वर आहे, त्याला ईश्वर म्हणावें, त्याला ज्यानें ओळखलें तो विश्वंभर होतो. समाधि, सहज स्थिति, हीं त्याच्या ओळखीपुढें फिकीं पडतात. पण साधारणपणें त्यांच्या अल्पस्वल्प परिचयानें समाधान पावणारेच फार. कितीहि ऐकलें, पाहिलें तरी अंतरात्म्याची समग्र ओळख होणें शक्य नाहीं. मनुष्य हें एक देहधारी बाहुलें आहे. पूर्णाला अपूर्ण कसा पुरणार ? तरी एक उपाय आहे. अखंड विवरणानें देवांत विलीन होतां येतें. ‘विभक्तपणें नसावें । तरी च भक्त म्हणवावें । १३’. एखाद्याच्या घरांत जाऊन घरधनी ओळखायचा नाहीं, राज्यांत हिंडून राजाची ओळख नसायची, तसा प्रकार माणसाच्या बाबतींत घडतो. देहसंगानें मनुष्य विषयांत रमतो, सिरवतो आणि देहधर्त्याला चुकतो. वर पुनः आपण विवेकी, असें म्हणायला तो तयारच. या देवाचें ध्यान करणें कठिण आहे. तो नाहीं अशी जागाच नाहीं. तथापि तो चंचल आहे. चंचल कधींहि निश्चल परब्रह्म असूं शकत नाहीं. तत्त्वानें तत्त्व उडून जाऊन देहबुद्धि झडली कीं, ‘निर्मळ निश्चळ चहूंकडे । निरंजन ।। २३’. आपण कोण, कुठें व कसे आहों, हा विवेकाचा मार्ग कच्च्या माणसाला समजत नाहीं. तरी ‘भल्यानें विवेक धरावा । दुस्तर संसार तरावा । अवघा वंश चि उधरावा । हरिभक्ती करूनी ।। २५’.

**नववा** समास ‘उपदेशा’चा आहे. यांत अंतरात्मा, जगज्जोती यांच्या माहितीचा उपदेश आहे. माणसाला कर्म चुकत नाहीं. तें सांग झालें पाहिजे. एखादें व्यंग राहिल्यास तें वाया जातें; म्हणून कांहीं घोटाळा होतोसें वाटल्यास हरिस्मरण करावें. पण तो हरि कोण ? संध्येंतील चोवीस नांवें याकरितां स्मरावीं. त्याचीं चोवीसच नांवें नाहींत. सहस्र आहेत, अनंत आहेत, अखेरीस त्याला नांवच नाहीं, असें ठरतें. तो कोण याचा अंतर्यामीं विचार करावा. ब्राह्मण संध्येनंतर प्रतिमेची पूजा करतो; लोकसुद्धां मोठ्या प्रेमानें नानाविध प्रतिमा पूजतात. तथापि ज्याच्या प्रतिमा तो परमात्मा कसा आहे तें ओळखून भजन करावें. साहेब–अधिकारी–वरिष्ठ ओळखून नमस्कार करण्यांतलाच हा प्रकार आहे. परमात्म्याच्या ओळखीनें भवसागर पार करतां येतो. प्रतिमा पूजा घेतात, अंतरात्मा अंगांत येतो. अवतारी

इहलोकीं येऊन आपल्या धामास जातात. ते आपल्या स्वरूपानें असतात. तें त्यांचें निजरूप म्हणजे 'जगज्जोती'. सत्त्वगुण जाणती कळा. हिच्या पोटीं असंख्य देव असल्याचें अनुभवानें पाहावें. देहपुरांतील जो ईश तो पुरुष. तसाच जगांतील जगदीश ओळखावा. जाणीवरूपानें शरीराचा व्यवहार चालतो. त्याला अंतःकरण-विष्णु म्हणतात. जो आपल्या ठिकाणीं तोच जगतांत असून कर्तृत्व, भोक्तृत्व त्याचें; तोच अंतरात्मा होय. पाहणें, हुंगणें, चाखणें, जाणून विचार करणें, आपलें परके निवडणें या सर्व त्याच्याच क्रिया असल्यानें 'येक चि जगाचा जिव्हाळा' असें पटलें तरी देहलोभ आडवा येतो. देहाच्या अभिमानानें निराळेपणा उद्भवतो. 'उपजे वाढे मरे मारी ॥ १७'. अशी त्रिलोकाची चालना करणारा हा अंतरात्मा शेवटीं पाहायला गेलें तर तत्त्वांतलाच म्हणजे विनाशी असल्याचें ठरतें. आधीं स्वतःची व मग जगाची परीक्षा केल्यावर दोन्ही पलीकडचें परब्रह्म पावतें. तेथें ज्ञानाचें विज्ञान होतें. या स्थितीच्या स्पष्टीकरणानें समास संपविला आहे.

**दहावा** समास 'निःस्पृह वर्तणुकी'चा आहे. समर्थांचा उत्तम पुरुष, विरक्त, महंत हे थोड्या फार अंशांनीं एकाच आदर्शाचे निरनिराळे पर्याय आहेत. या समासांतील निःस्पृह इतका उठावदार आहे कीं, त्याचें दर्शन घडतांच समर्थ आत्म-चरित्र सांगत आहेत असें वाटल्याशिवाय राहात नाहीं. येथें अंतरात्मा व महंत यांच्या वर्तनाचें सादृश्य दाखविलें आहे. पहिल्या तीन ओव्यांत अंतरात्म्याचें वर्णन असून पुढें १५ व्या ओवीपर्यंत महंताच्या वागणुकीची माहिती दिलेली आहे. ती प्रसिद्ध म्हणून जिज्ञासूंच्या विशेष परिचयाची समजून येथें तिचा विस्तार न केल्यास चालेल. हा महंत शोधल्यास एकाएकीं सांपडत नाहीं, त्याचा नेहमीं एकच पेहराव नसतो, उद्योगाखेरीज त्याचा एक क्षण जात नाहीं; ओळखीच्या लोकांना सोडून 'नित्य नूतन' असतो. लोकांना त्याच्या अंतरंगाचा ठाव लागत नाहीं. कोणाशीं पुरतें बोलत नाहीं, कोणाला पुरतें पाहात नाहीं, एका ठिकाणीं पुरता राहात नाहीं. जातें स्थळ सांगत नाहीं, सांगितलें तर तेथें जात नाहीं. त्याच्या वर्तनाचीं हीं कित्येक अंगें आहेत. दोनदां या वर्तनाच्या महंताला समर्थांनीं 'योगेश्वर' संज्ञेनें संबोधलें आहे. १५ व्या ओवीनंतर कांहीं अनुभवाचीं सुभाषितें व समुदायाच्या व्यवहाराला अवश्य असणारीं कर्तव्यें दाखल केलीं आहेत. समुदाय उभारणें हें समर्थांचें प्रिय कर्तव्य होतें. समुदायाखेरीज कार्याकार्यांची खरी परीक्षा होत नाहीं, यासाठीं 'बहुतीं

शोधून पाहिलें । बहुतांच्या मनास आलें । तरी मग जाणावें साधिलें । महत्कृत्य ॥ १६ '. असें समर्थांनीं एक सुभाषित रचलें आहे. एकान्तसेवन, अभ्यास, जनासहित काळाचें सार्थक, उत्तम गुणांची संपादणी व इतरांना त्यांची शिकवण, गुप्तरूपें समुदायाची उभारणी, 'अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावें जग ॥ १९ ' आधीं कष्ट मग फळ, म्हणून साक्षेप असावा, वृथा पुष्ट नसावें, लेकांची बारीक पहाणी व अधिकाराची परीक्षा, तदनुसार कामांची वाटणी—'अधिकारपरत्वें कार्य होतें । २२ ' म्हणून अधिकार पाहून कार्य सांगावें, प्रयत्नानुसार विश्वास ठेवावा, तथापि आपलें असें वेगळें अवसान हातचें राखून ठेवावें—'आपला मगज राखणें कांहींतरी ॥ २३ ' असें या समासांतील उपदेशाचें स्वरूप आहे. 'आधीं केलें मग सांगितलें ' हा उद्गार याच समासांतील असून 'महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे । जाणते करून विखरावे । नाना देसीं ॥ ' (२५) ही शेवटची ओवी आहे.

महंतानें सदैव हिंडावें, एका जागीं राहूं नये या कर्तव्याचा वाचक 'नित्यनूतन ' हा शब्द दासबोधाबाहेर दुसरीकडे समर्थांनीं वापरलेला आहे. श्रीरामदासांची कविता प्रथम खंडांतील स्फुट प्रकरणांत (क्र. १) 'हिंडतां शहाणे होते ' (२), 'ब्राह्मणु हिंडतां बरा ' (३), 'येके स्थळीं स्थिरावेना । नित्य नूतन साजिरा ' (२०), अशीं वचनें आहेत. स्फुट प्रकरण ३ मध्यें 'नित्यनूतन हिंडावें । धुंडावे भक्त प्रेमळ ' (६), या खंडांतील 'मानपंचकां 'त 'हिंडतां हिंडतां लोकीं । आवडे नित्य नूतनु ' (२०), स्फुट प्रकरण २५ 'सुचना चाळणा । बोलका नित्य नूतनु ' (१०), येथें समर्थांच्या 'नित्यनूतन ' या कल्पनेचें थोडें स्पष्टीकरण केलें आहे.

## • १२ •

या दशकाचें नांव 'विवेक-वैराग्य ' असें आहे. विवेक-वैराग्याचा समास मात्र चौथा आहे. याच्या अनेक समासांतून सामान्यतः जगांतील थोरवीला अवश्य असणाऱ्या गुणांची नोंद वेगवेगळ्या नांवानें केलेली आढळते. समासांचें विषय-विवेचन पाहतांना हा प्रकार ध्यानांत येईल.

**पहिला** समास 'विमललक्षणनाम ' आहे. विमल म्हणजे स्वच्छ दुर्गुणरहित

चारित्र्याचा पुरुष असा बोध समास वाचल्यावर होतो. पहिल्या १० ओव्यांत प्रपंच व परमार्थाचें तारतम्य दाखविलें आहे. समर्थ प्रपंच सोडावा असें सांगत नाहींत. प्रपंच नेटका करून मग परमार्थविवेक अंगीकारावा, यांत आळस कामाचा नाहीं, असें पहिल्या ओवींत त्यांनीं हडसून खडसून सांगितलें आहे. प्रपंचाला डावलून परमार्थ केल्यास कष्टी व्हावें लागतें. प्रपंच-परमार्थ चालविणें हें विवेकाचें लक्षण आहे. प्रपंच सोडून परमार्थांत शिरल्यास खायला अन्न मिळायची पंचाईत पडेल. उपासमार ओढवल्यावर परमार्थाचें नांवच घ्यायला नको. उलट, परमार्थाला उपेक्षून प्रपंच केल्यास यमयातना भोगण्याशिवाय गत्यंतर नाहीं. 'संसारीं असतां मुक्त । तो चि जाणावा संयुक्त ।८'. प्रपंचांत जो सावधान तो परमार्थांत कार्यक्षम होऊं शकतो. 'प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थीं खोटा ॥ ९'. दूरदृष्टीनें—दीर्घ सूचनेनें—प्रपंच-परमार्थ हे दोन्ही साधावे. अखंड चाळणा करून पुढें काय होईल याचें निश्चित अनुमान चित्तांत सांठवून ठेवावें. खबरदार असतो तो सुखी होतो. म्हणून जो सर्व सावधान त्याची योग्यता मोठी समजली जाते. तोच एक लोकांचें समाधान संभाळूं शकतो. चाळणेचा आळस केल्यास केव्हां काय संकट आदळेल तें कळत नाहीं. यासाठीं दीर्घ सूचनेच्या लोकांचा विवेक पाहावा. एकाचें पाहून दुसरा शहाणा होतो. तेव्हां शहाणे कोण ते हुडकावे, त्यांचे गुण घ्यावे. मनुष्य पारखावा, पण तसें करतांना त्याचें मन तोडूं नये. विमल पुरुषाचे आणखी कांहीं गुण आहेत. वरून पाहिलें तर इतरांसारखाच दिसतो, पण त्याच्यापाशीं नेटका विवेक असतो. उद्योगी कोण व आळशी निरुपयोगी कोण याची त्याला बिनचूक माहिती असते. त्याचें अपूर्व म्हणजे तो सर्वांना कोण कसा आहे याच्या ज्ञानानें पाहतो, हें असून ज्याचा त्याचा ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें गौरव करतो.

**दुसरा** समास 'प्रत्ययनिरूपणा'चा आहे. प्रत्यय शब्दाच्या योगानें सहज मनांत येतें कीं आत्मज्ञानाच्या अनुभवाचें निरूपण असेल. पण यांतहि मागील समासाप्रमाणें थोरांच्या गुणांची चर्चा आहे. संसारांत आलेल्या स्त्रीपुरुष निःस्पृहांना हाक देऊन समर्थांनीं त्यांस स्वस्थ चित्तानें आपल्या स्थितीचा विचार करण्याला सांगितलें आहे. प्रत्येक व्यक्तीला वाटतें कीं, आपल्या मनासारखें सर्व कांहीं असावें. पण बरें करायला जावें आणि वाईट पदरांत पडावें असा अनुभव येतो. कोणी सुखी तर कोणी दुःखी असें कां तर प्रारब्धावर ढकलतात. अचूक यत्न

करवत नाहीं म्हणून करावें तें सफल होत नाहीं. आपले दोष कळत नाहींत. ज्याला स्वतःचें ज्ञान नाहीं, तो दुसऱ्याला कसें ओळखणार ? लोकांचें मनोगत कळत नाहीं; लोकांप्रमाणें वागतां येत नाहीं; मूर्खपणानें कल्ह माजतो व शेवटीं दुःख मात्र नशिबीं येतें. लोकांची परीक्षा करण्याचा गुण पाहिजे व तो दक्ष पुरुषामध्यें असतो. दुसऱ्याला दोष देणें व आपला कैवार घेणें हा सामान्य स्वभाव आहे. लोकांत अशानें मान्यता मिळत नाहीं. 'लोकीं बरें म्हणायाकारणें । भल्यास लागतें सोसणें । १३ '. न सोसलें तर भंडवाणें होणारच. जेथें अनादर तेथें रहावेंसें वाटत नाहीं; पण लोकांची भीड तोडून जाववतहि नाहीं. 'बोलतो खरें चालतो खरें । त्यास मानिती ल्हानथोरें । १६ '. जोंवर लोकांना कळत नाहीं तोंवर विवेकानें त्यांच्याविषयीं क्षमाबुद्धि बाळगली पाहिजे, नाहींतर त्यांच्यांत आपल्यांत भेदच उरत नाहीं. माणसांत उत्तम गुण असतील तर लोकांना ते उमगतात व ते अंतर निवळून अनुकूल होतात. जगदांतर निवळलें – लोकांत किल्मिष राहिलें नाहीं – लोकांशीं सख्य झालें म्हणजे विश्वजनांत प्रसन्नता पसरते. लोकप्रियतेच्या रूपानें जनांतला जनार्दन संतोषला तर कशाची उणीव राहणार ? तथापि 'राजी राखावें सकळांला । कठीण आहे ॥ २० '. जें पेरावें तें उगवतें या नियमाप्रमाणें आपण लोकांत नीट वागल्यास सुख मिळतें, हें लक्षांत घेऊन आपल्याच मनाला प्रतिक्षणीं शिकवीत राहावें. यदाकदाचित् दुर्जनाशीं गांठ पडून त्याविषयीं क्षमेनें वागणें अशक्य झालें तर साधकानें चुपचाप दुसरीकडे निघून जावें. लोकांना पुष्कळ तऱ्हेच्या परीक्षा येतात, परंतु मनाची परीक्षा (अंतरपरीक्षा) करतां येत नाहीं, यामुळें ते करंटे ठरतात. 'आपणास आहे मरण । म्हणौन राखावें बरेंपण । २६ '. हें विवेकाचें लक्षण आहे. थोर, ल्हान, समान, आपले, परके या सर्वांशीं चढतें वाढतें संनिधान (सख्य) ठेवणें बरें. 'बरें करितां बरें होतें । हें तों प्रत्ययास येतें । २८ '. ही गोष्ट इतकी स्पष्ट आहे कीं, ती कोणीं कोणाला सांगायला नको. इतका उपदेश झाल्यावर पूर्वीच्या समासांतील हरिकथानिरूपण, बरेंपणें राजकारण, हीं कर्तव्यें आणलीं आहेत. विद्या शिकून भागत नाहीं. ती प्रसंगीं उपयोगीं पडेल तरच खरी. नाहीं तर फुकट गेली असें समजावें.

**तिसरा** समास 'भक्तनिरूपणा'चा आहे. हा समास स्वतंत्र वेगळा लिहून ठेवल्याचें प्रमाण रामदासी संशोधन खंडांतील बाडांक ६४ च्या माहितींत आहे. हें

बाड सुमारें २७५ वर्षांचें जुनें असून त्यांत या समासाला 'फुट' (फुटकळ-स्फुट) असें म्हटलें आहे. केव्हां तरी भक्ताचीं लक्षणें सांगण्यासाठीं हा समास लिहून ठेवला व नंतर त्याला हल्लींच्या दासबोधांत स्थान दिलें, याला आणखी एक प्रमाण शेवटच्या ओवींतील 'पतितपावनाचे दास' या शब्दाचें आहे.

पृथ्वींतील माणसांनीं विवेक पाहावा व इहलोक-परलोक साधावे. इहलोक यशस्वी करण्याचें साधन जाणत्यांची संगति असून परलोकाच्या सिद्धीकरितां सद्गुरु पाहिजे. सद्गुरूला आपण कोण व देव कोण हे दोनच प्रश्न विचारावे. पंचीकरण महावाक्याचें विवरण करावें. भगवंत हें सर्वांचें आद्य कारण ओळखलें पाहिजे. मायेच्या खेळांत न सांपडणारें परब्रह्म धुंडावें. दिसणें नासणें, उपजणें मरणें, रचणें खचणें, वाढणें मोडणें, येणें जाणें हें मायेचें स्वरूप आहे. येथून पुढें वनस्पति, अन्न, पृथ्वी, तेज, आप, वायु या क्रमानें अंतरात्म्यापर्यंत जाऊन नंतर निर्विकाराशीं हें विवेचन थांबलें आहे. निर्विकारांत अंतरात्म्यासकट सर्वांचा लय होतो; तेव्हां निर्विकार, निर्गुण हें शाश्वताचें लक्षण निश्चित झालें. याप्रमाणें देव कोण या प्रश्नाचा निर्णय लागला. आतां आपण कोण याचें निदान करावयाचें तर तें 'मी' हा मनोवृत्तीचा परिणाम असल्याचें लक्षांत येतें. सर्व देहाचा शोध घेतल्यास 'मीपण' सांपडेनासें होतें. पंचीकरण, तत्त्वविवरण यांच्या साह्यानें वस्तु (ब्रह्म) आपणच आहों असा बोध ठसवून आत्मनिवेदन करावें. देवाभक्तांचें मूळ शोधूं गेल्यास आत्मा निरुपाधिक असल्याचें गळीं उतरतें. मग 'मीपण' नाहींसें होऊन पुढें ही निवृत्ति उन्मनी अवस्थेस जाते. विज्ञानांत ज्ञान, ध्येयांत ध्यान, विलय पावतें. कार्यकारणभाव लोपतो. आतां जन्म-मरण, पाप, यमयातना, इत्यादिकांचें निरसंतान झालें असें समजावें. बद्धावस्था निःशेष मावळून मनुष्य मोक्षारूढ होतो. त्याचा जन्म सार्थकीं लागतो. किंतु संपले, धोके तुटले आणि ज्ञानविवेकानें मनुष्य पावन झाला. जे कोणी पतितपावनाचे (रामाचे) दास आहेत तेसुद्धां जगाला पावन करतात ही प्रचीत पुष्कळांना आलेली आहे.

•

'सप्तसमासीं'त इहलोक व परलोक याविषयीं कांहींसा विस्तारानें खल केलेला आहे. इहलोक म्हणजे संसार करावा, नाना यत्न आटोपावा, लोकांमध्यें आपला पुरुषार्थ मिळवावा, कन्यापुत्र योग्य असावे, सोयरे समर्थ पहावे, स्वाहास्वधा असें

ब्राह्मण्य विधियुक्त चालावें (९–१०), 'लोक म्हणती भला भला। इतुकेन इहलोक साधला। ११', परलोकाच्या विचारांत 'जेणें सकळ निर्माण केलें। त्यास पाहिजे ओळखिलें। १२' हें मुख्य व आद्य कर्तव्य आहे, मागलें आठवत नाहीं, पुढलें कळत नाहीं, म्हणून व्यर्थ अनुमानें करण्यापेक्षां वेदशास्त्रांतील पंचीकरणांत अंतःकरण घालून प्रत्ययाचें विवरण करावें. 'निर्गुणीं नाहीं कर्तृत्व हेत। सगुण तरी नासिवंत। याकारणें सिद्धान्त। शोधून पाहावा ॥ १९'. मुख्य परमेश्वराशीं एकरूप होणें हा परलोक इष्ट प्रकारें साधण्याचा उपाय आहे.

**चौथा** समास 'विवेक वैराग्या'चा आहे. भाग्य असून भोगतां येत नाहीं अशी विचित्र तऱ्हा वैराग्य असून विवेक नसला तर अनुभवास येते. दुःख हें वैराग्याचें जन्मस्थान आहे. परंतु नुसतें वैराग्य स्वेच्छाचाराला प्रवृत्त करणारें असतें. उलट ज्ञान असून वैराग्य नसेल तर परिणाम वाईट होतो. म्हणून वैराग्य व ज्ञान (किंवा विवेक) यांचें साहचर्य असावें. येथून पुढें या जोडीच्या प्रेरणेनें घडणारीं कर्में सांगितलीं आहेत. वैराग्यानें प्रपंच तुटतो, विवेकानें अंतःशुद्धि घडते. अशा रीतीनें मनुष्य अंतर्बाह्य मोकळा होतो. त्याची ज्ञानासारखी क्रिया पाहून लोक चकित होतात. मग यत्नविवेकधारणेची सीमा राहात नाहीं. संगीत, रसाळ कीर्तन, प्रेमळ आवडीचें भजन, अनुभवाशीं सुसंगत असलेलें वक्तृत्व, स्नानसंध्या, इत्यादि कामें विवेकवैराग्ययुक्ताच्या हातून होऊं लागतात. मध्येंच 'सन्मार्ग जगास मिळाला। म्हणजे जगदीश बोळला। १७' असें एक वचन आहे. शेवटीं नुसतें वैराग्य हेंकाडपिसें व शब्दज्ञान येळिलसें (कळकट, ओंगळ) असें सांगून वैराग्य आणि विवेक यांचा संयोग हें महद्भाग्य असल्याचें साधु जाणतात असें समर्थांनीं म्हटलें आहे. अखेरच्या ओवींतील 'रामदास' हा शब्द प्रस्तुत समासाच्या स्वतंत्रपणाची खूण आहे.

**पांचवा** समास 'आत्मनिवेदन' नांवाचा असून तो जुन्या दासबोधाचा ८ वा समास आहे. पहिल्या १० ओव्यांत शब्द व त्याचे वाङ्मयरूपानें दिसणारे नानाविध भेद यांची माहिती आहे. शब्द ॐकार हें एक तत्त्व असून अर्धमात्रा मकार (म् हें व्यंजन) हा शुद्ध सत्त्वगुण आहे. तोच मूळ माया आहे. नंतर आठ शरीरें, अष्टधा प्रकृति, यांचा निर्देश 'वारें' या शब्दानें करून त्याच्या आधारें 'वारें नस्तां जें गगन। तैसें परब्रह्म सघन।' हा सिद्धांत मांडला आहे. पिंडब्रह्मांडाच्या उभारसंहारानंतर

त्यावेगळें जें उरलें तें विमलब्रह्म. पदार्थ जड तर आत्मा चंचळ; विमलब्रह्म काय तें निश्चळ. याच्या विवरणानें साधक स्वतः वरून तद्रूप होतो. 'पदार्थ मनें काया वाचा। मी हा अवघा चि देवाचा। १६' याला आत्मनिवेदन म्हणतात. नंतर निश्चळ-चंचळ या द्विविध आत्मनिवेदनाची मीमांसा केलेली आहे. आपणच ठिकाणावरून उठल्यावर मीपण कुठें सांपडणार? 'मी हा अवघा चि देवाचा' ही कल्पना शेवटीं निराळ्या शब्दांनीं वाढविलेली आहे.

**सहावा** समास 'सृष्टिक्रमनिरूपणा'चा आहे. पूर्वोक्त २७५ वर्षांच्या जुन्या ६४ व्या बाडांत त्याला 'फुट' म्हटल्यामुळें त्याची एका वेळची स्वतंत्रता निदर्शनास येते. ज्याच्या ठिकाणीं करणें धरणें, उपजणें मरणें, जाणणें नेणणें, रचणें खचणें, इत्यादिकांची वार्ता नाहीं त्या ब्रह्मापासून सृष्टिक्रमाचा प्रारंभ करून पुढें मूळपुरुष, मूळमाया, गुणक्षोभिणी, नंतर उत्पत्तिस्थितिसंहाराच्या ब्रह्मा-विष्णु-महेश या तीन देवता, पंचभूतें, निश्चळांतलें चळण म्हणजे वायु, आकाश म्हणिजे अंतरात्मा, वायूच्या दोन उष्ण शीतळ झुळकांतून तेज आप, आप आळून पृथ्वी, मग औषधि अन्न, चौऱ्यांशीं लक्ष योनी असा विस्तार झाला. शेवटीं 'जें जें जेथून निर्माण जालें। तें तें तेथेंचि निमालें। १९' याप्रमाणें संहार होतो. हा वृत्तांत लक्षांत घेऊन 'जें शाश्वत निरंजन। तेथें लावावें अनुसंधान। जाणते पुरुषीं ॥ २०'. अंतरात्मा ही सर्वसाक्षिणी अवस्था असून ती मायेबाहेरची नाहीं. मूळमायादेखील अपूर्ण आहे. विवेकहीन तिला ब्रह्म समजतात. जगांत पुष्कळ जण स्वतःला थोर म्हणवितात; या थोर म्हणविणारांच्या नादीं लागून संसाराचा नाश करूं नये. पुस्तकी ज्ञानानें निश्चय करणें शक्य असतें तर गुरूची गरज राहिली नसती. आपल्या प्रत्ययानें विवरण करावें. 'जो बहुतांच्या बोलें लागला। तो नेमस्त जाणावा बुडाला। येक साहेब नस्तां कोणाला। मुख्यारा मागावा ॥ ३१'.

**सातवा** समास 'विषयत्यागा'चा आहे. विषयत्याग म्हणजे काय असा प्रश्न श्रोत्यानें उपस्थित केला आहे. विषयांची यथेच्छ निंदा कानांवर येते, पण ते कोणीं सोडल्याचें मात्र दिसत नाहीं. यामुळें बोलण्याचालण्यांत मेळ नसणें असें विवेकहीनत्व दिसून येतें. प्रपंचांत जेवण, परमार्थांत उपोषण असा प्रकार जर नाहीं, तर विषयत्याग करावा या हाकाटीचा अर्थ काय? विषयत्यागानें परमार्थ साधतो हें खरें

वाटत नाहीं. वक्त्यानें 'वैराग्य' असें एका शब्दांत आपलें उत्तर सांठविलें आहे. विषयाचें आकर्षण नसणें हें वैराग्य असून त्याच्या प्रभावाचा त्याग करतां येईल तर परमार्थयोग घडून येईल. प्रपंचत्याग म्हणजे परमार्थ. 'मागें ज्ञानी होऊन गेले। तें हि बहुत कष्ट केले। तरी मग विख्यात जाले। भूमंडळीं ॥ १०'. बाकीच्यांतील अनेक मत्सरानें, अज्ञानदशेनें वायां गेले. कित्येकांनीं पोटासाटीं धर्मभ्रंश स्वीकारला. प्रखर वैराग्य, प्रत्ययाचें ज्ञान, सदाचार यांचें भांडवल जवळ नसणारा भजन काय करणार? अशीं माणसें स्वतःला सज्जन म्हणायला चुकत नाहींत. मत्सरी लोक भाग्यपुरुषाची निंदा करतात. वैराग्य हेंच खरें भाग्य व तेंच परमार्थाचें औचित्य. 'प्रत्ययेज्ञानी वीतरागी। विवेकबळें सकळ त्यागी। तो जाणीजे महायोगी। ईश्वरी पुरुष॥ १८'. या बाबतींत महादेवाचें उदाहरण लक्षांत ठेवण्याजोगें आहे. जो उदास आणि विवेकी असतो त्याच्यामागें लोक धावतात. विषयलोभी व वैराग्यसंपन्न यांची तुलना होऊं शकत नाहीं. जे वैराग्यांत पक्के, ज्ञानभजनांत धड, विद्वान् असून वादप्रिय नाहींत, असे थोडेच असतात (२४). कष्ट केल्यानें शेत पिकतें, उंची वस्तु तत्काल विकली जाते, याच न्यायानें जाणत्या लोकांच्या कौतुकासाटीं इतरांच्या उड्या पडतात. बाकीचे मंदबुद्धीचे, दुराशेचे, भ्रष्टाचारानें ज्ञानाचा कोंडमारा करणारे असतात. जे विषय अनर्थकारक त्यांचा त्याग करावा, जे विषय शुद्ध असतील त्यांचा देहनिर्वाहापुरता उपयोग करावा. विषयत्यागांतसुद्धां सारासारविवेकाला जागा आहे. देव (पुरुष) प्रकृति, शूर भित्रा, कामगार अंगचोर, यांच्या संबंधांतलें तारतम्य विषयत्यागाच्या ज्ञानाला अवश्य आहे.

**आठवा** समास 'काळवर्णना' चा आहे. हा जुन्या दासबोधाचा आठवा समास असून तेथून त्याची इकडे भरती केली आहे. पहिल्यांदां मूळमायेचा सृष्टिविस्तार सांगून त्या विस्ताराचा एक अंश काळ आहे, 'चंचळ आहे तावत्काळ। काळ म्हणावें॥ ४'. समर्थांनीं काळाची केलेली पुढील व्याख्या कौतुकाची आहे : 'आकाश म्हणिजे अवकाश। अवकाश बोलिजे विलंबास। त्या विलंबरूप काळास। जाणोनि ध्यावें॥ ५'. हा विलंब सूर्यामुळें समजतो. नंतर पळापासून युगापर्यंतची काळगणना थोडक्यांत सांगितली आहे. आपण व्यवहारांत पर्जन्यकाळ शीतकाळ, प्रातःकाळ सायंकाळ, बाल्यकाळ तारुण्यकाळ, सुकाळ दुष्काळ, अशा अनेक नांवांनीं काळाचा निर्देश करतो. 'जें जें जये प्रसंगीं जालें। तेथें काळाचें नांव

पडिलें। १३ ', किंवा 'सकळ वेळा मिळोन काळ। तयास म्हणावें॥ १७ ' याप्रमाणें काळवर्णन झाल्यावर समर्थ परमार्थविवेकाकडे वळले आहेत. 'असते येक वाटतें येक। त्याचें नांव हीन विवेक। १८'. परंतु सर्वजण प्रायः आपल्या प्रवृत्तीनें चालतात. प्रवृत्ति अधोमुख व निवृत्ति ऊर्ध्वमुख असते हें त्यांना कळत नाहीं. विवेकी मात्र जेथून ब्रह्मांडरचना झाली तेथें दृष्टि गुंतवितो. सगळ्यांचें मूळ एकच; पण कोणी तें जाणतात, तर इतर सगळे बाष्कळपणानें आयुष्य दवडतात. माणसानें विवेकाचें साह्य घेऊन चटकन् परलोक साधावा. 'विवेकहीन जे जन। ते मानावे पशुसमान। त्यांचें ऐकतां भाषण। परलोक कैंचा॥ २४'. याप्रमाणें विवेकहीनावर ताशेरा झाडून समर्थ म्हणतात: 'बरें आमचें काय गेलें। जें केलें तें फळास आलें। पेरिलें तें उगवलें। भोगिती आतां॥ २५'. जें करावें तें भोगावें असा नियम आहे, तर भक्तियोगानें भगवंत कां आपलासा करूं नये? 'कीर्ति करून नाहीं मेले। ते उगे च आले आणि गेले। २७'. मनुष्य वैभवाच्या नादीं लागतो, पण शेवटीं 'येथील येथें अवघें चि राहातें। २८'. हा अनुभव ठरलेला आहे. पदार्थाविषयीं औदास्य बाळगून सावकाश विवेक पाहिल्यास अलभ्य जगदीशाचा लाभ होतो. त्याच्या लाभानें 'संसार करित असतांहि। समाधान॥ ३०'. पूर्वी जनकादिक राज्य करूनसुद्धां मुक्त होते. आजदेखील असे पुण्यश्लोक पुरुष आहेत. देह राजाचा असो वा रंकाचा असो, तो स्वाधीन नाहीं. म्हणून 'हाट भरला संसाराचा। नफा पाहावा देवाचा। तरी च या कष्टाचा। परीयाये होतो॥ ३४'.

**नववा** समास 'येत्नसिकवणनाम' आहे. यांत दिनचर्येचें कथन असून ज्या कर्तृत्वानें माणसाच्या वांट्यास पारमार्थिक थोरवी येते, अशा कर्तृत्वाचा बराच तपशील आलेला आहे. २३ व्या ओवींत 'महंतलीळा' हा शब्द असल्यामुळें दुःखी प्रापंचिकानें महंत व्हावें असा हा समास लिहिण्यामागील समर्थांचा हेतु ध्यानांत येतो.

अन्नवस्त्राची, अंथरुणपांघरुणाची, सोयऱ्याधायऱ्यांची, इष्टमित्रांची, आश्रय-परिचयाची, याप्रमाणें सर्व प्रकारची टंचाई ज्याच्या नशिबीं आलेली त्यानें काय केल्यास त्याचा उद्धार होईल असा कोणीएकानें प्रश्न केल्यावरून कोणीएकानें जो खुलासा केला तो येथें ग्रथित केला आहे. काम लहान असो वा मोठें असो,

तें केल्याशिवाय होत नाहीं हें जसें खरें, तसेंच तें सावधपणानें बिनचूक करावें लागतें हेंसुद्धां विसरूं नये. या उत्तरासोबत वक्ता आळसावर घसरला आहे. आळस सोडावा, यत्न साक्षेपें जोडावा, दुश्चितपणाचा थारा बळानें मोडावा, असें त्यानें बजावलें व नंतर त्यानें दिनचर्येचें वृत्त आरंभलें. मागल्या दिनचर्येंत व येथें थोड्याशा तपशिलाचा फरक सोडल्यास बरेंच सादृश्य आहे. जास्त तपशील आहे तो महंतलीळेचा आहे. सुंदर अक्षर, स्पष्ट नीट वाचन, अर्थांतरांत प्रवेश, विचारण्यासांगण्याचा नेमकेपणा, या गुणांमागून हरिकथानिरूपण, प्रसंगानुसार वर्तन, गाणेंवाजवणें, नाचणें, सभारंजक बोलणें इत्यादि कर्तव्यें आलीं आहेत. ‘बहुतांचें समाधान राखावें । बहुतांस मानेल तें बोलावें । २० ’. कथेमध्यें विसंगति होऊं देऊं नये. लोकांना उद्विग्न करूं नये. लोकांचें हृदय उकलावें. कशाकरितां तर नामघोषाकरितां. ‘जैसें बोलणें बोलावें । तैसें चि चालणें चालावें । मग महंतलीळा स्वभावें । आंगीं बाणे ॥ २३ ’. युक्तिवांचून कांहीं करूं गेल्यास सोबतीच्या लोकांचा भोगच उभा राहतो. ‘ऐसें न करावें सर्वथा । जनास पावऊं नये वेथा । हृदईं चिंतावें समर्था । रघुनाथजीसी ॥ २५ ’. उदासवृत्तीकडे लोक ओढले जातात, त्यांत कथानिरूपण असेल तर बोलायलाच नको, म्हणून ‘रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी ॥ २६ ’. जेथें बुद्धि नाहीं तेथें सारें विस्कळतें. ‘घालून अकलेचा पवाड । व्हावें ब्रह्मांडाहून जाड । तेथें कैचें आणिलें द्वाड । करंटपण ॥ २९ ’. इतकें ऐकल्यावर सर्व प्रकारें हीन असलेल्या माणसाची काळजी गेली. तो यत्नास लागला व त्याच्या अंतःकरणांत कांहीं एक उद्धाराची आशा बळावली.

**दहावा** समास ‘उत्तम पुरुष’ या नांवाचा आहे. आपण जेवल्यावर उरणारें अन्न फेकूं नये, वांटावें, या दृष्टांतानें समासाचा प्रारंभ असल्यामुळें त्यांत परोपकाराच्या धोरणाचा उपदेश असल्याचें ध्यानांत येण्याला हरकत नाहीं. उपकाराचे प्रकार अनेक आहेत. कुणाचें कसलेंहि उणें न पडूं देणें हें उपकाराचें रहस्य आहे. मृदु बोलणें, बऱ्या शब्दानें लोकांना जवळ करणें, नेमकें बोलणें, तत्काळ उत्तर देणें, दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी होणें, त्याला सहानुभूति दाखविणें, दुसऱ्याचें हृदय न दुखविणें, याप्रमाणें वाणीनें साधणाऱ्या उपकाराचा प्रथम बराच विस्तार आहे. उत्तम पुरुषाच्या कर्तव्यांत स्नानसंध्या, देवार्चन, एकाग्र जपध्यान, हरिकथानिरूपण यांचा समावेश प्रारंभीं केलेला आहे. उत्तम गुणी पुरुष तोच कीं, ज्याच्या भजनानें जगदीश

तृप्त होतो (१५). उत्तम गुणांचा साज, ज्ञानवैराग्याची शोभा ज्याच्या ठिकाणीं दिसेल 'तो चि येक जाणावा भला। भूमंडळीं ॥ १७'. 'जो उत्तम गुणें शोभला। तो चि पुरुष माहा भला। २९'. मनापासून भक्ति, उत्तम गुणांचें संपादन ज्याच्यापाशीं आहे, 'ऐसा जो माहानुभाव। तेणें करावा समुदाव। ३२'. समुदाय कशासाठीं? तर आपण अवचितपणें मरून गेल्यावर देवाचें भजन आपल्या मागें सदैव चालू राहावें यासाठीं समुदाय हवा. 'आपणामागें जगदीशासी। भजत जावें ॥ ३४ याकारणें समुदाव। ३५'. महोत्सव हें समुदायाचें मुख्य काम. 'हातोपातीं देवाधिदेव। वोळेसा (महोत्सव) करावा ॥ ३५'. समुदाय उभारण्याचीं दोन साधनें आहेत: १ रोकडी प्रबोधशक्ति. प्रबोधशक्तीनें बहुतांना भक्ति घडते. २ बहुतांचें मनोगत हातीं घेणें. पूर्वी जे उत्तम गुण वर्णिले ते प्रमाण असल्यामुळें मनोगत हातीं घेण्याला त्यांचा उपयोग होतो. बोलण्यासारखें चालणें व आधीं करून मग बोलणें अशा वर्तनाच्या माणसांचा शब्द लोकांत प्रमाण मानला जातो. 'जें जें जनास मानेना। तें तें जन हि मानीना। ४०'. जगांत आपण एकटे व लोक पुष्कळ अशी स्थिति असल्यामुळें सोबती जुळवून त्यांना मानवेल इतक्या बेतानें शिकवावें—'हळु हळु सेवटा न्यावें। विवेकानें ॥ ४१'. हीं विवेकाचीं कामें विवेकी मनुष्य व्यवस्थित रीत्या पार पाडतो. इतर बापडे संभ्रमानें भांडत असतात. परंतु त्यांनीं लक्षांत ठेवावें कीं बहुतांशीं भांडणाऱ्या एकाचा निभाव लागत नाहीं; 'याकारणें बहुतांला। राजी राखावें ॥ ४३'.

समर्थ कोणत्या गुणांना उत्तम समजत असत, याची अटकळ पूर्वीच्या कित्येक समासांतील विवेचनांत झाली असेल. या समासांत कांहीं गुणांची वाच्यता आहे. त्यांपैकीं वाणीच्या द्वारें घडणाऱ्या उपकारगुणाचा निर्देश मागें आला आहे. स्नान-संध्या, देवतार्चनादि कर्तव्यें पूर्वी वाचकांनीं पाहिलीं आहेत. देवाच्या भक्तीसंबंधाचा समर्थांचा कटाक्ष जिज्ञासूंच्या लक्षांत असेलच. याखेरीज बहुतांचे अन्याय क्षमावे, दुसऱ्याचें अंतर जाणावें, तदनुसार वर्तावें, लोकांस नानाप्रकारें परीक्षीत जावें, आलस्य अवघा चि दवडावा, यत्न उदंड करावा, उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा, आपला संसार सावधपणें करीत जावा, मरून कीर्तीस उरवावें, कोणी कितीहि धिक्कारून बोललें तरी शांति चळूं देऊं नये, दुर्जनास मिळून जावें (धन्य ते साधु), परक्यांना आत्मवत् मानावें, आपल्या पुरुषार्थवैभवानें बहुतांना सुखी करावें

(परंतु कष्टी करावें । हे राक्षेसी क्रिया ।। २७) अशी आणखी कांहीं गुणांची यादी आहे. गुणश्रेष्ठ पुरुषांना लोक शोधीत फिरतात, धुंडीत येतात, ही समर्थांची आवडती कल्पना प्रस्तुत समासांतहि आलेली आहे. या पुरुषानें आपल्यामागें भगवद्भजन चालण्यासाठीं समुदाय करावा, या आदेशाला जोडूनच 'आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी । आपणामागें जगदीशासी । भजत जावें ।। ३४' ही प्रसिद्ध ओवी ठेवलेली आहे. ही ओवी आपल्या आयुष्याच्या अखेरच्या दिवसांत समर्थांनीं उच्चारली, अशी एक आख्यायिका आहे. या ओवीचा भावार्थ १९:६:११ मध्यें दृष्टीस पडतो. तेथें 'कोण्हास कांहीं च न मागावें । भगवद्भजन वाढवावें ।' असें म्हटलें आहे. श्री रा म दा सां च्या क वि तें त (प्रथम खंड) प्रबोध म्हणजे 'आधीं प्रपंच शोधणें । १५' अशी व्याख्या असून 'प्रबोध लागतां लोकीं । नेमस्त सुटीका घडे ।। २३' अशी प्रबोधाची फलश्रुति सांगितली आहे (पान ३४४).

या १२ व्या दशकांत स्वतंत्रपणें निरनिराळ्या वेळीं लिहून ठेवलेल्या पुष्कळ समासांची जुळणी केली असली तरी सामान्यतः असें म्हणतां येईल कीं, त्यामध्यें समर्थांच्या ध्येयवादांतील उत्तम पुरुषाला अवश्य असणारीं ज्ञानाचीं अंगें व त्यांना शोभणारीं कर्तव्यें यांची माहिती बहुतेक समासांतून सांगिलेलीं आहेत. 'विवेकवैराग्य' या विषयाचा समास (४) एकच आहे; पण त्याचा संबंध उत्तम पुरुषाच्या जीवनपद्धतीकडे लागतो. विषयत्यागाचा समास (७) वैराग्याशीं जुळणारा आहे. माणसाची दिनचर्या (९) महंताचें चरित्र समजण्याकरितां असल्याचें सहज कळणारें आहे. समर्थांच्या अंतरंगांत एखादा विषय स्फुरल्यास त्याची मांडणी करतांना त्याचें समग्र रूप जिज्ञासूला दिसण्याकरितां ते आपलें ज्ञानभांडार कसें भरगच्च उघडतात, याची कल्पना पांचव्या समासाच्या पहिल्या १० ओव्यांतील शब्दविवरणावरून आणि ८ व्या समासांतील कालवर्णनावरून ध्यानांत येण्याला हरकत नाहीं.

## • १३ •

या दशकाचें नांव 'नामरूप' असें आहे. यांत पूर्वींच्या दशकांतीलच बहुतेक विषय आहेत. पहिला समास 'आत्मानात्मविवेक' आणि नववा समास 'आत्मा-विवरण' यांतील विवेचनामध्यें बरेंच सादृश्य आहे. दोन्ही ठिकाणीं देहधारी आत्म्याचा, अर्थात् अंतरात्म्याचा, खेळ सांगितलेला आहे. तिसऱ्या व चौथ्या

समासांत सृष्टीच्या संहारणी-उभारणीची माहिती आहे. लघुबोधाचा सहावा समास शिवाजीमहाराजांची प्रथम भेट झाली त्या वेळीं त्यांना थोडक्यांत एकंदर उपदेश कळण्याकरितां लिहिला किंवा दिला अशी आख्यायिका हनुमंतस्वामीच्या बखरींत दिलेली आहे. पांचव्या समासांत सृष्टिरचनेची रूपकात्मक कहाणी आलेली आहे.

**पहिला** समास 'आत्मानात्माविवेका'चा आहे. आत्मा कोण व अनात्मा कोण, असा प्रश्न उपस्थित केला असला तरी देहांतील जें सामर्थ्य माणसाला नाना प्रकारची हालचाल करायला आणि तशीच नानाविध स्थिति भोगायला लावतें त्याला आत्मा असें या समासांत म्हटलें आहे. या सामर्थ्याला देहाचा आधार नसेल तर आत्म्याला कांहीं करतां येत नाहीं. परंतु देह अनित्य, आत्मा नित्य, हा नित्यानित्य-विवेक जाग्रत पाहिजे. यानंतर जीवशिव, ईश्वर, अर्धनारीनटेश्वर, स्थूळ सूक्ष्म, कारण महाकारण, विराट हिरण्यगर्भ यांचें चिंतनमननानें निरसन करून अव्याकृत मूळ प्रकृतीशीं वृत्ति जाऊन भिडल्यावर त्या वृत्तीची निवृत्ति होणें हें अंतिम साध्य असें म्हटलें आहे (२४–३०).

**दुसरा** समास 'सारासारनिरूपणा'चा आहे. पूर्वीं आत्मा, अनात्मा या शब्दांनीं जो विचार केला तोच आतां सारासार या संज्ञेनें केला आहे. जें 'दिसेल तें नासेल। आणि येईल तें जाईल। जें असत चि असेल। तें चि सार ॥ २'. अनात्मा ओळखून टाकला म्हणजे मूळ मायेपर्यंत वृत्ति जाऊन पोंचते. या वृत्तींत निवृत्त होण्याचा हेतु असेपर्यंत सारासारविवेकाची पूर्ण सफळता होऊं शकत नाहीं. वृत्तींतील अजून कांहीं साधावयाचें आहे हा उद्देश समूळ नाहींसा होईल तेव्हां खरी निवृत्ति बाणली असें समजावें. ज्ञान आणि उपासना हीं एकच. उपासनेमुळें जगोद्धार होतो (८). ज्ञान आणि देव हीं तत्त्वतः एकच. तथापि ज्ञानाचें विज्ञान झालें पाहिजे. वृत्तिनिवृत्तीप्रमाणेंच ज्ञानविज्ञानाची गोष्ट आहे. या संबंधांत अनुमान, संदेह शिल्लक राहील तर ज्ञानाधिकार कच्चा ठरून असा मनुष्य तरण्याऐवजीं बुडेल (११-१२). परब्रह्माच्या प्राप्तीसाठीं संगत्याग करणें अवश्य आहे. शेवटीं जें परब्रह्म निश्चळ उरतें 'तें चि सार ॥ १८'. येथून पुढें कांहीं ओव्या ब्रह्मवर्णनाच्या आहेत. ओव्या २६-२७ मध्यें संत व परीक्षवंत यांचीं लक्षणें सांगून आत्मनिवेदन (२८), तद्रूपता (२९), अखेरीस अरूप (३०) यांची माहिती आहे.

**तिसरा** समास सृष्टीच्या 'उभारणी' चा आहे. पूर्वी अनेकदां सृष्टीच्या उत्पत्तीचा क्रम जिज्ञासूंनीं पाहिलेला आहे. परब्रह्म, त्यांत चंचल संकल्पाचें स्फुरण —त्यालाच आदिनारायण, मूळमाया, जगदेश्वर, षड्गुणेश्वर हीं नांवें आहेत. गुणक्षोभिणी, त्रिगुण, ॐकार हें त्रिगुणाचें दुसरें रूप आहे. आकाश म्हणजे अंतरात्मा; त्यापासून वायु, तेज, पाणी, पृथ्वी हीं भूतें जन्म पावतात. पृथ्वीवर नानाविध जीवांची, वृक्षवनस्पतींची गर्दी माजते. हें अनुमानाचें बोलणें नसून अनुभवाचें आहे. प्रत्यय हाच श्रेष्ठ. त्यावांचून दिसणारीं अनुमानें विवेकहीन समजावीं (१९).

**चौथा** समास 'प्रळया'चा आहे. प्रल्यकाळीं आग, वारा, पाऊस यांचा जो धुमाकूळ चालतो त्याच्या तडाक्यांत पंचभूतांचा पसारा आटोपतो. महद्भूत, मूळमाया यांचाहि अवतार संपतो. 'दृश्य हल्कालोळें नेलें। जड चंचळ वितुळलें। याउपरी शाश्वत उरलें। परब्रह्म तें ॥ २४ '.

**पांचवा** समास 'कहाणी'चा आहे. प्रकृति-पुरुषाचें एक जोडपें होतें. कालान्तरानें त्याला एक मुलगा झाला, नंतर त्याला एक मुलगा झाला, या मुलालाहि मुलगा झाला. पहिला मुलगा सत्त्वगुणी—विष्णु. त्याचा मुलगा रजोगुणी—ब्रह्मदेव. त्याचा मुलगा तमोगुणी—शंकर. विष्णु कार्यकर्ता आणि भला (४); ब्रह्मदेव हांवरा, त्यानें उदंड व्याप केला. चातुर्याच्या बाजूनें तो विष्णूसारखा पूर्ण नव्हता. अर्धवट होता. ब्रह्मदेवाचा मुलगा ज्ञानरहित व रागीट. संहार हें त्याचें काम. या मूळ पुरुषाचा पणतु शंकर—'कांहीं च नेणें। चुकतां संव्हारणें। माहा क्रोधी ॥ ९ '. प्रथम बहुतकाळ हा चार पिढ्यांचा संसार आनंदरूप होता. विस्तार वाढतां वाढतां आणखी बराच काळ लोटल्यावर आपसांतील नात्याचा विसर पडला व एकमेकांविषयीं किंतु बळावत जाऊन गृहकलह माजला. बेबंदशाही सुरू झाली व 'बाप लेंक नातु पणतु। सकळांचा जाला निपातु। कन्या पुत्र हेतु मातु। अणुमात्र नाहीं ॥ १५ '. ही कहाणी ज्याला योग्य प्रकारें कळेल तो जन्माच्या चक्रांतून सुटेल. 'ऐसी काहाणी निरंतर। विवेकें ऐकती जे नर। दास म्हणे जगोधार। ते चि करिती ॥ २० '.

प्रथम हा कहाणीचा समास २० च ओव्यांचा होता असें १७ ते २० ओव्यांवरून स्पष्ट कळणारें आहे. त्यापुढच्या पांच ओव्या मागून लिहून प्रस्तुत समासाची पुढील 'लघुबोधा' च्या समासाशीं संगति लावलेली आहे. जगोद्धार शब्दाचें सूत्र

घेऊन सार निवडावें, तत्त्वकोडें उकलावें, समजतां समजतां निस्संदेह व्हावें, अखंड निरूपणमननाच्या समाधानाकरितां तत्त्वांच्या गलबल्याचा संबंध नसणारी अवस्था प्राप्त करून घ्यावी, असें विवेचन या पांच ओव्यांत आहे.

**सहावा** समास 'लघुबोध' नांवाचा आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश हीं पंचभूतांचीं नांवें. पृथ्वी म्हणजे धरणी, आप म्हणजे पाणी, असा या नांवांचा नंतर अर्थ सांगितला आहे. शितावरून भाताची परीक्षा–'येक शीत चांचपावें। म्हणिजे वर्म पडे ठावें।'—या न्यायानें 'थोड्या अनुभवें। बहुत जाणावें ॥ ७'. पृथ्वी रचते खचते, पाणी आटतें, तेज विझतें, वारें बंद पडतें, आकाश हें तर केवळ नाममात्र आहे, याप्रमाणें पांची भूतांचा विस्तार नाशवंत ठरला. निराकार आत्मा काय तो सत्य व शाश्वत आहे. निराकार नित्य व साकार अनित्य याला नित्यानित्य-विचारणा म्हणतात. सार-असाराचें मिश्रण झालें असल्यामुळें त्याची निवड करावी लागते. चार भूतांमध्यें आकाश असतें. त्या आकाशांत जें सघन (दाट) भरलेलें असतें तें हुडसून खडसून पाहिल्यास आकाश व ब्रह्म एकच असें कळेल. उपाधि-रहित आकाश म्हणजे ब्रह्म. 'तें गे तें चि अनुमाना। विवेकें आणावें ॥ २०' परमात्मा निराकार असा बोध झाला. आतां आपण कोण हा प्रश्न सोडवायचा आहे. देह म्हणजे आपण असें वाटतें, पण वायु जातांच देह पडतो. श्वास कोंडला कीं देहाचें मढें व्हायला वेळ लागत नाहीं. आपण कर्ता असें मानावें तर स्वेच्छेप्रमाणें कांहींच घडत नाहीं, असा अनुभव येतो. तेव्हां आपण व कर्ता हें समीकरण खोटें झालें. कर्तृत्वाबरोबर भोक्तृत्वाचीहि वाट लागली. अशा रीतीनें शोध घेणें हाच विचार. जेथें विचार नाहीं, तेथें सारेंच खुंटलें. प्रत्यय म्हणजे न्याय, अप्रत्यय (अनुभवशून्यता) म्हणजे अन्याय. अनुभवशून्याला जन्मांधाप्रमाणें कसलीच परीक्षा करतां येत नाहीं. 'म्हणोन ज्ञाता धन्य धन्य। जो निर्गुणेंसी अनन्य। आत्मनिवेदनें मान्य। परम पुरुष ॥ ३१'.

'तें गे तें चि' हें वचन समर्थांच्या शब्दटाकसाळींतून निघालेलें असून 'तें (ब्रह्म) म्हणजे तेंच'—त्याला समजावून देण्याला दुसरें कांहीं आढळत नाहीं. एकमेव, अद्वितीय या उपनिषदांतील ब्रह्मलक्षणांचें तात्पर्य वरील वचनांत दिसतें. या वचनाचा उपयोग समर्थांनीं अन्यत्र क्वचित् क्वचित् केलेला आहे.

**सातवा** समास 'प्रत्ययेविवरणनाम' आहे. आकाशाच्या दृष्टांतानें ब्रह्माचें वर्णन करून पुढें तें निश्चळ आणि आत्मा वायूसारखा चंचळ, याचा निर्देश आला आहे. ब्रह्म घटाकाशासारखें, तर आत्मा घटबिंबासारखा आहे. 'भूत म्हणजे जितुकें जालें। जालें तितुकें निमालें। ५' यावरून चंचळ ओळखावें. अविद्या जड व आत्मा चंचळ यांचा कापूर-अग्नीसारखा संयोग होतांच दोन्ही जळून जातात. जड अनेक तर आत्मा एक, असा आत्मानात्माविवेक आहे. जडाला आत्मा चेतवितो. जगा वर्तविता तो जगन्नायेक, सर्वीं वर्ते तो सर्वात्मा. पण गोळावेरजेनें पाहिल्यास 'अवघा मिळोन चंचळात्मा' (९) हें ध्यानांत ठेवावें. निश्चळ ब्रह्मांत दृश्यभ्रम नसतो. 'विमळ ब्रह्म तें निभ्रम। जैसें तैसें॥ १०'. आधीं आत्मानात्माविवेक; मग सारासार विचार. या विचारानें प्रकृतीचा संहार होतो. प्रकृतीच्या संहाराबरोबर दृश्य साफ मावळतें. अध्यात्मश्रवणानें अंतरात्मा निर्गुणांत संचरतो. 'अर्थासारिखा आत्मा होतो। जिकडे नेला तिकडे जातो।... याकारणें उत्तम मार्ग। पाहोन धरावा॥ १४-१७'. 'जें जें देखिलें आणी ऐकिलें। तें अंतरीं सदृढ बैसलें। २०'. हा मनाचा धर्म लक्षांत घेऊन बाकीचें सर्व सोडून एका देवाला धुंडावें. 'सर्व सांडून शोधा मजला। ऐसें देव चि बोलिला। २३'. (येथें 'सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज। १८ : ६६'. या गीताश्लोकाचा भावार्थ स्पष्ट आहे.) मनुष्य प्रत्येक गोष्ट सुखासाठीं करतो, परंतु सुख देणाऱ्या देवाला विसरतो व सुखाऐवजीं दुःखांत पडतो. म्हणून शहाण्यांनीं देवाला ब्रह्मांडापरतें धुंडीत जावें. देव सांपडल्या-वर मग उणीव कशाची? वेड्या लोकांना असा विवेक नसतो. विवेक म्हणजे काय तर 'कर्तयासी वोळखावें। यास विवेक म्हणावें। २९'. सुख हें विवेकाचें फळ सिद्ध आहे. जो विचक्षण असेल त्यानें स्वहिताला चुकूं नये.

**आठवा** समास 'कर्तानिरूपणा'चा आहे. सृष्टीचा कर्ता देव या समजुतीला किती फाटे फुटतात याची या समासांत माहिती आहे. 'उत्तम मध्यम कनिष्ठ। भावार्थें बोल्ती पष्ट। आपुलाली उपासना श्रेष्ठ। मानिती जनीं॥ ४' हें त्या माहितीचें तात्पर्य आहे. ५ ते २० ओव्यांत लोकविश्रुत देवांचीं नांवें सांगून 'जेहिं जो देव मानिला। कर्ता म्हणती तयाला। ऐसा लोकांचा गल्बला। ओसरेना॥ २२' याप्रमाणें पुनः एकदां निराळ्या शब्दांनीं मागील तात्पर्याला दुजोरा दिला आहे. हा गलबला मोडण्याकरितां सूक्ष्म विचार करणें अवश्य आहे. ज्याला कर्ता समजायचें

त्याच्या आधीं कांहींच नसलें पाहिजे. पण कर्त्यानें जें केलें तें पंचभूतांचें, व त्यांतच जर कर्ता आढळला तर तो भूतांश ठरला. अर्थात् या भूतांवेगळा कर्ता असला पाहिजे. भूतांवेगळें निर्गुण ब्रह्म आहे, पण तेथें कर्तृत्व नाहीं. या अडचणींतून बाहेर निघण्याला जें झालें-केलें असें वाटतें तें सर्व लटकें, तेव्हां लटक्याचें कर्तृत्व हे शब्दच निरर्थक होत, असें मनावर ठसविणें हा मार्ग आहे. जें बरें असेल तें पाहून अंतर्यामीं अनुभव पटल्यावर मग गल्बला राहात नाहीं. हा विषय बोलण्याचा नाहीं. पण परीक्षेसाठीं बोलावें लागतें. यावर श्रोत्यानें 'देहीं सुखदुःखभोक्ता कोण?' असा प्रश्न काढला.

**नववा** समास 'आत्माविवरणा'चा असला तरी देहासकट आत्म्याचें विवरण यांत आहे. या दशकाच्या पहिल्या समासाशीं याचें सादृश्य असल्याचें आरंभीं सुचविलेलें आहे. तेथें 'देहसंगें आत्मा करी। सर्व कांहीं॥ २१' असें म्हटलें आहे, तर येथें 'शरीरयोगें आत्मा जगे। १' असें वचन आहे. येथें 'हें येकावेगळें येक। करूं जातां निरार्थक। ३' असें सांगितलें आहे तर तेथें 'येकेंविण येक-काये। कामा नये वायां जाये।२२' अशी आत्मा-देहाची सांगड असल्याविषयीं बजावलें आहे. पहिल्या समासांत नसलेली देहात्मयोगाची एक लहानशी गोष्ट आहे. भूक लागली हें जाणून देह उठवितो व ज्यासी त्यासी आच्यावाच्या बोलवितो. जेवणाचें झालें कीं नाहीं या टोचणीनें बायकांना सतावतो. सोवळें नेसून उतावळेपणानें ताटाकडे जाऊं लागतो. पानावर बसतो. आपोशन घेऊन घास उचलतो, तोंडांत घालतो, दातांनीं चावतो. (हीं देहकर्में आत्मा करवितो, म्हणून मुळांत पानावर बसविणें, घास उचलविणें, दांतांनीं चावविणें, असा शब्दप्रयोग आहे.) घासांत केंस, काडी, खडा लागल्यास थुंकतो. खाद्य आळणी असेल तर मीठ मागतो. 'बायलेसि म्हणे आगे कांगे। डोळे ताऊन पाहों लागे। रागें रागें॥ २१'. गोडी लागल्यास आनंदतो, 'तिखट लागतां मस्तक झाडी। आणी खोंकी॥ २३'. [येथें तिखटाकरितां मिरचीऐवजीं 'मिरपूड' हा शब्द योजला असल्यामुळें समर्थकालीं मिरच्यांच्या तिखटाचा प्रघात पडलेला नव्हता असें दिसतें.] 'आज्य उदंड जेविला। २५'. मग तहान अनावर झाल्यानें पाण्याचा तांब्या उचलून तोंडाला लावला. जेवणाचा हा तपशील दाखल करून 'देहीं सुखदुःखभोक्ता। तो येक आत्मा चि पाहातां। २६' हा सिद्धांत निवेदन केला आहे. हा आत्मा आणि वायु यांत इतर बाबतींत

पुष्कळ समानता असली तरी आत्मा वायूहून चपळ व सूक्ष्म आहे. वायु वाजतो, आत्मा वाजत नाहीं, अशी भिन्नताहि आढळते. देव व देह यांच्या संयोगाचें कौतुक फार आहे. पण 'देहावेगळी आडणूक। आत्मयास होये॥ ३९'. त्रैलोक्याला गवसणी घालणारा विवेकाचा आश्रय देहात्मयोगच आहे (४०).

**दहावा** समास 'सिकवणनिरूपणनाम' आहे. पालेमाळा, फूलमाळा, फळमाळा, कवडेमाळा इत्यादि अनेक माळा तंतूच्या आधारानें रचल्या जातात, हा दृष्टांत घेऊन जगांतील अनंतविध आकारांच्या पोटीं माळेंतल्या तंतूप्रमाणें आत्मा असतो असें दाखविलें. परंतु हा दृष्टांत योग्य नाहीं असें कळलें व 'तैसें म्हणों आत्मयातें। तरी साहित्य न पडे॥ ३' असें म्हणावें लागलें. हा दृष्टांत तंतोतंत नाहीं. त्यांत आत्म्याच्या दृष्टीनें उणेपणा आहे, म्हणून 'साहित्य न पडे'. दृष्टांत सर्वांगसंपन्न नसणें हें औचित्याला बाधक, एक प्रकारें विरस करणारें, अर्थात् 'साहित्य न पडे'. तंतूंत मणि ओवला तर तो तंतूमध्यें राहातो. आत्म्याचें तसें नाहीं. 'आत्मा सर्वांगीं व्यापला। ४'. तंतु ज्या मण्याच्या छिद्रांत असेल तेवढ्या एकाच मण्याला धरून ठेवतो, सर्व मण्यांना व्यापीत नाहीं. आत्मा सर्वांग व्यापून बसतो. तंतूमध्यें चापल्य नसतें. 'आत्मा चपळ सहजगुणें। ५' हें आत्म्याचें दुसरें वैशिष्ट्य तंतूंत नसल्यानें पुनः साहित्यदृष्ट्या दोष निर्माण होतो. म्हणजे दृष्टांत पुरा पडत नाहीं. उसांत रस असतो म्हणून रस काढून घेतल्यानंतर उरणाऱ्या चोथ्याला (ब्राकसाला) ऊस मानतां येत नाहीं. तसाच प्रकार माणसाच्या व्यवहाराचा आहे. राजा व रंक यांच्या ठिकाणीं आत्मा एकच खरा, पण वागतांना राजा–रंक हा भेद विसरतां येत नाहीं. 'अंतर येक तों खरें। परी सांगातें घेऊं न येतीं माहारें। पंडित आणी चाटें पोरें। येक कैसी॥ १४'. याप्रमाणें आणखी कांहीं दृष्टांत पुढें देऊन 'सगट अवघेंच घेतलें। तरी तें मूर्खपण॥ १८' असें निदर्शनास आणलें आहे. २० ते २९ ओव्यांत महंताच्या कर्तव्याचा पाढा आहे व शेवटच्या ओवींत महंत शब्द ठेवून तो पाढा कुणासाठीं हें पक्कें केलें आहे. निंद्य सोडावें, वंद्य हृदयीं धरावें. सत्कीर्तीनें भूमंडळ भरावें. हरिकथा, पुराणश्रवण, नीतिन्याय, वर्तायाचा विवेक, राजी राखणें सकळ लोक, लोकांना पुण्यश्लोक करून सोडणें, हीं कर्तव्यें सांगितलीं आहेत. लोकांना शिकवायचें कसें तर मुलांना शिकवतात तसें—'मुलाचे चालीनें चालावें। मुलाच्या मनोगतें बोलावें। तैसें जनास सिकवावें। हळुहळु॥ २४'. लोकांचें मनोगत राखणें हें चातुर्याचें

मुख्य लक्षण आहे (२५). वेड्याला वेडें म्हणूं नये, कुणाचें वर्म बोलूं नये, हें निःस्पृहाच्या दिग्विजयाचें साधन आहे. निरनिराळ्या प्रसंगीं, निरनिराळ्या ठिकाणीं प्रसंग व स्थान ओळखून वागावें लागतें. या सर्व प्रतिपादनाचा रोख लोकांचें मनोगत संभाळण्याचा आहे. शेवटीं समर्थ म्हणतात: 'याकारणें मनोगत। राखेल तो मोठा महंत। मनोगत राखतां समस्त। वोढोन येती ॥२९'.

१२ व्या दशकाचे कित्येक समास २७५ वर्षांच्या जुन्या बाडाप्रमाणें (क्र. ६४) 'फुट' असल्याचें दाखविलें आहे. या १३ व्या दशकांतील पुरुष-प्रकृतीच्या संसार-कहाणीचा ५ वा आणि 'आत्माविवरणनाम' हा ९ वा हे दोन समास 'फुट' असल्याचें त्या बाडावरून दिसतें. त्यांपैकीं कहाणीचा समास २५ व्या ओवींतील 'दास म्हणे' या शब्दांमुळें स्वतंत्र स्फुट प्रकरणासारखा होता, याविषयीं शंका रहात नाहीं.

## •१४•

या दशकाचें 'अखंड ध्यान' असें नांव आहे. परंतु या नांवाचा समास आठवा आहे, व त्याचें नांव सबंध दशकाला दिलेलें आहे. 'कीर्तनलक्षण नाम' हा चौथा समास एकदां 'फुट' होता असें ६४ क्रमांकाच्या बाडांतील नोंदींत पाहायला सांपडतें. त्याच्या रचनेवरूनहि तो स्वतंत्र लिहिला गेल्याचा तर्क करतां येतो.

**पहिला** समास 'निःस्पृहलक्षणा' चा आहे. हा समास ८० ओव्यांइतक्या विस्ताराचा असून यांत समर्थांचा निःस्पृह आपल्या संपूर्ण अंगोपांगांसह प्रकट झालेला आहे. ज्या कांहीं समासांत समर्थांनीं स्वतःसंबंधाचे उद्‌गार घातले आहेत त्यांतला हा समास आहे. पहिल्या ओवींत 'निस्पृहाची सिकवण' या शब्दांनीं विषय-परिचय करून दिल्यावर मंत्र सोपा पण परिणामकारक, साधें औषध पण गुणकारी, साधें बोलणें पण अनुभवास येणारें, 'तैसें माझें ॥ २' असा आपल्या उपदेशाच्या फलप्रदतेचा समर्थांनीं विश्वास दाखविला आहे. तिसऱ्या ओवींत अवगुण दडवून गुण देणारें 'शब्दवोषध' तीव्र असलें तरी आस्थेनें घ्यावें असें सुचवून चौथ्या ओवीपासून निःस्पृहलक्षणांना प्रारंभ झाला आहे. निःस्पृहता धरूं नये, धरल्यावर सोडूं नये, तर कसें वागावें याचा तपशील पुढें आहे. निःस्पृहता धरून सोडली तर ओळखीच्या लोकांत हिंडूं नये. देश, वेश, आहार, विहार यांच्या अनुरोधानें

पाहिल्यास पूर्वी वर्णिलेल्या निःस्पृहाच्या वर्तनांतील कांहीं गोष्टी समासांत दिसतात. 'येके स्थळीं राहों नये। ६', 'येक देसी होऊं नये। भ्रमण करावें ॥ १९', 'बहुसाल असों नये। येके स्थळीं ॥ २९' हा वस्तीसंबंधाचा विचार झाला. 'धड मळिण नेसों नये। ९', येक वेष धरूं नये। येक साज करूं नये। १९', असें सांगणें पेहरावाबद्दल आहे. भिक्षा हें निःस्पृहाच्या उपजीविकेचें मुख्य साधन असल्यामुळें त्याविषयीं जास्त चर्चा आहे. भिक्षेची लाज धरूं नये, पण 'बहुत भिक्षा घेऊं नये। ८', 'गोड अन्न खाऊं नये। ९', 'जड भिक्षा मागों नये' आणि भिक्षेच्या लोभानें आपली परंपरा सांगूं नये (५०). बाष्कळ अन्न खाऊं नये, पाहुण्याप्रमाणें आमंत्रणें घेऊं नयेत (५२). श्राद्ध, पक्ष, सट, शांति, फळशोभन, बारसें, लग्न वगैरे प्रसंगामध्यें निःस्पृहानें भाग घेऊं नये व त्या प्रसंगासाठीं केलेलें अन्न खाऊं नये (५३-५५). द्रव्य पाहूं नये (६), 'दिल्या द्रव्य घेऊं नये। ७', 'बहुसाल मागों नये। शिष्यवर्गासी ॥ ३६'. द्रव्यासाठीं कीर्तन करीत हिंडूं नये (४५), 'पोटासाठीं गाऊं नये। मोलें कीर्तन करूं नये ॥ ५५', मोलयात्रा, मोलपूजा, मोलसुकृत–मोबदल्याच्या लोभानें यात्रा, पूजा किंवा दुसरें कांहीं देवाधर्माचें कृत्य करूं नये (५६-५७). वैराग्य, धारिष्ट, मानापमानाविषयीं समत्वबुद्धि, प्रपंच असेल तर द्रव्यदारेसंबंधांत प्रखर अनासक्ति, एकांतप्रियता, उद्योगशीलता, परोपकार इत्यादि गुणांचा पुरस्कार आणि अतिवाद, कंटाळवाणें बोलणें, वैभवाचा मद, आळस इत्यादि दुर्गुणांचा तीव्र निषेध हा प्रकार पुष्कळशा ओव्यांतून जिज्ञासूंना पाहतां येईल. हा सगळा समास भाषेच्या बाजूनें अतिशय रसाळ असल्यामुळें त्याचें स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता वाटत नाहीं. व्यवहारांत अतिरेक टाळून कसें वागावें, हा विषय ६१ ते ७५ या ओव्यांत असून तो समर्थांची उपदेशपद्धति ध्यानांत आणून देण्याला उपयोगी आहे. नमुना म्हणून येथें कांहीं वचनें दाखवायला हरकत नाहीं. 'बहुत अन्न खाऊं नये । उपवास खोटा ॥ ६४', 'बहु जनीं असों नये। बहु आरण्य सेऊं नये । बहु देह पाळूं नये। आत्महत्या खोटी ॥ ६६', 'कर्मठपण कामा नये। अनाचार खोटा ॥ ६७', 'बहु विषये भोगूं नये । विषयत्याग करितां नये ॥ ७०', 'जगीं भेद कामा नये। वर्णसंकर करूं नये। आपला धर्म उडऊं नये । अभिमान खोटा ॥ ७६'—यावरून उपदेशपद्धतीच नव्हे तर विचारसरणीहि ध्यानांत येईल.

प्रस्तुत समासांत मुद्दाम पाहून लक्षांत ठेवावीं अशीं कित्येक वचनें आहेत.

४९ वी ओवी या दृष्टीनें मननीय आहे. स्वार्थबुद्धि नसावी, कारभारांत पडूं नये, यापुढें 'राजद्वारीं कार्यकर्ते होऊं नये' असा निःस्पृहाकरितां एक निर्बंध सांगितला आहे. दुसऱ्या दशकाच्या दुसऱ्या समासांतील उत्तम पुरुषाविषयीं म्हटलें आहे कीं, 'गोहीविण जाऊं नये । राजद्वारा ॥ २० '—उत्तम पुरुषानें केवळ साक्ष देण्याकरितांच राजाच्या द्वारीं अर्थात् राजमंदिरांत जावें. पूर्वीच्या काळीं राजवाड्यांतच न्यायसभा होत असल्यामुळें त्या सभेंत साक्षीला जायचें तर राजद्वारींच जावें लागे. राजद्वार याचा सामान्य अर्थ जरी राजाचें द्वार हा असला तरी तो राजाचा दरबार, न्यायसभा या अर्थानें रूढ असल्यामुळें राजदरबारांतल्या उठाठेवी निःस्पृहानें अंगावर घेऊं नयेत, असा दंडक समर्थांनीं येथें निदर्शनास आणलेला आहे व तो समर्थांची राज्यकारभारांतील उलाढालींसंबंधांत कोणती दृष्टि होती हें स्पष्ट करणारा आहे. श्रीसंप्रदायाचीं कागदपत्रें, भाग १ या पुस्तकांत (८८ पान) कल्याणस्वामीची समर्थांनीं कानउघाडणी केल्याची गोष्ट आहे. समर्थांचा प्रसाद शिवाजीमहाराजांकडे पोंचविण्याकरितां कल्याणाला पाठविलें असतां झालेल्या भेटींत कल्याणानें महाराजांकडून अकरा गाई मागून घेतल्या व हें वर्तमान त्याच्या तोंडून समर्थांना कळलें तेव्हां 'तुम्ही निस्पृह हे प्रयोजन तुम्हाला बोलिले नाहीं...आर्जव वृत्तीनें मागणें निस्पृहाचा धर्म नव्हे' असे निषेधपर उद्गार त्यांनीं काढले. राजापुढील निःस्पृहाची याचना ज्यांना खपली नाहीं, त्यांनीं राजद्वारींच्या कार्यकर्तृत्वाकडे पूर्णपणें पाठ फिरविण्याचा उपदेश निःस्पृहाला करावा हें सरळच आहे.

'कोठें मठ करूं नये।' केला तर तो धरून बसूं नये, 'मठपती होऊन बैसों नये। निस्पृह पुरुषें॥' असें ५८ व्या ओवींत म्हटलें आहे. त्यावरून हा समास मठस्थापना करावयास लागण्याच्या पूर्वीं समर्थांनीं केला होता कीं काय अशी शंका येते.

ग्रंथाचें लेखनवाचन या कार्याची समर्थांना जी आस्था होती तिचें प्रत्यंतर पूर्वींच्या समासांतून दोन तीन वेळां वाचकांच्या अवलोकनांत येणारें आहे. दुसऱ्या दशकाच्या पहिल्या समासांतील मूर्ख, अक्षरें गाळून किंवा पदरचीं घालून पुस्तक वाचतो, पुस्तकाची निगा करीत नाहीं, स्वतः वाचीत नाहीं व दुसऱ्याला देत नाहीं, असें म्हटलें आहे (७०-७१). ११ व्या दशकाच्या ६ व्या समासाचा प्रारंभ 'शुद्ध नेटकें ल्याहावें।...शोधून शुद्ध वाचावें', या उपदेशानें करून 'अक्षर सुंदर वाचणें

सुंदर" अशी महंताची प्रशंसा गायिली आहे. या १४ व्या दशकाच्या समासांत शेवटीं निःस्पृहाच्या कर्तव्यांत 'अबद्ध पोथी लेहों नये । पोथीवीण कामा नये । अबद्ध वाचूं नये । वाचिल्याविण खोटें ॥७८' याप्रमाणें वाचन-लेखनाचा संदर्भ आलेला आहे. शुद्ध लिहिण्यावाचण्याच्या गुणाचा व लाभाचा गौरव रामदासी स्फुटप्रकरणांत अनेकदां आलेला आहे. येथें तो गौरव यथास्थळ सांगायचा म्हटल्यास फार जागा अडवावी लागेल.

**दुसरा** समास 'भिक्षानिरूपणा'चा आहे. भिक्षा ही ब्राह्मणाची मुख्य दीक्षा. भिक्षा मागून जेवणारा निराहारी समजला जातो. ईश्वर (महादेव) सुद्धां भिक्षा मागणारा आहे. दत्त गोरक्षादि सिद्धदेखील भिक्षा मागणारे. भिक्षा हें निःस्पृहतेचें लक्षण आहे. वार लावला तर पराधीनता सोसणें भाग पडतें. आठ दिवसांच्या धान्याचा संग्रह केल्यास तें कंटाळवाणें वाटतें. संग्रही प्राणी नित्य नूतनतेपासून भ्रष्टला असें समजावें. 'नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटण करावें । तरी च भिक्षा मागतां बरवें । श्लाघ्यवाणें ॥ ८'. भिक्षेच्या माणसाला जिकडे तिकडे स्वदेश वाटतो. भिक्षा मागतांना कुरकुरूं नये, लाजूं नये, थकूं नये. भिक्षेकरी व चमत्कार असा योग असेल तर लोक आश्चर्यचकित होतात. भिक्षेकऱ्यानें भगवंताची कीर्ति निरंतर गात राहावें. भिक्षा सामान्य नव्हे. ती एक प्रकारें कामधेनु आहे. भिक्षेनें ओळखी होतात, श्रम चुकतात. भिक्षेनें निर्भयता, महंती, स्वतंत्रता, ईश्वरप्राप्ति असे अनेक लाभ घडतात. भिक्षेकऱ्यावर उपवासाची पाळी येत नाहीं. भिक्षेकऱ्यानें अल्पसंतोषी असावें. त्याच्या तोंडीं मृदु वाग्विलास दिसावा.

**तिसरा** समास 'कवित्वकले'च्या वर्णनाचा आहे. कवित्व ही शब्दकुसुमांची माळा असून तिचा अर्थपरिमळ संतरूप भ्रमरांना आनंद देतो. अशी माळा अंतःकरणानें गुंफून पूजेसाठीं रामचरणीं वहावी. ॐकाराचा तंतु तुटूं देऊं नये (१–२). अशा थाटानें या समासाचा प्रारंभ केलेला आहे. परोपकारार्थ कवित्व अगत्य करावें लागतें. भक्ति, विरक्ति वाढविणारी युक्ति आधीं वाढवावी. क्रियेवांचून शब्दज्ञान व्यर्थ म्हणून अनुतापानें देव प्रसन्न करून घ्यावा. मग देवाच्या प्रसादानें जे बोल मुखांतून बाहेर पडतील ते प्रासादिक ठरतील. १ धीट, २ पाठ, ३ प्रासादिक असे कवित्वाचे तीन प्रकार आहेत. धीटपणानें जें जें मनास येईल त्याला बलात्कारपूर्वक

कवित्वाचें रूप देणें हा पहिला प्रकार आहे. पाट म्हणजे विविध ग्रंथांतील पाठान्तरानें त्या ग्रंथांचा ‘उतार’ करणें. जें दिसलें त्यावर कविता रचली, तिच्यांत भक्ति पण मात्र नाहीं तर तिला ‘धीटपाठ’ म्हणावें. कामिक, रसिक, शृंगारिक, वीर, हास्य, कौतुक, विनोद, इतकेंच नव्हे तर उदरशांत्यर्थ प्रसंगीं करावी लागणारी नरस्तुति वगैरे सारें धीटपाठ कवित्व होय. यानंतर १४-२० ओव्यांत कवित्व कसें नसावें, याचें विवेचन आहे. प्रखर वैराग्य अंगीं बाणून ज्याच्या अंतरंगांत प्रतिक्षणीं भगवद्भजनाची गोडी चढती वाढती असते, ज्याचें अंतःकरण भक्तिरंगानें रंगलेलें असतें, ‘जया अंतरीं भगवंत । अचल राहिला निवांत । तो स्वभावें जें बोलत । तें ब्रह्मनिरूपण ॥ २५’. यापुढें त्याच्या भक्तीचें चरित्र–कीर्तन–नृत्य वगैरे वर्णिलेलें आहे (२६-३४). भक्ताची कविता प्रासादिक असते, ‘सहज बोलतां विवेक । प्रगट होय ॥ ३४’. येथवर धीट, धीटपाठ व प्रासादिक कवित्वाची माहिती झाली. परंतु कवित्वाचें ‘केलें च करूं निरूपण’ असें सांगून त्याकडे समर्थ वळले आहेत (३५-५४). याप्रमाणें एकूण २० ओव्या कवित्व कसें असावें, यासंबंधीं विचाराच्या आहेत. त्यांचा निराळेपणा पाहून व ‘ऐका कवित्व लक्षण । केलें च करूं निरूपण ।’ हें वाक्य लक्षांत घेतलें असतां वाटूं लागतें कीं, हा २० ओव्यांचा केव्हां तरी लिहून ठेवलेला स्वतंत्र समास दासबोध रचतांना तो दुसऱ्या समासांतील कवित्ववर्णनाला जोडला असावा. ७ व्या दशकांतील ९ व्या समासाच्या ३०-३५ ओव्यांत ग्रंथ कशाला म्हणावें हा विषय आहे. त्याच्याशीं जुळणारा कांहीं भाग या समासाच्या ४४-५३ या ओव्यांत आहे. कवित्वाचे धीट, धीटपाठ व प्रासादिक असे भेद समर्थांनीं केले आहेत. यांतील ‘धीटपाठ’ हा भेद एकनाथी भावार्थ रामायणांत सांगितला असून ‘प्रासादिका’चीं लक्षणें एकनाथी काव्यविवेचनांत सांपडतात.

**चौथा** समास ‘कीर्तनलक्षणा’चा आहे. हा एकदां ‘फुट’ असल्याचें पूर्वी निवेदिलेलें आहे. याचा विशेष म्हणजे क ख ग घ न याप्रमाणें अक्षरें ओवीच्या आरंभीं योजून कीर्तनाचीं लक्षणें सांगितलीं आहेत. ङ बद्दल जसा न तसा ञबद्दल य घेतला आहे. णचें स्थान नला दिलें असून पुनः न आपल्या जागीं आहेच. सच्यानंतर खची एक ओवी मध्येंच असून नंतर श ह ल व क्ष या अक्षरांच्या ओव्या आहेत. कीर्तनांत काय असावें, काय नसावें, कीर्तनाचें फळ कोणतें, हें सर्व या समासांत आहे. अक्षरानुक्रमाकरितां स्वीकारलेले शब्द दुर्बोध असावे हें स्वाभाविक आहे.

**पांचवा** समास 'हरिकथे'चा आहे. 'मागां' श्रोत्यानें प्रश्न केला होता असा संदर्भ सांगून हा समास रचला आहे. परंतु या 'मागां'चा पूर्वीच्या समासांत ठाव सांपडत नाहीं. सोन्याला सुगंध व उसाला फळें ही जशी अपूर्वता समजली जावी तशी हरिदास आणि त्याच्या ठिकाणीं वैराग्यज्ञान, भक्ति इत्यादि गुण याची अपूर्वता मानावी लागते. अभिमानमत्सरादि दोष हरिदासाच्या अंगीं नसण्याची अपूर्वता सांगितली आहे. हरिदासांत जयंत्या, पर्वें, तीर्थें, क्षेत्रें याविषयीं विश्वास पाहिजे. पुढें सगुण मूर्ति असतां जे निर्गुणकथा करतील ते पढतमूर्ख जाणावे. सगुण मूर्तीपुढें मनःपूर्वक करुणाकीर्तन करावें (१२); 'सगुणीं नाणावें निर्गुण । १४'. एकाची कीर्ति दुसऱ्यापुढें गाइल्यानें 'साहित्य न पडे ।'–औचित्यभंग होतो (१८). पुढें सगुण मूर्ति नसेल व श्रोते साधुजन असतील तर अद्वैतनिरूपण अवश्य करावें (१९). मूर्ति नाहीं, सज्जन श्रोते नाहींत, केवळ सामान्य श्रोते आहेत अशा प्रसंगीं अनुतापवैराग्याचें कीर्तन करावें. 'शृंघारिक नवरसिक' हे कीर्तनाचे विषय नसावे. स्त्रियांचें कौतुक व लावण्य वर्णिल्यास विकाराला बळी पडून श्रोता धारिष्टापासून चळतो. स्त्रियांच्या वर्णनानें मन कामाकार होऊन ईश्वराचें ध्यान मनांतून उडतें. यापुढें कीर्तनाचा खरा रंग कसा पाहिजे हें सांगून समर्थांनीं संगीतकलेनें कीर्तनाची हानि होण्याचा संभव निदर्शनास आणला आहे. कीर्तनाला संगीतकला अवश्य असली तरी कीर्तनांत गायनवादन, त्या कलेच्या ज्ञानामुळें व आवडीमुळें बेसुमार वाढलें तर देवाची कथा त्यांत गडप होऊन जाईल. याकरितां 'श्रीहरिवीण जे कळा । ते च्चि जाणावी अवकळा ।। ३१ ', नाद स्वर यांचा अतिरेक हीं हरिकथेचीं विघ्नें होत. ' मन ठेऊन ईश्वरीं । जो कोणी हरिकथा करी । तो च्चि ये संसारीं । धन्य जाणा ।। ३७ '. शेवटीं श्रोत्याविषयीं तीन ओव्या लिहून 'जयासि नामीं विश्वास । या नांव हरिदास ।' असा समारोप केला आहे. शृंगारिकाचा निषेध पंचसमासी ४:९-११ आणि एकवीस समासी दासबोध १२:४८-५२ याप्रमाणें पाहायला सांपडतो.

**सहावा** समास 'चातुर्या'चा आहे. रूपलावण्य अभ्यासानें कमावतां येत नाहीं. म्हणून आगंतुक गुणांची सोय धरावी ही दुसऱ्या दशकाच्या ८ व्या समासाची ३१ वी ओवी जशीच्या तशी प्रथम देऊन तिचें स्पष्टीकरण पुढें तीन ओव्यांत केलें आहे. ज्यांच्या समुच्चयाला चातुर्य म्हणतात त्या गुणांचा खल नंतर केलेला आहे. देहाची वेषभूषा चातुर्याच्या अभावीं फुकट जाते. प्रयत्न करणें, शिकणें, देह

कष्टविणें, यांना उत्तम गुणांच्या उपायांत स्थान आहे. न्यायानें वागेल तो शहाणा, अन्यायानें वागेल तो दैन्यवाणा. ‘जें बहुतांस मानलें। तें बहुतीं मान्य केलें ॥ १४’ ही चातुर्याची एक कसोटी आहे. समाधानानें समाधान, मैत्रीनें मैत्री वाढते. आहोला काहो तर अरेला कारे असें उत्तर मिळतें, हें सर्वांना माहीत असतांहि लोक नीट वागत नाहींत. वस्त्रानें शरीर शृंगारल्यास इतरांना कांहींच लाभ होत नाहीं. अंतरंगाचा शृंगार जें चातुर्य त्याच्या बळानें बहुतांचें रक्षण करतां येतें. ‘बरें खावें बरें जेवावें। बरें ल्यावें बरें नेसावें। समस्ती बरें म्हणावें। ऐसी वासना ॥ २०’ (या ओवींतील पहिले दोन चरण २:६:१० व १२:२:३ मध्यें आहेत). ही वासना तृप्त करून घ्यावयाची असेल तर ‘तनें मनें झिजावें। २१’. लोकांचा अडलेला कार्यभाग ज्याच्या द्वारें सिद्ध होईल त्याच्याकडे लोक सहजच ओढले जातात. ‘म्हणोन दुसऱ्यास सुखी करावें । २३’ व आपण सुखी व्हावें. हें ज्यांना ‘समजलें’ आणि तदनुसार जे ‘वर्तले। ते चि भाग्यपुरुष जाले।’ बाकीचे ‘उरले। ते करंटे पुरुष ॥ २५’. व्याप, वैभव आणि हावभाव (वर्तनक्रम) यांचा अविभाज्य संबंध आहे. आळसानें कार्यभाग नासतो, ‘साक्षेप होत होत होतो’ ही स्पष्ट दिसणारी गोष्ट ज्याला कळत नाहीं तो शहाणा नव्हे (२७). मैत्रीनें कार्य साधतें तर वैरानें मृत्यु येतो. जे मैत्री जोडीत नाहींत, राखीत नाहींत, उलट वैर करतात ‘त्यास म्हणावें अज्ञान। ३०’. एकटा कोणी सृष्टींत इतर सर्वांशीं भांडत निघाला तर त्याला यश कसें मिळणार? चातुर्याचें रहस्य ३२-३३ ओव्यांत सांगितलें आहे. बहुतांचें मुखीं उरावें, बहुतांचें अंतरीं भरावें, प्राणीमात्रांना उत्तम गुणीं विवरावें, शहाणे करावे जन, पतित करावे पावन, सृष्टीमधें भगवद्भजन वाढवावें.

**सातवा** समास ‘युगधर्मनिरूपणा’ चा आहे. वाडांक ६४ प्रमाणें एकदां हा ‘फुट’ समास होता. यांत युगधर्माची माहिती २९-४० ओव्यांत असून सुरुवातीपासून गृहस्थाश्रमाचा, त्यांत भक्तिमार्गाचा, नंतर वैराग्यसंपन्न भक्ताच्या जीवनसरणीचा महिमा गायिला आहे. एखाद्यानें जर तावातावानें संसार सोडून परमार्थ आरंभला तर त्याची कशी दुर्दशा होते, याचा विचार २०-२४ ओव्यांत आहे. २९ व्या ओवींत ‘नीच प्राणी गुरुत्व पावला’ हा विषय निघून त्याच्या विस्तारांत दावलमलकाची यात्रा, पीरांचें भजन व ‘आपले इच्छेनें’ तुर्की धर्माचा स्वीकार (३२) या गोष्टींची वाच्यता झालेली आहे. ब्राह्मणांच्या अवनतीवर समर्थांच्या

'युगधर्मा'चा कटाक्ष आहे. नीच यातीकडे गुरुत्व गेलें, राज्य म्लेंच्छांनीं व क्षत्रियांनीं गुंडाळलें, आपण (ब्राह्मण) अस्त्रीं ना परत्रीं कांहींच नाहीं (३६). समर्थांच्या डोळ्यांपुढें कलियुग आहे. 'पुढें पुढें वर्णसंकर। होणार आहे॥ ३३' असें त्यांनीं कलियुगाचें भविष्य बोलून टाकलें आहे. ब्राह्मण इतके खालावले कशानें, तर ग्रामणीनें—गांवगुंडपणानें, गांवकीच्या उपद्व्यापांत भाग घेऊं लागले म्हणून खालावले (३७). स्वतः ब्राह्मण, यामुळें ब्राह्मणांना दोष देतांना समर्थांना खेद वाटत होता. शेवटीं ब्राह्मणांचें नशीब असा हवाला देऊन त्यांनीं क्षमा मागितली आहे.

या समासांतील भगवद्भक्तांमध्यें पूर्वीं अनेकदां आलेल्या थोरवीच्या खुणा आहेत. पुरश्चरणी, कायाक्लेशी, दृढव्रती, परम सायासी, असा तो असतो. भगवंताखेरीज दुसरें कांहींच त्याला थोर वाटत नाहीं म्हणून कायावाचाजीवेंप्राणें तो भगवंतासाठीं कष्ट करतो. अंतरीं विरक्त असतो तेव्हां 'अंतरापासून वैराग्य। तें चि जाणावें महद्भाग्य। १०'. तो प्राणिमात्रांचें अंतर उकलूं जाणतो. जो परोपकारी तो लोकांच्या वाट्यास येत नाहीं. 'दर्शनमात्रें समाधान। पावती लोक॥ १३'. परमेश्वराकडे अखंड लय आंतून लागलेला असल्यामुळें तो बाहेरून दुश्चित दिसतो. आंत पूर्णपणें सावचित्त असतो. उपासनेच्या मूर्तींचें ध्यान, आत्मानुसंधान किंवा श्रवणमनन यांपैकीं कोणत्या ना कोणत्या कार्यांत तो मग्न असतो. दुसऱ्याचें अंतर व देश, काळ, प्रसंग जाणणें या गुणाचाहि निर्देश 'तया पुरुषा काये उणें। भूमंडळीं॥ २८' अशा गौरवानें करण्यांत आला आहे.

**आठवा** समास 'अखंड ध्याना'चा आहे. जें झालें तें होऊन गेलें, आतां ब्राह्मणांनीं स्वतःला शहाणें करावें, हें मागील समासाचें सूत्र ओवून हा समास तयार केला आहे. अखंड ध्यानाच्या विवेचनाला हें सूत्र लावलें आहे. देव स्वच्छ निर्मळ हातानें पुजावा तर भाग्य मिळतें. आधीं देवास नीट ओळखून भजन करावें, अखंड ध्यान धरावें. येथून पुढें अंतरात्म्याचें वर्णन असून, तो सर्वांचा अंतरात्मा म्हणून समस्तांना राजी राखावें हा मुद्दा येथेंहि आलेला आहे. दुर्जनांचे देव त्यांच्यासारखेच असले तरी ते देव म्हणून त्यांचा उपमर्द करूं नये. पाहिजे तर त्यांच्या वाटेस जाऊं नये. बाहेरून दिसणाऱ्या भेदांचा संबंध देहाशीं असतो. माणसाच्या विवेकाचा आधार हा अंतरात्माच आहे. देवाचें अखंड स्मरण हें अखंड

ध्यानाचें लक्षण आहे. मूर्तीचें ध्यान करूं लागलें तर नाना व्यक्ती डोळ्यांसमोर येऊन मनाला कासावीस करून सोडतात. मूर्ति देवळाप्रमाणें समजून देवळाऐवजीं देवाचें ध्यान करावें. अंतरनिष्ठाच्या ध्यानाचा प्रकार असा आहे. दंडकध्यान अनुभवाचें नसल्यानें त्यांत विघ्नें उद्भवून अनर्थ घडतात. फुटक्या मनाला कसें तरी आवरून तुटकें ध्यान केल्यास सार्थक कसें होणार? अखंड ध्यानानें हित न झाल्यास तो पतित समाजावा. ध्यान व ध्याता यांचें अनन्यत्व झालें पाहिजे. हें अनन्यत्व स्वयं-सिद्ध आहे. विवरणानें तें संपादून ज्ञानी समाधानांत राहतो. यापुढें दंडकध्यानाच्या गोंधळाची माहिती आहे. 'जेणें जैसा परमार्थ केला। तैसा च पृथ्वीवरी दंडक चालला ॥ ४७'. मग त्याबद्दल अभिमान वाढतो. अनुभवाखेरीज अभिमान शेवटीं घात करतो. यासाठीं अभिमान सोडून अनुभवानें विवेक मांडावा व मायेचा पूर्वपक्ष खोडून टाकावा.

**नववा** समास 'शाश्वतनिरूपणा'चा आहे. शाश्वत म्हटलें कीं अपरि-हार्यतेनें परब्रह्म आठवतें. परब्रह्मामागून सृष्टिरचनेचा विषय डोळ्यांपुढें येतो. या समासांत ब्रह्ममायेचेंच विवेचन आहे. पिंडासंबंधांत आत्मानात्मविवेक व ब्रह्मांडा-संबंधांत सारासारविचार अशी व्यवस्था आहे. नाशवंत तें असार व शाश्वत म्हणजे सार. ज्याचा कल्पांत होईल तें सार नव्हे. भूतें नाश पावतात. त्यांच्या मागोमाग गुणमाया, मूळमाया परब्रह्मांत लीन होतात. ब्रह्माला कल्पांत नाहीं. मायात्यागानें शाश्वताला ओळखावें. अंतरात्मा सगुण आहे; त्याच्या आधारानें निर्गुणास जावें. निर्गुणाच्या ज्ञानानें विज्ञानावस्था लाभते. ज्ञान तीन प्रकारचें आहे : १ ज्ञान, २ अज्ञान, ३ विपरीत ज्ञान. या त्रिपुटीचा क्षय म्हणजे विज्ञान. वेदांत, सिद्धांत, धादांत ही काय भानगड आहे ती पाहावी. शेवटीं 'निर्विकार सदोदित। जेथें तेथें ॥ १७' असा अनुभव येतो. तें निर्विकार ज्ञानदृष्टीनें पाहून तेथें अनन्य झालें कीं आत्म-निवेदन सिद्धीस गेलें. दृश्य व भास—एक दृश्याचा व दुसरा मनाचा धर्म आहे—याच्या पलीकडे अविनाश परब्रह्म आहे. या ज्ञानासंबंधांत कशाचीहि भीड धरून उपयोग नाहीं. 'भिडेनें वेव्हार निवडेना। भिडेनें सिधांत कळेना। भिडेनें देव आक-ळेना। अंतर्यामीं ॥ २४'. भीड मायेच्या अलीकडची असून ब्रह्म पलीकडचें आहे. 'लटिक्याची भीड धरणें। भ्रमें भलतें चि करणें। ऐसीं नव्हेती लक्षणें। विवेकाचीं ॥ २९'.

**दहावा** समास 'मायानिरूपण नाम' आहे. यांत मायेचें लटकें स्वरूप समजण्यासाठीं समर्थांनीं घेतलेलीं एकदोन उदाहरणें मागील भ्रमनिरूपणाच्या समासांतील बुद्धिप्रामाण्याला शोभणारीं आहेत. उताणा पडून करंटा मनोराज्यें करतो तशी मायेची अवस्था आहे. बहुरूप्याची लक्ष्मी, दसऱ्याचें सोनें, बाळविधवेचें जन्मसावित्री हें नांव, घरोघरीं भिक्षा मागणारा पण नांवाचा कुबेर, जुनीं वस्त्रें मिळण्याच्या आशेचा दशावतारांतील कृष्ण, ज्याच्या घरांत अन्नाचा कण नाहीं त्याच्या देव्हाऱ्यांतील अन्नपूर्णा, अशा तऱ्हेचीं पुष्कळ उदाहरणें सांगितलीं आहेत. समर्थांचा मार्मिकपणा एका उदाहरणांत विशेष दिसून येतो. पाण्यांत पाय सोडून पाहिल्यास आखूड, लांब, किरकोळ असे ते विचित्र दिसतात. मायेचे देखावे असेच असतात. मेल्याचा महोत्सव, सतीचें वैभव, स्मशानांतील रडारड यांची मायेशीं तुलना करून समर्थांनीं आपलें बुद्धिप्रामाण्य उघड केलें आहे. कित्येक उदाहरणें समर्थकालीन लोकस्थितीवर थोडासा प्रकाश टाकतात. नांव आणि वस्तुस्थिति यांमध्यें असलेल्या भेदाचीं या समासांतल्यासारखीं उदाहरणें एकवीस समासी दासबोधाच्या १० व्या समासांत ५२-५९ ओव्यांत पाहायला सापडतात (श्रीरामदासांची कविता, द्वितीय खंड, लघुकाव्यें, पान १८३–१८४).

## • १५ •

**पहिला** समास 'चातुर्य लक्षणा'चा आहे. अस्थिमांसाचीं जेवढीं शरीरें आहेत, त्या सर्वांमध्यें जीवेश्वर राहतो व नानाविध विकार त्याच्या विद्यमानें व्यक्त होतात हें लक्षांत घेऊन जीव जीवांत घालावा, आत्मा आत्म्यांत मिसळावा, राहून राहून परांतरांचा शोध घ्यावा (४), असें प्रथम सांगितलें आहे. येथें जीवेश्वर शब्द अंतरात्म्याला अनुलक्षून घातलेला आहे. कांहीं ठिकाणीं 'जगदांतर' असाहि शब्द येतो. जानवें ढिलेपणानें अस्ताव्यस्त होऊं दिल्यास शोभत नाहीं, त्याची व्यवस्थित त्रिनगुंतागुंतीची रचना केल्यास तें शोभतें. पूर्वीच्या काळीं प्रायः जानवीं ज्याचीं त्याला तयार करावीं लागत असल्यामुळें त्यांचे दोरे एकमेकांशीं जुळवितांना ढिलाई केल्यास कुठें कापसाचे तंतु चांगला पीळ न बसल्यास वेगळे दिसणें, क्वचित् सुतावर गांठी निर्माण होणें, सुतें एका लांबीचीं व जाडीचीं नसतील तर त्यांचा घोटाळा उडणें, या गोष्टी आठवून समर्थांनीं जानव्याचा दाखला येथें घेतला

असणें संभवतें. जीवांत जीव घालून दुसऱ्याचें हृद्गत नेमकें ओळखतां येणाराला लोक वश होतात. ही युक्ति सोडून निराळे चेटकासारखे उपाय केल्यास ते सफल होत नाहींत. आत्मा सर्वांचा जर एक, तर चेटुक कोणीं कोणावर करायचें? या संबंधांत विवेकाला अग्रमान दिला पाहिजे. 'श्रेष्ठ कार्यें करी श्रेष्ठ। कृत्रिम करी तो कनिष्ठ। कर्मानुसार प्राणी नष्ट। अथवा भले ॥ ११' असा नियम आहे. जगदांतराशीं एक होऊन जो जगदांतर झाला त्याला अत्रीं परत्रीं कांहींच उणें पडत नाहीं (१४). बुद्धि ही देवाची देणगी आहे. तिच्यावांचून मनुष्य कच्चें ठरतें. 'जें जें जेथें निर्माण जालें। तें तें तयास मानलें। अभिमान देऊन गोविलें। ठाईं ठाईं ॥१६'. प्रत्येकाला वाटतें कीं आपण थोर, सुंदर आणि चतुर आहों. कोणीच स्वतःला ल्हान समजत नाहीं. 'आपुलाल्या साभिमानें। लोक चालिले अनुमानें।१९'. हीं मूर्खपणाचीं लक्षणें आहेत. अभिमान असावा, पण तो सत्याचा असावा. अशा अभिमानाला निरभिमानच म्हणतात. जें शाश्वत तो न्याय, जें अशाश्वत तो अन्याय. ते एक नव्हत. 'आचारविचारेंविण। जें जें करणें तो तो सीण।' म्हणून धूर्त विचक्षण जे असतील ते शोधून काढावे. उदंड बाजारबुणग्यांना एक धूर्त आळा घालूं शकतो. याकरितां जे मुख्य (नियंते) असतील त्यांच्याशीं सख्य करावें. मग भोंवतीं बाजारबुणगे वाटेल तेवढे जमतील. धूर्ताला धूर्त आवडतो. धूर्तांचा गौरव धूर्तांतच होतो. धूर्ताला (दुसऱ्याचें) धूर्तपण कळलें कीं मनास मन मिळायला उशीर लागत नाहीं. पण आपण काय करतों हें गुप्त राहिलें पाहिजे. समर्थाचें मन राखणाराकडे वाटेल तेवढीं माणसें येतात; जन व सज्जन आर्जव करतात. ओळखीनें ओळख साधावी. बुद्धीनें बुद्धि बोधावी. नीतिन्यायानें पाखंडाचा प्रसार थांबवावा. 'वेष धरावा बावळा। अंतरीं असाव्या नाना कळा। २१' ही प्रसिद्ध ओवी या विवेचनांत आलेली आहे. २० ते ३५ या ओव्या ज्याला चातुर्य ही संज्ञा लावावयाची त्या कर्तव्यांच्या वर्णनाच्या आहेत. लोकांचा जिव्हाळा राखणें, निःस्पृहता, नित्यनूतनता, अनुभवाचें ब्रह्मज्ञान, सर्वांचें समाधान करणारें पाठांतर, अशीं त्यांतलीं कांहीं कर्तव्यें आहेत. 'येके ठाईं बैसोन राहिला। तरी मग व्याप चि बुडाला।' याकरितां हिंडते फिरते राहून ज्याची त्याची भेट घ्यावी; पण भेट घेतां देतांना गाफील नसावें, सावधपणा ठेवावा. भेट पुष्कळदां घेण्यानें सख्य वाढतें. भेट पुष्कळदां घेतली म्हणून आपला सगळा ठाव लागेल, असें वागूं नये.

या चातुर्यलक्षणांत प्रामुख्यानें लोक वश करून घेण्याच्या उपायांचा विचार आहे. येथें धूर्त शब्दाचा अर्थ लफंगा हा नसून लोकांची परीक्षा करून त्यांना आपल्या वेधांत ठेवणारा पुरुष या अर्थानें त्याचा उपयोग केलेला आहे. लोकांच्या पोटांत शिरण्याच्या युक्तीला चातुर्य म्हटलें आहे.

**दुसरा** समास 'निस्पृहव्यापा'चा आहे. यांतील पहिल्या १२ ओव्या समर्थकालीन सामान्य लोकस्थिति व देवधर्मविषयक अराजकता निदर्शनास आणून देणाऱ्या आहेत. कित्येकांनीं म्लेंच्छधर्म स्वीकारला. कित्येक फिरंगाणांत (पोर्तुगीज अंमलाखालच्या प्रदेशांत) खपले. भाषाभेदानें कित्येकांची अडवणूक झाली. महाराष्ट्र देशांत कांहीं आशा दिसली तरी आपसांतील चढाओढीच्या डावपेंचांत (राजकारण) लोक अडकले आहेत. त्यांना जेवायला फुरसत नाहीं. कित्येक युद्धप्रसंगांत गुंतून त्यांच्यांत लढाईचा उन्माद संचरला आहे. व्यापारीउदिम्यांना त्यांचा धंदा इकडे तिकडे पाहूं देत नाहीं. पोटधंद्यांत ते चूर आहेत. लोकांच्या बुद्धीचा व्यवसाय पाहायला जावें तर षड्दर्शनें, नाना मतें, पाखंडें यांसारख्या उपदेशांचा वर्षाव चाललेला आहे. स्मार्त, वैष्णव, कामनेचे भक्त यांनीं समाज विभागला असून युक्तायुक्ताचा विवेक मुळींच दिसत नाहीं. या गलबल्यांत आणखी कांहीं गलबला निघाल्यामुळें वैदिक लोकांच्या डोळ्यांत तो सलतो. यामुळें खरें ज्ञान दुर्लभ व पुण्य अलभ्य झालें आहे. परंतु विचारवंताला मात्र हीं दोन्ही सुलभ आहेत. स्वतःस कांहीं विचार कळला तर तो सांगतां येत नाहीं; सांगण्याच्या प्रयत्नाला विघ्नें भोवतात; त्यावर उपाय काढावा तर अपाय आडवे येतात. अशा स्थितींतहि जो तीक्ष्ण बुद्धीचा, धूर्त, तार्किक, विचक्षण व एकहि क्षण रिकामा न जाऊं देणारा असेल तो लोकांच्या आदराला पात्र होतो. हा पुरुष कसा असतो व काय करतो याचें १५ ते ३० या ओव्यांत जें व्याख्यान आहे त्यांत ११ व्या दशकाच्या १० व्या समासांतील कांहीं भाग शब्दांतरानें आढळतो. असा पुरुष पाठांतराच्या अस्खलित वक्तृत्वानें आडवळणाच्या संकुचित विषयाला राजमार्गाप्रमाणें विस्तीर्ण, सरळ व स्पष्ट करून सोडतो. लोकांना जागृत करण्याचे उपाय त्यांचें मनोगत ओळखून अंमलांत आणतो; यामुळें त्याच्या निरूपणाची लोकांना चटक लागते. अनुभवाच्या बळानें मतमतांतरें पाडून, सपाट करून व लोकांचे दंडक मोडून त्यांना आपल्याकडे आकर्षून घेतो. नेहमीं प्रसंगमानावर दृष्टि ठेऊन नेमकीं भेदक वचनें बोलतो. उदास वृत्तीच्या

गुमानें उठून जातो. मग लोक त्याला शोधून काढतात व शरण जातात. पण तो सहज सांपडत नाहीं. फार शोधावें लागतें. त्याचा वेष हीनादीनासारखा असतो. दिसायला भिकाऱ्यासारखा पण गुप्त रूपानें (आपलें रूप कळूं न देतां) उदंड कामें करतो. तो न सांपडला तरी त्याची कीर्ति सर्वत्र पसरलेली असते. ठिकठिकाणीं भजनाचें कार्य उत्पन्न करून आपण निसटतो. मत्सरमतांचा गुंता चुकवावा म्हणून जेथें कोणी पाहूं शकत नाहीं, अशा अवघड कडेकपारींच्या जागीं कठिण (रानटी) लोकांत नियमानें जाऊन राहतो व तेथून सर्वांची काळजी वहातो. लोक त्याला धुंडीत येतात. तो कट्ट घालून – जूट निर्माण करून किंवा कंबर बांधून – लोक राजकारणाला लावतो. जिकडेतिकडे लोकांचे समुदाय उभे राहून त्याचा त्यावर गुप्त रूपानें ताबा चालतो. त्याचे ताबे, लोकांची गर्दी यांचें फळ काय, तर चहूंकडे लांबवर परमार्थबुद्धि पसरते, उपासनेचा जागजागीं गजर चालू होतो. त्याच्या प्रत्ययानें प्राणिमात्रांची सुटका होते. याप्रमाणें लोकांच्या उद्धाराचे अनेक अडाखे (कैवाड) त्याला ठाऊक असल्यानें लोक शहाणे होतात. त्यांच्या अंगीं प्रत्यय बाणतो. जन्मास येऊन अशी कीर्ति करावी. 'दास म्हणे हें स्वभावें। संकेतें बोलिलें॥ ३०'. 'दास' हा शब्द समासाच्या स्वतंत्र लेखनाचा द्योतक आहे.

**तिसरा** समास 'श्रेष्ठ अंतरात्मा' या नांवाचा असला तरी त्याचा निर्देश १९व्या ओवींत असून त्याच्या अनुरोधानें जगांत श्रेष्ठ होण्याच्या उपायांचा उपदेश आहे. पहिल्या ओवींत मूळ मायेपासून पंचीकरण पसारा सैरावैरा वाढला. त्यांत जो जाणीवरूप (अंतरात्मा) दोरा आढळतो तोसुद्धां तत्त्वांपैकींच; परंतु त्याची योग्यता राजासारखी आहे. फौजेचीं माणसें व राजा यांत अस्थिमांसाच्या दृष्टीनें फरक नसला, तरी राजा उंच सिंहासनावर बसतो, तसा अंतरात्मा तत्त्वरूप आहे, पण इतर तत्त्वांहून श्रेष्ठ आहे. जाणीव–ज्ञान–हें त्याच्या श्रेष्ठतेचें कारण आहे. याच न्यायानें मनु चक्रवर्ती यांना थोरवी दिली जाते. 'विवेकें बहुत पैसावले। म्हणौन अवतारी बोल्लिे। ५'. उदंड जाणीव जेथें दिसेल तो सदेव. ज्याची जाणीव थोडी तो निर्देव. व्यापआटोप करणें, धक्केचपेटे सोसणें, या गुणांचीं माणसें पाहतां पाहतां सदेवाच्या कोटीस चढतात. साधारणपणें जो आधीं उपजला त्याला थोर समजण्याची वहिवाट आहे. पण वयानें लहान असलेल्या राजाला वृद्ध नमस्कार करतात असाहि अनुभव आहे. विवेकाची गति अशी विचित्र आहे. धाकटा भाग्यास चढला तर लोक

त्याविषयीं तुच्छता दर्शवितात; म्हणून 'सलगीच्या लोकांला। दुरी धरावें ॥ १३'. 'नेमस्त वचन कळेना, नेमस्त नये राजकारण (चातुर्य) । तरी उगीचच थोरपण। मिरविणें ॥' हा मूर्खांचा स्वभाव आहे. गुण नसतां वयाच्या वडीलपणाला कोणी विचारीत नाहीं. गुणाखेरीज वडीलपण अप्रमाण ठरतें (१७). वयाचें वृद्धत्व आणि गुणांचें श्रेष्ठत्व यांचा एकमेकांशीं संबंध नाहीं. तथापि वडिलांस मानावें. वडिलांनीं आपल्या वडीलपणाचा बोज राखावा. नाहीं तर थोरपणीं कष्टावें लागतें. सृष्टीच्या व्यापारांत अंतरात्मा वडील असून तो जेथें चेतेल तेथें महिमा वाढतो. हें जाणून प्रत्येकानें विवेकपूर्वक शहाणें व्हावें. विवेक नसेल तर तोल सुटतो. तोल गेल्यास कुठें तरी आड जागीं (कीर्तीच्या अभावीं) आयुष्य झांकल्या स्थितींत दवडण्याची पाळी येते. बायकादेखील मग शिव्या देतात. मूर्खपण पदरीं बांधलें जातें. यासाठीं प्रत्येकानें आयुष्य सार्थकीं लावावें. हें कळत नसेल तर ग्रंथ पाहावे. शहाण्याला लोक जवळ करतात. मूर्खाला पिटाळून लावतात. जीवाला संपत्ति आवडते, म्हणून शहाणें व्हायला पाहिजे. या शहाणपणाचा उपाय कोणता? समर्थांनीं हाक देऊन म्हटलें आहे : 'आहो या शाहाणपणाकारणें। बहुतांचे कष्ट करणें। २५'. कष्ट पडले तर पडूं द्यावे, 'परंतु शाहाणपणा शिकणें। हें उत्तमोत्तम ॥' एखादा मनुष्य शहाणा आहे हें ओळखायचें कसें? 'जो बहुतांस मानला। तो जाणावा शाहाणा जाला। २६' हें त्या प्रश्नाचें उत्तर आहे. शहाण्याला जगांत कांहीं उणें पडत नाहीं. स्वहित करीना तो आत्मघातकी व महापातकी समजावा. मूर्ख स्वतः कष्ट सोसतोच व लोकहि त्याला धिक्कारतात. साधकाला हें शिकविलें, 'मानेल तरी सुखें घ्यावें। मानेल तरी सांडावें। येकीकडे ॥ २९'

**चौथा** समास 'शाश्वतब्रह्मनिरूपणा'चा आहे. पहिल्या १७ ओव्यांत 'जितुका कांहीं जाला आकार। तितुक्यास पृथ्वीचा आधार।' हा विषय घोळून, पुढें पृथ्वीखेरीज इतर भूतांचा लय कसा होतो हें सांगून शाश्वत ब्रह्माच्या विवेचनाकडे २४ ते ३१ या ओव्या लावल्या आहेत. पृथ्वीवरील सर्व पदार्थ अखेरीस पृथ्वींतच मिसळतात, हा विषय परिचयाचा आहे. भूतांच्या विल्याचें येथें अगदीं थोडक्यांत सोपें स्पष्टीकरण आहे. 'जें जें जेथें निर्माण होतें। तें तें तेथें ल्या जातें। २२'. 'भूत म्हणिजे निर्माण जालें। पुन्हां मागुतें निमालें। पुढें शाश्वत उरलें। परब्रह्म तें ॥ २३'. तें परब्रह्म जोंवर कळलें नाहीं तोंवर जन्ममृत्यूचें रहाटगाडगें थांबत

नाहीं. जडाचें मूळ चंचळ, चंचळाचें मूळ निश्चळ व निश्चळाला मूळ नाहीं. 'पूर्वपक्ष म्हणिजे जालें। सिद्धांत म्हणिजे निमालें। पक्षातीत जें संचलें। परब्रह्म तें ॥ २६'. या संबंधांत भीड धरून चालणार नाहीं. भीड असेतोंवर मायेंतून सुटका नाहीं. मायेचें निःशेष निरसन हेंच आत्मनिवेदन. येथें विज्ञानाचा निर्देश आहे. 'लोकांचे बोलीं जो लागला। तो अनुमानें च बुडाला। याकारणें प्रत्ययाला। पाहिलें च पाहावें ॥ ३१'.

**पांचवा** समास 'चंचळलक्षण निरूपण' या नांवाचा आहे. हें निरूपण मायेचें आहे. सृष्टीच्या उभार-संहाराचा विषय गोष्टीच्या रूपानें सांगितला तरी कांहींसा दुर्बोध आहे. पुरुष प्रकृति, त्रिगुण पंचभूतें यांचा संकेत पहिल्या ओवीच्या दोन चरणांत दाखवून मधल्या अधोर्ध्वांच्या पोकळींत यांचा खेळ इंद्रफणी-सारखा चालला आहे. मांजर आणि साप हीं ज्याप्रमाणें एकमेकांकडे वैराच्या टवकाऱ्यानें पाहतात व वागतात, तसाच पंचभूतांचा व्यवहार असतो. पणजा पणतोंडांना गट्ट करतो. सांप्रदायिक अर्थाप्रमाणें पणजा म्हणजे अग्नि हा वनस्पत्यादि पदार्थांना खातो. मुलगा बापाला मारतो. दुसरा अर्थ तमोगुण जाणीवेचा नाश करतो, किंवा सत्त्वगुणाचा रजोगुण धुव्वा उडवितो, असा आढळतो. पणजा ते पणतू या चौघां जणांची राजा चुकवाचुकव (चुकाऱ्या) करीत जातो. तों निर्विकार असतो (निर्विकार हा शब्द परब्रह्मवाचक वाटतो). देव देवळांत लपून राहतो व देवळाच्या पूजेला पावतो. आकार, मूर्ति, व्यक्ति हें देऊळ व अंतरात्मा म्हणजे देव. पुरुष प्रकृति हीं नांवें दोन, पण ही दोन्ही एकच असून नांवावरून वाटणारा स्त्री, पुरुष हा भेद खरा नव्हे. जीव हा ब्रह्मांश असूनहि मायेच्या गोंधळांत तो स्वतःला ओळखीनासा होतो. सारे प्राणी अंतरात्मा सर्वांचा एक असतांहि एकमेकांपासून फुटलेले आहेत. वेलींत पाणी असून बाहेरून ती कोरडी वाटते. कित्येक झाडें अंतराळांतच वाढतात. त्यांची वाट कुठेंहि व कशीहि झाली तरी त्यांच्या ठिकाणीं अंतरात्मा एकच असतो. झाडेंदेखील बोलकीं असतात व एकमेकांना आपले भाव कळवूं शकतात. (या विवेचनांत प्रामुख्यानें झाडांचाच दाखला समर्थांनीं घेतलेला आहे.) जें व्हायचें तें आधींच होऊन गेलेलें असून लोक आपापल्या कल्पनेनें त्याचें स्पष्टीकरण करतात (१६). सर्वांत वडील कोण हें ओळखावें, मग जगदांतराच्या ज्ञानानें 'भेटे आपणास आपण ॥ १८' असा अनुभव येतो. 'अंतरनिष्ठांची

उंच कोटी। बाहेरमुद्राची संगती खोटी। १९'. अंतरें राजी राखल्यास 'भलत्यास भलता च' नावाजूं लागतो (२०). अंतर न राखतां आल्यास भाजीसुद्धां मिळायची नाहीं. हा प्रत्यक्ष अनुभव विचारांत घेऊन 'अलक्षीं लावावें लक्ष'. मनास मन मिळालें कीं परब्रह्मास पोंचून चंचळ चक्राच्या पलीकडे जातां येतें. एकदां असा साक्षात्कार झाला कीं ब्रह्म सन्निधच असतें; पण डोळ्यांना मात्र दिसणारें नसतें. शरीरांतील साऱ्या हालचाली (चळवळ) चंचल असून परब्रह्म हें सर्वत्र निश्चळ असतें. चंचळ हें अपुरें असून त्याला इतर चंचळाची संपूर्ण परीक्षा करतां येत नाहीं; तर निश्चळाला तें कशी गवसणी घालूं शकणार? येथें दारूच्या बाणाचा दृष्टांत योजला आहे. 'गगनीं चालिली हवावी। कैसी पावेल पार पदवी। जातां मधें च विझावी। हा स्वभाव चि तिचा॥ २७'. एकदेशी मनोधर्म ब्रह्म आकळायला लागला तर त्याची बाणाप्रमाणें वाट लागून तो निर्गुणाऐवजीं 'सर्व ब्रह्म' या कल्पनेंत रमतो. शेवटीं 'महत्तत्त्व महद्भूत। तो चि जाणावा भगवंत' असें बोलून उपासना येथेंच थांबते असें म्हटलें आहे. उपासनेच्यापुढें ज्ञानाचा आरंभ होतो. परब्रह्मांत ज्ञानाचें विज्ञान होतें (३२).

हा समास कांहींसा दुर्बोध असून त्यांतील पहिल्या सांकेतिक भागाचें सांप्रदायिक स्पष्टीकरण पुरेसें समाधानकारक वाटत नाहीं.

**सहावा** समास 'चातुर्यविवरणा'चा आहे. याच्या पहिल्या ओव्या मागील समासांतल्याप्रमाणें सांकेतिक आहेत. तेज पिवळें, त्यांतून काळें (काजळ) निपजून भूमंडळांत पसरलें. काजळाची शाई बनवून तिच्या साह्यानें ग्रंथलेखन साधतां येतें. ज्ञानाचा प्रसार ग्रंथ सर्वत्र करतात. महीसुत—बोरू—तासून त्याचें टोक चिरलें, म्हणजे लेखणी तयार केली, कीं मग सगळा कारभार चालू होतो. पांढऱ्या कागदाची पांढऱ्या नसलेल्या बोरूशीं शाईच्या योगानें गांठ पडल्यावर इहलोकाची सार्थकता होते. 'सकळांस जें मान्य। तें चि होतसे सामान्य।' सामान्य व अनन्य हें निराळें (६). उत्तम, मध्यम, कनिष्ठ ही वर्गवारी टळत नाहीं. सर्वांचें नशीब सारखें नसतें. चौदा पिढ्यांचे पोवाडे गाणारे हे शहाणे कीं वेडे, पोवाड्यांतील वर्णनाप्रमाणें खरो-खरीच घडतें कीं न घडतें 'ऐसें पहावें॥ ८'. (सांप्रदायिकांनीं चौदा पिढ्यांचा अर्थ १ निर्गुण, २ मूळमाया, ३ गुणमाया, ४ सत्त्वगुण, ५ रजोगुण, ६ तमोगुण, ७ आकाश, ८ वायु, ९ तेज, १० पाणी, ११ पृथ्वी, १२ ओषधि, १३ अन्न, १४ रेत,

याप्रमाणें लावला आहे. श्रीरामदासी संशोधन खंड १, बाडांक १५८, पान १९१-१९२. हें बाड सुमारें दीडशें वर्षांहून थोडेंसें जास्त जुनें आहे) कागदावरील लेखनाच्या रेघा पुसून टाकतां येतात तर अदृष्टांतील रेघा प्रयत्नानेंदेखील पुसल्या जाणार नाहींत असें कां म्हणावें? बहुतांच्या बोलीं लागल्यास अनुमानांत बुडणें प्राप्त; याकरितां सर्वांचें ऐकावें, पण तें खरें कीं खोटें हें अनुभवाच्या कसोटीनें ठरवावें. कोणाला नाहीं म्हणूं नये. अपाय उपाय समजून घ्यावे. बडबडींत अर्थ नाहीं. माणूस हेकट कच्चें असलें तरी त्याचें बोलणें ऐकून घ्यावें. सारांश, बहुतांचें अंतर राखावें. पोटांत पीळ पेच वळसा असेल तर दुसऱ्याचें समाधान करतां येणार नाहीं. 'वेडें करावें शाहाणें । तरी च जिणें श्लाघ्यवाणें । १५'. मिळून जाऊन मिळवावें. प्रसंगीं पड खाऊन शिरजोरी उलथावी. आपण काय करतों हें कळूं मात्र देऊं नये. दुसऱ्याच्या चालीनें चालावें; दुसऱ्याच्या बोलीनें बोलावें; दुसऱ्याच्या मनोगतानें मिळून जावें; हित करावयाचें तर दुसऱ्याला झेपेल, मानवेल इतक्या बेतानें त्याचें अंतर उघडीत जावें. आधीं अंतर हातीं घ्यावें, मग हळुहळू उकलावें. पारलौकिक सद्गतीचें ध्येय सिद्ध करावें. दोन हेकाडांची गांठ पडल्यास भांडण हा परिणाम ठरलेला आहे. बडबड सोपी, कृति अवघड हें सर्वांना माहीत आहे. दुसऱ्याला वश करणें सोपें नाहीं. 'धके चपेटे सोसावे । नीच शब्द साहात जावे' तेव्हां दुसरा पस्तावून आपला होतो. प्रसंगोचित बोलावें, शहाणपण दाखवूं नये, जेथें तेथें लीनतेनें प्रवेश करावा. 'कुग्रामें अथवा नगरें । पाहावीं घरांचीं घरें । भिक्षामिसें लहानथोरें । परीक्षून सोडावीं ॥ २४'. पुष्कळांच्या मेळ्यांत कांहीं ना कांहीं सांपडतें—'बहुतीं कांहींतरी सांपडे ।' मैत्री घडते यासाठीं फिरणें विवरणें अवश्य आहे. सावधपणानें आधींच सर्व बातमी काढावी. जेथें जाववेल तेथेंच विवेकसहित जावें. पाठांतरानें सकळांचीं अंतरें निवतीं. लिहून देण्याच्या परोपकाराला मर्यादा नसावी. ज्याला जें हवें, तें त्यास दिल्यानें श्रेष्ठता व मान्यता लाभते. 'भूमंडळीं सकळांस मान्य । तो म्हणों नये सामान्य । २९' त्याच्याशीं लोक अनन्य रहातात. हीं चातुर्याचीं लक्षणें असून चातुर्यानें दिग्विजय घडतो. मग कांहीं उणें पडत नाहीं.

**सातवा** समास 'अधोर्धनिरूपणा'चा आहे. 'अधःऊर्ध्व' या शब्दाचा 'अधोर्ध' हा अपभ्रंश असून अधः—खालीं, उर्ध्व—वर असा त्याचा अर्थ आहे. 'ऊर्ध्वमूलमधःशाखं' या गीतोक्त वृक्षाचें प्रतिबिंब या समासांत भरलेलें आहे.

अचंचळांतील जें सूक्ष्म रूप चंचळ–मूळमाया–तें नाना विकारांचें बीज किंवा मूळ असून तिच्यांत ब्रह्मांतील स्फुरणाची जाणीव आहे. षड्गुणेश्वर, प्रकृतिपुरुष, शिवशक्ति, अर्धनारीनटेश्वर हीं नांवें एकाच वस्तूचीं दर्शक असून तिलाच जगज्जोती म्हणतात. संकल्पाचें स्फुरण किंवा चलन तो वायु, मग त्रिगुण पंचभूतें हीं उत्पन्न झालीं. हा सृष्टिक्रम वेलाच्या दृष्टांतांत गोविला आहे. एक वेल आहे. त्याच्या मुळ्या खोल असून त्यांनाच फळें, फुलें, पानें लगडतात. स्वाद, विकार, तरंग, रंग हेसुद्धां मुळ्यांवरच उद्भवतात. मुळ्या फोडून पाहिल्यास कांहींच आढळत नाहीं. वेल कड्यावरून खालीं वाढत जातो. मूळ माया, पंचभूतें, त्रिगुण यांची रचना या वेलासारखी आहे. १०–१५ ओव्यांत वेलाचा विस्तार, संहार, पुनः उदय यांची माहिती आहे. वेलाच्या वाढझडींत जीव जगतात. मूळ खणून अनुभवाच्या ज्ञानानें काढून टाकलें तर मग पुनः त्याची वाढ होत नाहीं. 'जेथील अंश तेथें वृष्टी। न होतां जातो ॥ १८'. जाण्यायेण्याचे फेरे आत्मज्ञानी पुरुषासंबंधांत थांबतात. आत्मज्ञान मिळवावें लागतें म्हणजे त्याच्या लाभाचा उद्योग करावा लागतो. याचें मूळ जो अंतरात्मा तो आपल्याजवळच असून बहुधा कुणालाच कळत नाहीं. जें आपलें अंतर, तद्रूपच जगदांतर असतें. वरून मात्र देहाकार, पण त्यांचे विकार भिन्न असतात. एका देहांतील अवयवाच्या वेदना दुसऱ्या अवयवाला जाणवत नाहींत तर सर्वस्वीं जें दुसरें शरीर त्याचें अंतर कसें समजणार? ज्ञानदृष्ट्या आत्म्यांत भेद नाहीं. भेद देहप्रकृतीचा असतो व तो कळणारा आहे. पाहून, ऐकून, जाणून शहाणे अंतराची परीक्षा करतात. धूर्तांना हें सारें गुप्तरूपें (कोणास कळूं न देतां) समजतें. कुणावर विश्वास ठेवायचा झाल्यास त्याचें मनोगत आधीं ओळखण्याची रीत आहे. स्मरणामागून विस्मरण या न्यायानें आपल्याजवळच्या ठेवीची दाद नाहींशी झाली आहे. हें चंचळ चक्र कांहीं सरळ तर कांहीं वांकडें असें आहे. कोणी इंद्र तर कोणी रंक असा भेद अनुक्रमें स्मरणास्मरणानें घडतो. स्मरण म्हणजे देव, विस्मरण म्हणजें दानव, स्मरणविस्मरणाचें मिश्रण म्हणजे मानव (३५). यावरून दैवी व दानवी अशी दोन तऱ्हेची संपत्ति मानली गेली आहे (गीता : १६). आरशांतलें डोळ्यांचें प्रतिबिंब आपल्या डोळ्यांनींच पहावयाचें असतें, त्याप्रमाणें विवेकानें विवेक, आत्म्यानें आत्मा, स्थूलानें स्थूल, सूक्ष्मानें सूक्ष्म, खुणेनें खूण, विचारानें विचार, अंतरानें अंतर ओळखावें, जाणावें लागतें. दुसऱ्याच्या

हृदयांत शिरून तें आकलन करावें लागतें. स्मरणांत विस्मरण हें भेदाचें लक्षण आहे. तुर्या म्हणजे स्मरण, सुषुप्ति म्हणजे विस्मरण; हीं दोन्ही शरीरांत असतात.

**आठवा** समास 'सूक्ष्मजीवनिरूपणा' चा आहे. रेणूहून अनेक जीव सूक्ष्म असतात. त्यांचें आयुष्य आकारासारखेंच थोडें व युक्तिबुद्धीचें सामर्थ्यहि तसेंच अल्प असतें. हे जीव इतके लहान असतात कीं, ज्या मुंगीबद्दल 'मुंगीस मुताचा पूर। ऐसें बोलती॥' ती मुंगीदेखील हत्तीप्रमाणें त्या सूक्ष्म जीवांना प्रचंड वाटते. जीवांचे आकार लहान असोत वा थोर असोत, त्यांत जीवेश्वर मात्र वस्ती करून असतो. ६–१४ इतक्या ओव्यांत या जीवांचें वर्णन असून पुढें 'जेथें जीवन तेथें जीव' या नियमान्वयें पाण्यांतल्या जीवांची माहिती आहे. कित्येक पक्षी आकाशांत जन्मास येऊन आकाशांतच पंख फुटून उडतात (१९). याप्रमाणें खेचर, भूचर, वनचर, जलचर इत्यादि जीवांचे ८४ लक्ष योनिप्रकार आहेत. पुढें कल्पनेपासून उद्भवणाऱ्या प्राण्यांविषयीं जें विवरण आहे त्यांत समर्थांच्या विश्वासाचे कांहीं विषय आहेत. इच्छेचे, शापाचे, बाजीगरीचे, वोडंबरीचे जसे देह आढळतात तसे क्रोधापासून, तपापासून जन्मास येणारे व उःशापाचेहि देह असतात. हें भगवंताचें करणें किती म्हणून सांगावें? मायेच्या गुणानें तें होत जातें (२५). पोटापुरत्या विद्येनें प्राणी ज्ञातेपणाचा गर्व मिरवितात. पण खरा ज्ञाता असें एका अंतरात्म्या-बद्दलच म्हणतां येतें. पिंडांतसुद्ध उदंड प्राणी आहेत. आपल्या देहाचें जर योग्य ज्ञान आपल्यास होत नाहीं तर बाकीच्या अनंत देहांचें ज्ञान कसें असणार? परंतु 'लोक होती उतावळे। अल्पज्ञानें॥ ३०'. अणुरेणूसारख्यांचे आपण विराट् पुरुष ठरतों व त्यांच्या हिशोबानें माणसाचें आयुष्य उदंड वाटणें स्वाभाविक आहे. त्या प्राण्याच्या जीवनाचेहि दंडक आहेत, तथापि ते कळणें कठिण आहे. परमेश्वराच्या करणीचें अनुमान करवत नाहीं. तरी अहंतेच्या प्रभावानें मनुष्य भ्रमांत पडतो. खरें पाहिल्यास मनुष्याचें जिणें थोडें आहे. गर्व धरल्यास रडावें लागतें. देहाची जन्मकथा घाणेरडी आहे. याला थोर कोणत्या हिशेबानें म्हणावयाचें तें कळत नाहीं. 'काया माया दों दिसांची। आदिअंतीं अवघी ची ची। झांकातापा करून उगी चि। थोरवी दावती॥ २८'. शरीर झांकलें तरी कुजून घाण सुटते—'जो कोणी विवेकें पवाडे। तो चि धन्य॥ ३९'. भांडणतंटे सोडून व अहंतेचे पुंडावे मोडून 'विवेकें देवास धुंडावें। हें उत्तमोत्तम॥ ४०'.

**नववा** समास 'पिंडोत्पत्तिनिरूपण' नामक आहे. सर्व प्राणी उदकानें वाढतात हा विचार घेऊन त्याचा १५ ओव्यांत विस्तार केला आहे. बीज भुईंत पडल्यावर त्याला मूळ व अग्र असे दोन दिशांना जाणारे दोन फांटे फुटतात. 'मुळ्या चालिल्या पाताळीं। अग्रें धांवती अंतराळीं। नाना पत्रीं पुष्पीं फळीं। लगडलीं झाडें ॥ १३'. फळाहून वडील फुलें, पानें फुलाहून वडील, पानाहून वडील काष्ठें, त्याहून वडील मुळ्या, 'मुळ्यांवडिल तें उदक'. उदक आळून भूमंडळाचें कौतुक उदय पावलें. तेव्हां पृथ्वीहून वडील पाणी, 'तयावडिल अग्निदेव', त्याहून वडील वायुदेव, सकळांवडिल अंतरात्मा, असा वडिलकीचा क्रम सांगून दुरात्मा शब्दावर एक कोटी केली आहे. 'दुरात्मा म्हणजे दुरी आत्मा। १८'. अंतरात्म्याला ओळखून त्याशीं अनन्यत्व झालें कीं प्रकृतीचा स्वभाव पालटतो. 'करी आपुला व्यासंग। कदापि नव्हे ध्यानभंग। बोलणें चालणें वेंग। पडों च नेदी ॥ २१'. वडिलानें काय केलें तें पहावें. 'तो वडिल (अंतरात्मा) जेथें चेतला। तो चि भाग्यपुरुष जाला। अल्प चेतनें तयाला। अल्पभाग्य ॥ २३'. त्या नारायणाचें मनांत अखंड ध्यान राहील तर त्याला सोडून लक्ष्मी जाईल कुठें ? 'नारायेण असे विश्वीं। त्याची पूजा करीत जावी। याकारणें तोषवावी। कोणीतरी काया ॥ २५'. अंतरात्म्याची उपासना विश्वपाळिती आहे. कारण अंतरात्माच सर्वत्र भरला आहे. आत्माराम नाहीं अशी जागाच नाहीं, म्हणून रामानें सारेंच आवरलें आहे असा अनुभव येतो. येथें अंतरात्मा, आत्माराम व राम याप्रमाणें शब्दांत पालट करीत समर्थ आपल्या उपास्यदैवतापर्यंत येऊन पोंचल्याचें वाचकांना उमगेल. समर्थ बजावतात : 'ऐसी माझी उपासना। आणितां नये अनुमाना। नेऊन घाली निरंजना। पैलीकडे ॥ २९' कर्म, उपासना, ज्ञान, शास्त्र, मतें हीं सर्व देवानेंच सांगितलीं आहेत. देवाला हें सारें करावें लागतें. त्यांतून जेवढें घेववेल तेवढें घ्यावें, 'अधिकारासारिखें चालावें। म्हणिजे बरें ॥ ३२'. आवाहन, विसर्जन अशीं विधानें आहेत. येथवर पूर्वपक्ष सांगितला. पुढें सिद्धांत आहे. 'वेदांत सिद्धांत धादांत। प्रचित प्रमाण नेमस्त। पंचिकर्ण सांडून हित। वाक्यार्थ पाहावा ॥ ३४'.

**दहावा** समास 'सिद्धांतनिरूपणा'चा आहे. याची सूचना मागील समासाच्या शेवटीं मिळालेली आहे. 'गगनीं अवघें होत जातें। गगना ऐसें तगेना तें। १'. या कल्पनेचें स्पष्टीकरण पहिल्या ४ ओव्यांत आहे. अंधार, प्रकाश, उन्हाळा, हिंवाळा

हा खेळ आकाशांत चालतो, पण नाश पावतो. 'ऐसें जें कांहीं वाटलें। तें तें जालें आणी गेलें। आकाशासारिखें तगलें। हें तों घडेना ॥ ४'. उत्तम जाणिवेच्या साह्यानें आकाश, उदक, वायु, आत्मा इत्यादि तत्त्वांचें विवरण करतां करतां 'निवृत्तिपदीं अखंड भेटी। जालियानें तुटी। होणार नाहीं ॥ ८'. ज्ञानाचें विज्ञान, मनाचें उन्मन आणि तत्त्वदर्शनाच्या विवेकानें अनन्यत्व लाभतें. अंतरात्म्याचा शोध घेतला तेव्हां 'चंचळाचें निश्चळ जालें'. तेथें देवभक्तपण विराम पावतें. हा विषय बोलून दाखविण्याजोगा नाहीं, पण कळण्यासाठीं कांहीं तरी बोलावें लागतें. अज्ञान-शक्ति गेली, ज्ञानशक्ति मावळली. वृत्तिशून्यत्वानें शक्तिपात होतो तो असा. या स्थितींत चंचळाला थाराच नाहीं. ही स्थिति ब्रह्मभावाच्या निर्विकार एकान्ताची आहे. महावाक्याचा विचार करण्याचा अधिकार वस्तुतः संन्याशाचा; परंतु दैवी कृपेचा पुरुष त्याचेंहि विवरण करतो. संन्यासी कोण तर ज्यानें षड्विकारांचा न्यास (त्याग) केला आहे तो. व्याख्येप्रमाणें जेवढे विचारवंत तेवढे संन्यासी गणावे. ही करणी (थोरवी) ज्याच्या त्याच्या हातांत आहे. जे विचारी समजले ते निस्संग होऊन गेले. देहाभिमानी मात्र देहाभिमानाचें रक्षण करीत मागें राहिले. जें अलक्ष आहे तेथें मन गुंतलें कीं पूर्वपक्ष संपला. नंतर ब्रह्मभावाच्या प्राप्तीचा हेतु ज्याचा, तो अंतरात्माहि गेला. ही मधली अडचण निघाल्यावर आपण व ब्रह्म एकच होऊन जातों. 'आकाश आणि पाताळ। दोनी नामें अंतराळ। काढितां दृश्याचें चडळ। अखंड जालें ॥ २०'. आकाश, पाताळ हीं मधल्या दृश्याच्या पसाऱ्यानें दोन वेगळीं वाटतात. हा पसारा काढून घेतला म्हणजे त्यांचा अखंडपणा प्रत्ययास येतो. तसेंच ब्रह्म व आपण एकच असतां मन उपाधींत अडकून भेद उत्पन्न करतें. उपाधिनिरास झाल्यावर शब्दांनीं समजावून द्यावें असें कांहीं उरतच नाहीं. शब्दाच्या व कल्पनेच्या पलीकडे मनबुद्धीला अगोचर असें जें कांहीं आहे तें अंतर्यामीं विचारानें आकलन करावें. विचारानें जें कळतें तेंहि वायां जातें. तें काय व कसें आहे याचा बोध शब्दांनीं करून देणें शक्य नाहीं. वाच्यांशाचें मर्म लक्ष्यांश, त्याचा शोध घेऊन अलक्ष्यांत उडी पडल्यावर पुढें समजणें व त्याविषयीं बोलणें या क्रिया होऊंच शकत नाहींत. 'शाश्वतास शोधीत गेला। तेणें ज्ञानी साच जाला। विकार सांडून मिळाला। निर्विकारीं ॥ २५'. दुःस्वप्न जागृतावस्थेंत मिथ्या ठरतें व आठवलें तरी मिथ्याच असतें. प्रारब्धयोगानुसार देह राहो वा

जावो, ‘ विचार अंतरीं बैसे । चळेना ऐसा ।। २७ ’. भाजलेलें बीज वाढत नाहीं. ज्ञात्याच्या वासनाबीजाची अशी अवस्था असते. निश्चळास ध्याईल तो निश्चळ, चंचळास ध्यातो तो चंचळ, भूताचें ध्यान करणारा तो केवळ भूत होतो. हें सर्व मिथ्या असल्याचा बोध विचारानें सदृढ झाला म्हणजे तत्काळ तो (उपासक) निर्भय होतो. उपासनेमुळें प्राप्त होणाऱ्या ज्ञानाचें ऋण फेडावयाचें तर भक्तजन वाढविणें हा उपाय आहे. ‘ अंतरीं विवेकें उमजावें । सकळ कांहीं ।। ३३ ’.

## • १६ •

या दशकाचें ‘ सप्ततिन्वय ’ असें नांव असून त्याचा अर्थ सप्तसप्ति म्हणजे सूर्य व त्याचा अन्वय अर्थात् वंश याप्रमाणें ओढाताणीनें करावा लागतो. समासाचा विषय पंचभूतें हा प्रामुख्यानें असल्यामुळें ‘ सूर्यवंश ’ हा अर्थ पटत नाहीं. गिरिधरानें ‘ तत्त्वान्वय ’ असें या दशकाला जें नांव दिलें आहे तें विषयाकडे पहातां जास्त सयुक्तिक ठरतें. पण रूढि ‘ सप्ततिन्वया ’ची पडलेली आहे.

**पहिला** समास ‘ वाल्मीकस्तवना’चा आहे. यांत वाल्मीकि ऋषीच्या लोकप्रसिद्ध चरित्राचा थोडक्यांत पाढा वाचलेला आहे. वाल्हा कोळी तप करीत असतां त्याच्या देहाभोंवतीं वारूळ वाढलें व त्यावरून वाल्मीकि हें नांव त्यास मिळालें, इत्यादि प्रचलित चरित्र गौरवाच्या शब्दांनीं या समासांत सांगितलेलें आहे.

**दुसरा** समास ‘ सूर्यस्तवना ’चा आहे. सूर्याचा वंश सर्वांत श्रेष्ठ असा प्रारंभ करून पुढें सूर्यप्रकाशामुळें जगाचे सारे व्यवहार चालतात, असें वर्णन आहे. आंधळ्यांच्या बुद्धीचा प्रकाशदेखील सूर्यप्रकाशाच्या प्रभावाचा असतो (९). अंगांतील जिवंतपणाची उष्णता त्या प्रकाशावरच अवलंबून आहे (१०). ‘ जितुके संसारासी आले । तितुके सूर्याखालें वर्तले । अंतीं देहे त्यागून गेले । प्रभाकरादेखतां ।। १३ ’. या आल्यागेल्यांत हरिहरांच्या अनंत मूर्ती व शिवशक्तीच्या अनंत व्यक्ती यांनाहि जमेस धरावें लागतें. रघुनाथाच्या समुदायाशीं अंतर्भाव गुंतल्यामुळें मी वाग्दुर्बळ असूनसुद्धां सूर्याची महती गाण्याला प्रवृत्त झालों, असें समर्थांनीं म्हटलें आहे (२१). शेवटीं ‘ सकळ दोषाचा परिहार । करितां सूर्यास नमस्कार । स्फूर्ति वाढे निरंतर । सूर्यदर्शन घेतां ।। २२ ’ याप्रमाणें समारोप आहे.

सूर्याचें नित्यदर्शन घ्यावें या समर्थदंडकाचा निर्देश मागें केलेला आहे. असेंच सूर्यप्रशंसेचें प्रकरण श्रीरामदासांची कविता, खंड १ मध्यें पान ३९२–३९३ मध्यें आहे. त्यांत

**या सूर्यमंडळा खाल्यें । कितेक होत जातसे ।**
**औतारी वर्तले गेले । गेले दानव मानवी ॥ ५**

अशी माहिती वरील वर्णनाशीं जुळणारी आहे. करुणाष्टकें वगैरेमध्यें महिम्न धाटीचें समर्थकृत शतश्लोकी प्रकरण असून त्यांत रवीची स्तुति (पान१३७–१३८) या समासांतल्यासारखीच आहे. जिज्ञासूंनीं हीं प्रकरणें मुळांतून पहावीं.

**तिसरा** समास 'पृथ्वीस्तवना'चा आहे. पृथ्वी हा सर्व जीवांचा मुख्य आधार असून त्याची लोकांकडून सहजगत्या कशी व किती विटंबना होते याची वाच्यता प्रारंभीं करून पृथ्वीवरील पदार्थांची, त्यांच्या देखाव्यांची व गुणांची माहिती आहे. पृथ्वीवरच महाबळी पुरुष धामधूम उडवितात व अवतारी होऊन जातात. 'कित्तेक भूमी माझी म्हणती । सेवटीं आपण चि मरोन जाती । कित्तेक काळ होतां जगती । जैसी तैसी ॥ २९'.

पृथ्वीचें असेंच वर्णन पूर्वोक्त शतश्लोकींत आहे (करुणाष्टकें वगैरे, पान १३८-१३९). 'निदानीं ते सर्वै मरत चि भुमीमाजि भरती' याशीं समानार्थक वचन वर दिलेलें आहे. भागवत एकादश स्कंधाच्या टीकेंत एकनाथांनीं पृथ्वीची सहनशीलता सांगतांना 'येथ भूतीं पृथ्वी पूजिली । नातरी विष्ठा मूत्रीं गांजिली ।' किंवा 'पृथ्वी दाहे करूनि जाळिली । नांगर घालूनि फाळिली । लातवरी तुडविली । तोडिली झाडिली पैं भूतीं ॥' (अ. ७ ओ. ३६७ व ३७१) असा प्रकार नमूद केला आहे. या समासांत 'जाळिती पोळिती कुदळिती । नांगरिती उकरिती खाणती । मूळ मूत्र तिजवरी करिती । आणी वमन ॥ ३' या वाक्यांनीं एकनाथांचा वरील आशय येथें स्वीकारल्याचें स्पष्ट दिसतें. 'पृथ्वीते नानाभूतीं । माझी माझी म्हणोनि झोंबती । ३६३' या भावार्थाचा उल्लेख मागें केलेलाच आहे. भागवतांत पृथ्वी 'माझी माझी म्हणून, आपसांत युद्धें करून शेवटीं ह्या पृथ्वीवरच अनेक राजे मरून पडले' अशा अर्थाचा एक श्लोक आहे. यापेक्षां विष्णुपुराणांतील श्लोक (अ. ४ अ. २४) अधिक परिणामकारक असल्यामुळें जिज्ञासूंकरितां तो पुढें सादर केला आहे :

**पृथ्वी ममेयं सकला ममैषा ममान्वयस्यापि च शाश्वतेयम् ।**
**यो यो मृतो ह्यत्र बभूव राजा कुबुद्धिरासीदिति तस्य तस्य ॥ ६१**

**चौथा** समास 'आपनिरूपणा'चा आहे. पृथ्वीवरील पाण्याचें यांत वर्णन आहे. सकल जीवांचें जीवन म्हणून आपोनारायण अशी श्रेष्ठ संज्ञा असलेलें पाणी ज्या साधनद्वारां लोकांच्या अनुभवास येतें त्या सर्वांची नोंद यांत आहे. आवर्णोदक, समुद्र, मेघ, नदी, खळाळ, कूप, बावी, गायमुखें, पाट, कालवे, झरे, उकळ्या, कारंजीं, यांच्यासमवेत कंद, मुळें, फळें यांतील व उसांतील रस, गोरस, यांचाहि समर्थांनीं मान केला आहे. शरीरांतील शुक्र, रक्त, लाळ, मूत्र, स्वेद या द्रवांना तर ते विसरले नाहींतच, पण मोत्याचें पाणी, हत्याराचें पाणी यासारख्या लाक्षणिक अर्थालाहि प्रस्तुत वर्णनांत समर्थांनीं जागा दिलेली आहे. पृथ्वीचें मूळ पाणी, पाण्याचें अग्नि, अग्नीचें वायु, त्याहून थोर परमेश्वर, सर्वांहून थोर परात्पर ब्रह्म असें त्यांनीं येथें सांगून टाकलें आहे.

शतश्लोकींत पाण्याच्या उपयोगाचा विचार अधिक आहे.

**पांचवा** समास 'अग्निनिरूपणा'चा आहे. अग्नि हा सीतेचा पिता व रामाचा सासरा आहे. त्याच्या मुखानें भगवंत भोजन करतो. अग्नीमुळें पाणी आटून पृथ्वी जन्मास आली व लोकांना वस्तीकरितां स्थळ मिळालें. दीप दीपिका नाना ज्वाळ असें त्याचें जेथें तेथें दर्शन घडतें. जठराग्नि भूक उत्पन्न करतो व अन्नाची रुचि वाढवितो. अग्नि मंद झाला कीं प्रकृति बिघडते. अग्नीच्या बळानें शत्रु झटक्यास जिंकतां येतो (तोफखान्याचा हा उल्लेख वाटतो). अग्नीला विटाळ नाहीं. तो अंत्यजगृहींचा असला तरी पवित्रच. या वर्णनांत आतषबाजी हा अग्नीचा प्रकार नमूद केला आहे. 'लग्नें करिती थोर थोर । नाना दारूचा प्रकार । भूमंडळीं यात्रा थोर । दारूनें शोभती ॥ १५'. लोकांत जठरानल, सागरांत वडवानल, भूगोलाबाहेर आवर्णानल व शिवनेत्रांत विद्युल्लता असा सर्वत्र अग्नि आहे. कुपीपासून, आरशांतून, लाकडावर लाकूड घासल्यानें व चकमकेनें (लोखंड गारगोटीच्या घर्षणानें) अग्नि उत्पन्न करतो. आग्या साप आपल्या अंगाच्या दाहकतेनें गिरिकंदरें पेटवितो. 'जीत असतां सुखी करी । मेल्यां प्रेत भस्म करी । २४'. होम, वैश्वदेव, नंदादीप, नीरांजनें अशा रीतीनें तो लोकांच्या उपयोगास येतो. 'खरें खोटें निवडणें । दिव्य होतां ॥ २७'. चार शिंगें,

तीन पाय, दोन शिरें, सात हात असें त्याचें शास्त्रानें वर्णिलेलें रूप आहे (२९).

यांतली बरीच माहिती शतश्लोकींत आहे. येथें जो दारूचा प्रकार सांगितला आहे, त्याचा दाखला घेऊन समर्थांनीं देवाजवळ स्फूर्तीची मागणी करुणाष्टकें वगैरेंत केली आहे (पान ७६):

**हवाया नळे वाण भांडीं अनंतें। बळें सोडितां जाति आकाश पंथें॥**
**बती लागतां वेळ नाहीं उठाया। तयाचे परी स्फूर्ति दे देवराया॥ १**

सप्तसमासीच्या पहिल्या समासांत निरनिराळ्या प्रकाशांचें वर्णन आहे. त्यांत 'मुख्य प्रकाश सूर्याचा।' असें सांगून नंतर चंद्र, नक्षत्रें, वीज यांच्या प्रकाशाचा निर्देश आहे. मोंबत्त्या (मेणबत्त्या), चुड्या (मशाली), काकडे, आकाशदिवे यांचीं नांवें देण्याला समर्थ विसरले नाहींत. आंधळ्याच्या बुद्धींतील ज्ञानाचें श्रेय येथें सूर्याला दिलेलें आहे. सप्तसमासींत 'मतिप्रकाश' अंतरात्म्याचा असें म्हटलें आहे.

**सहावा** समास 'वायुस्तवना'चा आहे. वायू हाच सर्वांचा जीव हें प्रसिद्धच आहे. चलन, वलन, प्रसारण, निरोधन, आकोचन या पांच क्रिया प्राण, अपान, व्यान, उदान, समान अशा पांच वायूंच्या होत. नाग, कूर्म, कर्कश (कृकल), देवदत्त, धनंजय असे आणखी वायूचे पांच प्रकार आहेत. वायु हा सर्वांचा आधार. या वर्णनांत एका ठिकाणीं ढगांची फौजेशीं तुलना केली आहे. 'गिरीहून दाट फौजा। मेघ उठिले लोक काजा। गर्जगर्जों तडक विजा। वायो बळें॥ ११'. कात्यायनी, चामुंडा, भूतें, देवतें हीं वायुरूप असल्याचा समर्थांचा विश्वास येथेंहि उघड झाला आहे (२१–२२). २४ व्या ओवीपासून शेवटपर्यंत मारुतीचें चरित्र आहे.

समर्थांचा वायुविषयक विश्वास शतश्लोकींतहि दाखल आहे.

**सातवा** समास 'महद्भूतनिरूपणा'चा म्हणजे अंतरात्म्याच्या वर्णनाचा आहे. हा विषय पूर्वीं अनेकदां घोळलेला आहे. मुळीं मुळींचें स्फुरण तें अंतरात्मा, नंतर त्रिगुण, त्यांची स्पष्ट दशा हीं भूतें, त्यांत आकाश विशेष, विष्णु हें महद्भूत, इत्यादि वृत्तांत देऊन आत्म्याचा चपळपणापुढें वायु फिका पडतो, असें म्हटल्यावर आत्म्याची लीला सांगितली आहे. ऐकणें, पहाणें, मऊ-गार-ऊन समजणें, स्वाद व सुगंध घेणें, धरणें-सोडणें, येणें-जाणें, हें सर्व आत्मा करतो. विद्या कलांचा अभ्यास, मतभेद, वाद-संवाद, लिहिणें, वाचणें, पाठ करणें, विचारणें, सांगणें, गाणें,

वाजवणें, नाचणें, अभिनय करणें हें सर्व आत्म्यामुळें घडतें. ‘ स्त्रियास पाहिजे पुरुष । पुरुषास पाहिजे स्त्रीवेष । ३४ ’ हा परस्पर आवडीचा संतोष खरें पाहिल्यास आत्म्याचा आहे. ‘ स्थूळाचें मूळ तें लिंग । लिंगामधें हे प्रसंग । येणें प्रकारें जग । प्रत्यक्ष चाले ॥ ३५ ’. मात्र पुरुषाचा जीव व स्त्रियांची जीवी असा भेद समजू नये (३७). ‘बायकोनें बायकोस भोगिलें । ऐसें नाहीं कीं घडलें । ३८ ’. बायकोला पुरुषाचें ध्यान लागलेलें असतें. स्त्रीला पुरुष आणि पुरुषाला बायको ‘ ऐसा आहे हा समंधु ’ (३९). मुळांत जी द्वैताची इच्छा उद्भवली ती स्त्री-पुरुषांच्या रूपानें भूमंडळांत प्रगटली हें रुजुवातीनें पाहून घ्यावें (४२).

स्त्रियांची जीवी व पुरुषांचा जीव असा भेद नसतो या विधानाचें एकनाथांच्या तसल्या विधानाशीं सादृश्य आहे. एकनाथ पुरुष-स्त्री भेदाकरितां समर्थांच्या जीव-जीवीऐवजीं आत्मा-आत्मी असे शब्द वापरतात.

**आठवा** समास ‘ आत्मारामनिरूपणा ’चा आहे. सुरवातीस गणपति, शारदा, राम, यांचें वंदन व स्मरण असल्यामुळें हा समास एकदां स्वतंत्र होता, असें म्हणावें लागतें. आत्मा सर्वत्र भरलेला असून त्याची निरनिराळ्या लक्षणांवरून निरनिराळीं अनेक नांवें प्रचलित आहेत. कित्येक नांवांत आत्मा–जसें जीवात्मा इत्यादि–हा शब्द असतो. कित्येकांत रूप–जसे नादरूप, जोतीरूप इत्यादि, तर कित्येकांत उत्तम–जसे नरोत्तम, वीरोत्तम इत्यादि, हे शब्द आहेत. खटपट, लटपट, चटपट, झटपट ही गडबड आत्म्याची. तो नसेल तर शरीर केवळ मढें बापुडें (११). सिद्ध, सावध, भेद, वेध, खेद आनंद, रंक ब्रह्मा, कल्पना वासना भावना, प्रेम वैर, राजकारणें धरणें, सुबुद्धि कुबुद्धि विवरणें या सर्वांचा उगम आत्मा असून ‘आत्मा ठाईंचा अभेद।’ पण ‘भेद हि धरी ॥ २३ ’ हें जाणलें पाहिजे. पुरुषाला स्त्री, स्त्रीला पुरुष पाहिजे. ‘नंवरीस नवरी पाहिजे । हें तों घडेना ॥ २४’. पुरुषाचा जीव स्त्रियांची जीवी हा भेद मुळांत नाहीं, पण विषयसुखाकरितां तो भेद करावासा वाटतो. भेदच पाडायला गेले तर कितीतरी आहेत. आहारभेद, देहभेद ‘तैसा चि जाणावा आनंद । वेगळाला ॥ २७ ’. जीव अनंत आहेत, यामुळें अंतरात्मा अनुमानाच्या आटोक्यांत येत नाहीं. स्थूल-सूक्ष्मांची गुंतागुंत सोडविण्याकरितां ‘अंतरात्मा कृपाळुपणें । बहुतां मुखें बोलिला ॥ ३१ ’. अंतरात्म्याच्या वाच्यतेमुळें हा समास अंतरात्म्यासंबंधाचा असल्याचें जिज्ञासूंच्या ध्यानांत येईल.

**नववा** समास 'नानाउपासनानिरूपण' या नांवाचा आहे. परंतु अंतरात्मा निर्गुण याचा ऊहापोह प्रथम असून पुढें सारासारविवेकावर भर आहे. निर्गुण म्हणजे बहुगुण व बहुगुणी तो अंतरात्मा. जें कांहीं सर्व आहे तें त्याच्या अंशाचें, असा प्रत्यक्ष अनुभव आहे. सर्वांना जें मानवेल तें अंतरात्म्यास पावतें तरी ज्याचा त्याचा अधिकारभेद विसरून चालणार नाहीं. यानंतर झाडाच्या शेंड्यावर पाणी घातलें तर तें हटकून मुळाकडे जातें याच न्यायानें मूळ पहावें. वृक्षावरील पाण्याच्या दृष्टान्तानें ही गोष्ट कळायला कठिण नाहीं. आतां गुणाचा व निर्गुणाचा विचार करावयाचा म्हटल्यास जें 'चंचळपणें विकारलें। सगुण ऐसें बोलिलें। येर तें निर्गुण उरलें। गुणातीत ॥ १३' असा विवेक बाळगावा. 'कल्पांतप्रळईं जें उरलें। तें निर्गुण ऐसें बोलिलें। येर तें अवघें चि जालें। मायेमध्यें ॥ १६'. सैन्य, शहर, बाजार, यात्रा, इत्यादि कारणानें अपार शब्द उठतात, पावसाळ्यांत मध्यरात्रीं नाना जीवांचे शब्द ऐकूं येतात, त्यांतील कोणता आवाज कुणाचा याविषयीं निवड करतां येत नाहीं. तसाच प्रकार नाना देश, बहुऋषि, नाना भाषा, नाना मतें यांचा आहे. सभोंवतीं पसरलेला दृश्याचा विस्तार व विकार असाच गोंधळांत टाकणारा आहे. तथापि विवेक करणें अवश्य आहे. दिवस रात्र, उजेड अंधार, विचार अविचार, विसर आठवण, नेमस्त वाष्कळ, अनुभव अनुमान, न्याय अन्याय, इत्यादिकांची परीक्षा केलीच पाहिजे. 'वरिष्ठ आणी कनिष्ठ। भ्रष्ट आणी अंतरनिष्ठ। सारासार विचार पष्ट। कळला पाहिजे ॥ २९'.

**दहावा** समास 'गुणभूतनिरूपणा'चा आहे. पंचभूतांमुळें जग चालतें अशी थोरवी पंचभूतांची मानली तर त्रिगुणांची वाट काय ही शंका 'भूत म्हणिजे जितुकें जालें। त्रिगुण जाल्यांत आलें।' या खुलाशानें निकालांत काढून आत्मा, वायु, अग्नि, पाणी, पृथ्वी हा क्रम सांगितला आहे. सगळें थंड असतें तर प्राणी मरून जाते, सगळें उष्ण असतें तरी तोच परिणाम झाला असता, हें जाणून देवानें पर्जन्याचा उपाय काढला व भूमंडळ थंड झालें. परंतु हा थंडपणा सतत टिकणारा नाहीं. त्याच्या मागोमाग उष्णकाळ येतो. 'ऐसें येका मागें येक केलें। विलेनें नेमस्त लाविलें। १९' म्हणून प्राणी जगतात. आतां पाण्याची मौज पहा. रक्त, रेत, दांत हे पाण्यानें होतात. पाण्यापासून मोती बनतात व ते शुक्राच्या चांदणीसारखे चकाकतात. अशीच गोष्ट हिरेमाणकांची आहे. कुणाचा महिमा किती सांगावा?

तरी थोडेंबहुत समजण्याकरितां सांगावें लागतें. सगळें समजणें शक्य नाहीं. तसें असतें तर शास्त्रांचा परस्परविरोध दिसता ना. थोडक्यांत म्हणजे 'आत्माराम सकळां पाळी। २४'. विवेकदेखील आत्म्यामुळेंच करतां येतो. म्हणून 'कोणीयेकें जगदीशाचें। भजन करावें ॥ २७'. उपासना हें विचारणेचें एक मोठें साधन आहे. उपासनेखेरीज कितीहि उद्योग केला तरी तो फुकट जातो. उपासनेच्या योगानें समर्थ (देव, बलाढ्य) पाठीराखा मिळतो. तसा पाठिंबा नसेल तर 'तयास भलता च कुटी। ३०'. म्हणून उठाउठी, वेळ न दवडतां भजन करावें. 'भजन साधन अभ्यास। येणें पाविजे परलोकास। दास म्हणे हा विश्वास। धरिला पाहिजे ॥ ३१'.

या दशकांतील सारे समास एकदां निराळे स्वतंत्र लिहिलेले होते, असें त्यांचें निरीक्षण केल्यानें समजणारें आहे. तथापि १,५,८ व १० हे समास स्वतंत्र असल्याचीं प्रमाणें त्यांतच आहेत. पहिल्या समासाच्या व दहाव्या समासाच्या अखेरीस 'रामदास' व 'दास' हीं समर्थांचीं नांवें आहेत. पहिल्यामध्यें समस्त 'रघुनाथ-भक्तांचा किंकर' असे आपल्या नांवामागें लीनतेचे शब्द समर्थांनीं ठेविले आहेत. पांचव्याच्या शेवटीं 'न्यून्यपूर्ण क्षमा श्रोतीं केलें पाहिजे' असें वाक्य आहे व आठव्याच्या आरंभीं गणपतिशारदेला वंदन आहे. शेवटीं न्यूनपूर्णाबद्दल क्षमायाचना आणि आरंभीं गणपतिवंदना ही स्वतंत्र लेखनाचीं लक्षणें ठरतात.

## • १७ •

या दशकाचें नांव 'प्रकृति-पुरुष' असें आहे. ब्रह्म, माया, अंतरात्मा याखेरीज दुसरे जे फुटकळ विषय यांत आहेत ते यथाक्रम वाचकांना दिसणारच आहेत.

**पहिला** समास 'देवबलात्कारा'चा आहे. देव माणसाला आपली भक्ति कशी लावतो याचा सुरवातीस खुलासा आहे त्यावरून नांवाचा बोध घडतो. 'निश्चळ ब्रह्मांत चंचळ आत्मा' या कल्पनेनंतर त्याचीं वेगवेगळीं नांवें दाखल केलीं आहेत. देव देहाच्या देवळांत राहून जो उपेक्षा करील त्याला मारतो. त्या भयानें लोक देवाला भजतात. भजनानें भय जाऊन आवड उत्पन्न होते. जें मागावें तें देव देतो म्हणून त्रैलोक्यांत भजन सुरू झालें. देवाकरितां देहद्वारा पांच विषयांचा नैवेद्य सदैव सिद्ध न ठेवल्यास रोग होतात व देव निघून जातो. केव्हां जातो हें कळतसुद्धां

नाहीं. देवाकरितां देवळें धुंडावीं लागतात. देवळाच्या गुणानें देव प्रगटतो. अवतार हींसुद्धां देवळेंच. कांहीं कराळ विक्राळ तर कांहीं निर्मळ असतात. देवळांत केव्हां केव्हां अथांग समुद्राप्रमाणें सौख्यांना भरती चढते, पण तीं सौख्यें टिकत नाहींत. अंतरात्मा हा अशाश्वताचा मस्तकमणि असून तो दिसत नसला तरी त्यालाच धनी मानलें पाहिजे. देवळांचे भेद ब्रह्माकडे चित्त लावल्यानें नाहींसे होतात. चित्त तिकडे नसेल तर भेदापायीं उदंड खेद ठरलेला आहे. सकळाचें जें मूळ तें भव्य भारी असूनदेखील दिसत नाहीं, भासत नाहीं, एका ठिकाणीं असत नाहीं. त्या परमात्म्याचा महिमा कोणाला माहीत असणार? समर्थ अगतिकतेनें म्हणतात : 'तुझी लीळा सर्वोत्तमा । तूंच जाणसी ॥ २० '. नित्यानित्यविवेक हें संसारास आल्याचें सार्थक आहे. मननशीलांपाशीं देव अखंड रहातो. मननशीलांच्या पूर्वसंचिताला तोड नाहीं. अखंड योग म्हणून योगी. योग नसेल तो वियोगी. योगबळानें वियोगी योगी होतो. भलीं माणसें लोकांना सन्मार्गं लावतात. पोहणारानें बुडत्याला तारावें. स्थूळसूक्ष्म तत्त्वांचा झाडा, पिंड-ब्रह्मांडाचा निवाडा, त्याची प्रचीत पहाणें, वेदान्तामधील पंचीकरणाचें विवरण, महावाक्यांच्या साह्यानें रहस्यग्रहण, यामध्यें सत्पुरुष गर्क असतात. पृथ्वींतील विवेकी जनांची संगति धन्य. त्यांच्याकडील (बोध) श्रवणानें प्राणी गति पावतात. सत्संग, सच्छास्त्रश्रवण, परोपकाराचे उत्तम गुण असे 'जे सद्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश । धर्मस्थापनेचा हव्यास । तेथें चि वसे ॥ २९ '. ते सारासार विचारानें जग्गोद्धार करतात व संगत्यागानें निरंतर (ब्रह्माशीं अंतर नसलेले) होऊन जातात.

**दुसरा** समास 'शिवशक्तिनिरूपणा'चा आहे. पहिल्या पांच ओव्यांत ब्रह्माचें वर्णन आहे. निश्चळांत जें स्मरण चेतलें तें चैतन्य, त्याचें गुणसमानत्व हें गुणसाम्य, आकाशांतील अभ्रच्छायेसारखी मूळमाया, निर्गुणांत गुणविकार म्हणून षड्गुणेश्वर, तोच अर्धनारीनटेश्वर, आदिशक्ति ही मुळांतील सर्वशक्तीचीं रूपें, नंतर महत्तत्त्व गुणक्षोभिणी; मुळांत व्यक्तावस्थेचीं बीजें आहेत व त्यावरून शिवशक्ति वगैरे नांवाचीं बुद्धिग्राह्य रूपें सांगतां येतात. पिंडावरून ब्रह्मांड, ब्रह्मांडावरून पिंड हें जाणतां येतें. बीजांत फळ दिसत नाहीं. पण त्यांतूनच फळें निपजतात. पिंडाचे स्त्रीपुरुष हे भेद व्यक्त व्हावे, अशी व्यवस्था मुळांत आहे. स्थूळाचें मूळ वासना; पण ती दिसत नाहीं. एवढ्यावरून ती नाहीं असें म्हणणें चुकीचें ठरेल. कल्पनेची

सृष्टि हा वेदशास्त्रार्थ न दिसणारा असला तरी खोटा म्हणतां येत नाहीं. ब्रह्मापासून आपल्यापर्यंत ज्या पायऱ्या आहेत त्या योगानें या विषयाला गूढत्व आलें आहे. स्त्रीपुरुषांचा जीव एक परंतु देहपरत्वें त्यास भिन्नत्व आलें आहे. पुनः एकदां येथें नवरीस नवरी चालत नाहीं, 'नवरीचें मन नवऱ्यावरी । नवऱ्याचें मन नवरीवरी । २२' ही कल्पना आलेली आहे. जीवसृष्टींतील नरनारी हा भेद मुळांतल्या शिव-शक्तीमुळें झालेला आहे. नरनारीमुळें शिवशक्तीचा बोध घडतो. प्रीतीच्या वासना अनेक आहेत. त्या एकाच्या एकाला कळत नाहींत. यांतील आईचें प्रेम समर्थांनीं विचारांत घेतलें आहे. जिच्यामुळें उपाधि वाढते ती वनिता. तीच बालकाला संभाळते, वाढविते. मुलासंबंधांत आईला 'वीट नाहीं कंटाळा नाहीं । आलस्य नाहीं त्रास नाहीं । २७'. मातेसारखी माया नाहीं. उपाधि वाढवून मायेंत गोवण्यांत व प्रपंचाची प्रीति लावण्यांत स्त्री कुशल असते. पुरुषाला स्त्रीचा विश्वास तर स्त्रीला पुरुषाचा संतोष याप्रमाणें परस्परांना बांधून टाकलें आहे. 'ईश्वरें मोठें सूत्र केलें । मनुष्यमात्र गुंतोन राहिलें । लोभाचें गुंडाळें केलें । उगवेना ऐसें ॥ ३० '. ही स्त्रीपुरुषांची आवड मुळांतूनच निघालेली आहे. 'मुळीं शिवशक्ती खरें । पुढें जालीं वधुवरें । चौऱ्यासि लक्ष विस्तारें । विस्तारली जे ॥ ३३ '.

**तिसरा** समास 'श्रवणनिरूपणा'चा आहे. पूर्वीं दोन वेळां श्रवणाचें विवेचन झालेलें आहे. आतां पुनः एकदां त्याचा विचार श्रोत्यापुढें मांडला जातो, यावरून हा समास एकदां स्वतंत्र होता. याच्या पहिल्या दोन ओव्यांत स्वतंत्रपणाचीं लक्षणें आहेत.

श्रवणमनननिदिध्यासानें मोक्षाचा रोकडा साक्षात्कार घडतो. उधारीचें कारण नाहीं. व्यवहारांत मनुष्य रत्नें, वजनें, नाणीं, सोनें, धान्यें पारखून मोजून मापून सावधपणानें घेतो. कांहीं नाजूक गोष्ट असेल तर तिची एकान्तीं अतिशय तत्परतेनें पहाणी तपासणी करतो. याहून कोटि पटीनें अध्यात्म ग्रंथांच्या अभ्यासांत दक्षता असायला पाहिजे. कहाण्या, गोष्टी, पोवाडे, अवतार-चरित्रें या सर्वांहून अध्यात्मविद्या श्रेष्ठ आहे. गेल्या मेल्यांच्या गोष्टी ऐकून काय मिळविलें असा प्रश्न केल्यास 'पुण्य लागतें' असें उत्तर मिळतें, पण तें दिसत नाहीं. अध्यात्माचें फळ तसें नाहीं. तें अनुभवाचें आहे. येथून पुढें आत्म्याचा महिमा गाइला आहे. युगानुयुगें एकटा आत्मा सर्व चालवितो, आत्मा ही प्राण्यांची गति आहे, तो जर नसेल तर मग कांहींच नाहीं. म्हणून त्या

आत्म्याचें ज्ञान वरिष्ठ असून विवेकी सज्जन तें मिळवितात. आत्मज्ञान व्हायचें तर सृष्टीच्या उत्पत्तीचा विचार करणें अवश्य म्हणून पृथ्वी, आप, तेज, वायु, यांचा निर्देश आला असून 'अंतरात्मा तत्त्वबीज' जें निराळें राहिलें तिकडे लक्ष वेधून घेतलें आहे. मायादेवीच्या धांदलीमुळें सूक्ष्मांत कोणी मन घालीत नाहीं. जो मन घालून समजेल, त्याची संदेह वृत्ति मावळते. मूळ माया हा जो चौथा देह, त्याच्या निरासानें जो 'देहातीत होऊन राहे। धन्य तो साधु ॥ २०'. विचारांची ऊर्ध्वगति हा उद्धार असून बहुतेक सर्वांचा पदार्थज्ञानापायीं अधःपात होतो. याकरितां पदार्थज्ञान टाकून निरंजनाला धुंडीत जावें. अष्टांग योग, पिंडज्ञान, त्याहून थोर तत्त्वज्ञान, त्याहून थोर आत्मज्ञान, असा क्रम आहे. मूळमायेच्या शेवटीं जो हरिसंकल्प उठतो त्या उपासनेची मिठी घालावी. हरिसंकल्प म्हणजे ब्रह्म नव्हे, तें निर्मळ निश्चल निर्गुण असें निराळेंच आहे. तें 'येथून तेथवरी दाटलें। प्राणीमात्रास भेटलें। पदार्थमात्रीं लिगटलें। व्यापून आहे ॥ २७'. तें महान् तसेंच सूक्ष्म आहे. पिंड-ब्रह्मांडाचा संहार झाल्यावर हें समजतें. हा संहार प्रत्यक्ष व्हायला नको. विवेकानें त्याचा संहार पहातां येतो व मग शाश्वत कोण याचा बोध होतो.

**चौथा** समास 'अनुमाननिरसना'चा आहे. ब्रह्माचा निश्चय न करतां सारेंच ब्रह्म या अनुमानाचा येथें समाचार घेतला आहे. प्रारंभीं सहा ओव्या वक्ता कसा असावा यासंबंधाच्या आहेत. श्रोत्याची शंका तत्काळ फेडावी, बोलण्यांत पेंच नसावा; एक सावरायाला जावें तर दुसरें घसरतें; त्याला आवरावें तर मागलें कोसळतें; हा प्रकार पोहणारानें गटंगळ्या खाण्यासारखा असल्यामुळें उभयपक्षीं घातक ठरतो. आपण ज्याचा संहार होतो म्हटलें तेंच दुसऱ्या वेळीं सर्वसार म्हणून सांगायचें हा मायेचा गोंधळ टाकला पाहिजे. 'जें जें सूक्ष्म नांव घ्यावें। त्याचें रूप विंवऊन द्यावें। तरीच वक्ता म्हणवावें। विचारवंत ॥ ६'. त्यानें ब्रह्म, मूळ माया, अष्टधा प्रकृति, शिवशक्ति, षड्गुणेश्वर, गुणसाम्य, अर्धनारीनटेश्वर, प्रकृतिपुरुष, गुणक्षोभिणी, त्रिगुण याचें स्पष्ट ज्ञान संपादून पूर्वपक्षाच्या मर्यादा, वाच्यांशलक्ष्यांशाचें रूप जाणावें असा सूक्ष्म विचार करणारा साधु धन्य (९). पाल्हाळांत पडूं नये, बोललें तें बोलूं नये, शब्दाच्या आटोक्याबाहेरचें श्रोत्याच्या अनुमानांत आणून सोडावें. ज्याच्या बुद्धींत ब्रह्मासंबंधीं निश्चय नाहीं, क्षणाक्षणाला जो शब्द बदलतो, तो लोकांचें समाधान काय करणार ? आपल्या प्रतिपादनानें न भागल्यास शास्त्राचें दडपण घालतो, जास्त विचारल्यास

शीण मानतो. येथून पुढें असा वक्ता पापपुण्य, स्वर्गनरक, विवेकअविवेक, पावन-पतित यांची कशी कालवाकालव करतो त्याची माहिती दिली आहे. या वक्त्याचा मुख्य दोष म्हणजे खऱ्याखोट्याविषयीं गाढ अज्ञान हा असतो. एकंकारानें तो सर्वांची एकत्र दावण बांधतो व सर्वांना समान लेखतो. एकंकाराच्या निषेधार्थ समर्थांनीं योजलेले शब्द फार कडक आहेत. 'भेद ईश्वर करून गेला । त्याच्या वाचेन न वचे मोडिला । मुखामधें घांस घातला । तो अपानीं घालावा ॥ २७'. ज्या इंद्रियाचा जो भोग असेल तोच त्यानें यथासांग सेवावा. ईश्वराचें जग मोडतां येणार नाहीं. मोडणारा ठिकाणावरच रहाणार नाहीं—'उरेना' (२८). हा प्रकार भ्रांतीच्या भुताटकीचा आहे. यांत प्रचीत नसल्यानें तो लटका आहे. 'वेड लागलें जे बटकी । तें भलतें चि बोले ॥ २९'.

एकवीस समासीच्या १८ व्या समासांत येथील एकंकाराचा विचार व निषेध जास्त प्रमाणांत आढळतो. सृष्टीचा विलय होत होत जेव्हां मनुष्य स्वरूपीं जाऊन मिळतो तेव्हांच्या त्याच्या एकत्वाबद्दल एकंकार असें कदाचित् म्हणतां येईल, परंतु 'तेथें कोणासी कोणें म्हणावें । येकंकार म्हणोनी ॥ ७'. येकंकार म्हणायला दुसरें कोणी शिल्लकच नसतें. त्या अवस्थेंत भेद तुटला असें व्यवहाराच्या भाषेंत बोलावयाचें इतकेंच. कारण अभेद या शब्दाला त्या अवस्थेंत अर्थ रहात नाहीं. अभेदांत कर्महि संभवत नाहीं. 'भेद चि नाहीं तेथें कोणें । क्रिया करावी ॥ १२'. नंतर प्रपंच, परमार्थ, वैराग्य या विषयांचा खल केल्यावर समर्थ या भेदाकडे दृष्टि टाकून सांगतात कीं, 'भेद आणि प्रपंचीं मोडे । ऐसें हें कहीं च न घडे ॥ ५९'. प्रपंचांत भेद मोडतो हा आग्रह 'रासभीं सोहोळे भोगावे । आणि मनुष्यीं उकरडे भुरकसावे ॥ ६०' असें घडूं लागल्यासच खरा मानतां येईल. जोंवर सुरी घेऊन बोटाची लेखणी करीत नाहींत, ऊस खाण्याऐवजीं डोळ्यांत खोवत नाहींत, किंवा नारळानें कोणी कपाळ-मोक्ष करून घेत नाहीं, तोंवर प्रपंचांतील भेद मोडला असें कबूल करणें शक्य नाहीं. भेद नाहीं असें स्थळ 'तें येक स्वरूप निर्मळ' (६५). तेथें गेला असें सांगायला वक्ता शिल्लक रहात नाहीं, ही एक त्यांत गोम आहे. म्हणून 'अभेद बोलणें हा चि भेद । प्रपंचीं अभेद हा विनोद । जयासी न कळे तो मतिमंद । मूर्ख अविवेकी ॥ ॥ ६७' असा याविषयीं समर्थांचा समारोप आहे.

**पांचवा** समास 'अजपानिरूपणा'चा आहे. एका अहोरात्रांत २१६०० वेळां

श्वासोच्छ्वास घडतो याला 'अजपा' (प्रयत्नावांचून होणारा) जप असें नांव आहे. मूळ स्वर एक. तो चढउताराप्रमाणें तार, मंद्र, घोर (तार, मध्य, मंद्र) असा तीन प्रकारांत विभागला जातो. सर्वांत खालच्या स्वराहून अजपा सूक्ष्म आहे. स रि ग म प ध नि स असे स्वर म्हणावे. कुठल्याहि स्वरापासून म्हणावे. परावाचेहून अलीकडे व पश्यंतीच्या खालीं स्वरस्थान आहे. एकान्तांत बसून हें समजून घ्यावें. एकांतीं मौन धरून सावधपणानें पाहिल्यास 'सोहं सोहं' असा शब्द होत असल्याचें कळतें. हा शब्द अनुभवास येतो, पण आवाज नसतो. शब्द सांडून बसणाराला भला म्हणावें. जेवढे देहधारक प्राणी आहेत, त्यांना श्वासोच्छ्वास आहे. अर्थात् अजपा आहे. अजपा ही देव सांपडण्याची सहज सोय असतांना आयासांत कां पडावें ? आयासाचे देव फुटतात, नासतात, त्यांचा विश्वास धरण्यांत हंशील काय ? अजपेच्या आश्रयानें जगदांतराचें दर्शन, अखंड ध्यान, लोकसंग्रह, आत्म्याला समाधान देणारें अशन (खाणेंपिणें), समर्पण, हीं सर्व कांहीं साधतात. अजपेच्या सोहं शब्दांत रंगलेल्या पुरुषाच्या ज्ञानेंद्रियांचीं कर्मे ईश्वरतादात्म्यानें घडतात. अजपा हें सहज म्हटलें तरी त्यासाठीं हठयोगांत शिरावें लागतें. सहज एकाएकीं कळणारी ही गोष्ट नाहीं. घरांतलें द्रव्य म्हणून तें आपोआप हातीं येत नाहीं, त्यासाठीं खटपट करावी लागते. माहिती व खटपट हीं दोन्ही नसतील तर द्रव्य असून दरिद्री असा प्रसंग होतो. 'अंतरीं वसतां नारायेणें । लक्ष्मीस काये उणें । ज्याची लक्ष्मी तो आपणें । बळकट धरावा ।। २४'.

**सहावा** समास 'देहात्मनिरूपणा'चा आहे. आत्मा देहामध्यें राहून सुखदुःखें भोगतो व शेवटीं शरीर सोडून जातो, हा या समासाचा विषय आहे. तारुण्य हा सुखाचा काळ असला तर वृद्धत्व हा शक्तिक्षयाचा व दुःखाचा काळ आहे. तरी मरावेंसें वाटत नाहीं. अखेर हातपाय झाडीत मरावें हें लागतेंच. हा जो देहांतला आत्मा त्याला परब्रह्म समजून माणसाला दुःखाच्या गोंधळाचे धनी बनण्याची पाळी येते. समर्थांच्या पद्धतीप्रमाणें झोपेला डंवचणाऱ्या ढेकूणपिसवा, जेवतांना त्रास देणारे माश्याउंदीर व उंदरांना खाणारीं मांजरें यांच्या उल्लेखानें दुःखांचा तपशील समर्थांनीं सादर केला आहे. एकमेकांचें वैर धरणारीं माणसें हीं सर्व अंतरात्म्याचीं खेळणीं होत; पण त्यालाच परब्रह्म मानण्याचा प्रघात पडला आहे. परब्रह्म जात नाहीं व कोणास दुःख देत नाहीं. परब्रह्माला स्तुतिनिंदेचा स्पर्श होत नाहीं. शिव्या अंतरात्म्यास लागतात (१९) असें सांगून सहा शिव्यांची एक ओवी घातली आहे (२०).

परब्रह्माविषयीं कल्पनाच करतां येत नाहीं. सृष्टींत एवढे जीव आहेत पण साऱ्यांच्या वांटणीला सारखें भाग्य नसतें. कारण त्यांना सारासार कळत नाहीं. बाजारचे लोक जें हातीं येईल तें उचलतात. भाग्याचीं माणसें जें उत्तम तेवढेंच निवडून घेतात. हाच न्याय देवतार्चन, ब्रह्मज्ञान यांस लागू आहे. प्रत्येक जण संसार गोड करून काळ कंठतो, परंतु वैभवसंपन्न महाराजा व निष्कांचन करंटा हा भेद चुकत नाहीं. अंतकाळाचीं दुःखें मात्र सर्वांचीं सारखींच असतात. येथून पुढें अंतकालीन दैन्याचें वर्णन आहे (२६-२९). 'ऐसें चंचळ अवलक्षण। दुःखकारी ॥ ३०'. पुढील दोन ओव्यांत हाच विषय आहे.

**सातवा** समास 'जगजीवन' या नांवाचा आहे. जगाची चढती-उतरती राहाणी हा याचा विषय आहे. पाणी मुळांत निवळ (निर्दोष व रुचिहीन) असतांना वृक्षवल्लीच्या संगदोषानें त्याला कडू, तिखट, आंबट वगैरे चव येते हा दृष्टांत लक्षांत घेऊन आत्मा पाण्याप्रमाणें मुळांत अगदीं निराळा असतांहि देहसंगें विकारतो व देहाभिमानें भलत्या भरीस पडतो, असें दाखविलें आहे. हा दृष्टांत एवढ्यापुरता खरा आहे. पाणी नाश पावतें, आत्मा विवेकबळानें देहसंगाच्या विकारांतून पार जातो, हा भेद ध्यानीं वागवून माणसानें विवेकाच्या व सत्संगाच्या बळावर आपलें हित साधावें. मनुष्य हा आपला आपणच शत्रु किंवा मित्र ठरतो. कोणी स्वतःचें अहित करण्याचें मनांत आणलें तर त्याला आडवें कोण येणार ? गति-अवगति ही भल्याबुऱ्या संगतीवर अवलंबून असते म्हणून सत्संगति धरावी, तरी आपली चिंता आपणच करायला हवी. जाणत्या पुरुषांच्या बुद्धीचा आपण शोध घ्यावा. 'जाणता देवाचा अंश। नेणता म्हणिजे तो राक्षेस। १४'. जाणता सर्वमान्य असतो. असें पाहून 'जेणेंकरितां होइजे धन्य। तें चि घ्यावें ॥ १५'. संगतीप्रमाणें गुणदोष जडतात व सुखदुःख भोगावें लागतें. संकटांत अकल्पितपणें सांपडल्यास त्यांतून सुटण्याचें समाधान मिळविलें पाहिजे. दुर्जनाच्या संगतींत मनोभंग वारंवार होतो. यासाठीं आपला असा निराळाच रंग ठेवावा. प्रयत्न, उद्योग हें खरें शहाणपण. तें स्वीकारलें तर सुख, संतोष, श्लाघ्यता यांतलें कांहीं उणें पडत नाहीं. जगांत भाग्य, विद्या, व्युत्पत्ति हीं टिकणारीं नसतात. 'येक भरे येक रितें। रितें मागुतें भरतें। भरतें हि रितें होतें। काळांतरीं ॥२७'. संपत्ति ही दुपारच्या सावलीसारखी आहे; तीच तऱ्हा आयुष्याची असते. म्हणून सार्थक करावें. 'देह जैसें केलें तैसें

होतें । येत्न केल्यां कार्य साधतें । तरी मग कष्टावें तें । काये निमत्य ॥२० ’.

**आठवा** समास ‘तत्त्वनिरूपण’ या नांवाचा आहे. परंतु शेवटीं ३३ व्या ओवींत ‘इति श्री पंचीकर्ण’ असा पहिला चरण असल्यानें ‘पंचीकरण’ या विषयाबद्दल शंका रहात नाहीं. पंचीकरण हा शब्द मागल्या विवेचनांत पुष्कळदां उच्चारला गेला असून त्याचें विवेचन येथें आलें आहे.

सुरुवातीस परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी या चार वाणींचें स्पष्टीकरण आहे. नाभीपासून होणाऱ्या उन्मेषाला परा, हृदयांतील ध्वनिरूपाला पश्यंती, कंठांतून बाहेर पडणाऱ्या नादाला मध्यमा व जिभेनें बोलल्या जाणाऱ्या अक्षराला वैखरी असें म्हणतात. पुढें अंतःकरणपंचकाचा विचार आहे. जाणती कळा हें अंतःकरण, त्यांत घ्यावें टाकावें, अशी खळबळ नसते. ‘करूं न करूं ऐसें वाटलें । तेंचि मन ॥ ५ ’. निश्चय हें बुद्धीचें रूप आहे. निश्चयानंतरचें चिंतन हें चित्ताचें लक्षण आहे. निश्चय होऊन ज्याचें चिंतन आरंभलें, त्याचा कार्यक्षम अभिमान हा अहंकाराचा गुण आहे. येथवर अंतःकरणपंचकाची ओळख करून दिली. नंतर समर्थ प्राणपंचकाकडे वळले आहेत. प्राण हा वायूच, पण कार्यपरत्वें त्याचीं भिन्न नांवें व स्थानें सांगितलीं जातात. ‘सर्वांगीं **व्यान** नाभीं **समान** । कंठीं **उदान** गुदीं **अपान** । मुखीं नासिकीं **प्राण** । नेमस्त जाणावा ॥ १२ ’. मग ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें आणि विषय या पंचकड्यांची नोंद आहे. त्या प्रसिद्ध असल्यानें त्यासाठीं जागा अडविण्याचें कारण नाहीं. अंतःकरण, प्राण व ज्ञान-कर्म विषयांचीं तीन अशा पांच पंचकांच्या पंचवीस गुणांचा सूक्ष्म देह समजला जातो. या देहांत सर्वांचें मिश्रण असतें. त्या मिश्रणाचा संबंध पंचभूतांशीं पुढीलप्रमाणें असतो. आकाश–अंतःकरण, व्यान, कर्ण, वाचा, शब्द. वायु – मन, समान, त्वचा, हात, स्पर्श. तेज – बुद्धि, उदान, नेत्र, चरण, दर्शन. आप – चित्त, अपान, जिव्हा, शिस्न, रस. पृथ्वी – अहंकार, प्राण, घ्राण, गुद, गंध. पंचभूतांचा स्थूल व्यवहार पहाणें अवश्य आहे. आकाश–काम, क्रोध, शोक, मोह, भय (२४); वायु–चळन, वळन, प्रसारण, निरोध, आकुंचन (२५); तेज–क्षुधा, तृषा, आलस्य, निद्रा, मैथुन (२६); आप – शुक्र (शुक्लीत), शोणित (श्रोणीत), लाळ, मूत्र, स्वेद (२७); पृथ्वी–अस्थि, मांस, त्वचा, नाडी, रोम (२८). पंचभूतांत असें पंचवीसांचें मिश्रण होऊन स्थूल देह उद्भवतो. सूक्ष्म, स्थूल हे दोन देह झाले. तिसरा

देह कारण म्हणजे अज्ञान व चौथा देह महाकारण म्हणजे ज्ञान. या चारी देहांच्या निरसनावस्थेला विज्ञान म्हणतात, व तेंच परब्रह्म होय. 'विचारें चौदेह वेगळें केलें । मीपण तत्त्वांसरिसें गेलें । अनन्य आत्मनिवेदन जालें । परब्रह्मीं ॥ ३१'. विवेकानें जन्म-मृत्यु चुकला, नरदेहाचें सार्थक घडलें, भक्तियोगानें कृतकृत्यता लाभली. परिसानें लोखंडाचें सोनें बनतें, पण परीस लोखंडाला स्वतःची योग्यता आणीत नाहीं. साधु-संगतीचा परिणाम निराळा आहे. 'शरण जातां साधु जना । साधु च होइजे ॥ ३४'.

**नववा** समास 'तनुचतुष्ट्या'चा आहे. सूक्ष्म, स्थूळ, कारण, महाकारण हे चार देह पूर्वी सांगितले, पण कांहीं आनुषंगिक राहिलें तें या समासांत दाखल केलें आहे. जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या या चार अवस्था; विश्व, तैजस, प्राज्ञ, प्रत्यगात्मा हे चार अभिमान; नेत्र, कंठ, हृदय, मूर्धा हीं चार स्थानें; स्थूल, प्रविविक्त, आनंद व आनंदावभास हे चार भोग पूर्वी नमूद केलेले नव्हते. अउम व अर्धमात्रा (ईश्वर) या चार देहांच्या चार मात्रा आहेत. तम, रज, सत्त्व व शुद्धसत्त्व हे चार गुण व क्रिया, द्रव्य, इच्छा, ज्ञान या चार शक्ती चार देहांच्या विवरणांत मोडतात. चार देह व या २८ गोष्टी मिळून ३२ तत्त्वें होतात. यांत सूक्ष्म, स्थूल देहांचीं अनुक्रमें पंचवीस पंचवीस अशीं ५० तत्त्वें मिळविलीं म्हणजे ८२ तत्त्वें होतात. याखेरीज अज्ञान (कारणदेह), ज्ञान (महाकारण) हीं दोन तत्त्वें आहेत. हीं सारीं तत्त्वें मायिक आहेत. आपल्या साक्षीनें (साक्षित्वानें) त्यांचें निरसन करावें. 'साक्षी म्हणजे ज्ञान । ज्ञानें वोळखावें अज्ञान । ९'; या दोन्हींची देहाबरोबरच वाट लावावी. विराट, हिरण्यगर्भ या ब्रह्मांडांतील देहांची विवेकानें हकालपट्टी करावी. पुढें मागच्या समासांतील २४–२८ या पांच ओव्यांतील विषयाची उलट्या (२८–२४) क्रमानें पुनरुक्ति आहे. नंतर अंतःकरण, प्राण, ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें आणि विषय या पंचकाची आकाशादि पंचमहाभूतांच्या अनुक्रमानें फिरून एकदां नोंद केली आहे व शेवटीं हे सूक्ष्मदेहाचे पंचवीस तत्त्वभेद आहेत असें सांगून समास संपविला आहे.

या व मागल्या समासांत नोंदलेलीं देहाचीं पंचवीस पंचवीस तत्त्वें स्फुट ओव्या क्र. २७ मध्यें सांगितलीं आहेत. (श्री राम दा सां ची क वि ता, खंड १, पान २२३).

**दहावा** समास 'दोणपसिद्ध' लक्षणाचा आहे. सामान्यतः मूर्ख व शहाणा असें एकामागून एकाचें वर्णन करण्याची समर्थांची पद्धत आहे. येथें दोघांना एकत्र

आणलें असलें तरी आधीं टोणपा व नंतर सिद्ध हा क्रम सोडलेला नाहीं.

ज्याचें शरीरानें दर्शन घेतां येत नाहीं त्याविषयीं अनुमान करावें लागतें, याच न्यायानें जें आपणास टाऊक नाहीं तें जाणत्याला विचारावें. जें चर्मदृष्टीच्या आटोक्यांतलें नाहीं तें ज्ञानदृष्टीनें पहावें. मध्यें पृथ्वीचें चडळ नसेल तर आकाश-पाताळ मिळून एक अंतराळ असल्याचें लक्षांत येईल (ही कल्पना याच शब्दांनीं पूर्वीं एकदां ग्रथित झालेली आहे–१५:१०:२०). तें अंतराळ म्हणजे ब्रह्म. तें स्वभावतः 'उपाधिशून्य' असतें. तेथें दृश्यमायेचें अस्तित्वच नसतें. 'दृष्टीचें देखणें दृश्य। मनाचें देखणें भास। मनातीत निराभास। विवेकें जाणावें ॥ ९'. विवेकाची वाढ व दृश्यभासाचा निरास एकदम संभवतो. याकरितां सूक्ष्म दृष्टि पाहिजे. 'वाच्यांश वाचेनें बोलावा। न बोलतां लक्ष्यांश जाणावा। निर्गुण अनुभवास आणावा। गुणाचेन-योगें ॥ ११' पण लक्षांत असावें कीं, गुणांचा नाश होतो व निर्गुण अविनाशी आहे. जें दृष्टीला गवसत नाहीं तें ऐकून जाणावें. श्रवणमननानें सर्व कांहीं आकलन होतें. सृष्टींत जे नाना पदार्थ आहेत, ते सगळे ठोकून सपाट करूं नयेत. सर्वच सारखेंच मानील तो टोणपा. तो गुणग्राहक नसतो. ज्याला वेड लागतें त्याला सर्व सारखें वाटतें, म्हणून त्याला कोणी शहाणा समजत नाहींत. ईश्वरानें भेद केलेले असून भेदानेंच सृष्टि चालते. 'जेथें परीक्षेचा अभाव। तो टोणपा समुदाव ॥ २१'. गुण नसेल तर गौरवाची अपेक्षा करतां येत नाहीं. 'आधीं राखावा आचार। मग पाहावा विचार। आचारविचारें पैलपार। पाविजेतो ॥ २५'. साकल्यविवेक नसेल तर 'अवघेंच निरर्थक'. 'म्हणौन संतसंगें चि जावें। सत्‌शास्त्र चि श्रवण करावें। उत्तम गुणास अभ्यासावें। नाना प्रयेत्नें ॥ ३०'.

दृश्य भास हे दोन शब्द दासबोधांत अनेकदां एकत्र येतात त्यांची व्याख्या या समासांत आलेली आहे. 'दृष्टीचें देखणें दृश्य। मनाचें देखणें भास।' या व्याख्येप्रमाणें अर्थ घेऊन त्या त्या ठिकाणचा विचार केल्यास दिशाभूल होण्याचें कारण नाहीं.

## •१८•

या दशकाचें नांव 'बहुजिनसी' म्हणजे अनेक विषयांचें एकीकरण अशा धोरणाचें आहे. बहुजिनसी हें नांव इतरांपैकीं बऱ्याच दशकांना देतां येईल.

**पहिला** समास 'बहुदेव स्थाना'चा आहे. गजवदनाच्या वंदनानें सुरुवात असून पुढें सरस्वती, ब्रह्मदेव, विष्णु, महादेव या क्रमानें इंद्र, यम यांचा निर्देश झाल्यावर व्यंकटेश, बनशंकरी, मारुति, खंडोबा, तुळजाभवानी, पांडुरंग, क्षेत्रपाळ (भैरव) यांचे गुण गाऊन रामकृष्णादि अवतारांशीं ही यादी थांबली आहे. व्यंकटेशाच्या स्थळीं उभ्या उभ्या अन्न खाण्याचा प्रघात आहे. वडेघिरडीं किंवा अतळस आपाळ नामक मिष्टान्नें यांवर तेथें ताव मारतात. बनशंकरीकडे शाखा वहातात. मारुतीला कोरवड्याच्या माळा वाहून दहीवड्याचें समाधान लोक लुटतात. खंडोबाची काया भंडाऱ्यानें (हळदीनें) माखलेली असते. तेथें कांदेभरीत रोडगे खावे लागतात. तुळजाभवानी भक्तांवर प्रसन्न असते. पांडुरंगाकडे 'अखंड कथेचा होतो धिंग । १३'. भैरवानें लोकांना आपला चाळा लावलेला असून भक्तीचें फळ त्वरित पदरांत पडतें. याप्रमाणें प्रत्येक देवाचें कांहीं ना कांहीं वर्णन आहे. या साऱ्या देवांचें मूळ 'अंतरात्मा' हा सिद्धांत घेऊन कीर्तिअकीर्ति, निंदास्तुति, यांचा भोग अंतरात्म्याकडे जातो. भोगी, त्यागी व विरागी या सर्वांचा आत्मा एक; परंतु देहाच्या अभिमानानें लोक अंतरात्म्याला चुकतात. या आत्म्याची चळवळ समजणें कठिण; पुण्य अगाध असेल तर त्याचें थोडेंसें अनुसंधान रहातें. अनुसंधानासरिशीं किल्मिषें जळून जातात, अंतरनिष्ठ ज्ञानी हें विवरून पहातात. 'अंतरनिष्ठ तितुके तरले । अंतरभ्रष्ट तितुके बुडाले । बाह्याकारें भरंगळले । लोकाचारें ॥२४'.

समर्थांनीं रामाची उपासना श्रेष्ठ मानली असली तरी लोकांना प्रिय असलेल्या इतर प्रसिद्ध देवदेवतांचा त्यांनीं अनादर दाखविलेला नाहीं, हें या समासाच्या वरील सारांशावरून लक्षांत येण्याला हरकत नाहीं. येथें नमूद केलेल्या देवता स्फुट ओव्या क्र. १३ मध्यें नोंदलेल्या असून शिवाय तेथें कांहीं जास्त आहेत. पंढरीच्या विठ्ठलाचा उल्लेख येथें आलेला आहे व तो त्या देवाविषयीं समर्थांच्या ठिकाणीं उपेक्षाबुद्धि नव्हती हें सिद्ध करणारा आहे. या समासांत आलेल्या अनेक देवतांसंबंधांत समर्थांचीं स्तुतिपर पद्यें 'पदपदांतरें' या पुस्तकांत पहायला सांपडतात.

**दुसरा** समास 'सर्वज्ञसंगनिरूपणा'चा आहे. सर्वज्ञ म्हणजे (सर्व कांहीं) जाणता. जाणत्याची संगति धरावी, सेवा करावी, सद्बुद्धि घ्यावी. त्याच्यापाशीं लिहिण्यावाचण्याला शिकावें. सर्व कांहीं विचारावें. भजन, गाणें, वाजविणें, परीक्षा,

तालीम, पोहणें, कथा, गोष्टी, युक्ति, पीळपेंच, प्रसंग रंग, स्फूर्तीचे तरंग, इत्यादि विषय जाणत्याजवळ अभ्यासावे. जाणत्याचें धूर्तपण, राजकारण, निरूपण ऐकत जावें. जाणत्याकडून तीक्ष्णता, सहिष्णुता, उदारता (१७), कल्पना दीर्घसूचना (१८), अध्यात्म, भक्ति ज्ञान वैराग्य, ध्यान, अलिप्तपण, विदेहलक्षण, ब्रह्मविवरण (१९-२२) या संबंधांत धडे घ्यावे. खरा जाणता कोण म्हणाल तर एक अंतरात्माच आहे. त्यानेंच हें सर्व निर्माण केल्यामुळें तें वेगळें काढून त्याचा त्याच्यापुरताच विचार केला पाहिजे. तो निर्माण करतो पण दिसत नाहीं. विवेकानें तो अनुमानांत आणावा लागतो. त्याचें अखंड ध्यान लागेल तर तो आशन (खायला) देतो म्हणून त्याच्या संदर्भाला धरून नेहमीं संभाषण करावें. ' ध्यान धरीना तो अभक्त । ध्यान धरील तो भक्त । संसारापासुनी मुक्त । भक्तांस करी ॥ २९ '. उपासनेच्या शेवटीं देवाभक्तांची अखंड भेट होते. जो अनुभवी त्यालाच ही अनुभवाची गोष्ट कळणारी आहे.

सर्वज्ञाच्या गुणांच्या व कर्तव्यांच्या यादींत प्रसंग, रंगतरंग, साक्षेप, तर्क, उल्लेख या गुणांच्या घोळक्यांत एका बाजूस धूर्तपण व दुसऱ्या बाजूस निरूपण यामध्यें " राजकारण ' हा एक प्रकार आहे. राजकारणाचे हे सोबती पाहिले म्हणजे राजकारण शब्दाच्या अर्थाविषयीं समर्थांची कोणती कल्पना असेल, याचा अंदाज करतां येतो.

**तिसरा** समास ' निःस्पृहशिकवणी ' चा आहे. समास लहान असून तो एकदां स्वतंत्र असल्याची ' दास म्हणे ' ही खूण पहिल्याच ओवींत आहे. दुर्लभ शरीरांतल्या दुर्लभ आयुष्याचा नाश करूं नये. विवेक पहावा. विवेकाच्या अभावीं प्राणी रंक होतो. रंकपणा येण्याचें कारण आपणच. आळस, वाईट संगति, बाष्कळ-पणा, सर्वाविषयीं दैन्य, अन्नवस्त्राची टंचाई, बोलणें, बसणें, प्रसंग पहाणें यांपैकीं कोणताच गुण जवळ नाहीं. स्वतःस येत नाहीं, शिकविल्यास ऐकत नाहीं, आपण वेडा व सज्जनांना दोष लावतो, असा प्रकार असेल तर त्याच्या जाणिवेनें संसार बिघडल्याचा पश्चात्ताप होऊन मनुष्य विवेकाच्या अभ्यासाकडे वळतो. एकाग्र चित्तानें साधन करणें, आळस दवडणें, उत्तम गुण अभ्यासणें, प्रबंध पाठ करणें, जाड अर्थ पहाणें, आपल्या ज्ञानाचा प्रसंग पाहून उपयोग करणें, हीं कर्तव्यें सोडूं नयेत. दुसऱ्याचें अंतर व आदर पहावा आणि मग जें म्हणायचें तें म्हणावें. आठवेल

तें गाऊं नये. उपासनेप्रमाणें न चुकतां गावें. रागज्ञान, तालज्ञान, साहित्यसंगीत प्रसंगमान, यांच्या अनुषंगानें 'करावीं कथेचीं घमशानें । १८'. श्रवणमननानें अर्थांतर काढावें. पुष्कळ पाठ असावें, तें नेहमीं उजळीत असावें. सांगितल्या गोष्टीचें स्मरण असावें. 'अखंड येकांत सेवावा । ग्रंथमात्र धांडोळावा । प्रचित येईल तो घ्यावा । अर्थ मनीं ॥ २० '.

**चौथा** समास 'देहेदुल्लभनिरूपणा'चा आहे. यांतील विषय देहामुळें सर्व कांहीं घडतें, असा आहे. गणेशशारदेचा उल्लेख देहाच्या संदर्भानें आणून एक प्रकारें समासाच्या स्वतंत्र लेखनाची खूण पुरविली आहे. कवित्व, विद्या, कला, ग्रंथलेखन, लिपिपरिचय, पदार्थशोधन, श्रवण, मनन, कर्म, उपासना, ज्ञान, पुरश्चरण, अनुष्ठान, गोरांजन धूम्रपान, पंचाग्निसाधन, पापपुण्य, वंडपाखंड, भ्रम अवतार, बाह्याकार, भोगत्याग, दानधर्म, भक्तिमुक्ती, युक्ति, मतें, कीर्ति, इत्यादिकांचा देह हाच आधार आहे. ज्ञानी, साधु, ऋषि, मुनि, अशीं नांवें देहाच्या अनुषंगानेंच घेतां येतात. देहानेंच देहांतील मुख्य परमात्मा आकलन करतां येतो (५). 'जे जे देह धरुनी आले । ते ते कांहीं करून गेले । हरिभजनें पावन जाले । कितीयेक ॥ २६ '. अष्टधा प्रकृतीचें मूळ संकल्परूप असून त्याला देहाचें फळ आलें आहे. जो मूळचा 'हरिसंकल्प' तो फळांत पहावा. आत्मा व देह यांच्या सांगडीनें कार्यभाग चाललेला आहे. देहाच्या पूजेनें आंतील आत्मा संतोषतो. देहाला पीडा झाल्यास आत्मा क्षोभतो. देहाच्या न्यायानें 'जनीं जनार्दन म्हणोनी जना । संतुष्ट करावें ॥ ३५ '. उदंड विचार व धर्मस्थापनेचें कार्य जेथें आढळेल त्या पुण्य शरीराला पूजेचा अधिकार प्राप्त होतो. पूज्य असतील त्यांची पूजा करणें उचित. बाकीच्यांना उगीच तोषवावें. कोणाचें अंतर न दुखविणें बरें. जगदांतरींचा देव खवळेल तर रहायचें कुठें ? जनावेगळा जनास दुसरा उपाय नाहीं. परमेश्वरगुण जाणायचे असतील तर अध्यात्मग्रंथ श्रवण करावे.

**पांचवा** समास 'करंटपरीक्षानिरूपणा'चा आहे. ज्याला बऱ्यावाइटाची परीक्षा नाहीं, किंबहुना कित्येकदां बऱ्याला वाईट आणि वाइटाला बरें मानण्याइतका जो भ्रमिष्ट असेल, त्याची मूर्ख, करंटा, टोणपा इत्यादि शब्दांनीं समर्थ संभावना करतात, हें आतां वाचकांना समजलें आहे. या समासांतील

करंट्याची ओळख होण्याकरितां कांहीं दृष्टांत योजले आहेत. धान्य ज्या मापानें मोजलें जातें त्या मापानें त्याचें भक्षण होत नाहीं; खाण्याचें प्रमाण निराळें असतें. तसेंच ज्ञानाचें आहे. ज्ञानाचा विस्तार मोठा तरी त्याचें सेवन आपल्या कुवतीच्या मापानें करणेंच श्रेयस्कर ठरतें. पुष्कळ पाठान्तर उपयोगी नाहीं. योग्य वेळीं योग्य रीतीनें तें कामास येईल तर खरें. शब्द अनुभवानें पारखून घ्यावे. 'सार असार येक चि करावें। तें मूर्खपण ॥ ४'. एखादा लेखक (कुळकर्णी) ज्या कुळाची त्या कुळाला इष्ट आणि अवश्य माहिती नेमकी सांगण्याऐवजीं जर नुसतेच कागद वाचीत सुटला तर तो नालायक म्हणावा लागेल. दुसऱ्याला विषय समजावून देण्याची शक्ति नसेल तर कुसमुस (चुकवाचुकव लटपट) पहायला सांपडते. विचारायला गेल्यास वक्ता वसकन् अंगावर येतो. शब्दज्ञान किंवा पुस्तकी पांडित्य अनुभवाच्या कसाला उतरलें पाहिजे. नाहीं तर समुदायांत फजीतवाडा होतो. पीठ बारीक पडायला हवें असेल तर पशानें धान्य वैरून तांतडीनें जातें फिरवून चालणार नाहीं. घासांमागून घास तोंडांत भराभर ढकलले, चावायला अवकाश नाहीं, तर त्या बोकाण्याचा परिणाम अनिष्टच होणार. फडाच्या पुढाऱ्यानें क्षणभरदेखील विरंग होऊं देऊं नये. सर्वांचें अंतःकरण संभाळावें. (फड म्हणजे समुदाय, सभा अर्थात् माणसांचा जमाव. सरकारी कामाच्या फडावरील लेखनाधिकाऱ्याला फडनीस म्हणण्याचा प्रघात पडला. येथें लेखनाशीं संबंध नसून कीर्तन-प्रवचन ऐकणाऱ्या गर्दीच्या मनोधारणेचा संबंध आहे.) सूक्ष्म नांवें घेतलीं तर त्यांचें रूप ओळखून श्रोत्यांना तीं समजावून द्यावीं. जें कोडें (समस्या) निर्माण होईल तें समाधानकारक रीतीनें सोडविल्यास श्रोत्यांना आनंद होतो व प्रतिक्षणीं गोसावियाला (प्रवक्त्याला) ते नमस्कार करूं लागतात. समस्या न उलगडल्यानें वक्त्याला श्रोत्यानें नांवें ठेवलीं तर कुरकूर कामाची नाहीं. अनुभव ही ज्ञानाची कसोटी आहे. खोटें कुठेंच चालत नाहीं. म्हणून अनुभवाची यथार्थता पटवून द्यावी. व्यापार करतांना लेखी हिशोब न ठेवतां हिशोबाच्या ज्ञात्यासमोर तोंडीं सुचतील तशीं उत्तरें दिल्यास तीं खोटीं ठरतात. जर हिशेब चोख लिहिलेला असेल तर सुरनिसाच्या हुशारीची मात्रा चालणार नाहीं. या उदाहरणाचा पुढें जास्त विस्तार करून समर्थ सृष्टीचें मूळ शोधावें या विषयाकडे वळले आहेत. व्यवहारांत व परमार्थांत खरें असें एकच असतें. जें खरें तेंच न्यायाचें म्हणून न्याय सोडूं नये. न्याय सोडल्यास जग पाठीस

लागतें व जगाशीं एकटा किती भांडणार ? असत्य म्हणजे पाप, सत्य म्हणजे स्वरूप हें सूत्र घेऊन समर्थांनीं वाच्यांश, लक्ष्यांश, पूर्वपक्ष, नित्यानित्यविवेक, अन्वय-व्यतिरेक यांचा निर्देश केला आहे व शेवटीं 'तत्त्वें तत्त्व सर्व शोधावें । माहांवाकीं प्रवेशावें । आत्मनिवेदनें पावावें । समाधान ॥ ३३' याप्रमाणें समासाची पूर्तता केली आहे.

**सहावा** समास 'उत्तम पुरुष' नांवाचा आहे. समास लहान २२ ओव्यांचा असला तरी त्याच्याशीं हनुमंतस्वामीच्या बखरीनें शिवछत्रपतींचा संबंध लावल्यामुळें त्याच्या उद्देशाविषयीं वाद आढळतो. या बखरीचा उदय पेशवाईच्या अखेरीस होऊं लागला व इंग्रजी राजवटीच्या प्रारंभानंतर तो उदय पूर्णावस्थेस पोंचला. शके १७११ तील बखरीच्या खर्ड्यांत या समासाशीं शिवराजांचा संबंध दाखविलेला नाहीं. शके १७४५ च्या खर्ड्यांत या संबंधाची कथा आलेली आहे, व तिच्या-वरून अफझुलखानानें स्वारी केली त्या वेळीं हा समास लिहिला गेला, असा सिद्धांत पुढें आणला जात असतो. परंतु याला विरुद्ध असलेलें प्रमाण श्रीरामदासांनीं संशोधन खंड १ मध्यें केलें आहे. बांड क्र. ६४ चा उल्लेख पूर्वीं वेळोवेळीं केलेला आहे. हें बाड २५० वर्षांइतकें जुनें असें प्रस्तुत खंडांत म्हटलें तरी ही वर्षांची नोंद केल्यानंतर जीं सुमारें पंचवीस वर्षें लोटलीं तीं जमेला धरल्यास आज तें आणखी २५ वर्षांनीं जुनें झालें आहे. हीं वर्षें सोडलीं तरी तें बाड इ. स. १७०० च्या आंतबाहेरचें ठरतें. त्यांत हा समास 'फुट' (फक्त पहिल्या पांच ओव्यांनिशीं) या सदरांत ढकललेला आहे. ६४ व्या बाडाचें पोटबाड ५-'६' मध्यें असाच प्रकार आहे. फुट म्हणजे स्वतंत्र याची माहिती वाचकांना आहेच. बाड तयार करणारांना दासबोध माहीत असून त्यांनीं या समासाच्या पांच ओव्या व त्याहि स्फुट म्हणून लिहून ठेवाव्या हें विचार करण्यासारखें आहे. त्या बाडाच्या कर्त्याला या समासाचा बखरींतला वृत्तांत माहीत नाहीं. दासबोधांतील विषयांची इतस्ततः नोंद करणारांनीं या समासाचा विषय 'चातुर्य' असा दिला आहे. पुढें त्याचा निराळा ऊहापोह करावयाचा असल्यामुळें येथें त्याची वाच्यता न करणें बरें. बखरींतील मजकूर प्रदक्षिणाप्रकरणांत दाखल केला असून त्यासंबंधाच्या कल्पनांचा परामर्श तेथें घेतलेला आहे. प्रथम हीन प्रकृतीची व नंतर उत्तम प्रकृतीची माहिती देण्याचा समर्थांचा दंडक येथेंहि पाळलेला दिसतो. मागला समास करंटपरीक्षेचा आहे. नंतर उत्तम

पुरुषाचा. परंतु समासांतल्या समासांतदेखील पहिला भाग हीनाचा व पुढचा उत्तमाचा अशी तऱ्हा आहे.

शरीरशृंगाराहून अंतरशृंगार श्रेष्ठ असें पहिल्या ओवींत सांगून दुसऱ्या ओवींत वस्त्राभूषणांनीं शरीर सुंदर, सतेज व सज्ज केलें तरी 'अंतरीं नस्तां च्यातुर्यबीज। कदापी शोभा न पवे ॥' असें म्हटलें आहे. पहिल्या ओवींत अंतरशृंगाराचीं विवेक, विचार आणि राजकारण अशीं जीं तीन साधनें उल्लेखिलीं आहेत, त्यांनाच दुसऱ्या ओवींत 'चातुर्यबीज' हें नांव दिलेलें आहे. विवेकविचाराप्रमाणें राजकारण हें चातुर्यबीजांपैकीं एक असा अर्थ येथें स्पष्ट आहे. चातुर्यबीज ज्याच्या अंतरांत नसेल त्याचा जो अनुभव येतो, त्याचें विवेचन पुढें ६ ओव्यांत केलेलें आहे. चौथ्या व सहाव्या ओवींत राजकारण शब्द आला आहे. तऱ्हेवाईक, शीघ्रकोपी, संकुचित वृत्तीचा मनुष्य शहाणपणानें किंवा समंजसपणानें एखादी गोष्ट जमवून घेण्याला असमर्थ असतो. 'राजकारण संवादा। मिळो चि नेणे ॥'. एखादा नियम प्रतिज्ञेसारखा अनुल्लंघ्य मानल्यास सगळे प्रसंग सारखे नसल्यामुळें केलेले नियम चालत नाहींत, पण नियम मोडायचा नाहीं असा बाणा धरल्यास प्रसंगोचित शहाणपणाची योजना पार पडूं शकत नाहीं. 'नेम धरितां राजकारणा। अंतर पडे ॥'. यासाठीं विवेकी पुरुषानें अति सर्वत्र वर्जावें, प्रसंग पाहून चालावें, हट निग्रही पडूं नये (७). हट्ट फार धरल्यास तट (विरोधी पक्ष) वाढतात. निकाल होत नाहीं. पण कोणतीहि गोष्ट उत्पन्न झाली कीं तिचा निकाल हा केव्हां तरी व्हायला पाहिजे. इतकें सांगून ईश्वराला अभिमान आहे, तुळजा भवानीची त्यांतल्या त्यांत विशेष कृपा आहे, तरी विचारानें कार्य करावें असा उपदेश केला आहे. जो निरंतर सावधान आहे, त्याला सूचना करण्याची आवश्यकता नाहीं. समर्थ पुरुषाजवळचे लोक अभिमानाचे व निष्ठेचे पाहिजेत. 'म्लेंच दुर्जन उदंड। बहुतां दिसाचें माजलें बंड। १२', यासाठीं अखंड सावधान असावें. सकलकर्त्या ईश्वरानें ज्याचा अंगीकार केला त्या पुरुषाचा विचार जाणणारा विरळाच असतो. यानंतरच्या १४–२१ ओव्यांत 'देणें ईश्वराचें' या पालुपदाच्या ओव्या असून त्यामध्यें पूर्वीं वर्णिलेल्या उत्तम पुरुषाच्या गुणांची यादी आहे. शेवटीं 'सकळ गुणांमध्यें सार। तजविजा विवेक विचार। जेणें पाविजे पैलपार। अरत्रपरत्रींचा ॥ २२'.

'देणें ईश्वराचें' या पालुपदाच्या ओव्यांतून ज्या गुणांना स्थान दिलें आहे

त्यांतला एकहि गुण असा नाहीं कीं ज्याचा पूर्वी उच्चार झालेला नाहीं. तसाच प्रकार ३–८ या ओव्यांतील दोषदर्शक शब्दांचा आहे. इतर समासांतील समान व समानार्थक शब्द आणि वाक्यें यांचें दिग्दर्शन केल्यास समासांतील वरील विधानाची यथार्थता पटण्याचा संभव निश्चितपणाच्या सीमेंत येईल असें वाटतें. मासला म्हणून एका शब्द-संग्रहाचें परीक्षण केल्यास हरकत नाहीं. 'पापी अपस्मार' (५) यांत 'अनर्थी' हा शब्द नाहीं. 'पापी अनर्थी अपस्मार' इतके शब्द एकदम उच्चारले जाण्यासारखे समर्थांच्या तोंडीं बसले होते असें २:३:२४ व १९:३:१५ यावरून दिसतें. न्यायनीतीचा अनादर, दुरभिमान, इत्यादि दुर्गुणांचा निषेध पूर्वीच्या अनेक समासांतून पहायला सांपडतो. सावधपणा, लोकांची निष्ठा संभाळणें, न्यायनीतिविवेकविचाराचा आदर व अभ्यास, उद्योगप्रियता, लोकांचा सांभाळ, देवाचा कैवार, परोपकार, परांतर ओळखून वागणें, धारिष्ट इत्यादि गुणांचा व कर्तव्यांचा पूर्वीच्या समासांतून पुष्कळ वेळां उच्चार झाल्यामुळें येथें त्यांचा निर्देश पहातांच मागल्यांचें सहज स्मरण होईल.

**सातवा** समास 'जनस्वभावनिरूपणा'चा आहे. सामान्यतः सर्व प्रापंचिक माणसें देवासंबंधीं फारशी आस्था न बाळगतां ज्या रीतीनें वागतात, त्या रीतीला येथें 'जनस्वभाव' म्हटलें आहे. त्या रीतीची ओळख पहिल्याच ओवींत समर्थांनीं करून दिलेली आहे. देव म्हणजे द्यावें असा श्लेष काढून देव देव हा शब्द बोलतांना देवाकडून कांहीं मिळावें, हा लोभ लोकांच्या मनांत असतो, 'जनाचा लालचा स्वभाव। आरंभीं च म्हणती देव। म्हणिजे मला कांहीं देव। ऐसी वासना॥ १'. भक्ति करायची नाहीं व देवाच्या प्रसन्नतेची अपेक्षा धरायची हा प्रकार चाकरीखेरीज मुशाहिरा मिळण्याची आशा धरण्यासारखा आहे. ही रीत सोडून कष्ट करावे, आळस टाकावा. इहलोक वा परलोक या दोन्ही विषयांत सारखाच विवेक लागतो. दूरदृष्टि (दीर्घ सूचना) असावी. इहलोकीं संचितार्थ (दूर दृष्टीनें सांठविलें द्रव्य) उपयोगीं पडतो. परलोकासाटीं परमार्थाची आवश्यकता असते. एकदां मरून सुटका होत नाहीं. देव सर्व कांहीं करतो असें म्हणतात, परंतु भेटीचा लाभ अकस्मात् कसा होईल? देव एकच आहे. त्याचें कर्तृत्व आणि तो याचें पृथक् ज्ञान झाल्याशिवाय सारें बोलणें व्यर्थ. उदंड कष्टाचें भाग्य हें फळ आहे. कष्टाशिवाय बोलणारे तेवढे करंटे. ज्याची कुबुद्धि अपार तेथें विचाराच्या नांवानें शून्याकार आढळणें हेंच सरळ

आहे. विचारानें इहलोकपरलोक, जीविताचें सार्थक, नित्यानित्यविवेक हे विषय पहाणें अवश्य आहे.

**आठवा** समास 'अंतर्देवा'चा म्हणजे अंतरात्म्याच्या वर्णनाचा असून त्याचा प्रारंभ ब्रह्म निश्चळ, आत्मा चंचळ या पूर्वपरिचित विधानानें केलेला आहे. आत्म्याला देव म्हणतात, पण देवाचा ठाव लागून एक देव कळणें सोपें नाहीं. अनेक देवांच्या गडबडींत भांबावून जाऊं नये. क्षेत्रांत देव धातूचा असतो हें पाहून प्रतिमेचे देव निघाले. पाषाणाचे देव होऊं लागले. त्याचा विचार अवतारापर्यंत जाणारा आहे. अवतारापलीकडचे ब्रह्मा, विष्णु, महेश व या तिन्हींवर सत्ता अंतरात्म्याची आहे. तिन्ही लोक युगानुयुगें तोच चालवितो, पण त्या अंतर्देवाला विसरून लोक तीर्थाकडे धावतात. धोंड्यापाण्याशिवाय तीर्थावर कांहीं नसतें, हें ज्याला कळतें तो सत्संग धरतो. त्या योगानें पुष्कळांना देव सांपडला आहे. अंतर वेधावें, बाहेरचा देखावा निरुपयोगी, म्हणून विवेकी 'अंतर शोधिती' (१५). विवेक नाहीं तर सारा अभावच. प्रतिमेची पूजा मूर्खांसाठीं आहे. पहात, समजून घेत जो शेवट गाठील तो विवेक भला. सर्व आकार विनाशी होत. ज्ञान अनुभवाचें पाहिजे. सगुणाच्या आधारानें निर्गुण पावतें. मुख्य ज्ञानाचा परिपाक विज्ञानांत होतो. विवेकाचीं विवरणें स्वस्थ चित्तानें पहावीं. 'नित्यानित्य विवेकश्रवणें। जगदोधार ॥ २५'.

अकराव्या ओवी शतकांत तीर्थावर 'पाणी आणि धोंडा जेथें तेथें। ४६' हा विचार आलेला आहे.

**नववा** समास 'निद्राविलासा'चा आहे. याचा आरंभ आदिपुरुषाच्या वंदनानें केला आहे. झोपेच्या प्राबल्यानें कीर्तनाच्या फडांत किंवा दुसऱ्या एखाद्या समुदायांत बसलेलीं माणसें काय करतात, याची तपशीलवार माहिती या समासांत असून समर्थांच्या वर्णनशैलीचा नमुना म्हणून तो वाचण्यासारखा आहे. रात्रभर झोपेचा खेळ झाल्यावर सकाळ उजाडली व कोणी पठन, कोणी हरिकीर्तन, कोणी प्रातःस्मरण, कोणी ध्यान, कोणी जप, कोणी पाठांतराची उजळणी, कोणी गायन याप्रमाणें कर्में सुरू झालीं. निद्रा संपली, जागृति आली, जो तो आपल्या व्यवसायांत लक्ष घालूं लागला, पण ज्ञाता मात्र तत्त्वें मागें टाकून तुर्येच्या पलीकडे जातो व आत्मनिवेदनानें ब्रह्मरूप पावतो.

एकवीससमासी जुन्या दासबोधाच्या तिसऱ्या समासांत निद्रेचा प्रताप एकूण १३ ओव्यांत वर्णिलेला असून 'कडकडा जांभया देती । डकडकां ढुकल्या देती ।' आणि 'येक ते कलथोनि पडिले । येकीं फोडिले ब्रह्मविणे ।' हीं तेथील वाक्यें या समासांत जशींच्या तशीं आहेत. एकवीस समासींत निद्रेमुळें घडणाऱ्या पारमार्थिक हानीचें विवेचन जास्त आहे. येथें नुसते झोपेचें शारीरिक परिणाम दाखविले आहेत.

**दहावा** समास 'श्रोताअवलक्षणा' चा आहे. काळ सदैव सारखा नसतो. कधीं सुख, कधीं दुःख असा हा चक्रनेमिक्रम आहे. कधीं कधीं तर इहलोक परलोक हे दोन्ही साधणारा विवेक अद्‌भुताला स्वाभाविकांत आणून सोडतो, हें ईश्वराचें देणें समजावें. जें कृत्य असामान्य लोकोत्तर मानलें जाईल तें सहज सिद्धीस गेल्या-मुळें त्याचें आश्चर्य वाटत नाहीं. 'अद्भुत चि होये स्वभाविक । देणें ईश्वराचें ॥ ५ '. यानंतर श्रवणमनन, श्रवणाच्या आड येणारे विक्षेप, याचा विचार आहे. यांत सपाटून जेवलेल्या माणसाची निरूपण ऐकतांना जी दुर्दशा उडते ती चार ओव्यांत सांगितली आहे. याखेरीज विंचू चावला, पोटांत तिडिक उठली, पाठींत करक (उसण) भरली, असल्याहि विक्षेपांची नोंद आहे. जवळपास गलबला झाल्यास श्रवण सोडून तिकडे धावणें हा एक विक्षेप आहे. 'विषइ लोक श्रवणीं येती । ते बायेकां-कडे च पाहाती । चोरटे लोक चोरून जाती । पादरक्षा ॥ २६ '. कोणी चकाट्या पिटीत बसतात, हरिदास बिचारा पोटासाठीं रे रे करीत असतो. कित्येकदां वादविवाद माजतो. श्रोत्याचें अवलक्षण संपवून पुढें समर्थांनीं शहाण्या वक्त्यांचीं कर्तव्यें सादर केलीं आहेत. जगदांतर राखणें, क्षमाशांति, सोशिकपणा, उपायपर्याय, दीर्घ यत्न, स्थिर विवेक इत्यादि नेहमींचीं कर्तव्यें निराळ्या शब्दांनीं दिलेलीं आहेत. मूर्खांनीं मजलिसीचा चिवडा केल्यास शहाणे मजलसीची घडी नीट बसवितात. स्वतः सोसतात, दुसऱ्याला सोसायला लावतात, करतात, करवितात. सज्जन पुरुष क्षुब्ध मनोगताच्या खांचाखोंचा व वेळप्रसंग धोरण ओळखून संततांना शांत करतात. 'बहुत जनास चालवी । नाना मंडळें हालवी । ऐसी हे समर्थपदवी । विवेकें होते ॥ ४६ '. नंतर एकान्ताचे लाभ निवेदन केले आहेत. 'जयास येकांत मानला । अवघ्या आधीं कळे त्याला । त्यावेगळें वडिलपणाला । ठाव चि नाहीं ॥ ५० '.

# • १९ •

या दशकाचें नांव ' शिकवण ' असें आहे व याच्या दहाहि समासांत महंताच्या शिकवणीचे विषय आहेत. दुसऱ्या समासाला ' विवरणनिरूपण ' असें म्हटलें आहे, परंतु त्यांत समर्थांनीं आपल्या विचारसृष्टींतील ' उत्तम ' पुरुषासंबंधांतील अपेक्षांचेंच विवरण केलें आहे. तिसरा समास करंटलक्षणाचा असून त्याच्या पुढचा ' सदेव-लक्षणां 'चा आहे. सदेव म्हणजे दैवी संपत्तीचा पुरुष; याची ओळख पूर्वीं झालेली आहे. याप्रमाणें या नाहीं तर त्या नांवानें समर्थांच्या शिकवणीचीं सर्व प्रमुख अंगें या दशकांत आलेलीं आहेत. यांतल्या नवव्या समासाचें नांव ' राजकारण ' असल्यामुळें त्याचा आशय राजनीतिपर आहे कीं सामुदायिक व्यवहार सुरळित चालण्याकरितां अवश्य असणाऱ्या कुशलतेचा किंवा चातुर्याचा आहे, याविषयीं साशंकता उत्पन्न होत असते. त्याचा विचार पुढें करावयाचा आहे.

**पहिला** समास ' लेखनक्रिये 'च्या गुणांचा आहे. ब्राह्मणानें बाळबोध अक्षर घडसून सुंदर करावें, असें म्हटल्यावर सुंदर अक्षर म्हणजे काय याचें उत्तर ' वाटोळे मोकळे काळेभोर ' असें दिलें असून त्याच्या ओळी मोत्याच्या माळेप्रमाणें दिसाव्या म्हणून सांगितलें आहे. पहिल्यापासून ग्रंथ संपेपर्यंत अक्षरांत फरक नसावा, वगैरे मजकूर पुढें आहे. प्रत्येक गोष्टीचा बारीकसारीक तपशील सांगण्याची समर्थांची दक्षता येथेंहि प्रगट झालेली आहे. तसें कांहीं तपशील दाखविण्याला हरकत नाहीं. नव्या लेखकानें वाचणाराला मोहन (मोहिनी) पडेल असें लिहावें. बारीक अक्षर म्हातारपणीं नडतें म्हणून मध्यस्थ अक्षर लिहावें. अक्षर असें स्पष्ट असावें कीं कागद एक वेळ झडला तरी तें दिसावें. अक्षराच्या सौंदर्याचा मोह पडून लेखकाला पहाण्याची इच्छा लोकांना व्हावी. लेखनाच्या व ग्रंथरक्षणाच्या साहित्याची या समासाच्या उत्तरार्धांत माहिती आहे.

**दुसरा** समास ' विवरणा 'चा आहे. चांगल्या गुणांचें विवरण आहे. निश्चित अनुभवाच्या ज्ञानानें आशंका-प्रत्युत्तरें, पूर्वपक्ष-सिद्धांत या प्रकरणांचा निकाल करतां आला कीं, जगदांतरें अर्थात् लोकांचीं अंतरें ' चमत्कारती ' (२) बुद्धींत विचारांचा गोंधळ असूं नये. विचारणाराचा हेतु नेमका ओळखून उत्तर द्यावें. ' मुख्य च्यातुर्याचीं लक्षणें । तें हें ऐसीं ॥ ६ '. चातुर्याखेरीज खटपट, विद्या, सभा

यांना सफळता नाहीं. इतरांचें बोलणें मौन धरून पुष्कळ ऐकावें. जगदांतर अल्पचिन्हें समजावें (८). बाष्कळांना टाळावें, उद्धटाशीं तंडूं नये, आपल्यामुळें लोकांचें समाधान भंगण्याचा प्रसंग येऊं देऊं नये. नेणतेपणा संभाळावा, जाणतेपणानें फुशारूं नये, लोकांचें हृदय मृदु वाणीनें उकलावें, प्रसंग नेमका ओळखावा; बहुतांशीं हुज्जत करूं नये, (त्यायोगानें कदाचित्) आपली बाजू खरी असूनसुद्धां फड बिघडतो. सदैव शोध घेत रहावें. भ्रष्टांत बसूं नये व योगायोगानें बसावें लागलेंच तर खोटा दोष टाकूं नये. आर्तांचें अंतर पहावें, वेळीं थोडेंच वाचावें, भल्या माणसांना आपली चटक लावावी. मजलसींत बसूं नये. समाराधनेच्या जेवणाला जाऊं नये, त्या योगानें कमीपणा येतो. उत्तम गुणांच्या योगानें कुणाशींहि बोलतां येतें. भले असतील त्यांनाच मित्र करावें. उपासनेप्रमाणें बोलावें. लोकांना संतोषवावें, सर्वांशीं बरेंपण राखावें. आधीं शोध घ्यावा, मग गांवांत शिरावें. सर्वांना आपण कोणी आप्त आहों असें वाटावें. ल्हानमोठा हा भेद न पाहतां सर्वांचें हृदय निववावें. मित्रत्वाचें सूत्र आपल्या जिभेपाशीं आहे. कुठें कथा चालू असेल तर तेथें एखाद्या दीनाप्रमाणें जाऊन बसावें व अंतर्यामीं तेथील हरद्र (वर्म-रहस्य) सांठवावें. भले कोण व्यापक कोण, यांची माहिती मिळवून मग तेथें हळूहळू शिरकाव करावा. श्रवणमननानें लोकांचें समाधान करतां येतें. ‘ धूर्तपणें सकळ जाणावें । अंतरीं अंतर बाणावें । समजल्याविण सिणावें । कासयासी ॥ २३ ’.

**तिसरा** समास ‘ करंटलक्षणा ’चा आहे. करंटलक्षणें टाळल्यानें सदेवपण अंगीं बाणतें. करंटा ज्याला समजायचें त्याच्या ठिकाणीं पुढील दोष असतात. आळसाची आवड, यत्नाची नावड, अधर्मी बळकट वासना, याखेरीज भ्रमिष्टपणा, झोपाळूपणा, स्वैर वाचाळता, लिहिण्यावाचण्याचा व हिशेबकिताबाचा शून्याकार, दुर्जनांची संगत, भांडखोरपणा, दीर्घसूत्रता, न्यायनीति यांचा अभाव, या दुर्गुणांच्या यादीला झोप व आळस याचे दुष्परिणाम जोडले आहेत. नंतर स्वैर वाचाळतेचे पर्याय सांगितले आहेत. दुसऱ्याचा संहार हाच त्याचा उद्योग असतो. कोणाचा विश्वास नाहीं, कोणाशीं सख्य नाहीं, विद्यावैभव नसलें तरी ताठा मात्र मोठा. स्वतःला कळत नाहीं, शिकविलें तर ऐकत नाहीं. लाभदायक नसलेलीं मनोराज्यें करण्याची हौस फार, असा त्याचा स्वभाव असतो. हा मनुष्य कुचकामाचा असें लोकांना कळतें. ‘ कांहीं नेमकपण आपुलें । बहुत जनासी कळों आलें । तें चि मनुष्य मान्य जालें ।

भूमंडळीं ॥ २३ '. अवलक्षणापायीं जिकडे तिकडे फजितीचा प्रसंग ओढवतो. थोडक्यांत 'जेथें नाहीं उत्तम गुण । तें करंटपणाचें लक्षण । २७ ' असें म्हणतां येतें. जो लोकांना मान्य नाहीं तो पापी निराश्रितपणानें सर्वत्र उघडा पडतो.

**चौथा** समास 'सदेवलक्षणा 'चा आहे. सदेवाच्या ठिकाणीं कांहीं गुण उपजत असतात. परोपकारानें तो सर्वांना आवडतो. सुंदर लिहितो, शुद्ध वाचतो, अर्थांतर बिनचूक सांगतो. कोणाचें मन तोडीत नाहीं. भल्याच्या संगतीला चिकटून राहतो. नाना उत्तम गुणांचा, सत्पात्र, जगाचा मित्र व स्वतंत्र असतो. अंतर राखणें, पाठांतर, नम्रता, निश्चितपणा, योग्य वेळीं मदतीस धावणें, विद्या-कलांचें अध्ययन, आत्मविद्येचा जिव्हाळा, कुणाचें उणें पडूं न देणें, न्यायनीति, भजन, असे त्याचे इतर पूर्वपरिचित गुण सांगितले आहेत. लोक आपल्या कार्यांत मग्न राहतील असा परोपकार त्याच्या हातून घडतो. 'प्रपंचीं जाणें राजकारण । परमार्थीं साकल्य विवरण । १७ ' ही ओवी याच अनुसंधानांतली आहे. तो असेल त्या जागीं कधीं भांडणतंटा होत नाहीं. उत्तम गुणांचा पुरुष सूर्यासारखा तेजस्वी असतो.

**जो मानला बहुतांसी । कोणी बोलों न शके त्यासी ।**
**धगधगीत पुण्यरासी । माहांपुरुष ॥ ९**

... ... ...

**उदंड मुलें नाना परी । वडिलांचें मन अवघ्यांवरी ।**
**तैसी अवघ्यांची चिंता करी । माहांपुरुष ॥ २४**
**जयास कोणाचे सोसेना । तयाची निःकांचन वासना ।**
**धीकारिल्या धीकारेना । तो चि माहांपुरुष ॥ २५**

... ... ...

**बहुतांसी वाटे मी थोर । सर्वमान्य पाहिजे विचार ।**
**धीर उदार गंभीर । माहांपुरुष ॥ ३०**

मागल्या समासांत थोडक्यांत जसें करंट्याचें लक्षण सांगितलें, तसें येथें दोघांचें लक्षण एकत्र दिलें आहे.

**जितुके कांहीं उत्तम गुण । तें समर्थाचें लक्षण ।**
**अवगुण तें करंटलक्षण । सहज चि जालें ॥ ३१**

**पांचवा** समास 'देहेमान्य' या नांवाचा आहे. देहाच्या योगानें देवाचीं भजन-पूजन इत्यादि कार्यें होतात, असा विचार पहिल्या भागांत असून पुढें क्षेत्र, देव अवतार, ब्रह्मा विष्णु महेश, यांच्या पलीकडचा गुणातीत देव ओळखण्याचा यत्न सत्संगानें व स्वानुभवानें करावा हा उपदेश आहे. सगळ्या देवाचें मूळचें पहिलें स्मरण (ब्रह्मांतलें स्फुरण) हें आहे. नाना आकारानें तें स्मरण वाढलेलें आहे. मनुष्याचा देह हा त्यांतलाच एक प्रकार आहे. खरा देव ओळखावयाचा असेल तर भूमंडळांतल्या नाना देवांची भीड धरून चालणार नाहीं. देवाचें कर्तृत्व वेगळें करून देवाला पहावें. जें दिसत नाहीं, भासत नाहीं, कल्पान्तीं नष्ट होत नाहीं, तेथें सुकृत असेल तर विश्वास राहील (२५). 'हें ज्ञानदृष्टीनें पाहावें । पाहोनी तेथें चि राहावें । निजध्यासें तद्रूप व्हावें । संगत्यागें ॥ २८' हें समासाचें तात्पर्य आहे.

गंध, पुष्प, धूपदीप या सुगंधी पदार्थांच्या उल्लेखांत 'अत्र' हा एक शब्द आहे (१०) व तो अत्तराचा वाचक दिसतो. गंधादिकांबरोबर 'अत्र' शब्द 'पंचीकरण योग' प्रकरणांतहि आलेला आहे (योग २ : ७).

**सहावा** समास 'बुद्धिवादा'चा आहे. येथें बुद्धिवाद म्हणजे महंताच्या कर्तव्याचा विचार असा अर्थ करावा लागतो. प्रारंभीं उपदेश कोणीं कोणाला करूं नये, याची चर्चा आहे. भाऊ भावास उपदेश करील तर फजितीचा प्रसंग ओढवतो. ओळखीच्या लोकांत महंती मांडूं नये (६). भ्रतार शिष्य, स्त्री गुरु हा प्रकारदेखील अयोग्य (८). खऱ्या महंतानें 'कोण्हास कांहीं च न मागावें । भगवद्भजन वाढवावें । विवेकबळें जन लावावें । भजनाकडे ॥ ११' या ओवीमुळें १२ : १० मधील 'आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी । आपणामागें जगदीशासी । भजत जावें ॥ ३४' या ओवीचें स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं. तुर्क गुरु, चांभार शिष्य, असला व्यवहार भ्रष्टतेला कारण होतो (१३). ब्राह्मणमंडळ्या, भक्तमंडळ्या व संतमंडळ्या शोधून कोणाची जमवाजमव तर कोणाचा मानसन्मान अशीं कामें करावीं. 'उत्कट भव्य तें चि घ्यावें । मळमळीत अवघें चि टाकावें । निस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ॥ १५'. लिहिणेंवाचणें, अर्थांतर सांगणें, नाचणें, गाणें, पाठांतर, दीक्षा, मैत्री, राजकारणांत तीक्ष्ण बुद्धि, इत्यादि गुण ज्याच्या अंगीं बरे असतात, आपलें अलिप्तत्व ज्याला राखतां येतें तो श्रेष्ठ पुरुष गणावा. हरिकथा, नामघोष, प्रखर उपदेश हीं कामें चुकत

नाहींत. तो दुर्जनास राखतो, सज्जनास संतोषवितो, ज्याचें त्याचें मनोगत जाणतो, त्याच्या संगतीचीं माणसें सद्गुणी होतात, त्याचा समुदाय अभ्यासाला चिकटतो, तो नेहमीं नवा नवाच भासतो, लोकांना हवासा वाटतो, पण कधीं लोभांत गुंतत नाहीं. भक्ति, ज्ञान, चातुर्य, भजन, योग, अनुष्ठान, निःस्पृहता हीं सारीं त्याच्या अंगीं उत्कट असतात. 'कांहीं येक उत्कटेविण । कीर्ति कदापि नव्हे जाण ।। २४'. वय आणि शरीर यांचा विश्वास नाहीं, म्हणून सदैव सावधान राहून जेवढें होईल तेवढें करावें; 'भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ।। २६'. यापुढें एकान्ताच्या लाभाचें वर्णन आहे.

**सातवा** समास 'येत्ननिरूपणा'चा आहे. कथेचें घमंड आणि निरूपणाचें विवरण, कोणाचें उणें पडूं न देणें, असा यत्ननिरूपणाचा प्रारंभ आहे. महंतानें आपली भूमिका यशस्वी होण्यासाठीं कसें वागावें, हें या समासांत सांगितलें आहे. तात्पर्याच्या दृष्टीनें यांत नवीन विचार नाहीं. विवेचनाच्या तऱ्हेंत मात्र निराळेपणा आहे. जो ज्या कामांतला जाणता असेल त्यालाच त्या कामांतलें यशापयश समजतें. बाकीचे नुसतेच बध्ये. उत्तराला विलंब लागल्यास महत्त्व जातें. थोडें बोलून समाधान करावें. रागावण्याचा प्रसंग आला तरी मनुष्य तोडूं नये. त्याला आपल्या वेधांत राहूं द्यावें. एखादी गोष्ट न सोसल्यास चिणचिण करणें हें तामस वृत्तीचें लक्षण असून त्या वृत्तीनें श्रोत्यांची आवड जाते. कोण प्रसन्न व कोण रुष्ट आहेत याचा सारखा शोध पाहिजे. विकल्पानें शिष्य बिथरला व गुरूनें त्याची मनधरणी चालविली तर विकल्पच माजतो. आशाबद्ध क्रिया-चातुर्यहीनाची महंती म्हणजे निव्वळ भणभण. कीर्ति वाढावी, सर्व लोकांत हव्यास उपजावा. लोकांच्या प्रसन्नतेनें सर्व कांहीं करावें. परक्या लोकांत रहावें. समुदाय तटस्थपणें पहावा. मागण्याचा तगादा नसावा. 'जिकडे जग तिकडे जगन्नायेक । १२' हा विवेक बाळगणारे पुरुष लोकांना संभाळतात. दिसेल तें मनुष्य नष्ट समजणारा तेवढा एकटाच मात्र भला कशावरून? निर्जन ओसाडींत रहायचें कसें व पहायचें काय? लोकांत वागतांना केव्हां कुठें दांडगा खोटेपणा दिसल्यास कांहीं पड घ्यावी. सारांश, लोकांत ज्याला नीट वागतां येत नाहीं त्याची महंती व्यर्थ असल्यामुळें त्यानें पारलौकिक कल्याणाचा उपाय श्रवण करून असावें. लोकांत वागणें हें धकाधकीचें व तीक्ष्ण बुद्धीचें काम आहे. यापुढें लोकांत कसें वागावयाचें याचेंच वरच्याप्रमाणें विवेचन आहे. काम करायचें

असेल तर तें चोख करावें; नाहीं तर स्वस्थ रहावें. या विवेचनांत परिभ्रमणाचें एक कर्तव्य सांगितलें आहे (२८-२९).

**आठवा** समास 'उपाधिलक्षणा'चा आहे. उपाधि म्हणजे पारमार्थिक लोकोद्धाराचा उद्योग. अशा उद्योगांत पडणारा जर पुरेसा योजक नसेल, तर त्याचा उद्योग वायां जातो, हा सगळ्या समासाचा सारांश आहे. परंतु प्रारंभीं परिभ्रमण केल्यास उदासीन वृत्तीचे, सुखदुःख समान लेखून आपलें समाधान अभंग राखणारे प्रापंचिक देखील भेटतात. बोलणें-चालणें नेमकें, बोलण्याच्या अपूर्वतेनें लोकांस मान्य होणारे, अशा योग्यतेचे ते प्रापंचिक असतात. त्यांच्या ठिकाणीं महंताचीं लक्षणें दिसावीं अशी त्याची श्रेष्ठता असते. रागज्ञान, तालज्ञान, न्यायनीति हीं त्यांच्या ठिकाणीं उपजत असल्यासारखीं वाटतात. याप्रमाणें महंतलक्षणाच्या प्रापंचिकाची माहिती संपल्यावर अवगुणी पुरुषाच्या अस्ताव्यस्त व्यवहाराचा विचार केला आहे. माणसाला स्वतःचे दोष कळत नाहींत हें मोठें पाप आहे. जपून जपून वागल्यानें कामें होत नाहींत, 'ढाळें चि'—साहसानें होतात. मूर्खांच्या कारभारांत राजकारणें चुकतात, राजकारणीं वेढा लागतो, फजिती होते. चुकायचें नसेल तर उपायांचें उदंड ज्ञान पाहिजे. चुकल्यास उपायाचा अपाय होतो. काय चुकलें तें कळत नाहीं. 'येखादें मनुष्य तें सिळें। त्याचें करणें चि बावळें। १६'. आपल्या कल्पना आपणच बळकट बुद्धीनें आटोपाव्या. ज्याला हें जमणार नाहीं त्यानें उपाधी वाढवूं नयेत. मन सावध ठेवून स्वस्थ रहावें हें उत्तम. उपाधीचें काम कांहीं नीट तर कांहीं अडचणीचें असतें, हें ओळखून वागावें. लोकांत भावार्थ नसतो, तो वाढवावा लागतो. याचें सूत्र अंतरात्म्याकडे असल्याचें सांगून अंतरात्मा चंचल, चंचलांत धोके फार, म्हणून निश्चळाशीं एकरूपता साधावी, म्हणजे उपाधीची, आल्यागेल्याची क्षिति वाटत नाहीं. 'कांहीं गल्बला कांहीं निवळ। ऐसा कंठित जावा काळ। २९'. शेवटीं क्षणक्षणा नरदेह प्राप्त होत नाहीं अशी सूचना देऊन, उपाधीची काळजी सोडून थोर समाधान संपादावें, असें म्हटलें आहे.

**नववा** समास 'राजकारणनिरूपणा'चा आहे. जो ज्ञानी आणि उदास असून समुदायाचा हव्यास बाळगतो, त्यानें एकांतसेवनाची संवय ठेवावी. एकांतामध्यें तजविजा कळतात, चाळणा निघतात, प्राणिमात्राची गतिस्थिति आकलनांत येते.

सामान्य व्यवहारांत गडबड संपल्यावर एकटें बसून मनुष्य आपल्या कामकाजाचा झाडा घेतो तसाच हा प्रकार आहे. असें न केल्यास दिवाळखोर ठरण्याचा प्रसंग येतो. लोकांच्या मनांत उद्भवणारे तरंग ज्याला आधींच ताडतां येतात, त्याच्याकडे कृत्रिम कपट चालत नाहीं. सलगी व अतिपरिचय टाळण्यासाठीं सदैव भ्रमण करावें. एके ठिकाणीं राहूं नये. आळसानें कारभार बुडतो व समुदायाचें मानस कळेनासें होतें. समुदायामागें उपासनेचीं कामें नित्य नेमानें लावून दिल्यास त्याला कृत्रिम करायला फुरसत मिळत नाहीं. चोर भांडारी करावा, तो घसरल्यास सांभाळावा. मूर्खपणाचा गुंता हळुहळू सोडवावा. हें सांगण्यांत नवें असें कांहीं नाहीं. कुणालाच कष्ट न होऊं देतां थोर पुरुष राजकारणाचें मंडळ (समुदाय) सर्वत्र वेढून टाकतो. कांट्यानें कांटा काढावा, पण हा प्रयोग कुणाच्या लक्षांत येऊं देऊं नये. आपण बावळट भोळे आहों, हा दुर्जनाचा समज कायम ठेवावा. ‘न कळतां करी कार्य जें तें । तें काम तत्काळ चि होतें । १३’. ऐकून आवड लागावी, पाहून ती आवड बळकट व्हावी, तथापि सलगीच्या लोकांत आपली पदवी सेवकाची हा भ्रम राहूं द्यावा. कोणतेंहि काम केल्यानें होतें. करण्यांत ढिलेपण नसावें. ‘जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला । जो आपण चि कष्टत गेला । तो चि भला ॥ १६’. सर्वांना सगळें कळलें तर त्याचें रहस्य जातें. मुख्य सूत्र आपल्या हातीं ठेवून सर्व कामें लोकांकडून करवावीं. राजकारणामधें दुष्टांना उघडकीस आणावें. तोंडाळ भांडखोरांशीं झटें घ्यावीं (झटापट करावी). राजकारणांत दुर्जन वाढणार नाहींत अशी खबरदारी घ्यावी. गुंडगिरीचें वर्म नेमकें हेरून तिचीं हाडें खिळखिळीं करावीं, पण पुनः गुंडगिरांना सांवरावें. खळदुर्जनाच्या धास्तीनें राजकारण गमावल्यास सगळें बरेंवाईट उघड्यावर पडतें. समुदाय मोठा हवा असेल तर त्याच्या उभारणीचीं साधनें बळकट असावीं. मठ करून ताठा धरूं नये. दुर्जनांना ओळखून सज्जनाप्रमाणें आळवावें. लोकांत दुर्जनांना उघड वावरूं दिल्यास सदैव कटकट चालू राहील म्हणून त्यांच्या वाटा बुजवून टाकाव्या. (स्वजनांचा) कैवारी व परमार्थी (सचोटीचा) राजा असेल तर शत्रूच्या फौजा पहातांच त्याच्या रणशूर सैनिकांचे बाहू फुरफुरतात. त्या राजासारखा समुदायाचा नियंता असावा, म्हणजे दुर्जन जागच्या जागीं दबतात. तो प्रचीतीचे तडाखे मारणारा असल्यामुळें बंडपाखंडाचा धुव्वा उडतो (त्यांना वाखा होतो—अपमृत्यु येतो). हीं धूर्तपणाचीं कामें असल्यामुळें

राजकारण नियमानें करावें. ढिलेपणा नसावा. परिणामीं हा नियंता कुठेंच आढळत नाहीं, त्याच्या गोष्टी सर्वत्र बोलल्या जातात. आपल्या वाग्विलासानें तो सगळी सृष्टि वेधून सोडतो. यानंतर जशास तसा भेटविण्याविषयीं ओव्या आहेत. जशास तसा भेटल्यानें मजलिशींत रंग भरतो, पण या कामगिरीचा धनी मात्र दृष्टीस पडत नाहीं.

**दहावा** समास 'विवेकलक्षणा'चा आहे. येथील विवेक अध्यात्माचा नसून महंताच्या व्यवहाराचा आहे. चाळणा, धारणा, राजकारण, उत्तम गुणांचें निरूपण, चर्चाआशंका, प्रत्युत्तरें, खऱ्याखोट्याचा निवाडा, शास्त्राधारें वक्तृत्व, हीं विवेकाचीं कांहीं अंगें आहेत. भक्तिमार्ग, उपासनामार्ग विशद करणें, ज्ञानविचार अंतर्यामीं स्वच्छ असणें, वैराग्याची व उदासवृत्तीची आवड, प्रबंधाचीं पाठांतरें, हीं विवेकाचीं आणखी कित्येक लक्षणें आहेत. सकळांचीं अंतरें राखणें, या विवेकगुणाचा येथें विसर पडलेला नाहीं. समुदायाचा नेता सहज सांपडूं नये. या कल्पनेला विवेक-लक्षणांत स्थान आहे. असा पुरुष प्रख्यात असतो, पण आढळत नाहीं. नाना देशींचे लोक आले तरी तितक्यांचीं अंतरें वश करून तो विवेकविचारानें भरून टाकतो. अंतःकरणें कितीहि नाठाळ (कडोविकडीचीं) असूं देत. तो त्यांचें विवरण करतो. त्याचे लोक किती, समुदाय किती हें कळत नाहीं, तरी तो त्यांना श्रवणमनना-कडे ओढून घेतो. फडाची समजूत काढणें, गद्यपद्य सांगणें, 'परांतरासी राखणें। सर्वकाळ ॥ १२'. 'जितुकें कांहीं आपणासी ठावें । तितुकें हळुहळु सिकवावें । शाहाणे करूनि सोडावे । बहुत जन ॥ १४'. यानंतर लोकांना कसें शिकवावें याचा विचार आहे. आपण करावें, लोकांकडून करवावें; पण 'भगवद्भजन राहावें । हा धर्म नव्हे ॥ १६'. जुन्या लोकांचा कंटाळा आल्यास नव्या ठिकाणीं जावें. पण कर्तव्याचा आळस नसावा. 'देह्याचा अभ्यास बुडाला । म्हणिजे महंत बुडाला । १९'. हा मामला धकाधकीचा असल्यामुळें तो शक्ताला (बळकटाला) शिकवावा. उपाधींतून सुटला, निःस्पृहतेनें बळावला कीं तो (महंत) जिकडे अनुकूलता तिकडे जातो. उत्साह व धीर सोडल्यास संसारदेखील शेवटाला जात नाहीं. संसार मुळांत नासका असला तरी विवेकानें नेटका करतां येतो, व नेटका होऊं लागतांच त्याचा प्रभाव संपतो. संसारांतली ही गोम लक्षांत ठेवून कांहीं केल्या धीर सोडूं नये. धीर सोडल्यानें निष्कारण क्लेश सोसावे लागतात. शहाणा नाना मनें व बुद्धि जाणतो.

## • २० •

हा दशक एकंदर ग्रंथास पूर्णतेला नेणारा म्हणून 'पूर्ण' ही संज्ञा मिळालेला किंवा पहिला समास पूर्णापूर्ण विवेचनाचा यामुळें तसें नांव दिलें गेलेला दिसतो. यांत आत्मानात्मविचार प्राधान्यानें आहे.

**पहिला** समास 'पूर्णापूर्णनिरूपणा'चा आहे. निर्गुण परब्रह्म व्यापक आणि पृथ्वी-आपादि भूतें, अंतरात्मा-मूळमाया हींसुद्धां व्यापक असें पाहिलें म्हणजे गोंधळ उडतो. त्याचा निकाल लावण्यासाठीं हा समास असून त्यांत निर्गुण ब्रह्म हेंच काय तें खरें व्यापक अथवा पूर्ण आणि बाकीचीं सारीं अपूर्ण असें दाखविलें आहे. दृश्यादृश्य सृष्टींतील कोणत्याहि पदार्थाच्या किंवा व्यवहाराच्या दृष्टान्तानें पूर्ण ब्रह्माची यथोचित कल्पना आणून देणें शक्य नाहीं; याकरितां अनेकविध सादृश्याचे दृष्टांत घेतले आहेत. आत्मा, मन हीं अतिशय चंचल असलीं तरी ब्रह्माची व्यापकता त्यांना नाहीं. ब्रह्माला मागेंपुढें, डावेंउजवें असें कांहींच नाहीं. आत्म्यामागें जन्ममरणाचें चक्र आहे. 'ज्ञान म्हणिजे जाणणें। अज्ञान म्हणिजे नेणणें। विपरीत ज्ञान म्हणिजे देखणें। येकाचें येक ॥ २३'. ज्ञान आणि अज्ञान हीं वृत्तिरूपानें समान असून ज्ञान हें 'विकाराचें वळलें' (बनलेलें) आहे. त्याचें विज्ञान होऊन विदेहाचें पद मिळालें पाहिजे.

**दुसरा** समास 'सृष्टित्रिविधलक्षणा'चा आहे. पहिल्या १३ ओव्यांत ब्रह्माचें वर्णन आहे. मूळ माया व त्रिगुण, पंचभूतें, नंतर सृष्टि-पृथ्वी. मूळ माया जाणीवेची आहे, अर्थात् तेथें सूक्ष्म कल्पना आहे. परा वाचेची जी अवस्था तीच मूळ मायेची समजावी. ती जडाला चेतविते म्हणून चैतन्य. प्रकृति-पुरुष म्हणजे अर्ध-नारीनटेश्वर. गुप्त त्रिगुणाचें जें गूढत्व त्याला 'महत्तत्त्व' असें नांव आहे (महत्तत्त्व हा शब्द पूर्वींच्या निरूपणांत नाहीं). महत्तत्त्वांत शुद्ध सत्त्व वसत असतें. जेथून गुणांचा उदय होतो, ती गुणक्षोभिणी स्थिति. त्यापूर्वीं गुणसाम्य असतें. पुढें पंचभूतें, त्यांतील पृथ्वीचा पसारा सर्वांच्या परिचयाचा आहे.

**तिसरा** समास 'सूक्ष्मनामाभिधाना'चा आहे. पूर्वीं मुळापासून शेवटपर्यंत जो विस्तार सांगितला, त्याचा शेवटाकडून प्रारंभापर्यंत विचार करावा. त्याप्रमाणें पृथ्वी-पर्यंत मागें शोध केला. तिच्यामागें गुणापर्यंत जातां येतें. मग स्थूल संपून सूक्ष्माला

सुरुवात होते. जाणीवनेणीव आणि जाणीवनेणिवेचें मिश्रण यांनाच सत्त्व, आणि रज अशीं नांवें आहेत. त्यांच्या मागें गुणक्षोभिणी. तेथें तिन्ही गुण गूढ असतात म्हणून त्या स्थितीला दुसरें नांव 'महत्तत्त्व' आहे. शिवशक्ति, पुरुष-प्रकृति, अर्धनारीनटेश्वर यांचें कर्दम रूप आहे. मग गुणसाम्य, चैतन्य. येथून पुढें मूळ मायेचें वर्णन आहे. मूळ मायेचे जे चौदा प्रकार ते सदैव ध्यानांत ठेवावे. वाच्यांश बोलतां येतो. लक्ष्यांश विवेकाचा विषय आहे. पूर्वपक्ष म्हणजे माया. त्यांत अन्वयव्यतिरेकाचा समावेश होतो. 'सिद्धांत म्हणिजे शुद्ध येक । दुसरें नाहीं ॥ २१ '. मायेकडून खालीं उतरतांना भेद वाढतात; मायेकडे चढतांना भेद नष्ट होतात. माया खोटी असें कळतें, पण तिची भीड तुटत नाहीं. याकरितां साधु-पुरुषांना हुडकावें. तेव्हां प्रचीतीचा महंत सांपडतो. प्रपंच आणि परमार्थ या दोन्हीला प्रचीति पाहिजे. 'प्रत्ययेज्ञानी तो समर्थ । सकळांमध्यें ॥ २८ '. रात्रंदिवस अर्थ पहावा. 'अर्थ पाहेल तो समर्थ ॥ २९ '.

**चौथा** समास 'आत्मानिरूपणा'चा आहे. पृथ्वींत जिकडेतिकडे कामाची गडबड चालली असली तरी राजसत्तेच्या बळानें व संरक्षणानें ती गडबड चालू असते. राजसत्ते-प्रमाणें ईश्वराची सत्ता आहे. जेवढीं शरीरें तेवढीं भगवंताचीं घरें. भगवंताचा कृपाळू-पणा मातेच्या रूपानें अनुभवास येतो. तो जगदीश जगाचें रक्षण करतो. अंतरात्मा म्हणजे जाणता पुरुष. त्याची सत्ता जशी शरीरांत तशीच जगांत आहे म्हणून जगदीश. भगवंताला उंचनीच याची क्षिति नाहीं. कोणीकडून तरी कार्य चालो, एवढेंच त्याचें उत्सुकतेनें पहाणें असतें. जगदंतराचें अखंड अनुसंधान हेंच ध्यान व तेंच ज्ञान. प्रापंचिकानें विवरण सुरू केलें तर त्याला रामाचें निशाण उघड दिसणारें आहे. ज्ञानघन आत्माराम, विद्यमान विश्वंभर याचा त्याला भाग्यवशात् बोध होईल. रामाच्या उपासनेची वासना धरल्यास ती लांबत जाते. तिचा महिमा कळत नाहीं. द्रष्टा साक्षी अनंत यांस ओळखावें. सत्संग व कथानिरूपणाची संवय असेल तर विश्रांति मिळते. त्यांत प्रत्ययज्ञान असेल तर बोलायलाच नको. मूळ संकल्प तो हरिसंकल्प. मूळ मायेमधील साक्षेप तोच. संकल्प, मग तो कोणताहि असो, सोडून द्यावा, म्हणजे परब्रह्म पावतें. उपासना व ज्ञान यांत भेद नाहीं, तारतम्य आहे. उपासनेचा परिपाक ज्ञान. 'सामर्थ्य आहे चळवळेचें ।' या प्रारंभाची प्रसिद्ध ओवी (२६) या समासांत आलेली आहे. भगवंताच्या सत्तेनें सर्व चालतें, या सूत्रानुसार

'भगवंताचें अधिष्ठान आधीं पाहिजे' असें या ओवींत म्हटलें आहे. कर्ता जगदीश हें खरें, परंतु त्याचें कर्तृत्व भिन्न भिन्न आकारांत वांटलें गेलें आहे, ही परिस्फुटता या ओवीच्या खऱ्या अर्थावर प्रकाश टाकणारी आहे. 'विभाग आला पृथगाकारें' हेंच रहस्य सदर ओवीच्या आधीं 'बनावरी बनचरांची सत्ता। जळावरी जळचरांची सत्ता। भूमंडळीं भूपाळां समस्तां। येणें चि न्यायें ॥२५' या ओवीनें स्पष्ट झालेलें आहे. येथें चळवळीचा अर्थ हालचाल असा असून चलन-वलन या मूळ शब्दाचा चळवळ हा संक्षेप आहे. हल्लीं त्याचा अर्थ जनतेच्या क्षोभ-मूलक उठावणीचें साधन असा झालेला आहे. या समासांतील आत्मा म्हणजे देव याचा परिचय पूर्वीं पुष्कळदां करून दिलेला आहे.

**पांचवा** समास 'चत्वारजिनस' या नांवाचा आहे. सृष्टीचे घटक चार आहेत. त्या घटकांचे पोटघटक एक, चौदा, पांच व चार असे दिसून येतात. एक म्हणजे ब्रह्म, चौदा म्हणजे मूळ मायेचे पर्याय, पांच म्हणजे भूतें व चार म्हणजे चार खाणी—प्राण्यांचे स्वेदज-अंडजादि प्रकार. या स्पष्टीकरणांत हरिसंकल्प, चैतन्य, गुण-साम्य, गुणक्षोभिणी, मन माया अंतरात्मा इत्यादिकांचा विचार आहे. एका बीजा-पासून उदंड फळें लाभतात, तसेंच सृष्टीचें प्रकरण आहे. त्यांत नरदेह श्रेष्ठ. 'वरकड देहे तें काबाड। नरदेह मोठें घबाड ॥५६'. तेथें जाड विवेक मात्र पाहिजे. विवेक असेल, अनुभवानें श्रवण करील, तर 'नर तो चि नारायेण। २८' याबद्दल संशय नको.

**सहावा** समास 'आत्मागुणनिरूपणा'चा आहे. पहिल्या सात ओव्यांत पृथ्वीची व ८४ लक्ष योनींची माहिती असून पुढें अंतरात्म्याच्या द्वारें मनुष्याच्या जीवनांत आपोआप होणाऱ्या किंवा प्रयत्नानें उद्भवणाऱ्या सर्व कायिक, मानसिक घडामोडींची यादी आत्म्याचे गुण म्हणून दिलेली आहे. देवदेवता, भूतें, दानव, इतर अनंत स्थूल सूक्ष्म जीव, चंद्र, सूर्य, तारानक्षत्रें, शेष, कूर्म, मेघ हे सारे आत्म्याचे गुण होत. आत्मारामाच्या उपासनेनें निरंजन ब्रह्म गांठतां येतें.

**सातवा** समास 'आत्मनिरूपणा'चा म्हणजे वस्तुतः आत्मगुणाचाच आहे. १० ओव्यांपर्यंत आत्मगुणाचा विषय आहे. नंतर पिंडाचा शोध घ्यावा म्हणजे त्यांत जडचंचळ तत्त्वें सांपडतात. पिंडांतला चंचळ आत्मा निघून जातांच 'देहे जड हा

पडतो । देखतदेखतां ॥ १४’. जड पडलें, चंचळ उडालें म्हणजे उरतें तें एकटें निश्चळ निर्विकार परब्रह्म. महाभूतांमध्यें आत्मा घालून त्या भूतांचा एक खंबीर पुतळा उभारला आहे. सृष्टीचा गलबला या रीतीनें चालला आहे. ब्रह्म हें एकच काय तें अखंड व्यापक असून बाकीच्या गोष्टींची व्यापकता खंडित, मर्यादित आहे. ज्याचा संहार होतो तें नाशवंत. हें कोडें उलगडण्याकरितां एकान्ताचा उपाय आहे. पण प्रत्ययाचे ज्ञानी पुरुष एकमेकाला भेटून सावध चित्तानें चर्चा करण्याचा योग येईल तर तो ‘एकान्तापरीस एकान्त । २४’. अनुमानाचें बोलणें नसावें. बोलणें अनुभवसिद्ध ज्ञानाचें पाहिजे. ‘सब घोडे बारा टक्के’ असा सरसकट विचार म्हणजे येकंकाराचा अर्थात् भ्रष्टाकाराचा पाया होय. कृत्रिम टाकून शुद्ध घ्यावें. सारासाराची जाणजाणून निवड करावी.

**आठवा** समास ‘देहेक्षत्र’ या नांवाचा आहे. क्षत्र म्हणजे क्षेत्र व देह हें क्षेत्र. ब्रह्मदेवाच्या सृष्टिरूप वृक्षाचा विस्तार झाला, त्यावर फळें आलीं, त्यांची गोडी पहाण्याकरितां शरीरें निर्माण केलीं. ‘शरीरासारिखें यंत्र । आणीक नाहीं ॥ ११’. या वचनापूर्वी ज्ञानेंद्रियें, त्यांचे विषय व कर्मेंद्रियें यांची माहिती आहे. शरीरांत गुणविचारादिकांचा भेद ईश्वरानेंच करून ठेवला आहे (१६). बुद्धि उलटवून ऊर्ध्व गतीनें विचार केला तर भेद मावळतो. सृष्टीच्या उदयांत भेद आहे, संहारांत भेद संपतो. भेद-अभेद हा मायेचा गुण आहे. मायेमधील अंतरात्म्याचा महिमा चतुरानन ब्रह्मयालादेखील कळला नाहीं. हा महिमा आत्म्याचा. निरंजनामध्यें यांतलें कांहींच सांपडणार नाहीं. ‘देहेसामर्थ्यानुसार । सकळ करी जगदेश्वर । थोर सामर्थ्यें अवतार । बोलिजेती ॥ २१’. यानंतर ईश्वराचा प्रताप सूर्य, ढग, झंझावात, विजांचा कडकडाट, यांच्या वर्णनानें सांगितला आहे. आत्म्याचे हे अनंत भेद समजावून घेतां घेतां मनाच्या चिंधड्या उडतात असें बजावून आपल्या उपासनेबद्दल कांहीं विचार समर्थांनीं व्यक्त केले आहेत. सृष्टीच्या उभारणीसंहारणीच्या ज्ञानाला आवाहन, विसर्जन हे शब्द घेऊन येथें भजन म्हटलें आहे.

**नववा** समास ‘सूक्ष्मनिरूपणा’चा आहे. मूळ मायेचा जो चौदा संख्येपर्यंतचा विस्तार त्याला सूक्ष्म संज्ञेनें ओळखण्याची समर्थांची पद्धत आतां जिज्ञासूंना बरीच परिचित झाली आहे. त्याच पद्धतीचें येथील सूक्ष्मनिरूपण आहे. देव म्हणून

मातीची पूजा करावी आणि नंतर ती फेकून द्यावी हें मनाला बरें वाटत नाहीं. देव करावा आणि टाकावा, असा नाहीं. शरीरें धारण करून तीं सोडणारा देव कसा आहे तें विवेकानें जाणावें. देवासाठीं आपण साधनें करतों, परंतु त्याचें इंगित अंतःकरणानें ओळखावयाचें असतें. ब्रह्मज्ञान हा एक उपाय आहे. पण तो कांहीं देण्याघेण्यासारखा पदार्थ नव्हे. जें विचारापुढें तगणार नाहीं त्याला देव समजतां येत नाहीं. थोर लोक मरून गेल्यावर त्यांच्या प्रतिमा (सुरता) करून पहाण्यासारखा हा उपासनेचा प्रकार आहे. मोठ्या व्यापाचा उद्योगधंदा जमेना म्हणून एखाद्यानें कांहीं क्षुद्र व्यापार केल्यास त्याच्या संबंधांत राज्यसंपदा मिळण्याची जशी आशा धरतां येत नाहीं, तशीच पूर्वोक्त प्रतिमापूजेच्या उपासनेची स्थिति असल्याचा निर्णय द्यावा लागतो. 'म्हणोनि जितुका भोळाभाव। तितुका अज्ञानाचा स्वभाव। अज्ञानें तरी देवाधिदेव। पाविजेल कैचा ॥ ११'. माया सोडून मुळास जाऊन भिडणें हा एक याला उपाय आहे. अनुभवपूर्वक अध्यात्मश्रवणाच्या मार्गानें जावें. माया सोडायची म्हणजे खऱ्याखोट्याची परीक्षा आली. मन स्वभावतः अधोमुख आहे तें ऊर्ध्वमुख केलें व हळुहळू मुळाकडे चालविलें कीं या विषयाचे पीळ सुटत जातात. ब्रह्म, संकल्परूप म्हणजे अंतःकरणरूप मूळ माया, तीच चैतन्यरूप झाल्याचें शरीरद्वारा आढळतें. गुणसाम्य, प्रकृतिपुरुष, शिवशक्ति, अर्धनारीनटेश्वर, षड्गुणेश्वर, महत्तत्त्व, गुणक्षोभिणी, मन माया जीव या सर्वांचा निर्देश चौदा नांवांच्या निमित्तानें येथें केलेला आहे.

**दहावा** समास 'विमळब्रह्मनिरूपणा'चा आहे. २९ ओव्यांपर्यंत विमलब्रह्माचा विचार असून ३० व्या ओवींत दा स बो ध ग्रंथाचें नांव घेऊन ग्रंथाचें स्वरूप, फल व ग्रंथरचनेच्या अहंतेचा परिहार या गोष्टी ३७ व्या ओवीपर्यंत सांगितल्या आहेत. ब्रह्म पुढें मागें वर खालीं सर्वत्र आहे. धरणें टाकणें हा व्यवहार ब्रह्माशीं चालत नाहीं. येथें दृष्टांतानें ब्रह्माला आकाश मानतां येईल, पण हा दृष्टांत एकदेशी आहे. ब्रह्माकरितां तीर्थयात्रा नको. ब्रह्म बसल्या जागीं सर्वकाळ आहे. 'दृश्या सबाहे अंतरीं। ब्रह्म दाटलें ब्रह्मांडोदरीं। आरे त्या विमळाची सरी। कोणास द्यावी॥ ११'. तें पावसानें भिजत नाहीं, चिखलानें भरत नाहीं, पुरानें वाहून जात नाहीं. 'येकजिनसी गगन उदास। जेथें नाहीं दृश्यभास। भासेंविण निराभास। परब्रह्म जाणावें॥ १८'. तें साधुसंत, महानुभाव, देवदानव, मानव या सर्वांचें विश्रांतिस्थान आहे.

तें नीट ओळखायला ज्ञानदृष्टीच पाहिजे. याप्रमाणें ब्रह्माचें वर्णन करीत 'जन्ममृत्याच्या नांवें । सुन्याकार ।। २९' या फलश्रुतीशीं तें वर्णन थांबविलें आहे.

भक्ताच्या अभिमानानें दाशरथीनें कृपा केली. त्या समर्थकृपेचीं वचनें म्हणजे दासबोध. हा ग्रंथ वीस दशकांचा आहे. श्रवणद्वारें शोध घेऊन त्याचें मनन केल्यास परमार्थ विशद होतो. त्याचे दोनशें समास आहेत. ते साधकानें स्वस्थपणें पहावे. नंतर विवरणानें विशेषाविशेष कळूं लागेल. ग्रंथाचें स्तवन नको. सगळेंच करणें जर जगदीशाचें तर ग्रंथकर्तृत्व तेवढें माणसाचें हें म्हणणें हवें कशाला ? देहाचा झाडा घेऊन तत्त्वसमुदाय उडविल्यावर आपण म्हणून जागेवर कांहींच शिल्लक रहात नाहीं, तर आपलें अमुक हा शब्दप्रयोग चुकीचा ठरतो. सारांश, जगदीश्वरानें हें सर्व अनुक्रमपूर्वक केलें, असें मानणेंच श्रेयस्कर होय.

x x

x x

१५ व्या दशकाच्या दुसऱ्या समासांत लोकस्थितीचा पारमार्थिक दृष्ट्या आढावा घेतांना समर्थांनीं स्मार्त व वैष्णव या दोन संप्रदायांचा उल्लेख केला आहे. सप्त-समासीच्या चौथ्या समासांत स्मार्त-भागवत यांबद्दल हे भेद अनादिसिद्ध असून, स्मार्त म्हणिजे शिवभक्त, भागवत म्हणिजे विष्णुभक्त असा खुलासा पहायला सांपडतो. स्मार्तभागवतांमध्यें तारतम्य पाहावें लागतें, असें सांगून 'कर्ममार्ग उपासना । वैष्णवामध्यें विशेष जाणा । १७' असा समर्थांनीं अभिप्राय दिला आहे.

'स्मरण म्हणिजे देव । विस्मरण म्हणजे दानव ।' ही एक समर्थांची आवडती कल्पना १५:७:३५ मध्यें आली आहे. श्रीरामदासांची कविता, प्रथम खंड यांतील स्फुट प्रकरण ६६ मध्यें 'स्मरणें देव जाणावें । विसरु दैत्यकुळ हें' ।। ३ या कल्पनेला स्थान मिळालें आहे.

देह म्हणजे देऊळ व त्यांतील चेतनांश आत्मा हा देव या कल्पनेचा उच्चार दासबोध १७:१ मध्यें दृष्टीस पडतो (१२-१६). ही कल्पना श्रीरामदासांची कविता, प्रथम खंड यांत पान ३२० आणि ४३९ येथें आलेली आहे. शेवटच्या

दशकांमध्यें ‘ हरिसंकल्प ’ हा शब्द १७:३:२५, १८:४:२८, २०:४:१९ आणि २०:५:६ याप्रमाणें बहुत वेळा आलेला असून त्याचा अर्थ ‘ मूळ माया ’ असा आहे. हा शब्द पूर्वी दासबोधामध्यें एकदांहि आढळत नाहीं. ब्रह्मामध्यें जें पहिलें स्फुरण घडलें, त्याला ‘ हरिसंकल्प ’ असें दुसरें नांव समर्थांनीं योजिलें आहे. ‘ मूळ संकल्प तो हरिसंकल्प । मूळमायेमधील साक्षेप ’ असें त्याचें स्पष्टीकरण २०:४:१९ मध्यें दिलेलें आहे. हरिसंकल्प म्हणजेच आत्माराम असें त्याचें स्वरूप पुढील समासांत सांगितलें असून, हा एक नामाभिधानाचा संकेत समजावा असें समर्थांनीं म्हटलें आहे. सप्तसमासी प्रकरणाच्या ४ थ्या समासांत हरिसंकल्प हा शब्द दोनदां घेतलेला आहे. ‘ मुळीं संकल्प उठिला । हरिसंकल्प म्हणिजे तयाला । १३ ’ अशी एकदां त्याची व्याख्या केल्यावर ‘ हरिसंकल्प षड्गुणेश्वर । याचा बरा पाहावा विचार । १५ ’ अशी दुसऱ्या ठिकाणीं त्याविषयीं सूचना आहे. कांहीं ठिकाणीं हरिसंकल्पाऐवजीं सत्यसंकल्प हा शब्द वापरला असून तोच विष्णु असा हवाला दिला आहे. समर्थांच्या इतर स्फुट कवितेमध्येंहि तो शब्द सांपडतो.

दासबोधांतील विषयांचें समासवारीनें संकलन करीत असतां, इतर स्फुट प्रकरणांतून ते विषय आले असल्यास त्यांची ओळख शक्य तों जिथल्या तिथें व्हावी, अशा रीतीनें त्यांचा उल्लेख व संदर्भ मागें नमूद केला आहे. परंतु सर्वत्र ही गोष्ट विस्ताराच्या भीतीमुळें केलेली नाहीं. वाचकांची जिज्ञासा वाढावी आणि जिज्ञासा तीव्र असल्यास ती तृप्त करून घेतां यावी, हा उद्देश मागें सादर केलेल्या ठिकठिकाणच्या उल्लेखानें सफल होईल अशी उमेद आहे. यानंतर दासबोधांतील एकंदर शिकवणीचें स्वरूप व कोणत्या विषयाकडे किती दशक वा समास खर्ची पडले आहेत याची ठोकळ पाहणी करणें योग्य होईल.

दासबोधाच्या पहिल्या समासांत हडसून खडसून सांगितल्याप्रमाणें भक्तिमार्गाचा परमार्थ जिज्ञासू भाविकांना विशद करून सांगणें हा दासबोध-रचनेमागील समर्थांचा हेतु या ग्रंथामध्यें ओतप्रोत दिसून येतो. परमार्थाच्या जोडीला चातुर्य हा एक विषय

दासबोधांत मांडलेला असून त्याचा खुलासा प्रस्तुत समासाच्या शेवटीं विस्तारानें पहायला सांपडतो. 'विवेकेंसहित चातुर्य कळे यथायोग्य ॥ ३१, भ्रांत अवगुणी अवलक्षण । ते चि होती सुलक्षण । धूर्त तार्किक विचक्षण । समयो जाणती ॥३२' या आश्वासनास अनुसरून दासबोधामध्यें 'चातुर्य' (लक्षण, विवरण) या नांवाचे १४:६, १५:१ व १५:६ याप्रमाणें तीन समास आहेत. अवलक्षणी माणसांचें वर्णन मूर्ख (२:१), कुविद्या (२:३), रजोगुण-तमोगुण (२:५-६), पढतमूर्ख (२:१०), दुश्चीत (८:६), द्रोणपसिद्ध (१७:१०), करंटपरीक्षा (१८:५), निद्रा श्रोता अवलक्षण (१८:९-१०), करंटलक्षण (१९:३), याप्रमाणें अकरा समासांतून आलेलें आहे. याच्या उलट उत्तम पुरुषाची कृति व स्तुति उत्तमलक्षण (२:२), सत्त्वगुण-सद्विद्या (२:७-८); उत्तम पुरुष (१२:१०, १८:६), यामध्यें वर्णिलेली आहे. परंतु एवढ्यानें तो विषय संपत नाहीं. तो अन्यत्र कुठें सांपडतो, याची पहाणी करण्यापूर्वी शुद्ध पारमार्थिक उत्तम पुरुषाकडे लक्ष देणें बरें. विरक्त (२:९), साधक व सिद्ध (५:९ व १०, ८:९), महंत व निःस्पृह (११:६ व १०). यानंतर निःस्पृहाच्या चरित्राचा विचार १४:१, १५:२, १८:३ अशा रीतीनें आणखी तीन वेळां दासबोधांत दाखल झालेला आहे. विरक्त (२:९) आणि गुरु (५:२) यांचा समावेश महंत व निःस्पृह यांच्या विवेचनांत होऊं शकतो. याखेरीज इतर अनेक समासांतून नांवें निराळीं असलीं तरी व्यावहारिक व पारमार्थिक चातुर्याचा उपदेश समर्थांनीं गोविलेला आहे. उदाहरणार्थ, येथें १२ वा आणि १९ वा या दोन दशकांकडे दृष्टिक्षेप करायला हरकत नाहीं. १२ व्या दशकाच्या पहिल्या दोन समासाचीं नांवें अनुक्रमें विमललक्षण व प्रत्ययनिरूपण अशीं आहेत. परंतु यांमध्यें उत्तम गुणांची चर्चा आहे. यापुढील कांहीं समासांत तोच विषय असून शेवटीं उत्तम पुरुष हें नांव दहाव्या समासाला दिलेलें आहे. १९ व्या दशकांत समासांतील विषयांचा असाच प्रकार दृष्टीस पडतो. 'सिकवण' या शब्दाला प्राधान्य असलेल्या ११:३, १२:९, १३:१०, १८:३ अशा चार समासांचें निरीक्षण केल्यास, पहिल्यांत व दुसऱ्यांत माणसाच्या दिनचर्येचा आढावा सांगून प्रयत्नवादाकडे समर्थांनीं लक्ष वेधलें आहे. पहिल्या दिनचर्येंत आळसाचा निषेध आहे. दुसऱ्या दिनचर्येंत महंतलीला, महंती हे शब्द असल्यामुळें या समासांतील उपदेशाचा रोख ध्यानांत येतो. या समासांतील प्रयत्नवाद महंताकरितां आहे. तिसऱ्या समासाच्या शेवटच्या भागांत चातुर्याचीं लक्षणें

(२५) निःस्पृह व महंत या शब्दांचा अंतर्भाव असल्यामुळें तेथील शिकवण कुणासाठीं याचा बोध ध्यानांत येण्याला उशीर लागत नाहीं. १२:९ चें नांव ‘ सिकवण ’ खरें, परंतु त्या शब्दामागें ‘ येत्न ’ हा एक शब्द आहे. १९:७ चें नांव ‘ येत्न निरूपण ’ आहे. त्यामधील चातुर्याचें लक्षण, ‘ महंतीची भणभण ’, तस्मात लोकिकीं वर्ततां न ये । त्यास महंती कामा नये । १५’ हे शब्द किंवा विचार महंता-करितां हें ‘ येत्ननिरूपण ’ असल्याबद्दल खात्री पटवितात. महंत व निःस्पृह हे समर्थांच्या मतें एकच असल्याचा पुरावा ११:१० मध्यें भरपूर आहे.

११ व्या दशकाच्या ५ व्या समासाचें व १९ व्या दशकाच्या ९ व्या समासाचें नांव ‘ राजकारण ’ असें आहे व हे दोन्ही समास राजनीतीचे किंवा इंग्रजींत ज्याला पॉलिटिक्स म्हणतात त्या विषयाचे आहेत असें एका पक्षाचें म्हणणें आहे. यांतील विचार चातुर्य, उत्तम पुरुष, निःस्पृह यांच्या माहितीशीं ताडून पाहिल्यास समर्थांनीं या शब्दाचा उपयोग कोणत्या अर्थानें केला असावा, याविषयीं तर्क करतां येतो. या समासांचा अर्थ देतांना त्या त्या स्थळीं थोडा विचार सादर केला आहे. ज्या गुणांच्या वा कृतींच्या मालिकेंत ‘ राजकारण ’ हा शब्द आला आहे ती मालिका त्याच्या अर्थाची सूचक ठरते. जे समास ‘ राजकारण ’ नामक समासांच्या मागेंपुढें असतील ते समासहि सदर समासांतील उपदेशाची दिशा समजावून देण्याला उपयोगीं पडणारे आहेत. या विषयाची मीमांसा पुढें स्वतंत्रपणें केलेली आहे. येथें राजकारणपर (पॉलिटिक्स विषयक) समास किती याचा अंदाज करतां यावा म्हणून या दोन समासांचा संदर्भ आणला आहे. पहिल्या आठ दशकांत म्हणजे एकूण ८० समासांत राजकारणाचा संबंध नाहीं. नवव्याच्या ४ थ्या समासांत ज्ञानाची महती सांगतांना ‘ राजकारण ’ शब्द आला आहे, परंतु या समासावर कोणी राजकीय उपदेशाचा हक्क लादलेला नाहीं. अर्थात् या दशकाची व्यवस्था पूर्वीच्या ८० समासां-प्रमाणें लागते. अकराव्या दशकाचा पांचवा समास सोडल्यास बाकीचे नऊ समास राजकारणरहित ठरतात. पुढील दशकांतून असाच प्रकार आहे, हें वाचकांच्या लक्षांत येणें कठिण नाहीं. यामुळें राजकारणाची शिकवण पंचवीस समासांत म्हणजे दासबोधाच्या एक अष्टमांश विभागांत आहे किंवा चाळीस म्हणजे एक पंचमांश विभागांत आहे, हा कित्येकांनीं मांडलेला दावा लटका पडतो. दासबोधांत वेदांताची

शिकवण प्रामुख्यानें असून त्या शिकवणींत मुरलेल्या विरक्तांनीं, निःस्पृहांनीं, महंतांनीं, सत्त्वगुणी किंवा उत्तम पुरुषांनीं आपलें वर्तन कसें राखावें, कोणतें ध्येय सिद्धीस न्यावें, याचा बोध होण्यासाठीं लोकव्यवहाराच्या निर्देशानें समर्थांनीं वेळोवेळीं केलेला उपदेश त्यांत ग्रथित झालेला आहे, हें दासबोधाच्या अभ्यासानें लक्षांत येण्यासारखें आहे.

# अनुष्ठान

**दासबोधांतील** समग्र शिकवणीचा इतर ठिकाणच्या संदर्भासह तुलनात्मक दृष्टीनें आढावा घेतला तरी त्यांतील विषय क्रमबद्ध व एकत्र नसल्यामुळें त्यांची माहिती शक्य तोंवर सुसंगतपणें स्वतंत्र दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. दासबोध काय किंवा समर्थांची इतर कविता काय, त्यामध्यें प्रपंचाचा मोह सर्वथैव सोडून मनुष्यानें परमार्थ म्हणजे ब्रह्मज्ञान व ब्रह्मसाक्षात्कार हीं संपादावीं आणि देवाच्या भक्तीचा लोकांत प्रसार करावा, असा समर्थांचा उपदेश आढळतो. परमार्थाच्या उपदेशाची पद्धत साधारणपणें ठरलेली आहे. ब्रह्ममायेचा तात्त्विक विचार, सृष्टीची उभारणी व संहारणी, मनुष्याच्या आयुष्याची चर्चा, मनुष्याचीं कर्तव्यें, आणि या विषयांच्या अनुषंगानें उद्भवणारे लहानमोठे प्रश्न इत्यादिकांचा समावेश परमार्थाच्या उपदेशांत केला जातो. समर्थांच्या दासबोधांत व इतर कवितेंत हेच विषय प्रामुख्यानें व विस्तारानें दृष्टीस पडतात. त्यांची क्रमशः मांडणी केल्यास समर्थांच्या उपदेशाचें स्वरूप जिज्ञासूंना आकलन करतां येईल. जिज्ञासूंचें पूर्ण समाधान होईल किंवा त्यांना समर्थांचे ग्रंथ मुळांतून वाचावयाचें कारण उरणार नाहीं, असा मात्र याचा अर्थ नव्हे.

## •१•

दासबोधांत अनेकदां मनुष्यानें जन्मास आल्यानंतर मी कोण व देव कोण हे दोन प्रश्न निरंतर दृष्टीपुढें ठेवावे आणि योग्य प्रकारें सोडवावे, असें म्हटलें असल्यामुळें त्यांस अनुसरून प्रथम 'मी कोण' या प्रश्नापासून समर्थांच्या उपदेशाचें संकलित रीत्या निरीक्षण करणें बरें. मी कोण हा प्रश्न माणसाला अनुलक्षून असल्यामुळें त्याचें उत्तर 'मनुष्य' हें असल्याचें निराळें सांगायला नको. धर्म, न्याय, नीति, भक्ति, तत्त्वज्ञान, इत्यादि गोष्टी मनुष्याकरितांच आहेत, तेव्हां त्याची शरीराच्या व

बुद्धीच्या याप्रमाणें दोन्ही अंगांनीं परीक्षा करण्याची वहिवाट परमार्थाच्या विवेचनांत कायमची पडलेली आहे. शरीराच्या अंगानें परीक्षा करतेवेळीं मनुष्याचें शरीर अतिशय घाणेरडें असल्याविषयीं हटकून सांगितलें जातें. दासबोधाच्या तिसऱ्या दशकांत आरंभीं माणसाच्या जन्माची चर्चा असून 'रजस्वलेचा जो विटाळ। त्याचा आळोन जाला गाळ। त्या गाळाचें च केवळ। शरीर हें ॥ १३' असा देहाबद्दल खुलासा आहे. 'देह विटाळाचा गोळा' ही कल्पना समर्थांनीं पुष्कळ वेळां आपल्या उपदेशरचनेंत खेळविलेली आहे. या शरीराला बाल्य, तारुण्य, रोग, वृद्धत्व या अवस्थांतून जावें लागतें. तिसऱ्या दशकाच्या पहिल्या पांच समासांत शरीराच्या व्यवहाराचा मरणापर्यंतचा वृत्तांत आलेला आहे. त्यामध्यें वरच्या अवस्थांतील माणसाचें आचरण आणि त्याच्या वाट्यास येणारें दुःख यांचाहि पाढा सादर झालेला आहे. माणसाचा देह मुळांत घाणेरडा असल्याचें किळस उत्पन्न करणारें वर्णन त्याविषयींची आसक्ति माणसाच्या बुद्धीला जडूं नये म्हणून वेदांताला करावें लागतें. समर्थांनीं असें वर्णन एकट्या दासबोधांत दिलेलें नाहीं. ओवीशतकांच्या प्रकरणांतील पहिल्या शतकांत देहनिंदेला स्थान मिळालें असून एकवीससमासी जुन्या दासबोधाच्या ७ व्या समासांत ३८ ते ५० या ओव्या देहनिंदेनें व्यापल्या आहेत. वृद्धावस्थेंतील पराकाष्ठेचें दैन्य हा एक देहनिंदेचा विभाग असल्यानें त्याची तपशीलवार माहिती दासबोधाच्या तिसऱ्या दशकांतील पांचव्या समासाच्या शेवटीं जशी आली आहे, तशीच ती पूर्वोक्त ओवीशतकाच्या अखेरीस पहायला सांपडते. श्रीसमर्थकृत पदपदांतरें यांत वृद्धावस्थेचें एक स्वतंत्र १० कडव्यांचें पद आहे (पान ९८–९९). देहास भोगाव्या लागणाऱ्या त्रिविध तापांची कथा समर्थांनीं दासबोधाच्या तिसऱ्या दशकांत ६-७-८ असे तीन समास खर्ची घालून विस्तारानें सांगितली आहे. श्रीरामदासांची कविता खंड १ मध्यें पान २३२-२३३ वर देहनिंदेच्या ओव्या आहेत.

देहाची निंदा कितीहि केली तरी माणसाला त्याखेरीज कसलीच गति नसल्याचें वेदान्त विद्येला देखील कबूल करणें भाग पडतें. यामुळें देहाच्या उपयुक्ततेची प्रशंसा वेदांताला टाळतां येत नाहीं. समर्थांनीं नरदेहाचा स्तुतिपूर्वक नानाविध उपयोग दासबोधांत व अन्यत्र पुष्कळदां दाखविलेला आहे. दासबोधाचा पहिल्या दशकाचा

१० वा समास मोठ्या प्रमाणांत नरदेहाच्या प्रशंसेचा आहे. भारतीय तत्त्वज्ञानानें पुनर्जन्माची कल्पना स्वीकारून प्राण्याला मनुष्यकोटींत दीर्घ प्रयासानें व कालावधीनें जन्म लाभतो, असा सिद्धांत निर्माण केला आहे. दा स बो धांत ३ : १० : २५ मध्यें समर्थांनीं तो सिद्धांत उच्चारला असून २ : ४ च्या पहिल्या ओवीचा भावार्थ तसाच आहे. १८ : ४ हा सगळा समास देहाची उपयुक्तता पटविण्याकडे वेंचला गेला असून १९ : ५ मध्यें ७ ते १२ या ओव्या याच विषयाकडे लावल्या आहेत. इतर कोणत्याहि प्राण्यापेक्षां नरदेह श्रेष्ठ, याची वाच्यता शेवटीं २० : ५ मध्यें केलेली आहे. देह नसेल तर देवाची भक्ति करण्याला साधनच नाहीं. गणेशपूजन, शारदावंदन, गुरुसेवा, कवित्व, अध्ययन, तीर्थाटन, कर्ममार्ग, ज्ञानमार्ग, उपासना, पुरश्चरण, अनुष्ठान, दानधर्म, इहलोक, परलोक, मुक्ति यांतल्या कोणत्याहि शब्दाला देहावांचून कसलाच अर्थ नाहीं. देहाची ही विलक्षण उपयुक्तता विसरून मनुष्य जेव्हां ती स्वार्थाच्या लोभानें द्रव्यदारापुत्रादिकांच्या ममत्वांत बुडवितो, तेव्हां त्याला देहाचें घाणेरडें स्वरूप समजावून देण्याची पाळी येते व बजावणें प्राप्त होतें कीं, ज्यांच्यावर तूं ममत्वाचा हक्क असल्याचें मानतोस तीं कन्यापुत्र, मायबापें तर राहोत, 'तुझें तुज नव्हे शरीर' —तुझ्या देहावरसुद्धां तुझा ताबा नाहीं (३ : १० : ५३). देहावर कुणाकुणाचा अंमल चालतो याचें सविस्तर विवेचन पहिल्या दशकाच्या १० व्या समासांतील शेवटच्या ५१-६० या दहा ओव्यांमध्यें आलेलें आहे. देहाच्या खालोखाल माणसाला आपल्या घराचें प्रेम असल्याचें ध्यानांत घेऊन समर्थांनीं या समासामध्यें त्या घरांत माणसाप्रमाणेंच ज्याची वस्ती रहाते अशा अनेक प्राण्यांची यादी मांडली आहे. चोरांनीं व राजाच्या लोकांनीं घर लुटल्याचे किंवा आगीनें घर जळण्याचे प्रसंग ओढवतात ते निराळेच. 'तें (घर) माझें ऐसें दृढ कल्पिलें । परी तें बहुतांचें हें कळलें । नाहीं च तयासी ॥ ३४'. जो प्रकार घराचा तोच देहाचा आहे. 'देह म्हणावें आपुलें । तरी तें बहुतां कारणें निर्मिलें । ५१'.

ज्या मानवशरीराच्या स्थितिगतीची एवढी विवंचना करावी लागते तें सृष्टीच्या व्यवहारांत अवतरलें कसें हा प्रश्न समर्थांनीं पौराणिक ज्ञानाच्या आधारानें सोडविला आहे. दा स बो ध १० : ४ मध्यें माणसें माणसांपासूनच जन्म पावतात—'नाना प्रकारीचीं शरीरें । शेरीरांपासून होती ॥ २'. पुढें 'शरीरावांचून उत्पत्ती । होणार

नाहीं ॥ ४' हा सिद्धांत मांडून ब्रह्म, माया, ईश्वर, ब्रह्मा, विष्णु, महेश यांचा इतिहास निवेदन केला आहे. ब्रह्मदेवानें सृष्टि कल्पिली, त्याच्या इच्छेसरशीं सृष्टि झाली, तिच्यांत जीव आले. 'अवघे जोडे चि उदेले'—स्त्रीपुरुष अशा जोडीनें जीव उद्भवले. हीं जोडपीं म्हणजे जीवांची टाकसाळच. जाणतेनेणतेपणाचें मिश्रण हें या टांकसाळीचें मूळ आहे (१० : १ : २८). या मिश्रणाला रजोगुण असें दुसरें नांव आहे. परंतु मनुष्यजन्माला हें मिश्रण वाटेल ह्या प्रमाणाचें चालत नाहीं. 'पापपुण्य समता घडे। तरी च नरदेह जोडे।' (८ : ७ : २१) या आशयाची भागवत पुराणांतील व्यासोक्ति समर्थांनीं आधारास घेतली आहे. या टाकसाळींतून एक दुसऱ्याहून निराळा याप्रमाणें एकूण ८४ लक्ष जीवप्रकार भारतीय पुराणांनीं मानले आहेत. त्यांचा हिशोब २० : ६ मध्यें आहे व नानाविध सूक्ष्म जीवांचें वर्णन १५ : ८ मध्यें केलेलें आहे. त्या जीवांपैकीं मनुष्य हा एक श्रेष्ठ जीव आहे. मनुष्यांत जाणता नेणता हा भेद असल्यानें त्यांचा व्यवहार सुरळित चालण्यासाठीं वेदांची योजना केली. 'मग शरीरापासून शरीरें। सृष्टि वाढली विकारें। सकळ शरीरें येणें प्रकारें। निर्माण जालीं ॥ १० : ४ : ३७'. मनुष्य व राक्षस हे इतर जीवांसारखे मर्यादित शक्तीचे नाहींत. त्यांची बुद्धि मूळच्या सृष्टीमध्यें उलथापालथ करणारी असल्यामुळें मनुष्यांची गौडविद्या, राक्षसांची वोडंबरीविद्या यांना ब्रह्मदेवाच्या सृष्टिविद्येबरोबर ठेवण्याला तारतम्यानें अवकाश आहे. दासबोधांत मनुष्यांच्या विद्येला 'बाजीगरी' असेंहि म्हटलें आहे. ब्रह्मदेवानें स्वेच्छाद्वारें मनुष्याचें जोडपें निर्माण केलें व तेव्हांपासून माणसांची संख्या पृथ्वीवर वाढत चालली एवढाच या माहितीचा मथितार्थ आहे.

जीवांचे देह किंवा आकार कितीहि भिन्न असले तरी त्यांतील चेतनांश जीव किंवा आत्मा आकारानुसार भिन्न नसतो, तो एकच व सारख्या स्वभावाचा असतो. प्राण्यांच्या देहांत नर-मादी किंवा मनुष्याच्या देहांत स्त्री-पुरुष हा भेद आढळतो; परंतु स्त्रीच्या चेतनांशाला 'जीवी' समजत नाहींत, त्याला पुरुषांप्रमाणें जीवच म्हणतात. दोघांचा जर जीवच तर स्त्री-पुरुष हा भेद कसा उद्भवला, याची माहिती समर्थांनीं दासबोधांत १६ : ७ व ८ आणि १७ : २ अशी तीन ठिकाणीं दिलेली आहे. मुळांत ब्रह्माच्या ठिकाणीं जें अहं—मीपणाचें स्फुरण घडलें तेथें द्वैत उगवलें. त्या द्वैताचा एक परिणाम स्त्रीपुरुष हा भेद होय. प्रकृति-पुरुष हा ब्रह्मांडांतील भेद स्त्रीपुरुषांच्या

रूपानें देहसृष्टींत अवतरलेला आहे. 'स्थूळाचें मूळ तें लिंग। लिंगामधें हे प्रसंग। येणें प्रकारें जग। प्रत्यक्ष चाले ॥ १६ : ७ : ३५' असा या भेदाचा खुलासा आहे. तोच पुढें १६ : ८ मध्यें २३-२५ या ओव्यांत आला असून १७ : २ मध्यें 'नरनारीचें बीजकारण। शिवशक्तीमधें जाण। २४' असें म्हटलें आहे. येथेंच मातेची थोरवी वर्णिली असून स्त्रीपुरुषांच्या परस्पर आकर्षणाचें 'ईश्वरें मोठें सूत्र केलें। मनुष्यमात्र गुंतोन राहिलें। ३०' असें कौतुक सांगितलें आहे. 'जीव' ही मूळ स्थिति स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं एकच असली तरी वेदान्तांत पुरुषाच्या देहालाच सर्वप्रकारें महत्त्व दिलेलें पहायला सांपडतें. स्त्री पराधीन असते, 'नरदेह हा स्वाधेन' (१ : १० : २५ व २६) असा पुरुषदेहाचा महिमा समर्थांनीं गाइला आहे.

देह मुळांत जसा घाणेरडा तसाच नाशवंत असल्याचें कळलें तरी त्याचें प्रेम, त्याचा अभिमान, अहंकार-अहंता, देह म्हणजेच मी ही कल्पना, या जवळजवळ निसर्गसिद्ध असलेल्या स्थितीपासून माणसाच्या बुद्धीची सुटका सहजासहजीं होत नाहीं. या स्थितीचा बोध करून देणारे देहात्मबुद्धि किंवा देहबुद्धि, देहाभिमान, मीपण इत्यादि शब्द परिचित असून त्यांचा समर्थांनीं वापर केला आहे. या स्थितीपायीं जें माणसाच्या वांट्यास येतें, तें समर्थांनीं 'देह मी वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा। देहाभिमानें येरझारा। भोगिल्या च भोगी ॥ ५ : ६ : ५५' या ओवींत स्पष्ट केलें आहे. 'देहाचें जें थोरपण। तें चि देहबुद्धीचें लक्षण। ३४' अशी देहबुद्धीची ओळख सांगून देहबुद्धीचे अनर्थ ७ व्या दशकाच्या दुसऱ्या समासांतील ३२-४१ ओव्यांतून गोविलेले आहेत. मीपण किंवा देहबुद्धि किती बलाढ्य आहे याची खात्री पटवून घ्यावयाची असेल तर ७ व्या दशकांतील ७ व्या समासाच्या ४५-५० ओव्या पहाव्या. 'मीपण शस्त्रें तुटेना। मीपण फोडितां फुटेना। मीपण सोडितां सुटेना। कांहीं केल्या ॥ ४५'. त्याचें इतकें अचाट सामर्थ्य आहे, पण त्यावर महाप्रयत्नानें विजय न मिळविला तर ब्रह्मज्ञान, भक्ति, वैराग्य, प्रपंच, परमार्थ, मैत्री, प्रीति यांतली एकहि गोष्ट साधणें शक्य नाहीं. विकल्प, अभिमान, कलह यांचें मूळ मीपण असून तें जर माणसाला आपसांत सहन करवत नाहीं तर भगवंतानें त्याच्या मीपणाचा तिटकारा बाळगल्यास तें सरळच ठरेल. सारांश, मीपणाची—अहंकारवृत्तीची मनोरचनेंत जन्मापासून अधिकाधिक बळानें वाढत जाणारी गांट फोडून तिचा

पंचमहाभूतांचा मनुष्यासह मनुष्याभोवतीं निरंतर चाललेला खेळ मायेचा म्हणून सर्वथैव खोटा असें तत्त्वतः विचारास पटलें तरी तो खरा कां वाटतो, याचा खुलासा समर्थांनीं निरनिराळ्या अनुभवाचे दाखले घेऊन ६ : ८ व ८ : ३ मध्यें केला आहे. त्याखेरीज हा विषय स्पष्ट होण्याकरितां १० : ६ व १४ : १० हे दोन समास अनुक्रमें 'भ्रम' व 'माया' अशीं नांवें देऊन दासबोधांत घातले आहेत. पंचमहाभूतांचा अर्थात् सर्व दृश्याचा खेळ खोटा अशी खात्री पटल्यावर मनुष्यानें ब्रह्मज्ञानाच्या लाभाचा उद्योग आरंभल्यास त्याला दुश्चीतपण, आळस, झोप हीं विघ्नें बाधतात. संशय व भीड हीं विघ्नें या व्यवहारांत विसरतां येत नाहींत. हीं विघ्नें ज्यामुळें ब्रह्मजिज्ञासूची अडवणूक करूं शकतात, तें अहंभावाचें, मीपणाचें किंवा देहबुद्धीचें विघ्न सकृद्दर्शनीं अजिंक्य वाटण्याइतकें बलाढ्य आहे. संशयाचे दुष्परिणाम ५ : १० मध्यें आणि भिडेमुळें होणारी हानि १४ : ९ मध्यें दाखविलेली आहे. दुश्चीतपण, आळस व झोप यांचा एकत्र निषेध ८ : ६ मध्यें असून निद्रेविषयीं 'निद्रानिरूपणा'चा एक स्वतंत्र (१८ : ९) समासच लिहिलेला आहे. सर्वांत मोठें विघ्न 'मीपणा'चें, त्याचें वर्णन ७ : ७ मध्यें दृष्टीस पडतें. एकवीस समासी जुन्या दासबोधाचा १३ वा समास 'मीपण' या विषयास वाहिलेला आहे. वृत्ति, कल्पना अशा आणखी दोन गोष्टींचा निर्देश वारंवार आढळतो. त्यांतील एकाचा विचार, कल्पना व शुद्ध कल्पना या भेदासह ७ : ५ मध्यें मांडलेला आहे. ५ : ९ या मुमुक्षुवर्णनाच्या समासांत मीपणाचा मुमुक्षु ज्या दोषदृष्टीनें झाडा घेऊं लागतो, त्याची ओळख पटविली आहे.

परमार्थमार्गांतील विघ्नांची येथवर थोडक्यांत यादी सांगितली. हीं विघ्नें ध्यानांत येऊन त्यांचा निःपात होण्यासाठीं जीं साधनें स्वीकारावीं लागतात, त्यांतील पहिलें मोठें साधन सत्संग किंवा सद्‌गुरुसेवा हें आहे. त्या साधनाची चर्चा ५ : ३ मध्यें सच्छिष्याच्या लक्षणासह आलेली असून, असच्छिष्याचें चरित्रहि त्यांतच दाखल आहे. त्यापूर्वी नवविधांपैकीं 'पादसेवन' (४ : ४) या भक्तीचा ओघ गुरुसेवेकडेच सर्वथैव वळविलेला आहे. श्रवण हें दुसरें महत्त्वाचें साधन दासबोधांत स्वतंत्रपणें तीन वेळां विचारांत घेतलेलें आहे. नवविधा भक्तीचा आरंभ श्रवणानें होतो म्हणून ४ : १ मध्यें त्याचा खल असून सातव्या दशकाचे ८ व ९ हे दोन समास

'श्रवणा'ला वाहिलेले आहेत. ४ : १ आणि ७ : ८ यांचें स्वरूप अंशतः सारखेंच दिसतें. ७ : ९ मध्यें श्रवणासंबंधांतील विवेक–निवड असून ज्या ग्रंथांचें वाचन व श्रवण करावयाचें त्यांचें निश्चित स्वरूप ३०-३५ या ओव्यांत खणखणीत शब्दांनीं उघड झालेलें आहे. शिवाय श्रवणाचे उल्लेख इतरत्र पुष्कळच आहेत. श्रवणाच्या अनुरोधानें मननिदिध्यास या साधनांचा थोडासा उल्लेख सांपडतो. मननिदिध्यासाचा अर्थ किंचित् ताणून ध्यान असा केल्यास १४ : ८ मध्यें त्याचें विवेचन केलेलें आढळतें. 'अजपा' नांवाच्या एका साधनाचा विचार (१७:५) सांगायला समर्थ विसरले नाहींत, परंतु त्याबद्दल अन्यत्र आग्रह दाखविलेला नाहीं. यात्रा, स्नानें, पुरश्चरणें, नामस्मरण, इत्यादि साधनांना वगळलेलें नाहीं, परंतु त्यांचें अध्यात्माच्या श्रवणाइतकें महत्त्व मानलेलें नाहीं. ५ : १ मध्यें सारीं व्रतवैकल्यें सद्गुरुकृपेच्या अभावीं व्यर्थ होत असें समर्थांनीं स्पष्ट नमूद केलें आहे. सद्गुरुकृपा या साधनाला अग्रस्थान मिळालेलें असलें तरी इतर साधनांचा अभ्यास सद्गुरुकृपेनें प्राप्त होणाऱ्या श्रेष्ठ योग्यतेनंतर देहावसानापर्यंत अखंड चालू राहिला पाहिजे, यासंबंधांतला समर्थांचा आग्रह डोळ्यांआड करण्यासारखा नाहीं.

सद्गुरुकृपेसह इतर साधनें अंगीकारून परमार्थ सिद्धीस न्यावयाचा म्हणजे जीवन्मुक्ति, मोक्ष किंवा सायुज्यपद ही स्थिति आपलीशी करावयाची, हें समर्थांच्या शिकवणीचें सूत्र त्यांच्या वाङ्मयांत सर्वत्र ओवलेलें आहे. माणसाला आपल्या पसाऱ्यांतील गुलामगिरी किंवा बद्धावस्था उमगली, जाचूं लागली, व तिच्यांतून सुटण्याची मानसिक व शारीरिक क्रिया सुरू झाली कीं तो मुमुक्षु बनतो. नंतर त्याचीं बंधनें तुटत जातात. काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ, मोह, मीपण, कुळाभिमान, लोकलज्जा, अविद्या, प्रपंच, भेद, अहंकार, विकल्प, संदेह, गर्व, स्वार्थ, दुःख, शोक, द्वेष, तिरस्कार, विषाद, कपट इत्यादि दोषांचे पाश तोडून जो मोकळा होतो, तो साधक. ५ : ९ मध्यें त्याच्या महतीची प्रशंसा आहे. साधक व सिद्ध यांच्यामध्यें अंतर नाहीं व असलेंच तर फार थोडें आहे, याचा बोध ८ : ९ मधील सिद्धाचें वर्णन पाहिल्यानें होईल. तेथें क्रोध, तिरस्कार, मत्सर, दंभ, लोभ, शोक, मोह, भय, भेद, स्वार्थ, अविवेक, राग–आसक्ति, चिंता, मानापमान इत्यादि दोष सिद्धावस्थेमध्यें मुळींच उरत नाहींत, असें प्रतिपादन आहे. ५ : १० मध्यें साधकावस्थेंत संदेहाचें

सर्वस्वीं निर्मूलन झालेलें नसतें व सिद्धावस्थेंत संदेह साफ गेलेला असतो, असें या दोन अवस्थांमधील सूक्ष्म अंतर सुचविलें आहे. सिद्धावस्था हें ब्राह्मी स्थितीचें दुसरें नांव असून त्या स्थितींत बुद्धीचा निश्चय चळत नाहीं. 'निश्चय चळेना ऐसा जाला। या नांव सिद्ध। १०' 'साधु तो निःसंदेह॥ १४' 'म्हणोनि संदेहरहित ज्ञान। निश्चयाचें समाधान। तें चि सिद्धाचें लक्षण। निश्चयेंसीं॥ २७' अशी या समासांत सिद्धाची व्याख्या केलेली आहे. यावर निश्चय कशाला समजावयाचें हा प्रश्न निघाला. देहबुद्धी निःशेष लोपून आत्मबुद्धि सुदृढ असणें याला निश्चय म्हणतात. 'आत्मबुद्धि निश्चयाची। ते चि दशा मोक्षश्रींची। अहमात्मा हें कधीं चि। विसरों नये॥ ३८' हें निश्चयाचें लक्षण समर्थांनीं सांगितलें आहे.

सिद्धावस्थेचें स्पष्टीकरण समर्थांच्या उपदेशांत अनेक स्थळीं निरनिराळ्या रीतीनें आलेलें आहे. मोक्ष, (सायुज्य) मुक्ति, आत्मनिवेदन, स्थिति या शब्दांनीं केलेला सिद्धावस्थेचा ऊहापोह दासबोधांत पहायला सांपडतो. भक्तीच्या भाषेंत ज्या स्थितीला मुक्ति व आत्मनिवेदन म्हटलें तिलाच ज्ञानमार्गाच्या भाषेंत सिद्धावस्था व मोक्ष हीं नांवें योजिलीं आहेत. आत्मनिवेदनाचा अर्थ भक्तानें आपला निराळेपणा नाहींसा करून देवाच्या स्वरूपांत विलीन होऊन जाणें असा आहे. जो विभक्त नव्हे तो भक्त ही कोटी याच अर्थाची द्योतक आहे. मुक्ति व मोक्ष या शब्दांचा अर्थ सुटका, जन्ममरणाच्या चक्रांतून सुटका; परंतु या चक्राचा मुख्य व मूळ आधार मीपण किंवा देहबुद्धि ही असल्यानें मीपणापासून सुटका, अशा निरनिराळ्या व्याख्या दृष्टीस पडतात. याखेरीज वृत्ति-निवृत्ति, ज्ञान-विज्ञान या शब्दांनीं मोक्षाचें विवरण केलेलें आहे. वृत्ति घालवून निवृत्ति उत्पन्न झाली, ज्ञानाचें भान हरपून विज्ञानदशा उद्भवली कीं साधक मोक्षपदीं चढला, असें समजावें, इत्यादि समर्थोक्ति मोक्षाची कल्पना विशद करणाऱ्या आहे. अहमात्मा—मीच आत्मा हा अनुभव सिद्धावस्थेची गुरुकिल्ली आहे. मुक्ति व मोक्ष यांचा अर्थ एकच असला तरी मोक्षाच्या कल्पनेंत तरतमभाव नाहीं, मुक्तीच्या कल्पनेंत भेद आहेत. स्वलोकता, समीपता, स्वरूपता व सायुज्यता यांतील शेवटची सर्वश्रेष्ठ व बाकीच्या तिच्या मानानें कनिष्ठ, असा या भेदाचा प्रपंच आहे. आत्मनिवेदनाला सायुज्यतेच्या जोडीला बसवूनहि समर्थांनीं त्याचे जड, चंचल व निश्चळ असे तीन प्रकार दर्शविलेले आहेत (१२ : ५ : १६-२०).

मुक्ताचेहि मुक्त, नित्यमुक्त, जीवन्मुक्त, विदेहमुक्त असे चार भेद पडतात. मात्र समर्थ मरणोत्तर मुक्तीला विश्वसनीयतेच्या क्षेत्राबाहेर ढकलतात हें लक्षांत ठेवणें चांगलें.

मोक्षप्राप्तीला किती कालावधि लागतो असा प्रश्न उपस्थित करून समर्थांनीं त्याचें उत्तर ८ : ६ व ८ : ७ या दोन समासांत खेळविलें आहे. लोखंडाला परिसाचा स्पर्श झाल्याक्षणींच लोखंडाला सोनेपणा लाभतो, त्याप्रमाणें सावध, साक्षेपी व दक्ष (प्रज्ञावंत आणि श्रद्धाळू) पुरुषाला मोक्षाकरितां सायास पडत नाहींत. 'तयास तत्काळ चि मोक्ष'. तथापि या मोक्षप्राप्तीच्या संदर्भात 'भोळा भाव सिद्धी जाव। हा उधाराचा उपाव।' असें भोळ्या भावाचें गौणत्व दाखविलें आहे (९ : ७ : ४९).

आत्मज्ञानी अतएव मोक्षारूढाच्या जीविताची गति कशी असते किंवा ज्ञानोत्तर कर्म करावें कीं न करावें हा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. प्रपंच आणि परमार्थ यांचा कलह या प्रश्नांत समावलेला आहे. याचा निर्णय समर्थांनीं ७ : ६ मध्यें दिलेला आहे. शुक, वामदेव हे दोघे तेवढे मुक्त, आणि बाकीचे सर्व बुडाले, या वचनावर विश्वास ठेवणारे पढतमूर्ख होत, असा शेरा मारून पुढें लाकडाच्या ओंडक्याप्रमाणें पडून राहणें हें मुक्तावस्थेचें एकमेव लक्षण असतें तर शुकानें परिक्षितीला भागवत सांगितलें तेव्हां त्याला बद्ध समजावयाचें कीं काय, असा समर्थांनीं उलट प्रश्न विचारला आहे. 'म्हणोनी बोलतां चालतां। निचेष्टित पडलें नस्तां। मुक्ति लाभे सायोज्यता। सद्गुरुबोधें ॥ ४४'. मुक्त पुरुष व्यवहार करीत असतां अंतर्यामीं त्याविषयीं पूर्ण अलिप्त असतो, कारण त्याचा व्यवहार अहंभावानें घडत नाहीं. 'मीपणापासून सुटला। तो चि येक मुक्त जाला। मुका अथवा बोलिला। तरी तो मुक्त ॥ ५४'. हाच विचार ८ : ९ मध्यें निराळ्या दाखल्यानें आलेला आहे. 'स्वरूपीं स्वरूप चि जाला। मग तो पडोनि च राहिला। अथवा उठोनि पळाला। तरी चळेना ॥ १६'. मुक्ताचें किंवा सिद्धाचें शरीर व मन क्रिया करीत असतें, त्या क्रिया प्रारब्धाच्या म्हणजे पूर्वसंचिताच्या परिणामीं होत रहातात, अशी जीवन्मुक्ताच्या कर्मशीलतेसंबंधीं एक तोड तत्त्वज्ञानानें काढली आहे. 'देह प्रारब्धीं टाकिला' या शब्दांनीं ती तोड स्पष्ट केली जाते. तीच समर्थांनींदेखील स्वीकारली आहे. सारांश, ज्ञानोत्तरकाळीं मुक्त पुरुषाचें कर्म थांबत नाहीं, तें त्याला प्रारब्धवशात् करावें लागतें, असा समर्थांचा अभिप्राय आहे.

देह प्रारब्धवशात् जें करील तें करील असा तिन्हाईतपणा समर्थांच्या उपदेशांत नाहीं. देवाची भक्ति लोकांत वाढावी, ही त्यांची तळमळ ज्ञानोत्तर कोणतें कर्म करावें, या प्रश्नासंबंधांत शांत, उदासीन किंवा स्तब्ध नाहीं. ६ : ७ मध्यें ज्ञानानें दृश्याचें मिथ्यात्व पटल्यावर दृश्यांत मोडणाऱ्या सगुणाचें भजन करण्याचें प्रयोजन काय, अशी शंका काढली आहे. प्रारब्धाच्या प्रभावाची तोड मान्य केल्यास जर 'होणार हें तो पालटेना' असें अगतिकत्व पत्करणें भाग आहे, तर मग 'भजनें काय करावें जना?' यावर समर्थांचा दासबोधांतील वक्ता म्हणतो : ज्ञान झालें म्हणून भोजन उदकप्राशन, मळमूत्रत्याग हीं कर्में जर करावीं लागतात, जर 'जनाचें समाधान रहावें। आपुलें पारिखें वोळखावे।' हा वर्तनप्रकार सुटत नाहीं, तर 'भजन चि मोडावें। हें कोण ज्ञान?' पोटास देणाऱ्या धन्यापुढें लोटांगण घालणें चुकत नाहीं, पण देव मात्र मानवत नाहीं 'हें कोण ज्ञान?' समर्थांचा वक्ता म्हणजे स्वतः समर्थच असल्यामुळें त्यांनीं पुढें स्वगताचा उच्चार केला आहे : 'रघुनाथाची उपासना हा आमचा परमार्थ आहे. त्याचे आम्ही सेवक. आम्हांला जें ज्ञान झालें तें त्याच्या सेवेसाठीं झालें आहे.' तेव्हां भजन केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ७ : ७ हा सगळा समास सिद्धावस्थेंत साधनें सोडूं नयेत अशा आग्रहाचा आहे. ७ : ८ मध्यें श्रवण हें साधन केव्हांहि चुकवूं नये. 'सेविलें च सेवावें अन्न। घेतलें चि घ्यावें जीवन। तैसें श्रवण मनन। केलें चि करावें।४७' ८ : ९ मधील 'सिद्धलक्षणां'त साधकाची भूमिका सिद्धावस्थेंत कायम असेल तरच त्याला सिद्ध म्हणावें, 'बाह्य साधकाचे परी। आणी स्वरूपाकार अंतरीं। सिद्धलक्षण तें चतुरीं। जाणिजे ऐसें॥१२' असें समर्थांनीं मत दिलें आहे. १० : ७ मध्यें 'सगुणभजन' आहे. ज्ञानी पुरुष मुक्त होऊन गेल्यावर त्यांना जर पुनः जन्म नाहीं, तर त्यांच्या पश्चात् त्यांचें सामर्थ्य कां अनुभवास येतें, या विवंचनेचें निरसन करतांना हें सामर्थ्य त्यांनीं चोखाळलेल्या पुण्यमार्गाचें आहे, असें बजावून समर्थांनीं 'सांडील सगुणभजनासी। तरी तो ज्ञाता परी अपेसी। म्हणौनियां सगुणभजनासी। सांडूं चि नये॥१८' अशी ज्ञानोत्तर सगुणभजनाची शिफारस केली आहे. मात्र हें भजन निष्काम असावें हें सुचवायला समर्थ विसरले नाहींत.

## •२•

दासबोधाच्या पहिल्या दशकांत ज्यानें परमार्थ ओळखला, त्यानें जन्माचें सार्थक केलें; बाकीचे सर्व पापी व ते कुलक्षयाकरितां जन्मास आले (असें समजावें); भगवत्प्राप्ति सोडून जो संसारांत शीण करतो, त्या मूर्खाचें तोंड पाहूं नये; 'भल्यानें परमार्थी भरावें। शरीर सार्थक करावें। पूर्वजांस उद्धरावें। हरिभक्ती करूनी ॥ १ : ९ : २७' याप्रमाणें परमार्थ हा जीवनसाफल्याचा उपाय सांगितलेला आहे. समर्थांच्या सर्व उपदेशाचा रोख परमार्थावर आहे. ब्रह्मज्ञान व देवाची भक्ति असा त्यांचा दुहेरी परमार्थ आहे. परमार्थाचें साधन कसें करावें, या प्रश्नाचें उत्तर समर्थांनीं सद्गुरूची सेवा असें दिलें आहे. माणसाच्या व्यवहारांत गुरूंचा तोटा पडत नाहीं. जन्म देणारे आईबाप, विद्या देणारे शिक्षक, एखाद्या व्यवसायाचे मार्गदर्शक, वागणुकीचें नियंत्रण करणारे अधिकारी, अशा रीतीनें माणसांची किती तरी गुरूंशीं गांठ पडते. समर्थांनीं या गुरूंची झडती ५ : २ मध्यें घेतली आहे. जसे गुरु अनेक तसेच मंत्र व उपदेशाचे प्रकारहि अनेक आहेत. ५ : ४ मध्यें उपदेशाची आणि मंत्रांची विविधता दाखवून त्यांचा खऱ्या जन्मसाफल्याच्या दृष्टीनें उपयोग नसल्याचा विषय स्पष्ट केला आहे. त्या समासाच्या शेवटीं ज्ञान पाहिजे म्हणजे आत्मज्ञान पाहिजे असा निर्णय दिल्यामुळें ज्ञान या शब्दानें जितक्या गोष्टींचा प्रायः बोध होतो त्या गोष्टी ज्ञानाच्या खऱ्या व्याख्येंत मोडणाऱ्या नव्हत, असें बजावण्याचा प्रसंग आला. ५ : ५ मध्यें ज्ञानाच्या व्याख्येंतून कोणत्या गोष्टी वगळाव्या याची माहिती दासबोधांत केली आहे. नंतर समर्थ ज्ञानाच्या स्पष्टीकरणाकडे वळले आहेत. ५ : ६ हा समास शुद्धज्ञाननिरूपणाचा आहे व त्यांत संकलितपणें जें ज्ञानाचें स्वरूप निदर्शित केलें आहे, त्याचा विस्तार पुढें अनेक समासांतून केलेला आहे.

गुरु करावयाचा तर तो नीच यातीचा नसावा, हा समर्थांचा इशारा २ : २ : ३९ मध्यें प्रथम प्रकट झाला असून पुढें त्याचा निर्देश ५ : २ : ५८ व ६२ मध्यें केलेला आहे. नीच यातीचा गुरु म्हणजे कोण याचें स्पष्टीकरण १४ : ७ : २९, ३१-३२ मध्यें दृष्टीस पडतें. भाऊ किंवा बायको यांच्या गुरुत्वाचा निषेध करून तुर्क गुरु, शिष्य चांभार याप्रमाणें नीचाच्या गुरुत्वाची १९ : ६ मध्यें पुनरुक्ति आलेली आहे. ५:२ मध्यें गुरु स्वज्ञातीचा (आपल्या जातीचा) असावा (६४) असें

म्हटलें आहे. ब्राह्मण इतर सगळ्या धर्मव्यवहारांत श्रेष्ठ मानले गेले असले तरी आत्मज्ञानाच्या प्राप्तीला त्यांचा उपयोग नाहीं, त्याकरितां सद्गुरूच गांठणें अवश्य, ही सूचना ५ : १ मध्यें आहे. व्रतवैकल्यें पुष्कळ आहेत; तीं करीत राहिल्यानें आत्मज्ञानाचा लाभ होत नाहीं. आत्मज्ञान संपादन करायला सद्गुरूवांचून दुसरा उपाय नाहीं, यासंबंधाच्या विवेचनांत सत्संगाचा संदर्भ आढळतो, म्हणून सद्गुरु आणि ज्यांची संगति धरावयाची ते सत्पुरुष हे एकच होत असें समजावें लागतें. यासाठीं संतांची व सद्गुरूची तुलना करून पहावी म्हणजे ते एकच असल्याचें ध्यानांत येईल. ग्रंथ वाचावे, अध्यात्माचे ग्रंथ अवश्य वाचावे, असें समर्थांचें मत निश्चित असूनहि गुरूच्या तुलनेंत पुस्तकी ज्ञान हलकें असें त्यांनीं १२ : ७ च्या शेवटीं सुचविलें आहे.

आत्मज्ञानाची आवश्यकता तीव्रतेनें उत्पन्न होण्याकरितां आपली प्रपंचमूलक अनिष्ट स्थिति पूर्णपणें ध्यानांत यावी लागते. त्या स्थितीचें संपूर्ण चित्र तिसऱ्या दशकाच्या पहिल्या ९ समासांत आहे. त्या स्थितीच्या कंटाळ्याचें—वैराग्याचें—निरूपण त्या दशकाच्या दहाव्या समासांत आहे. वैराग्याला विवेकाचा लगाम पाहिजे, याचा ऊहापोह १२ : ४ मध्यें आहे. पांचव्या दशकाच्या सातव्या समासामध्यें प्रपंचांत रमणाऱ्या माणसाचें ' बद्ध ' या नांवानें वर्णन केलें असून या बद्धावस्थेंतून सुटण्याच्या तळमळीला आठव्या समासांत ' मुमुक्षु ' नांवानें स्थान दिलेलें आहे. नंतर साधक व सिद्ध यांची माहिती आहे. सिद्धावस्था लाभली अर्थात् दृश्य सृष्टीच्या भानांतून मनुष्य सर्वथैव बाहेर पडून दृश्यातीत निर्गुण ब्रह्माशीं तो एकरूप झाला तरी त्याला भगवद्भक्तीचें साधन सोडतां येत नाहीं. भगवद्भक्तीच्या नऊ पायऱ्या आहेत. त्याचें विवरण चौथ्या दशकांत आलेलें असून तेथेंच १० व्या दशकांत चारी मुक्तींचें स्वरूप पहायला सांपडतें. पण दासबोधांत श्रवण, कीर्तन, आत्मनिवेदन, बद्ध, मुक्त किंवा सिद्ध यांचा ऊहापोह दुसरीकडे आला असल्यानें त्यांच्याकडे स्वतंत्र दृष्टिक्षेप पूर्वीं केला आहे. या ग्रंथांत आत्मज्ञानाचें सूतउवाच 'शुद्धज्ञाननिरूपण' या नांवानें पांचव्या दशकाच्या ६ व्या समासांत झालें आहे. सहाव्या दशकाचें नांव ' देवशोधन ' आहे. सदर दशकांत ब्रह्ममायेचा विचार आहे खरा, पण तो चर्चेस घेण्यापूर्वीं जिज्ञासूंनीं दासबोधाच्या आधारें निराळें ' देवशोधन ' करणें बरें.

समर्थ स्वतः राम या अवताराचे निस्सीम भक्त होते, हें प्रसिद्ध आहे. परंतु त्यांनीं आपल्या देशांत प्रसिद्ध असलेल्या दुसऱ्या देवतांचा कुठेंच निषेध केलेला नाहीं. ज्या देवता विख्यात किंवा समर्थांना माहीत होत्या त्या सर्वांची त्यांनीं कुठें ना कुठें आपल्या वाङ्मयांत वरणी लावलेली आहे. दासबोधाच्या १८ व्या दशकाच्या पहिल्या समासांत अनेक देवतांचें वृत्त ग्रथित झालेलें आहे. त्यांपैकीं विष्णु, शंकर, इंद्र, राम या देवता सोडल्यास बाकीच्या सर्व दक्षिण भारतामधील असल्याचें लक्षांत ठेवणें योग्य आहे. तसाच प्रकार देवताविषयक स्फुट कवितांमधून आढळतो. सदर देवता अंतरात्म्याचीं रूपें असल्यामुळें अंतरात्म्याकडे प्रामुख्यानें लक्ष द्यावें, असा या समासाचा तात्पर्यार्थ आहे. ८ : १० मध्यें परमार्थाच्या साधनांचा व लोकांच्या देवविषयक समजुतींचा पाढा वाचतांना अनेक देवदेवतांचीं नांवें पहायला सांपडतात. १३ : ८ मध्यें सगळ्या ब्रह्मांडाचा कर्ता कोण हा प्रश्न विचारांत घेऊन 'जेहिं जो देव मानिला । कर्ता म्हणती तयाला । २२' या न्यायानें जीं नांवें अभिमानपूर्वक उच्चारलीं जातात, त्यांची यादी सांगून देवांच्या बाजाराची अधिक बारकाईनें पहाणी केली पाहिजे व खऱ्या मुख्य एका देवाचें निर्भेळ ज्ञान बुद्धीनें स्वीकारलें पाहिजे, असें तेथें समजावून दिलें आहे. परंतु मुख्य देव जाणण्याच्या निमित्तानें लोकांत ज्या देवदेवतांची पूजाअर्चा चालते, त्यांना झिडकारावयाचें, हा प्रकार समर्थांना संमत नसल्याचा अनुभव ४ : ५ मधील आशयानें येतो. या समासांत 'जाखमाता मायराणी । बाळा बगुळा मानविणी । पूजा मांगिणी जोगिणी । कुळधर्में करावी ॥ १६' याप्रमाणें अगदीं सामान्य देवतांचाहि मान राखला आहे.

जाखमाता-मायराणीसारख्या क्षुद्र स्थानदेवता किंवा कुळदेवतांसंबंधांत आदराची भाषा समर्थांनीं वापरल्याचें पाहून आश्चर्य वाटायला नको. एरवीं पाषाणाच्या मनुष्यकल्पित देवांना देव समजूं नये, असें देवविषयक तत्त्वज्ञानांत निःशंकपणें प्रतिपादन करणारे समर्थ अनेकदां भुताखेतांवर आपला विश्वास दाखवितात, व सर्वांनीं तसा विश्वास बाळगणें अवश्य असल्याचें बजावतात, त्यावरून त्यांच्या विचारसरणीची दिशा कळण्याला हरकत नाहीं. एकट्या १० व्या दशकांत ४ व ९ या समासांत ही कल्पना दोनदां आली आहे. ४ थ्या समासांत 'देव देवता भूतें देवतें । चढतें सामर्थ्य आहे तेथें । येणें चि न्यायें राक्षसांतें । सामर्थ्यकळा ॥ २४

झोटिंग वायोस्वरूप असती । सर्वे च खुळखुळां चालती । खोत्ररीं खारका टाकून देती । अकस्मात ॥ २५ अवघें चि न्याल अभावें । तरी हें बहुतेकांस ठावें । आपुलाल्या अनुभवें । विश्वलोक जाणती ॥ २६', व पुढें ९ व्या समासांत 'तैसे देव देवता देवतें भूतें । मिथ्या म्हणों नये त्यातें । आपलाल्या सामर्थ्यें ते । सृष्टीमध्यें फिरती ॥ २०' त्यापूर्वी ९ व्या दशकाच्या ८ व्या समासांत 'वायोरूपें देवतें भूतें । आंगीं भरती अकस्मातें । वीध केलियां प्रतें । सावध होती ॥ २०' असा समर्थांचा भुताखेतांवरील विश्वास व्यक्त झाला आहे. वरच्या एका ओवींत 'राक्षसांतें सामर्थ्यकळा' असे शब्द आहेत. पुराणांतील राक्षसांचीं मायावी कृत्यें समर्थांना खरीं वाटत होतीं व त्यांनीं अशा कृत्यांचीं उदाहरणें आपल्या सृष्टिरचनेच्या युक्तिवादांत पूर्ण विश्वासानें गोविलेलीं आहेत, याचें प्रमाण दासबोधांत व अन्यत्र त्यांच्या वाङ्मयांत भरपूर आहे.

देवाच्या निदानांत समर्थांनीं दोन परस्परविरोधी वाटणाऱ्या तऱ्हा कां पतकरल्या, याचें कारण पाहूं गेल्यास त्यांनीं समाजामध्यें प्रचलित असलेल्या देवासंबंधाच्या चार भिन्न कल्पना आपल्यासमोर ठेवल्याचें दिसून येतें. या कल्पनांचे देव मायेच्या पसाऱ्यांतले म्हणून अखेरीस लटके ठरतात आणि नंतर मायेपलीकडच्या खऱ्या देवाचा मार्ग उजळत जातो, अशी समर्थांची देवमीमांसा आहे. कल्पनेच्या, पाषाणाच्या, नदींतील दगडांच्या, धातूंच्या, लाकडाच्या व चित्रांतल्या देवांचा ऊहापोह ६ व्या दशकांतील ६ व्या समासांत समर्थांनीं केला आहे. 'धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ठ देखा । तेथें देव कैंचा मूर्खा । भ्रांति पडली ॥ ४४' अशा खणखणीत शब्दांनीं समर्थांनीं आपली निष्ठा प्रगट केली आहे. 'देवें निर्मिली हे क्षिती । तिचे पोटीं पाषाण होती । तयास चि देव म्हणती । विवेकहीन ॥ २९' असा समर्थांचा अभिप्राय ८ : १ मध्यें स्पष्ट आहे. यालाच पुढें त्या समासांत 'देव आला देव गेला । देव उपजला देव मेला । ऐसें बोलतां दुरिताला । काये उणें ॥ ४८' अशी पुस्ती जोडली आहे. प्रतिमा, अवतार, अंतरात्मा आणि निर्विकारी असे समर्थांच्या मतें चार देव आहेत (११ : २ : ३३). त्यांतल्या पहिल्या तिघांची बहुविधता जशी पूर्वी ६ व्या दशकांत दर्शविली आहे तशीच ती १९ : ५ मध्यें सांगितली असून तेथें 'देव देवता भूतें देवतें । मुळींचें सामर्थ्य आहे तेथें । अधिकारें नाना देवतें । भजत जावीं ॥ १३' असें म्हटलें

आहे. पुनः एकदां या ठिकाणीं क्षेत्रदेव आणि अवतार यांचा उल्लेख आहे. शिवाय अवताराचीं किंवा ब्रह्मा-विष्णु-महेशांचीं चरित्रें लोक ऐकतात व त्यांनाच देव समजूं लागतात, अशी देवांच्या नानात्वाची उपपत्ति दिलेली आहे. सारांश, 'भूमंडळीं देव नाना। त्यांची भीड उलंघेना। मुख्य देव तो कळेना। कांहीं केल्या ॥ २३' असा अनुभव येतो. २० : ९ मध्यें मृत्तिकापूजन करावें, नंतर पुजलेली माती फेकून द्यावी, देव पुजावा आणि टाकावा, हा व्यवहार माणसाला प्रशस्त वाटत नाहीं. 'देव करिजे ऐसा नाहीं। देव टाकिजे ऐसा नाहीं। म्हणोनि त्याचा कांहीं। विचार पाहावा ॥ ३' असें समर्थांनीं सुचविलें आहे. तेव्हां समर्थांनीं हा विचार कसा केला आहे, इकडे वळणें बरें.

चार देवांपैकीं प्रतिमा व अवतार यांची विशेष विवंचना करण्याची आवश्यकता नाहीं. जी सृष्टि नश्वर आहे, तिच्यांत यांचा समावेश होत असल्यानें त्यांना दिला जाणारा मान सृष्टीच्या नश्वरतेबरोबर निकालांत निघतो. परंतु त्यांचा गौरव योग्य असल्याची साक्ष १५ : ३ मध्यें पहायला सांपडते. अवतारी आणि सदेव या शब्दांच्या व्याख्या सदर समासांत आहेत (४–७). देव पहाण्यासाठीं देवळें पहावीं लागतात, त्याप्रमाणें अवतार हीं देवळें देवाच्या दर्शनाकरितां पहाणें अवश्य असल्याचें समर्थांनीं १७ : १ मध्यें सांगितलें आहे. समर्थांनीं रामकृष्णादि अवतारांचीच नव्हे तर ब्रह्मा-विष्णु-महेशांचीसुद्धां अंतरात्म्याच्या घडामोडींत सोय लावली आहे. यामुळें अंतरात्म्याच्या समर्थोक्त कल्पनेचें अधिक निरीक्षण केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. अंतरात्म्याचें विवेचन समर्थांनीं अनेक प्रकारें केलें असून त्याचे निर्देश त्यांच्या इतर वाङ्मयांतहि सांपडतात.

अंतरात्मा हा शब्द दासबोधांत प्रथम ८ : १ मध्यें आला असून तेथें जग मिथ्या, आत्मा खरा, सर्वांहून पलीकडचा (सर्वोपर) परमात्मा, 'अंतर्बाह्य अंतरात्मा। व्यापूनि असे ॥ ४४', त्याला देव म्हणावें असें वेदांताचें रहस्य आहे, याप्रमाणें समर्थांनीं या कल्पनेची ओळख करून दिली आहे. पुढें १० व्या दशकापासून १४, १९ आणि २० या दशकांखेरीज बाकीच्या साऱ्या दशकांत ठिकठिकाणीं अंतरात्म्याचा महिमा गाइलेला आढळतो. आत्मा व अंतरात्मा हीं दोन नांवें एकाच तत्त्वाचीं असून आकाश म्हणजे अंतरात्मा असेंहि एके ठिकाणीं म्हटलें आहे

(१२ : ६ : १२). विष्णु म्हणजे अंतरात्मा एवढेंच नव्हे तर ब्रह्मा-महेश यांचाहि उगम तोच, देवाचा शोध घेणारानें प्रथम त्याचा ध्यास लावून घ्यावा; अशा ध्यासानें तो देवशोधक ब्रह्मप्राप्तीचा अधिकारी होतो; अंतरात्मा चढत्या अर्थानें चढत जातो, शेवटीं निर्गुण ब्रह्म गांठतो; मात्र तो चंचलाच्या क्षेत्रांतील आहे, याचा विसर पडूं न देणें चांगलें, ही समर्थांची विचारसरणी पंचमान, चतुर्थमान, मानपंचक व इतर लघुकाव्यें यामध्यें पहायला सांपडते. अंतरात्म्याची स्त्री, पुरुष, नपुंसक नांवें १० : १० मध्यें गोंविलीं आहेत.

अंतरात्मा हा 'अशाश्वताचा मुकुटमणी' (१७ : १ : १७) असल्यामुळें त्याच्या खेळांतील अवतार हे खऱ्या शाश्वत देवाच्या मानाला तत्त्वदृष्ट्या अपात्र असले तरी त्यांचा सृष्टीच्या व्यवहारांतील उपयोग दृष्टीआड करतां येत नाहीं. ब्रह्मा, विष्णु, महेश हे रज, सत्त्व आणि तम या तीन गुणांचे प्रतिनिधि असून उत्पत्ति, रक्षण व संहार अशीं तीन कामें त्यांच्याकडे आहेत. त्यांतला विष्णु हा सृष्टीचा रक्षणकर्ता असल्यामुळें त्याच्या कामावरून समर्थांनीं काढलेले निष्कर्ष पहाण्याजोगे आहेत. विष्णु हा सत्त्वगुणाची मूर्ति असल्यानें ज्ञान–जाणतेपणा हा त्याचा विशेष आहे. ब्रह्मदेवांत कांहीं जाणतेपणा तर कांहीं नेणतेपणा आहे. महेश हा निखालस नेणतेपणाचा पुतळा असून नेणतेपणामुळेंच त्याला भोळा म्हणतात. हे तिघेहि देह धारण करूं शकतात. 'गुप्त प्रगट होतां तयांस । वेळ नाहीं ॥ १० : ४ : २२'. गीतेंतील 'एकांशेन स्थितं जगत्' हें वचन' (१० : ४२) कृष्णाचें अर्थात् विष्णूचें या धोरणानें विष्णु आपल्या एका अंशमात्रेनें सगळ्या जीवांना वाढवितो, वर्तवितो, या कल्पनेला समर्थांनीं आपल्या उपदेशांत अनेकदां थारा दिला आहे. विष्णु हा 'दुष्कृतां विनाशाय, धर्मसंस्थापनार्थाय (४ : ८) जन्म घेतो–'दुष्टांचा संव्हार करणें । धर्म स्थापाया कारणें । विष्णूस जन्म ॥ ४१ ॥' यावरून समर्थांनीं तात्पर्य सिद्ध केलें आहे कीं, 'जे धर्मसंस्थापनेचे नर । तेहि विष्णूचे अवतार ।'. असे पुरुष जर विष्णूचे अवतार तर विष्णूला ज्यांच्यामुळें अवतार घ्यावा लागतो ते रजनीचर–राक्षस कोण? 'अभक्त दुर्जन रजनीचर । सहज चि जालें ॥ (१० : ४ : ४२)' हें वरील प्रश्नाचें उत्तर आहे. सत्त्वगुण, ज्ञान किंवा जाणतेपणा हें प्रमुख लक्षण ठरवून समर्थांनीं ज्ञान म्हणजे देव असें दासबोधांत व अन्यत्र म्हटलें आहे. ज्ञानाचाच

समर्थांनीं स्मरणगुण हा दुसरा पर्याय योजून स्मरण=देव, विस्मरण=दानव आणि स्मरण+विस्मरण=मानव असें गणित एका ठिकाणीं मांडलें आहे (१५:७:३५). श्रीरामदासांची कविता खंड १ व श्रीरामदासांचीं लघुकाव्यें, सप्तसमासी यांत अनुक्रमें पान ४३३ व पान ८१ वर हें गणित आलेलें आहे. देवाच्या पूर्वोक्त व्याख्येला अनुसरून सत्कीर्तींच्या धर्मस्थापनाकांक्षी पुरुषाचें वर्णन समर्थांनीं 'तो ईश्वराचा अंश' (२:७:७८, १७:१:२९), 'ईश्वरी पुरुष' (१२:७:१८) या शब्दांनीं केलें आहे.

अंतरात्म्यासारखीच समर्थांची 'जगजोती', 'जगज्जोती' ही कल्पना आहे. अंतरात्मा म्हणजे आकाश अर्थात् वायुतत्त्वाहून तो वडील मानला आहे, तर जगज्जोती हा वायूचा गुण ठरविल्यानें तो अंतरात्म्याहून खालच्या श्रेणीचा असें साहजिकच वाटतें. परंतु या गुणाचा अंतरात्म्याइतकाच प्रभाव असल्याचें वर्णन पाहिलें कीं अंतरात्म्याची ही वेगळी आवृत्ति असल्याचा ग्रह झाल्याशिवाय रहात नाहीं. १०:९ मध्यें वायूला प्रकृति आणि त्यांतील जाणिवेच्या गुणाला–जगज्जोतीला पुरुष म्हणतात, असें विवेचन आहे. अर्धनारीनटेश्वर ही संज्ञा या स्थितीवरूनच पडलेली आहे. जगज्जोतीचा अनुभव घ्यावयाचा असेल तर सर्व प्राण्यांच्या ठिकाणीं आढळणारी स्वरक्षणाची दक्ष क्रिया पहावी. 'अवघ्या जगास वांचविती । म्हणोनि नामें जगज्जोती । ते गेलिया प्राणी मरती । जेथील तेथें ॥ १८' या जाणीवकलेनें अंतरात्मा देहाच्या पंचेंद्रियांचे विषय ओळखण्याला समर्थ असतो. अंतरात्म्याची ज्ञानशक्ति (जाणीवकळा) म्हणजे जगज्जोती असा जगज्जोतीचा अर्थ निघतो. दासबोधाबाहेर पंचमानांत (२ रें मान) जगज्जोती, आत्मा, अंतरात्मा हीं सर्व एकच असें म्हटलें आहे. वेदांताच्या भाषेंत ज्याला प्रकृति-पुरुष या संज्ञा आहेत, त्यांची माहिती वायु, अंतरात्मा, जगज्जोती या नांवांनीं दासबोधांत दिलेली आहे, हें दासबोधांतील खुलाशावरून कळणारें आहे.

आत्मा, अंतरात्मा, जगज्जोती यांच्या विचारामागोमाग समर्थांनीं विश्वाच्या घडामोडीचा जो वृत्तांत दिला आहे, त्याचें समालोचन करायला हरकत नाहीं. कारण अंतरात्मा हा त्या घडामोडींतला एक अतिश्रेष्ठ अंश असल्याचें जिज्ञासूंच्या ध्यानांत आलेंच असेल. अंतरात्म्यापर्यंतचें अंतरात्म्यासकट सारें विश्व चंचल, नाशवंत, हा समर्थांचा

सिद्धांत असून परमार्थाचें सर्वस्व अंतरात्म्यापलीकडे असल्यामुळें तें मिळविल्याखेरीज परमार्थाला पक्केपणा येत नाहीं, असा त्यांचा अभिप्राय अनेक स्थळीं व्यक्त झालेला आहे. अंतरात्मा हा सृष्टीचा आरंभ होय. त्याला आकाशाचा पर्याय ठरविल्यानें वायु, तेज, आप आणि पृथ्वी या भूतांच्या मूलस्थानाचा मान अंतरात्म्याकडे जातो. म्हणून कित्येकदां 'वडील' या शब्दानें त्याला गौरविलें आहे (१५ : ९). आत्मज्ञान म्हणजे अंतरात्म्याचें ज्ञान अशी समर्थांची व्याख्या असून (१७ : ३) समर्थ उपासना व ज्ञान यामध्यें भेद करीत नाहींत (१३ : २ : ८ व ९). मात्र विश्वारंभाची शास्त्रीय चर्चा करतांना समर्थांनीं वेदांताची ब्रह्म, माया, तीन गुण, स्थूल सूक्ष्म भूतें, आत्मा इत्यादि परिभाषा स्वीकारली आहे. त्या परिभाषेप्रमाणें दासबोधांत व इतरत्र आलेल्या सृष्टिविषयक तत्त्वज्ञानाचा आढावा घेणें अवश्य आहे.

दासबोधाच्या ६ व्या दशकापासून ब्रह्म, माया, पंचभूतें (सूक्ष्मस्थूल), त्यांची सृष्टि इत्यादि विषयांचें विवेचन थोड्या फार प्रमाणांत जिज्ञासूच्या समोर येऊं लागतें. ब्रह्म हें तत्त्व विश्वाच्या आरंभीं व शेवटीं शिल्लक रहातें. तें अखंड असून सर्वत्र सदैव भरून राहिलेलें आहे. निर्गुण, निराकार, निश्चल, निर्द्वंद्व, सर्वगत, सम, अद्वितीय हीं वेदांतांतील व अच्छेद्य, अशोष्य, अक्लेद्य इत्यादि गीतेंतील ब्रह्माचीं लक्षणें दासबोधांत विस्तारानें घेतलेलीं आहेत. ब्रह्म निश्चल असतां त्यामध्यें चलत्व कसें उत्पन्न झालें, हा प्रश्न सोडवितांना त्याच्या ठिकाणीं जर कांहीं घडलेंच नाहीं तर त्याचें वर्णन करण्याला अवकाश नाहीं, असें उत्तर एका समासांत आहे. परंतु या उत्तरानें समाधान होणार नाहीं म्हणून, जें केव्हां तरी घडलें आहे असें वाटतें, जें दिसतें, जें भासतें, त्याची उपपत्ति दाखवितांना एकजिनसी निश्चल ब्रह्मांत एकाएकीं 'अहं' असें स्फुरण उद्भवलें असें म्हणावें लागतें. तें स्फुरण हेंच मायेचें आद्यस्थान. किंबहुना मायाच. पुढें मायेंत सत्त्व-रज-तम या गुणांचा क्षोभ झाला; प्रस्तुतपैकीं तमोगुणापासून आकाश, वायु, तेज, आप आणि पृथ्वी हीं पंचभूतें झालीं. पंचभूतांची जी घालमेल—कालवाकालव—तीच सृष्टि. या सृष्टीचे काल्पनिक, शाब्दिक, दृश्य, चित्रलेप, स्वप्न, गंधर्व, ज्वर आणि दृष्टिबंधन असे ८ प्रकार मानले आहेत (६ : ६ : ५१-५३). पंचभूतें व त्रिगुण यांच्या गणनेला अष्टधा प्रकृति म्हणतात, या वेदांताच्या प्रमेयाचा निर्देशहि जागोजाग आहे. सहाव्या दशकांत ब्रह्ममायेचा

विचार सुरू झाला असून सातव्यांत व आठव्यांत त्याचा विस्तार आहे. पण एवढ्यावर हा विचार संपलेला नाहीं. आठव्यानंतरच्या सर्व दशकांतून या विचाराच्या पुनरुक्तीला स्थान मिळालें आहे. सृष्टीचा उदय सांगितल्यावर तिच्या विलयाची व्यवस्था सांगणें क्रमप्राप्त असल्यामुळें त्यासंबंधाचें स्पष्टीकरण १० : ५, ११ : १, १३ : ४ या तीन समासांत ग्रथित झालेलें आहे. प्रलयांत विवेकप्रलय (अर्थात् एक प्रकारें जीवन्मुक्तावस्था) नांवाचा प्रलय नोंदलेला आहे. समर्थांनीं सामान्यतः वेदान्तामध्यें ज्यांची चर्चा आढळत नाहीं, त्या चौदा ब्रह्मांची माहिती त्यांच्या निराकरणासह सातव्या दशकाच्या तिसऱ्या समासांत गोविली असून चौथ्या समासांत 'विमलब्रह्म' या नांवानें ब्रह्माचें शुद्ध तात्त्विक स्वरूप निवेदन केलेलें आहे.

पंचभूतांचीं सूक्ष्म व स्थूल अशीं दोन अंगें आहेत. त्यांची तपशीलवार माहिती अनुक्रमें ८ : ४ व ५ या ठिकाणीं असून आकाशासंबंधांत आकाश व ब्रह्म यांत भेद कोणता, याप्रमाणें निघणाऱ्या शंकेचा ८ : ५ च्या शेवटीं परिहार केला आहे. परंतु ही शंका दुसरीकडे 'उपाधिरहित आकाशाला ब्रह्म मानतां येईल (९ : ६ : ३७), अशा अर्थाचीं सिद्धांतवाक्यें पाहिल्यावर त्या त्या ठिकाणीं डोकावून गेल्याचा बोध होतो. १६ व्या दशकांत सूर्य अग्नि मिळून तेजाविषयीं दोन समास (२ व ५), पृथ्वीकरितां ३ हा एक समास (पृथ्वीच्या महतीचा १५ : ४ हा एक समास आहे), आपनिरूपणाचा ४ हा समास, वायुस्तवनाचा ६ हा एक समास, आकाशाचा महद्भूत या नांवानें ७ हा समास, एकूण ६ समास पंचभूतांच्या वर्णनाकडे लावले आहेत. पंचमहाभूतांमध्यें वायूची भक्ति समर्थांनीं विशेष प्रकट केली आहे. ९ : ८, १० : ३ व ४, वायु व आत्मा यांतील तारतम्य १३ : ९ (मागें १६ : ६ या समासाचा निर्देश केलाच आहे) इतक्या ठिकाणीं वायूची प्रशंसा पहायला सांपडते. पंचमहाभूतांच्या पसाऱ्याचा मनुष्य हा एक लहानसा अंश आहे; परंतु त्याला या पसाऱ्यांतून सुटून त्यापलीकडे जाण्याची व तेथें स्थिरावण्याची महत्त्वाकांक्षा असते. ती महत्त्वाकांक्षा चिकाटीच्या प्रयत्नानें सफल करणें हें त्याच्या जीविताचें परमार्थदृष्ट्या परम साफल्य आहे.

पिंड व ब्रह्मांड याचा किंचित् पृथक् विचार झाला. परंतु बारकाईनें पाहिल्यास पिंडब्रह्मांडाच्या रचनेंत सादृश्य असल्याचें दिसल्याशिवाय रहात नाहीं.

हें सादृश्य दासबोधाच्या ९ : ५ समासांत सविस्तर दाखविलेलें असून पुढेंहि त्याचें ओझरतें निर्देश पहायला सांपडतात. त्याचें पुढील कोष्टक सादृश्याच्या माहितीला उपयोगीं पडणारें आहे.

| पिंड | ब्रह्मांड |
|---|---|
| अंतःकरण | विष्णु |
| मन | चंद्रमा |
| बुद्धि | ब्रह्मदेव |
| चित्त | नारायण |
| अहंकार | रुद्र |

यावर निघणाऱ्या शंकेचें निरसन ९ : ६ मध्यें केलेलें आहे. मुख्य शंका जाणीव–ज्ञान यासंबंधाची असल्यानें प्रथम विश्वाच्या विस्तारांत जाणिवेचें मूळ कोणतें हा प्रश्न सोडविला आहे व नंतर इतर गोष्टींचें निरूपण आहे. जाणीव हा विष्णूचा अंश, अंतःकरण हें त्याचें मानवी देहांतील स्थान असल्यामुळें पालनसंवर्धनासारख्या क्रिया माणसाच्या हातून घडतात. नेणीव हा रुद्राचा अंश व अहंकार हें त्याचें स्थान आहे. नेणीव माणसांच्या हातून मोडतोडीचीं दुष्ट कृत्यें करवितें. कांहीं बरें, तर कांहीं वाईट करणें हें जाणीवनेणिवेचें मिश्रण बुद्धिस्थानीं असल्यानें त्याच्याद्वारें मनुष्य आपल्या देहांतील ब्रह्मदेवाचें अस्तित्व निदर्शनास आणतो. ब्रह्मांडांतील पंचमहाभूतें आपल्या गुणधर्मासह पिंडांत कोणत्या रूपानें आढळतात, याची माहिती १७ : ८ व १७ : ९ मध्यें आल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. विश्वाच्या तत्त्वांची यादी आणि पिंडब्रह्मांडाच्या सादृश्याची हकीकत श्री रामदासांची कविता खंड १ च्या २६७-२६८ पानावर ग्रथित झालेली आहे.

परमार्थसिद्धीच्या निरूपणांत मनुष्यजीवाचे आणि विश्वाचे पंचभूतादिकांहून निराळे घटक सांगण्याची वहिवाट आहे. त्या घटकांचा समर्थांच्या उपदेशांत समावेश असल्यामुळें त्यांचा परामर्श केल्याशिवाय एकंदर विषयाची पूर्तता होणार नाहीं. सदर वहिवाटीनें स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण, विराट, हिरण्य, अव्याकृत, मूळ प्रकृति असे आठ देह व त्यामध्यें पुरुष, प्रकृति हे दोन मिळविले म्हणजे एकंदर दश देह कल्पिले आहेत (८ : ७ : ४०-४१). त्यांतील पहिले चार पिंडाचे

असून दुसरे चार ब्रह्मांडाचे आहेत. प्रकृतिपुरुषांची देहांच्या बेरजेंत व्यवस्था असली तरी पिंडब्रह्मांडविचारांत या जोडीला वगळलें आहे. या देहांच्या अनुरोधानें चार आत्मे मानले आहेत. पिंडांतला आत्मा हा घटांतल्या आकाशाप्रमाणें जीवात्मा, ब्रह्मांडांतला तो मठाकाशाप्रमाणें परमात्मा, शिवात्मा मठाबाहेरील महदाकाशा-प्रमाणें ब्रह्मांडाबाहेरील जो तो परमात्मा आणि उपाधिवेगळा जो तो उपाधिवेगळ्या चिदाकाशाप्रमाणें निर्मळात्मा, असा या चार आत्म्यांचा खुलासा आहे; तथापि मुळांत हे पिंड ब्रह्मांड या नात्यानें एकच आहेत.

पिंडाच्या दोन (सूक्ष्म स्थूल) देहांचा खोल विचार करूं लागल्यास आणखी कित्येक गोष्टी निदर्शनास येतात. त्या एकूण पंचवीस असून पांचाचा एक याप्रमाणें त्यांचे पांच गट करण्याची रीत आहे. अंतःकरणाचे पांच प्रकार, पांच प्राण, पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पांच विषय, एकूण पंचवीस गोष्टींचें पंचमहाभूतांमध्यें मिश्रण झालें आहे. स्थूल देहांतदेखील पंचमहाभूतांचें असेंच मिश्रण आहे. या माहितीला 'पंचीकरण' अशी पारिभाषिक संज्ञा असून १७ : ८ मध्यें ही माहिती सांगितली आहे. पंचीकरणांतील पंचकड्यांच्या बरोबर स्थान, अभिमान, भोग इत्यादींच्या कित्येक चौकड्या ध्यानांत येणाऱ्या असल्यानें त्यांची माहिती १७ : ९ मध्यें १७ : ८ मधील माहितीसह घातलेली आहे. पिंडांतील तिसरा देह कारण या नांवानें ओळखला जातो. अज्ञान हें त्याचें स्वरूप असून महाकारण या चौथ्या देहाचें स्वरूप ज्ञान होय. सूक्ष्म, स्थूल, अज्ञान व ज्ञान या चार देहांचें साधकाच्या बुद्धीनें निरसन केलें कीं ती बुद्धि विज्ञानमय झाली असें ठरतें. विज्ञान हेंच परब्रह्म असल्यामुळें चार देहांच्या निरसनानंतर साधक मोक्षपदीं स्थिरावतो. क्वचित् ब्रह्मांडांतील चार देहांपलीकडे जाऊन साधकानें परब्रह्माशीं एकरूप व्हावें, असें म्हटलें आहे. मायेच्या परिहारांत आपण व ब्राह्यसृष्टि यांचा अंतर्भाव असल्यानें चार देहाचें निरसन व आठी देहांचें निरसन यांत भेद उरत नाहीं.

वेदांताच्या प्राकृत परिभाषेंत चार वाणी, चार खाणी हे शब्द येतात. परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी या चार वाणी प्रसिद्ध आहेत. १७ : ८ च्या प्रारंभीं थोडक्यांत वाणींचें व्याख्यान आहे. पूर्वी स्थान, अभिमान, भोग इत्यादि ज्या चौकड्या सांगितल्या त्याखेरीज सृष्टीच्या घटकांचें आणखी एक गणित आहेच.

त्याची अंतिम संख्या चारच आहे. १ ब्रह्म, २ मायेचीं चौदा रूपें, ३ पंचमहाभूतें, ४ जीवांचे चार प्रकार. यांनाच चार खाणी म्हणतात. अंडज, जारज, स्वेदज, उद्भिज्ज हीं या खाणींचीं नांवें आहेत. २० : ५ मध्यें या गणिताचा खुलासा आहे. माणसानें देव ओळखण्याकरितां या सर्व प्रकरणांचा स्वतंत्र शोध घ्यावा. 'नर तोचि नारायण' हें प्रमेय अनुभवानें पटवून घेऊन निस्संदेह व्हावें, असें शेवटीं तात्पर्य सांगितलें आहे. सृष्टीच्या घडामोडीचा विषय सुगम होण्याकरितां चंचळ नदी (११ : ७), कहाणी—कूटकथा (१३ : ५) हे दोन समास दासबोधांत घातले आहेत.

## उत्तम पुरुष

**दासबोधामध्यें** व इतर कवितेंत समर्थांनीं वेगवेगळ्या नांवांखालीं आपल्या ध्येयवादानुसार आदर्श पुरुषाचें चित्र अनेकदां रेखाटलें आहे. शुद्ध पारमार्थिक दृष्टीनें व्यक्तिशः जो सिद्ध, साधु, भक्त, संत किंवा ज्ञानी तोच व्यवहाराच्या बाजूनें उत्तम, सत्त्वगुणी, सद्विद्येचा, विरक्त, निःस्पृह, महंत, सदेव, चतुर किंवा चातुर्यलक्षणाचा, शहाणा याप्रमाणें भिन्न भिन्न नांवांनीं ओळखतां येतो. परंतु उत्तम पुरुषाची कल्पना समर्थांच्या बुद्धींत इतकी घट्ट खिळून बसलेली होती कीं, नांवावरून ज्या समासांत उत्तम पुरुषाचें वर्णन असेलसें वाटणार नाहीं, त्या समासांतदेखील त्याची चुटपुटती नव्हे तर चांगली सविस्तर माहिती दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, १८:१० हा समास घेतला तर त्याचें नांव 'श्रोताअवलक्षण' असें पाहून त्यांत शहाण्या माणसाची प्रशंसा पहाण्याची आशा सहज करतां येत नाहीं. परंतु अवलक्षणी श्रोत्यानें केलेला 'मजालसीचा चिवडा' शहाणा पुरुष आवरतो या संदर्भात शहाण्याचे गुण व कर्तृत्व हीं समर्थांनीं सांगितलीं आहेत. 'विवरण' असें १९ : २ या समासाचें नांव आहे. त्यावरून हा समास उत्तम पुरुषाच्या लक्षणांचा असल्याविषयीं कल्पना करवत नाहीं. समास वाचल्यावर त्यांत उत्तम पुरुषाचीं कर्तव्यें गाइल्याचें दृष्टीस पडतें. १९ : ६ चें 'बुद्धिवाद' हें नांव असेंच दिशाभूल करणारें आहे. त्यांत देखील उत्तम पुरुषाचीं कर्तव्यें निवेदन केलेलीं आहेत. १९ व्या दशकांत हा प्रकार अनेक समासांसंबंधांत घडल्याचा अनुभव येतो. हीं उदाहरणें वाढवावयाचीं म्हटल्यास आणखी बरींच वाढवितां येतील.

उत्तमाच्या विरुद्ध समर्थांनीं मूर्ख, कुविद्य, रजोगुणी, तमोगुणी, बद्ध, पढतमूर्ख, आळशी, दुश्चीत, झोपाळू, करंटा, टोणपा इत्यादि नांवांनीं अवगुणी माणसांना उभें केलें आहे. जे प्रापंचिक आहेत, ज्यांना आत्मज्ञान नाहीं व जे केवळ अज्ञान आहेत, त्यांना समर्थांनीं मूर्ख ठरविलें आहे (२ : १ : ७). समर्थांनीं 'ज्ञाना-

ज्ञाना'च्या ज्या व्याख्या दिल्या आहेत, त्या लक्षांत ठेवल्यास ज्याला सामान्य लोक-व्यवहारांत चोख वागतां येत नाहीं, तोच फक्त मूर्ख असें म्हणतां येत नाहीं. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान, 'जाणिजे निर्गुण परमात्मा । त्यासी च म्हणावें ज्ञान । त्यावेगळें तें अज्ञान । सर्व कांहीं' (६ : १ : १९), 'आपण म्हणजे मीपण । मीपण म्हणिजे जीवपण । जीवपण म्हणिजे अज्ञान । संग जडला ॥' (७ : २ : २०) या व्याख्यांना धरून समर्थांनीं मूर्खांची संभावना केली आहे. संसारांत जो सुख मानतो तो परम मूर्ख (२ : १० : ४०). मूर्खांच्या लक्षणांत साध्या व्यवहारांतील वागणुकीचा अस्ता-व्यस्तपणा पुष्कळसा दाखविलेला असला तरी उत्तमाच्या वर्तनक्रमांमध्यें परमार्थदृष्ट्या अवश्य असणाऱ्या कर्तव्यांची मोठी यादी पहायला सांपडते. ज्याला रोजचा परिचित व्यवहार नीट संभाळतां येत नाहीं, त्याला परमार्थाचा व्यवहार साधणें शक्य नाहीं, हा सिद्धांत समर्थांनीं दासबोधांत व्यक्त केलेला आहे. साध्या सामान्य व्यवहारांत आळस, झोंप, विसराळूपणा, संशयी वृत्ति, कलहप्रियता, व्यसनासक्ति, स्त्रीपुत्रादि-कांचें ममत्व वगैरे स्वभावदोषांच्या प्राबल्यामुळें ज्याला आपलीं कामें तडीस नेतां येत नाहींत, त्याला जेथें सावधपणा, सोशिकपणा, दुसऱ्याला सज्ञान व सुखी करण्याची आकांक्षा, सतत उद्योग, क्लेशाविषयीं बेफिकिरी, प्रत्येक गोष्टीमध्यें दक्षता इत्यादि गुणांची आवश्यकता असते तो परमार्थ सिद्धीस नेणें अशक्य असल्याचें निराळें सांगायला नको. दुसऱ्या दशकांत मूर्खांचे अवगुण बऱ्याच समासांमध्यें असून त्यांची छाननी केली म्हणजे शब्दांचा भडकपणा सोडल्यास पुष्कळ अवगुणां-मध्यें साहश्य असल्याविषयीं संशय रहात नाहीं. उत्तमाच्या गुणांचा प्रकार असाच आहे. येथें उत्तमाचा स्वभाव आणि व्यवहार तपासावयाचा असून त्याच्या आधारें समर्थांच्या एकंदर शिकवणीचें स्वरूप व तात्पर्य निश्चित करावयाचें आहे; स्थितप्रज्ञा-विषयीं अर्जुनानें विचारलेल्या प्रश्नासारखेच प्रश्न घेऊन येथें समर्थांच्या उत्तम पुरुषाचें दर्शन घ्यावयाचें आहे.

प्रथम हें ध्यानांत बाळगणें अवश्य आहे कीं, समर्थांचा उत्तम पुरुष हा सांप्र-दायिक आहे; भक्तीचा, उपासनेचा, आत्मज्ञानाचा प्रसारक आहे. तो समुदायाचा नेता असला तरी त्याचा समुदाय देवाची भक्ति व देवाचे महोत्सव सदैव चालू रहाण्यासाठीं उभा केलेला असतो. समुदायाचा नेता खरा, पण तो समुदायाचा शास्ता नाहीं—समुदायांत कोणीं चूक केली तर तो चुकाराला शिक्षा करूं शकत नाहीं.

त्याच्या पुढारीपणाला मर्यादा आहेच. एखाद्या वेळीं कोणी हिरवट कचरट भेटल्यास त्याचा संबंध सोडून या पुढाऱ्यानें दुसरीकडे निघून जावें, असा समर्थांनीं एके ठिकाणीं उपदेश केला आहे. क्वचित् जशाला तसा भेटवितां आल्यास त्याच्यामार्फत कांट्यानें कांटा काढण्याची युक्तीहि सांगितली आहे. या पुढाऱ्याच्या कामगिरींत मठ, फड, मज्यालस, सभा हे प्रसंग दिसतात. गुरु-शिष्य, श्रोता व वक्ता या नात्यांना त्याच्या कामगिरींत जागा आहे. कीर्तन, कवित्व, त्यांनिमित्त वाचन-लेखन या कर्तव्यांचा त्याच्या व्यवहारांत आदर आहे. यशस्वी पुढारीपणाच्या दृष्टीनें जें चातुर्य पाहिजे त्याची मीमांसा समर्थांनीं केलेली आहे. लोकांना आपल्या गुणांच्या बळानें वश करून घेण्याच्या वर्तनाला समर्थांनीं 'चातुर्य' हा शब्द लावला आहे. उत्तम गुण स्वीकारावे, असें समर्थांनीं वारंवार निक्षून बजावलें आहे. कोणत्या स्वभावविशेषांना समर्थ उत्तम समजतात याची चर्चा आतां करायला हरकत नाहीं.

स्थितप्रज्ञाच्या दाखल्यास अनुसरून 'का भाषा?'—समर्थांचा उत्तम पुरुष बोलतो कसा, या प्रश्नाच्या उत्तरानें प्रस्तुत चर्चेची सुरुवात केलेली बरी. 'बोलतो कसा' हा प्रश्न सकृद्दर्शनीं अगदीं साधा व सोपा वाटतो, परंतु विचार करूं लागल्यास त्याच्या किती तरी छटा उघडकीस येतात. बायकोपाशीं हितगुज सांगणें, आत्मश्लाघा, पूर्वजश्लाघा, दुसऱ्याचें किंवा मित्राचेंसुद्धां उणें उच्चारणें, पैज मारणें, अंगांत वकूब नसतां पोकळ बढाई मिरविणें, पुऱ्या ओळखीशिवाय यथेच्छ बोलणें, भांडणें, बोलावल्याखेरीज साक्षीला जाणें, विचारलेल्या प्रश्नाचें अवश्य तेवढें नेमकें उत्तर न देतां निराळाच पाल्हाळ करणें, संसारानिमित्त देवाला शिव्यांची लाखोली वहाणें, वगैरे किती तरी तऱ्हा बोलण्याच्या आहेत. त्या एकाच समासांतून (२ : १) येथें गोळा केल्या आहेत. २ : २ मधील उत्तमाच्या विवरणांत आणखी कित्येक तऱ्हा गोविलेल्या आहेत. चहाडी करणें किंवा बाहेर जाणाराला 'कोठें जातोस' म्हणून प्रश्न करणें, यांचा समावेश बोलण्याच्या क्रियेंतच होतो. समर्थांनीं असल्या बोलण्याचा निषेध केला आहे. १४ : १ मध्यें कठिण, उद्धट शब्द बोलूं नये, पूर्ण माहिती असल्यावांचून किंवा प्रसंगाशिवाय उगीच बोलूं नये, संशयात्मक बोलूं नये, दाटून उपदेश देऊं नये, जाणतेपणाच्या घमेंडीनें एखाद्याला प्रश्न विचारूं नये, अशा रीतीनें बोलण्याच्या क्रियेचे कित्येक पडदे दाखवून त्या क्रियेचा त्याग सुचविला आहे.

समर्थांच्या उत्तम पुरुषाचें 'बोलणें कसें असावें' याची अटकळ मागील माहितीवरून करतां येईल. माणसांना वेध लावण्याचा त्याच्याजवळ बोलणें हा एक श्रेष्ठ उपाय असल्यानें त्या उपायाचा उपयोग त्याला फार जपून करावा लागतो. आपण जसें बोलावें तसें त्याचें उत्तर येतें, हें समर्थांना ठाऊक होतें. आपल्याला अनुलक्षून कोणी कठिण शब्द उच्चारल्यास त्याचें वाईट वाटतें; बरें बोलल्यानें सुख वाटतें, हा नित्याचा अनुभव आहे. मग जाणून बुजून वाईट बोलण्यांत हंशील काय, असा प्रश्न उपस्थित करून 'जे दुसऱ्यास दुःख करी। ते अपवित्र वैखरी। आपणास घात करी। कोणी येके प्रसंगें॥' (१२ : १० : २५) असा आपला रोखठोक अभिप्राय समर्थांनीं व्यक्त केला आहे. सद्विद्येच्या वर्णनांत (२ : ८) 'अमृतवचनी, विचक्षण बोलिका, सर्वकाळ सत्यवचनी, शुभवचनी, कोमळवचनी, एकवचनी, निश्चयवचनी, सौख्यवचनी, परशोकहारी वाङ्माधुर्य, संशयछेदक विशाळ वक्ता, वेवादरहित संवादी' इत्यादि स्तुतिवाचक शब्दांनीं उत्तम पुरुषाच्या बोलण्याचा गौरव केला आहे. यांतील प्रत्येक शब्दाच्या अर्थाची परिस्फुटता करूं गेल्यास विस्तार होईल, परंतु थोडासा विस्तार पत्करणें भाग आहे. सत्य बोलावें, परंतु तें शुभ असावें; पुनः त्यांत पुढेंमागें फेरबदल होण्याचा संभव नसावा, याकरितां एकवचनी, निश्चयवचनी हे शब्द घातले आहेत. बोलणें सत्य, शुभ, कोमळ, व निश्चयाचें असलें तरी तें सौख्यकारक असेलच अशी खात्री बाळगतां येत नाहीं; तेव्हां सौख्यकारित्व, परशोकहारित्व हे गुण उत्तम पुरुषाच्या बोलण्यांत अवश्य आहेत. समर्थांच्या दासबोधेतर कवितेंत बोलणें गोड, नम्र व कोमल असावें, अशा अर्थाचीं वचनें आहेत. 'कर्कशें भुंकती स्वानें। तैसें वाक्य करूं नये। सर्वांसीं मृद बोलावें' हा चतुर्थ मान प्रकरणांतील उतारा दुजोऱ्यादाखल सादर केला आहे. स्फुट प्रकरण १ मध्यें 'विचारें गोड बोलावें। बहुतां मान्यसें बरें' याप्रमाणें एक वचन आहे.

लोकांना आपल्या कार्यास जोडावयाचें असेल तर जिव्हेच्या—वाणीच्या सूत्रानें हा उद्देश साधतो. उत्तम पुरुष हा आपल्या गुणांनीं इतरांहून बहुत प्रकारें श्रेष्ठ असला 'बहुतांसीं भांडतां येकला' कसा निभावणार? बहुतांमध्यें येकल्याला यश कैंचें? लोकांना कष्टविल्यास आपल्यालाहि कष्टावें लागतें. 'जनीं भांडभांडों हिंपुटी किती व्हावें?' जगांत राह्यचें, लोकांत काम करायचें तर 'जनावेगळा जनास उपाव। आणिक नाहीं'. लोकांशीं भांडायचें नाहीं, त्यांना सोडायचें नाहीं, असें एकदां निश्चित

ठरल्यावर त्यांना राजी राखणें–संतुष्ट राखणें–हें ध्येय बाळगणें भाग आहे व समर्थांनीं या ध्येयाची पुनः पुनः दासबोधांत घोषणा केली आहे. प्रस्तुत घोषणेचीं स्थळें जिज्ञासूंना दासबोधांमध्यें व अन्यत्र विशेष श्रमाखेरीज दिसणारीं आहेत. परंतु लोक राजी रहाण्याकरितां 'दुसऱ्याचें अंतर जाणावें,' या समर्थोक्तीचा थोडा बारकाईनें विचार केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. समर्थ 'अंतर' हा शब्द खोल अर्थानें वापरतात. अंतरात्मा सर्व प्राणिमात्रांना व्यापून राहिलेला असल्यानें दुसऱ्याला दुःख दिल्यास तो अंतरात्मा दुखावतो, यासाठीं दुसऱ्याच्या अंतराला अर्थात् अंतरात्म्याला धक्का न लावण्याची काळजी घ्यावी—'परांतराला न लावावा ढका.' येथें चित्त, हृदय, मन या सामान्य अर्थानें 'अंतर' शब्द उपयोगांत आणलेला नाहीं. प्रत्येक प्राण्याच्या ठिकाणीं वसणारा आत्मा हा अर्थ ध्यानांत वागवून समर्थ त्याचा पुष्कळदां वापर करतात. 'प्राणीमात्रीं जगदांतरें। म्हणोनि राखावीं अंतरें।' (१४ : ८ : ७). अंतरात्मा नानाविध असल्यामुळें त्याची दुसऱ्याच्या ठिकाणीं चटकन् ओळख पटणें शक्य नसतें. 'जीव जीवांत घालावा। आत्मा आत्म्यांत मिसळावा। राहाहों शोध घ्यावा। परांतराचा', परांतर जाणतां आलें नाहीं तर लोक वश्य होत नाहींत, असें एकदां सांगितल्यावर (१५ : १ : ४ व ८) दुसऱ्या ठिकाणीं एका अवयवाच्या सुखदुःखाचें ज्ञान शेजारच्या दुसऱ्या अवयवाला होत नाहीं; तेव्हां दुसऱ्या निराळ्या देहांतील अंतर–परांतर–नेमकें ओळखणें फार कठिण आहे असा इशारा दिला आहे. उत्तम पुरुषाला देवाच्या भक्तीचा प्रसार लोकांत राहूनच करावयाचा असतो, म्हणून त्याला जगाशीं फटकून वागतां येत नाहीं, आपल्या मोठेपणाच्या तोऱ्यांत लोकांबरोबर भांडतां येत नाहीं, याचें विवेचन समर्थांनीं दासबोधांत पुष्कळ वेळां केलें आहे. लोकांना जें मानवणार नाहीं, तें लोक मानणार नाहींत, तथापि लोकांशीं भांडतां येत नाहीं; कारण 'आपण येकला जन नाना' अशी स्थिति असल्याचें विसरू नये, असें सुचवून 'परांतर होऊनियां अंतरें जाणावें' असा उपाय निदर्शनास आणला आहे (१५ : ७ : २५ व ३१), १५ : ५ मध्यें 'अंतरें राखतां राजी। भलत्यास भलता च नवाजी (नांवाजतो)। अंतरें न राखतां भाजी। मिळणार नाहीं ॥' (२०), असें अंतर राजी राखण्या न राखण्याचा परिणाम स्पष्ट केला आहे. 'लोक हे राखतां राजी। सर्व राजी च होतसे। अंतरें चुकतां तेथें। सर्व भाजी च (विचका) होतसे॥ १७' अशी भाजी शब्दाची कोटी दुसरीकडे दृष्टीस पडते. बाह्य विश्वाच्या अणुरेणूंत भरून

राहिलेल्या अंतरात्म्याची बिनचूक ओळख बाळगणारासाठीं समर्थांनीं 'अंतरनिष्ठ' हा शब्द उपयोगांत आणला असून 'बाहेरमुद्रा' हा अंतरनिष्ठ नसलेल्यांची समर्थ-निर्मित संज्ञा आहे. 'अंतरनिष्ठ जो पुरुष। तो अंतरनिष्ठेनें विशेष। जगामधें जो जगदीश। तो तयास वोळखे ॥ १४ : ८ : २०' लोक आपल्या संबंधांत संतुष्ट राहण्याचा उपाय परांतर ओळखून त्याप्रमाणें वागण्याखेरीज दुसरा नसतां, जारण-मारण-वशीकरण असल्या भलत्याच मार्गांत शिरणारीं माणसें स्वतःची हानि करून घेतात. 'जगदीश आहे जगदांतरीं। चेटकें करावीं कोणावरी। १५ : १ : १०' याप्रमाणें समर्थांनीं प्रश्न विचारून चेटकांची निरर्थकता पटविली आहे.

धर्मस्थापना, भक्तिमार्गाचा प्रसार, देवाच्या वैभवाचें संवर्धन हें समर्थांचें ध्येय असल्यामुळें, त्याच्या सिद्ध्यर्थ लोकांची संघटना करणें त्यांस अवश्य वाटत होतें. लोकांमध्यें भक्तिविषयक जूट व जागृति करावयाची म्हटल्यास, एकाच ठिकाणीं कायमचा डेरा ठोकून राहणें अयोग्य होय, असें समर्थांच्या उपदेशाचें आणखी एक अंग आहे. लोकांच्या बहुत्वाविषयीं समर्थांचा विश्वास त्यांच्या उपदेशविस्तारांत जागजागीं प्रगटला आहे. समर्थांच्या काळीं आजच्या लोकशाहींतील बहुमताचें प्रामाण्य माहीत नव्हतें, हें मुद्दाम सांगायला नको. परंतु समर्थांच्या विचारसरणींत बहुमताच्या प्रामाण्याचा कसा आदर झाला आहे, तें पहाणें उद्बोधक ठरेल. 'जें बहुतांस मानलें। तें बहुतीं मान्य केलें। येर तें वेर्थ चि गेलें। जगनिंद्य ॥ १४' असें त्यांनीं १४ : ६ मध्यें म्हटलें आहे. 'बहुतांसीं न मने तें अवलक्षण। सहज चि जालें ॥ २७' असें त्यांनीं १९ : ३ मध्यें सांगितलें आहे. त्यांचा निश्चित अभिप्राय होता कीं, 'बहुतीं कांहींतरी सांपडे' (१५ : ६ : २५). म्हणूनच 'जो बहुतांस मानला। तो जाणावा शाहाणा जाला' (१५ : २ : २६) अशी शहाण्याची व्याख्या केली आहे. त्याच्या उलट समर्थांनीं बहुतांना जो थोडा मान्य त्याची दुर्दशा १९ : ३ मध्यें स्पष्ट केली आहे : 'बहुतांसी मान्य थोडा। त्याच्या पापास नाहीं जोडा। निराश्रई पडे उघडा। जेथें तेथें ॥ २९'. बहुतांच्या प्रामाण्यावर आधारलेली समर्थोदित व्याख्या अशीच कौतुकाची आहे. 'बहुतीं शोधून पाहिलें। बहुतांच्या मनास आलें। तरी मग जाणावें साधिलें। महत्कृत्य॥' (११ : १० : १६) बहुमान्यासंबंधांत समर्थांचा एक उद्गार तर त्यांच्या हृदयांतील आदराची उचंबळ

पटविणारा आहे : 'जो मानला बहुतांसी । कोणी बोलों न शके त्यासी । धगधगीत पुण्यरासी । माहांपुरुष ॥' (१९ : ४ : ९).

बहुतांची मान्यता निराळी व बहुतांचें मानणें–ऐकणें निराळें, हा भेद नजरेआड होऊं नये म्हणून समर्थांनीं कित्येकदां एकाच अर्थाच्या ज्या सूचना केल्या आहेत त्या निदर्शनास आणणें अवश्य आहे. एखाद्याजवळ लोकांवेगळें विचारांचें व कर्तृत्वाचें भांडवल आहे व तें उपयुक्त आहे असें जेव्हां पुष्कळांना उमगतें तेव्हां ते त्याला मानतात. 'कांहीं नेमकपण आपुलें । बहुत जनासी कळों आलें । तें चि मनुष्य मान्य जालें । भूमंडळीं ॥' (१९ : ३ : २३) हें त्याचें 'नेमकपण'–वैशिष्ट्य ज्याच्या त्याच्या कमाईचें असतें, लोकांच्या देणगीचें नसतें. आणि ज्याची त्यानें कमाई करायची तर लोकांच्या नादीं लागून चालत नाहीं. यासाठीं समर्थांनीं १५ : ४ मध्यें 'लोकांचे बोलीं जो लागला । तो अनुमानें च बुडाला । याकारणें प्रत्ययाला । पाहिलें च पाहिजे ॥ ३१' असें ठासून सांगितलें आहे. १५ : ६ मध्यें १०–११ ओव्यांत वरील हृद्गताचा अनुवाद आहे. लोकांनीं कांहीं सांगितलें तर तें ऐकूं नये, झिडकारावें, असें समर्थ सुचवीत नाहींत. 'उदंडांचें उदंड ऐकावें' असें तेथें त्यांचें म्हणणें आहे. परंतु उदंडांचें उदंड ऐकतांना त्याच्या याथातथ्याची आपल्या अनुभवाच्या कसोटीनें परीक्षा करावी. या परीक्षेचा निर्णय उच्चारण्याची आवश्यकता नाहीं. 'खरेंखोटें निवडावें । अंतर्यामीं ॥'

'शाहाणे करावे जन । पतित करावे पावन । सृष्टिमधें भगवद्भजन । वाढवावें ॥' (१४ : ६ : ३३) या ओवींत व्यक्त झालेलें उत्तम पुरुषाचें कर्तव्य पार पाडण्याकरितां सतत संचाराचा उपाय समर्थांनीं वाखाणला आहे. उत्तम पुरुषानें सदैव हिंडत रहावें. 'येके ठाईं बैसोन राहिला । तरी मग व्याप चि बुडाला । १५:१:३४'. 'उगेंच बैसतां कांहीं च न घडे ।' (१५ : ६ : २५). हिंडतांना आपण कोणी 'अहंविशेष' असल्याचा भासदेखील उत्पन्न करूं नये. 'लीनता धरून जावें । जेथें तेथें ॥ २३'. अशा संचाराचा उद्देश काय तर 'कुग्रामें अथवा अथवा नगरें । पाहावीं घराचीं घरें । भिक्षामिसें ल्हानथोरें । परीक्षून सोडावीं ॥ २४'. हिंडतांना निष्कारण साहस न करणें श्रेयस्कर. जेथें जाणें कसल्याहि कारणामुळें कठिण वाटेल तेथें जाऊं नये. 'जाऊं ये तिकडे जावें ।'–जातां येईल तिकडे जावें, परंतु तसें

करतांना बुद्धींत अविचार नसावा. 'जाऊं ये तिकडे जावें' या वचनाला 'विवेकें-सहित' या शब्दाची समर्थांनीं मर्यादा घातली आहे. दासबोधाच्या १९:२ मध्यें संचाराचा विषय चोखाळलेला आहे. कुठल्याहि गांवांत शिरण्यापूर्वीं त्यासंबंधाचा जागजागीं बारीक शोध घ्यावा व तेथें गेल्यावर 'प्राणीमात्र बोलवावा। आसपणें ॥ १७'. जेथें कथा चालली असेल तेथें (हटकून) जावें. जमलेल्या लोकांच्या दृष्टींत न भरण्यासाठीं 'दुरी दीनासारिखें बैसावें।' मात्र तेथील सारें रहस्य (हरद्र) अंतर्यामीं सांठवावें. कथेच्या जमावांत केव्हां केव्हां भले व्यापक वृत्तीचे लोक आढळण्याचा संभव असतो. त्यांचें अस्तित्व ध्यानांत आल्यावर मग हळुहळू मंदगतीनें त्यांमध्यें मिसळावें (२०–२१). श्रीरामदासांची कविता खंड १ मधील स्फुट प्रकरणांतून संचाराचें महत्त्व गाइलेलें आहे. स्फुट प्रकरण १ मध्यें 'हिंडतां शाहाणें होतें। २', 'घरींच बैसतां खोटें। ब्राह्मणु हिंडतां बरा। ३', हिंडून लोकांची परीक्षा करतो व जो कार्यकर्ता आढळेल त्याला हातीं धरतो. 'हिंडतां पारखी लोकां। कार्यकर्त्ता जिवीं धरी ॥६', 'येके स्थळीं स्थिरावेना। नित्य नूतन साजिरा। २०', स्फुट ३ मध्यें 'नित्य नूतन हिंडावें। धुंडावे भक्त प्रेमळ। ६' याप्रमाणें हिंडण्याविषयीं शिकवण आहे.

उत्तम पुरुषाच्या संचाराचा येथवर विचार केला. संचार हा अहोरात्रांत केव्हां तरी थांबलाच पाहिजे. मूर्खाच्या लक्षणांत (२ : १) वैधृति व्यतिपात इत्यादि कुमुहूर्त व अपशकुनांचा निर्देश (३६) असल्यामुळें उत्तमाच्या संचाराला त्यांची अटक असावी. २ : २ मधील उत्तमानें पाऊस पडत असेल त्या वेळीं अथवा अवकाळीं बाहेर पडूं नये (३७), असें म्हटलेलें आहे. १९ : २ मध्यें 'अस्तमानीं जाऊं नये। कोठें तऱ्ही ॥१८' असा नियम सांगितला आहे. उत्तम पुरुष झाला म्हणून त्याला दुपार, अंधार, पाऊस याचें बंधन संभाळणें भाग आहे. समर्थांच्या काळीं दळणवळणाचीं साधनें आजच्याप्रमाणें नसल्यानें संकटेंहि अधिक होतीं हें समजणें कठिण नाहीं. म्हणूनच पाऊस, अवकाळ, सूर्यास्त, रात्र, अज्ञात किंवा अपरिचित मार्ग यांचा निर्देश दासबोधांत आलेला आहे. संचार थांबला तर वस्ती कुठें करायची, या प्रश्नाचें उत्तर दासबोधांत नाहीं. श्रीरामदासांची कविता खंड १ मधील ३ ऱ्या स्फुट प्रकरणांत त्याचें उत्तर आहे. दुर्बलाच्या घरीं, देवालयांत, नदीतीरीं, जेथें जवळच पाणी असेल अशा डोंगराळ जागेंत, उत्तम पुरुषानें रहावें. या ठिकाणीं शीतोष्णापासून बचाव होण्याची

खात्री नसल्यामुळें तितिक्षेच्या बळानें शीतोष्णादिकांना सहन करावें. रम्य स्थळें पहावीं, जमल्यास कष्ट करून रम्य स्थळें निर्माण करावीं, असेंहि त्या प्रकरणांत सांगितलें आहे; परंतु न जाणों, रम्य स्थळें अस्तित्वांत आणल्यावर तेथेंच कायम रहाण्याचा मोह होईल, म्हणून तात्रडतोब 'येकें ठाई स्थिरों नये' असा इशारा दिला आहे.

भिक्षा हें उत्तम पुरुषाच्या निर्वाहाचें साधन असल्याबद्दल दासबोधांत एक स्वतंत्र समासच आहे (१४ : २). त्यांत संचार व भिक्षा यांचा संबंध 'नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटण करावें । तरी च भिक्षा मागतां बरवें । श्लाघ्यवाणें ॥ ८' या ओवींत दाखविला आहे. वार लावल्यास पराधीनता ओढवते, आठवड्याचें धान्य गोळा केल्यास 'नित्यनूतनता' रहात नाहीं, याकरितां प्रत्यहीं भिक्षा मागावी, असें समर्थांचें निक्षून सांगणें आहे. तथापि अन्नग्रहणानिमित्त समर्थांचे जे इतर नियम होते, त्याकडे डोळेझाक करून चालणार नाहीं. २ : २ मध्यें 'बहुत अन्न खाऊं नये । (२३), आसुदें (अशुद्ध) अन्न सेऊं नये । वडिलांचेंहि ॥ २६' अशी अन्नासंबंधीं मर्यादा सांगून १४ : १ मध्यें ५२–५४ ओव्यांत कोणत्या प्रसंगाचें भोजन निःस्पृहानें स्वीकारूं नये, याविषयींची माहिती दिलेली आहे. याच समासांत 'गोड अन्न खाऊं नये । (९), वारें (वारानें) अन्न खाऊं नये । (५६)' अशा आणखी सूचना आहेत. समर्थांना कोणत्याहि बाबतींत अतिरेक मान्य नसल्यामुळें या समासांत 'बहुत अन्न खाऊं नये' या बरोबरच 'त्यांनीं उपवास खोटा ॥ ६४' असें बजावून ठेवलें आहे. भिक्षामाहात्म्याचे करुणाष्टकांतील दोन श्लोक (पान ७२) या संदर्भांत पहाण्याजोगे आहेत.

उत्तम पुरुषाच्या वेषाबद्दल समर्थांनीं कांहीं सूचना केल्या आहेत. मागें एका ठिकाणीं हरिकथा चालू असेल तेथें अवश्य जावें, पण 'दुरीं दीनासारखे बैसावें', या समर्थमताचा निर्देश झाला आहे, त्यावरून उत्तम पुरुषाच्या पेहरावाची कांहीं कल्पना करणें शक्य आहे. उत्तम पुरुषाची ओळख पटकन् पटूं नये, हा दूर दीनाप्रमाणें बसण्याचा उद्देश लपण्यासारखा नाहीं. लोकांनीं त्याला धुंडून काढावें, त्यानें स्वतः लोकांसमोर बढाईनें मिरवूं नये, ही समर्थांची उत्तम पुरुषासंबंधांतील मनीषा अनेक स्थळीं त्यांच्या वाङ्मयांत चमकून जाते. 'पहातां तरी सांपडेना' (११ : ५ : २४), 'त्यास शोधिती सकळ लोक ।' '(१२ : ७ : २१)', 'तया माहांपुरुषाकारणें । धुंडित

येती ॥' (१२:१०:३१), 'परी तो कोठें आडळेना । कोणे स्थळीं सांपडेना ।' या स्थितीचें कारण १५ : २ मध्यें 'वेष पाहातां हीन दीना । सारिखा दिसे ॥ २१' याप्रमाणें स्वच्छ सांगून टाकलें आहे. निःस्पृहलक्षणाच्या १४ : १ या समासांत 'येक वेष धरूं नये । येक साज करूं नये। १९' असा समर्थांचा आदेश असून १५ : १ मध्यें 'वेष धरावा बावळा २१' अशी त्याची पुनः परिस्फुटता दृष्टीस पडते. १५ : २ चा एक उल्लेख वर आला आहे. तेथेंच पुनः एकवार 'उदंड करी गुप्त रूपें । भिकाऱ्यासारिखा स्वरूपें ।' अशी उत्तम पुरुषाच्या पेहरावाची खूण पटविली आहे. हीनादीनासारखा वेष म्हणजे मळकट घाणेरडा वेष असा समर्थांचा संकेत नाहीं. वस्त्र एक वेळ फाटकें चालेल पण मळकें खपणार नाहीं, हा भाव 'धड मळिण नेसों नये ।' (१४:१:९), 'मळिण वस्त्र नेसों नये।' (२:२:१८) मध्यें दृष्टीस पडतो. ज्याला एका ठिकाणीं न रहातां अनेक ठिकाणीं कामें करावयाचीं आहेत व तीं कामें करणारा कोण याचा लोकांना शक्य तोंवर पत्ता लागूं द्यावयाचा नाहीं, त्याचा गुप्त रहाण्याचा हेतु कायमच्या एका वेषानें किंवा साजानें नेहमीं सिद्धीस जाणार नाहीं. तेव्हां तो 'नित्य नूतन' भासला पाहिजे, हें सरळ आहे. वेष व कार्य यांच्यांत कसलाच संबंध नाहीं. कार्य साधायला विशेष प्रकारचा वेष नको, कार्य तडीस जाण्याकरितां माणसाला विवेक पाहिजे, हें जाणून समर्थांच्या स्फुट प्रकरण १ मध्यें 'वेषानें कार्य साधेना । विवेकें कार्य साधतें ।' असें सुभाषित पहायला सांपडतें. वस्त्राभूषणांच्या शरीरशृंगाराविरुद्ध समर्थांनीं दासबोधांत जे विचार दाखल केले आहेत ते या संदर्भात सहज लक्षांत येणारे आहेत. १४ : ६ मध्यें चातुर्य आणि वस्त्र यांची तुलना करून चातुर्य हें वस्त्राहून श्रेष्ठ, कारण 'चातुर्यें बहुतांसी रक्षिलें । नाना प्रकारें ॥ १९', शरीराचा शृंगार लोकांचें कल्याण साधीत नाहीं, याप्रमाणें वस्त्रांचें हीनत्व दाखविलें आहे. शरीर सुंदर व सतेज असून वस्त्रालंकारांनीं तें आणखी सजविलें तरी 'अंतरीं नस्तां च्यातुर्यबीज । कदापी शोभा न पवे ॥ २' असा अभिप्राय १८ : ६ मध्यें पहायला सांपडतो. ११ : १० हा समास निःस्पृह-वर्तणुकीच्या वर्णनाचा आहे, तेथें 'वेश पाहतां शाश्वत । येक हि नाहीं ॥ ५' असें सांगून झाल्यावर निःस्पृहाला 'वेषभूषण तें दूषण' । ७' वाटतें, असें म्हटलें आहे.

समर्थांनी उत्तम पुरुषाची कांहीं ठिकाणीं अंतरात्म्याशीं तुलना केली आहे. ती लक्षांत घेतल्याशिवाय संचारशीलता व गुप्तता या दोन गोष्टींचा नीट उलगडा

व्हावयाचा नाहीं. ११:६ या समासांतील 'महत लक्षणां'त अंतरात्मा ज्याप्रमाणें सर्वोठायीं असतो, परंतु पाहूं गेल्यास कुठेंच आढळत नाहीं, 'न दिसोन वर्तवीतसे। प्राणी मात्रांसीं ॥ १५' त्याप्रमाणें महंताचा व्यवहार असल्याचें समर्थांचें वचन आहे. ११ : १० मध्यें हीच माहिती 'ऐसें (अंतरात्म्याप्रमाणें) महंतें असावें। सर्व सार शोधून घ्यावें। पाहों जातां न संपडावें। येकायेकी ॥ ४' या ओवींत आलेली आहे. याच संदर्भात 'वेश पाहातां शाश्वत। येक हि नाहीं ॥ ५' हा वेशाचा विचार गोवलेला आहे. 'उदंड समुदाये करावे। परी गुप्तरूपें ॥ १८' या वचनांतील 'गुप्तरूपें' शब्द कोणत्या उद्देशानें योजलेले आहेत, याचा बोध अंतरात्म्याची तुलना न विसरल्यास किंवा मुद्दाम दृष्टीआड न केल्यास असंदिग्ध आहे.

पारमार्थिक दृष्ट्या अज्ञ असलेल्या लोकांना तत्त्वज्ञान शिकवून शहाणें करावें, भगवद्भजन वाढवावें, हें समर्थांचें ध्येय त्यांच्या ग्रंथांतून तत्त्वज्ञानाच्या विवरणासह वारंवार उत्कटपणानें प्रगट झालेलें आहे. उत्तम पुरुषानें हीनादीनाच्या वेषांत हिंडावें, लोकांची परीक्षा करून जे योग्य दिसतील त्यांची भेट व मैत्री साधावी, ती टिकवावी; पण हें सारें कशाकरितां, तर उपासना, भगवद्भजन वाढविण्याकरितां. समर्थांच्या या हृद्गताविषयीं त्यांच्या शिकवणीचा अभ्यास करणारांना शंका बाळगण्याचें कारण नाहीं. लोकशिक्षणाचें प्रिय कार्य साधण्यासाठीं जी युक्ति समर्थांनीं सांगितली आहे तिची चर्चा येथें करणें अवश्य आहे. उत्तम पुरुषाच्या गुणांचा व कर्तव्यांचा परिचय जिज्ञासूंना सत्त्वगुण, सद्विद्या, उत्तम पुरुष, चातुर्य, राजकारण, सदेव, प्रत्यय, निःस्पृहव्याप, निःस्पृह वर्तणूक, साधक, सिद्ध इत्यादि नांवांच्या समासांच्या द्वारें होऊं शकेल. यांतील कित्येक समासांतून व्यवहारकुशलतेच्या अंगोपांगांचें निदर्शन आहे तर कित्येकांतून लोकांना बिथरूं न देतां त्यांस शिकवून शहाणे करण्याच्या युक्तीवर भर दिलेला आहे. भगवद्भजन लोकांत अखंड चालण्याकरितां संघटना पाहिजे. संघटनेलाच समर्थांनीं 'समुदाय' म्हटलें आहे. समुदाय सदैव दृढ राखण्याकरितां जी व्यवहारचतुरता पाहिजे तिला समर्थांच्या विचारसरणींत निराळें स्वतंत्र स्थान आहे.

या समुदायरक्षणचातुरीला त्यांनीं 'राजकारण' हें नांव दिलें आहे. उत्तम पुरुषाचे बरेच गुण भगवद्गीता व भागवत पुराण यांतील भक्तांच्या गुणांशीं तंतोतंत जुळणारे आहेत. कुविद्येच्या विवेचनाचा 'दंभो दर्पोऽभिमानश्च' हा

गीताश्लोक मुख्य आधार आहे. दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, पारुष्य (कठोरपणा), अज्ञान हे दुर्गुण कुविद्येच्या माणसांत आढळतात, तेव्हां त्यांचा अभाव आणि दया, क्षमा, शांति, विवेक, वैराग्य, नम्रता, हृदयाची व वाणीची मृदुमधुरता, उपकार-वृत्ति, ज्ञान, एकान्ताची आवड, ग्रंथाभ्यास इत्यादि गुण उत्तम पुरुषांत दिसावे, हें सरळ आहे. भागवत एकादश स्कंधाच्या ११ व्या अध्यायांतील २९–३१ या तीन श्लोकांत जे सत्तावीस गुण दाखविले आहेत, त्यांचा अनुवाद दासबोधांत आहे. तेथें 'अप्रमत्त' या नांवाचा जो गुण दिसतो तो दासबोधांत व अन्यत्र 'सावधान' या शब्दानें स्पष्ट केला आहे. 'अप्रमत्त' म्हणजे गाफील नसणें, खबर-दार असणें, अर्थात् सावध असणें. 'कल्प' या नांवाच्या गुणाची व्याख्या 'परबोधने दक्षः' अशी दृष्टीस पडते. दुसऱ्याला शिकविण्यांत दक्ष हा 'कल्प' शब्दाचा अर्थ स्वीकारून समर्थांनीं प्रबोध हा शब्द वापरला आहे. या स्पष्टीकरणानें उत्तम पुरुषाच्या गुणाची अटकळ करतां येईल. जे सद्‌गुण येथें सांगितले त्यांची केवळ परमार्थामध्येंच आवश्यकता असते व प्रपंचांत नसते, असा प्रकार नाहीं. प्रपंच नेटका करावयाचा तर परमार्थाच्या गुणांनींच तो होईल, हें ध्यानांत घेऊन १२ : १ मध्यें 'आधीं प्रपंच करावा नेटका' असें बजावून मग प्रपंच व् परमार्थ हे दोन्ही चालवील तो विवेकी अशी समर्थांनीं परमार्थाची सांगड घातली आहे. प्रपंचासह परमार्थ कदाचित् थोडा फार साधणें शक्य असलें तरी 'प्रपंचत्यागें सर्व सांग । परमार्थ घडे ॥ १२ : ७ : ९' याप्रमाणें प्रपंच व परमार्थ यांचा भेद दर्शविला आहे. समर्थ प्रपंचाविषयीं तिरस्कार बाळगीत नव्हते, या समजुतीची हकालपट्टी करणारीं समर्थांचीं वचनें दासबोधांतून हवीं तेवढीं काढतां येतील. समर्थांचा उत्तम पुरुष प्रापंचिक नाहीं. तथापि पारमार्थिक दृष्ट्या लोकांना शहाणे करण्याचा भार त्यावर होता. हें लोकशिक्षणाचें कार्य त्यानें कसें करावें याची माहिती येथें द्यावयाची आहे.

१३ : १० हा समास शिकवणीचा आहे. शहाणपणाच्या वागणुकीनें सगळे लोक राजी राखून हळुहळू पुण्यश्लोक करीत जावें (२३), हें कर्तव्य निदर्शनास आणून समर्थांनीं लहान मुलांचा दाखला घेतला आहे. मुलांच्या संतोषाकरितां वडील माणसें मुलांच्या चालीनें चालतात, मुलांचें मनोगत ओळखून त्या अनुरोधानें बोलतात. लोकांना शिकवितांना तसेंच वागावें लागतें. 'तैसें जनास सिकवावें । हळुहळु ॥ २४'. मुख्य मनोगत राखणें हें चातुर्याचें एक महत्त्वाचें लक्षण आहे (२५). वेड्याला सुद्धां

वेडा असें म्हणून हिणवूं नये. खरें पाहिल्यास कुणाचें कोणतेंच वर्म बोलूं नये, उलट प्राणिमात्राचें अंतरंग होऊन जावें (२६). शेवटीं समस्त मनोगत राखील तो मोठा महंत. मनोगत राखल्यानें प्रत्येक जग आपल्याकडे ओढला जातो (२९). वेड्यास वेडें न म्हटलें, कुणाचें वर्म उघडकीस न आणलें तर लाभ कोणता? निःस्पृहाचा दिग्विजय हा विलक्षण लाभ समर्थांनीं सांगितला आहे. जें तत्त्व एकदां मुलांच्या दाखल्यानें स्पष्ट केलें तेंच १५ : ६ मध्यें 'दुसऱ्याचे चालणीं चालावें। दुसऱ्याचे बोलणीं बोलावें। दुसऱ्याचे मनोगतें जावें। मिळोनियां ॥ १७' याप्रमाणें मांडलें आहे. 'आधीं अंतर हातीं घ्यावें। मग हळुहळु उकलावें। नाना उपायें न्यावें। परलोकासी ॥ १९'. लोकांचें मनोगत बिनचूक जाणून परमार्थाचें ज्ञान मिळवितांना तें बुजणार नाहीं, बिथरणार नाहीं, इतक्या बेतानें लोकांना शिकवावें, शहाणें करावें, असा या विवेचनाचा मथितार्थ आहे. १२ : १० मध्यें प्रबोधशक्तीच्या संदर्भांत 'बहुतांचें मनोगत हातीं। घेतलें पाहिजे ॥ ३७' या वचनाचा पूर्वोक्त मथितार्थाला दुजोरा आहे. 'मानत मानत शिकवावे। हळुहळु सेवटा न्यावे। विवेकानें ॥ ४१' यांत असाच अर्थ आहे.

जें शिकवायचें तें अनुभवसिद्ध—प्रत्ययाचें किंवा प्रचीतीचें असावें, हा प्रबोध-शक्तीचा दुसरा घटक आहे. लोकांना मान्य आहे, लोकांत रूढ आहे एवढ्या-करितां एखाद्या मताचा अंगीकार करणें समर्थांना प्रशस्त वाटत नव्हतें. 'लोक-धाटी' या शब्दानें समर्थांनीं हा प्रकार व्यक्त केला आहे. दुसरा प्रकार शास्त्रांचा आहे. शास्त्रांत आहे म्हणून एखादी गोष्ट स्वीकारायची, या स्थितीबद्दल समर्थांच्या विचारसरणींत आदर दिसत नाहीं. शास्त्र असो, गुरूचा उपदेश असो, किंवा लोक-मान्य परंपरा असो, स्वतःच्या अनुभवाशीं जर त्यांची एकवाक्यता झाली तरच त्यांचा मान राखावयाचा, असा समर्थांच्या विवेचनाचा रोख आहे. या रोखाचे पुरावे, तत्त्वतः सर्वांना सारखें लेखणें योग्य असलें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत भेदबुद्धीनें —तरतमभावानें वागणें अवश्य या मताच्या समर्थनांत दिसून येतात. ९ : १०, १३ : १०, आणि १७ : ४ मध्यें हें समर्थन ग्रथित आहे. एकदां मुख्य खऱ्या 'अंतरात्मा' देवाला डावलून इतर दैवतांना भजणारांचा भ्रम दूर करण्यासाठीं हा विषय आलेला असून दुसऱ्या वेळीं निंद्य वंद्य, उत्तम कनिष्ठ यांना समतेनें वागविण्यांतील चूक दाखविण्याकरितां भेदभावाच्या अपरिहार्यतेची चर्चा केली

आहे. 'सर्व ब्रह्म' हा समज उराशीं बाळगून 'एकंकार' माजविणारांवर कोरडे ओढण्याच्या हेतूनें तिसऱ्या वेळीं 'भेद ईश्वर करून गेला । त्याच्या बाचेन न वचे मोडिला । मुखामधें घांस घातला । तो अपानीं घालावा ॥ २७' याप्रमाणें कडक शब्द वापरले आहेत. हाच विचार मानपंचकाच्या दुसऱ्या मानांत पहायला सांपडतो : 'भेदाभेदक्रिया देहीं । लागली हे सुटेचिना । जेथील विषयो तेथें । विपरीत करितां नये ॥ १४ मुखें चि सेवितां आन्नें । आपानीं घालितां नये । अन्याय करिती तैसा । समान मानिती जनीं ॥ १५'. भेदाभेदाच्या तरफदारांतील समर्थांची अनुभवनिष्ठ तार्किकता पटविण्याकरितां हें एक उदाहरण येथें घेतलें आहे.

समर्थांच्या काळीं लोकांना शिकविण्याचा कथाप्रवचन हा एकच मार्ग होता. निवडक शिष्यांना समर्थ कदाचित् आपल्याजवळ एकान्तीं बसवून स्वतंत्रपणें आपले विचार शिकवीत असतील. शिकविलेले विचार शिष्यांच्या बुद्धींत पक्के ठसावे आणि इतरांना त्यांचें ज्ञान व्हावें यासाठीं त्यांनीं वाङ्मय निर्माण केलें, परंतु मुळांत त्या वाङ्मयाचें स्वरूप गुरु-शिष्यांच्या किंवा वक्त्या-श्रोत्यांच्या संवादाचें आहे. गुरु-शिष्यांतील संवादानें मोठ्या समाजाचें कार्य होणार नाहीं, म्हणून समर्थांनीं आपल्या उपदेशांत समुदाय उभारण्याचा हेतु अनेकदां उघडकीस आणला आहे. समुदाय म्हणजे कसल्या तरी अकल्पित निमित्तानें सहज एकत्र गोळा होणाऱ्या व निमित्त संपल्यावर पांगून आपापल्या ठिकाणीं जाणाऱ्या माणसांचा जमाव नव्हे. अनेक व्यक्ती एका उद्देशानें व जुटीनें आपल्या नेत्याची किंवा गुरूची विचारसरणी ऐकण्यासाठीं व अंमलांत आणण्यासाठीं स्नेहाच्या, सहकाराच्या भावनेनें, पुनः पुनः ठरल्या वेळीं ठरल्या स्थळीं एकत्र येतात, तेव्हां त्या व्यक्तींच्या जमावाला समुदाय हा शब्द औचित्यानें लावतां येतो. समुदायाच्या ठिकाणीं जूट व शिस्त या दोन गुणांचें अस्तित्व प्राबल्यानें पाहिजे. संप्रदाय, पक्ष, हे शब्द जुटीच्या, शिस्तीच्या व एका ध्येयाच्या समुदायाचेच पर्याय होत. सभा, फड, मंडळें, मंडळ्या, मज्यालस या शब्दांचा समर्थ समुदायाच्या अर्थानें उपयोग करतात. मठ हें पारमार्थिक समुदायाच्या कार्याचें केंद्र असल्यामुळें त्याचाहि निर्देश समुदाय संभाळण्याच्या विवरणांत आढळतो.

समुदायासंबंधांत नेत्याला, पुढाऱ्याला लोक राजी राखणाऱ्या वागणुकीचीं जीं अनेक पथ्यें पाळावीं लागतात, त्यांची माहिती उत्तम पुरुष, महंत, निःस्पृह, सदेव,

चातुर्य, राजकारण, शिकवण इत्यादि नांवांच्या समासांतून दासबोधांत दिलेली आहे. हीं पथ्यें पाळण्याची शक्ति नसणारानें महंतीच्या पुढारीपणाच्या भानगडींत पडूं नये, हा अभिप्राय समर्थांनीं १७:४, १८:५, १८:१०, १९:७ व ८ या समासांतून व्यक्त केला आहे. वक्त्याचे गुणदोष चर्चेला घेऊन यांपैकीं पहिल्या समासांत 'जें जें सूक्ष्म नाम घ्यावें। त्याचें रूप बिंबऊन द्यावें। तरी च वक्ता म्हणवावें। विचारवंत ॥ १७:४:६' अशी वक्त्याची व्याख्या केली आहे. लोक आपलेसे करून एकत्र जमविण्याचें वक्तृत्व हेंच एक महत्त्वाचें साधन समर्थांच्या काळीं होतें व आतांहि आहे. श्रोत्याचें सर्व प्रकारें समाधान करणारें व सारासार-विवेकाचें वक्तृत्व पाहिजे, असा त्या समासाचा इत्यर्थ आहे.. ज्या वक्त्यामध्यें श्रोत्याची नीट समजूत घालण्याचें कौशल्य नाहीं, (१८:५) 'तेथें अवघी कुसमुस। पुसों जातां वसवस। वक्ता करी ॥ ६'. अनेक वक्ते सपाटून बडबड करतात, शब्दांचा त्यांच्यापाशीं तोटा नसतो, परंतु अनुभवाच्या कसोटीवर ते शब्द पोकळ टरले तर फडप्रसंगीं 'ते अवघे चि वेर्थ गेले' (७). सारांश, वक्ता आपली प्रतिष्ठा गमावतो. 'वक्ता अधिकारेंवीण। वगत्रृत्वाचा करी सीण।' (२:१०:११) असा अनुभव येतो. वक्तृत्वाचा अधिकार क्षुद्राला झेपणारा नाहीं. 'वक्ता पाहिजे साचार। अनुभवाचा ॥' (४:२:२४). 'संशयछेदक विशाळ वक्ता' असें सद्विद्येच्या विवेचनांत वक्त्याचें वर्णन आहे. 'जेथें निश्चयाच्या नांवें। सुन्याकार' तें वक्तृत्व नको (७:९:३). १८:५ या समासाचें नांवच 'करंटपरीक्षानिरूपण' हें असल्यामुळें तेथील वक्तेपणाचा जास्त खल करण्याची गरज नाहीं. १८:१० मध्यें श्रोत्याच्या दुर्गुणाचे परिणाम सांगितले आहेत, पण शेवटीं श्रोत्याच्या मूर्खपणानें मज्यालसीचा चिवडा होऊं लागल्यास शहाणीं माणसें मज्यालस कशी सावरून निभावून नेतात याचें दिग्दर्शन आहे. १९:७ मध्यें ज्याला लोक संभाळतां येत नाहींत 'त्यास महंती कामा नये। १५' असें समर्थांचें स्वच्छ सांगणें आहे. अभ्यास खोल व भक्कम असेल तर लोकांत प्रगट व्हावें; 'प्रगट होऊन नासावें। हें बरें नव्हे ॥ १७'. १९:८ मध्यें कच्च्या महंतीचा विषय घेतला असून समुदाय टिकविणाऱ्या यशस्वी उपायांचें वर्णन १९:९ मध्यें आहे. त्यामध्यें 'जशास तसें' हा न्याय अंमलांत आणण्याचा उपदेश पाहून पुष्कळदां तो न्याय परमार्थाकरितां नसून राजनैतिक व्यवहाराशीं त्याचा संबंध असावा—नव्हे आहेच, असें प्रतिपादन मोठ्या आग्रहानें

केलें जातें. संघटना एका कुटुंबाची असो, मोक्षप्राप्तीच्या ध्येयाची असो, वा राज्यकारभाराची असो, संघटना या नात्यानें तिच्या मजबुतीसाठीं अवश्य असणाऱ्या उपायांचें स्वरूप ध्येयानुसार फारसें बदलत नाहीं. १९ : ९ या समासांत 'जशास तसें' किंवा 'अरे तर का रे' या न्यायाची कांस धरून 'मज्यालस' रंगवावी असें सांगणारे समर्थ इतर ठिकाणीं दुष्टानष्टाशीं गांठ पडली व तो सुधारण्याची आशा उरली नाहीं तर आपण त्याचा संपर्क टाळावा, असेंहि सुचवितात, हें 'जशास तसें' यावर जोर देतांना नजरेआड न करणें बरें. जुन्या दासबोधाचा तिसरा समास श्रोता-वक्ता हा विषय समजण्याकरितां जिज्ञासूंनीं नजरेखालीं घालावा.

उत्तम पुरुषाच्या कर्तव्यांत समर्थांनीं हरिकथा-निरूपणाचा उल्लेख अनेकदां केला आहे. 'सगुणकथा या नांव कीर्तन । अद्वैत म्हणिजे निरूपण ।' (४ : २ : २३) याप्रमाणें त्यांनीं कीर्तन-निरूपणाची व्याख्या दिलेली असून या दोन्ही प्रकारांना वक्तृत्व हाच मुख्य आधार आहे. निरूपणाचें दासबोधांत स्वतंत्र विवेचन नाहीं, पण कथाकीर्तनाची चर्चा त्रिवार आली आहे. चौथ्या दशकाच्या दुसऱ्या समासांत नवविधा भक्तीपैकीं दुसऱ्या भक्तीचें—कीर्तनाचें—माहात्म्य सांगावें लागलें. कीर्तन रंगण्याकरितां कीर्तनकारापाशीं कोणती सामुग्री सज्ज पाहिजे, हें दाखविल्यावर 'नाना नवरसिक शृंघारिक । (१५)' असा शृंगाराचा निर्देश असला तरी दुसरीकडे शृंगारिकाचा समर्थांनीं अनेकदां निषेध सुचविला आहे. पढतमूर्खांच्या लक्षणांत 'वर्णी स्त्रियांचे आवेव । नाना नाटकें हावभाव ।' (२ : १० : १९) असें लक्षण नमूद आहे. 'विनोदार्थीं भरे मन । शृंघारिक करी गायेन' ही रजोगुणांची खूण आहे (२ : ५ : २४). १४ : ३ हा कवित्वकलेचा समास असून 'धीटपाठ' नांवाच्या हीन कवित्वांत 'कामिक रसिक शृंघारिक । ११' यांचा समावेश आढळतो. यापूर्वीं १३ : ७ मध्यें अंतरात्म्याच्या अधोगतीला 'नवरसिक अर्थ' (१६) कारणीभूत होऊं शकतो, असें म्हटलें आहे. शृंगारिक म्हणजे स्त्रियादिकांचें कौतुक; तें कीर्तनांत आणल्यास 'धारिष्टापासून श्रोता । चळे तत्काळ ॥' (१४ : ५ : २२) हा एक परिणाम घडतो, परंतु कीर्तनकारदेखील ईश्वराला मुकतो, हा दुसरा परिणाम समर्थांनीं स्पष्टपणें उघडकीस आणलेला आहे. स्त्रियांच्या वर्णनाचा विषय टाळण्याच्या कर्तव्याबरोबरच गायनादि कलेच्या आहारीं न जाण्याचें पथ्य कीर्तनकारानें पाळणें अवश्य असल्याबद्दल समर्थांचा उपदेश १४ : ५ मध्यें आहे. श्रीरामदासकृत लघुकाव्यें

यांतील पंचसमासी ४ : ९, एकवीससमासी १२ : ४८–५३ मध्यें शृंगारिकाच। त्याग सांगितला आहे. समर्थांनीं शृंगारिकाला वाणीच्या कार्याबाहेर ढकलून एक प्रकारें आपल्या ब्रह्मचर्यव्रताची सर्वांगीणता पटविली आहे. द्रव्याच्या आशेनें कीर्तन करूं नये व कीर्तनांत नरस्तुति नसावी असे समर्थांचे आणखी दोन कीर्तनविषयक दंडक आहेत. कीर्तनाच्या विचारांत समाजाची योग्यता पाहून त्याप्रमाणें सगुणाचें किंवा निर्गुणाचें कीर्तन वा निरूपण करण्याबद्दल समर्थांची सूचना आहे.

देश, काळ, प्रसंग, वर्तमान पाहून पारखून वागण्याचा शहाणपणा कर्त्या माणसांत असल्याशिवाय त्याला व त्याच्या कामगिरीला मोल चढत नाहीं, असें समर्थांच्या शिकवणींतील एक महत्त्वाचें अंग आहे. कीर्तनाच्या विवेचनांतील कांहीं सूचनांकडे दृष्टिक्षेप केल्यास त्याचें स्वरूप लक्षांत येईल. कीर्तनांत लोकांना काय शिकवावें, याचा विचार ४ : २ मध्यें सविस्तर असून श्रोत्यांची योग्यता लक्षांत घेऊन त्या योग्यतेला झेपणारें कीर्तन करण्याचा विषय १४ : ५ मध्यें स्पष्ट केला आहे. पुढें देवाची मूर्ति असतां निर्गुण कथा करूं नये; असें जर कोणी करील तो पढतमूर्ख समजावा (१०). सगुण मूर्ति पुढें नसेल तर अद्वैताचें निरूपण अवश्य करावें (१९) मूर्ति नाहीं व समोरचे श्रोते अद्वैत समजण्याइतके अनुभवी जाणते नाहींत, केवळ भाविक आहेत, अशा वेळीं पश्चात्तापयुक्त वैराग्य उत्पन्न होईल, असें कीर्तन करावें. १८:३ मध्यें प्रसंगज्ञानानें आनंद निर्माण होतो असें सांगून कोणत्या प्रसंगीं काय म्हणावें हें नीट ध्यानांत आणावें, नाहींतर फुकट शीण भोगण्याची पाळी येईल, याप्रमाणें खुलासा केला आहे. दुसऱ्याचें अंतर जाणून तेथें ज्याची आस्था आदर दिसेल तें म्हणावें, 'जें आठवेल तें गावें । हें मूर्खपण ॥ १६'; आपल्या उपासनेला धरून गावें, उपासनेसंबंधांत चूक होऊं देऊं नये; याप्रमाणें समर्थांचें हृद्गत व्यक्त झालें आहे. कारण 'ज्याची उपासना जैसी । त्यासी प्रीति वाटे तैसी । तेथें वर्णितां दुजयासी । प्रशस्त न वटे ॥ १०' ही ओवी ७:९ मधील आहे. या समासांत 'जेथील तेथें चि गोड' हा संकेत बऱ्याच ओव्यांतून उघड केलेला आहे. कीर्तनांत 'न बोलावे गुण दोष । पुढिलांचे कदा ॥ १४:५:१४' हा नियम पाळणें समर्थांच्या मतें अवश्य आहे.

उत्तम पुरुषाला लिहितांवाचतां आलें पाहिजे. समर्थांना कुठलीहि गोष्ट अर्धवट, शिथिल किंवा मळमळीत असल्यास पसंत पडणारी नव्हती. उत्तम पुरुषाची

प्रत्येक गोष्ट सुंदर, भव्य, उत्कट असावी (१९ : ६), अशी त्यांची ध्येयदृष्टि असल्यामुळें ११ : ६ मध्यें 'अक्षर सुंदर वाचणें सुंदर। बोलणें सुंदर चालणें सुंदर' असें त्यांनीं म्हटलें आहे. लिहिण्यासंबंधांत त्यांनीं एक 'लेखनक्रिया' नांवाचा स्वतंत्र समासच (१९ : १) दासबोधांत दाखल केला आहे. लेखनवाचनाच्या अभावाचें दैन्य समर्थांच्या स्फुट कवितेमध्यें किती तरी वेळां आलेलें आहे. वाचनाच्या निमित्तानें त्यांनीं मूर्ख लक्षणांच्या शेवटीं अक्षरें गाळून किंवा पदरचीं घालून वाचण्याचा दोष (२ : १ : ७०) निदर्शनास आणला आहे. 'चपळ शुद्ध वाचूं जाणें' हा वाचनाचा गुण १९ : ४ : ३ मध्यें सांगितला आहे. पुनः एकदां १९ : ६ मध्यें 'अक्षर बरें वाचणें बरें। अर्थांतर सांगणें बरें। गाणें नाचणें अवघें चि बरें। पाटांतर ॥ १६'. पाठांतर हा वाचण्याचा एक प्रकार असून त्याचाहि निर्देश समर्थांनीं अनेकवार केला आहे. मात्र पाठांतर म्हणजे अर्थज्ञानावांचून घोकंपट्टी असेल तर तसलें पाठांतर समर्थांना मुळींच संमत नाहीं. 'अर्थेवीण पाठ कासया करावें। वेर्थ कां मरावें घोकुनिया' हा प्रसिद्ध अभंग अर्थशून्य पाठांतरासंबंधांतील समर्थांच्या दृष्टीची ओळख पटविणारा आहे.

उत्तम पुरुषाच्या विचारांत जाणतेपणा व प्रयत्न (साक्षेप) या दोन गुणांचें विशेष महत्त्व आहे. जाणतेपणाचा अर्थ केवळ प्रपंच-व्यवहारांतील सर्व तऱ्हेची बिनचूक माहिती असणें असा नाहीं. जाणतेपणाचा संबंध ब्रह्मज्ञानाशीं आहे. प्रपंचाची किंवा लोकव्यवहारांची खडान्‌खडा माहिती नसावी असें समर्थ सांगत नाहींत. उलट 'श्रवणा'च्या एका समासांत (४ : १) अशा माहितीचा जास्तींत जास्त तपशील त्यांनीं ग्रथित केलेला आहे. परंतु या माहितीला ते जाणतेपण किंवा ज्ञान म्हणत नाहींत याची कल्पना ५ : ५ या समासावरून येण्याला हरकत नाहीं. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान हा समर्थांचा निश्चित अर्थ असला तरी इतर प्रापंचिक अथवा व्यावहारिक ज्ञानाचा त्यांना अनादर नव्हता, हें ज्ञानी माणसांचे, त्याच्या माहितीचें स्वरूप लक्षांत घेऊन जे त्यांनीं उत्तम, मध्यम, अधम असे भेद मानले आहेत त्यावरून लक्षांत येईल (स्फुट प्रकरण ४०). तेथें जाणत्याला देव म्हटलें आहे. जाणत्याची निर्भयता 'जाणतां भय तुटलें' या पालुपदाच्या प्रकरणांत पहायला सांपडते (स्फुट प्रकरण १२). 'धन्य ते जाणते गुणी' या पालुपदाचें प्रकरण (स्फुट प्रकरण ४९) या संदर्भांत नजरेखालीं घालण्यासारखें आहे. 'वन्हि तो चेतवावा रे' या प्रकरणांत

(स्फुट प्रकरण ३०) देवदैत्यांचे अनुक्रमें जे गुणदोष उघड केले आहेत. त्यांत यत्न, साक्षेप, न्याय, सावधपणा, इत्यादि गुणांना देव आणि त्या गुणांच्या पुरुषांना देवाचे अंश या संज्ञेनें गौरवून त्या गुणांच्या अभावाची किंवा विरोधी दोषांची दैत्य या शब्दानें संभावना केली आहे. ब्रह्मज्ञ किंवा आत्मज्ञानी पुरुषाला जगाच्या बाजारांत राहूनच आपला परमार्थप्रसाराचा उद्योग करावयाचा असल्यामुळें, या बाबतींत सर्व प्रकारच्या भल्याबुऱ्या हालचालींची माहिती आपल्या बुद्धीच्या व्यापारांत सांठविल्याखेरीज गत्यंतर नाहीं, याविषयीं समर्थांची खात्री होती. त्यांचा 'जाणता' कसा होता, याची अटकळ १८ : २ या समासावरून होण्याला हरकत नाहीं. त्या समासांत जाणत्याचें औषध घ्यावें, तो सांगेल तें पथ्य करावें; जाणत्यापाशीं तालीम करावी, पोहणें शिकावें, असा उपदेश आहे. व तो समर्थांचा जाणता केवळ विदेही, ब्रह्मज्ञ, सहिष्णु, उदार इत्यादि गुणांचा नसतो, तर तो वैद्यक, कुस्ती, मल्लखांब, पोहणें या विद्याकलांतहि निपुण असल्याचें दिसून येईल. जाणत्याच्या उलट नेणता कसा असतो याची थोडीशी ओळख ९ : ४ समासांत करून दिलेली आहे. या समासाचें नांव 'जाणपण' असें आहे. साध्या व्यवहारांत योग्य रीतीनें वागण्याची अक्कल नसेल तर 'सगट बायेका सिव्या देती। सांदीस पडिला ऐसें म्हणती। मूर्ख-पणाची प्राप्ती। ठाकून आली ॥ (१५ : ३ : २२)' याप्रमाणें दुर्दशा भोगावी लागते. शहाणपणा माणसाला हवा असेल तर बहुतांचे कष्ट करावे लागतात. त्या योगानें मनुष्य बहुमान्य होतो आणि बहुमान्यता ही शहाणपण असल्याची खूण समजावी असें पुढें सांगितलें आहे.

प्रयत्न, उद्योग यांची महती समर्थांना स्वानुभवानें पटलेली होती. आळस, दुश्चीति, झोप यांचा निषेध प्रयत्नाच्या पुरस्कारार्थ वारंवार केलेला आहे. प्रयत्नवादाच्या आड येणाऱ्या प्रारब्धाची कल्पना त्यांना आलस्यादि दोषांइतकीच निषिद्ध वाटत होती. रोग झाल्यास प्रारब्धानें तो झाला असें समजून औषधोपचारांची खटपट माणसानें सोडली असती तर माणसाचा खरोखरीच प्रारब्धावर विश्वास आहे असें म्हणतां आलें असतें, परंतु ज्याअर्थीं मनुष्य रोगाच्या प्रतिकाराचे उपाय अंमलांत आणतो त्याअर्थीं प्रारब्धासंबंधाची त्याची कुरकुर खोटी, असा युक्तिवाद लढवून समर्थांनीं प्रारब्धाहून प्रयत्न श्रेष्ठ असा सिद्धांत मांडला आहे. ओव्या शतकांतील १२ व्या शतकाचें नांव रामदासी संशोधनाच्या बाडांक ४४९ मध्यें प्रारब्ध प्रयत्न-वाद

असें दिलेलें आहे. पहिल्या ७५ ओव्यांत प्रारब्ध व प्रयत्न यांचा झगडा वर्णिला असून ७६ व्या ओवींत आधीं कोण उत्पन्न झालें, प्रारब्ध कीं प्रयत्न, असा प्रश्न उपस्थित करून समर्थ सृष्टीच्या इतिहासांत शिरले आहेत. ब्रह्म, मूळ माया, गुणमाया, त्रिगुण, पंचमहाभूतें या परंपरेंत प्रारब्धाला जागा नाहीं. पंचमहाभूतांपैकीं पृथ्वीचा प्रादुर्भाव झाल्यावर 'प्रगटलें अन्न प्रगटलें रेत । तेथुनी जीवित्व पुरुषाचें ॥ ८५'. ब्रह्मांत जें अहंस्फुरणचांचल्य उद्भवलें तें प्रयत्नाचें रूप आहे. 'आहे निराकार निर्मळ निश्चळ । तेथुनी चंचळ प्रेत्न जाला ॥ ९२' हा प्रकार लक्षांत बाळगल्यास 'प्रेत्न जाला आधीं म्हणोनिया थोर ।' ही खूणगांठ समजायला कठिण नाहीं. 'ऐलीकडे कर्म पाहातां भूतळीं । प्रेत्न अंतराळीं मुळारंभ ॥ ९४' अशी प्रयत्नाची थोरवी आहे. याच इतिहासाला धरून समर्थांनीं 'येत्न तो देव जाणावा' असा विश्वास दुसऱ्या ठिकाणीं ग्रथित केलेला आहे. समर्थांचा उत्तम पुरुष हा देवाचा अंश असल्यामुळें तो उत्कट, दीर्घ, दृढ व अखंड प्रयत्नाचा अवतार असावा, यांत अतिशयोक्ति नाहीं.

समुदाय निर्माण केल्यावर तो ज्या ध्येयानिमित्त निर्माण केला असेल त्या ध्येयासंबंधांत तो समुदाय अनन्य एकनिष्ठ, अव्यभिचारी वृत्तीचा रहावा म्हणून कोणतें धोरण समुदायाच्या चालकानें बाळगलें पाहिजे व लोकांना परमार्थज्ञान देण्यासाठीं कोणते उपाय अंमलांत आणले पाहिजेत याच्या विवेचनाकरितां जे समास समर्थांनीं वेळोवेळीं रचले, त्यांना राजकारण, चातुर्य, बुद्धिवाद, यत्नशिकवण, प्रत्यय, उपाधि, विवेक इत्यादि नांवें दिलेलीं आहेत. ११ : ५ हा राजकारण नांवाचा दासबोधांतील पहिला समास आहे. समुदाय अनन्य रहाण्याकरितां सांगितलेल्या उपायांत 'मुख्य हरिकथानिरूपण । दुसरें तें राजकारण । तिसरें तें सावधपण । सर्वविषईं ॥ ४ चौथा अत्यंत साक्षप । फेडावे नाना आक्षप । ५' याप्रमाणें क्रमांकाच्या निर्देशासह एकूण चार उपाय सुचविले आहेत. या समासांत पांच वेळां 'राजकारण' शब्द आला असून शेवटीं २५ व्या ओवींत 'ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । चातुर्याचीं ॥' या शब्दांनीं त्याचा समारोप केला आहे. या समासांत क्षमावृत्ति, परांतरज्ञान, उदासीनता, नीतिन्यायाचें रक्षण, लोकांना वेध लावून बोध करणें, दुर्जन ओळखून उपकारानें त्यांची बोळवण करणें, फड विघडूं न देणें, समुदायाचें बरें-वाईट सोसणें वगैरे कर्तव्यांचा समावेश आहे. त्यानंतरचा ११ : ६ हा समास महंतलक्षणाचा असून त्यांत कांहीं पूर्वीचीं व कांहीं नवीं कर्तव्यें सांगितलेलीं आहेत. ११ : १० या समासाचें

नांव 'निःस्पृहवर्तणूक' असून त्यामध्यें 'उदंड समुदाये करावे परी गुप्तरूपें ॥ १८' या आकांक्षेचा उच्चार आहे. यांत आणखी एकदां पूर्वीच्या कर्तव्यांचा संग्रह आढळतो. समुदायांतील व्यक्तींची योग्यता-अधिकार पाहून त्यांकडे त्यांस झेपणारीं कामें द्यावीं, साक्षेप पाहून विश्वास धरावा, तरीसुद्धां आपलें म्हणून कांहीं निराळें राखून ठेवलें पाहिजे, 'आपला मगज राखणें । कांहीं तरी ॥ २३' इत्यादि तपशील जास्त आहे. १२ : १० मधील उत्तम पुरुषाच्या वर्णनांत महानुभावानें आपल्या मागें देवाचा महोत्सव चालण्यासाठीं समुदाय करावा (३२–३४), असा आशय असून प्रबोधशक्तीचीं लक्षणें या अनुसंधानांत गोविलीं आहेत. १९ : ९ या समासाचें नांव 'राजकारण' असून त्यांत समुदाय बळकट राखण्याचाच उपदेश आहे. हा समुदाय हरिकथानिरूपणाचा असल्याच्या तीन खुणा या समासांत आहेत. २२ व्या ओवींत समुदायाबरोबर 'मठा'चा उल्लेख आहे व जशास तसा भेटला कीं 'मज्यालस' थाटते–मज्यालसीला रंग चढतो, असें शेवटच्या ओवींत म्हटलें आहे. 'मठ' ही पहिली व 'मज्यालस' ही दुसरी खूण आहे. उत्तम पुरुषानें समुदायाचा हव्यास असेल तर 'अखंड सावकाश एकान्त' स्वीकारावा, एकांतांत तजविजा कळतात, चाळणा निघतात, प्राणिमात्राची स्थितिगति आकलन करतां येते. त्यानें सलगी, विश्रांति, आळस या प्रकारांना आपल्या वर्तनांत थारा देऊं नये. आळसानें कारभार बुडतो व समुदायाचा 'अंतरहेत'–अंतःस्थ हेतु, मुख्य उद्देश वायां जातो; म्हणून 'उदंड उपासनेचीं कामें । लावीत जावीं नित्य नेमें ।' म्हणजे कृत्रिमें (रिकामे उपद्व्याप) करायला फावत नाहीं (८). यांतील 'उपासनेचीं कामें' हे शब्द तिसरी खूण होत. समुदायामागें जर कामामागून कामें लावलेलीं नसतील तर रिकाम्या वेळीं त्यांतील घटकांना उपद्व्यापांत शिरावेसें वाटतें; कृत्रिमें करावींशीं वाटतात; हा समुदायाचा स्वभाव ध्यानांत ठेवून उदंड उपासनेच्या कामांत समुदायाला गुंतवून ठेवण्याचा उपाय समर्थांनीं आपल्या उपदेशांत दाखल केला आहे.

# राजकारण

**दासबोधांत** बऱ्याच वेळां आणि इतर वाङ्मयांत क्वचित् 'राजकारण' हा शब्द आढळतो, म्हणून समर्थांनीं राजकारण (politics) शिकविलें, नव्हे राजकारण केलें, असा एक ठाम ग्रह अलीकडील पन्नास-साठ वर्षांमध्यें विशेष आग्रहानें प्रचलित झालेला आहे. त्या ग्रहाच्या पुरस्कारामागें महाराष्ट्रांतील कित्येक नामवंत व्यक्तींची प्रतिष्ठा आहे. प्रस्तुत ग्रह प्रचलित होण्याचें मुख्य कारण समर्थ-शिवाजीचें गुरु-शिष्यत्व हें असून, शिवाजीमहाराजांना समर्थांनीं स्वराज्यस्थापनेचा मंत्र पढविला या कल्पनेपर्यंत या ग्रहानें एकदां मजल मारली होती. शिवसमर्थांच्या पहिल्या भेटीचें इ. स. १६४९ (शके १५७१) हें वर्ष संशयांत पडण्यापूर्वी या ग्रहाचें प्राबल्य निर्विघ्न होतें. त्या वर्षाची निश्चितता ढासळल्यावर दासबोधादि वाङ्मयांतील राजकारण शब्दापुरतें त्याचें महत्त्व राहिलें. परंतु 'राजकारण' हा शब्द समर्थांनीं ज्या संदर्भांत वापरला आहे, त्या संदर्भाचें निरीक्षण केलें म्हणजे सदर शब्दाचा मानण्यांत येणारा politics हा अर्थ टिकत नाहीं, असें दिसून येतें. राजकारण म्हणजे राजनीति किंवा राज्यविषयक उलाढालीचें शास्त्र नव्हे, असा या शब्दाच्या अर्थासंबंधाचा वाद उपस्थित झाल्यापासून तो उणींपुरीं गेलीं पंचवीस वर्षें थोड्याफार प्रमाणांत चालू आहे. राजकारण म्हणजे politics किंवा राजनीति ठरविणारा पक्ष आपल्या विवेचनासाठीं नवे नवे निरनिराळे पुरावे पुढें ढकलीत असतो. त्यांचा विचार करण्यापूर्वी 'राजकारण' या शब्दाचा अर्थ समर्थांच्या दृष्टीनें कोणता असावा, याची शहानिशा करणें अधिक उपयुक्त आहे.

दासबोधाच्या दोनशें समासांपैकीं एकूण पंधरा समासांत (३ : ९, ९ : ४, ११ : ५ व ६, १२ : २, १५ : २ व ३, १६ : ८, १८ : २ व ६, १९ : ४, ६, ८, ९, १०) राजकारण हा शब्द २७ वेळां आलेला आहे. मानसपूजा प्रकरणाच्या दुसऱ्या समासांतील ६ व्या ओवींत एकदां 'राजकारण' हा शब्द दृष्टीस पडतो. या समासाचा

विषय 'पारपत्य' (कारभार) हा असून पारपत्य करणारांच्या उत्तम गुणांची चर्चा त्यामध्यें आहे. श्रीरामदासांची कविता खंड १ मधील स्फुट कवितेंत चारदां हा शब्द वापरलेला आहे (स्फुट ओव्या १४, स्फुट प्रकरणें ६७, स्फुट श्लोक ४० व ५१). शिवाजी महाराजांस लिहिलेल्या पत्रांत अगदीं शेवटीं 'राजकारण' हा शब्द असून 'राजधर्म' प्रकरणांत तो पुनः एकदां दृष्टीपुढें येतो. सेवकधर्म नामक प्रकरणाच्या दुसऱ्या समासांत प्रारंभीं एकदांच तो पहायला सांपडतो. श्रीरामदासी संशोधन खंड १ मधील ६४ व्या बाडांत हा समास स्वतंत्र समजून त्याला 'राजकारण' हें नांव लावलेलें आहे. (हें बाड २७५ वर्षांचें जुनें, म्हणजे इ. स. १६८० इतकें मागचें, अर्थात् समर्थांच्या हयातींत लिहिलें गेलेलें आहे.) इतरत्र न छापलेल्या परंतु श्रीदासविश्रामधामांत असलेल्या एका अभंगांत 'राजकारण' शब्दाचा उपयोग केलेला आहे. दासबोधांत अवघ्या ११ : ५ व १९ : ९ या दोनच समासांना राजकारण असें नांव दिलें असून बाकीच्या समासांचीं नांवें मृत्युनिरूपण, जाणपण, महंतलक्षण, प्रत्ययनिरूपण, निःस्पृहव्याप, श्रेष्ठ अंतरात्मा, सर्वज्ञसंग, उत्तम पुरुष, सदेवलक्षण, बुद्धिवादनिरूपण, उपाधिलक्षण, विवेकलक्षण, याप्रमाणें आहेत. १९ व्या दशकाच्या एकंदर पांच समासांत राजकारण शब्द वापरलेला आहे. त्यांतील 'राजकारण' नामक (१९ : ९) समासाच्या मागें-पुढें सदेवलक्षण, बुद्धिवाद, उपाधि, या विषयांचे समास असून पुढें विमललक्षणाचा समास आहे. राजकारण हा शब्द किंवा समास कोणत्या परिवारांत आढळतो, हें विचारांत घेतल्याशिवाय त्याचा नेमका अर्थ कोणता, या प्रश्नाचा योग्य निर्णय लागणें कठिण आहे.

समर्थांच्या 'राजकारण' शब्दाची परीक्षा करतांना त्यांच्या वाङ्मयांत येणाऱ्या आणखी दोन शब्दांचें भान सोडून चालत नाहीं. 'राजकी' व 'राजिक' हे ते दोन शब्द होत. १ : १० : ४६ मध्यें 'तस्कर म्हणती आमुचें घर। राजकी म्हणती आमुचें घर।' याप्रमाणें 'राजकी'चा, तर ११ : ३ : ५ मध्यें जन्म निष्फळ करणाऱ्या चिंताममतादि मानसिक अवस्थांच्या माहितींत 'राजिक देविक (दैवी) उदेग (उद्वेग) चिंता' याप्रमाणें 'राजिक' शब्दाचा उपयोग केलेला आहे. श्रीरामदासांची कविता खंड १ मधील स्फुट प्रकरण ५४ मध्यें सोयऱ्याधायऱ्यांच्या एका संवयीबद्दल सांगतांना 'राजकी भोवते येती। तेहि त्यासीच मीळती ॥ १७' —हे सोयरेधायरे राज्यकारभारांतील लोक भोंवतीं आल्यास त्यांना सामील होतात, असें

म्हटलेलें आहे. करुणाष्टकामध्यें ८३ : १७ त 'राजकी' आला आहे. राजकी व राजिक या शब्दांच्या अर्थामध्यें फरक आहे. राजाचीं माणसें, राज्यांतील अधिकारी असा राजकीचा अर्थ आहे. राजिक या शब्दाशीं राज्यकारभाराचा संबंध असला तरी राज्यविषयक घडामोडींतून, धामधुमींतून उद्भवणारी जी चिंता ती 'राजिक' चिंता, असा अर्थ वर दिलेल्या वचनांतून स्पष्ट निघणारा आहे. समर्थांच्या काळीं 'राजिक' शब्द कोणत्या अर्थानें वापरला जात असे, याचा उलगडा होण्यासाटीं शिवकालीन कागदपत्रांतून दोन उदाहरणें येथें सादर केल्यास तीं अनाठायीं ठरणार नाहींत. राजवाडेसंशोधित मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १५ मधील पुढील उताऱ्यांत 'राजिक' शब्द दोनदां लागोपाट आला आहे. 'वणगोजी मुधोजीस मिळोन मुलखामधे राजीक केलें. आणि वनगोजी (नें) मुधोजीस आणून कऱ्हाडीचा कोट त्यास घेऊन दिल्हा. मोठेमोठे सावकार लुटिले. पनाळापावेतो राजीक केलें.' (पान १४)—वणगोजी नांवाच्या इसमानें मुधोजीशीं संगनमत करून मुलखांत बंडाळी आरंभिली. त्यानें कऱ्हाडचा किल्ला मुधोजीच्या ताब्यांत दिला. मोठमोठे सावकार लुटले. पन्हाळ्यापर्यंतच्या मुलुखांत बंडाळी माजविली. सदर उताऱ्याच्या या स्पष्टीकरणांत किल्ले बळकावणें, सावकार लुटणें, हें राजिकाचें स्वरूपहि उघड झालें आहे. एका राज्याची दुसऱ्यावर चढाई, राज्यांतली बंडाळी, यामुळें आपल्यावर संकट कोसळेल ही धास्ती शिव-समर्थकाळीं सगळ्या प्रजेला निरंतर वाटणारी होती. तिलाच 'राजिक' चिंता असें दासबोधांत संबोधलें आहे. येथें दाखल केलेला उतारा प्रत्यक्ष शिवकालांतील नाहीं. यासाटीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १८ मधील एखादें वाक्य पहाण्याला हरकत नाहीं. हें वाक्य शके १५९० (ठोकळ मानानें इ. स. १६६८) सालीं लिहिल्या गेलेल्या कागदांतील आहे. 'त्यावरी गोंदजी मजकूर राजीकानें तीनच्यार वरसे पळोन गेला.' (पान ३३) या वाक्यांत राज्यव्यवस्थेंतील अंदाधुंदीमुळें गोंदजी तीनचार वर्षें आपला गांव सोडून दुसरीकडे परागंदा झाला होता, असा आशय असून 'राजिका'च्या अर्थाचा त्या योगानें खुलासा सहजच होतो. आणखी सुगावा काढल्यास इ. स. १६७० मधील एका पत्रांत 'अफजलखानाचे राजिक' दृष्टीपुढून जातें. (शिव च. सा. खंड ७ ले. ५३). शिवकालापूर्वी 'राजिक' हा शब्द रूढ असल्याचें प्रमाण शि. च. सा. खंड ९ मध्यें आहे. ले. २१ त (इ. स. १६०७)

'कोरळांचें राजिक जालें' असें वाक्य आहे. राज्यव्यवहाराचा अस्ताव्यस्तपणा निदर्शनास आणणारे 'राजिक' व 'राजकी' हे दोन शब्द लोकांमध्यें प्रचलित असतां समर्थांनीं 'राजकारण' हा एक नवा शब्द राजव्यवहाराच्या अर्थानें उपयोगांत आणला असा समज स्वीकारायला अडचण पडते.

दासबोधाच्या प्रारंभीं जी विषयसूचि आहे तिच्यांत चातुर्याचा दोनदां उल्लेख आहे (१० व ३१). पहिल्या उल्लेखांत चातुर्याची बहुविधता (नाना चातुर्यलक्षण) दर्शविली असून दुसरा उल्लेख फलश्रुतीचा आहे. 'चातुर्य कळे यथायोग्य। विवेकेंसहित।'. चातुर्यज्ञानाचे परिणाम ३२-३३ ओव्यांत गोविलेले आहेत व त्यावरून समर्थांच्या चातुर्यनिरूपणाचा रोख कळण्यासारखा आहे. दासबोधांत चातुर्य नांवाचे तीन समास असून त्यांतले दोन एकट्या पंधराव्या दशकांत आहेत (१४ : ६ आणि १५ : १ व ६). समर्थांच्या मनांत 'राजकारण' या नांवाचा स्वतंत्र विषय असता तर त्याला त्यांनीं सुरुवातीच्या सूचींत स्वतंत्र स्थान देण्याला कसलाच प्रत्यवाय नव्हता. भक्ति, ज्ञान, वैराग्य, देव, भक्त, जीवशिव, ब्रह्म-माया, पंचभूतें, मुक्ति, अलिप्तपणा यांच्या मालिकेंत उपासना-कवित्वाबरोबर चातुर्याचा मान व्हावा आणि राजकारण या अर्वाचीन समर्थभाविकांना अत्यंत महत्त्वाचा वाटणारा विषय सूचींतून साफ वगळला जावा, हें त्यांना कोडें वाटत नाहीं, यामुळें त्यांतून बाहेर पडण्याचा यत्न हे समर्थ-भाविक करीत नाहींत, यामध्यें आश्चर्य नाहीं. सूचींत राजकारण नसलें तरी ज्या अर्थीं दासबोधांत त्याचा समावेश आहे, त्याअर्थीं त्याची संगति लावणें प्राप्त म्हणून विचार करूं लागल्यास, चातुर्याचीं लक्षणें राजकारणांत पाहून नाना चातुर्यां-तील राजकारण हें एक प्रकारचें चातुर्य असा बोध होतो. सूचींत उत्तम किंवा उत्तम पुरुष हे विषय नाहींत. त्याचा दासबोधामध्यें अंतर्भाव असल्याची जबाबदारी ओळखून पूर्वीच्या समर्थभक्तांनीं जो मार्ग चोखाळला तोच आतांच्या समर्थाभ्यास-कांनीं चोखाळला पाहिजे.

शके १८५५ सालीं श्रीरामदासी संशोधन खंड १ हें पुस्तक प्रसिद्ध झालें. त्याला आतां २० वर्षें होत आलीं व त्यापूर्वीं निदान पांच वर्षें संशोधिलेल्या बाडांची जुळवाजुळव चालली असावी, असें म्हणतां येतें. प्रस्तुत संशोधनखंडांतील बाडांक ५५ हें छापण्यासाठीं हातीं घेतलें तेव्हां १५० वर्षांचें जुनें होतें. आतां वरील हिशोबाप्रमाणें तें १७५ वर्षांचें समजण्याला हरकत नाहीं. या बाडांत

एका पानावर दासबोधाच्या सूचींतील कोणते विषय कुठच्या समासांत आहेत, याची माहिती दिलेली असून ती सत्कार्योत्तेजक सभेच्या दासबोधामध्यें पहिल्या समासाखालीं टिपेच्या रूपांत पहायला सांपडते. १८ : ६ या समासाचें नांव 'उत्तम पुरुष' असतां त्याला सदर माहितींत चातुर्य हें नांव योजलेलें आहे. शके १७०० मध्यें 'उत्तम पुरुष' म्हणजे चातुर्य अशी सांप्रदायिकांनीं सांगड घातल्याचें हें उदाहरण आहे. बाडांक १०३ हेंदेखील १७५ वर्षांचें जुनें असून, त्यांत दासबोधांतील विषय समासवारीनें दाखविण्याचा यत्न केलेला आहे. या दोन बाडांत इतर समासांच्या विषयाबद्दल थोडा फरक असला तरी उत्तम पुरुष या समासाविषयीं दोन्ही बाडांमध्यें मतैक्य आहे. समर्थांनीं जें चातुर्य वर्णन केलें, त्यालाच १८ : ६ मध्यें उत्तम पुरुष असें नांव असल्याबद्दल बाडांक १०३ मध्यें दुजोरा मिळतो. उत्तम पुरुष हा चातुर्याचा पुतळा कल्पून १७५ वर्षांपूर्वीं समर्थांच्या 'नाना चातुर्यलक्षण। बोलिलें असे॥' या वचनाची जशी सांप्रदायिकांनीं संगति लावली तशीच संगति आतां लावल्यास राजकारण व चातुर्य यांचाहि मेळ घालतां येतो.

चातुर्यविशेषाला 'राजकारण' ही संज्ञा लावणाऱ्या समर्थांना चातुर्य हा शब्द माहीत असून त्यांनीं 'राजकारण' हा निराळा शब्द काढला, तेव्हां त्याचा चातुर्याहून वेगळा अर्थ स्वीकारणें हेंच योग्य, असें प्रतिपादन क्वचित् ऐकायला अगर पहायला सापडतें. तथापि चातुर्याच्या लक्षणाशीं राजकारण ताडून पाहिल्यास हीं दोन्ही एक होत असें लक्षांत येऊं शकतें. समर्थांनीं चातुर्यांतच त्याची गणना केल्याचें पहिल्या समासांतील राजकारणाच्या अनुल्लेखामुळें सिद्धच आहे. समर्थ आपल्या वाङ्मयांतील प्रत्येक शब्द कांहीं पारिभाषिक संज्ञा बाजूला काढल्यास एकाच निश्चित अर्थानें सर्वत्र उपयोगांत आणणारे असते तर राजकारण व चातुर्य सर्वस्वीं भिन्न असल्याच्या आग्रहामध्यें कांहीं तथ्य असल्याचें कबूल करतां आलें असतें. परंतु एका अर्थाचे अनेक शब्द त्यांनीं वापरले असल्यामुळें असें ठरविण्याला जागा सापडत नाहीं. १२ : ९ या समासाला 'येत्नसिकवण' हें नांव आहे. परंतु यांत 'महंती' साधण्याच्या यत्नाचा उपदेश आहे. त्यापूर्वीं ११ : ३ या समासांत १२ : ९ सारखाच विषय असून शेवटीं 'सदेव' पणाचें विवेचन आहे. समासाचें नांव पहावें तर 'सिकवण' असें दिसतें. १३ : १० या समासाचें नांव 'सिकवण' हेंच असून त्याच्या शेवटीं मनोगत राखण्याच्या संदर्भांत चातुर्य, निःस्पृह व महंत

हे तीन शब्द आणले आहेत. १२ : १० तील उत्तम पुरुषाच्या गुणांत मनोगत हातीं घेण्याचा गुण असल्यानें चतुर, निःस्पृह, महंत व उत्तम पुरुष हे सर्व त्या गुणा-पुरते एकच असल्याचें लक्षांत येईल. प्रचीत आणि प्रत्यय या शब्दांचा अर्थ भिन्न नसतां या दोन्हींचें स्वतंत्र विवरण समर्थांच्या वाङ्मयांत आहे. एकच विषय वेग-वेगळ्या नांवानें किंवा रीतीनें जिज्ञासूच्या गळीं उतरविण्याचा समर्थांचा उद्देश देखील दासबोधांत स्पष्ट आहे. 'आम्हांला (श्रोत्याचें) समाधान विघडूं नये म्हणून जें एकदां सांगितलें तेंच पुनः सांगावें लागतें,' असा समर्थांचा एके ठिकाणीं उद्गार आहे (११ : ५ : २). ५ : ४, ८ : १० आणि १३ : ८ या तीन समासांतील विषयांचें एकमेकांशीं बरेंच साद्दश्य असतां एकाला 'उपदेश', दुसऱ्याला 'सुन्यत्वनिर्शन' व तिसऱ्याला 'श्रीकर्तानिरूपण' अशीं नांवें देण्यांत आलेलीं आहेत. जिज्ञासूला असे आणखी दाखले समर्थांच्या वाङ्मयांत पहातां येतील आणि खात्री पटेल कीं, चातुर्य व राजकारण यांच्या एकरूपतेची कल्पना निराधार नाहीं.

राजकारण या शब्दांतील 'राज' हा अंश 'राजा'चा वाचक असल्यामुळें हा सगळा शब्द राजाचा, पर्यायानें राजाच्या द्वारें घडणारा राज्यविषयक व्यवहार सुच-वितो, अशी कल्पना रूढ होऊन समर्थांच्या मागून—किंबहुना समर्थांच्या हयाती-मध्यें पण अगदीं अखेर अखेरच्या वर्षांमध्यें—तो राज्यासंबंधांच्या उलाढालींचें अत्यंत स्थूल ज्ञान पुरविणारा ठरला. शिवाजी राजांनीं आपल्या भावास, व्यं(ए) कोजीस, लिहिलेल्या पत्राच्या आरंभीं 'राजकारण' शब्द आलेला आहे. ('राजकारण प्रसंगें आम्ही कुतुबशहाचे भेटीस भागानगरास गेलों'.) १६८४ मध्यें संभाजी राजांच्या कारभारांत या शब्दाचा उपयोग केलेला दिसतो (श्री. जदुनाथ सरकारांचें 'हाऊस ऑफ शिवाजी', पान २११). येथें समर्थांच्या काळांत किंवा त्यांच्या मागून इतरांनीं 'राजकारण' हा शब्द कोणत्या अर्थानें वापरला हा वादाचा विषय नाहीं. समर्थांच्या वाङ्मयांत तो कोणत्या अर्थानें आला, याविषयींच काय तो वाद आहे. समर्थांनीं त्या शब्दाला जन्म दिल्यानंतर हा शब्द राज्यविषयक व्यवहाराला अनुलक्षून सर्रहा योजला जाऊं लागला. पेशवाईच्या उत्तरार्धांत याचा वापर पूर्वार्धाहून जास्त आढळतो. शिवकालीन कागदोपत्रीं तो राजनीति, राजधर्म, राज्यासंबंधाच्या उलाढाली किंवा निर्भेळ 'पॉलिटिक्स' या अर्थानें तुरळक तुरळक

दृष्टीस पडतो. आज त्याचा पॉलिटिक्स हा अर्थ इतका निश्चितपणें व दृढत्वानें बुद्धीला खिळून बसला आहे कीं राजकारण शब्द ऐकतांच पॉलिटिक्सखेरीज दुसरा कोणताहि अर्थ मनांत येत नाहीं. परंतु समर्थांनीं तो निर्माण केला तेव्हां पॉलिटिक्स हा अर्थ त्यांच्या मनांत होता असें ठरविण्याला अनेक अडचणी आहेत. पॉलिटिक्स—मग तें लोकशाहीचें असो किंवा अनियंत्रित असो—त्याच्यांत दंडकार्यांचा (कायदे, शिक्षा, पोलिस, लष्कर, तुरुंग, हत्यारें इत्यादिकांचा) समावेश असल्याशिवाय भागत नाहीं. राजापासून गांवच्या पाटील-कुळकर्ण्यांपर्यंत पसरलेल्या व लोकांना कह्यांत राखणाऱ्या अधिकाऱ्यांची माळ पॉलिटिक्समध्यें जमेस धरावी लागते. आपला-परका, मित्र-शत्रु, तटस्थ-मध्यस्थ, असल्या भेदभावाला पॉलिटिक्समध्यें महत्त्वाचें स्थान आहे. पॉलिटिक्समध्यें आज्ञांचें-हुकमांचें प्राबल्य असतें, तर समर्थांच्या राजकारणांत आर्जवाला महत्त्व आहे. गड, कोष, बाजार, शहरें, शिबिरें यांचा पॉलिटिक्समध्यें विचार बाळगणें अवश्य असतें. समर्थांच्या वाङ्मयांत या गोष्टी क्वचित् दृष्टांत या नात्यानें पहायला सांपडतात. पृथ्वीस्तवनांत (१६ : ३) 'गड कोठ पुरें पट्टणें' (७) किंवा 'गड कोठ नाना नगरें। पुरें पट्टणें मनोहरें। २५' असा किल्लेकोटांचा उल्लेख आहे, तर 'सेना शाहार बाजार। नाना यात्रा लहान थोर।' असा सेना-बाजाराचा दुसरीकडे निर्देश दिसतो (१६ : ९ : १७). परंतु राजकारण शब्दाच्या अर्थविस्तारांत किल्लेकोट, लष्कर, बाजार यांची वरणी समर्थांनीं लावलेली नाहीं. राजदंडामुळें भोगाव्या लागणाऱ्या दुःखांना आधिभौतिक तापांमध्यें ढकलण्यांत आलें आहे. राजकारणाच्या समासांत राजदंडाचें नांवसुद्धां नाहीं. भूपति, चक्रवर्ती, हयपती, गजपती, नरपती, राजा, देसाई इत्यादि लहान-मोठ्या राज्याधिकाऱ्यांचीं नांवें मृत्यूच्या महिम्यांत गोविलेली असून त्याच्यापुढें 'राजकारणी' (राजकारणपटु) हा शब्द ठेवला गेल्यानें त्या शब्दाचा अर्थ भूपति-चक्रवर्तीच्या संदर्भाला धरून स्वीकारणें प्राप्त असें म्हणायला अवकाश आहे. भूपति-चक्रवर्तीला मृत्यु ओळखीत नाहीं असें सांगून होतांच समर्थांनीं 'मृत्यु न म्हणे करामती।' असें नमूद करून भूपति-चक्रवर्तीचा क्रम तोडला आहे. नंतर 'मृत्यु न म्हणे वरिष्ठ जनीं'—लोकांत वरिष्ठ या नात्यानें ज्याला मानतात, त्याची मृत्यूपाशीं कांहींच प्रतिष्ठा नाहीं, यानंतर 'मृत्य न म्हणे राजकारणी' हें वाक्य असल्यानें हयपति-गजपतींशीं राजकारणीचा संबंध निर्विवादपणें जोडतां येत नाहीं. कारण मागें 'वरिष्ठ

जनीं' आहेत तर पुढें पगारी नोकर आहेत (वेतनी वेतनधर्ता). ग्रामाधिपति, देशाधिपति, नृपति, राजा, महाराजा, चक्रवर्ती या चढत्या राजपरंपरेचा उल्लेख समर्थांनीं ६ : १ च्या आरंभीं देव ओळखण्याच्या साधनांत केलेला आहे. इहलोकींच्या राजामहाराजांना ब्रह्मदेव निर्माण करतो, अर्थात् ब्रह्मदेव राजामहाराजांहून थोर, परंतु ब्रह्माविष्णुमहेश हे देव स्वयंभू नाहींत, त्यांना जन्मास घालणारा जो परमेश्वर त्याला ओळखावें. सारांश, परमेश्वर कसा ओळखावा, या प्रश्नाच्या अनुरोधानें राजामहाराजांचा उच्चार झालेला आहे. राजकारणाशीं या राजामहाराजांची संगति नाहीं. आधिदैविक तापांत (३ : ८) 'ग्रामा दंडी ग्रामाधिपती । देशा दंडी देशाधिपति । ८' या क्रमानें राजा व राजनीति हे दोन शब्द आले आहेत. राजानें राजनीति सोडली तर यम त्याला शिक्षा करतो. येथें राजकारणाचा संबंध नाहीं. यावरून राजकारण व राजनीति किंवा राजधर्म हीं अर्थदृष्ट्या निरनिराळीं असल्याचें दिसून येतें. राजकारणांत–पॉलिटिक्समध्यें–वधाचें कर्म संभवतें. आणि ९ : ४ मध्यें 'नेणतां कांहीं राजकारण् । अपमान करून घेती प्राण । ३५' असें एक वाक्य आहे. तेव्हां अपमान करून प्राण घेण्याच्या कर्मानिमित्त येथील राजकारण शब्दाचा अर्थ पॉलिटिक्स असाच स्वीकारला पाहिजे, असें आग्रहानें सांगण्यांत येतें. परंतु आत्महत्या किंवा परहत्या म्हणजे आपल्या दुसऱ्यांच्या प्राणांची घेवाणदेवाण मूर्ख, तमोगुणी, कुविद्य, इत्यादि वर्गाच्या वर्णनांत पाहिल्यावर वधकर्मासाठीं राजकारणाची आवश्यकता असते, हा आग्रह फोल ठरतो. समर्थवाङ्मयांतील राजकारण शब्द व पॉलिटिक्स यांचा अर्थदृष्ट्या उघडकीस येणारा विरोध स्पष्ट आहे. 'राजे राज्य सांडून गेले । भगवंताकारणें हिंडले । कीर्तिरूपें पावन जाले । भूमंडळीं ॥ (१४ : ७ : ११)'. राज्य सोडण्याचा समर्थांचा परमार्थ आहे. दुर्जनांचा देव 'लाताड' असला तरी त्याचा उपमर्द करूं नये. राजा रागावला तरी त्याशीं भांडतां येत नाहीं. तोच न्याय लाताड स्वभावाच्या देवासंबंधांत पाळावा (१४ : ८ : १६). समर्थांची ही कल्पना त्यांच्या राजकारण शब्दावर प्रकाश टाकणारी आहे.

'राजकारण' या शब्दाचा अर्थ नेमका कोणता असावा, हा प्रश्न सोडविण्याचा एक उपाय १५ : ३ च्या प्रारंभीं सांपडतो. तेथें राजा व अंतरात्मा यांचें सादृश्य सुचविलें आहे. मूळ मायेंतून उद्भवणारा पंचीकरण पसारा सैरावैरा (अस्ताव्यस्त) असला तरी त्यांत साक्षीत्वाचा एक दोरा भरलेला आहे. हा दोरा जागिवेचा आहे. म्हणून

पंचीकरण पसारा कांहीं व्यवस्थेनें रहातो. उंच सिंहासनावरील राजा व रस्त्यावर उभ्या असणाऱ्या त्याच्या फौजा यांच्यांत अंतरात्मा व पंचीकरण पसारा यांच्यासारखाच संबंध आहे. अंतरात्म्याप्रमाणें राजा हासुद्धां ' मुळीं आधिक जाणीवेचें अधिष्ठान आहे ॥ ४ '. ही तुलना नीट गळीं उतरण्याकरितां अवतार व मनु चक्रवर्ती यांचा दाखला घेतला आहे. ' विवेकें बहुत पैसावले । म्हणौनि अवतार बोलिले । मनु चक्रवर्ती जाले । येणें चि न्यायें ॥ ५ '. पुढच्या ओवींत उदंड जाणीव हें सदेवपणाचें लक्षण असून थोड्या जाणिवेचे प्राणी निर्देव होत, असें व्याख्यान आहे. उदंड जाणीव हें सदेवाचें मुख्य लक्षण खरें, पण तेवढ्यानें भागत नाहीं. व्याप आटोप करावा, धक्के-चपेटे सोसावे, तेव्हां ' तेणें प्राणी सदेव होती । देखत देखतां ॥ ७'. धक्के चपेटे सोसावे ही १५ : ६ मधील चातुर्याची एक खूण आहे (२२). जाणीव, जाणतेपणा, विवेक यांच्या बळानें मनुष्याला श्रेष्ठत्व लाभतें; राजाच्या सत्तेची श्रेष्ठता जाणीव, विवेक यांवरच अवलंबून असते. समर्थांसमोर जाणतेपणा, विवेक या गुणांचा अभाव असलेल्या राजांचीं, स्वामींचीं उदाहरणें असल्यामुळें, ' अध्यात्मसार ' नामक तुळजा भवानीच्या स्तवनांत शक्तियुक्तीचें वर्णन झाल्यावर, खबरदारी, शक्तियुक्ति, कामाची त्वरा इत्यादि गुण नसतील तर फितुरी माजून राज्यें बुडतात, अशा तऱ्हेची माहिती सादर केली आहे. राज्यांतील चोरटी होरटी तुंड, लांचखाऊ माणसें ' राजकारणें ' मारावीं. ' सेवकां आवरूं नेणें तो राजा मूर्ख जाणिजे ' असा उपदेश तेथें केलेला आहे. स्फुट प्रकरण २ मध्यें प्रभु जाणता नसेल तर लोकांचें पाप कसें उभें रहातें याची विवेचना केलेली आहे. ' सर्व सांभाळी । तोची साहेब नेटका ॥१७ खबर्दार बरा राजा विवेकी सर्व साक्षपी । आज्ञेनें सर्वहि चाले तेणें सौख्य बहु जना ॥ १८ ' याप्रमाणें लोकांना सौख्य देणाऱ्या राजाचे गुण सांगितले आहेत. परंतु ही माहिती दाखलेवजा आहे. शेवटीं ' भक्तीमार्ग प्रतिष्ठिला ' हे शब्द असल्यानें या प्रकरणांतील उपदेश भक्तिमार्गाच्या पुढाऱ्याकरितां आहे, हें तात्पर्य राजाच्या दृष्टांतानें गडबडून दृष्टीआड न होऊं देणें बरें. या स्फुट प्रकरणाला श्रीरामदासी संशोधनाच्या सवादोनशें वर्षांच्या जुन्या बाडांत (५३०) ' राजनीति ' असें नांव दिलें आहे. राजनीति हें नांव असलें तरी त्यांत राजनीति नाहीं, याचा तें प्रकरण वाचल्यावर बोध होण्याला उशीर लागत नाहीं. ' भाग्यासी काय उणें रे । येत्नावांचुनि राहिले ' असा या प्रकरणाचा आरंभ आहे.

समर्थांचे महंत, विरक्त, निःस्पृह, उत्तम पुरुष, सदेव, हे सारे भक्तिमार्गाचे, पारमार्थिक विचाराच्या प्रसाराचे पुढारी असल्यामुळें त्यांना अवश्य असणाऱ्या गुणांची चर्चा करतांना समर्थ राजाचा दृष्टांत घेतात याचें कारण उघड आहे. राजा हा आपल्या ताब्यांतील मानवसमुदायाचा पुढारी समजला जात असल्यामुळें व्यक्तिशः त्याच्या ठिकाणीं तो समुदाय संतुष्ट व अनन्यनिष्ठ राखणारे अनेक गुण असल्याशिवाय गत्यंतर नाहीं. महाभारतामध्यें शांतिपर्वाच्या आरंभीं राजधर्माचें विवेचन आहे. शांतिपर्वाच्या ५७ व्या अध्यायांत उत्तम राजाचे गुण पुढीलप्रमाणें दिले आहेत.

**अक्रोधनो ह्यव्यसनी मृदुदंडो जितेंद्रियः।**
**राजा भवति भूतानां विश्वास्यो हिमवानिव ॥ २९**
**प्राज्ञस्त्यागगुणोपेतः पररंध्रेषु तत्परः।**
**सुदर्शः सर्ववर्णानां नयापनयवित्तथा ॥ ३०**
**क्षिप्रकारी जितक्रोधः सुप्रसादो महामनाः।**
**अरोषप्रकृतिर्युक्तः क्रियावानविकत्थनः ॥ ३१**
**आरब्धान्येव कार्याणि सुपर्यवसितानि च।**
**यस्यः राज्ञः प्रदृश्यन्ति स राजा राजसत्तमः ॥ ३२**

या श्लोकांत राजाचे म्हणून वर्णिलेले गुण—पररंध्रेषु तत्परः व मृदुदंडः वगळून—समर्थांच्या उत्तम पुरुषांत दिसणारे असल्यामुळें आतां दासबोधांत व अन्यत्र आलेल्या 'राजकारण' शब्दाच्या विचाराकडे वळण्यास हरकत नाहीं. येथें आणखी असें सुचवून ठेवणें अवश्य वाटतें कीं, भारतीय संस्कृतीनें प्रत्येक व्यवसायांतील पुरुषाच्या गुणांसंबंधांत राजाच्या गुणांसारखीच अपेक्षा बाळगली आहे. आयुर्वेदांतील चांगल्या वैद्याच्या, फार कशाला पाकशास्त्रांतील आचाऱ्याच्या, गुणांची यादी पाहिल्यास या संबंधांत खात्री पटेल. कोणत्याहि व्यवसायांत अग्रगण्य होऊं इच्छिणाराला प्रायः सारख्या गुणांची संपादणी व जोपासना करावी लागते, असा या विवेचनाचा इत्यर्थ आहे.

दासबोधाबाहेरील एका ठिकाणच्या 'राजकारणा'चा निर्देश मागें आला आहे. दुसरा निर्देश स्फुट श्लोक ४० मध्यें 'गुणीच गोविले गुणी। विशेष राजकारणी।' याप्रमाणें असून स्फुट श्लोक ५१ मधील देवाच्या प्रार्थनेंत 'तुझेनि योग धारणे।

तुझेनि राजकारणें।' याप्रमाणें पुनः एकदां तो शब्द दिसतो. स्फुट ओव्या १४ यांतील पहिल्या १० ओव्यांत एकंदर २० लक्षणें दृष्टीस पडतात. म्हणून त्याला 'समर्थ संप्रदायाचीं लक्षणें' असें नांव देण्यांत आलें आहे. लिहिणें, वाचणें, अर्थांतर सांगणें, आशंकानिवृत्ति, स्थिति, प्रचीति, गाणें, नाचणें, टाळी वाजविणें, अर्थभेद, प्रबंध, प्रबोध, वैराग्य, विवेक, लोक राजी राखणें, हीं चौदा लक्षणें सांगून झाल्यावर 'राजकारण' हें पंधरावें लक्षण गोविलें आहे. अव्यग्रता, प्रसंगज्ञान, कालज्ञान, उदासीन निर्लोभ वृत्ति, सर्वांशीं समानतेनें वागून ज्याचें त्याचें समाधान राखणें आणि शेवटचें लक्षण रामोपासना, अशी हीं वीस लक्षणें आहेत. या लक्षणांत 'चातुर्य' नाहीं. त्याऐवजीं राजकारण आहे. पण या राजकारणाच्या मागेंपुढें ज्या गुणांचा व कर्तव्यांचा परिवार आहे, त्यांवरून राजकारणाचा समर्थमान्य अर्थ काढणें शक्य आहे. तो परिवार राज्यव्यवहारांतील घटनांचा नाहीं, हें ध्यानांत येण्याला कसलीच अडचण नाहीं. मा न स पू जेंतील दुसऱ्या समासांत 'ऐसे भले परमार्थी। श्रवण मनन अर्थार्थी। जे परलोकींचे स्वार्थी। परोपकारी ॥ ११' ही अखेरची ओवी मागल्या ओव्यांतील विषयाचा समारोप करणारी असल्याचें 'ऐसे' या शब्दावरून ध्यानांत येणारें आहे. समर्थ ज्याला उत्तम पुरुष म्हणतात, त्याचें कौतुक या समासांत आहे. तथापि जिज्ञासूंच्या समाधानासाठीं त्या ओव्या येथें सादर केल्या आहेत.

धीर उदार सुंदर। दक्ष वित्पन्न चतुर
सबल प्रेत्नीं तत्पर। अत्यादरें ॥ २
दुरी द्रष्टे दीर्घप्रेत्नी। समयो प्रसंग जाणती चिन्हीं
नासला फड नेटका वचनीं। बोलोन करिती ॥ ३
जाणती दुसऱ्याचें अंतर। सावधानता निरंतर
नेमस्त न्यायाचें उत्तर। बाष्कळ नाहीं ॥
पवित्र वासनेचे उदास। केवळ भगवंताचे दास
सारासार विचारें वास। हृदयीं केला ॥ ५
अगाध अवेग्र धारणा। मिळोन जाती राजकारणा
कार्यभागाची योजना। येथायोग्य योजिती ॥ ६

न्याय-नीति मर्यादेचे । स्नानसंध्या पवित्रतेचे
सत्यवादी बहुतांचे । अन्याय क्षमिती ॥ ७
चुकणें विसरणें असेना । मछर पैशुन्य दिसेना
कोप क्षणिक वसेना । निरंतर ॥ ८
हरिकथानिरूपण । तेथें प्रेमळ अंतःकर्ण
पाहों जातां उत्तम लक्षण । उत्तम असे ॥ ९
ऐसियांनीं करावें पारपत्य । करूं जाणती सकल कृत्य
धन्य धन्य कृतकृत्य । निःकामतेनें ॥ १०

मानसपूजा हें प्रकरण देवाचा उत्सव कसा साजरा करावा, यासंबंधाचें आहे. स्वयंपाक, भोजन, रोषनाई, कीर्तनें यांचा तपशील या प्रकरणांत पहायला सांपडतो. पारपत्य म्हणजे व्यवस्था. उत्सवाची व्यवस्था करणारांचे गुण वरील ओव्यांत गाइले आहेत. त्यांत एका ठिकाणीं (६) राजकारण शब्द गुंतविला आहे. सगळ्या संदर्भा-वरून त्याचा 'पॉलिटिक्स' हा अर्थ कितपत उचित ठरेल हें वाचकांना कळणारें आहे. मागें एका अभंगाचा उल्लेख केला आहे. 'राजकारणाचीं द्वारें । ती काय जाणतील गव्हारें' असा त्या अभंगाचा आरंभ असून पुढें भवसिंधु आटणें, सृष्टीचा संहार, अनंत ब्रह्मांडाची घडामोड हे विषय एकेका चरणांत सुचवून 'दास बोलतो बोभाटे । विवेक सोडा कडकडाटें । बंड पाषांड फलकटें । उडोन जाती ॥ ४' असें आश्वासन आहे.

दासबोधाबाहेर शिवाजीराजांना लिहिलेल्या पत्रांत एकदां, राजधर्मप्रकरणांत एकदां, सेवकधर्माच्या दुसऱ्या समासांत एकदां, सावधता प्रकरणांत एकदां, याप्रमाणें 'राजकारण' शब्द आणखी चार वेळां समर्थ-वाङ्मयांत आलेला आहे. राजधर्माच्या 'धुरेनें युद्धासी जाणें । अशीं नव्हेत कीं राजकारणें । १४'—जो नेता असेल त्यानें स्वतः युद्धास जाणें हें राजकारण नव्हे, या वाक्यांतील राजकारणाचा अर्थ उघड उघड चातुर्य आहे. सेवकधर्मांत 'सुचीत करूनि अंतःकरण । आतां करावें राज-कारण ।' या वचनांतील राजकारणाचा खुलासा पाहूं गेल्यास मालकाशीं शिरजोरीनें वागणाऱ्या नोकरांचें वर्णन दिसतें व 'आतां करावें राजकारण' याचें स्पष्टीकरण त्या समासाच्या शेवटच्या ओव्यांतून स्वीकारावें लागतें. मालकानें चढेल नोकरांना

बदलून टाकावें, एक वेळ काम बिघडलें तरी चालेल पण सेवकाधीन होऊं नये, या शहाणपणाला प्रारंभीं राजकारण म्हटलें आहे. सावधताप्रकरणाच्या शेवटीं 'शोधिलें चि शोधावें। राजकारण ॥ ११' असा उपदेश आहे. यांतील राजकारणाचा राज्यविषयक व्यवहाराशीं संबंध लावण्यापूर्वीं या प्रकरणाचा थोडासा इतिहास पहाणें अवश्य आहे. रामदासी संशोधनाच्या १२०४ क्रमांकाच्या बाडांत या प्रकरणामध्यें आणखी १२ ओव्या भरून त्याला 'महंतलीळाशिकवण' असें नांव दिलेलें आहे. या नांवावरून राजकारणाच्या खऱ्या अर्थाचा बोध होऊं शकत नाहीं. पुष्कळ बाडांतून हें प्रकरण ११ ओव्यांचें म्हणजे राजकारणाच्या १२ व्या ओवीशिवाय असल्याचें लक्षांत ठेवणें बरें. उरलें शिवाजीराजांच्या पत्रांतील 'राजकारण'. 'उदंड राजकारण तटलें'—शिवाजीमहाराज ज्या उलाढाली करीत होते, त्या आवरण्याची व रेटण्याची कुशलता—त्या उलाढालींच्या विविधतेमुळें चित्त भारावून फाटलें असतां किंवा त्या योगानें चित्त व्याकुळ असतां पत्र लिहिणें कांहींसें अप्रासंगिक आहे व त्यासाठीं क्षमा केली पाहिजे; असें त्या ओवीचें तात्पर्य आहे. समुदाय उभारून त्याची जूट व शिस्त संभाळण्याच्या कामगिरीसाठीं समर्थांनीं 'राजकारण' शब्द उत्पन्न केला, हें न विसरल्यास या पत्रांतील राजकारणाला पॉलिटिक्स हा अर्थ चिकटविण्याची आवश्यकता नाहीं. समर्थांचा समुदाय राजिकासाठीं नसून देवाच्या भक्तांचा होता हें या संदर्भांत सदैव लक्षांत बाळगणें अवश्य आहे.

दासबोधांत 'राजकारण' हा शब्द एकूण २७ वेळां आल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्याच्या दोन उल्लेखांचा पूर्वीं परामर्श केला असला तरी ९ : ४ : ३५ मधील राजकारणाचा नेणत्याशीं संबंध असल्यामुळें त्याच्याकडे आणखी एकदां लक्ष देणें भाग आहे. नेणत्याचें स्वतंत्र वर्णन या समासाच्या १९-२३ ओव्यांत आहे. नेणत्याला विंचू-साप डसतात, जीवघात होतो, वैरी जिंकतात, संकटांत पडावें लागतें, असे नेणतेपणाचे अनिष्ट परिणाम दाखविल्यावर जाणतेपणाचा गौरव केलेला आहे. नंतर पुनः एकदां नेणतेपणाची दुःस्थिति सांगितली आहे व तिच्या ओव्यांत 'नेणतां कांहीं राजकारण। अपमान करून घेती प्राण।' हें वचन आलें आहे. हा सगळा समास परमार्थाचा आहे. त्यांत नेणत्याला अनुलक्षून आलेलें 'राजकारण' विंचू, साप, वैरी, कार्यनाश, जीवघात, टकणें-विसरणें, या मागील संदर्भांशीं जुळविलें पाहिजे व तसें जुळवितांना 'राजकारण' शब्द पॉलिटिक्स या अर्थानें घेण्याची गरज नाहीं. मानापमान केवळ

राज्यव्यवहारांत उद्भवतात व प्रापंचिक व्यवहारांत त्यांना थारा नसतो, अशी भूमिका रोजच्या अनुभवाविरुद्ध आहे. १२ : २ मध्यें हरिकथानिरूपणामागून 'बरेपणें राजकारण।' असें म्हटलें आहे (२९). ११ : ६ मध्यें 'बरेपणें' ऐवजीं 'नेमस्तपणें' हा शब्द आहे. १२ : २ हा प्रत्ययनिरूपणाचा समास आहे, तर ११ : ६ महंतलक्षणाचा आहे. १५:२ मध्यें 'मऱ्हाष्टदेश थोडा उरला । राजकारणें लोक रुधिला । ४' आणि 'कट्ट घालून राजकारणा । लोक लावी ॥ २५' असा दोनदां त्या शब्दाचा उल्लेख आहे व या समासाचें नांव 'निःस्पृहव्यापलक्षण' आहे. १४:१ या निःस्पृहलक्षणाच्या समासांत 'कार्यकर्ते होऊं नये । राजद्वारीं ॥४९'—राजदरबारीं किंवा राज्यकारभारांत कार्यकर्ता होऊं नये, या उपदेशाला धरूनच राजकारणाची संगति लावणें प्राप्त आहे व १५:२ मधील 'कट्ट घालून राजकारणा । लोक लावी ॥' या वचनाच्या मागेंपुढें 'ठाइं ठाइं भजन लावी । २२' किंवा 'चहुंकडे उदंड लांवे । परमार्थबुद्धि ॥२७ उपासनेचा गजर । स्थळोस्थळीं थोर थोर । २८' यांसारखीं वचनें आहेत आणि तीं राजकारण म्हणजे पॉलिटिक्स या कल्पनेला बाधक आहेत. 'राजकारणें लोक रुधिला' यापुढील युद्धप्रसंग, युद्धचर्चा, उदिम्याचा व्यासंग, पोटधंदा, षड्दर्शनें, नाना मतें, पाखंडें वगैरे गोष्टींच्या विस्तारानें महाराष्ट्रांतील निरनिराळया स्वार्थांच्या ज्या सामुदायिक उलाढाली, उलथापालथी चालल्या होत्या, त्यांच्या आधारें राजकारणाचा अर्थ लावतां येतो. १५ : ३ मध्यें 'नेमस्त कळेना वचन । नेमस्त नये राजकारण । १४' असें श्रेष्ठ अंतरात्माविवरणांत म्हटलें आहे. १६ : ८ हा आत्मारामनिरूपणाचा समास असून त्यामध्यें वासना, भावना, मनाच्या अनंत वृत्ति, अनंत कल्पना यांच्या ओघांत 'अनंत राजकारणें धरणें । कुबुधी सुबुधी विवरणें । २०' याप्रमाणें राजकारण शब्दाचा प्रयोग आहे. वृत्ति, कल्पना, कुबुद्धि, सुबुद्धीच्या सोबतीनें येणारा हा शब्द पॉलिटिक्स या बाह्य व्यवहाराचा द्योतक नसून वृत्तिकल्पनांसारखा अंतरंगांतल्या एखाद्या गुणाचा तो वाचक आहे, असा सुगावा लागतो. हा सुगावा चुकीचा नसल्याचा पुरावा १८ : ६ मध्यें सांपडतो. त्यापूर्वी १८ : २ मधील जाणत्याच्या गुणांत धूर्तपण, निरूपण यांच्यासह राजकारण शब्द दृष्टीसमोर येतो. साक्षेप, तर्क, उल्लेख, कवित्व, गद्यपद्य, प्रबंध, वचनभेद अशा गोतावळयांत तेथें 'राजकारण' आहे.

१८ : ६ या समासाचें नांव 'उत्तम पुरुष' आहे व हें नांव अफझुलखानाच्या

वधानंतर शिवाजीमहाराजांच्या गुणांकडे पाहून समर्थांनीं योजलें, अशी कथा समर्थांच्या मागून सुमारें दीडशें वर्षांनीं जन्मास आलेल्या हनुमंतस्वामींच्या बखरींत आहे. मात्र या बखरीच्या अधिकृत आवृत्तींत अफझुलखानाचें नांव नाहीं. समर्थांनीं प्रायः प्रथम हीन स्वभावाचें व नंतर उत्तम स्वभावाचें शब्दचित्र रेखाटण्याचा नियम पाळला आहे. १८ : ५ हा समास 'करंटपरीक्षा' निरूपणाचा आहे. पुढचा उत्तम पुरुषाचा आहे. आरंभीं वस्त्रेंभूषणें हा शरीराचा आणि विवेक-विचार-राजकारण हा अंतराचा शृंगार वर्णून, वस्त्राभूषणांनीं सजविलेलें व मुळांत सुंदर, सतेज असलेलें शरीर 'अंतरीं नस्तां च्यातुर्यबीज' खरी शोभा पावत नाहीं, असा समर्थांनीं आपला अभिप्राय स्वच्छ सांगून टाकला आहे. पहिल्या ओवींत अंतराचा शृंगार या नात्यानें ज्या विवेक-विचार-राजकारणाचा गौरव केला, त्यांनाच दुसऱ्या ओवींत 'च्यातुर्यबीज' या एका शब्दानें उल्लेखिलें आहे. पुढल्या तीन ओव्यांत दुष्ट स्वभावाचें दिग्दर्शन करून नंतर उत्तम पुरुषाच्या गुणांची मांडणी केली आहे. या सबंध समासांतील अनेक विचार पूर्वींच्या कित्येक समासांतून आढळतात. देहाच्या शृंगाराचा निषेध १४ : ६ मध्यें आहे. बाह्य शृंगार लोकांच्या उपयोगी पडत नाहीं. चातुर्याचा अंतरशृंगार लोकांचें रक्षण करतो. हा समास चातुर्य-लक्षणाचा आहे, व तोच आशय १८ : ६ मध्यें संक्षेपानें घेतला आहे. १८ : ६ मधील ३-५ या तीन ओव्यांतील कुलक्षणें शब्दशः कुविद्येच्या समासांत सांगितलेलीं पहायला सांपडतात. १९ : ३ मधील करंटलक्षणांत 'पापी अपस्मार' हे शब्द आले आहेत व तेच येथील ५ व्या ओवींत आहेत. त्यांचा उच्चार जसाच्या तसा २ : ३ या कुविद्येच्या समासांत आहे (२४). तेथें विश्वासघातकी आहे तर येथें 'बेइमानी' आहे. हीं कुलक्षणें १८ : ६ समासांत अनुक्तपूर्व किंवा सर्वथैव नवीं नसतांहि त्यावरून अफझलखानाचें चरित्र समर्थांच्या डोळ्यांपुढें हा समास रचतांना होतें, अशी कल्पना अर्वाचीन समर्थभाविक टासून सांगतात. परंतु ती ज्या त्या समर्थभाविकाची स्वैर कल्पना असल्यानें तिची जास्त छाननी करायला नको. कसून छाननी करूं लागलें तर १९ : ४ च्या १५ व्या ओवींतील 'केला बहुतांचा संव्हार। पापी अनर्थी अपस्मार। सर्वअबद्धी ॥' या शब्दांतूनहि अफझुलखानाचें दर्शन घ्यावें लागेल. याखेरीज समर्थांच्या वाङ्मयांत आणखी किती ठिकाणीं अशा रीतीनें अफझुलखान भेटेल याचा भरंवसा नाहीं.

१८ : ६ च्या १४ व्या ओवीपासून २१ व्या ओवीपर्यंत प्रत्येक ओवीच्या शेवटीं 'देणें ईश्वराचें' हे शब्द आहेत. हे शब्द येथें नवे नाहींत. १८ : १० च्या पांचव्या ओवींत 'येहलोक अथवा परलोक। साधतां कोणीयेक विवेक। अद्भुत होये स्वाभाविक। देणें ईश्वराचें॥' याप्रमाणें ते शब्द ग्रथित आहेत. १८ : ६ च्या १८ व्या ओवींत 'येहलोक परलोक' आहेत. 'अद्भुत चि कार्य करणें' हा मुद्दा १५ व्या ओवींत असून 'अद्भुत होये स्वाभाविक' या वचनाशीं त्याचें असलेलें सादृश्य लपण्यासारखें नाहीं. अफझुलखानाचा वध हें अद्भुत कार्य समजावयाचें असेल, तर तें दोन्ही ठिकाणीं तसेंच समजलें पाहिजे. २० व्या ओवींतील 'धर्मस्थापनेचे नर हे ईश्वराचे अवतार असतात. आजवर झाले, पुढें होतील, हें ईश्वराचें देणें होय,' ही कल्पना १७ : १ च्या २९ व्या ओवींत 'सत्कीर्तीचे पुरुष हे परमेश्वराचे अंश असतात, त्यांच्या ठिकाणीं धर्मस्थापनेचा हव्यास वसत असतो,' अशा शब्दांतरानें आलेली आहे. 'ईश्वराचे अंश' या शब्दांत 'देणें ईश्वराचें' हा अर्थ आहे. धर्मस्थापनेचे नर हे विष्णूचे अवतार असल्याची पुनर्वाच्यता १० : ४ : ४२ मध्यें आढळते. १८ : ६ तील इतर ओव्यांचा भावार्थ दासबोधांतील आणखी किती तरी समासांतील ओव्यांतून काढून दाखवितां येईल. 'म्लेंच्छ दुर्जन उदंड। बहुता दिवसांचें माजलें बंड। म्हणून अखंड, सावधान असावें॥,' या विचाराचें प्रतिबिंब नीच यातीचें किंवा तुर्कांचे गुरुत्व, दावल मलकाची यात्रा, पीरांचें भजन या निर्देशांतून पहातां येतें. 'राज्य नेलें म्लेंच्छि क्षेत्रीं। गुरुत्व नेलें कुपात्रीं।' (१४ : ७ : ३६) या ओवींत व तिच्या मागें इस्लामी राज्य आणि धर्म यांचा प्रभाव व परिणाम सुचविला आहे. १८ : ६ मध्यें अशा तऱ्हेच्या मागल्या पुढल्या समान विचारांची गोळाबेरीज आहे. स्वधर्मघातकी मतांना समर्थ 'बंड पाषांड' म्हणतात. ११ : २ : १६ मध्यें याचें प्रमाण आहे.

१८ : ६ मधील एका राजकारणाचा 'चातुर्यबीज' या दुसऱ्या ओवींतील शब्दाच्या अनुरोधानें अर्थ पूर्वी केला आहे. ४ थ्या ओवींत संवादाबरोबर राजकारण शब्द आहे. शीघ्रकोपी व अमर्याद वृत्तीचा म्हणजे उच्छृंखळ वृत्तीचा मनुष्य सामोपचाराचें बोलणें मनावर घेत नाहीं. विरोध मिटविणारें बोलणें चालूं देत नाहीं. विरोध शांत करणें हा चातुर्यांत मोडणारा एक प्रकार आहे. याच धोरणानें 'नेम धरितां राजकारणा। अंतर पडे॥ ६' यांतील राजकारणाचा अर्थ लावतां येतो.

शहाणपणाच्या वागणुकींत मनानें ठरविलेल्या नियमांचा अढळपणा किंवा हट्ट चालत नाहीं. आपल्या नियमांत फेरबदल करून विरोधाच्या प्रसंगांतून शहाण्या माणसाला पार पडावें लागतें. या अर्थाला पोषक होणारे विचार ७-८ या ओव्यांत आहेत. 'अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें । हटनिग्रहीं न पडावें ।' हीं वाक्यें 'नेम धरितां राजकारणा । अंतर पडे' या विधानाला दुजोरा देणारीं आहेत.

१९ : ६ मध्यें लिहिणें, वाचणें, अर्थांतर सांगणें, गाणें, नाचणें, पाटांतर, यांच्या माळेंत दीक्षा, मैत्री, यांच्यापुढें 'तीक्ष्णबुधी राजकारणीं बरी । १७' हे शब्द आले आहेत. समुदाय राखण्याच्या शहाणपणाला जणुं काय तीक्ष्ण बुद्धीची जरूर नसते, अशा कल्पनेनें येथील राजकारणाचा पॉलिटिक्स असा अर्थ लावण्याचा यत्न पूर्वीं झाला आहे. परंतु समुदायाचें, संघटनेचें रक्षण आणि संवर्धन करण्याच्या कामाला तीक्ष्ण बुद्धीवांचून चालत नाहीं, असें ध्यानांत ठेवल्यास पॉलिटिक्स हा अर्थ स्वीकारण्याचा हट्ट लटका पडतो. या समासांत समुदायाप्रमाणें महंतीचा व चातुर्याचाहि उल्लेख आहे. हरिकथा, नामवेध, भक्तिज्ञान, भजन, भगवत्कीर्ति, या विषयांची उत्तरार्धांत चर्चा असून आधीं भावाचा भावाला उपदेश, स्त्री गुरु भ्रतार शिष्य, तुर्क गुरु चांभार शिष्य, इत्यादि गोष्टींची माहिती आहे, लेखन, वाचन, अर्थांतरकथन, गायन, नर्तन, दीक्षा, मैत्री या प्रवाहांत पडलेलें राजकारण एकदम पॉलिटिक्स कसें ठरूं शकतें, हा एक अडचणीचा प्रश्न आहे. परंतु समर्थोक्त राजकारण म्हणजे पॉलिटिक्स या कल्पनेला जे घट्ट चिकटून आहेत, त्यांना 'राजकारण' शब्दाच्या मागें पुढें कांहींच बघावेंसें वाटू नये, हें सरळ आहे. १९ : ८ मध्यें प्रापंचिक माणसांतहि उदासीन वृत्तीनें, नेमकें बोलण्याच्या पद्धतीनें तालज्ञानानें, रागज्ञानानें, न्यायनीतिलक्षणानें एकदां माणूस महंत असल्याचा अनुभव येतो, अशा तऱ्हेचें वर्णन झाल्यावर वर्तनांतल्या चुकीचे 'मोटीं राजकारणें चुकती । राजकारणीं वेढां लागती । ११' याप्रमाणें दुष्परिणाम सांगितले आहेत. येथें देखील मागल्यापुढल्या विवेचनाकडे डोळेझांक न केल्यास 'राजकारणा' चा पॉलिटिक्स हा अर्थ स्वीकारण्याला जागा सांपडत नाहीं.

१९ : ९ या समासाचें नांव 'राजकारण' असून त्यांत पांच वेळां 'राजकारण' शब्द आलेला आहे. 'ज्ञानी आणि उदास पुरुषाला समुदायाचा हव्यास असेल तर त्यानें एकांत सेवावा,' असा या समासाचा आरंभ आहे. नंतर समुदाय संघटित

राखण्याचे उपाय सुचविले आहेत. कृत्रिम (कपट) सलगी, अतिपरिचय, आळस, ढिलेपण, दुसऱ्याचा विश्वास हे दोष टाळावे; सर्वांना सर्व गोष्टींचा पत्ता लागू देऊं नये; राजकारणामध्यें खलक उगवावे (१८); राजकारण दुर्जनामुळें अडेल असें वागूं नये (१९); खलदुर्जनांना भिऊन जर राजकारण राखलें नाहीं तर सर्व कांहीं उघडकीस येऊन आब रहाणार नाहीं. हीं अर्थात् पूर्वी नमूद केलेलीं कामें धूर्तपणाचीं आहेत. 'राजकारण करावें नेमें। ढिलेपणाच्या संभ्रमें। जाऊं नये॥ २७' –संघटनाचातुर्याचे प्रयोग सतत चालू ठेवावे, त्यांत ढिलेपणा उपयोगी नाहीं. अशा कर्तृत्वाचा पुरुष कुठेंच दृष्टीस पडत नाहीं, मात्र त्याच्याविषयीं सर्वत्र लोक बोलतात, आपल्या वाग्विलासानें तो सृष्टि वेधून टाकतो (२८). या समासांत दुर्जनांच्या बंदोबस्ताचा प्राधान्यानें उपदेश आहे. त्यासाठीं एका ठिकाणीं 'गनीमांच्या फौजा पहातांच (हातांखालील) रणशूरांच्या भुजा फुर्फुरायला लावणाऱ्या राजासारखा समुदायाचा पुढारी पाहिजे, अशा अर्थाचें एक वाक्य आहे (२५). त्याला पाहून दुर्जन वचकतात, तो प्रचीतीचे तडाखे देतो, यामुळें बंडपाखांडाचा सहजच वाखा–निःपात होतो (२६). येथील दृष्टांतांतल्या राजाला सिद्धांतांतील श्रेष्ठ पुरुष समजून अनेकांनीं समर्थांच्या राजकारणावर (पॉलिटिक्स समजून) काव्यें रचलीं आहेत. परंतु समुदाय, उपासनेचीं कामें, मठ, मज्यालस हे शब्द लक्षांत ठेवल्यास या समासांतील राजकारणाचा पॉलिटिक्स हा अर्थ पत्करण्याला आधार उरत नाहीं.

या समासांतील उपदेशाचे अनेक अंश पूर्वीच्या समासांतून आलेले आहेत. 'कोठें च पडेना दृष्टी। ठाईं ठाईं त्याच्या गोष्टी। २८' ही कल्पना ११ : ५ मध्यें 'पाहातां तरी सांपडेना। कीर्ति करूं तरी राहेना। २४' अशा रीतीनें आली आहे. पण ११ : ५ हा 'राजकारण' नांवाचा समास आहे, असा आक्षेप निघणें शक्य आहे. या आक्षेपाचा परिहार ११ : ६ या महंतलक्षणाच्या समासांत आहे : 'आहे तरी सर्वां ठाईं। पाहों जातां कोठे चि नाहीं। १४'. प्रस्तुत आशयाचा पाठपुरावा ११ : १० मध्यें आढळतो : 'पाहों जातां न संपडावें। येकायेकी॥ ४ कीर्तिरूपें उदंड ख्यात। जाणती लहान थोर समस्त। ५'. १५ : २ या निःस्पृह-व्यापाच्या समासांत 'परी तो कोठें आडळेना। कोणे स्थळीं सांपडेना। २०' असें निःस्पृहव्यापाचें एक लक्षण वरील पाठपुराव्यांत भर टाकणारें आहे. १९ : ९

मधील पुरुष प्रचीतीचे तडाखे लगावून बंडपाखंडाचा धुव्वा उडवितो, तर १५:२ मधील निःस्पृह 'मतें मतांतरें सगट । प्रत्ययें बोलोन करी सपाट । १७'. शब्द वेगळे असले तरी दोहींकडील अभिप्रायांत तत्त्वतः भेद नाहीं. जे विचार महंत व निःस्पृह यांच्या माहितीमध्यें आहेत, ते जर निराळ्या नांवाच्या समासांत दिसले तर दिशाभूल करून घेण्याचें कारण पूर्वग्रहाशिवाय दुसरें काय संभवतें?

आतां ११:५ या समासांतील 'राजकारणा'चें निरीक्षण करायला हरकत नाहीं. समर्थांनीं 'राजकारण' शब्दाची व्याख्या कुठेंच दिलेली नाहीं. चातुर्य शब्दाचा प्रकार असाच आहे. त्यांनीं वापरलेल्या 'उत्तम गुण' या शब्दांची व्याख्येच्या दृष्टीनें अशीच अवस्था दृष्टीस पडते. मूर्ख, कुविद्य, तमोगुणी, करंटा, टोणपा, आळशी यांच्या पडताळ्यानें चतुर, उत्तम, निःस्पृह, महंत, सदेव, इत्यादिकांचा निराळेपणा ओळखून काढावा लागतो. हाच नियम राजकारणासंबंधांतहि लागू आहे. ११:५ मध्यें हरिकथानिरूपण व राजकारण यांची सांगड असून निःस्पृह, महंत, सदेव प्रभृति पुरुषांच्या गुणांशीं व कर्तृत्वाशीं जुळणाऱ्या गोष्टी सांगतां सांगतां १९,२०,२२ या तीन ओव्यांत चार वेळां राजकारण शब्द आलेला आहे. 'राजकारण बहुत करावें । परंतु कळों च नेदावें । १९' 'लोक पारखून सांडावे । राजकारणें अभिमान झाडावे । २०' यांच्यामागून 'हिरवटाला दूर धरावें, कचरटाशीं बोलूं नये, (तरी) संबंध पडल्यास त्यांना सोडून एकीकडे जावें,' असें मनोगत स्पष्ट करून, 'ऐसें असो राजकारण । सांगतां तें असाधारण । सुचित अस्तां अंतःकरण । राजकारण जाणे ॥ २२' याप्रमाणें पूर्वीच्या विवेचनाचा समर्थांनीं उपसंहार केला आहे. असें हें राजकारण सांगून सांगून किती सांगणार? अंतःकरण स्वस्थ असल्यास त्याचें ज्ञान होऊं शकतें. सदर ओवींतले 'ऐसें असो' हे शब्द चालत आलेल्या विषयाचा समारोप दर्शविणारे आहेत व त्यावरून मागें गेल्यास परोपकाराची तत्परता, शांति निर्माण करणें, तऱ्हेवाईकपणाची हकालपट्टी, क्रियाशीलता, अपाय करणें असल्यास तो बोलून दाखविण्याऐवजीं परभारें प्रत्ययास आणून देणें, सहनशीलता, स्वाभिमानाचें रक्षण, 'बहुत सोसितां उरेना। महत्व आपुलें । १८' वगैरे गुण व क्रिया दृष्टीपुढें येऊन समर्थोक्त राजकारणाचें स्वरूप आकलन करतां येतें. प्रस्तुत समासांत समुदाय अनन्य रहाण्याची आकांक्षा आरंभींच व्यक्त झालेली आहे. मध्यें १४ व्या ओवींत पुनः समुदायाचा उल्लेख आहे. २५ व्या ओवींत

एकाबद्दल प्रेम व दुसऱ्याचा द्वेष हीं चातुर्याचीं लक्षणें नव्हेत, असें सांगून राजकारण व चातुर्य यांचें समीकरण समर्थांनीं निदर्शनास आणलें आहे.

'प्रपंचीं जाणे राजकारण। परमार्थीं साकल्य विवरण।' (१९ : ४ : १७) येथील राजकारण शब्दाच्या जोरावर कित्येकांनीं आपल्या विचित्र कल्पनांचें जाळें विणलें आहे. 'प्रपंचीं जाणे राजकारण' म्हणजे प्रपंच सुखाचा होण्यासाठीं लागणारें शहाणपण जाणे, असा अर्थ न घेतां, पॉलिटिक्स हें प्रपंचाचें श्रेष्ठ स्वरूप व माणसानें त्याचा अवलंब करावा, असें या ओवीचरणाचें भाष्य करण्यांत आलें आहे. प्रपंच ही एक लहानशी संघटना असून तिचा सुयंत्रितपणा राखण्याकरितां प्रपंचांतल्या कर्त्या पुरुषाला चातुर्यानें वागावें लागतें. प्रपंचांत पुष्कळ माणसांशीं संबंध येतो, म्हणून मनुष्यपरत्वें किंवा प्रसंगपरत्वें कर्त्या पुरुषाला आपल्या वागणुकीचें नियमन करावें लागतें. निरलस उद्योग, लोकांचा संतोष, सावधपणा, सहनशीलता, प्रपंच-व्यवसायाचें ज्ञान, न्यायनीतीचें रक्षण या गुणावांचून प्रपंच यशस्वी होत नाहीं. ११ : ३, १२ : ९ मधील दिनचर्येचीं वर्णनें प्रस्तुत विवेचनाची साक्ष पटविणारीं आहेत. प्रपंचांतल्या गुणांनींच परमार्थ करतां येतो, असें समर्थांचें निश्चित मत १२ : १ मध्यें प्रकट झालेलें आहे. येथें दर्शविलेले प्रापंचिकाचे गुण निःस्पृह, महंत, सदेव यांच्या परिचयांत गोवलेले असून त्यांतल्या कांहींच्या समुच्चयाला समर्थांनीं राजकारण हा शब्द योजलेला आहे. 'प्रपंचीं जाणे राजकारण' या वचनांतील 'राजकारण' शब्द कौटुंबिक प्रपंच उत्कर्षपूर्वक सफळ करणाऱ्या गुणांना अनुलक्षून समर्थांनीं वापरला याची खात्री करून घेण्यासाठीं त्याच्या मागलापुढला मजकूर जिज्ञासूंनीं पहावा. तुलनेसाठीं 'प्रपंचीं पाहिजे सुवर्ण। परमार्थीं पंचिकर्ण।' (११ : ३ : २९) व स्फुट ओव्या ३०० तील 'प्रपंचीं तें भाग्य परमार्थी वैराग्य', राजवाड्यांनीं 'सरस्वतीमंदिरा'त छापलेल्या रामदासी ओवीप्रबंधांतील 'प्रवृत्तीसी पाहिजे राजकारण' हीं वाक्यें घेतल्यास 'प्रपंचीं जाणे राजकारण' हें वाक्य अधिक स्पष्ट होईल. कुटुंबाचा प्रपंच चालविणाराला आपल्या मनांतील सगळे हेतू नेहमीं उघड करून सांगणें पुष्कळदां शक्य नसतें, हें लक्षांत घेऊन दासबोधांत राजकारणाशीं म्हणजे चातुर्याशीं कांहीं ठिकाणीं जो गुप्तपणा जोडला आहे, त्याचा उलगडा करतां येतो.

समर्थांनीं राजकारण केलें या कल्पनेच्या सिद्धीसाठीं तुळजामातेच्या एका

स्तुतिपर कवितेमधील शक्तीच्या (देहबळाच्या) वर्णनावर भिस्त ठेवीत असतात. या कवितेच्या पहिल्या २१ श्लोकांत 'रामवरदायिनी' या शब्दाचा इतिहास आहे. नंतर २५ पर्यंत प्रतापगडावर तिचा उदय व ती आपली कुलस्वामिनी हा कथाभाग आहे. ३० पर्यंत शक्तीचा प्रभाव निवेदन केलेला आहे. अंगीं शक्ति नसेल तर कला, कांति, युक्ति, बुद्धि यांचाहि अभाव दिसतो. नंतर शक्तीच्या जोडीला युक्ति असल्यास काय घडतें याचें निदर्शन आहे. जो राजा सेवकांना कह्यांत ठेवीत नाहीं, त्याच्या राज्यांतील अंदाधुंदीचें चित्र रेखाटलें आहे. त्यामध्यें 'राजकारण' शब्द आला असून त्याचा अर्थ तेथें युक्ति, शहाणपण असाच निघतो. कारण शक्तीबरोबर युक्तीचें प्रतिपादन चालू आहे. ४२ व्या श्लोकांत 'असो' या उपसंहाराच्या शब्दानंतरच्या वाक्यानें युक्ति स्पष्ट होण्याकरितां मागील विवेचन होतें, याबद्दल शंका रहात नाहीं. 'असो हें बोलणें जालें । युक्तीवीण कामा नये।' असें तें वाक्य असून युक्तीच्या पाठीशीं शक्ति पाहिजे, 'तस्मात् शक्तीप्रमाण हे ॥ ४२' असा निष्कर्ष सादर केला आहे. ४३–४५ मध्यें 'रामाला वर दिला. मला याचा अनुभव नसल्यामुळें तो वर खरा वाटत नाहीं. मग मनांतल्या मनांत कल्पना केली. एकान्तीं बोललों बहु, शेवटीं देवांच्या रक्षणकर्त्या देवाचा उत्सव इच्छिला. आईनें ही इच्छा तृप्त केली.' इत्यादि लांबलचक स्वगतानें ही स्तुति संपविली आहे. या स्तुतीला 'अध्यात्मसार' असें नांव आहे. देवी ही शक्तिरूप असल्यामुळें तिच्या वर्णनांत शक्तीचें माहात्म्य यावें हें सरळ असतां त्यांत पॉलिटिक्स भरलें आहे, याप्रमाणें ग्रह करून घेण्याला अवकाश नाहीं.

दासबोधांतील कोणता विषय कोणत्या समासांत आला आहे, याची माहिती जिज्ञासूला त्वरित करून घेतां यावी, अशा उद्देशानें जे प्रयत्न दीडशें वर्षांमागील काळांत झाले, त्यांचा प्रकाश दासबोधांतील राजकारणाचा अर्थ लावतांना घेतल्यास त्या शब्दाचा अर्थ अधिक निश्चित व स्पष्ट होऊं शकतो. डोमगांव मठांतील ५५ व १०३ या दोन बाडांत दासबोधाचे कोणते विषय कोणत्या समासांत सापडतील याच्या जंत्र्या आहेत. त्या दोहींत १८ : ६ हा समास चातुर्याचा असें म्हटलें असल्याचें पूर्वी एकदां सांगितलें आहेच. यापैकीं ५५ व्या बाडांतील जंत्री सत्कार्योत्तेजक सभेच्या दासबोधांत पहिल्या समासाखालीं टीप म्हणून छापल्याची माहिती वाचकांना आतां झालेली आहे. सदर जंत्र्यांशिवाय 'मुखवस्त्र' या नांवाचीं ओवी·

वृत्ताचीं जंत्रीवजा प्रकरणें आढळलेलीं असून त्यांतलें एक ७९ ओव्यांचें 'मुखवस्त्र' २२५ वर्षांइतकें जुनें आहे. 'श्री रामदास आणि रामदासी' मासिकांतील 'वृत्त, चर्चा वगैरे'च्या दुसऱ्या खंडांत (अंक ११३, लेखांक ११३) हें मुखवस्त्र समग्र छापलें असून, त्यांत ११ : ५ या राजकरणनामक समासाची 'विशाल बुद्धीचें लक्षण' अशी माहिती आहे. १९ : ९ या समासाची 'जैशासी तैशाची मंडळी' एवढ्या लहानशा शेऱ्यानें बोळवण केली आहे. १८ : ६ बद्दल 'साहवा विवेकेंवीण सुंदर वेश' असा अभिप्राय आहे. दुसरें मुखवस्त्र टाकळी मठांतील संग्रहापैकीं आहे. तें १७५ वर्षांचें जुनें आहे. श्री रामदासी संशोधन खंड १ मध्यें पान ७३-७४ वर तें छापलें आहे. या मुखवस्त्राच्या २० व्या ओवींत १८ : ६ समासांतील विषयाची माहिती पुढीलप्रमाणें आहे.

> **नाना युक्तीचें चातुर्य । अष्टादशदशकीं सहावें समासी पर्याय**
> **सांगितला तेणें श्रवणें होय । समाधान ॥ २०**

गिरिधर स्वामीनें स्वात्मबोधवाका, ग्रंथभावार्थ, ग्रंथराजभावार्थ, ग्रंथान्वय, अशीं दासबोधांतील उपदेशाच्या स्पष्टीकरणाचीं चार छोटीं प्रकरणें लिहिलीं आहेत. पहिल्या तिन्हींत १८ : ६ चा उद्देश उत्तम गुणांचें विवरण असा असल्याचें सांगून ग्रंथान्वयांत मुळांतल्या उत्तम पुरुष या नांवावर भागविलें आहे.

'संकेत कुबडी' नांवाचा एक ओवीबद्ध प्रबंध दासबोधांतील विषय दशकसमासवारीनें समजावून देण्याकरितां लिहिला गेलेला असून, तो देखील १५० वर्षांमागचा आहे. ११ : ५ विषयीं त्यांत (१९०७ सालाची आवृत्ति) म्हटलें आहे (पान ४०) :

> **चंचलामध्येंही वर्तणूक । सकळ कळाकौतुक**
> **विचारें राजिक दैविक । करणें हा पांचवा ॥ ११**

यांत 'राजिक' शब्दानें राजकारणाची थोडी तरी इभ्रत राखली गेली असें एक वेळ म्हणतां येईल. परंतु १९ : ९ च्या खुलाशांत 'राजिका'ला साफ काट देण्यांत आला आहे (पान ६६) :

> **नवमीं उदासज्ञानी । समुदायीं हव्यास मनीं**
> **प्रचीतीचें निरूपणीं । साधक ओळखती ॥ १४**

**परी आपण कोणासी न सांपडावे । जैशासी तैसेच योजावे**
**परस्परें आदरावे । ज्यासी त्यास प्रचीत ॥ १५**

१८:६ या वादग्रस्त समासाचें 'कुब्रडी' कारांनीं कोणतें तात्पर्य काढलें हें पुढील ओवीवरून कळेल (पान ६४) :

**शिकविलें सहावे समासीं । अभ्यासावें उत्तम गुणांसी ।**
**धर्मस्थापना जयांपासीं । ते ईश्वरी पुरुष ॥ १६**

मागें गिरिधराच्या तीन टिपणवजा स्वात्मबोधवाक्य, ग्रंथभावार्थ वगैरे प्रबंधातील १८:६ संबंधाचा अभिप्राय सांगितला याखेरीज त्यानें आपल्या 'निवृत्तिराम' ग्रंथाच्या १९ व्या समासांत दासबोधांतील विषयांची माहिती समासवारीनें लिहिली आहे, त्या समासाच्या १२३ व्या ओवींत 'प्रपंचपरमार्थ राजकारण राजयोग साफल्य विवरण लिहिणें वाचणें महंती' असे शब्द एकापुढें एक पाहून त्यांतील राजकारण म्हणजे पॉलिटिक्स असें आग्रहाचें प्रतिपादन पहाण्यांत येतें. मुळांतला राजकारण शब्द जसाच्या तसा वाचकांपुढें ठेवल्यानें त्याच्या कोणत्याच अर्थाचा पत्ता लागत नाहीं. गिरिधर फक्त राजकारणाच्या बाबतींत त्या शब्दाला चिकटून राहतो, यावरून त्याला राजकारणाचा नेमका अर्थ कोणता याचा बोध नव्हता असा ग्रह करून घेणें भाग आहे. ग्रंथान्वय, ग्रंथभावार्थ, ग्रंथराजभावार्थ यामध्यें त्यानें ११:५ व ११:९ या दोन्ही समासांचें ज्ञान फक्त राजकारण हा शब्द जसाच्या तसा ठेवून उघडकीस आणलें आहे. स्वात्मबोधवाक्यांत ११:५ चें राजकारण अनुल्लेखित असून १९:९ विषयीं एक नवा 'राजयोग' शब्द वापरला आहे. गिरिधराच्या समर्थप्रतापांतील दासबोध वर्णनांत (स. ८) दशकांतील विषयांचा परामर्श आहे, परंतु त्यांत राजकारणाला अवकाश दिलेला नाहीं.

स्वानुभव दिनकरांतील १३ : ५ : ६४ ओवींतील राजकारणाचा अर्थ राज्यकारभार असा स्पष्ट आहे. सदर ओवीच्या पहिल्या दोन चरणांचा 'विषयांध राजाचें राजकारण थांबतें' असा आशय आहे. येथें त्याच्या अर्थाविषयीं शंकेला जागा नाहीं. वामन पंडिताच्या एका कवितेंत राजकारण शब्द सांपडतो. परंतु समर्थांच्या काळांत अगदीं शेवटीं किंवा त्यांच्या पश्चात् इतरांनीं राजकारण शब्द कोणत्या अर्थानें वापरला हा वादाचा विषय नाहीं. समर्थांनीं त्याचा उपयोग कोणत्या अर्थानें केला हा वादाचा एकच एक मुख्य विषय आहे. त्यामुळें इतरांचे आधार वायां जावें यांत आश्चर्य नाहीं.

# महाराष्ट्र-धर्म

**राजकारणाइतकाच** समर्थांनीं इतस्ततः दोन वेळां फुटकळपणें वापरलेला 'मऱ्हाष्ट-धर्म' हा शब्द वादग्रस्त होऊन बसला आहे. प्रथम गेल्या शतकाच्या शेवटीं कै. न्या. मू. रानडे यांनीं महाराष्ट्रधर्म या नात्यानें त्याचा अर्थ काय बसवावा हा प्रश्न उपस्थित करून त्याचें लोकोद्धाराच्या दृष्टीनें उत्तर दिलें. त्यांच्या मागून कै. वि. का. राजवाडे, कै. राजारामशास्त्री भागवत यांनीं त्या शब्दाच्या अर्थाचा खल केला. राजवाडे तर आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत त्याची निरनिराळ्या प्रकारें चर्चा करीत होते. त्यांचे शिष्य धुळ्याचे कै. भा. वा. भट यांनीं 'महाराष्ट्र-धर्म' या नांवाचा एक भला दांडगा ग्रंथच लिहून काढला आहे. कै. रानडे यांनीं ज्याची थोडक्यांत वाट लावली, त्या शब्दाचा ग्रंथ व्हावा अशी वस्तुतः मुळामध्यें कसलीच गहनता, संदिग्धता किंवा जटिलता नाहीं. मुळांत जो शब्द मऱ्हाठ, मऱ्हाष्ट होता तो महाराष्ट्र समजला जाऊन तशा रूपानें तो लोकांसमोर सदैव येत गेल्यानें त्याची समाज-वाचकता लोपून तो देशवाचक ठरला व त्याच दृष्टीनें त्याचा अर्थ लावण्याच्या प्रवृत्तीला चालना मिळाली. शिवाजीमहाराजांनीं समर्थांच्या हयातीमध्यें स्वराज्य संपादन केलें व १६७२ सालीं त्यांनीं समर्थांना भेटून त्यांचें शिष्यत्व पत्करलें, या गोष्टींनीं या प्रवृत्तीला पुष्टि आणलेली आहे. समर्थ व शिवाजी यांच्या ध्येयांत व कर्तृत्वांत पूर्व-पश्चिम दिशांसारखें अंतर असूनहि त्यांचें सर्वप्रकारें ऐक्य कल्पून राजवाड्यांनीं महाराष्ट्रधर्माचें अनेकदां विवेचन केलें आहे व तसें करतांना आपण ज्या आधारानें विधानें करतों ते आधार खरे कीं खोटे याची पहाणी करण्याचें भान त्यांनीं ठेवलेलें नाहीं. परंतु राजवाड्यांच्या मताचा अनुवाद महाराष्ट्रांत बहुमान्यतेनें होत असल्या-मुळें त्यांचीं एकट्याचीं मतें तपासणें अवश्य आहे.

राजवाड्यांनीं 'महाराष्ट्र-धर्म' या शब्दाचा परामर्श प्रथम मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १ च्या प्रस्तावनेंत रानड्यांना अनुलक्षून केला. [पुढें दिलेले

पानांचे आंकडे राजवाडे लेखसंग्रह, भाग १, ऐतिहासिक प्रस्तावना या चित्रशाळा-प्रकाशित पुस्तकांतील आहेत.] 'स्वराज्यस्थापनेची कल्पना महाराष्ट्रांतील विचारी पुरुषांच्या मनांत जेव्हां प्रथम आली तेव्हां यवनांच्यासंबंधीं द्वेष व स्वधर्मासंबंधीं प्रेम महाराष्ट्रांतील सामान्य जनांच्या मनांत भरवून देण्याकरितां कथा, पुराणें, यात्रा वगैरे संस्थांच्या द्वारें कित्येक पिढ्या प्रयत्न चालले होते. त्यांच्या योगानें महाराष्ट्रांतील लोकमत जागृत झालें व सर्व लोकांची एकजूट बनविण्याचें बिकट कृत्य साध्य होणें शक्य झालें. पुढें शिवाजीमहाराजांनीं स्वराज्याची मुहूर्तमेढ १६४६ त रोविल्यावर निराळेंच एक संकट उद्भवलें. तें हें कीं महाराजांच्या सेवकसमुदायांत म्हणजे मुत्सद्दी मंडळांत व सेनानायकांत परस्पर मत्सरभाव उत्पन्न होऊं लागला व स्वामिहित व देशहित साधण्याच्या कामीं व्यत्यय येऊं लागले (समर्थांचा सेवाधर्म व दासबोध). तेव्हां समर्थांसारिख्या थोर विभूति पुढें येऊन त्यांनीं ह्या स्वामिद्रोहरूपी व देशद्रोहरूपी रोगांचें उत्पाटन केलें (सेवाधर्म, दासबोध). आयुष्याची इतिकर्तव्यता काय, स्वामिद्रोह व देशद्रोह केल्यापासून आपलेंच अहित आपण कसें करितों, वगैरे विषयांची चर्चा करून, कुचर सेवकांना ताळ्यावर आणण्यास, सुचर सेवकांची भक्ति दृढ करण्यास, लोकांचे विचार सन्मार्गास लावण्यास व राजाला नीतीनें वर्तन करविण्यास, समर्थांसारख्या थोर, विचारी महापुरुषांच्या ग्रंथांचा अत्यंत उपयोग झाला. महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापण्याच्या कामीं मराठ्यांच्या शौर्याचें व मराठ्यांच्या जुटीचें जितकें साहाय्य झालें, तितकेंच, किंबहुना त्याहूनहि जास्त, साहाय्य समर्थांच्या उपदेशाचें आहे. राष्ट्रांतील लोकांना दिशा दाखविण्यास असल्या महात्म्यांची आवश्यकता सदा असते. समर्थ १६८१ त वारले. तदनंतर पंचवीस-तीस वर्षें समर्थांच्या उक्तींचा नाद महाराष्ट्रांतील लोकांच्या कानांत घुमत होता. त्या नादाच्या गुंगींत मराठ्यांनीं १७२० पर्यंत स्वराज्याची स्थापना केली' (पान ९२-९३).

या उताऱ्याचें नीट मनन केल्यास शिवाजीमहाराजांनीं स्वराज्याचा उद्योग सुरू करण्यापूर्वी यवनासंबंधीं द्वेष व स्वधर्मासंबंधीं प्रेम महाराष्ट्रीय सामान्य जनतेंत भरवून देण्याचें काम कथा, पुराणें, यात्रा वगैरे साधनांच्या द्वारें कित्येक पिढ्या चाललेलें होतें, ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट राजवाड्यांनीं कबूल केल्याचें दिसून येईल. कथा, पुराणें, यात्रा यांच्या योगानें लोकमताची जागृति व लोकांची एकजूट हीं बिकट

कृत्यें सिद्ध झालीं, अशी राजवाड्यांची सदर कबुलीला आणखी पुस्ती आहे. दामाजीच्या वेळींच महाराष्ट्रांत यवनद्वेष उत्पन्न झाला या कल्पनेलाहि त्यांनीं आपल्या विवेचनांत स्थान दिलें आहे. तथापि कथा-पुराणादिकांनीं लोकजागृति व लोकांची एकजूट करणाऱ्या व्यक्ती कोण हें सांगण्याचें मात्र त्यांनीं टाळलें आहे. ज्ञानेश्वर-एकनाथांच्या शिकवणीची नालस्ती करणाऱ्या राजवाड्यांना त्यांच्या नांवाचा व पंथाचा उच्चार कसा करवेल? यासाठींच त्यांनीं व्यक्तींचीं नांवें वगळून संस्था हा शब्द मुद्दाम वापरला आहे. पण शिवाजीमहाराजांना पूर्वींच्या कित्येक पिढ्यांमध्यें चाललेली धर्माभिमान राखण्याची व वाढविण्याची कामगिरी उपयोगीं पडली, हा राजवाड्यांचा अभिप्राय ध्यानांत ठेवणें अगत्याचें आहे. या अभिप्रायामुळें १६४६ नंतर स्वामिद्रोह व देशद्रोह हे रोग शमविण्याचें दुय्यम दर्जाचें काम राजवाड्यांना समर्थांच्या गळ्यांत अडकवावें लागलें. दुय्यम दर्जाचें कां होईना, पण समर्थांनीं हें काम बजावलें, यासाटीं सेवाधर्म व दासबोध या वाङ्मयाचा आधार त्यांनीं दोनदां घेतला आहे. त्यांपैकीं दासबोधाचा आधार कवडीमोलाचाहि नसून सेवा (सेवक) धर्माचे समास वाचणारांना तसाच अनुभव येईल. सेवक धर्मांतील शिरजोर नोकरांचें वर्णन सामान्य स्वरूपाचें आहे. दासबोधांत सर्व प्रकारच्या अभिमानाबरोबर देशाभिमानाला अर्धचंद्र मिळाल्यानें देशद्रोहाला थारा नाहीं. सेवकधर्मांत मालकाशीं शिरजोरीनें, बेपर्वाईनें आणि स्वार्थानें वागणाऱ्या सेवकांची कानउघडणी आहे. त्यावरून शिवाजीच्या स्वामिद्रोही नोकरांची शक्कल राजवाड्यांच्या मेंदूंत उगवली. दासबोधांत राज्यकर्ता स्वामी व त्याचा द्रोह करणारे सेवक या विषयाचा गंधहि नसल्यानें आधारादाखल दासबोधाचें नांव नमूद करतेवेळीं राजवाड्यांपाशीं दासबोध नव्हता व त्यांत कोणते विषय आहेत याची आठवणदेखील धड नव्हती, याची निराळी चर्चा नको.

मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या सहाव्या खंडाच्या प्रस्तावनेंत इतिहास व तत्त्वज्ञान यांच्या परस्परसंबंधांविषयीं लिहितांना राजवाड्यांनीं मागल्यापेक्षां अधिक चमत्कार केले आहेत. भगवद्गीतेची प्रशंसा गाऊन ज्ञानेश्वरांच्या शिकवणीची निंदा तेथें त्यांनीं ओकून टाकली आहे. ज्ञानेश्वरांची शिकवण गीतेंतील विचारावर उभारलेली असतां ती शिकवण निंदेस कशी पात्र होते हें कळणें कठीण आहे. 'मी हे भाष नेणे। माझें कांहींच न म्हणे। सुखदुःख जाणणें। नाहीं तेथें॥' ही

किंवा अशा ओव्या संदर्भांतून वेगळ्या काढून त्यांच्या आधारें एकंदर शिकवणीचा निष्कर्ष सांगण्याचें धाडस केवळ भाबड्या अज्ञानाचेंच नव्हे तर जाणत्या अविचाराचें म्हणावें लागतें (पान ३३६). ज्याला 'मी हे भाष नेणे' ही ओवी दिसली त्याला ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्यायांतील

**तुवां शरीरपरा नोहावें । कामनाजात सांडावें ।**
**मग अवसरोचित भोगावे । भोग सकळ ॥ १८८**
**आतां कोदंड घेऊनि हातीं । आरूढ पां इये रथीं ।**
**देईं आलिंगन वीरवृत्ती । समाधानें ॥ १८९**
**जगीं कीर्ति रूढवीं । स्वधर्मांचा मान वाढवीं ।**
**इया भारापासोनि सोडवीं । मेदिनी हे ॥ १९०**

यांसारख्या ओव्या कां दिसू नयेत? राजवाडे यांचीं संतविषयक सारीं मतें बहुधा अप्रामाणिक असल्यामुळें त्यांची जास्त झडती घेऊन येथें काळ व जागा वायां घालविण्याऐवजीं रामदासांबद्दलचीं त्यांचीं इतर तर्कटें तपासण्यावर समाधान मानावें हेंच योग्य वाटतें.

'महाराष्ट्रांतील गुलाम बनलेल्या लोकांच्या बोधार्थ दासबोध नामक इतिहासतत्त्वनिरूपक ग्रंथाची (रामदासांनीं) रचना केली. त्यांतील तत्त्वज्ञान गीतेंतील तत्त्वज्ञानासारखें सर्वदेशी व व्यापक आहे' (पान ३३६). दासबोध म्हणजे गुलामांना केलेला बोध हा राजवाड्यांचा कोटिक्रम बालिश असून निरर्थकहि आहे. दासबोधांत प्रपंचदास्याच्या बद्धावस्थेंतून सुटण्याचा उपदेश आहे. राजकीय पारतंत्र्याच्या निरासाविषयीं एकसुद्धां शब्द त्यांत सांपडायचा नाहीं. दासबोधाच्या अर्थाची स्वच्छंदपणें फोड केल्यावर 'मराठा तेवढा मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा—मारतां मारतां मरावे । मारून आपण उरावे' (यांतील शेवटचा चरण समर्थांचा नाहीं, राजवाड्यांचा आहे!) वगैरे स्पष्टोक्त्या समर्थांच्या प्रसिद्ध आहेत, असा राजवाड्यांनीं आणखी एका विधानाचा उत्पात केला आहे. 'वगैरे स्पष्टोक्त्या' हे शब्द लिहितांना आपले शब्द समर्थांचा दासबोध तर नाहींच पण दुसरीं फुटकळ प्रासंगिक प्रकरणें देखील सावरून धरणार नाहींत, याची राजवाड्यांनीं दिक्कत बाळगलेली नाहीं (पान ३३५–३३६). राजवाड्यांच्या दासबोधविषयक दुर्धर व दुराराध्य अज्ञानाचा प्रताप एवढ्यावर थांबलेला नाहीं.

महाराष्ट्र-धर्म हा महाशब्द कै. रानडे व भागवत यांना 'दासबोधांत प्रमुखत्वानें उच्चारलेला सांपडला व तेवढ्यावरच समाधान मानून ह्या शब्दाचा अर्थ करण्यास ते लागले' (पान २८३). राजवाड्यांचा हा 'महाशब्द' रानडे-भागवतांना दासबोधांत प्रमुखत्वानें आढळला, या वाक्यानें राजवाड्यांचें त्या ग्रंथासंबंधाचें गाढ अज्ञान त्या दोघांवर लादलें गेलें आहे. रानड्यांच्या लेखांत व भाषणांत दासबोधाचें नांव नाहीं. दासबोधांत प्रमुखत्वानें तर राहोच, पण गौणत्वानें देखील या राजवाडेकल्पित महाशब्दाचा उच्चार एकदांहि समर्थांनीं केलेला नाहीं. 'रामदासानें क्षात्रधर्म, सेवाधर्म, राजधर्म, स्त्रीधर्म, पुरुषधर्म वगैरे जे शब्द योजिले आहेत ते' कर्तव्य या अर्थाचे असून महाराष्ट्र-धर्म यांतील 'धर्म' तसाच कर्तव्यबोधक समजावा, असें राजवाडे म्हणतात (पान २८२). नंतर 'धर्म, धर्म-स्थापना, हिंदुधर्म हे शब्द जेथें जेथें दासबोधांत योजिले आहेत तेथें तेथें धर्म हा शब्द दुःखध्वंसाचा मार्ग ह्याअर्थीच योजिलेला आहे. परंतु सेवाधर्म, राजधर्म, स्त्रीधर्म, महाराष्ट्र-धर्म हे शब्द जेथें जेथें दासबोधांत योजिले आहेत, तेथें तेथें धर्म ह्या शब्दाचा अर्थ कर्तव्य असा बिनचूक आहे' (पान २८४). या विधानांबद्दल एकदम स्पष्टपणें सांगून टाकणें अवश्य आहे कीं धर्म, धर्मस्थापना, धर्मवासना हे शब्द दासबोधांत विरलत्वानें आले असून 'हिंदु धर्म' व पूर्वोक्त इतर शब्द दासबोधांत मुळींच सांपडणार नाहींत. समर्थांच्या इतर वाङ्मयांतहि तो नाहीं. सेवा (सेवक)धर्म, राजधर्म, या नांवाचीं प्रासंगिक स्फुट प्रकरणें आहेत. राजधर्माच्या प्रकरणांत एकदांच 'रायांनीं करावे राजधर्म।' असा राजधर्म शब्दाचा उल्लेख आहे. सेवकधर्माच्या प्रकरणांत सेवकधर्म या शब्दाचा उच्चार नाहीं. क्षात्रधर्म हा शब्द राजधर्माच्या स्फुटांत एकदां व क्षात्रधर्माच्या विवरणांत प्रारंभीं दोनदां, एवढी या शब्दांची क्षुद्र प्रयोगसंख्या आहे. स्त्रीधर्म, पुरुषधर्म, हे शब्द तर राजवाड्यांच्या फस्फसलेल्या मेंदूचे बुडबुडे ठरतात. समर्थांना ते आपल्या बोधनिर्माणकाळीं केव्हांच सुचलेले नाहींत. दासबोधांत अमुक शब्द नाहींत हें विधान पाहून समर्थ आपल्या उपदेशाच्या अंगोपांगांना दासबोध म्हणतात, या शोधानें दासबोध म्हणजे दासबोध नांवाचा नवाजुना ग्रंथ न समजतां दासबोध म्हणजे त्यांचें सारें वाङ्मय अशी शक्कल लढविण्याचा मोह राजवाडेभक्तांना झाल्यास, हा शोध राजवाड्यांना टाऊक नव्हता ही वस्तुस्थिति राजवाडेभक्तांनीं विसरूं नये.

'महाराष्ट्रेतर प्रांतांतील हिंदुधर्म + धर्मस्थापना + गोब्राह्मणप्रतिपाल + स्वराज्य-स्थापना + एकीकरण + धुरीधरण' म्हणजे समर्थांचा महाराष्ट्र-धर्म, या कल्पनेचा व्यूह उलगडून दाखवितांना राजवाड्यांच्या इतिहासज्ञतेचे वायबार विचारांत घेतल्याशिवाय भागणार नाहीं. (१) बहुत लोक मेळवून एकविचारें भरण्याचें काम शिवाजीनें संतमंडळीकडून करविलें. ह्या वस्तीला अनुलक्षून समर्थ म्हणतात : ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या। भक्तमंडळ्या मानाव्या। संतमंडळ्या शोधाव्या। भूमंडळीं॥ (२) महाराष्ट्रेतर प्रांतांतील हिंदुधर्मास सहिष्णु हिंदुधर्म म्हटल्यास व महाराष्ट्रांतील हिंदुधर्मास जयिष्णु हिंदुधर्म म्हटल्यास या दोन्ही धर्मांतील भेद उत्कटत्वेंकरून स्पष्ट होईल. दामाजीपंताच्या वेळचा स्तब्ध विठोबा सहिष्णु हिंदुधर्माची मूर्ति आहे व समर्थांचा उड्डाण करणारा मारुति जयिष्णु हिंदुधर्माची पताका आहे (पान ३२–३३). (३) संभाजीराजालाहि महाराष्ट्र-धर्म पसरविण्याचा उपदेश समर्थांनीं केला आहे (पान ३४). राजवाड्यांच्या या तिन्ही वायबारांचा फुसकेपणा सहज ध्यानांत येणारा नाहीं. राजवाड्यांना मायावी शब्दांचें जाळें पसरून लोकांना झुलविण्याची हातोटी कशी साधली होती, याचा पुरावा वरील विधानांतून आहे. 'बहुत लोक मेळवावे। एक विचारें भरावे।' हा विचार संभाजीस लिहिलेल्या समर्थांच्या पत्रांत आहे व तो समर्थांना शिवाजी महाराजांच्या चरित्रावरून सुचलेला दिसतो. हा विचार त्या पत्रांत प्रथम व एकदांच आलेला आहे. परंतु तो शिवाजीराजांनीं संतमंडळीकडून अंमलांत आणला असें राजवाडे समजतात, पण ही संतमंडळी कोण हें सांगण्याचें त्यांनीं साफ टाळलें आहे. समर्थांची दासबोधांतील एक ओवीहि त्यांनीं खेचून या विपर्यासांत बसविली आहे. कारण राजवाड्यांच्या मतें महाराष्ट्र-धर्माच्या विवरणाचे दासबोधांत पांच-सहा समास आहेत. संभाजीच्या पत्रांत जसा महाराष्ट्र-धर्म हा शब्द नाहीं तसा दासबोधांतहि नाहीं, हें लक्षांत ठेवलें म्हणजे महाराष्ट्र-धर्म पसरविण्याचा उपदेश समर्थांनीं संभाजीला केल्याच्या कल्पनेचें बूड आपोआप नाहींसें होऊन ती कल्पना कोलमडते. उरली तुलना सहिष्णु व जयिष्णु हिंदु-धर्मांची. महाराष्ट्रेतर प्रांतांतील हिंदु धर्म सहिष्णु व महाराष्ट्रांतील हिंदु धर्म जयिष्णु या विधानाची यथार्थता स्तब्ध विठोबाच्या निर्देशानें जिज्ञासूंना कशी पटावी? स्तब्ध विठोबा ही महाराष्ट्राची देवता आहे; पण राजवाडे ठासून सांगतात कीं, महाराष्ट्रेतर प्रांतांतील हिंदु धर्म सहिष्णु

होता. त्या हिंदु धर्माची पाठ महाराष्ट्रांतील स्तब्ध विठोबाची मूर्ति कशी राखूं शकणार ? उड्डान करणारा मारुति हें समर्थांचें आराध्य दैवत नव्हतें. त्यांनीं स्थापिलेले मारुति उड्डान करणारे नाहींत. पण येनकेनप्रकारेण महाराष्ट्र-धर्माचा काल्पनिक जयस्तंभ उभा करण्याच्या शाब्दिक उठाठेवीनें गुंगलेले राजवाडे इतका आगापीछा संभाळतील तर मग ते राजवाडे कसले ?

बारकाईनें राजवाडे व रानडे यांच्या 'महाराष्ट्र-धर्म 'विषयक कल्पनांची तपासणी केल्यास दोघांत राजवाडे भासवितात तसा विरोध सांपडत नाहीं. रानड्यांनीं 'Rise of the Maratha Power' या पुस्तकांतील आठव्या प्रकरणाच्या आरंभीं 'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा' या दोन क्षात्र धर्मांतील चरणांचें इंग्रजी भाषांतर दिलें आहे व त्या प्रकरणाच्या अगदीं शेवटीं 'महाराष्ट्र-धर्म' या शब्दाचा उल्लेख केला आहे. धर्म शब्दाच्या विवेचनांत रानड्यांनीं ज्ञानेश्वरांपासून रामदासांपर्यंतच्या साधुपुरुषांनीं जे देवानिमित्त धर्मव्यवहारामध्यें फेरबदल घडवून आणले त्यांचा धावता आढावा सादर करून रामदासांपुढें हा परिवर्तनशील महाराष्ट्र-धर्म होता, असें म्हटलें आहे. याखेरीज रामदासांविषयीं त्यांनीं मुंबईस दिलेलें एक व्याख्यान त्यांच्या धर्म पर व्याख्यानसंग्रहांत छापलेलें आहे. त्यांतहि वरील दोन ओवीचरणांमध्यें रामदासांचा सारा उपदेश सांठविल्याची कल्पना स्वीकारून सिद्धान्त केला आहे कीं, 'महाराष्ट्र धर्म हा हिंदु धर्माहून भिन्न आहे. त्याच्या तोडीचा जेमतेम इंग्रजी शब्द Patriotism होईल.'

महाराष्ट्र-धर्म हा सामान्य हिंदु धर्माहून निराळा, ही रानड्यांची उष्टी कल्पना राजवाड्यांनीं मटकावली आहे. राजवाड्यांच्या गणितांतील एकीकरण व धुरीधरण हे महाराष्ट्र-धर्माचे अवयव रानड्यांच्या लेखांत आहेत. 'मराठा तितुका मेळवावा' या चरणाच्या पुढील इंग्रजी भाषांतरांत—'Unite all who are Marathas together'—एकीकरणाचें तत्त्व दृष्टीस पडतें. 'मराठा तितुका मेळवावा' हा उपदेशाचा पहिला अंश. याबद्दल रानड्यांनीं लिहिलें आहे : "The first advice represents the leading feature of the political movement which assumed its final shape under Shivaji's leadership" (पान १४३). राजवाड्यांनीं या इंग्रजी वाक्याचा मथितार्थ 'धुरीधरण' या शब्दानें साधून आपल्या स्वतंत्र प्रज्ञेचा डौल दाखविला आहे. महाराष्ट्र-धर्म हिंदु धर्माहून निराळा, मराठ्यांचें एकीकरण व

धुरीधरण, या कल्पनांसंबंधांतील राजवाड्यांची उसनवारी याप्रमाणें स्पष्ट आहे. स्वराज्यस्थापना हें कलम समर्थांच्या शिकवणींत नव्हतें. तेव्हां रानड्यांनीं त्याचा विचार करण्याचा प्रश्न उद्भवत नाहीं. परंतु त्यांनीं परक्यांच्या राजकीय वर्चस्वांतून सुटण्याला संतांची कामगिरी उपयोगी पडल्याचा सिद्धांत आपल्या लेखाच्या शेवटीं स्पष्ट मांडला आहे. कीर्तन, पुराणादि संस्थांच्या निर्देशानें त्या कामगिरीला राजवाड्यांनीं मान्यता दिली आहे. तरी सुद्धां स्वराज्यस्थापनेचें सर्व श्रेय समर्थांच्या पदरीं बांधण्याचा राजवाड्यांचा विलक्षण तर्कटी अट्टाहास आहेच. शिवाजीच्यापूर्वी होऊन गेलेल्या कित्येक पिढ्यांनीं स्वधर्माभिमान जळता ठेवला, दामाजीपंताच्या वेळेपासून उद्भवलेला यवनद्वेष पेटता राखला, या अर्थाचीं राजवाड्यांचीं विधानें त्यांच्या या अट्टाहासाची वाफ जिरविणारीं आहेत. राजवाड्यांनीं याविषयीं दुजोऱ्यादाखल घेतलेले शिवाजीच्या मागून सुमारें १२५ वर्षांनीं लिहिलेल्या बखरींचे आधार गैरलागू तसेच निरुपयोगी आहेत.

समर्थांच्या उपलब्ध प्रकाशित समग्र वाङ्मयांत मऱ्हाट-मऱ्हाष्ट्र धर्म हा शब्द फक्त दोन वेळांच आलेला आहे. एकदां शिवाजीमहाराजांना समर्थांनीं लिहिलेल्या पत्रांत व एकदां क्षात्रधर्मप्रकरणांत. तें पत्र व तें प्रकरण हीं प्रासंगिक आहेत. समर्थांनीं आपल्या संप्रदायांत सदैव ज्यांचा अभ्यास व्हावा, असें उपदेशिलें त्या दासबोध, आत्माराम वगैरे वाङ्मयापैकीं हीं प्रकरणें नाहींत. म्हणून त्यांचा रामदासी संशोधनाच्या १८७५ बाडापैकीं अवघ्या पांच सहा बाडांतच समावेश आढळतो. मऱ्हाट हें मऱ्हाष्ट्राचें सुबोध रूप आहे. भाषेला अनुलक्षून 'मऱ्हाटे' हा शब्द दासबोधांत ७ : १ : ३२ व ५२ मध्यें आला आहे. 'देशभाषा मऱ्हाटी' याप्रमाणें एकदां करुणाष्टकांत (१०८) उल्लेख आहे. त्याला मराठ-मराठा असें उच्चारदृष्ट्या जास्त सोपें रूप पुढें हळुहळू प्राप्त झालें. इ. स. १७१० च्या एका महजरांत 'मराठा धर्म' असा शब्द आहे. या किंवा त्याच्या मूळ महाराष्ट्र शब्दामध्यें राजवाड्यांनीं दाखविलेल्या हिंदुधर्म, धर्मस्थापना, गोब्राह्मणप्रतिपाल, स्वराज्यस्थापना इत्यादि भानगडींचा अर्थ शिवाजीमहाराजांस व संभाजीस लिहिलेल्या पत्रांतील मजकुरावरून काढलेला आहे. संभाजीच्या पत्रांत 'मऱ्हाष्ट्र (मराठ्यांचें) राज्य' हा शब्द एकदां आलेला असून शिवाजी महाराजांच्या राज्यकर्तृत्वाला स्मरून त्याचा उपयोग समर्थ करीत आहेत, हें समजणें कठीण नाहीं. शिवाजी

महाराजाच्या पत्रांत देव, धर्म, गोब्राह्मण हे शब्द पाहून गोब्राह्मणप्रतिपाल हा महाराष्ट्र-धर्माचा एक घटक राजवाड्यांनीं निर्माण केला. मराठ्यांच्या एकीकरणाची कल्पना 'मराठा तितुका मेळवावा' या क्षात्रधर्मांतील ओवीचरणानें राजवाड्यांना पुरविली. धुरीधरण हें अंग शिवाजीमहाराजांच्या चरित्रामुळें सिद्धच होतें. धर्म-स्थापना हा शब्द शिवाजीस लिहिलेल्या पत्रांत आलेला असल्यामुळें, शिवाय महाराष्टधर्म या शब्दांत धर्म आहेच म्हणून, धर्मस्थापनेला आपल्या कल्पना-कौतुकांत राजवाड्यांनीं गुंतवून टाकलें. येथें दाखविल्याप्रमाणें समर्थांच्या किरकोळ प्रासंगिक लिखाणांतून दोन तीन ठिकाणचे तुकडे एकत्र जोडून राजवाड्यांनीं आपली महाराष्ट्र-धर्माची गोधडी तयार केली आहे. भाषासौष्ठवाचा व अर्वाचीन देशाभिमानाला खुलविणाऱ्या भावनांचा भडक रंग या गोधडीवर चमकत असल्यामुळें राजवाड्यांच्या मताला भक्कम आधार असल्याप्रमाणें भाबड्यांना वाटतें.

शिवाजीमहाराजांनीं स्वराज्य मिळवून त्याला स्थिरत्व आणल्यावर समर्थांनीं 'तुमचे देसीं' आपलें वास्तव्य असल्याचें त्यांच्या निदर्शनास आणलें, तेव्हां 'तुमच्या पराक्रमामुळें महाराष्ट्र धर्म कांहीं उरल्याचा अनुभव येतो,' असें समर्थांनीं म्हटलें. मुसलमान राज्यकर्त्यांच्या हातून वारंवार घडणाऱ्या धार्मिक जोरजुलमाचा प्रतिकार करणारा राजा समर्थांच्या माहितीमध्यें हें पत्र लिहितांना शिवाजीखेरीज दुसरा कोणी नव्हता. जो धर्म शिवाजी महाराजांमुळें वांचला, तो धर्म म्हणजे सामान्य हिंदु धर्माशिवाय दुसरा कोणता सांगतां येणार ? देव, गोब्राह्मण, यांचा प्रतिपाळ हें केवळ महाराष्ट्रांतल्या हिंदूंचें अनन्य धर्मलक्षण होतें व देशाच्या इतर भागांतील बाकीचे हिंदु राजे देवगोब्राह्मणांच्या उच्छेदाला मदत किंवा त्याची उपेक्षा करणारे होते, असें जोंवर कुणालाहि सिद्ध करतां येत नाहीं, तोंवर देवगोब्राह्मण यांच्या रक्षणाचें भूषण एकट्या महाराष्ट्र-धर्माचें ही राजवाड्यांची कल्पना प्रमाण-शुद्धतेच्या विश्वासानें स्वीकारतां येत नाहीं. क्षात्रधर्माच्या उपदेशांतील आपला महाराष्ट्र-धर्म वाढवावा, हें वचन आपला हिंदु धर्म वाढवावा, या साध्या अर्थाचेंच आहे. देवाच्या उच्छेदाचा व स्वधर्महानीचा समर्थांना उद्वेग वाटत होता व तोच 'देव मात्र उच्छेदिला । आपुला स्वधर्म बुडविला' या वचनांत व्यक्त झालेला आहे. म्हणून 'देव मस्तकीं धरावा', 'देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते ।' हीं वचनें क्षात्रधर्मांत दृष्टीस पडतात. या प्रकरणांत गोब्राह्मणांच्या

संरक्षणाची वाच्यता एका अक्षरानेंहि केलेली नाहीं. समर्थांच्या साऱ्या शिकवणींत सामान्य माणसानें गोरक्षण करावें, असा उपदेश कुठेंच आढळत नाहीं. क्षत्रियांच्या कर्तव्यांत गोब्राह्मणाचें रक्षण असल्याचे संदर्भ रामायणांत व पुराणांतून क्वचित् दृग्गोचर होतात. एकनाथांच्या ग्रंथांत त्याचा आदर झालेला आहे. जोंवर गोवध करणाऱ्या ग्रीकांची व त्यांच्यानंतर भरत-खंडाबाहेरून आलेल्या इतर गोमांसभक्षक जमातींची गांठ पडली नव्हती, तोंवर भारतीयांना गोरक्षणाचें कर्तव्य क्षात्रधर्मांत भरीला घालण्याचें कारण नव्हतें. राजा म्हणजे क्षात्रधर्माचा मूर्तिमंत अवतार. त्याच्या गुणांत गोब्राह्मणप्रतिपालाचें कर्तव्याचरण जमेस धरण्याचा प्रघात गोमांस-भक्षकांच्या परिचयानंतर पडला व तो समर्थांनीं शिवरायासंबंधांत संभाळला आहे. वस्तुतः क्षात्रधर्मांत त्याचा अंतर्भाव असावयास हवा होता. पण तेथें तो नाहीं. आतां एक दोन उदाहरणानीं मऱ्हाष्ट-धर्माची अधिक मीमांसा करायला हरकत नाहीं.

मुंबईची रामाजी कामत ही व्यक्ति मुंबईतील इंग्रजांच्या शिवकालीन राज्यकार-भारांत प्रसिद्ध असल्याचें इतिहासज्ञांना माहीत आहे. या व्यक्तीचें इ. स. १६९२ सालांतील एक पत्र भारत इतिहाससंशोधक मंडळाच्या शिवचरित्रसाहित्य खंड ९ मध्यें पहायला सांपडतें (ले. ८३). या पत्रांत 'राजकी उपद्रव' हे शब्द आहेत; 'मऱ्हाष्ट धर्म' या शब्दाचा खुलासेवार उपयोग केलेला आहे. मुंबईत झोल म्हात्रा व जंवर म्हात्रा या दोघां जणांनीं आपल्या जातीच्या पन्नास-पाऊणशें जणांना न जुमानतां बाळा नांवाच्या भ्रष्ट झालेल्या इसमास जातीमध्यें घेतलें, वेंटा आगरी नांवाच्या इसमाला जातींत सामील होण्याची या दोघांनीं बेधडक सवलत दिली. हा इसम मनजी देवजी नांवाच्या माणसाकडे जेवीतखात असे. याबद्दल रामाजी कामत लिहितो : 'मनजी म्हणजे त्याचा मऱ्हाष्टधर्म मात्र परंतु वरकड अवघा आचार मुसलमानाचा.' पुढें या झोल-जंवरांच्या उपद्व्यापाची हकीकत रुजू करून रामाजी कामतानें ज्याला पत्र त्या दामाजी आपाजी प्रभुदेसाई व देशकुळ-कर्णी मामले चौल यास विनंती केली आहे : 'झोल व जंवर हे तों आपले ढंग सांडीत नाहींत येही मागां कितेक अनुचित गोष्टी केल्या आहेत व पुढेंही यास सलुग दिल्हेयानें (याकडे कानाडोळा केल्यानें) आपल्या कर्तव्यास चुकणार नाहीं. त्यास मऱ्हाष्ट यातीचा बंद राखावा अनुचित पदार्थ होऊ नेदावा हें भल्यास विहित आहे.' यावरून मऱ्हाष्ट म्हणजे मऱ्हाठे—महाराष्ट्रांतील हिंदु—हा अर्थ अगदीं स्पष्ट

आहे. नंतरच्या 'मऱ्हाष्ट्र याती'च्या उल्लेखानें त्याविषयीं शंका बाळगण्याचें कारण उरत नाहीं. 'मऱ्हाष्ट्र धर्म मात्र वरकड अवघा आचार मुसलमानाचा' हा खुलासा मऱ्हाष्ट्र धर्माच्या अर्थासंबंधांत पुष्टि देणारा आहे. रामाजी कामत जसा मुंबईचा अर्थात कोकणपट्टींतला तसाच 'मराठा धर्म' ज्या महजरांतला तो महजर लिहिणाराहि कोकणपट्टींतला आहे. निवाड्याच्या व्यवहारांत वादीप्रतिवादीकडून शपथ घेववितांना जवळ गाय व सुरी ठेवली, असा मजकूर त्या महजरांत आहे. खोटी शपथ म्हणजे गोहत्या असा या देखाव्याचा उद्देश होता. तेव्हां 'हजीर मजालसी व गोत मिलोन अर्ज केला कीं गाई आणुन उभी केली. सौगंद (शपथ) करावया कबुल जाहले. अमा आमचा मराठा धर्म असे.' गाईचा मान राखण्याचा आशय येथील मराठा धर्म या शब्दांत आहे. प्रस्तुत महजर राजवाडे संशोधन मंडळ, धुळें या संस्थेच्या प्रकाशनांत (क्र. ४) 'ऐतिहासिक वृत्त चर्चा वगैरे'मध्यें छापलेला आहे.

दासबोधांतील परमार्थाच्या उपदेशावर राजवाड्यांनीं जें स्वराज्यविषयक भाष्य रचलें आहे, त्याला दासबोधांतच नव्हे तर समर्थांच्या इतर वाङ्मयांतहि बिल्कुल आधार नाहीं. तो राजवाड्यांचा नुसता उद्दाम कल्पनाविकार आहे. दासबोधांत काय भरलें आहे याचें स्वतः समर्थांनींच त्या ग्रंथाच्या पहिल्या समासांत स्पष्टीकरण केल्यामुळें त्यासंबंधांत दुसऱ्या कुणावर जिज्ञासूला विसंबण्याचें कारण नाहीं. दासबोध हा शुद्ध निर्भेळ परमार्थाचा ग्रंथ आहे. परमार्थाला जातगोत, बायकोमुलें, आईबाप, स्नेहीसोबती यांतल्या कुणाचेंच ममत्व मान्य नाहीं. सर्व जिव्हलगांचा पूर्णपणें त्याग करून देवाचें सख्य जोडावें, हें एक परमार्थाचें महत्त्वाचें तत्त्व आहे. म्हणूनच 'माझा देश, माझा गांव, माझा वाडा, माझा ठाव' यांच्यावर रजोगुणाचा शिक्का मारून समर्थांनीं त्यांची त्याज्यता उघडकीस आणली आहे (२ : ५ : १५). मुमुक्षूच्या उद्वेगविषयांत देह, कुळ, द्रव्य इत्यादिकांचे नाना अभिमान आहेत (५ : ८ : ४०). साधकाच्या गुणांत कुळाभिमानाच्या निःशेष त्यागाला स्थान देऊन आपल्या परमार्थाची दिशा तेथें स्पष्ट दाखविली आहे (५ : ९ : ३६). पुनः एकदां १० : ६ : २९ मध्यें देहाभिमान, कर्माभिमान, जात्यभिमान यांना समर्थांनीं भ्रमांत ढकलून आपली परमार्थदृष्टि सामान्य अभिमानांनाच नव्हे तर ज्ञानाच्या व मोक्षाच्या अभिमानालासुद्धां कशी तुच्छ लेखते याची ओळख पटविली आहे. मी आणि माझें या दोन भावनांचें निर्मूलन हा ज्या परमार्थाचा मुख्य आधार तो परमार्थ स्वदेहाभिमानापासून

स्वदेशाभिमानासकट सारे अभिमान घातकी ठरवील व त्यांचें वारेंहि साधकानें स्वतःस लागूं न देण्याचा आग्रह दाखवील यांत नवल कसलें? दासबोधांत समर्थांनीं या परमार्थाचें प्रतिपादन केलेलें असल्यामुळें देशाभिमान व देशद्रोह या गुणदोषांना त्यांत साहजिकच स्थान नाहीं. दासबोधाचा अभ्यास करणारांना स्वदेशाभिमान, स्वराज्य या गोष्टी दासबोधांत नसल्याचें सकृद्दर्शनींच कळण्यासारखें आहे. समर्थांना केवळ एका देवाचा अभिमान आहे. त्या अभिमानाच्या अनुषंगानें उद्भवणाऱ्या सर्व प्रश्नांचा त्यांनीं शक्य तेवढा जास्तींत जास्त विचार पुनः पुनः दासबोधांत व अन्यत्र, कित्येकदां तर त्याच त्याच शब्दांनीं आणि वाक्यांनीं, घोळलेला आहे.

स्वधर्मरक्षण, धर्मवासना, धर्मस्थापना हे शब्द मधून मधून दासबोधांत डोकावतात. त्यांचा आशय पाहूं गेल्यास वर्णाश्रमांचें पुनरुज्जीवन करण्याची आकांक्षा त्यांत आढळत नाहीं. ब्राह्मण, शूद्र, क्षत्रिय, नीच हे शब्द तत्कालीन रूढार्थानें समर्थ वापरतात. गृहस्थ वानप्रस्थ, संन्यासी असा आश्रमांचा उल्लेख आहे. १४ : ७ च्या प्रारंभीं गृहस्थाश्रमाची स्तुति आहे. ब्रह्माच्या ठिकाणीं जातिभेद, वर्णभेद, वर्णपरत्वें सोवळें-ओवळें किंवा अधिकारपरत्वें उंच-खालीं, देहपरत्वें स्त्रीपुरुष असा भेदभाव नसतो हें सांगूनहि, रोजच्या सामाजिक व्यवहारांतील विषमतेच्या अस्तित्वाचा त्यांनीं तीव्र युक्तिवादाच्या पुरस्कारानें दासबोधांत उच्चार केला आहे. यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दानें, (कार्तिक-माघांतलीं) स्नानें, (सहस्र-लक्ष) भोजनें, व्रतें, तीर्थाटनें, पुरश्चरणें, देवळें, मठ, पार, वृंदावनें, दीपमाळा, घाट, देवाच्या उत्सवाचीं वाद्यें, वाहनें, उपकरणें, वस्त्रेंभूषणें, खाद्यें, लिंगें, लाखोल्या, अभिषेक, उपासना इत्यादि गोष्टींचा समर्थांनीं मोठ्या आस्थेनें दासबोधांत कितीदां तरी उल्लेख केला आहे. आपल्या मनोगताच्या विस्तारांत संध्या, वैश्वदेव, भजन, देवतार्चन, मंत्रध्यान, समुदाय, निष्ठानेम, प्रदक्षिणा—नमस्कार, अतिथि-अभ्यागतांचें स्वागत, अध्यात्माचें वाचनमनन, गाणें, नाचणें, टाळी वाजविणें, या कर्मांचा जसा, तसाच विद्या, वैभव, कुळ, लक्ष्मी, शक्ति, कला, मुद्रा, दीक्षा, युक्ति, बुद्धि, आचार, विचार, क्रिया, सत्त्व, विवेक, भक्ति, ज्ञान, वैराग्य, शांति, क्षमा, समयप्रसंग जाणणें, प्रयत्न, अभ्यास, प्रबोधशक्ति, प्रत्यय, आर्जव, मैत्री, उपरति, त्याग, समता, योग, धारिष्ठ, परोपकार, सहिष्णुता इत्यादि गुणांचाहि आदर केलेला आहे. विद्येची महती समर्थांनीं गाइली असली, तरी मल्लविद्या, शस्त्रविद्या या विद्या, युद्ध देखावें, ऐकावें, करावें,

मारावें, मरावें, ही भावना त्यांनीं तमोगुणाच्या व कुविद्येच्या विवरणांत ढकलून त्यांविषयीं पराकाष्ठेचा तिटकारा प्रकट केलेला आहे. उत्तम, विरक्त, सत्त्वगुणी, सद्विद्येचा, सदेव, महंत, निःस्पृह, विमल, जाणता या निरनिराळ्या नांवांनीं ज्या आदर्श व्यक्तींचीं कमीजास्त उठावदार चित्रें समर्थांनीं दासबोधांत व इतरत्र रेखाटलीं आहेत, त्यांत मागें सादर केलेल्या गुणकर्मांखेरीज दुसरें कांहींच सांपडणार नाहीं. नरदेहाच्या प्रशंसेंत (१ : १०) किती तरी अद्भुत कृत्यांचा गोतावळा आहे, पण राजकीय दास्यांतून किंवा परधर्माच्या जुल्मांतून सुटण्याच्या प्रयत्नासारखें एकसुद्धां कृत्य त्या गोतावळ्यामध्यें दिसणार नाहीं.

कवित्व, कीर्तन, वक्तृत्व हीं लोकजागृतीचीं साधनें आहेत. ग्रंथांचा लोकजागृतीला उपयोग होतो. समर्थांनीं ग्रंथ, कवित्व, कीर्तन, वक्तृत्व याचा मान ज्या दृष्टीनें केला आहे त्या दृष्टींत परमार्थाव्यतिरिक्त दुसरा कोणताच विषय नाहीं. १ : ७ हा कवींच्या स्तुतीचा समास आहे. 'देवांचे रूपकर्ते, ऋषींचे महत्त्ववर्णिते, नाना शास्त्रांचें सामर्थ्य ते कवि वर्णितात, कवींचा व्यापार नसता तर जगोद्धाराची आशाच नव्हती, म्हणून कवि हे सृष्टीचे आधार होत (२०-२१)' ही समर्थमतें कवींची कामगिरी आहे. १४ : ३ हा कवित्वकलानिरूपणाचा समास वरील कामगिरीचें स्वरूप निवेदन करणारा आहे. 'गति, वित्पती, मती, स्फूर्ति, धारणा, धृती, शंका-आशंका, प्रत्योत्तर, प्रसंग, विचार, योगविवर(ण), तत्त्वचर्चासार, साधनें, पुरश्चरणें, तपें, तीर्थाटणें,' हे कवित्वाचे विषय असून 'अनुताप उपजे, लौकिक लाजे, ज्ञान उमजे प्रबळे, वृत्ति मावळे, भक्तिमार्ग कळे, देहबुद्धी तुटे, भवसिंधु आटे, भगवंत प्रगटे, सद्बुद्धि लागे, पाषांड भंगे, विवेक जागे,' एतावता 'जेणें होये समाधान। जेणें तुटे संसारबंधन। जया मानिती सज्जन। तया नांव कवित्व ॥ ५३' अशी समर्थमान्य कवित्वाची व्याख्या व फलश्रुति आहे. कीर्तनाचा रंग याहून वेगळा नाहीं. कीर्तनांत प्रसंगानुसार 'पदें दोहडे श्लोक प्रबंद धाटी मुद्रा अनेक छंद वीर थाटिंव विनोद, नवरसिक, शृंगारिक, गद्यपद्याचें कौतुक, पश्चात्ताप उत्पन्न करणारीं वचनें,' याप्रमाणें सामग्री कामास आणून 'भक्तिज्ञानवैराग्य, नीति, न्याय स्वधर्मरक्षण, साधनमार्ग, अध्यात्मनिरूपण' हे विषय 'प्रांजळपणें बोलावें, वेद पारायण करावें, पुराण सांगावें, मायाब्रह्मीचें विवरण साकल्य वदावें, ब्राह्मण्य आदरें रक्षावें' हीं कीर्तनानें सिद्धीस नेण्याचीं कर्तव्यें उपदेशिलीं आहेत. वक्तृत्वाचा विचार जुन्या दासबोधांत (३) विस्तारानें केलेला आहे. भक्त,

विरक्त, प्रेमळ, दीनवत्सल, गंगाजलनिर्मळ हृदयाचा, परोपकारी, धार्मिक, सिद्ध विवेकाचा, बोलाप्रमाणें क्रिया करणारा, निराश, निरभिमान, अशा गुणांचा वक्ता पाहिजे. त्याचें ज्ञान पुस्तकी नसावें, अनुभवाचें असावें, हें त्याचें समर्थोक्त स्वरूप. यापुढचे दोन समास गुरुशिष्यलक्षणांचे नव्या दासबोधाच्या पांचव्या दशकांत दुसरा व तिसरा या क्रमानें घेतले आहेत. या लक्षणांत राजकीय दास्यांतून सुटण्याचें अर्थात् स्वराज्यस्थापनेचें ध्येय दिसत नाहीं. चातुर्वर्ण्यमूलक धर्मरक्षणाचाहि अंश त्यामध्यें आढळत नाहीं. कारण ब्रह्मात्मैक्याच्या परमार्थाला बहुतांशीं चातुर्वर्ण्याचें किंवा जातवारीचें वावडें आहे. चातुर्वर्ण्याच्या सामान्य आचार-संग्रहांत जपतप, अनुष्ठान, पुरश्चरण, तीर्थाटन या कर्तव्यांना प्राचीन स्मृतिग्रंथांनीं जागा दिलेली नाहीं. या कर्तव्यांना भक्तिमार्गाकरितां पुराणांनीं आपल्या कोठ्यांत समावून घेतलें आहे. हीं कर्तव्यें महंत-विरक्तांच्या, निःस्पृह-सदेवांच्या, गुरुशिष्यांच्या समर्थकृत प्रवचनांत दिसलीं तर तें सरळच म्हटलें पाहिजे. समर्थांनीं स्वकाळीं जो स्मृतिप्रणीत धर्म लोकांमध्यें शिल्लक होता त्याच्या रक्षणाविषयीं इतस्ततः वाच्यता केलेली आहे. त्या धर्माच्या ज्या अंगांचा लोप झाला होता, त्यांना समर्थांच्या विचारांत उजळा मिळालेला नाहीं. ब्राह्मणांनीं आपलें महत्त्व गमावल्याचा खेद त्यांनीं व्यक्त केला आहे व त्यांच्या श्रेष्ठतेला उचलून धरलें आहे. परंतु परमार्थाचा अनुभव देणारा जो सद्गुरु त्यापुढें ते ब्राह्मणवर्णाची मातब्बरी बाळगीत नाहींत. राजवाड्यांनीं बनविलेल्या महाराष्ट्र-धर्माच्या व्याख्येंत समर्थांवर लादलेल्या स्वधर्मस्थापनेचें खरें स्वरूप कळण्यासाठीं त्या विषयाचें दिग्दर्शन केलें आहे. ७ : ९ मध्यें ग्रंथ कशाला म्हणावें या प्रश्नाच्या उत्तरांत ‘ जेथें नुपजे विरक्ती भक्ती । तो ग्रंथचि नव्हे ।। ३५ मोक्षेंविण फळश्रुति । ते दुराशेची पोथी । ३६ ’ असें समर्थांचें खणखणीत मत प्रगटलें आहे. श्रवणाचा समास (४ : १) या मताच्या पुष्ट्यर्थ पहाण्याजोगा असून त्याची चर्चा मागें केलेली आहे. थोडक्यांत म्हणजे राजवाड्यांनीं समर्थांच्या मऱ्हाष्ट्रधर्माचें नांव पुढें करून स्वतःचें नागडें मनसोक्त यथेच्छ नाचविलें आहे व एकप्रकारें जनतेला फसविलें आहे.

समर्थांच्या परमार्थाला जर युद्धादि कर्में पत्करत नाहींत तर त्यांनीं क्षात्रधर्माचें व्याख्यान दिलें कशाकरितां, अशी शंका काढण्याला हरकत नाहीं. ११ : ३ मधील दिनचर्येंत ‘ ज्या ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबर्दार । १९’ असें एक वचन आहे.

त्यास अनुसरून लढाऊ पेशाच्या लोकांना त्यांनीं क्षात्रधर्म सांगितला, असा वरील शंकेचा परिहार करतां येतो. समर्थांना भेटण्याला, त्यांचा आशीर्वाद व जमल्यास अनुग्रह मिळविण्याला शिवाजीमहाराजांच्या पदरचे किंवा दुसरे मराठे सरदार शिपाई आल्यास त्यांचा व्यवसाय ध्यानांत घेऊन त्यांनीं आपली कामगिरी चोख बजावली पाहिजे, अशा धोरणाचा समर्थांनीं उपदेश करावा आणि हे भेटणारे सर्व मऱ्हाष्ट्र-मराठे हिंदु असल्यामुळें त्यांनीं देव मस्तकीं धरावा, देवद्रोही कुत्र्यांना मारूनपिटाळून लावावें, जेवढे मराठे मिळतील तेवढे एकत्र आणून मऱ्हाष्ट्र–मराठ्यांचा म्हणजे हिंदूंचा धर्म वाढवावा, हा संकेत या उपदेशांत समर्थांच्या देशकालज्ञतेला किंवा सारासारविचारणेला पूर्णपणें शोभणारा आहे. ७ : ९ मध्यें समर्थांनीं ज्याला जें आवडतें तेंच सांगावें, नाहीं तर हाताचें वीरकंकण नाकांत घालण्यासारखा आचरटपणा घडायचा, 'जेथील तेथें आणिकीं । कामा नये सर्वथा ॥ १५', असा विवेक सागितला आहे. शिपाई बाण्याच्या माणसांना लढावें कसें हें समजावून देण्याऐवजीं ध्यान-कीर्तनावर जिभेचा पट्टा चालविण्याइतके समर्थ व्यवहारशून्य बुद्धीचे नव्हते. त्यांनीं क्षात्रधर्माचें प्रकरण कुणासाठीं रचलें याचा आणखी थोडा खुलासा पाहिल्यास असें दिसून येईल कीं, मऱ्हाष्ट्र-धर्म वाढविण्याचा सल्ला मराठा सरदार-शिपायांना देण्याला योग्य अशी स्थिति त्या वेळीं महाराष्ट्रांत उद्भवली होती. शिवाजीमहाराजांनीं चालविलेला उद्योग जसा या खुलाशामुळें डोळ्यासमोर येतो, तसाच बाजी घोरपडे, दिनायतराव प्रभृती जे कोणी समर्थांच्या कार्याकडे सहानुभूतीनें पहाणारे व साह्य पोंचविणारे लोक होते, त्यांचाहि थोडाफार स्वधर्माभिमान जिज्ञासूंच्या दृष्टिक्षेपात आल्याशिवाय रहात नाहीं. प्रसंग व माणसें पाहून त्यांना जें उचित असेल तें सांगणें, हा समर्थांच्या स्वभावाचा विशेष घटक आहे. त्याला धरूनच संभाजीस उपदेशपत्र लिहितांना त्यांनीं 'मऱ्हाष्ट्र राज्य करावें जिकडे तिकडे' ही शब्दयोजना अंमलांत आणली. बापाचा कित्ता त्याच्या पश्चात् मुलानें गिरवावा, हा उपदेशाचा मामुली शिरस्ता त्या पत्रांत दिसतो. समर्थांचा हा स्वभावघटक विसरल्यास बाग-बनकटीनिरूपण, कारखाना, इमारत, मानसपूजा या प्रकरणांची संगति लावतां येणार नाहीं. दा स बो धांतील देवाच्या वैभवांत ज्या इमारतींचा निर्देश आहे तशा इमारती उभारण्याचा प्रसंग येतांच शिष्यांना मार्गदर्शन व्हावें म्हणून त्यांनीं कारखाने-इमारतींचीं प्रकरणें लिहून काढलीं असावीं,

अशी कल्पना करवते. त्यामध्यें विटांची लांबीरुंदी, त्या तयार करण्यास लागणारी सामग्री व दक्षता, मजुरांची निवड, त्यांच्याकडून काम करवून घेण्याची तऱ्हा, मजुरीचें तारतम्य, इत्यादि विषयांचा बारीक विचार आहे. मठ-मंदिरांभोंवतीं बाग लावण्याची आवश्यकता उत्पन्न झाली तेव्हां त्यांनीं बागेचें प्रकरण अस्तित्वांत आणलें. समर्थांच्या काळांत 'उदंड गोसावी उतले' (जनस्वभाव गोसावी, ओवी ७) असा अनुभव येत असल्यामुळें समर्थांनीं भोंदू बुवांच्या हजेरीचा मजकूर एकूण ७० ओव्यांच्या 'जनस्वभाव किंवा बहुधा गोसावी' या प्रबंधांत लिहून काढला. केव्हां तरी लोक उंदरांचा संहार करीत असल्याचें दृष्टीस पडल्यावर समर्थांनीं त्यासंबंधीं अकरा ओव्या रचल्या. घर, वस्त्रें, धान्य, यांचा उंदरांनीं फडशा चालविला, याविषयींचें गाऱ्हाणें त्यांनीं एकदां ५ ओव्यांत गाइलें आहे. एकदां रानांतील वस्तीच्या जागीं पिसवांचा त्रास उद्भवला, त्यास अनुलक्षून समर्थांचें लहानसें कवित्व आहे. समर्थांना अरण्यवासामुळें वादळी वाऱ्यापावसानें घडणारे परिणाम पहावे लागले. रानांतील जलप्रवाहांचे ध्वनि, नानाविध जंगली प्राणी, त्यांचे खेळ व आवाज यांचा समर्थांना नेहमींचा परिचय होता. दासविश्रामधामकर्ते आत्माराम स्वामी एकेहळ्ळीकर यांनीं आपल्या ग्रंथांत सदर दोन विषयांवरील समर्थांच्या कविता दाखल केलेल्या आहेत (पान २४४ ते २५२). नुसत्या फळांच्या यादीची एक कविता श्री रामदासकृत स्फुट प्रकरणांत आढळते (पान ३९०). माणसांच्या निरनिराळ्या नांवांचीच एक लहानशी कविता आहे. प्रस्तुत उदाहरणांचा इत्यर्थ एवढाच कीं, ज्या वेळीं जो अनुभव किंवा विचार मनांत उत्कटपणें घोळत असेल, त्यास अनुसरून समर्थ कविता रचीत असत. क्षात्रधर्म, राजधर्म, सेवकधर्म हीं प्रकरणें अशांपैकीं प्रासंगिक असून, त्यांना कायमच्या स्वरूपाची शिकवण ज्यांत आहे, त्या दासबोधाच्या मोलानें लेखण्यामध्यें व त्यांतून स्वतःच्या कल्पना काढण्यामध्यें समंजसपणा नाहीं.

नी- ८२५

# कवित्व आणि कविता

**समर्थांच्या** ग्रंथरचनेंत कवित्वाचा अंश किती आहे यासंबंधांत वाद आढळतो. समर्थ हे खरे कवि नसून त्यांची वाङ्मयरचना कवितेसारखी दिसते. कवित्व ज्याला म्हणतात, त्या गुणाचा सामान्यतः त्यांच्या वाङ्मयांत बहुतांशीं अभाव आहे, असें प्रतिपादणारा एक वर्ग आहे. कवित्वाच्या साहित्यशास्त्रानें प्रचलित केलेल्या व्याख्यांच्या कसोटीवर समर्थांचे ग्रंथ नीरस वाटतात, असा त्या वर्गाच्या प्रतिपादनाचा अर्थ करतां येतो. समर्थांना साहित्यशास्त्र अवगत होतें, असें त्यांनीं क्वचित् केलेल्या नवरसांच्या उल्लेखावरून दिसतें. परंतु रसवर्ग व त्यांतला शृंगार समर्थांना आपल्या ध्येयाप्रीत्यर्थ मान्य नव्हता, असें ठरविण्याला दासबोधांत व त्यांच्या इतर वाङ्मयांत पुरावा आहे. त्यांनीं स्वतः कवि आणि कवित्व या दोन्ही विषयाचा विचार दासबोधांत स्वतंत्रपणें मांडला असल्यामुळें त्यांचें कवित्व त्यांच्या विचारानुसार पारखलें पाहिजे. धीट, धीटपाठ हे कवित्वाचे दोन प्रकार समर्थांच्या मतें हीन असून प्रासादिक कवित्वाची त्यांनीं प्रशंसा गाइली आहे. कामिक, रसिक, शृंगारिक, वीर, हास्य, प्रस्ताविक, (पश्चात्तापाचें) कौतुक, विनोद, हे 'किंवा मन जालें कामाकार। तैसे चि निघती उद्गार' किंवा 'व्हावया उदरशांती। करणें लागे नरस्तुती।' (१४ : ३ : ११-१३) असल्या विषयांच्या कवित्वाला समर्थांनीं धीटपाठ म्हटलें असून 'धीटपाठें परपार। पाविजेत नाहीं ॥' असा त्यांचा रोखठोक निर्णय आहे. परोपकारासाठीं कवित्व अवश्य आहे; परंतु त्यांच्या परोपकारांत भक्ति-विरक्तीला प्राधान्य आहे. देवाची प्रसन्नता हें भांडवल संपादून मग त्या योगानें 'जें जें घडे बोलणें, तें अत्यंत श्लाघ्यवाणें' असतें व त्यासाठींच त्याला 'प्रासादिक' समजतात, असें समर्थांचें स्पष्टीकरण आहे. समर्थांनीं कवित्वाची कला कीर्तनाला जोडली आहे. कवित्व निर्मळ, सरळ, अन्वयाचें प्रांजळ असावें. त्यामध्यें अहंता नसावी. मृदु मंजुळ कोमल भव्य अद्‌भुत विशाल गौल्य माधुर्य रसाळ हें कवित्वाचें स्वरूप भक्ति-

रसानें साधावें, अशी समर्थांनीं त्याविषयीं अधिक परिस्फुटता केलेली आहे. १४ : ३ या समासाबरोबर १ : ७ हा कवीश्वरस्तवनाचा समास वाचल्यास कवि आणि कवित्व हे दोन्ही विषय समर्थदृष्ट्या कसे होते, याचा बोध होईल आणि समर्थांचें कवित्व हें त्याच्या विवेचनाप्रमाणें तपासणें अवश्य असल्याबद्दल शंका रहाणार नाहीं.

कवित्व सोपें म्हणजे कुणालाहि सहज समजणारें असावें, हें लक्षण समर्थांच्या कवित्वासंबंधांत सर्वत्र यथार्थ आहे. निर्मळ, सरळ व प्रांजळ, भव्य, अद्‌भुत, विशाल इत्यादि लक्षणें त्यांच्या कवित्वांत भरपूर दृष्टीस पडतात. या लक्षणांचे मासले देऊं लागल्यास लहानसा वेगळा ग्रंथच लिहावा लागेल; तथापि तीं लक्षणें जिज्ञासूंना अवगत होण्यासाठीं थोडेसे मासले येथें सादर करणें अवश्य आहे. ९ : ९ हा समास संदेहनिवृत्तीचा आहे. ब्रह्म आणि मायेचें दृश्य, यांमध्यें ब्रह्म सर्वप्रकारें श्रेष्ठ; किंबहुना ब्रह्माच्या विशालत्वांत दृश्याचा 'सागरामध्यें खसखस' या न्यायानें ठावठिकाणादेखील सांपडायचा नाहीं; मात्र हा अनुभव मतीच्या विशालत्वानें येऊं शकतो, असा विषय जिज्ञासूच्या गळीं उतरविण्याकरितां समर्थांनीं केलेलें विवरण मुद्दाम नजरेखालीं घालण्याजोगें आहे.

मती करितां विशाळ । कवळों लागे अंतराळ ।
पाहातां भासे ब्रह्मगोळ । कवीठ जैसें ॥ ३०
वृत्ति त्याहून विशाळ । करितां ब्रह्मांड बद्रीफळ ।
ब्रह्माकार होतां केवळ । कांहीं च नाहीं ॥ ३१
आपण विवेकें विशाळला । मर्यादेवेगळा जाला ।
मग ब्रह्मगोळ देखिला । वटबीजन्यायें ॥ ३२
होतां त्याहून विस्तीर्ण । वटबीज कोटिप्रमाण ।
आपण होतां परिपूर्ण । कांहीं च नाहीं ॥ ३३
आपण भ्रमें लहानाळला । केवळ देहधारी जाला ।
तरी मग ब्रह्मांड त्याला । कवळेल कैसें ॥ ३४
वृत्ति ऐसी वाढवावी । पसरून नाहीं च करावी ।
पूर्ण ब्रह्मास पुरवावी । चहूंकडे ॥ ३५

जंव येक सुवर्ण आणितां। तेणें ब्रह्मांड मढवितां।
कैसें होईल तें तत्त्वतां। बरें पाहा॥ ३६
वस्तु वृत्तीस कवळे। तेणें वृत्ति फाटोन वितुळे।
निर्गुण आत्मा च निवळे। जैसा तैसा॥ ३७

पुढील उतारा (९:१०) व्यावहारिक तारतम्याचा तर्कदृष्ट्या बोध करून देणारा आहे:

देउळामधें जगन्नायेक। आणी देउळावरी बैसला काक।
परी तो देवाहून अधिक। म्हणों नये कीं॥ १
सभा बैसली राजद्वारीं। आणी मर्कट गेलें स्तंभावरी।
परी तें सभेहून श्रेष्ठ चतुरीं। कैसें मानावें॥ २
ब्राह्मण स्नान करून गेले। आणी बक तैसे चि बैसले।
परी ते ब्राह्मणापरीस भले। कैसे मानावे॥ ३
ब्राह्मणामधें कोणी नेमस्त। कोणी जाले अव्यावेस्त।
आणी स्वान सदा ध्यानस्त। परी तें उत्तम नव्हे॥ ४
ब्राह्मण लक्षमुद्रा नेणें। मार्जर लक्षविषईं शाहाणें।
परी ब्राह्मणापरीस विशेष कोणें। म्हणावें तयासी॥ ५
ब्राह्मण पाहे भेदाभेद। मक्षिका सर्वांस अभेद।
परी तीस जाला ज्ञानबोध। हें तों न घडे कीं॥ ६
उंच वस्त्रें नीच ल्याला। आणी समर्थ उघडा च बैसला।
परी तो आहे परीक्षिला। परीक्षवंतीं॥ ७

ब्रह्माचें समत्व (७:२) मागील उताऱ्यासारखेंच अतिशय सोप्या भाषेंत विशद केलें आहे:

उंच नीच नाहीं परी। राया रंका येकि च सरी।
जाला पुरुष अथवा नारी। येक चि पद॥ २४
ब्राह्मणाचें ब्रह्म तें सोवळें। शूद्राचें ब्रह्म तें वोवळें।
ऐसें वेगळें आगळें। तेथें असे चि ना॥ २५

उंच ब्रह्म तें रायासी । नीच ब्रह्म तें परिवारासी ।
ऐसा भेद तयापासीं । मुळिं च नाहीं ॥ २६
सकळांसि मिळोन ब्रह्म येक । तेथें नाहीं हे अनेक ।
रंक अथवा ब्रह्मादिक । तेथें चि जाती ॥ २७
स्वर्ग मृत्य आणि पाताळ । तिहीं लोकींचे ज्ञाते सकळ ।
सकळांसि मिळोनि येक चि स्थळ । विश्रांतीचें ॥ २८
गुरुशिष्या येक चि पद । तेथें नाहीं भेदाभेद ।
परी या देहाचा समंध । तोडिला पाहिजे ॥ २९
देहबुद्धीचा अंतीं । सकळांसि येक चि प्राप्ति ।
येक ब्रह्म द्वितीयं नास्ति । हें श्रुतिवचन ॥ ३०
साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपीं मिळाले ।
अवघे मिळोन येक चि जाले । देहातीत वस्तु ॥ ३१
ब्रह्म नाहीं नवें जुनें । ब्रह्म नाहीं अदिक उणें ।
उणें भाविल तें सुणें । देहबुद्धीचें ॥ ३२

श्रीरामदासांची कविता प्रथम खंड यांतील ९ व्या स्फुट प्रकरणांत वृद्धावस्थेचें पुढील शब्दचित्र समर्थांच्या वर्णनशैलीची उत्कृष्ट कल्पना आणून देणारें आहे :

देह्याचा भर्वसा नाहिं । तारुण्य चळतें जनीं ।
वृधापीं विटंबे काया । रूप विद्रूप होतसे ॥ १
कॆस ते रेसिमा ऐसे । पुढें बुकुल होतसें ।
टकलें पडती माथां । सेंडीचा ठाव जातसे ॥ २
दुरुनी ऐकिजे कानीं । ते कर्ण बधिरावले ।
दुरुनी न्याहाळे डोळां । ते डोळे मंद जाहाले ॥ ३
नासिकीं गळतें पाणी । जिव्हेची बोबडी वळे ।
दांत ते सर्वहि गेले । मान हाले निरंतरीं ॥ ४
हाताच्या जाहाल्या कांबी । कोथळु पंजरु दिसे ।
वांसाड निघालें मागें । सर्वांगीं मास सुकलें ॥ ५
बगाड्या मोकळ्या जाल्या । पोटाची काचरी वळे ।
कांटकें पोटऱ्या मांड्या । पायांची वेगडी वळे ॥ ६

उदंड पाहिली पृथ्वी । उंबरा उंच जाहाला ।
पाळिलीं पोसिलीं होतीं । हांसती तेंची माणसें ॥ ७
सरतो धरेना वारा । मळमूत्र चहुंकडे ।
खोकितां वोकितां नाशी । नाना दुखें बळावलीं ॥ ८
मागील आठवे सवैं । दुख वाटे क्षणक्षणा ।
आक्रंदे तो कणे कुंथे । आयुष्य न सरे कदा ॥ ९
सर्व येकीकडे जाती । हांसती खेळती सुखें ।
पाहातां न येती कोण्ही । आपलाल्या कामाकडे ॥ १०
ऐसें हें दुख वृधापीं । कळलें पाहिजे जना ।
परत्र साधणें आधीं । तारुणींच उठाउठी ॥ ११

'करुणाष्टकें वगैरे' मध्यें स्फूर्तिविषयक सहा श्लोकांची एक कविता आहे (पान ७६). तिच्यांत समर्थांच्या दृष्टांतांमागील स्वतंत्र प्रज्ञा व भावनेची उत्कटता, व्यापकता हे गुण अनुभवास येतात:

हवाया नळे बाण भांडीं अनंतें । बळें सोडितां जाति आकाश-पंथें
बती लागतां वेळ नाहीं उठाया । तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥ १
वरी पाहतां दृष्टि हे दूर धांवे । तयाच्या सवें कल्पना हे उठावे
उठे मारुती वेळ नाहीं उडाया । तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥ २
फिरे वावरे वात सर्वांत जैसा । चळे नीवळे ही कळे पष्ट तैसा
धरीतां बळें संधि नाहीं धराया । तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥ ३
विवेकी विवंचूनिया लागवेगें । पळे सर्वही दृश्य सांडूनि मागें
उपायेंचि तो जाय लंघूनि माया । तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥ ४
असावें तरी सर्व कांहीं असावें । नसावें तरी लेश तेंही नसावें
परब्रह्म तें वीवराया वराया । तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥ ५
म्हणे दास रे वास भूतीं भुतांचा । तयाचे परी निर्गुणीं निर्गुणाचा
विचारेंचि वीनासती अष्टकाया । तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥ ६

करुणाष्टकांतील देवाच्या आळवणीची कितीतरी कविता महाराष्ट्रीय भाविकांच्या कंठस्थानीं विराजमान होऊन त्यांना देवभक्तीचें समाधान पुरवीत आहेत. 'रघु-

नायका मागणें हें चि आतां', 'उदासीन हे वृत्ति कोठें न लागे', 'तुझा दास मी वेर्थ जन्मासि आलें', 'बरें सत्य बोला यथातथ्य चाला' (मुलांना शिकवण), 'उदासीन हा काळ कोठें न कंठे', 'अनुदिन अनुतापें तापलों रामराया', 'बुद्धि दे रघुनायका' इत्यादि कविता भक्तिप्रेमाच्या रसाळपणाचा परिचय करून देणाऱ्या आहेत. मारुतीचीं समर्थकृत स्तवनें अशींच पुष्कळांच्या माहितीचीं आहेत. मृदु मंजुळ कोमल हीं विशेषणें समर्थांनीं देवाच्या आळवणींत सार्थ केलीं आहेत. भव्य अद्भुताची योजना मारुतिस्तवनांत दिसून येते. मनोबोध किंवा मनाचे श्लोक या कवितेंत ठिकठिकाणीं विचाराचा भव्यपणा आणि रचनेचा सरळपणा यांचा सुंदर संगम पहायला सांपडतो.

एखाद्या विषयाचें विवेचन करतां करतां त्या विवेचनाचा सारांश लहानशा सुभाषितप्राय वाक्यांत सांगून टाकण्याच्या कुशलतेला काव्यगुणांत गणतां येते. अर्थ-गौरव या शब्दानें साहित्यशास्त्राच्या व्यापारांत प्रस्तुत गुणाचा होणारा मान सर्वांच्या परिचयाचा आहे. दासबोधांत या गुणाचा प्रत्यय पुष्कळदां येतो, अशीं सुभाषितें उदाहरणादाखल येथें सादर केल्यास समर्थांच्या प्रतिभेची कल्पना स्पष्ट होईल.

प्रपंच अथवा परमार्थ । जाणता तो चि समर्थ । ९ : ४ : १९<br>
तैसें जयांस ज्ञान जालें । ते ते तितुके च तरले । ९ : ७ : ३६<br>
भोळा भाव सिद्धी जाव । हा उधाराचा उपाव ।<br>
रोकडा मोक्षाचा अभिप्राव । विवेकें जाणावा ॥ ९ : ७ : ४९<br>
देहरक्षणाचा उपाव । जाणती कळा ॥ १० : १ : १२<br>
सत्यायेवढें सुकृत नाहीं । असत्यायेवढें पाप नाहीं ॥<br>
प्रचीतीविण कोठें चि नाहीं । समाधान ॥ १० : १० : ५४<br>
येरवी ब्रह्मज्ञानेंविण । जें जें साधन तो तो सीण ॥ १० : १० : ५०<br>
निर्गुणीं जे अनन्यता । ते चि मुक्ति सायोज्यता ॥ ११ : १ : ४२<br>
जेथें परीक्षेचा अभाव । तेथें दे घाव घे घाव ।<br>
सगट सारिखा स्वभाव । लौंदपणाचा ॥ ११ : ४ : २३<br>
प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थीं खोटा ॥ १२ : १ : ९<br>
लोकीं बरें म्हणायाकारणें । भल्यांस लागतें सोसणें । १२ : २ : १३

**जें जें जये प्रसंगीं जालें । तेथें काळाचें नांव पडिलें । १२ : ८ : १३**
**असतें येक वाटतें येक । त्याचें नांव हीन विवेक । १२ : ८ : १८**
**जो बहुतांस मानला । तो जाणावा शाहाणा जाला । १५ : ३ : २६**

समर्थांनीं आपल्या भाषेला संस्कृत किंवा परदेशी शब्दांची अटक ठेवलेली नाहीं. परदेशी शब्द वापरल्यानें आपली भाषा विटाळते असा त्यांचा ग्रह नव्हता. त्यांच्या आधीं एकनाथांनीं अनेक मुसलमानी शब्द आपल्या ग्रंथांत दाखल करून एकप्रकारें त्या शब्दांच्या स्वीकाराचा कित्ता घालून दिला होता. आपला उपदेश सुबोध होण्यासाठीं लोकांच्या परिचयाचे जे शब्द सहज सुचतील, स्फुरतील त्यांचा उपयोग करावयाचा ही समर्थांची दृष्टि होती. शिवाय समर्थांच्या ज्ञानभांडारांत हिंदी-हिंदुस्तानी भाषेच्या उत्तम परिचयाचा समावेश असल्यामुळें त्यांनीं एकनाथ-तुकारामांच्या मानानें अधिक मुस्लिम शब्द बेधडक वापरले आहेत. मराठी कवितेंत गम (दुःख), गुमान, तुफान, बेफाम, जबर्दस्त, खबर्दार, साहेब, सुरनीस, फडनीस, बाजीगरी, दिवाण (न्यायालय), जर (सोनें), जिन्नस, मसाला, मोंबत्ती (मेणबत्ती), जमाना, कमान, बेइमान, बाज (सत्ताणा), मस्त, तोलदार, फौज, कतार (रांग), तमाशा, बाजार, एकजिनसी, रूबरू वगैरे पुष्कळ शब्द समर्थांनीं वापरले आहेत.

समर्थांच्या भाषेचा एक उल्लेखनीय विशेष म्हणजे त्यांनीं उत्पन्न केलेले कांहीं वाक्प्रचार व नवे शब्द हा होय. राजकारण या शब्दाचा दासबोधांत मूळ अर्थ पॉलिटिक्स असा नसला तरी आज तो पॉलिटिक्स या अर्थानें सर्वमान्य झालेला आहे. मराठी भाषेला या शब्दाची समर्थांच्या वाङ्मयांतून एक देणगी मिळाली आहे. कै. लो. टिळकांचें गीतारहस्य बारकाईनें पाहिल्यास त्यांनीं तेथें उपयोगांत आणलेले कित्येक शब्द मुळांत समर्थांचे आहेत, असें लक्षांत येईल. विश्वाची ‘उभारणी व संहारणी’ (समर्थ ‘उभार संहार’ असेहि शब्द योजतात), ब्रह्माचा ‘एकजिनसी’पणा व मायेचा ‘बहुजिनसी’पणा या शब्दांचें मूलस्थान दासबोध असल्याचें दासबोधाच्या अभ्यासकांना सांगायला नको. देवाचें ‘चढतें वाढतें’ वैभव, यांतील ‘चढतें वाढतें’ या वाक्प्रचाराचे जनक समर्थ असून त्याचा प्रयोग त्यांच्या पश्चात् कांहीं काळ चालू होता, अशी शके १६१८ (इ. स. १६९६) तील मार्गशीर्ष-फाल्गुनांतील श्रीसंप्रदायाच्या कागदपत्रांतील (खंड १) ‘चढता वाढता महोत्सव चढतें वाढतें

राज्य' या शब्दांवरून खात्री पटायला हरकत नाहीं. 'म्हैसमंगळु' हा समर्थांच्या शब्दसृष्टींतील एक खास निंदाव्यंजक शब्द आहे. त्याचा वापर लोकांत झाला नाहीं. श्री रा म दा सी क वि ते च्या स्फुट प्रकरणांत ९ श्लोकांचें यासंबंधीं एक स्वतंत्र प्रकरणच आहे. 'तो प्राणी म्हैसमंगळू' असा प्रत्येक श्लोकाचा चतुर्थ चरण आहे. विवेकानें निश्चय झाल्यावरहि ज्याला संदेह बाधतो, दृश्य हें सारें मिथ्या असें ज्याला कळूनहि जो लोकांच्या दंडकाला बळी पडतो, पंचीकरण महावाक्याच्या निश्चित ज्ञानानें मुक्त होऊन सुद्धां जो लोकांच्या बोलानें ढासळतो, शास्त्रें अभ्यासूनहि जो संशयांत रहातो, ज्याचें जिणें पराधीन, अशा स्थितीच्या माणसाला 'म्हैसमंगळु' ही संज्ञा समर्थांनीं लावली आहे. या शब्दाचा इतिहास कळणें अशक्य असून समर्थांनीं त्याचा या प्रकरणाखेरीज अन्यत्र फारसा उपयोग केलेला नाहीं.

आपल्या कवितेच्या रचनेंत सहज ओघानें रोजच्या व्यवहारांतील घरगुती शब्द किंवा म्हणी उपयोगांत आणणें हा समर्थांच्या वाङ्मयाचा आणखी एक विशेष सांगतां येतो. समर्थांचें वाङ्मय हें त्यांच्या सहजोद्गारांचें भांडार असल्यामुळें त्यांत रचनेच्या खटपटीची कृत्रिमता आढळत नाहीं. सन १९३२ च्या मार्गशीर्षांत समर्थांच्या जांबगांवीं कित्येक लोकांनीं जमून दा स बो धा ची चर्चा केली. त्या चर्चेंत तिसऱ्या दशकाच्या पहिल्या पांच समासांतील स्वगुणपरीक्षेच्या भाषेचा प्रश्न निघाला व त्या समासांतील घरगुती शब्द निवडण्यांत आले. त्यांची नोंद श्री रा म दा स आ णि रा म दा सी मासिकांतील 'वृत्तचर्चा वगैरे'च्या १६७ व्या लेखांकांत पहायला सांपडते. लोकांच्या तोंडीं असलेल्या रोजच्या सहज वापरांतील शब्द यान्च पांच समासांत आहेत व इतरत्र नाहींत असा प्रकार नाहीं. तसे शब्द सर्वत्र आहेत. शब्दांप्रमाणें म्हणींचा देखील समर्थांनीं ठिकठिकाणीं आवश्यकतेप्रमाणें उपयोग केला आहे. शितावरून भाताची परीक्षा, मुंगीस मुताचा पूर, दर्यामें (सागरामध्यें) खसखस, याप्रमाणें अनेक म्हणी समर्थवाङ्मयांत आहेत. दा स बो धां-तील कित्येक शब्द समर्थांनीं आपल्या माहितीच्या अर्थानें वाङ्मयांत घेतले व तो नेमका अर्थ आज प्रचलित किंवा अज्ञात असल्यामुळें ते शब्द दुर्बोध वाटतात. जांब-गांवच्या या चर्चेंत अशा कित्येक शब्दांचे स्थानिक अर्थ जाणत्यांनीं सांगितल्याचा निर्देश आहे. उदाहरणार्थ, कुकडें–सुताचें भेंडोळें, सोपें–केळीचें सोप किंवा सोपट, वटक–बेंबीखालीं गांठ येणें, इत्यादि. कांहीं शब्दांचे अर्थ जांबगांवाच्या

परिसरांतले तर कांहीं ज्या प्रदेशांत समर्थांच्या आयुष्याचा उत्तरार्ध गेला त्या सातारा जिल्ह्यांतले आहेत. नामांचीं आणि विशेषणांचीं क्रियापदें हा एक विशेष येथें नमूद केल्याखेरीज या विषयाची पूर्तता होणार नाहीं.

समर्थांची कवित्वशक्ति मान्य केली तरी तिच्यांत कांहीं दोष निःसंशय आहेत. ते दोष ओवीछंदाच्या रचनेंत नसून श्लोकरचनेंत आहेत. समर्थ हे वृत्तांचे नियम पाळीत नाहींत. यामुळें गणमात्रांची ओढाताण अनुभवास येते व वाचनाच्या गतीला वारंवार धक्के बसतात. पुनरुक्ति हा दोष समजल्यास तो येथें नमूद करणें अवश्य आहे. परंतु समर्थांची लोकशिक्षणाची भूमिका ध्यानीं घेतल्यास पुनरुक्तीच्या दोषाला फारसें महत्त्व देतां येणार नाहीं. लोकांना पारमार्थिक दृष्ट्या शहाणे करण्यासाठीं जो विषय शिकवायचा तो जर एकदां सांगून गळीं उतरणारा नसेल तर त्याची पुनः पुनः निरनिराळ्या रीतीनें वाच्यता केल्याशिवाय उपदेशकाला गत्यंतर नसतें. समर्थांना आपल्या उपदेशांतील पुनरुक्तीची जाणीव होती. त्यांनीं या विषयीं बऱ्याच वेळां दासबोधांत खुलासा केला आहे. दासबोधांतील व त्यांच्या इतर वाङ्मयांतील समास किंवा ओव्या, अष्टाक्षरी स्फुटें, श्लोक प्रकरणें ही रचना एकेका विषयावरील निबंधाप्रमाणें दिसते. साध्या सोप्या भाषेनें दृष्टांतांचें साह्य घेऊन आपला विषय श्रोत्यांच्या गळीं नीट उतरवावा असें समर्थांचें धोरण आहे. आजच्या उपदेशकाला आपलें ज्ञान जनतेच्या चित्तावर ठसविण्याकरितां जसा पुनरुक्तीचा अवलंब करावा लागतो, तसाच समर्थांनीं केलेला आहे; यामुळें पुनरुक्ति हा दोष असला तरी तो उपदेशकाच्या भूमिकेचा असल्यानें कवित्वपरीक्षणांत त्याचा आदर करतां येत नाहीं.

कवित्वाविषयीं आत्मविश्वास दृढ होण्यापूर्वी स्वतःकडे कमीपणा घेण्याचा नव्या कवींचा प्रघात जमेला धरल्यास स्फुट श्लोक ५८ चें लघुरामायण हें समर्थांच्या कवितारचनेची प्राथमिक दशा व्यक्त करणारें ठरेल. 'लहानसा कवी नवा' असे शब्द तेथें स्वीकारले आहेत. करुणाष्टक २ मध्यें स्वतःला 'लघुसा कवी' म्हटलें आहे. भाषेचा आणि भावनेचा संयम सुटणें हें प्रारंभकाळाचें लक्षण मानल्यास तें समर्थकृत लघुकाव्यांतून दृष्टीस पडतें. जुन्या दासबोधाच्या ११ व्या समासांत रोग्याच्या कुपथ्यामुळें रोग भडकल्यास वैद्याला दोष देण्यांत अर्थ काय, या

दृष्टांताच्या विस्तारांत 'झक्य माराया पथ्य मोडिलें । ५' असें म्हटलें आहे. 'लंडीच्या युद्धासी गेला । तो मोडता वेळ न लगे ॥ २२' (कित्ता : १२). याच समासांत देहाच्या नश्वरतेबद्दल 'आणि अंतीं नासोनि जातें । रांडेचें अमंगळ ॥ ३४' असें म्हटलें आहे. या दोन विधानांची भाषा सदोष असल्याबद्दल निराळें विवेचन नको. शुद्ध स्वरूपस्थितीमध्यें जन्ममृत्यूचें भान शिल्लक रहात नाहीं, हें शिष्याला समजावून देतांना समर्थांनीं जी तोंडांत मारण्याची धमकी दिली आहे, ती भावनेचा तोल सुटल्याची दर्शक आहे. 'स्वामी म्हणती शिष्यासी । आतां संदेह धरिसी । तरी श्रीमुखावरी खासी । निश्चयेसी ॥ १५' (अंतर्भाव ५). येथें हें सांगून ठेवणें अवश्य आहे कीं भाषेचे किंवा भावनेचे हे प्रकार मुद्दाम शोधून काढल्याखेरीज लक्षांत न येण्याइतके विरळ आहेत. सामान्य माणसें आपसांत बोलतांना एकेरीवर येऊन ज्याप्रमाणें आपल्याबद्दल खात्री पटण्यासाठीं एकमेकांची शपथ वहातात, तशी शपथेची भाषा एकवीस समासीच्या १० व्या आणि १४ व्या समासांत दिसते. 'ऐसें यथार्थचि सांगेना । त्यासी बापाची आण ॥ २२'. प्रकृतीच्या खेळांत 'भर्तारा सहित प्रसवली' ही घटना जर खोटी वाटत असेल 'तरी आण तुझी रे शिष्या ॥ ६'. दासबोधांत शपथेचा प्रसंग आहे, पण तेथें व्यक्तीला अनुलक्षून आण उच्चारलेली नसून समर्थांनीं आपली उपासनाच पणाला लावली आहे. आपल्या चालू हयातींत मोक्ष मिळतो, ह्या निश्चयोक्तीविषयीं जो विकल्प करीत बसेल तो सिद्ध असला तरी पतन पावेल; निश्चयोक्ति ही खोटी आहे असें मानणाराला 'उपासनेची आण', असें तेथें म्हटलें आहे (६ : ९ : ३०).

'ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद । येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग' या रचनेंतील आत्मविश्वासाचा दणदणीतपणा समर्थांच्या लघुकाव्यांतून दिसत नाहीं. पंचसमासीच्या शेवटीं 'आरुष बोबडा वाणी । भावें पूजिला कोदंडपाणी । ३४' अशी लीनता दाखविली आहे. दासबोधांत आधारादाखल घेतलेल्या ग्रंथाचीं नांवें संशय व संकोच सोडून दृढाभ्यासाच्या निर्भयपणानें सांगून टाकलीं आहेत. एकवीस समासीच्या दुसऱ्या समासांत 'जें बोलिलें वेद पुराणीं । तें म्यां ऐकिलें सांगणी वागणी । १४' याप्रमाणें आत्मविश्वास न मुरलेल्या व्यक्तीसारखें विधान आढळतें. मनाच्या मोकळेपणानें स्वतःचें ध्येय व कार्य बोलून दाखविण्याची तऱ्हा दासबोधांत

आहे. एकवीस समासीच्या नवव्यांतील 'तसा मीहि येक पिसाट। उगीच करितों वटवट। ८

मी जें बोलतों कांहीं। तें माझें प्रमाण नाहीं
मज सकळलोकीं कोण्हीहि। न मानिजेती ज्ञातृत्वें ॥ १४
म्हणोनिया मी ब्रह्मपिसा। बडबड करितों भलतैसा
मज बरें म्हणेल तोहि पिसा। माणुसकी त्यासी नाहीं ॥ १५
माझे पोटीं होती हाव। जे जाणोनि घ्यावें वस्तूचें नांव
तव विचारितां शब्दउपाव। खुंटोनि गेला ॥ १६
म्हणौनि हें मज बोलवेना। न बोलतां सुख वाटेना
स्वानुभव उद्गार आवरेना। त्यासि मी काय करूं ॥ १७

या वचनासारखीं वाक्यें दासबोधांत दाखवितां येणार नाहींत. या वचनांत वाङ्मय-कार्यांतील नवशिकेपणा स्पष्ट भासतो. दासबोधाच्या ६ : ७, १० : ७ व ८ मध्यें वरच्या उद्गारांना शोभणारे उद्गार आहेत. परंतु त्यांमध्यें गांभीर्य असल्याचा अनुभव तुलनेनें जिज्ञासू घेऊं शकतील.

•१•

दासबोधाच्या संमार्जनांत समर्थांच्या इतर अनेक प्रबंधांचा निर्देश विचारसाम्य दाखविण्यासाठीं आलेला आहे. परंतु त्या प्रबंधांची नांवनिशीवार माहिती दिल्या-शिवाय समर्थवाङ्मयाचें समालोचन पुरें होणार नाहीं. सत्कार्योत्तेजक सभेनें रामदासी मठांतील बाडांच्या आधारें दासबोध, श्रीरामदासांची कविता प्रथमखंड व द्वितीयखंड, करुणाष्टकें, पदपदांतरें, मनाचे श्लोक याप्रमाणें कांहीं वाङ्मय अधिकृतरीत्या प्रसिद्ध केलें आहे. श्रीरामदासांच्या कवितेच्या प्रथमखंडांत रामायण, ओव्या, स्फुट ओव्या, षड्रिपु, पंचीकरण योग, चतुर्थमान, मानपंचक, पंचमान, स्फुट प्रकरणें, स्फुट श्लोक, इतके विषय आहेत. दुसऱ्या खंडांत पूर्वारंभ, जुनाट पुरुष, अंतर्भाव, आत्माराम, पंचसमासी, सप्तसमासी, सगुण ध्यान, निर्गुण ध्यान, मानसपूजा, एकवीस समासी म्हणजेच जुना दासबोध, जनस्वभाव किंवा बहुधा गोसावी अशीं अकरा लहान मोटीं प्रकरणें आहेत. करुणाष्टकांत बहुतेक

सर्व श्लोकबद्ध काव्यरचना असून समर्थांच्या मननप्रवचनाचे अनेक विषय तेथें गोवलेले आहेत. पदपदांतरांत कीर्तनोपयोगी कविता आहे व तिच्यांतील कांहीं हिंदी-हिंदुस्तानी भाषेंत आहे. मनाचे श्लोक हें प्रकरण अत्यंत लोकप्रिय असल्यामुळें त्याबद्दल येथें आतांच अधिक लिहिण्याची आवश्यकता नाहीं. हें सारें वाङ्मय दासबोधाप्रमाणेंच भक्तीच्या परमार्थाचें आहे. त्याचें स्वरूप त्याच्या अंतरंगांत डोकावून पाहिल्यानें समजणारें आहे.

समर्थांचें **रामायण** अवघ्या दोन कांडांचें आहे. सुंदरकांड १०१ श्लोकांत संपविलें असून युद्धकांडाचे १३ सर्ग आहेत. बाकीच्या सर्व देवांच्या कथा सोडून आपण रामाची कथा कां गातों, या प्रश्नाचें उत्तर समर्थांनीं

> **जेणें फेडिला पांग ब्रह्मादिकांचा । बळें तोडिला बंद त्या त्रीदशांचा ।**
> **म्हणोनी कथा थोर या राघवाची । जनीं ऐकतां शांत होते भवाची ॥७**

याप्रमाणें उत्तर देऊन टाकलें आहे. रामभक्त या नात्यानें देवांचा उद्धार करण्याचें जें ध्येय समर्थांनीं आपल्या मनाशीं निश्चित केलें होतें त्याचें साफल्य रामकथेंत सांठविलें असल्यामुळें त्या कथेचा आपल्या कवित्वानें सन्मान करण्याला समर्थांनीं प्रवृत्त व्हावें यांत नवल नाहीं. इस्लामी अंमलाच्या धाकानें समर्थांच्या काळीं अनेक देव नद्यांच्या डोहांचा बंदिवास सोशीत होते. त्यांना तसल्या बंदिवासांतून सोडविण्याची कामगिरी स्वतःकरितां निवडतांना रामाचा पराक्रम समर्थांच्या डोळ्यापुढें उभा असावा हें त्यांच्या रामोपासनेला सर्वथैव शोभणारें होतें. राम हें समर्थांचें वंशपरापरागत आराध्य दैवत होतें. त्या दैवताचें चरित्र गाऊन आपली वाणी पवित्र करावी, ही आकांक्षा त्यांनीं रामायण रचून तृप्त केली. त्यांच्या पुरश्चरणकाळांतील 'रामेण रामदासेन लिखितं' या साक्षीचें एक संस्कृत रामायण उपलब्ध आहे. त्या लिखिताचा संस्कार समर्थांच्या चित्तावर विशेष असल्याचा संभव दृष्टीआड न होऊं दिल्यास त्यांच्या रामायणाची आणखी एक उपपत्ति सांपडते. समर्थांनीं संस्कृत रामायणाची सेवा केली असली तरी त्यांच्या रामकथेवर एकनाथी भावार्थ रामायणाची दाट छाया पसरलेली आहे, या वस्तुस्थितीकडे कानाडोळा करतां येत नाहीं. (श्री रामदासी संशोधनाच्या एका बाडांत या समर्थकृत रामायणाला भावार्थ रामायण असें म्हटलें आहे.) तथापि समर्थांनीं

भावार्थ रामायणाचा विस्तार टाळला आहे व क्वचित् आपल्या रचनेंत थोडासा फेरफारहि केलेला दिसतो. समर्थांचें सारें लक्ष देवांच्या सोडवणुकीवर गुंतलें असल्यामुळें त्यांनीं देवांच्या बंदिवासाचें ठिकाण मारुतीनें शोधणें, देवांना प्रतिबंधांत ठेवणाऱ्या रावणाशीं रामानें युद्ध करणें या दोन गोष्टींवरच आपलें कवित्व खर्चिलें आहे. थोडक्यांत झपास्यानें या गोष्टी सांगण्याच्या ओढीमुळें त्यांच्या कवित्वांत वेग व आवेश हे दोन गुण उतरले आहेत; पण या गुणांच्या अतिशयामुळें रसाळपणांत कमतरता उत्पन्न झाली आहे. युद्धकांडाच्या १० व्या शताच्या शेवटीं 'कीतीयेक पाल्हाळ सांडूनि मागें। कथा चालिली ते पुढें लागवेगें।' असें समर्थांनीं म्हटलें आहे. रामकथाश्रवणानें बिघडलेलें कार्य साधतें, विघ्नें नष्ट होतात, रामाच्या भक्तांना आनंद प्राप्त होतो, या हेतूप्रमाणेंच 'अल्पशा भक्तिभावें प्रभूला बोबड्या उत्तरीं तोषवावें, आपण संतुष्ट व्हावें,' असाहि समर्थांचा उद्देश नमूद आहे (अनुक्रमें शत ८,१२,९). भक्ताची आर्ति व देवाची वत्सलता यांस अनुलक्षून थोडेंसें विवेचन इतस्ततः दृष्टीस पडतें. तें युद्धाच्या व युद्धोत्तर राज्याभिषेकादि कार्यांच्या गर्दींत सांपडल्यामुळें वाचकाच्या हृदयाला चटका लावीत नाहीं. या रामायणाचीं सुंदरकांड १०० व युद्धकांडाचीं १३ शतें, मिळून १४६२ एवढी श्लोकसंख्या आहे.

समर्थांच्या रामायणानें महाराष्ट्राच्या जनतेमध्यें बळावलेली कलियुगाची धास्ती नाहींशी करून कार्योत्साहाच्या रामरावणयुगाला जन्म दिला, अशी कल्पना एकदां काढण्यांत आली होती. समर्थांच्या आधींचीं रामायणें रामाची भक्ति शिकविणारीं तर समर्थांचीं रामायणकांडें शौर्यवीर्यादि गुणांची वाचकांच्या हृदयांत पेरणी करणारीं, असा या कल्पनेचा रोख होता. परंतु समर्थांच्या कृतीवर आपल्या कल्पनेच्या भपकेदार मुलाम्यानें तकाकी दाखविण्याच्या यत्नांपैकींच हा एक प्रकार ठरतो. समर्थांच्या आधींचें एकनाथकृत रामायण प्रचंड म्हणून सोडलें तरी कृष्णदास मुद्गलाचें रामायण मराठे गडकरी शिवकाळापूर्वीं किल्ल्याकिल्ल्यावरून वाचीत असल्याची आख्यायिका विसरतां येत नाहीं. समर्थांचें रामायण संप्रदायाच्या संग्रहांतील १८७५ बाडांपैकीं अवघ्या १७ बाडांत सांपडावें, यावरून त्याची संप्रदायांतील दुबळी लोकप्रियता उघडकीस येते, मग त्याविषयींच्या सामान्य जनतेमधील प्रेमाबद्दल बोलायला नको.

**ओव्यांच्या १४ शतकांत** १—गर्भवास, २—संसारकथा, ३—संतसंग, ४

—उपदेशपद्धति, ५—नवविधाभक्ति, ८—सगुणनिर्गुणवाद, ९—सर्वब्रह्म विमल-ब्रह्माचा वाद, १०—संतमुमुक्षुवाद, १२—प्रारब्धप्रयत्नवाद, असे विषय आहेत. रामदासी संशोधनांतील ४०९ या अडीचशें वर्षांच्या जुन्या बाडांत कांहीं शतकांचीं जीं नांवें दिसलीं तीं येथें रूजू केलीं आहेत व तीं यथार्थ आहेत. १३ व १४ या शतकांत श्रीराम व श्रीकृष्ण यांचीं चरित्रें आहेत हें तीं शतकें पहातांच ध्यानांत येणारें आहे. शतक ६, ७, ११ यांमध्यें निश्चित व प्रमुख अशा एका विषयाचें निरूपण नसल्यामुळें ४०९ बाडाच्या लेखकाला त्या शतकांना कोणतें नांव द्यावें हें सुचलें नाहीं व नांव ठरविणाराला आतांहि तोच अनुभव येईल.

ओवी असें या शतकांच्या वृत्ताला नांव आहे, पण त्याचें स्वरूप अभंगाचें असून पहिल्या अभंगाच्या शेवटचा शब्द घेऊन दुसरा अभंग सुरू करावयाचा अशी या रचनेची पद्धत आहे. ६ व्या शतकांतील पुढील ओव्यांवरून या पद्धतीची कल्पना करतां येईल.

**प्रगटला देव जयाचे अंतरीं। धन्य सृष्टीवरी तोचि येक ॥ २८**
**तोचि येक धन्य ब्रह्मादिकां मान्य। निर्गुणी आनन्य सर्वकाळ ॥ २९**
**सर्वकाळ गेला कथानिरूपणें। आध्यात्मश्रवणें निजध्यासें ॥ ३०**
**निजध्यास जया लागला स्वरूपीं। जाले ब्रह्मरूपीं ब्रह्मरूप ॥ ३१**
**ब्रह्मरूप तेथें ब्रह्मचि नाडळे। विवेकानें गळे अहंभाव ॥ ३२**
**अहंभाव गळे ब्रह्मआनुसंधानें। आत्मनिवेदनें आनन्यता ॥ ३३**
**आनन्यता जोडे ऐसे ज्ञाते थोडे। ज्यांचेनि निवडे सारासार ॥ ३४**
**सारासार पाहे तो साधु पुरता। जाणे आनन्यता भक्ती करूं ॥ ३५**
**भक्ति करूनियां मुक्ति पाविजेते। विवेकें आईतें ब्रह्मरूप ॥ ३६**
**ब्रह्मरूप जाले लोकिकीं वर्तले। साधु वोळखिले साधु जनीं ॥ ३७**

शेवटच्या शब्दानें नवा चरण तयार करण्याच्या नियमांमुळें विचारांची गुंतागुंत व पुनरुक्ति टळणें कठिण होतें. समर्थांचा हा पारमार्थिक मननविनोद होऊन गेला. त्यांत विचारांची सांखळी आहे; परंतु तिच्या वळणावर मागल्या चरणांतील शेवटच्या शब्दाचें दडपण आहे, हें नाकबूल करतां येत नाहीं.

**स्फुट ओव्यांचे** ३२८ लहान मोठे गुच्छ आहेत. पहिले गुच्छ ६५,५२,४९,५० या ओवीसंख्येप्रमाणें उतरत्या क्रमाचे असून शेवटीं तीन चरणांच्या ओवीपर्यंत हा क्रम पोचला आहे. स्फुट ओव्यांच्या पहिल्या गुच्छांत रामकथा आहे. रचनेची पद्धत ओवीशतकांसारखीच असल्यानें त्यांच्या आस्वादाचा जो अनुभव वाचकांस येतो, तोच या ओव्यासंग्रंथांत भोगावा लागतो. समर्थांच्या शिकवणीचे विषय आणि त्यांच्या प्रतिपादनाचे अनेक शब्द, वाग्विशेष, हे निश्चित असल्यामुळें त्यांचा समावेश स्फुट ओव्यांतून पुष्कळदां आढळतो. कांहीं गुच्छ शिष्यानें विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तराचे—शंकेच्या निरसनाचे—आहेत तर पुष्कळसे स्वतंत्र आहेत. देव कोण, आपण कोण, ज्या सृष्टीचा आपण अंश आहों त्या सृष्टीचें स्वरूप आणि पूर्व वृत्त, नवविधा भक्ति, भक्तीचें समाधान, श्रीरामचरित्र, मारुति, अविद्या, कल्पना, लोकांतील प्रसिद्ध देवता, राम व रामाचे दास यांचा संबंध, रामदासांची थोरवी, देहाचे गुणदोष, संसारांतील विरोध, गणपतीचें स्तवन, अंतर्बाह्य शुद्धि, ज्ञानाची महती, सत्संग, वैभवाची नश्वरता, इत्यादि विषयांची चर्चा स्फुट ओव्यांतून भरलेली आहे. यांतील महादेवाच्या वर्णनाचा एक मासला पहाण्यासारखा आहे :

**कराळें विक्राळें भुतें नानापरी । तेथें क्रीडा करी महादेव ॥ १**
**आमंगळ सीळा तो नये कंटाळा । डोलतसे भोळा चक्रवर्ती ॥ २**
**भुतें मांस खाती रक्त तोंडीं हातीं । वर्डाती झोंबती येकमेकां ॥ ३**
**कैंचे भारेभार चालीले अपार । फुपाती विखार आंगावरी ॥ ४**
**लवथविती वोलीं हातींचीं कातडीं । गळती अंतडी लवथवित ॥ ५**
**साजुक सीसाळें टोंचुनी दोरीसी । रुंडमाळ ऐसी हेलावते ॥ ६**
**वन्हीनें पोळला विंध जाजावला । घामें थबथबीला सावकाश ॥ ७**
**चामावरी रक्त रक्तावरी राख । राखेवरी वीख वाहातसे ॥ ८**
**भुतफौजा ऐशा भणीभणीती साशा । नंदीच्या गोमाशा भारेंभार ॥ ९**
**बेल राख आणी धोत्र्याचीं फुलें । पुजेलागीं मुलें धांवताती ॥ १०**
**सिधीची उपेक्षा भयानक दीक्षा । अभक्तासी सीक्षा लावितसे ॥ ११**
**दास म्हणे हर तो भोळा शंकर । भक्तांसी आभर करीतसे ॥ १२**

**षड्रिपु** हें सहा विभागाचें प्रकरण असून त्यांत काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ, प्रपंच या विषयांचें श्लोकांत विवरण आहे. कामाचे दुष्परिणाम सांगतां सांगतां

**कीतेक भोरपी जाले । कीती गेले उठोनियां ।**
**बाटले भ्रष्टले मेले । बुडाले कामवेसनें ॥**

असा एक श्लोक दिसतो व 'बाटले भ्रष्टले' हे शब्द पाहून शंका येते कीं, हल्लीं जशीं मुसलमान स्त्रीच्या नादानें हिंदु माणसांनीं धर्मांतर स्वीकारल्याचीं उदाहरणें कानीं येतात, तशीं उदाहरणें त्या वेळीं होत असावींत. क्रोधाच्या वर्णनांत एकमेकांमध्यें मारहाण करून फिर्यादीपायीं शिक्षा भोगण्याची पाळी लोकांवर पुनः पुनः येत असल्याप्रमाणें 'दिवाणामाजी ते नेले । मारिले दंड पावले ॥ १३' हा प्रकार समर्थांच्या वाङ्मयांत दृष्टीस पडतो. क्रोधाची येथल्यासारखी अवस्था जवळ जवळ शब्दशः करुणाष्टकें ८३ च्या शेवटीं पहायला सांपडते. 'स्वभावें दिवाणांत ते हाक गेली...पुढें राजकी फोडिले जेरबंदी' असे मारामारीचे प्रसंग बाहेरच्या व्यवहारांतच उद्भवत नव्हते, तर कथाप्रवचनांतहि ते उत्पन्न होत असावे, या कल्पनेला एकवीस समासी जुन्या दासबोधाच्या ३ ऱ्या समासांत आधार आहे. श्रोत्यांनीं अडवितांच क्रोधाच्या आहारीं जाणारा वक्ता श्रोत्यांशीं हमरीतुमरी करूं लागतो. 'बोलतां बोलतां नीच उत्तरें । ताडित उठिले परस्परें'; परिणामीं श्रोतावक्ता दोघेहि रक्तानें न्हाले, पण भांडण थांबलें नाहीं. पुनः 'कोल्हाळ उटविला येकसरा ।' आणि पुस्तकांचाहि मारामारींत चुराडा उडविला 'केला पुस्तकाचा घुमसारा ।'; शेवटीं 'थोऱ्यां तंवकें राजद्वारा माहापुरुष निघाले ।' असें सांगून षड्रिपूंतील क्रोधवर्णनाचा समारोप पुढीलप्रमाणें केलेला आहे :

**भल्यानि कोप सांडावा । शांतीनें आस्तां बरें ।**
**क्षुल्लकें कोप पाळावा । भल्याचें काम तों नव्हे ॥ १४**

मद, मत्सर, दंभ, प्रपंच या शत्रूंची मागल्यासारखींच वास्तववादी वर्णनें आहेत. यांतील प्रत्येक विभाग १४।१५ श्लोकांचा असून शेवटचा २३ श्लोकांचा आहे.

**पंचीकरण** योगाच्या विभागांना, योग असें नांव असून **पहिल्या** योगांत सृष्टीच्या उत्पत्तीची माहिती आहे. 'जाणती कळा, जगजोती' हे शब्द प्रारंभींच आहेत. **दुसऱ्यांत** संसार, देव, लौकिक कर्मे, ज्ञान; **तिसऱ्यांत** पुनः मूळ माया, पंचभूतें, अंतरात्मा; **चौथ्यांत** पिंडब्रह्मांडाची एकरूपता; **पांचव्यांत** निर्गुणाची ओळख व आत्मनिवेदनी क्रिया; याप्रमाणें एकंदर विषय आहेत. प्रत्येक योग २० श्लोकांचा आहे.

**चतुर्थमान** या नांवावरून याचे चार विभाग असल्याचें सहज ध्यानांत येईल. प्रत्येक मान २५ श्लोकांचें आहे. **पहिल्या** मानांत अंतरात्म्याची लीला वर्णिलेली असून **दुसऱ्या** मानाचे १२ श्लोक 'तें ब्रह्म जाणती भले' या पालुपदाचे आहेत. पुढचे अकरा 'निःशब्द याचि कारणें' या चतुर्थ चरणाचे आहेत. ब्रह्मज्ञान व आत्मनिवेदनक्रियेनें प्राप्त होणारी निःशब्द ब्रह्मरूपता यांचें हें स्पष्टीकरण आहे. **तिसऱ्यांत** चातुर्याचें विवरण आहे. **चौथ्यांत** चातुर्याचे गुण आहेत, पण देव-भक्तांच्या ऐक्यालाहि अवकाश दिलेला आहे.

**मानपंचक** या प्रकरणाच्या **पहिल्या** मानांत 'रामराज्या' चें वर्णन आहे. **दुसऱ्या** मानांत देव, त्याचें भजन, सद्‌गुरु, भेद, आणि चातुर्यलक्षणें हे विषय घेतले आहेत. **तिसऱ्याचें** नांव 'सारासार उपासना' आहे. अष्ट काया, त्यांचें निरसन, ज्ञान विज्ञान, वृत्ति निवृत्ति, क्षराक्षर, वाच्यांश लक्ष्यांश, कला विकला, इत्यादि ब्रह्मात्मैक्याच्या पायऱ्यांची माहिती तिसऱ्यांत आहे. **चौथ्यांत** रामोपासना, तिची ब्रह्मांडव्यापकता, देवच तारता मारता या विषयांचें निरूपण आहे. सुरवात 'कास या रघुनाथाची । धरितां सुख पावलों' या उद्गारानें केली असून 'सेविला देव देवांचा । तेणें मी धन्य जाहलों', 'सेवकु मारुती ऐसा । त्याचा मी म्हणती जनीं ।' अशी या उद्गाराला पुष्टि दिलेली आहे. **पांचवें** मान व्याव-हारिक उपदेशाचें आहे व त्यामुळें तें वाचकांच्या चित्ताला सकृद्दर्शनींच वेध लावतें. 'जयासी दुःख सांगावें । तयापासीं दुणें वसे' या वचनाची मार्मिकता उकलून सांगायला नको. आपलें दुःख हलकें करण्यासाठीं ज्याच्याकडे त्याचा उच्चार करावा तो आपल्याहून अधिक दुःखीकष्टी आढळतो व याकरितां 'दुःख जाणे पराव्याचें' अशा स्वभावाचा मनुष्य पहायला जावें तर 'ऐसा तो विरुळा गुणी ।', तो अनायासें लाभत नाहीं. या मानांत समर्थांचा 'उत्तम पुरुष' रेखाटलेला आहे.

**पंचमाना**च्या **पहिल्या** मानांत नाना देवता व त्यांच्या ध्यानाचीं फळें सांगितलीं आहेत. गणेशशारदादिकांच्या ध्यानानें मूर्ख भलेपणा पावतात. ईश्वर, गिरजा, गंगा, वीरंणा, कार्तिक, बसवा, यांच्या ध्यानानें सुखसंपदा लाभते; सर्वात्मा शेषशायी श्रीहरि गरुडध्वज यांच्या ध्यानानें धारणा साधते; मल्लारी, भैरव यांच्या ध्यानानें दुष्टांचें दमन घडतें; गंगा, कृष्णा, नर्मदा यासारख्या नद्यांच्या ध्यानानें पवित्रता पदरीं

पडते; तीर्थक्षेत्रांच्या पर्यटनानें धर्मवासना उद्भवते; अरण्यें, समुद्र, भुयारें यांच्या ध्यानानें वृत्ति विस्तारते; दिशा, रवि, शशी, ग्रह, पृथ्वी, आप, वायु, मेघ, विद्युल्लता यांचें ध्यान तर्काला निवळून सोडतें. पहिल्या मानाचा हा निवडक सारांश आहे. **दुसऱ्या** मानाचें नांव 'अंतरात्माविवरण' असून पारमार्थिक सद्गतीकरितां अवश्य असणाऱ्या गुणांचीहि नोंद आहे. **तिसऱ्यांत** प्रपंचांतील सुखदुःखाचे चढउतार, रंगबेरंग याचें विवरण आहे. त्यांतून सुटायचें तर सद्‌गुरु भेटला पाहिजे. पण जगाच्या बाजारांत असद्‌गुरु व असच्छिष्य फार दिसतात, म्हणून त्यांचीं लक्षणें दाखल केलेलीं आहेत. या मानाचें नांव 'गुरुशिष्यलक्षण' आहे. **चवथ्या** मानाचें नांव 'सारासार-विवेक' असून पहिल्या १५ श्लोकांचे अंतिम चरण 'विवेकी जाणते घेती। सारासार विचारणा' अशा वचनाचे आहेत. नामस्मरण, जप, ध्यान, मंत्रयंत्र, तीर्थें, व्रतें, तपें, दानें, होम, पुरश्चरणें हीं भाविकांसाटीं आहेत. विवेकी जाणते पुरुष सारासार विचारणेनें चालतात, असें सदर पंध्रा श्लोकाचें अंतरंग आहे. नंतर जाणत्याबरोबर नेणत्याचाहि थोडासा विचार आढळतो. एकंदर रोख ब्रह्मज्ञानाचा म्हणावा लागतो. **पांचव्यांत** ज्ञानाचा महिमा पाहून या रोखाविषयीं खात्री पटते. तत्त्वार्थाचा साक्षात् अनुभव घ्यावा, वाच्यांश सोडून लक्ष्यांश पहावा, आणि आत्मनिवेदनानें कृतकृत्य व्हावें, ही विचारसरणी ग्रथित करून 'हें ज्ञान रामकृपेनें। धन्य रामउपासना' असे समर्थांनीं स्वतःविषयीं धन्योद्गार काढले आहेत. या सबंध प्रकरणाला दासबोध अशी संज्ञा दिल्याचें 'दासबोधीं समाप्यते' या शब्दांवरून वाटतें. कदाचित् 'अध्यात्म शोधणें सर्वें' या आधींच्या शब्दांमुळें जें अध्यात्म शोधायचें तें दा स बो धांत समाप्ति पावलें आहे, असाहि तर्क करतां येईल. पण दा स बो ध म्हणजे जुना एकवीस समासी, कीं वीस दशकींचा सातवा दशक, कीं सगळा वीस दशकी, हा प्रश्न शिल्लक रहातोच.

**स्फुट प्रकरणें.** गणपति-शारदेचीं वंदनें सोडून हीं प्रकरणें ६९ आहेत. यांतलीं **पहिलीं तीन** उत्तम पुरुषाच्या गुणकर्मांच्या मीमांसेचीं आहेत. प्रापंचिकाची दीनता, भक्तांचा कैवारी देव, मैत्री-सत्संग, वृद्धावस्था, उन्मत्तपणा, ब्रह्म, ज्ञानाज्ञानाचे गुणदोष, अंतरात्मा, देहाची आणि वैभवाची नश्वरता, गणेशस्तुति, देवाची प्रार्थना (बुद्धि दे रघुनायका), चार वाणी चार खाणी, व्यर्थ व धन्य संसार,

वनश्री, फळें, सूर्याचा महिमा, गायनी कला, इहलोक परलोक, महाबळेश्वर, देव-स्थानाचें वैभव, देऊळ व देव याप्रमाणें या प्रकरणांचे कांहीं विषय आहेत. कित्येक प्रकरणें अत्यंत दुर्बोध आहेत.

स्फुट प्रकरणांत तुळजामातेविषयीं ५ कविता आहेत (३३, ३५, ३७, ५३, ६७). दुसऱ्या कवितेंत आईच्या ममतेनें तुळजामाता आपल्या भक्तबाळांना संभाळते. ती विश्वसाक्षिणी विश्वमाता आहे. ती जगजोती आहे. जीवंतपणा हा तिचाच प्रभाव. ती शक्ति असल्यामुळें 'शक्तीनें चालतो देहो। शक्ति नस्तां देहे पडे' असा तिचा अनुभव येतो. तिसरींत आपल्या वडील बंधूंनीं केलेला सोन्याचें फूल वहाण्याचा नवस फेडण्याचा योग आला, या गोष्टीचें समाधान मोठ्या कृतज्ञतेनें व्यक्त केलेलें आहे. आरंभीं 'बंधूंचा नवस चुकला, मी तर जोगी. तुझें दर्शन घेतलें, तुझ्या कृपादृष्टीनें ख्यातीस चढलों. लोक मला महंत म्हणतात. तूं माझ्या ज्या इच्छा पुरविल्यास त्या किती म्हणून सांगूं? चिरस्थायी आनंदाच्या स्थितींत उदय पावलों. पराधीनता गेली. लोकांत उदंड सत्ता सुरू झाली. रामाला वर दिल्याचें ऐकत होतों. पण तूं मला देखील वरदायिनी आहेस.' एवढें आत्मचरित्र सांगून समर्थ देवीच्या व नवसाच्या इतिहासाकडे वळले आहेत: 'श्रेष्ठांचा नवस फेडीनसें म्हटलें खरें, पण तुळजापुरास जाण्याचें जमेना—तुळजापुर ठाकेना. देवी पश्चिमेकडे निघाली व सध्यां पारघाटांत येऊन राहिली असें ऐकून माहीत होतें. माझा हेतु तिथेंच पूर्ण झाला. साध्या पुष्पाची कल्पना मनांत धरली होती; पण तुझ्या कृपेनें सोन्याचें फूल वाहूं शकलों. तुझ्या कृपेंतून उत्तीर्ण कसा होणार? आतां एकच मागणें आहे. तुझा तूं वाढवी राजा सीघ्र आह्माची देखतां. दुष्टांचा संहार तूं केल्याचें ऐकतों. आतां तें रोकडें मूळ सामर्थ्य आम्हांला दाखीव. देवांचीं सत्त्वें गेलीं, त्याचें आणखी सत्त्व किती पहाणार? रामदास म्हणे माझें सर्व आतुर बोलणें।' शेवटीं क्षमा याचून हें प्रकरण पुरें केलें आहे. पहिल्या कवितेंत देवीचें असेंच वर्णन आहे.

[ पारघाटांत तुळजाभवानीची स्थापना चंद्रराव मोऱ्यांनीं केली व तिची पूजाअर्चा प्रतापगडावर तिला नेऊन शिवाजी महाराजांनीं पुढें चालविली, असा इतिहास आहे. ६७ व्या प्रकरणांत प्रतापगिरीचा निर्देश आहे. त्यावरून प्रतापगडावर देवीची स्थापना होण्यापूर्वींचें हें काव्य समजावें लागतें. मोऱ्यांनीं महाराजांशीं चालविलेली कटकट कायमची निकालांत निघण्यापूर्वीं हा नवस फेडण्याचा प्रसंग

घडला हा तर्क योग्य असल्यास 'तुझा तूं वाढवी राजा' या शब्दांतून 'शिवाजी राजा' असा बोध अनन्यत्वानें निघणार नाहीं. ते शब्द श्रेष्ठाच्या मुलांकडेहि लावतां येतील.]

चौथी कविता (५३) तुळजामातेचें एक स्तोत्र या नात्यानें रचलेली आहे. प्रारंभीं गणेशाचें वंदन आणि शेवटीं 'पुजीली बत्तीसा श्लोकीं आदिशक्ती नारायणी' हा समारोप पाहून तिच्या स्वतंत्र रचनेबद्दल शंका रहात नाहीं. या कवितेंत तुळजा ही आपली कुळदेवी आहे, असें समर्थांनीं म्हटलें आहे. देवीच्या कृपेनें काय घडतें, याचा पाढा समर्थांनीं येथें सविस्तर वाचला आहे. तिच्या प्रसन्नतेसाठीं भाविक समाज काय करतो त्याचेंहि वर्णन आहे. तिच्या क्षेत्रांत कोणतें वैभव दिसतें, त्याची नोंद आहे. तिच्या शक्तिस्वरूपाचें समर्थांना स्मरण असल्याचें प्रमाण 'शक्तिरूपें जगन्माता वर्तते जगदांतरीं। त्रिलोकीं जितुके प्राणी शक्तीविण वृथा वृथा ॥ ४' किंवा 'ऐश्वर्य सर्व शक्तीचें विवेकें प्रत्ययें पाहा ॥ ३१ शक्तीनें मिळते सर्वै शक्तीनें भोग होतसे ॥ ३२' या वचनांतून स्पष्ट आहे.

६७ क्रमांकाच्या पांचव्या कवितेच्या शेवटीं '**अध्यात्मसार**' हें नांव असून तिच्यांतील ५७ श्लोकांची विभागणी कशी आहे तें दाखविल्यास कवितेचें एकंदर स्वरूप स्पष्ट होईल. पहिल्या ८ श्लोकांमध्यें अरण्यांत एक कुमारी भेटेपर्यंतचें रामाचें चरित्र आहे. ती कुमारी सौंदर्याची खाण असली तरी सूर्यवंशी राम तिच्याकडे बघेना. पण लक्ष्मणाशीं तो बोलत होता. अखेरीस 'तूं कोण तुकाई (तूं कां आई), तुझें नांव काय' असे प्रश्न विचारले. तिनें उत्तर दिलें, 'मीच तुकाई. तुम्हांला मी वर दिला आहे. जा.' रामलक्ष्मणांनीं वराची सत्यता पटवून देण्याचा आग्रह धरला व अट घातली कीं, येथून लंका दाखविल्यास वर खरा वाटेल. लक्ष्मणानें झाडावर चढून लंका पाहिली. कुमारीनें 'रामराजा माहाराजा। वरू हा दीधला तया'. तेव्हांपासून लोक तिला रामवरदायिनी म्हणूं लागले. वीस श्लोकांपर्यंत हा कथाभाग आहे. (तूं कां आई म्हणून तुकाई या नांवाचा इतिहास एकनाथांच्या भावार्थ रामायणांत आहे.) २५ व्या श्लोकापर्यंत समर्थांचें स्वगत आहे कीं, देवीबद्दल ऐकत होतों पुष्कळ, पण अनुभव नव्हता; आतां ती प्रतापगिरीवर आहे. तुळजापुराची माता तेथें प्रतापानें प्रगट झाली. ही आदिशक्ति आहे, कुळस्वामिनी

आहे, वैष्णवी माया आहे. तिनें कुळाचें रक्षण केलें. आमचेंहि अनेक प्रकारें केलें. श्लोक २६ पासून ३० पर्यंत शक्तीचा प्रभाव सांगून युक्तीची प्रस्तावना केली आहे. नंतर युक्तीनें काय साधतें याची माहिती आहे व तिच्यांतून राज्यांतली अंदाधुंदी, तिच्यामार्गीं राज्यनाश, हे विषय निघाले. लोकांच्या संतोषानें राज्य बळावतें, म्हणून तांदुळांतल्या खड्याप्रमाणें दुष्ट शोधून बाहेर काढावे. खरें घ्यावें, खोटें टाकावें, परीक्षा करावी, असा उपदेश बोलतां बोलतां पुनः समर्थांनीं युक्तीच्या गुणाचें स्मरण दिलें आहे. युक्तीला शक्तीची जोड पाहिजे, 'तस्मात् शक्ती प्रमाण हे' (४२). रामाला शक्तीमुळें देव बंधमुक्त करतां आले, या विधानावरून शक्तियुक्तीच्या साहचर्याचा राज्यकारभाराशीं जुळविलेला सांधा स्वतंत्र निराळ्या उपदेशाचा द्योतक नसल्याचें लक्षांत येईल. 'भवानी माता समर्थ, रामहि समर्थ. एका समर्थानें दुसऱ्या समर्थाला वर दिला. मला या वरदानाचा अनुभव नसल्यानें ही जुन्या वरदानाची कथा मनावर विशेष परिणाम करीना. तरी मनाची खळबळ चालू राहिली. अखेरीस रामाचा उत्सव आपल्या हातून घडावा अशी इच्छा धरली व ती देवीनें पुरविली. घमंड जाहालें मोठें । घबाड साधलें बळें । (४७), प्रतापगडावरील देवीचा शोध आपण लावला, असा आणखी थोडा समर्थांच्या चरित्राचा मजकूर आहे. ४९-५७ या श्लोकांत आईच्या तुलनेनें देवीच्या गुणांची वाच्यता आहे. या सगळ्या कवितेंत 'अध्यात्मसार' पाहूं गेल्यास देवीच्या भक्तीचें व कृपेचें आहे. या कवितेमधील अनेक विचार संक्षेपानें पूर्वींच्या कवितांतून आलेले असतां येथें त्यांचा विस्तार राज्यकारभारांत गुंतविलेला पाहून समर्थांना स्वराज्यस्थापनेची विवंचना लागली होती, असें अत्यंत गंभीरपणानें व आग्रहानें सांगण्यांत येतें. रामाचा उत्सव करण्याचें ध्येय देवीच्या कृपेनें सिद्धीस गेलें, हें या कवितेचें तात्पर्य आहे. शक्तीखेरीज माणसाला सुखें भोगतां येत नाहींत, शरीरावर कळा कांति दिसत नाहीं, युक्तिबुद्धींत कार्यक्षमता रहात नाहीं. वैभव विपुल असून शक्तीच्या अभावीं जर तें भोगतां आलें नाहीं तर वैभव आणि दारिद्र्य हीं दोन्ही सारखींच ठरतात. या क्रमांत शक्तीनें राज्यें मिळतात व ज्यांच्या हातून कधींहि चूक होत नाहीं त्यांचीं राज्यें चालतात, हे विचार आले व समर्थांनीं त्यांचा स्वभावानुसार तपशील वाढविला, एवढ्यावरून समर्थ स्वराज्याची विवंचना करीत असल्याचा सिद्धांत स्वीकारतां येत नाहीं. त्यांचें खरें हृद्गत 'रक्षिता देव

देवांचा त्याचा उंछाव इच्छिला' या वचनांत उतरलें आहे. हा 'जीवीचा हेतु पुरला' याकरितां ४७ पासून पुढच्या सर्व श्लोकांत त्यांनीं आपल्या कृतार्थतेच्या आनंदाला अवकाश दिला आहे. हा रामोत्सव समजला जातो त्याप्रमाणें मसूर येथील १६४५ सालांतला असेल किंवा चाफळचें देवस्थान उभारल्यानंतरचा असेल. कोणत्याहि वर्षांतला किंवा कुठल्याहि ठिकाणचा उत्सव असला तरी देवाचा उत्सव करण्याला भय असल्यावेळचा तो आहे. मुसलमानी राज्याच्या दहशतीनें लोकांनीं स्वतःच देव नद्यांच्या डोहांत लोटून देवळें रिकामीं केलेलीं; देवच ठिकाणावर नाहीं तेव्हां उत्सवाचें नांव काढायला नको; कोणी उत्सवाचें नांव काढलेंच तर त्याला लोकांचें पाठबळ मिळण्याची आशा नाहीं; अशा स्थितींत रामवरदायिनीनें रामाच्या उत्सवाची आकांक्षा सफल केली. समर्थांच्या प्रस्तुत कवितेंत हा आशय डोळ्याला वेगळ्या रंगाचा चष्मा नसेल तर असंदिग्धपणें पहातां येतो.

[देवीविषयीं वरील आशयाचीं जीं समर्थनिर्मित पदें आहेत, त्यांचा संग्रह श्री स म र्थां चा गा था, संग्राहक : अनंतदास रामदासी, प्रकाशक : चिटणीस श्रीसमर्थ-गोसेवामठ, वाई, जि. सातारा, यामध्यें ३०–३१ पानावर आहेत. पहिल्या पदांत 'सर्व देह हालविते चालविते बोलविते' 'शक्ति सर्वांगें व्यापिली, शक्ती गेली काया मेली' असें म्हटलें आहे.

या खेरीज श्री रा म दा सी सं शो ध न खंड १, बाड ५०० व ५०७ यांत एकूण ५ कविता देवीच्या आहेत व त्यांमध्यें साधारणपणें मागील कवितांसारखेच जास्त कमी विचार दिसतात. बाड ५०० तील शेवटच्या कवितेंत 'आपुली कीर्ति संभाळी अद्‌भुत करणी करी' अशी एक याचना आहे. बाड ५०७ मध्यें 'चंपकाचें (चांफ्याचें) फूल पाठविलें, त्याच्या योगानें उत्तीर्ण झालों, पण उत्तीर्ण झालों हें म्हणणें शोभत नाहीं' असा वृत्तांत आहे. चांफ्याचें अर्थात् पिवळ्या चांफ्याचें फूल अशी कल्पना केल्यास सोन्याचें फूल पाठविलें असें वाटतें. पण या कवितेंत श्रेष्ठांच्या नवसाचा व देवीच्या स्थळाचा उल्लेख नसल्यानें या फुलाची गोष्ट निराळी समजण्याला प्रत्यवाय नाहीं.]

स्फुट प्रकरणांतील ५८ वें प्रकरण '**आनंदभुवन**' या नांवानें सर्वांच्या परिचयाचें आहे. त्याच्या अंतरंगांतील कित्येक शब्दांकडे पाहून कोणी त्याला 'भविष्य-पुराण'

म्हणतात तर कोणी 'समर्थ-स्मृति' या नांवानें संबोधतात. हें ५९ श्लोकांचें आहे. याचा निर्देश समर्थांच्या अधिकृत बखरींत नाहीं. मुळांत त्याचें नांव 'श्रीवनभुवनी' असें आहे. पुराणांतून 'आनंदवन' हा शब्द काशीक्षेत्राला अनुलक्षून उपयोगांत आणलेला आढळतो, व तोच समर्थांच्या मनांत होता असें पटविणाऱ्या कल्पना या प्रकरणांत आहेत. आयुष्यांत एकदां तरी काशीयात्रा घडावी, मरायचें तर काशीक्षेत्रीं मरावें (कारण तें मुक्तिक्षेत्र आहे), येकाकी येकदां जावें आनंदवनभुवना (४), देहे त्यागासी येणें हो आनंदवनभुवना (५) या कल्पना काशीक्षेत्र सुचविणाऱ्या आहेत. समर्थ म्हणतात : 'स्वप्नीं पाहिल्याचा प्रत्यक्ष अनुभव घेत हिंडतां फिरतां आनंदवन-भुवनास गेलों (७). साक्ष पटली. 'कल्लोळ' उठलेले होते. गणपतीची प्रार्थना केली (८). पुढच्या ९–३५ श्लोकांत कल्लोळाचें वर्णन आहे. देव आणि त्यांचे शत्रु यांच्या लढाईचा धुमधडाका या श्लोकांत भरलेला आहे. भीम (मारुति) लोटला (१०), मुख्य देव देखील उठला (१२), सुरेश (इंद्र) उठला (१९). गाढवें राखावीं लागल्याच्या रागानें गणपति अघाडीस गेला (२३). म्लेंच दैत्य बुडविणारा हा प्रसंग जणूं काय कल्पांताचा होता. सर्व पापी बुडाले (२८), औरंग्या पापी बुडाला, म्लेंच संव्हार जाहाला (३३), रामवरदायिनी माता खड्ग घेऊन सरसावली (४१). शेवटच्या ३५-५९ या भागांत जिकडे तिकडे आनंदी आनंद झाल्याची माहिती आहे.

म्लेंच्छ दैत्यांचा नाश व हिंदुधर्माचा उदय-उत्कर्ष अशा तऱ्हेचें औरंगजेबाला बुडविणारें स्थित्यंतर समर्थांच्या जीवनकाळांत महाराष्ट्रामध्यें घडलें नव्हतें हें इतिहासज्ञांना माहीत आहे. औरंग्याऐवजीं अफजल्या शब्द असता तर अफझुल-खानाच्या वधानंतर प्रतापगड ते पन्हाळा या प्रदेशांत जी धामधूम उडाली तिला हें वर्णन लावणें शक्य होतें. पण औरंग्याखेरीज आणखी कांहीं शब्द महाराष्ट्राशीं या प्रकरणाचा संबंध जुळूं देत नाहींत. 'रामगंगा' काशीक्षेत्रांत आहे (१३). 'हिंदुस्थान' बळावलें (२८). 'विद्यापीठ तें आहे आनंदवनभुवनीं' (५८). काशीक्षेत्राची विद्यापीठ या नात्यानें पुरातन काळापासून ख्याति आहे. 'हिंदुस्थान' या नांवानें नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेशाला ओळखण्याचा त्या काळीं व पुढेंहि अनेक वर्षेपर्यंत महाराष्ट्रामध्यें प्रघात होता. आपण हा लढाईचा कल्लोळ काशीस पाहिला, असें समर्थांचेंच म्हणणें आहे. समर्थांच्या मनांतून आपल्या उपास्य दैवताचा–रामाचा

पराक्रम सांगायचा होता, असें 'कोपला देव देवांचा' (२९), कैपक्ष घेतला रामें (३०) यावरून कळणारें आहे. याचें प्रत्यंतर ६४ व्या प्रकरणांत दिसतें. तेथें रामाचा पराक्रम चर्चेस घेतला असून 'सध्यां' देव कोपला असून देवद्रोह्यांना त्यानें नको नकोसें करून सोडलें आहे (८), 'काय होईल पाहावें राहावें सुखभुवनीं' (९), देव कोपला, फौजा निघाल्या, देवाकडून इच्छा पुरविल्या जात आहेत; यापुढें काय होईल तें पहावें, सुखभुवनीं रहावें असें म्हटलें आहे. समर्थांनीं हें प्रकरण एवढ्यावरच सोडून निराळें 'आनंदवनभुवन' रचलें, असें या ६४ व्या प्रकरणाच्या स्थितीवरून वाटतें. 'सुखभुवन' हा शब्द आनंदवनभुवनाकडे दृष्टि वळविणारा आहे. 'येथून पुढें जे वाचतील ते सर्व कांहीं पहातील (५४), पुढें घडेल तें खरें (५६)' यांच्या आधारें समर्थ भविष्य बोलत होते असें समजावें, तर 'समरलें लिहिलें आहे' हें गतकालाचें दर्शक वाक्य पाहून वर्णिलेला प्रकार मागचा असें मानावें लागतें. मध्येंच 'लिहिला प्रत्ययो आला' (३८) हें एक वाक्य आहे. प्रत्ययो आला तो लिहिला, किंवा याप्रमाणें जो पूर्वीं कोणी लिहून ठेवलेला होता तोच प्रत्यय तंतोतंत 'लिहिला प्रत्ययो आला' असे या वाक्याचे दोन अर्थ संभवतात.

साऱ्या फौजा मागें टाकून गणपति रागारागानें सर्वांच्या पुढें निघाला ही कल्पना डोमगांव मठाच्या एका बाडांतील 'फुट' समासांत विस्तारानें आलेली असून श्रीरामदासी संशोधन खंड १ च्या १२२-१२३ पानांवर छापलेली आहे. संशोधन-खंडाचे संपादक श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांनीं 'आवघियापुढें लंबोदरु' म्हणजे मोरो त्रिमल, मुख्येश्वरु म्हणजे शिवाजी महाराज, असे संकेत असल्याची कल्पना मांडली आहे.

उरलेल्या स्फुट श्लोकांच्या विभागाची पहाणी आटपून श्रीरामदासांची कविता खंड १ हें पुस्तक हातावेगळें करावयाचें आहे. येथील श्लोक 'प्रमाणिका' वृत्तांतील आहेत व त्यांचे ६१ गुच्छ आहेत. समर्थांच्या शिकवणीच्या विषयांची येथवर बरीच ओळख झालेली असल्यामुळें त्यांची विशेष वाच्यता व परीक्षा न केल्यास चालेल. पहिल्या गुच्छाचें पालुपद 'श्री राम राम हे म्हणा' असें आहे. दुसऱ्या-तिसऱ्यांत रामचरित्र व रामोपासना यांचा आदर आहे. चौथ्यांत परमार्थाच्या व्यवहाराचा उपदेश आहे व तोच पुढील गुच्छांतून परोपरीनें आलेला आहे. ५५ व्या गुच्छाचा

आरंभ 'त्रिकांड वेद बोलिला उदंड अर्थ चालिला' याप्रमाणें असून त्याचे ४० श्लोक चार कांडांत वाटले आहेत. कर्म, उपासना, ज्ञान आणि ब्रह्मात्मैक्यस्थिति हे त्या कांडांचे विषय आहेत. ५७ मध्यें रामरावणयुद्ध असून ५८ मध्यें रामानें देवाच्या सुटकेसाठीं रावणाशीं केलेल्या लढाईचें १२५ श्लोकांत वर्णन आहे. त्याला 'लघु रामायण' असें नांव जुन्या काळीं देण्यांत आलें होतें. ५९ मध्यें श्रीकृष्णाचें चरित्र १०२ श्लोकांनीं गाइलें असलें, तरी ३०, १२ आणि ६० असे त्याचे तीन विभाग आढळतात. तिसऱ्या विभागाच्या १५ श्लोकांतील पाण्याचें व रानाचें वर्णन बरेंच सरस आहे. या प्रकरणाला कल्याणस्वामींच्या बाडांत 'भागवत' म्हटलें आहे. ६० त मारुति-चरित्र आहे.

समर्थांच्या कवितेंत 'दास' या शब्दाची खूण अति मोठ्या प्रमाणांत असली तरी ते 'रामदास', 'रामीरामदास' हे शब्द वापरीत असत, हें सर्वांच्या परिचयाचें आहे. याखेरीज ते कवि, महंत, सज्जन इत्यादि शब्दांचा उपयोग करीत असल्याचीं प्रमाणें व आख्यायिका आहेत. हिंदी-उर्दू कवितेसाठीं त्यांनीं 'भक्त, रसिक, जिंदा, बंदा, फकीर' वगैरे शब्द खुणेदाखल स्वीकारल्याची कविता व कथा त्यांच्या सांप्रदायिक चरित्रांतून दृष्टीस पडतात. या खुणेच्या शब्दांतील 'कवि' हा शब्द श्री राम दा सांची क वि ता खंड १ मधील शेवटच्या स्फुटश्लोकी प्रकरणांतून आधिक्यानें सांपडतो. समर्थांच्या साऱ्या कवितेंत असल्या शब्दाची खूण असतेच असा नियम नाहीं. ही खूण नसलेली देखील पुष्कळशी कविता संप्रदायाच्या कवितासंग्रहांत आहे.

•ऽ•

दा स बो धाच्या बरोबरीनें लोकप्रिय असलेलें समर्थकृत वाङ्मयांतील **'मनबोध'** किंवा **'मनाचे श्लोक'** हें प्रकरण आहे. या प्रकरणाचे एकंदर २०५ श्लोक आहेत, परंतु अनेक प्रकाशकांनीं २१० श्लोक आपल्या समग्रांकित पुस्तकांतून प्रसिद्ध केलेले आहेत. १९११ सालीं सत्कार्योत्तेजक सभेनें कल्याणस्वामींच्या लिखाणाबर-हुकूम २०५ श्लोकांची बहुतांशीं विश्वसनीय प्रत छापली असतांहि २१० श्लोकांचा 'मनोबोध' लोकांसमोर १९११ नंतरच्या नव्या नव्या आवृत्त्यांतूनहि कित्येक

प्रकाशकांनीं ठेवावा हा एक विलक्षण चमत्कार आहे. या चमत्काराचें वैचित्र्य असें आहे कीं, सदर श्लोक छापतांना अर्थाकडे लक्ष पुरवून ज्या चुका दिसतील त्या काढून टाकण्याचा प्रयत्न केला जात नाहीं. जें एकदां छापलें त्यांतल्या चुका नव्या छपाईच्या वेळीं, आणखी चुकांची भर पडल्यास त्यांची क्षिति न बाळगतां, बेधडक छापून टाकायच्या, असें जणूं काय जुन्या ग्रंथांच्या प्रकाशकांचें चिरव्रतच बनलेलें आहे. चुका असल्या तरी जोंवर आपलीं पुस्तकें खपत आहेत तोंवर प्रकाशकांनीं तरी चुकांची पर्वा कशाला करावी? चुकांची दाद नसणें ही आंधळ्या भाविकपणाची वृत्ति असून या वृत्तीला पुढें येणाऱ्या शब्दांचें पाठांतर-पारायण हेंच परम कल्याणकारक वाटतें. अर्थ न कळला तरी शब्दाचा नुसता उच्चार पारमार्थिकदृष्ट्या तारतो, या कल्पनेपायीं भाविकांकडूनहि प्रकाशकांना सवलत मिळते. आधीं जुन्यांत जुन्या विश्वसनीय पाठाच्या प्रती मिळत नाहींत. समर्थांच्या वाङ्मयासंबंधांत सुदैवानें बहुतांशीं विश्वसनीय प्रती उपलब्ध असतां समर्थांच्या प्रकाशकांनीं अधिक तारतम्य दाखविल्यास भाविकांवरच नव्हे तर सर्वांवरच उपकार होतील. सत्कार्योत्तेजक सभेच्या प्रतीबरोबर तशाच जुन्या प्रतींची पाठभेदांच्या परीक्षेसाठीं तुलना करणें या बाबतींत अवश्य आहे.

मनाच्या श्लोकांची रचना समर्थांनीं घरोघर व गांवोगांव भिक्षेच्या निमित्तानें हिंडणाऱ्या शिष्यांसाठीं गायनाच्या दृष्टीनें भुजंगप्रयाता वृत्तांत केली, अशी एक कल्पना व आख्यायिकाहि आहे. समर्थांचे सांप्रदायिक अलीकडच्या काळीं भिक्षेसाठीं मनाचे श्लोक म्हणतात, यावरून ही कल्पना निर्माण झाली असणें संभवते. कदाचित् आख्यायिकेचें मूळहि असेंच असूं शकेल. मनोबोधाचे कांहीं श्लोक भिक्षेकरितां लिहिले गेले असतीलहि. परंतु सगळ्या श्लोकांचें अवलोकन-मनन केल्यास त्यांच्या रचनेचें भिक्षा हें एकमेव कारण पटण्याजोगें वाटत नाहीं. मनाला बोध करण्याची प्रथा प्राचीन आहे. योगवासिष्ठांत जनकानें आपल्या चित्ताला उपदेश केल्याची कथा दृष्टीस पडते (उपशम सर्ग ११). तुकारामबुवांनीं मनोबोधार्थ कांहीं अभंग केले आहेत (आवटे आवृत्ती, पान ४८३). समर्थांचे दुसरे समकालीन सत्पुरुष वामनपंडित यांच्या नांवानें मनाच्या श्लोकाची रचना लोकांच्या परिचयाची आहे. समर्थांनीं भिक्षेचें अंग या नात्यानें मनोबोध निर्माण केला असें मानण्याऐवजीं उपदेशाच्या स्वतंत्र स्फुरणोर्मीला वश होऊन त्यांनीं मनोबोधास जन्म दिला, असा तर्क केल्यास तो चुकीचा ठरूं नये असें वाटतें.

मनोबोधाच्या शेवटीं 'मनाचीं शतें' हे शब्द घालून २०५ या संख्येची सूचना समर्थांनीं जिज्ञासूंना दिलेली आहे. 'दास' या स्वत्ववाचक शब्दप्रयोगानें या सूचनेला पक्केपणा आणला आहे. तथापि मध्यें अनेक स्थळीं 'दास' हा शब्द दिसल्यामुळें सुरवातीपासून मनाचीं शतें रचण्याविषयीं समर्थांचा संकेत नव्हता; हळुहळू नानाविध श्लोकांच्या दशकपंचकांची जुळणी करून तिचा शतांमध्यें विकास झाला, २०५ या संख्येवर हा विकास थांबला, अशीहि कल्पना करवते. मनोबोधांत शेवटचा चरण पालुपदाप्रमाणें असलेले १० श्लोकांचे व ५ श्लोकांचे एकंदर आठ गुच्छ आढळतात. (१) नुपेक्षी कदा राम दासाभिमानी २८-३७, (२) जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ४७-५६, (३) प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ६७-७६, (४) नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ११६-१२५, असे प्रत्येकीं १० श्लोकांचे चार गुच्छ असून (५) मना सज्जना राघवीं भक्ति कीजे ३८-४२, (६) तुटे वाद संवाद तो हीतकारी १०८-११२, (७) जुनें ठेवणें मीपणें आकळेना १३७-१४१, (८) मना संत आनंत शोधौनि पाहे १४६-१५० हे चार गुच्छ प्रत्येकीं पांच श्लोकांचे आहेत. यांतील ३, ७, व ८ या तीन गुच्छांच्या शेवटीं 'दास' या शब्दाचा शिक्का आहे. १ व २ या गुच्छांतील श्लोकांच्या अखेरीस 'दासाभिमानी' व 'दास सर्वोत्तमाचा' हे शब्द आहेत. त्यांत 'दास' शब्दाचा संकेत असल्यामुळें तेथें पुनः तो शब्द ठेवण्याची गरज नव्हती. तसाच प्रकार 'नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी' या दशश्लोकींत संभवतो. मनोबोधाच्या १२३ व्या म्हणजे सदर गुच्छांतील ८ व्या श्लोकांत 'नुपेक्षी कदा राम दासाभिमानी' असें वचन असून त्यांतील 'दास' हा सगळ्या गुच्छाला गवसणी घालतो. 'देव भक्ताभिमानी' या-ऐवजीं या एकाच श्लोकांत 'राम दासाभिमानी' हे शब्द पाहून वाचक घोटाळ्यांत पडतो. समर्थांची ही गफलत आहे कीं काय असा संशय येतो. परंतु समर्थ हे निस्सीम रामभक्त होते याचें भान ठेवल्यास त्या संशयाला आधारच उरत नाहीं. ही दशश्लोकी अवतारचरित्रांची आहे. अवतारांतील रामचरित्र या ८ व्या श्लोकांत सादर करतांना इतर अवतारांचा भक्ताभिमानी सामान्य देव क्षणभर बाजूला ठेवून समर्थांनीं आपल्या रामोपासनेची उत्कटता 'राम दासाभिमानी' या शब्दयोजनेनें व्यक्त केली. हा फरक समर्थांच्या गाफिलपणाचा दर्शक नसून त्यांच्या सावधपणाची साक्ष पटविणारा आहे. ५ व ६ हीं पंचकें दासांकित नसलीं

तरी सगळया २०५ श्लोकांवर समर्थांचें कर्तृत्व स्थापन करणारा 'दास' हा शब्द शेवटच्या श्लोकांत सिद्ध आहेच.

पहिल्या २० श्लोकांनंतर आपल्या उपास्य रामाची भक्ति करण्याच्या उपदेशाला सुरवात होऊन तो उपदेश ७९ व्या श्लोकापर्यंत पसरलेला आहे. या ७९ श्लोकांच्या विस्तारांत 'नुपेक्षी कदा राम दासाभिमानी', 'मना सज्जना राघवीं वस्ति कीजे', 'जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा', 'प्रभाते मनीं राम चिंतींत जावा' या ३५ श्लोकांचा समावेश करण्यांत आलेला आहे. 'दास सर्वोत्तमाचा' हे भक्तीचे श्लोक नसून भक्ताच्या थोरवीचे श्लोक आहेत. रामभक्ताची थोरवी रामभक्तीच्या वर्णनांत समावूं शकते. उरलेल्या ४४ श्लोकांमध्यें ज्यांत 'राम' नाहीं असे अवघे सहाच श्लोक आढळतात. ८१ व्या श्लोकांपासून १०१ श्लोकापर्यंत नामस्मरणाची महती गाइलेली आहे. १०२ ते १०७ या सहा श्लोकांत भक्ताच्या कर्तव्याचें प्रतिपादन आहे. नंतर 'तुटे वाद संवाद तो हीतकारी', 'नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी' हे विषय गोवून १२७ ते १३६ या श्लोकांत उत्तम पुरुषाकडे समर्थांनीं दृष्टिक्षेप केला आहे. पुढें 'जुनें ठेवणें मीपणें आकळेना', 'मना संत आनंत शोधूनि पाहे', 'सदा संगती सज्जनाची धरावी' हीं तीन पंचकें एकमेकांपासून थोड्या थोड्या अंतरावर भेटतात. दशकपंचकांचा उल्लेख मागें वारंवार करण्यांत आला, तसा एका चौकडीचा उल्लेख केला म्हणजे गुच्छ संपतील. 'परी संग सोडूनि सूखें रहावें' या पालुपदाचे १८९-१९२ याप्रमाणें चार श्लोक लागोपाठ दिलेले आहेत. यांचा उल्लेख शिल्लक ठेवण्याचें कारण केव्हां तरी केवळ अवशिष्ट श्लोकांची चौकडी निदर्शनास आणणें एवढेंच नसून मनोबोधाच्या रचनेची कल्पना यावी हें आहे.

करुणाष्टकाच्या हस्तलिखित मढेंप्रतींत मनाच्या श्लोकांपैकीं १९४-१९५ हे दोन श्लोक १ व २ या आंकड्यांसह स्वतंत्र या नात्यानें श्री. शं. श्री. देवांना आढळले. त्यांच्या मतें हे दोन श्लोक आधीं केव्हां तरी रचले गेले होते व मागाहून त्यांचा समावेश मनाच्या श्लोकांत झाला. या श्लोकांत छांदोग्य उपनिषदांतील एका ठिकाणच्या प्रश्नोत्तरांचा अनुवाद आहे. तो अनुवाद केव्हां तरी समर्थांनीं करुन ठेवला व मनाच्या श्लोकांत नंतर त्याची सोय लावली, हा या श्लोकासंबंधांतील श्री. देवांचा न्याय मनाच्या श्लोकांच्या दशकपंचकचतुष्टयांना लावण्याला प्रत्यवाय नाहीं.

करुणाष्टक १७ मधील ४ था श्लोक 'लपावें अती आदरें रामरूपीं' हा मनाच्या श्लोकांत जसाच्या तसा १८५ वा श्लोक आहे. करुणाष्टक ७६ व ८८ यांतील अनुक्रमें ४ व ८ हे श्लोक मनाच्या श्लोकांत १३५ आणि १४४ याप्रमाणें दाखल आहेत. या संबंधांतला श्री. देवांचा अभिप्राय : 'संदर्भ वगैरे पाहतां मनांत असें येतें कीं, हे मूळचे करुणाष्टकांतील असावेत' (श्रीसमर्थ हृदय, पान २३७). या पुढच्याच पानांत श्री. देव समर्थविषयक श्रद्धेच्या अनावर उचंबळीनें म्हणतात : 'एका प्रशांत दिवशीं, चित्ताची अतीव प्रसन्नता असतां, एकाच बैठकींत एकापुढें एक असे श्लोक श्रीसमर्थ सांगत गेले व श्रीकल्याण लिहीत गेले ते हे मनाचे २०५ श्लोक होत ! इतका त्यांचा ओघ स्वाभाविक आहे' (श्रीसमर्थ हृदय, पान २३८-२३९). श्लोकांचीं निरनिराळीं दशकपंचकें व इतर विषय पाहून श्लोकांची रचना वेळोवेळीं होत राहिली व कालान्तरानें ते मनास अनुलक्षून लिहिलेल्या पहिल्या २० श्लोकांना जोडण्यांत आले, समर्थांनीं त्यांना 'मनाचीं शतें' हें नांव दिलें, नंतर मनास बोध-मनोबोध किंवा मनाचे श्लोक या नांवाचा प्रघात रूढ झाला, असें म्हटल्यास अयुक्ततेचें भय वाटत नाहीं.

येथें केलेल्या बहिरंगपरीक्षणावरून मनाच्या शतांचें अंतरंग थोडेंसें आकलन होण्याला हरकत नाहीं. या शतांत समर्थांच्या इतर वाङ्मयांतील शिकवणीचीं बरींच प्रमुख अंगें उतरलीं आहेत. गर्भवास, नश्वर जीवन, खरा देव व त्याच्या प्राप्तीचीं साधनें, नामस्मरण, सत्संग, रामाची उपासना, उत्तम पुरुषाचीं लक्षणें, देवाचा भक्ताभिमान, मीपणाचे अनर्थ, इत्यादि विषयांचें विवरण या रचनेंत आहे. मागें जे पालुपदवजा अंतिम श्लोकचरण नमूद केले आहेत ते त्या त्या विषयाकडे जिज्ञासूची दृष्टि वळवून घेतील. तथापि या संबंधांत थोडें दिग्दर्शन करणें इष्ट आहे. इतर देवांना सोडून एकट्या रामाचीच उपासना करण्याचें समर्थांनीं पुढील कारण दाखविलें आहे.

**भजाया जनीं पाहतां राम येकु। करीं बाण येकु मुखीं शब्द येकु।**
**क्रिया पाहतां उधरे सर्व लोकु। धरी जानकीनायकाचा विवेकु ॥**

एकबाणी एकवचनी या गुणांबरोबर एकपत्नी हा गुण उच्चारलेला नाहीं. मान-पंचकांत त्याची नोंद आहे. सर्वोत्तमाचा दास म्हणजे समर्थांचा उत्तम पुरुष; त्याचीं

लक्षणें ज्याला सदाचार म्हटलें त्यासंबंधाच्या श्लोकांतून पुनः सांगितलीं आहेत. सज्जन व सद्गुरु या दोन शब्दांचा उपयोग एकाच अर्थानें केला जातो; सद्गुरु किंवा सज्जन हे पर्यायानें उत्तम पुरुष ठरतात. त्यांचीं वर्णनें ताडून पाहिलीं तर याबद्दल शंका असल्यास निवळतील. सद्गुरूच्या लक्षणांत एका ठिकाणीं 'चातुर्य' हा शब्द आला आहे. 'राजकारण' हा शब्द मनाच्या श्लोकांत कुठेंच नाहीं. पोटाची किंवा साधकाची सोय, यांतल्या कोणत्याहि कारणानें सदर श्लोकांची रचना, जुळणी व माळ करतांना समर्थांना स्वराज्यानिमित्त लोक जागवून उठवायचे असते, तर या श्लोकांची रचना व जुळणी करते वेळीं आज राजकारणाचा जो अर्थ समजला जातो, त्या अर्थाच्या धोरणाचे शब्द श्लोकांत घालणें शक्य होतें. या श्लोकांत तसा प्रकार आढळत नाहीं. त्यामध्यें प्रपंचाचें हीनत्व व परमार्थाचें श्रेष्ठत्व या दोन विषयांवर सगळा भर आहे.

समर्थकृत कवित्वाच्या व्याख्येप्रमाणेंच नव्हे तर साहित्यशास्त्रीय कसोटीनें देखील मनाचे श्लोक ही रचना मराठी वाङ्मयांत फार श्रेष्ठ श्रेणीची ठरायला हरकत नाहीं. सरळ, स्वच्छ, सोपी, मधुर तथापि मर्मग्राही, अशी ही रचना आहे. या रचनेंतील कित्येक श्लोक व श्लोकचरण तर नेहमींच्या बोलण्यांतील 'वाक्प्रचार' होऊन बसले आहेत :

जनीं सर्व सूखी असा कोण आहे । विचारी मना तूंचि शोधूनि पाहें ।११
मरे येक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात तो ही पुढें जात आहे । १६
मना मानव वेर्थ चिंता वाहातें । अकस्मात होणार होऊन जातें । १७
घडीनें घडी काळ आयुष्य नेतो । देह्यान्तीं तुला कोण सोडूं पहातो। २२
समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे । ३०
असे हो जया अंतरीं भाव जैसा । वसे हो तया अंतरीं देव तैसा । ३५
घरीं कामधेनु पुढें ताक मागे । हरीबोध सांडूनि वेवाद लागे । ६२
अहो ज्यां नरां रामविश्वास नाहीं । तयां पामरां बाधिजे सर्व कांहीं ।७८
येथासांग रे कर्म तेंही घडेना । घडे कर्म तों पुण्य गाठीं पडेना । १००
फुकाचे मुखीं बोलतां काय वेचे । दिसेंदीस अभ्यांतरीं गर्व साचे ।
क्रियेवीण वाचाळता वेर्थ आहे । विचारें तुझा तूंचि शोधून पाहे ॥ ११४

**जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेची । तया भोजनाची रुची प्राप्त कैंची ।**
**अहंभाव ज्या मानसींचा विरेना । तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना ॥१५९**
**नको रे मना वाद हा खेदकारी । नको रे मना भेद नाना विकारी ।**
**नको रे मना सीकऊं पूढिलांसी । अहंभाव जों राहिला तूजपासीं ॥१६०**
**घडीनें घडी सार्थकाची करावी । सदा संगती सज्जनाची धरावी ॥ १६७**
**जया मानला देव तो पूजिताहे । जया मानली भक्ति जे तेचि मोठी ॥१७८**

ज्यांचा उपयोग वारंवार ऐकूं येतो, असे कांहीं श्लोक वा श्लोकचरण येथें सादर केले. वाचकाच्या अभिरुचीस अनुसरून आणखी कित्येकांचा अंतर्भाव या सुभाषितमालिकेंत होऊं शकेल. या उताऱ्यांत समर्थांच्या विचारसरणीचीं कांहीं निश्चित अंगेंहि वाचकांना उमगतील.

म ना च्या श्लो कांत अनुप्रासानें गंभीर अर्थ अनेक स्थळीं निर्माण केलेला आहे. मना वासना, मना कामना, मना यातना, मना सज्जना, सदा सर्वदा, मनीं लोचनीं, महाकाळ विकाळ, यासारख्या सामान्य अनुप्रासाच्या उदाहरणांना म ना च्या श्लो कांत तोटा नाहीं. अनुप्रासाच्या शब्दांनीं अर्थाचें सौंदर्य साधण्याचा खेळ हा डोळ्याच्या किंवा कानांच्या वेधाबरोबर चित्ताला आपल्याकडे ओढून घेतो व तसा खेळ म ना च्या श्लो कांत पुष्कळ दिसतो. नसे राम तें धाम सोडून द्यावें । ४४, अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना । अती काम त्या राम चित्तीं असेना । अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा । ६४, नव्हे सार संसार हा घोर आहे । ६६, मुखीं राम त्या काम बाधूं शकेना । ८७, जया नावडे राम त्या येम जाची । १०१, अशीं उदाहरणें आणखी पुष्कळ सांपडतील. क्वचित् श्लेषाचेंहि दर्शन घडतें. उदाहरणार्थ, करी वृत्ति जो संत तो संत जाणा । १६८. अक्षरसाम्याच्या गोडीनें आपला उपदेश एखाद्याच्या जिव्हेस लिगटला कीं त्याच्या अर्थाचा स्वाद आकलन होऊन त्यानें उपदेशाच्या डोहांत डुंबण्यास प्रवृत्त व्हावें, असा समर्थांचा हेतु असल्यास तो प्रत्येक श्लोकामध्यें उठावानें दिसल्याशिवाय रहात नाहीं.

मनाच्या श्लोकामागून **करुणाष्टकें** या सामान्य नांवानें प्रकाशित करण्यांत आलेल्या संकीर्ण कवितासंग्रहाकडे लक्ष देणें उचित आहे. सत्कार्योत्तेजक सभेच्या करुणाष्टक-संग्रहांत एकूण २५९ कविता आहेत. त्यांतील शंभरावर कविता राम-

चरित्र, रामराज्य, रामचरित्रांतील अहिल्योद्धारासारखा एखादा प्रसंग, रामाची प्रार्थना, या विषयाच्या असून श्रीकृष्णचरित्राची माहिती इतर कित्येक कवितांमधून दिलेली आहे. रामकृष्ण (७३) या दोन्ही अवतारांची कथा एका ३४ श्लोकांच्या कवितेंत एकत्र आहे. अशीं काव्यें संस्कृत भाषेंत आहेत. एक श्लोक रामाचा व एक कृष्णाचा अशी या कवितेची रचना आहे. रामकृष्णांखेरीज परशुराम, नृसिंह, यांच्या स्तुतीचे श्लोक आहेत. परशुरामाला आळवितांना समर्थांनीं आपलें जमदग्नि गोत्र उच्चारून म्हटलें आहे कीं अवतारकाळीं ब्राह्मणांना राज्यदान करणारा व ब्राह्मणांची महती वाढविणारा परशुराम आज निःसत्त्व झालेला दिसतो. अवतार सोडल्यास महाराष्ट्रांतील पांडुरंग, तुळजामाता, या देवतांचीं वर्णनें या संग्रहांत आढळतात. मारुति हें समर्थांचें आवडतें दैवत असल्यामुळें त्याच्या पराक्रमाचें स्तवन या कवितासंग्रहांत बरेंच असावें यांत आश्चर्य नाहीं. करुणापर कवितांतील बहुतेकांचा निर्देश मागें समर्थांच्या कवित्वगुणांच्या परामर्शांत झालेला असल्यामुळें त्यांची पुनरुक्ति येथें न केल्यास चालेल. त्यांतील पुष्कळ कवनें प्रसिद्धहि आहेत. एक महिम्नस्तोत्राच्या वृत्ताचें १०० श्लोकी प्रकरण असून त्यांत एकूण २० पंचकें आहेत. स्तवन, शारदा, कथा, गायन, विष्णु, शंकर, भवानी, रघुनाथ, पंचमहाभूतें, प्रवृत्ति, वैराग्य, विमल, निश्चळ, निराकार हे या पंचकांचे विषय आहेत. प्रतिपादनाचें स्वरूप दासबोधासह इतरत्र सांपडणाऱ्या उपदेशासारखेंच आहे.

अंतरात्मा, जगज्जोती, देह, संसारांतील सुखदुःखें, एक देव, नानाविध लोक, मतामतांचा विरोध, सज्जन दुर्जन, व्यवहारांतील भेद, बायकोमुलांचा अभिमान, मुलांना शिकवण, अद्वैत, वैराग्य, कामविकार, उद्योगशीलता, हे समर्थांच्या बोधसृष्टींतील विषय करुणाष्टकें या संग्रहांत पसरले आहेत. तथापि वेळोवेळीं उद्भवणाऱ्या कित्येक श्लोकबद्ध स्वैर विचारतरंगांचा हा संग्रह असल्यामुळें यांत अन्यत्र न आढळणाऱ्या समर्थहृद्गताच्या छटा पाहण्याला सांपडतात. त्यांचा रंगहि साहजिक निराळा आहे, म्हणून त्यांचें दर्शन घेण्याला हरकत नाहीं.

नाना देवतांच्या गर्दीतून खरा एक देव ओळखण्याची आवश्यकता पटण्यासाठीं समर्थांनीं एका पंचकांत (२५) एखाद्याला पुष्कळ बाप असावे, या अपवादाचा दाखला घेतला आहे :

**बहू बाप हो बोलतां पाप लागे। जनामाजि विस्मीत होऊन सांगे**
**बहू देव त्याला बहू बाप जाणा। म्हणोनी मना वोळखे देवराणा ॥ ४**

त्या पुढच्या (२८) या पंचकांत 'दुजा जनकू बोलणें हें घडेना' या वाक्यानें तोच अर्थ सुचविला आहे. ६३ क्रमांकाच्या दशकांत स्त्रीनिंदेचा निषेध समर्थांनीं केलेला आहे. कोणीतरी समर्थांच्या समोर स्त्रीनिंदा केली व समर्थ क्षोभले असा प्रसंग त्या कवितेंत दिसतो. समर्थ स्त्रीनिंदकाला बजावतात: ज्या आईच्या पोटीं तुझा जन्म झाला, त्या आईच्या जातीची नालस्ती करण्याचा तुला संकोच कसा वाटत नाहीं? अगोदर तिनें तुला पोटांत वाहिलें. जन्मोत्तर 'बहू जननीनें तुझे कष्ट केले। बरें वोखटें सर्व साहोनि नेलें।' आज तुला तें आठवत नाहीं. मूर्खा ध्यानांत ठेव कीं

**जनीं पाळिती सर्व नारी नराला। तया निंदिती शुद्धि नाहीं खराला ॥ ५**

भिक्षेची थोरवी जशी दासबोधाच्या एका समासांत आहे तशी या संग्रहाच्या एका श्लोकांत आहे व त्यांत भिक्षेची लाज वाटणारांचा लहानसा स्वानुभव समर्थांनीं नमूद केला आहे (९४):

**भिक्षा मुळीं पाहातां ब्राह्मणांची। भीक्षा नस्तां होतसे सर्व ची ची**
**भिक्षा मागें रक्षिली थोरथोरीं। आतां लज्या मानिली मूर्ख पोरीं ॥ ६**

लहान मुलांसंबंधांत ज्या गोष्टी बोलल्या जातात त्यांचा निर्देश करून समर्थ वेदांताकडे कसे वळले आहेत तें सांगण्यासारखें आहे. मुंजीच्या वेळीं मुलांच्या मांडींत पुरणपोळी व चेंडूक भरतात, पोटांत फळाची बी गेली तर तेथें झाडें जाळ्या वाढतात, मुलांनीं एखादी गोष्ट पाहूं नये असा संकेत असेल तर मुलांनीं ती गोष्ट न पाहावी म्हणून डोळे गमावण्याचें भय त्यांना दाखविलें जातें, स्त्रियांच्या मासिक अस्पृश्यतेचें कारण कावळ्याचा स्पर्श असें सांगून गतकालीं मुलांचें समाधान करीत असत, ही माहिती पहिल्या श्लोकांत आहे:

**जानुमधें घालिती जीवपोळी। पोटामधें वाढती वृक्षजाळी**
**पाहों नये पाहतां नेत्र जाती। पुसों जातां कावळे सीवताती ॥ १**
**बाउ बाउ बाळका चाळवावें। मिथ्यावादें अर्भकाला वळावें**
**हें तों कांहीं जाणत्यालागि नाहीं। पाहीं पाहीं सार शोधूनि पाहीं ॥ २**

वरील दुसऱ्या श्लोकाचा अर्थ मुद्दाम उलगडून सांगण्यासारखा कठिण नाहीं. पुढील दोन श्लोकांत (१३४) भोजनाचें व ताकाचें वर्णन आहे :

**बरी शाक ते भुंकणीं मुंकणीची । रुची चोखडी निर्गुंडीचे कडीची**
**करी लोकरी भाकरी भातभाजी । फुटें तीखटें लोणचें तक्र आजी ॥९०**
**मला लागतां उष्ण मी कृष्ण जालों । परी सेवितां तक्र सुखें निवालों**
**माहां तक्र स्वादिष्ट तो शक्र नेणे । तया मानवी जीव हा काय जाणे ॥९६**

कडी-कढी, लोकरी-लौकरी, फुटे-कूटें (चूर्णें) याप्रमाणें पहिल्या श्लोकांतील शब्दांचा बोध करून घेतां येतो. दुसऱ्या श्लोकांत केव्हांतरी कडक उन्हानें काळवंडून गेल्याच्या प्रसंगीं उत्तम ताक मिळाल्यामुळें सुख झाल्याचा स्वानुभव समर्थ वर्णीत असल्याचा भास होतो. 'तक्रं शक्रस्य दुर्लभम्' या संस्कृत सुभाषिताचाहि वास या श्लोकांत जिज्ञासूंना गवसेल.

स्वकालीन लोकस्थितीचा अस्ताव्यस्तपणा विवेचीत असतां समर्थांच्या कानावर त्या स्थितीचें जें कारण पडलें तें त्यांनीं एका श्लोकांत गोवलें आहे (१३४) :

**अकस्मात मागें भुमीकंप जाला । नभामाजि तारेंसि सेंडा निघाला**
**तदारभ्य भूमंडळीं धुंदि जाली । नसे न्याय ना नीति सर्वै बुडाली ॥ ६**

भूकंप व शेंडेनक्षत्राचा उदय या घटना समर्थांच्या आठवणींतच झाल्या असाव्या अशी कल्पना करून घेण्याचें कारण नाहीं. समर्थ जन्मास येण्यापूर्वीपासून भूमंडळीं धुंदी व न्यायनीतीची बूड बहुत काळ सुरू असल्याचें इतिहासज्ञांना सांगायला नको. भूकंप व धूमकेतूचा उदय हीं लोकांवर ओढवणाऱ्या संकटाचीं पूर्वचिन्हें मानण्याचा प्रघात अतिशय प्राचीन आहे.

समर्थांच्या चरित्राशीं ज्यांचा संबंध जोडण्यांत येतो असे चार श्लोक या संग्रहांत इतस्ततः पडलेले आहेत. १३४ क्रमांक एका स्फुट श्लोकांच्या संकलनाला देण्यांत आला असून त्यांत अनेक विषयांचे १४६ श्लोक आहेत. चारांपैकीं दोन श्लोक मारुतीचा ठसा किंवा मूर्ति असलेले ताईत वापरण्याविषयीं आहेत व केव्हांतरी साध्या भाविकांनीं किंवा शिपाईगिरींतल्या लोकांनीं समर्थांकडे आपल्या नशीबाची चौकशी केल्यावरून ते श्लोक समर्थांनीं रचले, असें त्याविषयीं चरित्रकारांचें म्हणणें आहे.

**ठसा हेमधातूवरी वातसुतु । तथा ताइताची बरी रौप्य धातु**
**तयाची पुजा मंदवारीं करावी । बरी आवडी आर्त पोटीं धरावी ॥ ५६**
**लघूसी परी मूर्ति हे हाटकाची । करावी तथा मारुती नाटकाची**
**असावी सदा ताइतामाजि दंडीं । समरंगणीं पाठि दीजे उदंडी ॥ १५**

पुढील दोन श्लोकांचा संबंध समर्थचरित्रकारांनीं स्त्रियांशीं जोडला आहे. समर्थांच्या शिष्यिणींबद्दल समर्थांना अनुलक्षून अपवाद उत्पन्न झाल्याचें ऐकून श्रेष्ठांनीं

**संपन्न तारुण्य लावण्यनारी । कौशल्यता वैभव चित्तहारी**
**येकांतकाळीं पडतां समंधु । अभिलाष न करी तो धन्य साधु ॥ १३३**

हा श्लोक पाठविला. शिरगांवकर भीमस्वामीच्या भक्तलीलामृतांत हा श्लोक वरच्याप्रमाणें नाहीं. 'लावण्य सौंदर्य तारुण्य नारी । चातुर्यता चंचळ चित्तहारी' असे भीमस्वामीच्या माहितीचे चरण आहेत. तिसऱ्या चौथ्या चरणांत फरक नाहीं. श्रेष्ठांच्या श्लोकांतील खोंच लक्षांत घेऊन समर्थांनीं उत्तरादाखल जो श्लोक लिहिला तो असा (९४) :

**स्वर्गांगनासी सन्मुख आली । लावण्यरूपीं दृष्टी न घाली**
**मुक्ताफळीं शुक्र उघडीच रासी । परंतु आरण्यमिरास त्यासी ॥ २**

मुक्ताफळ व शुक्र हे शब्द एकत्र पाहून दासबोधांतील 'जीवनाचें मुक्ताफळ । शुक्रासारिखें सुढाळ ।' (१६ : १० : १९) या ओवीचरणांचें स्मरण होणें शक्य आहे. शुक्राच्या चांदणीसारखें मोती असा याचा अर्थ स्पष्ट आहे. भीमस्वामीच्या कथेंतील या श्लोकांत पुढीलप्रमाणें पाठभेद आहेत.

**स्वर्गांगनेसी जरि साम्य आली । परंतु तिथें दृष्टी न घाली**
**निजात्मबोधें निःसंग राशी । परंतु आरण्य मिरास त्यासी**

करुणाष्टक-संग्रहांत हे दोन्ही श्लोक समर्थांचे म्हणून रुजू आहेत. शिवाय ते दोन्ही एकमेकापासून दूर अंतरावर भिन्न स्थळीं पडलेले आहेत. त्यांच्यांत प्रश्नोत्तराचा अनुक्रम नाहीं. एक संकीर्ण श्लोकांच्या जमावांत आहे, तर दुसरा निःस्पृहतुल्य पुरुषाच्या सप्तश्लोकी वर्णनांतील आहे. समर्थांच्या चरित्रकारांनीं एक श्लोक श्रेष्ठांचा व दुसरा समर्थांचा कल्पून घाणेरड्या कथेचा जो गोंधळ घातला आहे त्याचा बनावटपणा आतां उघडकीस येण्याला हरकत नाहीं.

अरण्यवासाची आवड हा समर्थांचा स्वभावविशेष या संग्रहांतहि प्रगटलेला आहे. जेथें राम नाहीं तें धाम सोडून 'सुखालागिं आरण्य सेवीत जावें ॥ ४४', सर्वोत्तमाचा दास 'सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं । ५४' याप्रमाणें हा स्वभावविशेष मनाच्या श्लोकांत व्यक्त झालेला असून 'निघोन जावें कठिणा वनाला । अखंड गावें मग पावनाला । ६४ : १०' अशा रीतीनें तो करुणाष्टक संग्रहांत दृष्टीस पडतो. क्र. ७९ मध्यें जीविताचें निरीक्षण आहे. त्याचा आरंभच 'मना चाल उठीं वना दुर्गमातें' असा असून 'बहू वीट आला भवाचा न सावे (साहावे) । अटव्यांत देऊनिया हाक जावे । ९' याप्रमाणें पुनः वरील विचाराची वाच्यता केली आहे. या निरीक्षणाच्या शेवटीं 'यथावीध देहो वनामाजि जावा' अशी आणखी एकदां वनवासाची आकांक्षा उघड झाली आहे. क्र. १५४ मध्यें 'स्वजन जन तजावे देश लंघूनि जावें । कठीण मन करावें झाडखंडी भरावे' असें सांगून आणखी एकवार समर्थांनीं आपल्या आकांक्षेचा आविष्कार केला आहे (पा. ९३):

**दरे दर्कुटें झाडखंडे अनेकीं । कपारे कडे वीवरे आणि टाकीं**
**वनीं पावनीं पांडवीं वास केला । गिरी देखिला दास संतुष्ट जाला ॥**

महाराष्ट्राच्या डोंगरांतील बऱ्याच लेण्यांना पांडव लेणीं म्हणण्याचा प्रघात आहे. पांडवांच्या वास्तव्यानें ओळखल्या जाणाऱ्या एखाद्या लेण्याच्या डोंगराला अनुलक्षून हें स्वगत उच्चारलें आहे कीं काय असा संशय येतो.

डोंगरदऱ्यांतून, गुहाघळींतून कशासाठीं फिरायचें, काय करायचें, याचें समर्थांच्या मनांतलें उत्तर निश्चित होतें (पा. ८६) :

**येकांत गुव्हा निर्वात येथें । चर्चा करावी अद्वैत तेथें**

या आकांक्षेचा प्रत्यय श्रीरामदासांची कविता खंड १ मधील एका जलप्रपाताच्या वर्णनांत येतो (पान ३९०–३९१). डोंगराच्या माथ्यावरून खालीं कोसळणाऱ्या पाण्याच्या धारेआड रम्य विवरें व गुंफा असून त्यांत तापसी राहतात. तेथें जाण्याला पुण्य पाहिजे. 'कथा निरूपणें चर्चा । सार्थकें काळ जातसे ।'—त्या जागीं कथानिरूपणचर्चेनें काळ सार्थकीं लागतो, असें तेथें म्हटलें आहे.

करुणाष्टकांतील ५३ व्या प्रकरणांत समर्थांनीं स्वतःचा एक अनुभव बाहेगांवच्या मारुतीसंबंधांत ग्रथित केला आहे. बाहेगांवचा मारुति पाहण्याला समर्थ

मोठ्या उत्सुकतेनें गेले, पण जागेवर मारुति नव्हता. समर्थांना विस्मय वाटला. देवाशिवाय देऊळ उदास भासलें व समर्थांनीं देवाला हाक मारली. मारुतीनें भेट दिली व मोठा चमत्कार केला, अशा अर्थाचे या श्लोकदशकांत ७–८ व १० असे तीन श्लोक आहेत.

समर्थांना मुलांची आवड होती असें पुढील श्लोकावरून लक्षांत येईल (१३४):

**वयें थोर ते चोर भावार्थ नाहीं। विकल्पें बुडाले अहंभाव डोहीं**
**अहंता नसे हो तया लेकुरासी। म्हणोनी बहु आवडी रामदासीं ॥ ११८**

मनाच्या श्लोकासारखींच करुणाष्टकसंग्रहांत सोप्या भाषेचीं व हृदयाला जाऊन भिडणाऱ्या अर्थाचीं पुष्कळशीं सुभाषितें आहेत. त्यांच्याकडे करुणाष्टकांचा परामर्श आटोपतां आटोपतां नजर टाकणें बरें (पुढील आकडे पानांचे आहेत):

**अति क्रोध त्या बोध होणार नाहीं। असी बोध त्या क्रोध येणार नाहीं। ८६**
**बहु बोल ते फोल कंटाळवाणे। जया शांति ते दांति ते ही न बाणे**
**बहु क्रोध त्या बोध होईल कैंचा। जळो तें जिणें लेश नाहीं सुखाचा। ९५**
**गतांच्या कथा काढितो अल्प कांहीं। पुढें लोक ते काढिती आमुच्याही। १३**
**मदें साभिमानें असंभाव्य ताठा। पुढें बैसला काळदंडे चपेटा। ५८**
**बरा काळ देखोनि सर्वैं मिळाली। अभाग्यास देखोनि सर्वैं पळाली। ५८**
**नवे लोक येती जुने लोक जाती। मिळे सेवटीं सर्व मातीस माती। ७१**
**नसे तोल ते बोल कंटाळवाणे। बहु बोल ते फोल सर्वत्र जाणे। ८१**
**जना सांगतां ऐकतां जन्म गेला। परी आपुलाला स्वयें घात केला। ८**

क्र. २१५ तील उपदेशाचा चुटका अन्यत्र न सांपडणाऱ्या विचाराचा असल्यामुळें पहाण्यायोग्य आहे (पान १६३):

**भेटो कोणी येक नर धेड महार चांभार**
**त्याचें राखावें अंतर याचें नांव भजन।**
**दुःख नेदावें कोणाला उंच नीच जरी जाला**
**अंतरात्मा वोळखिला तोचि जाणावा सज्जन।**
**मिळाला तो भक्त जाला दोष मिळेना तयाला**
**देव प्रतक्ष कोपला अहंभाव दुर्जन।**

**राजी राखावे सकळ बरेंपण सर्वकाळ**
**नित्य आनंदाची वेळ काळ करी वंदन ।**

समर्थांना अरण्याचें प्रेम होतें, हें पूर्वी वेळोवेळीं वाचकांच्या निदर्शनास आलेलेंच आहे. त्यांच्या निसर्गवर्णनांत अरण्याप्रमाणें पावसाळयांतील देखाव्यांचीं आणि जलसंचयांचीं, जलप्रवाहांचीं शब्दचित्रें अधिक आढळतात. दासबोधांतहि हीं जलविषयक शब्दचित्रें दिसतात (विशेषतः १६ : ४). करुणाष्टक-संग्रहांत असें एक शब्दचित्र आहे व तें पाहिल्यानें समर्थांच्या कवित्वासंबंधीं नीट कल्पना करतां येईल (पान १६) :

**पसरले सरले गिरि साजरे । सरवटें धुकटें भरितें भरें**
**बहुत वात झडांत झडाडितो । वर तरू वरताच कडाडितो ॥ १**
**झिरपती झरती झरती झरे । न धरितां धरतां निर वावरे**
**बहुत पाभळ वोघ महीतळीं । नभकटें धुकटें कटपाभळी ॥ २**
**सरस रम्य रसाळ वनांतरा । हरित रंग सुरंग दिसे बरा**
**दिसतसे रमणीय वसुंधरा । नुतन पल्लव हा तरु साजिरा ॥ ३**
**द्रुमलता समता त्रुण मातले । सुख मनीं सुमनीं मन रातलें**
**परम सुंदर ते खग बोलती । गमतसे वसती कमळापती ॥ ४**
**विमल सूसिळ तें स्थळ पाहतां । सुख विशेष घडे पळ राहतां**
**वरदराज विराजतसे वनीं । विनटला नटला रत सज्जनीं ॥ ५**

जलश्रीचें असेंच पण याहून विस्तृत वर्णन श्रीरामदासांची कविता खंड १ मधील स्फुट श्लोकांत कृष्णचरित्र गातांना समर्थांनीं गोवलेलें आहे. त्याचा प्रारंभ 'नदी तिरें मनोहरें । जळे सुनीळ सुंदरें' याप्रमाणें आहे (पान ४९३–४९४).

सत्कार्योत्तेजक सभेनें छापलेल्या समर्थांच्या वाङ्मयामध्यें **'पदपदान्तरें'** या नांवाचा खंड असून त्यांत आरत्या (त्यांत कृष्णा नदीची एक आरती आहे), विठ्ठल, खंडोबा, भवानी इत्यादिकांचीं स्तवनें, उपदेशपर व तत्त्वज्ञानपर पदें अशी सुमारें ३७५ कविता क्रमांक पाहिल्यास दिसते. परंतु त्यांत दुबार छापलेलीं पदपदान्तरें आहेत. तीं वगळल्यास सवातीनशेंपर्यंत सगळ्या कवितांची बेरीज

भरेल. कीर्तनप्रसंगीं उपयोगांत आणलेलीं हीं पदें आहेत. जे विषय समर्थांच्या इतर वाङ्मयामध्यें आढळतात तेच या पदांतूनहि आढळतात. हीं पदें गावयाचीं असल्यानें कीर्तनांतील साथीच्या वाद्यांकडे लक्ष देऊन कित्येक पदांची रचना केलेली आहे. 'तक धी धी धी धी बुद्धि हरी। रिद्धि सिद्धि खरी ॥ ध्रु० ॥' या पदाच्या स्वरूपावरून वरील विधानाची सत्यता पटेल. अनेक पदें पंचकांत विभागलीं आहेत. पंचक म्हटल्यानें प्रत्येक विभागांत नेमकीं पांचच पदें असतील ही कल्पना खरी ठरणारी नाहीं. नांवांत पंचक असलें तरी संख्या तीनपासून दहाअकरापर्यंत सांपडते. आरंभ, सावध, सार्थक, आवस्ता (अवस्था), कुढावा, करुणा, प्रीति, भक्ति, वेध, तडक, धावा, खोज (शोध), साहित्य, प्रबोध, विवेक, विवरण, दयाळ, आळस, घमंड, आर्त, गुह्य याप्रमाणें पंचकांचीं अनेकविध नांवें आहेत. या कवितांत व्रज, अवधी व हिंदुस्थानी (उर्दू), या उत्तर भारतीय भाषांतील रामकृष्णांच्या स्तुतीचीं किंवा देवाच्या खऱ्या स्वरूपाचें निदर्शन करणारीं पदेंहि आहेत. हिंदुस्तानी भाषेंतील पदांचा विषय हिंदु-मुसलमानांतील द्विधाभाव कमी करण्याचा आहे. त्यांत मराठींतील 'विभक्त नव्हे तो भक्त' यासारख्या शब्दार्थाच्या कोट्याहि आहेत. 'खबर है सो गबर है। फिकीर नहीं सो फकीर।' (पान १२५)–'जो सावध तो सुखी व ज्याला काळजी नाहीं तो फकीर (साधु)' असा याचा अर्थ आहे. मुलाणा (मौलाना) या शब्दाची व्युत्पत्ति समर्थांनीं एका पदांत लावली आहे ती अशी (पान १५३): मू अल्लाणा–अल्ला आना–ज्याच्या तोंडांत सदैव अल्ला वसतो तो मुलाणा. सत्य मार्गानें जाईल तो काजी. (छापलेल्या प्रतींत बहुधा चुकीनें काजीबद्दल 'काही' असा शब्द पडला आहे.) प्रस्तुत पदपदांतरांच्या खंडांत दोन कवितांचे विषय इतरत्र न पाहण्यांत आलेले आहेत. एक वानराच्या वर्णनाचा व दुसरा वानर-गोपाळ संवादाचा असे ते विषय होत. वानर हे रामाचे दास या नात्यानें त्यांच्या संबंधीं समर्थांना प्रेमादर वाटत होता. 'हुलें कपाळ ज्यांचें धुलें पाहाणें त्यांचे। फुटाणे आणि चण्याचे आरत बहु। वांकुल्या दाविती कुसी कांडोळती' या स्वभावोक्तीनंतर समर्थ म्हणतात: 'आतां वाटतें जावें त्यांचे सांगाती व्हावे। डोळे भरून पाहावें। सर्वांग त्यांचें ॥ ५'. हा विचार ऐकून श्रोता हसेल या जाणिवेनें समर्थांनीं त्यांची योग्यता निदर्शनास आणली आहे. 'त्यांची सर कोणाला येणार नाहीं. पाला खाऊन त्यांनीं रामाची शुश्रूषा केली.

ऐसी करणी त्यांची व्यर्थ जीर्णी आमुचीं. त्यांच्या तुलनेनें आमचें जिणें अगदीं टाकाऊ ठरतें' असा समर्थांचा अभिप्राय आहे (पान ४३).

जुन्या मराठी साहित्यांतील लक्ष्मी-पार्वती संवादाचें वाचकांना ज्ञान असल्यास वानर-गोपाळांच्या संवादाचें स्वरूप अंदाजण्याला कठिण नाहीं. वानर व गोपाळ यांची गांठ पडली तेव्हां वानरांनीं रामाचें गुणगान आरंभलें. उत्तरादाखल गोपाळांनीं कृष्णचरित्राचा उच्चार सुरू केला. रामानें रावण मारला तसा कृष्णानें कंस मारला. दोन्ही अवतार भक्तांच्या कैवारानें उत्पन्न झाले. शेवटीं रामकृष्ण निराळे नव्हत, आपण सर्वच रामदास आहों, असा या संवादाचा निष्कर्ष निघाला (पान २७-२९).

## •३•

श्री रामदासांची कविता खंड २ लघुकाव्यें या नांवाखालीं सत्कार्योत्तेजक सभेनें प्रसिद्ध केलेलें समर्थवाङ्मयाचें आणखी एक पुस्तक असून यामध्यें पूर्वारंभ, जुनाट पुरुष, अंतर्भाव (६ समास), आत्माराम (५ समास), पंचसमासी, सप्तसमासी, सगुणध्यान, निर्गुणध्यान, मानसपूजा, एकवीस समासी म्हणजेच जुना दासबोध, जनस्वभाव किंवा बहुधा गोसावी, अशीं अकरा प्रकरणें आहेत.

**पूर्वारंभ** प्रकरणाच्या ६० ओव्या आहेत. जन्माचें कारण, तें नष्ट होण्याचा उपाय, भक्ति कशी करावी, सद्गुरूची ओळख, या संबंधाचीं प्रश्नोत्तरें पहिल्या ९ ओव्यांत असून, मोक्ष कशाला म्हणतात हा शिष्याचा प्रश्न ऐकून अधिकाराशिवाय कांहीं गोष्टी सांगणें शक्य नाहीं असें गुरूकडून उत्तर मिळालें, तेव्हां अधिकाराच्या खुणा शिष्यानें विचारल्या. 'विश्वास, विरक्ति, संसाराविषयीं अनासक्ति, अंतरापासूनि गुरुभक्ति, इत्यादि गुण जेथें दिसतील तें अधिकाराचें स्थळ होय,' असा गुरूनें खुलासा केल्यावर, आत्मज्ञानाच्या उपदेशाला १६ व्या ओवीपासून प्रारंभ केला आहे. देह, आत्मा, प्राण म्हणजे वायु यांची विवेचना झाल्यावर, देहच खोटा तेव्हां त्याच्या चालकाचा प्रश्न उपस्थित होतोच कसा, याप्रमाणें विषयाला निराळी गति देऊन मायेचा विचार सांगितला. मायेचा भ्रम आत्मनिवेदनानें जातो. आत्मनिवेदनाकरितां सद्गुरुवचनाचें अंजन डोळयांत पाहिजे. मग मायेचें भय उरत नाहीं. यावर भावनेला आतुडत नाहीं, त्याची प्राप्ति कशी होणार, हा प्रश्न निघून त्याच्या

उत्तरांत ब्रह्माच्या स्वरूपाचें शिष्याला गुरूनें दर्शन घडविलें आहे. ३९–५५ या ओव्यांत एकच विषय असून, ज्याचा शोध चालविला, तें आपल्याजवळच आहे, किंबहुना तें आपणच आहों, हें त्याचें तात्पर्य ५४–५५ ओव्यांत सांगितलें आहे. हा अनुभव व त्याचा आनंद शब्दांनीं वर्णन करतां येण्याजोगा नाहीं, याप्रमाणें या प्रकरणाचा समारोप आहे.

**जुनाट पुरुष** हें ५७ ओव्याचें प्रकरण ब्रह्म, माया, पंचमहाभूतें या विषयाच्या विवेचनाचें आहे. सृष्टीची उभारणी-संहारणी सरळ सांगण्याऐवजीं या विषयाला कहाणीचें रूप दिलें आहेः जुनाट पुरुष होता व आहे. त्याला मुलगी झाली; तिला पुढें मुलगा झाला. मुलाचें नांव काळ. २१ व्या ओवीपासून या कहाणीची सुरवात आहे. या मुलीचा खेळ म्हणजे सगळें ब्रह्मांड. समर्थांनीं 'याचाहि करावा पाल्हाळ । तरी तें दिसतचि आहे ॥' असें म्हणून ही कहाणी आटोपली आहे. खेळ चालू असतां केव्हां तरी या मुलीला झोंप लागते किंवा बापाच्या भेटीची तळमळ तिच्या ठिकाणीं उद्भवते. झोंप लागली कीं ब्रह्मांड विलय पावतें. भेटीच्या तळमळीनें बापापाशीं पोचतांच सृष्टि तर उरत नाहींच पण ही मुलगी देखील दिसेनाशी होते. मुलगी दिसेना म्हणून बाप चिंतेंत पडतो, तोंच मुलगी आपल्या अंतरंगांत असल्याची जाणीव होऊन तो चिंतेंतून सुटतो. जुनाट पुरुषाच्या कथेचा हा सारांश आहे. पहिल्या २० ओव्यांत हा विषय समजून जिरवून पूर्णपणें आपलासा कसा होईल, याची चर्चा आहे. नुस्ती बुद्धि किंवा विद्वत्ता यांचा प्रस्तुत विषय आकळायला उपयोग नाहीं. समाधानाची किल्ली वेगळीच आहे (६). 'समूळ अहंता विराली । हेचि समाधानाची किली । १७'. अहंतेच्या लोपांत बुद्धि व विद्वत्ता (ज्ञान) यांचाहि लोप होतो. अहंतेचा पडदा गेला कीं आपण कोण याचा पूर्ण बोध अंगीं मुरून बद्धावस्था संपते व मोक्ष लाभतो.

**अंतर्भाव** म्हणजे सगळ्या तत्त्वज्ञानाचा अंतर्भाव–गाभा–निदिध्यास. समर्थांच्या उपदेशाचीं अंगोपांगें जीं एकदां त्यांच्या बुद्धीनें निश्चित केलीं, तींच सर्वत्र कमी-अधिक विस्तारानें त्यांनीं सांगितलीं आहेत. अंतर्भावाचा पहिला समास शिष्यानें काकुळतीनें विचारलेल्या प्रश्नांचा आहे. प्रश्नांचें स्वरूपहि ठरलेलेंच आहे. संसाराच्या दुःखांचें निरसन कसें होईल ? हा शिष्याचा प्रश्न ऐकून गुरुजींचें प्रवचन सुरू झालें. देह मायिक, त्याचीं कर्में बंधक. यांच्या कचाट्यांतून सुटायचें तर माणसानें प्रयत्न

करायला पाहिजे. नुसतें शब्दज्ञान उपयोगाचें नाहीं. आचरण घडेल तर संसाराच्या दु:खांतून सुटका होऊं शकते, असें गुरुजींनीं दुसऱ्या समासांत सुचविलें आहे. प्रयत्न करायचा म्हणजे काय करायचें याचा तपशील तिसऱ्या समासांत आहे. बद्ध, मुमुक्षु, साधक यांचीं लक्षणें सांगून स्वधर्मरक्षण, अद्वैतश्रवण आणि नित्य नेम हीं कर्तव्यें गुरूनें निदर्शनास आणलीं तेव्हां शिष्यानें नित्य नेमाचा खुलासा विचारला. मानसपूजा, एकाग्र जप-ध्यान, मारुति-सूर्याचें त्रिकाळदर्शन, हरिकथानिरूपण, 'अंतरीं पांच नांवें म्हणत जावीं नित्य नेमें।' याप्रमाणें नित्य नेमांची माहिती कानीं पडतांच शिष्यानें शंका काढली कीं, हीं साधनें करतां करतां जन्म निघून जाईल व खरें समाधान मिळण्याची खात्री नाहीं. या शंकेला चौथ्या समासांत उत्तर दिलें आहे. साधनांचा कंटाळा केला कीं सिद्धावस्था आटपली म्हणून समजावें. सिद्धावस्थेंत खाणें झोंपणें सुटत नाहीं, पण साधनांचा मात्र त्याग करावासा वाटतो. खाण्याझोंपण्यासारखेंच साधनांचें महत्त्व अपरिहार्य आहे. साधन सोडल्यास शिस्त बिघडून घात होतो. देहाच्या आसक्तीनें विरक्तीला खो बसतो आणि विरक्तीखेरीज भक्ति संभवत नाहीं. साधकाला नित्य नेम नसेल तर 'तयासी अंतीं धोका। नेमस्त आहे ॥ ११'. यांतील 'अंतीं'च्या अनुरोधानें 'अंतीं मति तेचि गती। तरी मी काय करूं ॥ १२' हा शिष्याचा प्रश्न पुढें आला. त्याचा विचार पांचव्या समासांत आहे. आत्म्याचा अंत होत नाहीं. आत्म्यावांचून शरीर हें केवळ मढें; अर्थात् त्याचा अंत होणें शक्य नाहीं. या उत्तरानें शिष्याला विस्मय वाटला. देह प्राणांच्या बळानें चालतो, प्राणावर आत्म्याची सत्ता असते. परंतु सत्ता म्हणजे माया. माया तर सांगून सवरून खोटी. मग सत्तेची वाट काय? अज्ञान-भ्रांतीनें तरळलेल्या दृष्टीला माया आढळते. माया हा दृष्टिदोषाचा परिणाम होय. देहबुद्धि शुद्ध ज्ञानाला झांकून टाकते, यासाठीं देहातीत सुखाचा शोध केला पाहिजे. देहाच्या आसक्तीचा प्रभाव घालविला कीं, देहान्ताचा प्रश्नच उरत नाहीं. 'अस्तें करूनि वाव। नस्त्याचा पुसूनि ठाव। दोहितीत अंतर्भाव। अस्तें खुणेनें असावें ॥ २२'. साधकाच्या समाधानाचें हें स्वरूप आहे. नीट लक्ष देऊन उपदेश ऐकत असतांना जें पटतें तें मागून मावळतें, यावर शिष्यानें उपाय विचारला. त्याचें निरूपण सहाव्या समासांत आहे. वृत्ति स्थिर असणें, कदापि न चळणें हाच अंत-र्भाव, असें या प्रकरणाच्या नांवाचें स्पष्टीकरण आहे. गुरूच्या निरूपणाचा सारांश

असा : 'अभ्यास हा वृत्तिस्थिरतेचा उपाय आहे. अभ्यासाच्या बळकटीवर वृत्तीचें स्थिरत्व अवलंबून असतें. न चुकतां नित्यनेम संभाळणें हेंच अभ्यासाच्या दृढत्वाचें लक्षण आहे. अभ्यासानें संवय जडली कीं काय करायचें हें सांगावें लागत नाहीं. शक्ति मंदावली तरी संवय कायम रहाते व नेम चुकल्यास जीव कासावीस होतो. जीव कासावीस होतो याचा अर्थ निदिध्यास. देवाचें प्रत्यक्ष दर्शन घडेनासें झाल्यास निदिध्यासानें दर्शन घडतें. वाचा गेल्यास आंतल्या आंत जप चालतो. अभ्यासामुळें अंतकाळीं बुद्धि भक्तीला चिकटून राहाते व असा मनुष्य सद्गतीला अंतरत नाहीं.'

**आत्माराम** हें पांच समासाचें प्रकरण असून, अंतसमयीं ज्यांत आपलें स्वरूप शिष्यांना दिसेल, असें समर्थ बोलल्याची आख्यायिका आहे त्या दोन ग्रंथांपैकीं हें प्रकरण आहे. अंतर्भावाहून आत्मारामाचे समास ओवीसंख्येनें मोठे आहेत. आत्माराम या नांवावरून त्याच्या विषयाचा बोध घडण्याला हरकत नाहीं. **पहिला** समास नमनाचा असून आत्मा, शारदा, सद्गुरु, राम, संत, यांना पहिल्या १७ ओव्यांमध्यें नमन केलें आहे. आपलें बोलणें पराकृत (प्राकृत) असल्याचाहि निर्देश सांपडतो (१६). पूर्वीचीं प्रकरणें शिष्याच्या पृच्छेनें जन्मास आलीं, तसा प्रकार येथें नाहीं. 'तूं शंका उपस्थित केली नसलीस तरी तुझी भ्रांति फिटण्याची काळजी मला बोलवीत आहे. (जुन्या) दासबोधाच्या एका समासांत (१३) मीपणाचें निर्मूलन कसें करावें, हें तुला शिकविलें, पण तुझ्या वृत्तीमध्यें पालट दिसत नाहीं; म्हणोनी न पुसतां सांगणें । घडलें शिष्या तुजकारणें । २१'. ग्रंथलेखनाचा उद्देश अशा रीतीनें स्पष्ट केला आहे. शब्दांचा वर्षाव एकाग्रतेनें ऐकावा, त्याचें मनन करावें, आपल्या मनाच्या अवसानाप्रमाणें ऐकलेल्या शब्दांचें रहस्य स्वीकारावें (२३–२४) ही सूचना देऊन 'तूं कोण, कोणाचा, कोठून कसा आलास', या प्रश्नांनीं विवेचनाला तोंड लावलें आहे. 'तूं ईश्वरापासून झालास, पण त्याला विसरलास. संसाराचा अभिमान धरलास. वस्तुतः तुझें असें येथें कोणीच नाहीं. तथापि तूं माझ्या शब्दावर विश्वास ठेवलास आणि वैभव टाकलेंस तर मी तुला तुझ्या मूळ ठिकाणीं पोचवीन.' या कामगिरीबद्दल गुरूनें शिष्याजवळ मजेदार मोबदला मागितला आहे. वस्तुतः 'कांहीं न मागावें शिष्यासी' हा ज्या गुरूचा बाणा तो आपण होऊन मागणें मागतो, या आश्चर्या-

सारखेंच गुरूचें मागणेंहि कौतुकाचें आहे. 'जें जें कांहीं नश्वर आहे तें सर्व मला देऊन टाकलेंस तर तुझें इष्ट स्थान तुला निश्चितपणें लाभेल. पण त्यामध्यें लालुच करिसी। तरी स्वहित न घडे ॥३५ हें विसरूं नको'. यावर शिष्य झटकन् म्हणाला: 'तुम्ही मागतां तें दिलें'. गुरूनें देखील तितक्याच त्वरेनें 'तुलासुद्धां तुझें स्थान मिळालें' असें उत्तर बोलून टाकलें. शिष्यानें विनीत होऊन दिल्या-घेतल्याचा खुलासा विचारला. नंतर दुसऱ्या समासांत आत्मज्ञानाच्या विशदीकरणाला प्रारंभ केला आहे. नश्वराचा अमंगळ मळ झाडून स्वच्छ होणें म्हणजे स्व-रूपास पावणें. माया नश्वर असल्यामुळें तिचा खेळ पुढें वर्णिला आहे. अहंस्फुरण हें मायेचें जन्मस्थान, तिच्यापासून त्रिगुण, त्रिगुणापासून पंचभूतें, नंतर त्यांची सृष्टि असा मायेचा विस्तार आहे. 'येवं दृश्य आणि अदृश्य। सकळ माया ॥ १२'. येथून मायेचा प्रभाव वर्णून त्याच्यांतून सुटायचें तर मायेलाच शरण जावें लागतें, असें म्हटलें आहे. 'मायेंतच तूं आहेस. हें इतुकेंहि आपुलें मानूं नको सर्वथा ॥ ३९'. संग जसा नश्वर तसा निःसंगपणाहि नश्वर आहे; 'म्हणोनी संगनिःसंगातीत। होउनी राहे ॥४१'. तिसऱ्या समासांत संगनिःसंगातीत होण्याच्या उपायाचें विवरण आहे. यासंबंधांत जें सांगावें आणि मानावें त्याच्या पलीकडे आत्मा असल्यामुळें प्रवचन, श्रवण, मनन यांच्या योगानें त्याचा अनुभव कळणें शक्य नाहीं. तथापि सांगावें लागतें म्हणून ब्रह्माचा विचार बऱ्याच ओव्यांत मांडला आहे. देहबुद्धीचा निःशेष नाश केल्याखेरीज परमार्थ साधत नाहीं. देहबुद्धि खोट्याला खरें कसें भासविते व कसे अनर्थ घडवून आणते, याचें समर्थांनीं दिलेलें उदाहरण परिचयाचें परंतु मार्मिक असल्यामुळें तें नमूद केल्यास अप्रस्तुत होणार नाहीं. तें उदाहरण सोंगट्यांच्या खेळाचें आहे. लाकडाच्या निर्जीव सोंगट्या खेळाडू आपसांत वाटून घेतात. पुष्कळदां या सोंगट्या स्वतःच्या नसतात तर दुसऱ्याकडून मागून घेतलेल्या असतात. पण एकदां वाटून घेतल्यावर त्यांचा अभिमान हृदयांत संचरतो. सोंगट्या मेल्या कीं खंत वाटते, ईर्ष्या वाढते, कधीं कधीं क्रोध बळावतो. 'क्रोध पेटतां घेती। जीव येक येकाचा ॥ २५'. नेमकी अशीच अवस्था प्रापंचिक अभिमानाची असते. सोंगट्यांप्रमाणें प्रपंचांत कन्या, पुत्र, नारी हीं माणसें वाटणीस येऊन त्यांच्या अभिमानाचा पाश मनुष्य आपल्याभोंवतीं आवळून घेतो. सूक्ष्म विवेकाखेरीज या अभिमानाचा अर्थात् मायेचा फडशा होत नाहीं. 'विवेक

केलीयां अनेक । येकीं मुरे ॥ २३ '. हा उपदेश ऐकून शिष्य घोटाळ्यांत पडला. गुरूनें नश्वराची मागणी केली, परंतु विवेकान्तीं नश्वर म्हणून जर कांहीं उरतच नाहीं तर गुरूला द्यायचें काय? तथापि त्याला एक शंका सुचली. चौथ्या समासांत या शंकेचा विचार आहे. सगळें जर नश्वर तर साधुसंत, सज्जन धातुपाषाणमूर्तीचें भजन करतात, भूतांचें पूजन करतात, याचें कारण काय? त्यांना यामुळें पुनः जन्म घ्यावा लागत असेल कीं काय? ही शंका ऐकून शिष्याच्या बौद्धिक प्रगती-बद्दल गुरूला विश्वास वाटला व त्यानें पुनर्जन्माचें कारण वासना किंवा कारणदेह अज्ञानरूप आहे, तो मी आत्मा हें जें ज्ञान, त्याला महाकारण म्हणतात. मनाचा हा थारा सुटला कीं पुनर्जन्माचा प्रसंग कायमचा निकालांत निघतो. भक्तीचें हेंच फळ आहे. 'निसंग आणि निर्मळ। होइजे स्वयें॥ २९'. संगातीतत्व म्हणजेच मोक्ष. आत्मनिवेदन हा त्याचा उपाय व पर्याय आहे. 'प्राप्त जालें अद्वैत ज्ञान। अभिन्नपणें विज्ञान। तेंचि जाण आत्मनिवेदन। जेथें मी तूं नाहीं॥ ३२' अशी आत्मनिवेदनाची व्याख्या केलेली आहे. आत्मनिवेदनाच्या व्याख्येनें शिष्य त्या अवस्थेंत गेला व गुरूला धन्यता वाटली. जें मागणें शिष्याजवळ केलें तें शिष्याची ही अवस्था पाहून आपल्यास मिळाल्याच्या धन्यतेंत गुरुजी रमले व त्यांनीं ही अवस्था शब्दांनीं अधिक विशद केली. शिष्यानें त्यांच्या पायावर लोळण घेतली. 'निःसंदेह स्वरूपमिळणी। दोवे येकचि जाले॥ २४'. पांचव्यांत हें गुरुशिष्यांचें ऐक्य दाखविलें आहे. समारोपाच्या पुढील ओवींत आत्मारामाचें तात्पर्य आहे :

> **जो शिष्य स्वामीस शरण गेला। आणि संदेहावेगळा जाला**
> **तेणें जन्म सार्थक केला। जो देवांसी दुल्लभु॥ २६**

**पंचसमासी** प्रकरणांतील उपदेश करणारा गुरु प्रत्यक्ष रामच मानलेला आहे. त्याला संसारग्रस्तानें आपली अवस्था सांगून उपदेश करावा असें म्हटलें. त्यावरून दुसऱ्या समासांत उपदेशाला प्रारंभ झाला. 'सस्वरूपीं सावधपण' हें ज्ञानाचें लक्षण; 'ब्रह्मीं पडे विस्मरण' ही अज्ञानदशा. याप्रमाणें व्याख्या सांगितल्यावर स्वरूपाचें विस्मरण पडण्याचें कारण-जें ममत्व त्याचा विचार करून 'जेथें जयाचें मनोगत। तयासी होये तेंचि प्राप्त (१२)' या न्यायानें ममत्व असणाराला आत्मज्ञानाची आशा

करायला नको असा निर्णय दिला आहे. 'तो मी आत्मा' या ज्ञानानें अज्ञानाचा बींमोड होतो. 'आधीं पाहावें मी कोण?' हा आत्मदर्शनाचा उपाय आहे. 'आपणच आत्मा आहों' या निश्चयामुळें बंध किंवा जन्ममृत्यूचा भ्रम माणसाच्या बुद्धींत उरत नाहीं. या निःसंदेह दृढनिश्चयाला सायुज्य मुक्ति म्हणतात. हा निश्चय सदैव टिकविण्याचा मार्ग शिष्यानें पृच्छा केल्यावरून **तिसऱ्या** समासांत दाखविला आहे. देहबुद्धीची मगरमिठी सोडविणें हा ज्ञानाच्या दृढीकरणाचा मुख्य उपाय आहे. मळकें वस्त्र स्वच्छ करण्यासाठीं जसें सारखें धुवावें लागतें तसेंच ज्ञानाचें आहे. साधनांचा निरंतर अभ्यास चालू ठेवल्यानें ज्ञान स्वच्छ राहतें. अभ्यासांत खंड पडूं दिल्यास मनावर नानाविध भ्रमांचा पगडा बसून माणसाचा अधःपात होतो. भक्ति हें एक साधन असून त्याच्या अभावीं जें ज्ञान तें अज्ञान समजावें. अंगणाच्या स्थितीवरून जशी घराची अंतःस्थिति ओळखतां येते तशी समाधानाच्या विशेष चिन्हावरून भक्तीची कमी जास्त उत्कटता ओळखतां येते. भक्तीवर गुरूनें भर दिल्याचें पाहून शिष्यानें भक्तीचें स्वरूप समजावून द्यावें, असा आग्रह धरला. **चौथ्या** समासांत हा आग्रह गुरुजींनीं पुरवला आहे. तेथें नवविधा भक्तीचीं लक्षणें थोडक्यांत सांगितलेलीं आहेत. परंतु त्यापूर्वी श्रवणभक्तीच्या निमित्तानें 'शृंगारीक' (९) व 'नवरसिक' (२१) हें श्रवणाबाहेर ठेवावें अशी सूचना आहे. भक्तीनें शुद्ध ज्ञान, त्या योगानें वैराग्य, त्यामुळें वासनेचा नाश व लिंगदेहाचा मोक्ष याप्रमाणें पारमार्थिक उत्कर्षाच्या पायऱ्या ओलांडीत शेवटीं साधक हेतुरहित सहज समाधीचा (२७) धनी होतो. मग गुरुशिष्य हा भेद उरत नाहीं. त्यानंतर काय – ततः किं – याचें उत्तर **पांचव्या** समासांत आहे. राम हा या प्रकरणाचा गुरु व त्याच्याशीं शिष्य एकरूप होतांच जिकडे तिकडे राम भरल्याचा अनुभव येतो. 'ततः किं'चें हें उत्तर आहे. प्रपंचरूपी ताकांतलें हें नवनीत ताकाला आटवून इतकें वाढतें कीं त्याचें पात्र फुटतें व तें ब्रह्माडांत पसरून ब्रह्मांडालाहि आटपत नाहीं. या विचित्र नवनीताचें प्राशन करायला गेल्यास तें प्राशनकर्त्यालाच गट्ट करतें. सारांश, 'सेविलें आपणास आपण। हेचि अनुभवाची खूण। २६'. शेवटीं सद्गुरुसेवा, सत्संगति, यांचा महिमा निवेदन करून हें प्रकरण संपविलें आहे. आपली वाणी कसलेली किंवा स्पष्ट नसली तरी देवाच्या पूजेकडे ती लावली आहे म्हणून संतांनीं तिचे दोष न पाहतां क्षमा करावी, असें समर्थांनीं शेवटीं म्हटलें आहे.

**सप्तसमासी** हें प्रकरण वेदांताचेंच आहे. **पहिल्या** समासांत प्रकाशांचें विवरण आहे. यांत चुडे (मशाली) यांच्या जोडीला मोंबत्त्या (मेणबत्त्या) हा शब्द पाहून समर्थकालीं मेणबत्त्या महाराष्ट्राच्या लोकव्यवहारांत वावरत होत्या असें लक्षांत येतें. प्रकाशाच्या परंपरेंत 'अंतरात्मा जगजोती' यांचा निर्देश असून दिव्याच्या व बुद्धीच्या उजेडांतील फरक उलगडण्यासाठीं समर्थांनीं स्वानुभवक्षेत्रांतील एक दृष्टांत दिला आहे. पर्वत कोरून तयार केलेल्या गुहेसारख्या स्थळीं दिवा ठेवून गुहेचें तोंड झाकल्यास दिव्याचा उजेड बाहेर दिसणार नाहीं. दिव्याऐवजीं जर तेथें मनुष्य बसला तर त्याच्या बुद्धीचा प्रकाश गुहेच्या मर्यादेंत कोंडला जात नाहीं. बाहेरचा उजेड अंधार पळवून लावीत असला तर बुद्धीचा प्रकाश अज्ञानाला पळवून लावतो. बाहेरील दिव्याचा प्रकाश वाऱ्यानें जातो, बुद्धीचा अर्थात् आत्म्याचा प्रकाश वाऱ्यानें तगतो, असा या दोन प्रकाशांतील भेद आहे. **दुसऱ्या** समासांत सृष्टीची उभारणी व तिचा चमत्कार यांचें विवरण आहे. **तिसऱ्या** समासांत स्मरण म्हणजे देव, विस्मरण म्हणजे दानव आणि स्मरण–विस्मरण म्हणजे मानव, या व्याख्या सांगून स्मरणाची शिस्त मोडली कीं, मनुष्य माणुसकीला मुकला. म्हणून बंध, मर्यादा शिस्त हीं भक्कम हवींत. राजानें मर्यादा सोडल्यास 'देशाची होते फजीती ॥ ३ '; मग त्याच्या प्रजेनें जगायचें कसें ? बेशिस्तपणाचा निषेध साधनाभ्यासाच्या प्रतिष्ठेकरितां केलेला आहे. **चौथ्या** समासांत माया, ममत्व यांचें विवेचन करून स्मार्त, वैष्णव या पंथांचें मायेसारखेंच अनादित्व सुचविलें आहे. एकजिनसी निश्चल परब्रह्मांत जें संकल्पाचें चलत्व घडलें त्याला हरिसंकल्प म्हणतात. तोच विष्णु. तो सत्त्वगुणी आहे. परमार्थाला सत्त्वगुण अवश्य आहे. हरिसंकल्पाला षड्गुणेश्वर असें दुसरें नांव आहे. विष्णु सत्त्वगुणी, परमार्थाचा मुख्य आधार सत्त्वगुण, या गोष्टीकडे लक्ष देऊन 'कर्ममार्ग उपासना । वैष्णवामध्यें विशेष जाणा' असा वैष्णवांचा गौरव दर्शविला आहे. व्यवहारांतील भेदाला अभेद समजण्याविरुद्ध असलेला समर्थांचा कटाक्ष वाचकांना माहीत आहे.' तोच पुनः एकदां व्यक्त करून 'कानावर कांहीं पडतांच त्याचा विश्वास धरणें हा मूर्खपणा व समजून अनुभव घेणें हें उत्तमोत्तम' (२१) असा इषारा दिला आहे. नंतर विवेकाचें, प्रत्ययाचें आणि विवेकप्रत्ययाचें माहात्म्य गाइलें आहे. विवेकप्रत्ययाला सत्संग व एकान्त पाहिजे अशी **पांचव्या** समासाची प्रस्तावना असून 'वीट नाहीं तो चि संग' असें बजावलें आहे. सत्संग नसेल तर

केव्हां मनोभंग होईल याचा भरंवसा नसतो. उपाधीनें योग बिघडतो म्हणून उपाधीचा त्याग करावा. या त्यागाला संन्यास म्हणतात व 'संन्यास घेणें ब्राह्मणास। उचित आहे ॥ ११'. उपाधि मनानें सोडावी. मन परब्रह्मांत सर्वस्वीं गुंतलें असेल तर मायेच्या भ्रमांत देहाचा व्यवहार होऊनहि संसाराच्या ऊर्मी बाधत नाहींत. या समासांचें तात्पर्य शेवटच्या ओवींत आहे व तें समजण्याकरितां सहाव्या समासांत सृष्टिरचनेचा वृत्तांत सादर केलेला आहे. [हा समास रचण्यापूर्वीं दासबोधाचा विसावा दशक तयार झाला होता अशी खूण २८ व्या ओवींत आहे.] समासाच्या शेवटीं नरदेहाचें साफल्य मुख्य परमेश्वराला ओळखून तद्रूपता साधण्यांत असल्याचा उपदेश आहे. दासबोधांतील अनेक विचार व समजुती या व मागील समासांत प्रगटलेल्या आहेत. सातव्यांत इहलोक, परलोक, व देव ओळखणें हे विषय आहेत.

**सगुणध्यान** ११९ ओव्यांचें आहे. राम या उपास्य दैवताच्या मूर्तीचें या प्रकरणांत वर्णन असलें पाहिजे, हें नांवावरूनच कळण्याजोगें आहे. डोक्यापासून पायाच्या बोटांनखांपर्यंत सर्व अवयवांचें सौंदर्य यांत वाखाणलें आहे. सिंहासनावर बसलेल्या रामाशेजारची सीता, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न ही मंडळी व समोर मारुति यांची माहिती सांगून झाल्यावर सभामंडपाचें भव्य चित्र रेखाटलें आहे. या सभेचें दासबोधाच्या सभेशीं साहृश्य आहे. जगांतील सर्व पंथाचीं माणसें या सभेंत दिसतात, कारण 'जे जे जेथें विश्वासले। ते ते तेथेंचि राहिले। ७६'. नंतर रामाच्या स्वारीचें वैभवशाली दृश्य शब्दांनीं चितारल्यावर समर्थांनीं रामाचें चरित्र निवेदन करून नामस्मरणाची आवश्यकता व सफलता वर्णिली आहे. 'रामाचेनि स्वामीपणें। मी ब्रह्मांड मानी टेंगणें। १०५' असें एका ठिकाणीं समर्थांचें हृद्गतहि उघड झालें आहे. एकवीस समासीच्या १५ व्या समासांतील रामवर्णनाच्या २०-२१ या ओव्या सगुणध्यानांत ११०-१११ याप्रमाणें आढळतात.

**निर्गुणध्यान** हें रूपकाच्या भाषेंत असल्यामुळें सगुणध्यानाइतकें सुबोध नाहीं. रामाचे अवयव आणि परमार्थाचे गुण व कर्तव्यें यांचा मेळ घालण्याचा यत्न जिज्ञासूच्या आकलनाला कठीण वाटल्यास नवल नाहीं. जेवढें म्हणून दृश्य आहे तेवढेंच जणूं काय एखादें कुळ, त्यांना पाळतो यासाठीं रामाला कुलदैवत हें नांव

पडलें—'दृश्य कुळातें पाळित। म्हणोनि नामें कुलदैवत।' अशा कोट्याहि क्वचित् आहेत. या देवाच्या पायापासून 'उद्धार' गंगा निघाली. ही गंगा व दासबोधांतील गुप्तगंगा एकच. श्रवण हें या गंगेचें स्नान. हें स्नान प्रत्यहीं घडेल तर अभ्यंतरींचा मळ झडत जाऊन कैवल्यपद प्राप्त होईल. मुळांत वासनेचें वस्त्र मळकें, त्यांत त्याला प्रपंचाचा स्नेह (तेल) लागलेला, म्हणून हें वस्त्र सतत धुतल्याखेरीज स्वच्छ होणार नाहीं. 'जरी जाला थोर ब्राह्मण। तरी केलें पाहिजे क्षाळण ॥ ५१'. अहंतेचे डाग काढणें अवश्य आहे. संसाराच्या उष्णतेनें पोळणारे लोक या गंगाजळानें निवतात. गंगेच्या उगमाकडे जे पोचतील 'ते उगमचि होऊन ठेले ॥ ५९' अशी या गंगेची एक मौज आहे. गंगोदक कानांत भरलें कीं तें मुखांतून बाहेर पडूं लागतें व भाविकांच्या उपयोगास येतें. या नदीला समर्थांनीं 'गोदावरी' असें म्हटलें आहे (६१). रामाचें चरित्र सांगतां सांगतां धनुर्भंगाच्या प्रसंगानें परशुरामाचा उल्लेख करावा लागतांच 'सत्त्वगुणी ब्राह्मण राज्यकर्ते असतां रजोगुणी क्षत्रियांनीं त्यांना राज्यभ्रष्ट केलें. अधर्मी दुरात्म्यांच्या हातीं राज्य गेलें. सात्त्विक ब्राह्मणांनीं पळ काढला.' मग 'सावकास राज्य करिती। रजोगुण क्षेत्री (क्षत्रिय) ॥ ११२, तेव्हां परशुरामानें रजोगुण संहारून सात्त्विकांना आनंदविलें' अशी समर्थांची विचार-सरणी स्पष्ट झाली आहे. क्षत्रियनाशाच्या विचाराचें ज्ञातेपण हेंच जणूं काय धनुष्य. तें परशुरामानें जनकाच्या स्वाधीन केलें. रामानें त्याचा भंग केला. ज्ञातेपणाचें भान असेपर्यंत मोक्ष लाभत नाहीं, ही कल्पना या धनुर्भंगाच्या कथेंत समर्थांनीं गोविली आहे. निर्गुणध्यानाचा कांहीं भाग सगुणध्यानासारखाच आहे. १५८ व्या ओवीं-तील सोपी (सूफी), फकीर, कलंदर या मुसलमान साधुप्रकारांचा उल्लेख वाचकांच्या ध्यानांत असेल. शेवटीं पारमार्थिक विचारांनीं देवाची आरती करून श्रोत्यावक्त्यांना ओवाळून निर्गुणध्यान संपविलें आहे. याच्या १७७ ओव्या आहेत.

**मानसपूजा** हें प्रत्येकीं अकरा ओव्या याप्रमाणें तेरा समासांचें प्रकरण आहे. प्रत्यक्ष पूजा करण्याचा योग नसेल तर 'मनें भगवंतास पूजावें। कल्पून सर्व हि समर्पावें।', 'जें जें आपणास पाहिजे। तें तें कल्पून वाहिजे। येणें प्रकारें कीजे। मानसपूजा ॥' अशी मानसपूजेची शिफारस समर्थांनीं दासबोध ४ : ५ मध्यें अगदीं अखेरच्या तीन ओव्यांत केलेली आहे. सगुणध्यान, निर्गुणध्यान हीं प्रकरणें

मानसपूजेंतच मोडणारीं आहेत. **पहिल्या** समासांत तुळसीवनें, वृंदावनें, ओटे, सोपे, माड्या, ओऱ्या, भुयारें, तळघरें, देवळें, दीपमाळा इत्यादि देवानिमित्त करावयाच्या स्थळांची यादी आहे. **दुसऱ्यांत** धीर, उदार, सुंदर, दक्ष, व्युत्पन्न, चतुर इत्यादि लक्षणांच्या कारभारी मंडळीची माहिती आहे. स्वयंपाकिणींचें गुणवर्णन **तिसऱ्यांत** आहे. **चौथ्यांत** खाद्यपेयांची गर्दी थाटली आहे. स्वयंपाकाच्या व जेवणाच्या भांड्यांचा विस्तार **पांचव्यांत** आहे. भोजनापूर्वी फराळ या नियमानुसार **सहाव्यांत** त्याची योजना आहे. **सातव्यांत** भोज्य पदार्थांची ओळख करून दिलेली आहे. **आठव्यांत** भोजनपूर्व देवार्चनाच्या नैवेद्यसमर्पणाचा विषय आहे. **नवव्यांत, दहाव्यांत** व **अकराव्यांत** भोजनसमारंभाला स्थान दिलें आहे. **बाराव्यांत, तेराव्यांत** भोजनोत्तर मध्यरात्र उलटेपर्यंतचीं कामें कशीं पार पडावीं हें सांगितलें आहे. प्रत्येक समासाच्या शेवटीं 'इति श्री मानसपूजा । मनें पूजावा वैकुंठ राजा । साधकें अगत्य कामकाजा । श्रवण करावें' अशी मानसपूजेचें स्वरूप स्पष्ट करणारी ओवी आहे.

दुसऱ्या समासांतील 'राजकारण' शब्दाचा निर्देश व खुलासा मागें केला आहे. देवीच्या स्तोत्रांतील शक्ति, बुद्धि, युक्ति या शब्दांचा गवगवा करून त्यांच्या साह्यानें समर्थोक्त राजकारण शब्दाचा पॉलिटिक्स अर्थ ठरवूं पाहणारांनीं तिसऱ्या समासांतील स्वयंपाकिणींच्या गुणांत समर्थांनीं शक्ति, बुद्धि यांचा समावेश केल्याचें भान बाळगल्यास बरें. स्वयंपाक करणाऱ्या स्त्रियांच्या ठिकाणीं 'शक्ती युक्ती बुधी विशेष । नाहीं आलस्याचा लेश । कार्यभागाचा संतोष । अतिशयेसी ॥ ४' असे गुण असण्याची आकांक्षा समर्थांनीं उघड केली आहे.

**एकवीस समासी जुना दासबोध** ही समर्थांची पहिली मोठी उपदेश रचना समजावी लागते. तिच्यांत लेखनकार्याच्या प्रारंभावस्थेच्या कित्येक खुणा सांपडतात. वीस दशकी दोनशें समासांचा दासबोध निर्माण करतांना या दासबोधांतील चार, पांच, सहा व आठ हे समास त्यांमध्यें तिसऱ्या, पांचव्या आणि बाराव्या दशकांत सामील केल्याचा वृत्तांत वाचकांना सादर झालेला आहे.

**पहिल्या** समासांत सद्गुरुकृपेचा प्रभाव सांगितला आहे. **दुसऱ्यांत** श्रोत्यांची श्रेष्ठ योग्यता व आपली कनिष्ठता यांचा विचार आहे. कवित्वाच्या विवेचनांतील 'धीट पाठ' हे शब्द या समासांत आले असून प्राकृत भाषेची तरफदारी येथें

थोडीशी पाहायला सांपडते. **तिसऱ्या** समासांत वक्ता, त्याला क्रोध आल्यास घडणारे दुष्परिणाम, उत्तम वक्त्याचीं लक्षणें, योग्य श्रोता, अयोग्य श्रोता, झोंप हे विषय आहेत. यांच्या मांडणींत क्रमबद्धता नाहीं. **चौथ्या, पांचव्या** समासांतील विषयांचें दर्शन दासबोधाच्या संमार्जनांत घडलेलें आहेच. **सहाव्याचा** प्रकार तसाच आहे. **सातव्या** समासांत सुरवातीस पारमार्थिकांचीं कर्तव्यें सांगून मग 'आशा' या मनोविकाराची हजेरी घेतली आहे. नंतर देहनिंदेकडे पुष्कळशा ओव्या खर्चीं घातल्या आहेत. येथील **आठवा** समास वीस दशकी दासबोधांत जिरविल्यामुळें त्याची माहिती तेथील बाराव्या दशकाच्या पांचव्या समासांत वाचकांनीं पाहावी. एकवीस समासीच्या **नवव्या** समासांत प्रथम समर्थांनीं आपल्या स्थितीविषयीं उद्गार काढून पुढें शांतीचा महिमा, ज्ञातेपणाचा अभिमान यांचें विवेचन केलें आहे. **दहाव्या** समासांत लीनतेची प्रशस्ती व शब्दज्ञानाची निरर्थकता या दोन विषयांचा परामर्श आहे. एखाद्याचें नांव मोठें ऐश्वर्य सुचविणारें असावें, आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिति नांवाच्या उलट आढळावी, या धोरणाच्या अनेक उदाहरणांनीं प्रस्तुत समासाचा शेवट केला आहे. **अकराव्यांत** कलियुग, प्रारब्ध, प्रयत्नवाद हे विषय प्रामुख्यानें आहेत. प्रपंचासाठीं प्रयत्नाला तोटा नाहीं, पण परमार्थाविषयीं प्रश्न केला कीं मनुष्य प्रारब्धाचा आधार घेतो, या दुटप्पीपणावर सदर समासांत समर्थांनीं ताशेरा झाडला आहे. **बाराव्यांत** संतांचें स्तवन, विषादवृत्तीचे अनर्थ, अध्यात्म-श्रवणाची आवश्यकता, शृंगारिक न ऐकण्याची सूचना, असे विषय आहेत. **तेराव्या** समासाला माधवी किंवा मीपण अशीं दोन नांवें आहेत व दुसऱ्या नांवाप्रमाणें 'मीपणा' वरच सगळ्या विवेचनाचा रोख आहे. **चौदाव्या** समासांत सृष्टिरचनेची कहाणी सांगितली आहे. प्रकृति किंवा माया भ्रतारावांचून सृष्टीला जन्म देते, जन्म देऊन पुनः तिचा वांझपणा कायम राहतो, या नवलवार्तेचें कोडें या समासांत स्पष्ट केलें आहे. मायेच्या जाळ्यांतून सुटण्याचा उपाय म्हणजे देहबुद्धीचें निरसन, तोहि येथें सुचविला आहे. नंतर मायेचा भ्रम साफ गेल्यावर गुरुशिष्यत्वाचें द्वैत मावळून जी अनिर्वाच्य आनंदावस्था उद्भवते तिचें निरूपण आहे. **पंधराव्यांत** रामाचें स्वरूप व चरित्र वर्णून रामोपासनेची महती 'श्रीराम जयराम जयजय राम' या त्रयोदशाक्षरी मंत्राच्या उच्चारासह गाइली आहे. रामोपासकांना हा समास अतिशय हृदयंगम वाटण्याजोगा आहे. **सोळाव्या** समासाच्या प्रारंभीं समर्थांनीं

देवाशीं केलेला वाद आहे. रामभक्त हे प्रत्यक्ष रामाहून श्रेष्ठ असल्याचा दावा मनोवेधक वाटतो. राम व्हावयाचें असेल तर आत्मनिवेदन भक्ति केली पाहिजे. पण या संबंधांत मनाची तळमळ घडविणारे जे संदेह निघतात, त्यांचा समाचार घेतल्याशिवाय मुख्य प्रतिपाद्य गळीं उतरणार नाहीं हें जाणून, त्या संदेहांचा समर्थांनीं आपल्या स्पष्टोक्तीनें निचरा केला आहे. सतराव्यांत नाना मतें, गुरु, शास्त्र आत्मप्रत्यय, पाखंडाहून अज्ञान बरें, जन आणि जनार्दन, क्रिया व शब्दज्ञान इत्यादि विषयांचा ऊहापोह आहे. ‘आपण करूनि दाखवावें। तरी च दुसऱ्यासी सांगावें’ जर हें जमत नसेल तर आपल्या ठिकाणीं मेल्याप्रमाणें अगदीं गप्प रहावें (६७); आपण क्रियाशील असलों तर त्या गुणाचा दुसऱ्याला उपदेश करावा लागत नाहीं, इत्यादि समर्थांचे विचार या समासांत आहेत. लोकांत लोकाचार व सद्गुरूच्या ठिकाणीं ‘एकंकार’ हें गौडबंगाल उकलण्याविषयीं शिष्यानें प्रश्न केला व गुरुजी तिकडे वळले. एकंकार–ऐक्य–भेदभावाचा समूळ लोप, हा प्रकार अध्यात्माच्या अंतिम स्थितींत शक्य व खरा असला तरी रोजच्या व्यवहारांत भेदाचा अभाव शक्य नाहीं, हा समर्थांचा सिद्धांत जिज्ञासूंच्या परिचयाचा आहे. त्याचें अठराव्या समासांत निरूपण करतांना परमार्थ व प्रपंच यांचा विरोध प्रथम विचारांत घेतला आहे. प्रपंच व परमार्थ यांचा सहयोग सर्वथैव अशक्य असून प्रपंचत्यागाखेरीज परमार्थाचा मनुष्यबुद्धीला स्पर्शसुद्धां व्हावयाचा नाहीं. वैराग्य हें प्रपंचत्यागाचें पहिलें साधन आहे. वैराग्याचा अंगीकार निर्विघ्न नाहीं. बायकोमुलांचें ममत्व, कुलाभिमान, देहाभिमान अशीं वैराग्याला बाधणारीं अनेक विघ्नें आहेत. या विघ्नांवर कनक व कांता यांचा त्याग हा उपाय आहे. मूळचा विषय एकंकाराचा असल्यामुळें हा परमार्थाचा लाभ प्रपंचांत चालत नाहीं. भेद हा प्रपंचाचा कायमचा सोबती आहे. प्रपंच व भेद यांचें साहचर्य सिद्ध करण्यासाठीं समर्थांनीं ज्या दाखल्यांनीं आपल्या तर्काला धार चढविली आहे ते दाखले ६०–६२ या ओव्यांत जिज्ञासूंनीं पहावे. ‘अभेद बोलणें हा चि भेद। प्रपंचीं अभेद हा विनोद। ६७’ असा विवेचनाच्या शेवटीं समर्थांचा खणखणीत अभिप्राय नमूद झालेला आहे. **एकोणिसाव्या** समासांत संतांचे गुण, त्यांच्या संगतीचें फळ यांची माहिती असून, यावर विश्वास कसा ठेवावा, तो विश्वास कसा वाढवावा, हा प्रश्न शिष्यानें विचारला, तेव्हां संसारांतील गांजणुकीचा वैताग उद्भवला म्हणजे खरा विश्वास मूळ धरतो,

असें गुरुजींनीं उत्तर दिलें व त्याबरोबरच अविश्वासाचें अनर्थहि सांगून टाकले. विश्वासानुसार आचरण हें विश्वास बाणल्याचें लक्षण असल्याचें सुचवून नुसत्या शब्दज्ञानाचा पोकळपणाहि गुरुजींनीं उघडकीस आणला आहे. नंतर गुरुजींनीं आत्मज्ञानाचा विकास न होऊं देणारीं विघ्नें कोणतीं हें सांगण्याचें आश्वासन दिलें आहे. मायादेवीचें चेटुक हें आत्मज्ञानाचें पहिलें बलाढ्य विघ्न आहे. प्रपंचाची आवड, विषयसुखाचा लोभ, देहाभिमान, कर्मठपणा, स्वधर्मासंबंधीं अप्रीति, इत्यादि विघ्नें पहिल्या मुख्य विघ्नाचीं अंगोपांगें होत, याची चर्चा विसाव्या समासांत आहे. 'स्वधर्मकर्म उडवणें । या नांव परमार्थ बुडवणें । १८', 'ज्याचा जो स्वधर्म तेणें । त्यागूं नये सर्वथा । २०' अशी समर्थांनीं स्वधर्माची आस्था दाखविली आहे. देहाशा सोडावी तेव्हां परमार्थ बहरतो, हें समजण्याकरितां देहाभिमानाचें सविस्तर विवेचन केलें आहे.

**एकविसाव्या** समासांत पूर्वीच्या समासांतील विषयांची क्रमशः नोंद करून साऱ्या कथनाचें मंथन ग्रथित केलें आहे (२). खऱ्या समाधानाकरितां ज्याचा त्यानें यत्न केला पाहिजे; समाधान म्हणजे अनुभव; तो शब्दाच्या आटोक्याबाहेरचा आहे; इत्यादि विचार हे त्या मंथनाच्या नवनीतासारखे आहेत. ब्रह्म व आपण यांचें अभेद्य व चिरस्थायी ऐक्य हें या समासाचें थोडक्यांत तात्पर्य आहे.

या समासांतील अनेक ओव्या नव्या दासबोधाच्या ६ : १० व ८ : ८ मध्यें बहुधा जशाच्या तशा किंवा एखाद्या शब्दाच्या वा चरणाच्या फेरफेरानें घेतल्या आहेत. सत्कार्योत्तेजक सभेच्या आवृत्तींत कल्याणस्वामीच्या डोमगांव पोथ्यांतील १,४,५,६ अशा क्रमांकाचे चार निराळे समास परिशिष्टरूपानें दिलेले आहेत. त्यापैकीं चवथ्या समासाच्या १२ ओव्या नव्या दासबोधाच्या ६ : १० मध्यें व ६ ओव्या ७ : १० मध्यें दाखल केलेल्या आहेत. त्यांतील पहिल्या समासाच्या तीन ओव्या १६, १७ व १९ या नव्या दासबोधाच्या ५ : १ मधील ३४, ३५ व ३८ या ओव्या होत. या चार समासांना चतुःसमासी असेंहि नांव दोन बाडांत आढळतें. डोमगांवच्या पोथ्यांतील चार समासांचा विचार प्रस्तावनेंत करण्याचें संपादकांचें आश्वासन वाया गेलें आहे. त्यांनीं तें आश्वासन साफ डोळ्याआड केलें आहे. जुन्या दासबोधांतील ४,५,६ या समासांची नव्या दासबोधांत रवानगी झाल्यावर

त्यांची जागा भरून काढण्यांसाठीं हे समास रचले असावे, कारण हे समास नेमके त्या क्रमांकाचे आहेत. यांतील ओव्या नव्या दासबोधाच्या ६:१०, ७:१० व ८:८ मध्यें घेतल्या त्यावरून हे समास त्या समासांच्या आधीं सिद्ध होते असेंहि समजावें लागतें.

**जनस्वभाव** किंवा **बहुधा गोसावी** या प्रकरणांत भोंदु गुरु व त्यांचे अडाणी शिष्य यांच्यावर कोरडे ओढले आहेत. हें सारें प्रकरण वाचनीय आहे. विष्ठा-मूत्र-वमनाच्या भक्षणानें महंती वाढविणारे, भुताटकीचे खेळाडू, चेटकी, पंचाक्षरी, गारुडी, किमयागार, चोर-श्वापदांना कह्यांत आणणारे, यांच्या ताशेऱ्यांत एखादी ओवी, एखादा ओवीचरण असा भेटतो कीं त्यावरून चांगदेव-ज्ञानेश्वरांचें स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं. आमचा गुरु वाघावर निःशंक बसतो, हातांत सापाचा चाबूक घेतो, तो हजार वर्षें जगला (३४), रेड्याकरवीं वेद बोलवी (४२), अशा उदाहरणांत समर्थांच्या संबंधांतील सांप्रदायिक चरित्रकारांनीं सांगितलेल्या गोष्टीहि दिसतात. ‘ तूप घे घागरीचे घागरी । ५६, आमचा गुरु वाघासी भेटला । ५८, पारीं वाळवंटीं पुरिला । ६२ ’ असे चमत्कार समर्थांच्या नांवें चरित्रकारांनीं खपविले आहेत. चमत्कारांवर समर्थांचा विश्वास असल्यामुळें त्यांनीं या प्रकरणांतील गुरुबाजीचे प्रकार झिडकारले नाहींत. ‘ऐसें उदंड वर्तले लोकिकीं । परि येणें सार्थक नव्हे कीं ।’—लोकांत असें पुष्कळ घडलें असलें तरी तें उपयोगाचें नाहीं म्हणून अध्यात्मज्ञान संपादावें. याप्रमाणें प्रकरणाच्या अखेरीस उपदेश आहे. ७० ओव्यांत हें प्रकरण न संपलेंसें वाटतें.

सत्कार्योत्तेजक सभेनें जुन्या बाडांच्या आधारें तपासून अधिकृत रीत्या प्रसिद्ध न केलेलीं परंतु लोकांपुढें समर्थविषयक ग्रंथांतून येणारीं कांहीं महत्त्वाचीं प्रकरणें आहेत. शिवाजी-संभाजीस लिहिलेलीं प्रत्येकीं एक अशीं दोन पत्रें, राजधर्म, क्षात्रधर्म, सेवकधर्म, सावधता, बाग कारखाने वगैरे प्रासंगिक लिखाणें यांच्याकडे नजर टाकणें अवश्य आहे. यांतील कित्येकांचा उल्लेख आणि विचार पूर्वी करावा लागल्यामुळें पुनः त्याचें तपशीलवार चर्वितचर्वण करण्याची गरज नाहीं. या लिखाणांतील शिवाजीमहाराजांस लिहिलेलें पत्र श्री. शं. श्री. देवांच्या श्रीसमर्थावतारांत व श्रीसमर्थहृदयांत पाठभेदासह छापलेलें आहे. तसेंच संभाजीस लिहिलेलें पत्र श्रीसमर्थहृदयांत पान ५६७–५६९ वर समग्र दिलेलें आहे.

राजक्षात्रधर्मादि प्रकरणें संभाजीराजांस अनुलक्षून लिहिलीं गेलीं असल्याचें एक प्रमाण लक्षांत घेऊन शिवाजीमहाराजांस लिहिलेल्या पत्राचें आधीं दर्शन घेतलें पाहिजे. वस्तुतः वाङ्मय या नात्यानें त्याला महत्त्व नाहीं. परंतु त्या पत्राला समर्थ-चरित्रांत अन्य कारणास्तव महत्त्व देण्याचा सांप्रत प्रघात पडलेला असल्यामुळें त्याचा वाङ्मयसमालोचनांत समावेश केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. या पत्राच्या एकूण १५ ओव्या असून त्यापैकीं पहिल्या सहा ओव्यांत महाराजांचे गुण, लोकांतील श्रेष्ठत्व यांचें वर्णन आहे. सातव्या ओवींत तीर्थक्षेत्रें मोडलीं, ब्राम्हणस्थानें भ्रष्ट झालीं, सगळी पृथ्वी हादरून गेली, धर्म बुडाला, अशी स्थिति वर्णून, देव-धर्म-गोब्राह्मण यांचें संरक्षण करण्यासाठीं तुम्हांला हृदयस्थ नारायणानें प्रेरणा केली, असा मजकूर आठव्या ओवींत आहे. महाराजांपाशीं व्यवहाराच्या अनेक शाखांतील गुणी माणसें असल्याचा निर्देश नवव्या ओवींत आहे. भूमंडळावर (तुमच्याशिवाय) धर्मरक्षक कोणी दिसत नाहीं. मात्र तुमच्यामुळें मऱ्हाष्टधर्म (मराठ्यांचा म्हणजे महाराष्ट्रांतील हिंदूंचा धर्म) कांहीं राहिलेला आहे. या मऱ्हाष्टधर्मरक्षणाव्यतिरिक्त आणखी कित्येक धर्मकृत्यें घडत आहेत. तुमच्या आश्रयाला कित्येक आहेत. (तुम्ही) धन्य (आहां). विश्वांत तुमची कीर्ति पसरली आहे. कित्येक दुष्टांचा (तुमच्या हातून) संहार घडला. कित्येकांना धाक सुटला. शिवकल्याण राजा कित्येकांचा आश्रय झालेला आहे. हा १० ते १२ ओव्यांचा सारांश आहे. यानंतर १३ व्या ओवींत समर्थांचें हृद्गत अवतरलें आहे :

**तुमचे देसीं वास्तव्य केलें। परंतु वर्तमान नाहीं घेतलें।**
**रुणानुबंधें विस्मरण जालें। काय नेणों ॥ १३**

'तुमच्या देशांत (राज्यांत आम्ही) वास्तव्य केलें असून आमची कांहीं विचारपूस केली गेली नाहीं. (कांहीं) ऋणानुबंधानें विस्मरण झालें कीं काय न कळे!' (काय कारण समजावें?) आपल्यासारखी सर्वज्ञ मंडळी, पुनः धर्ममूर्ति जी व्यक्ति आहे तिला (निराळें कांहीं) सांगण्याची गरज काय? (पण) धर्मस्थापनेची कीर्ति आपण संभाळली पाहिजे. तुम्हांला कामें अतोनात आहेत, त्यामुळें तुमचें चित्त व्यग्र असतां मी पत्र लिहिणें हें कांहींसें अप्रासंगिकच, याबद्दल क्षमा करावी,' हा विषय शेवटच्या ओवींत आहे.

पहिल्या ओव्या निर्भेळ स्तुतीच्या आहेत. 'अखंडित-लक्ष्मी-अलंकृत राजमान्य राजश्री' इत्यादि मायन्यादाखल जे शब्द उपचारार्थी वापरतात, त्यासारखेच या ओव्यांतील गुणवाचक शब्द आहेत. 'तुम्ही धर्मरक्षक आहां. आम्ही तुमच्या देशांत रहातों, परंतु तुमच्याकडून आजवर आमची दखल घेतली गेली नाहीं. विस्मरण झाल्यासारखें दिसतें.' हें साऱ्या पत्राचें मर्म आहे. इ. स. १६५८ मध्यें भास्कर-गोसावी भेटल्यानंतर सालीना दोनशें होनांची मोईन चाफळच्या उत्सवाकरितां शिवाजीमहाराजांकडून सुरू होती, तिच्या योगानें महाराजांना समर्थांचें स्मरण रहावें, पण तसें स्मरण असल्याचा अनुभव आला नाहीं, असा त्या ओवींतील विस्मरण शब्दाचा खुलासा आहे. १६७२ मध्यें सातारा-कोल्हापूरचा मुलूख महाराजांच्या अमलाखालीं आला, यामुळें 'तुमचे देसीं वास्तव्य केलें' या वचनांचा अर्थ नीट लावतां येतो. जो प्रदेश १६७२ पूर्वीं महाराजांचा नव्हता, त्या प्रदेशाला 'तुमचा देश' म्हणण्याइतके समर्थ वृत्तीनें अव्यवस्थित होते, असें मानावयाचें असेल तर गोष्ट वेगळी; परंतु १६७२ पासून पुढें 'तुमचे देसीं' हे शब्द यथार्थ असल्याचें इतिहासावरून स्पष्ट दिसणारें आहे. १६७२ पूर्वीं शिव-समर्थांच्या अनेकदां भेटी झाल्या होत्या, असें म्हणणाऱ्या पक्षाला 'विस्मरण' शब्दाची अडचण सहजासहजीं ओलांडतां येत नाहीं. १६४५ पासून १६७२ पर्यंत ज्यांच्या कारणपरत्वें वारंवार भेटी झाल्या किंवा घ्याव्या लागल्या त्या समर्थांचें महाराजांना विस्मरण होईल हें शक्यतेच्या कोटींत बसणारें नाहीं. सरळ अर्थ केल्यास या अडचणीचा परिहार कसा होतो, हें वर दाखविलें आहे. गौरवाच्या भाषेनें महाराजांना पत्र लिहून महाराजांचें लक्ष आपल्याकडे वेधून घ्यावें, असा या पत्राचा उद्देश आहे. १६४५ किंवा १६४९ या वर्षांपूर्वीं हें पत्र लिहिलें होतें असें मानल्यास त्यांतील पुष्कळशीं गौरवदर्शक विशेषणें निरर्थक ठरतात.

**राजधर्माच्या** प्रारंभीं प्रपंचाचा निर्देश आहे. त्यांतील बरेच विचार सामान्य उपदेशाचे असून अमर्याद फितवेखोरांचा संहार (७), कारभारांत हुकुमाची शिस्त (१३), युद्धास जाणें (१४), तुरंग शस्त्र स्वार यांची जमवाजमव व शत्रूंना दहशत (१९), हे राजधर्म तुरळक आहेत. याला समर्थांनीं 'प्रपंचाचा विवेक' म्हटलें आहे (२०).

**क्षात्रधर्मांत** योद्धयांच्या गुणांचें बरेंच वर्णन आहे. हिंदु धर्माचा–स्वधर्माचा

निर्देश 'मऱ्हाटा धर्म' या शब्दानें केलेला आहे. समर्थांचा उपदेश हिंदु लढवय्यांकरितां असल्यामुळें ज्याला एकदां स्वधर्म म्हटलें (१२) त्यालाच दुसऱ्या ओवींत मऱ्हाटा धर्म असें म्हटलें आहे (१३). हा संदर्भ न विसरल्यास मऱ्हाटा धर्म म्हणजे महाराष्ट्रांतील हिंदूंचा धर्म या व्यतिरिक्त जास्त व्यापक अर्थ निष्पन्न होत नाहीं. तुळजा भवानी ही शिवाजीप्रमाणें मोऱ्यांची सुद्धां कुलदेवता होती. त्या देवीच्या वरामुळें रामाच्या हातून रावण मारला गेला. समर्थांचें उपास्य राम असलें तरी त्याला वर देणारी तुळजादेवी हें तिचें महत्त्व लक्षांत घेऊन तिला 'रामदास ध्यातो मनीं ।' अशी समर्थांची साक्ष आहे (२०). रामदासी संशोधनांतील ९९४ व १२४० या बाडांतून एक ओवी जास्त आढळते :

**देवद्रोही रजनीचर । त्यासी मिळती जे नर ।**
**बहुत काय सांगणें विचार । कळला पाहिजे ॥ १७**

समर्थांनीं **संभाजीस लिहिलेलें पत्र** २१ ओव्यांचें आहे. एखाद्या कर्तबगार पुरुषाचें निधन झाल्यानंतर त्याचे स्नेही त्याच्या मुलाला जशा तऱ्हेचा उपदेश करतील तशा तऱ्हेचा उपदेश या ओव्यांत आहे. मुलामध्यें कांहीं स्वभावदोष असतील तर त्यानें ते आवरून किंवा घालवून आपल्या पित्याचा कित्ता गिरवावा, असें सांगण्याचा साधारणपणें प्रघात आहे. समर्थांनीं सदर पत्रांत तोच प्रघात अनुसरलेला आहे. सावध रहावें, एकान्तामध्यें नव्या योजनांचा विचार करावा, स्वभावांतील उग्रता सांडून सौम्यता धरावी, मागले अपराध क्षमून कारभाऱ्यांना हातीं धरावें व सुखी करावें. वडिलांच्या मिळकतीसाठीं आपसांत भांडत बसल्यास शत्रूचें फावतें. सगळे लोक एकत्र आणून गनीमाचा (शत्रूचा) निःपात करावा (१०). बहुत लोक जमवून व त्यांच्यांत एक विचार (ध्येयदृष्टि) निर्माण करून कष्टांची क्षिति न बाळगतां म्लेंच्छांवर घसरावें (१४). आहे तेवढें संभाळून त्यांत जमल्यास भर घालावी. जिकडे तिकडे मऱ्हाष्ट्र राज्य करावें (१९). आपल्या पित्याचें (शिवाजीचें) रूप, प्रताप, साक्षेप, बोलणें, चालणें, सलगी देणें इत्यादि गुण आठवावे. शिवाजीहून 'करावें विशेष । तरीच म्हणावें पुरुष । २१'. याप्रमाणें त्या पत्रांतील उपदेशाचा कांहीं भाग आहे. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाला स्मरून जो उपदेश केला, त्याचा काळ व रोख लक्षांत न घेतां किंवा मुद्दाम नजरेआड

ढकलून कित्येक पूर्वसूरींनीं त्यांतून समर्थांचें स्वतंत्र राजकीय तत्त्वज्ञान दाखविण्याचा यत्न केला आहे.

श्री संप्रदायाचीं कागदपत्रें खंड १ च्या ४३ लेखांकांत 'पूर्वी राजश्रीस, राजधर्म क्षात्रधर्म व अखंड सावधान ऐसीं पत्रें' पाठविल्याचा मजकूर आहे. 'अखंड सावधान' हें पत्र 'शिवरायाचें आठवावें रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप।' वगैरे सांगणारें असल्यामुळें तें शिवाजीला लिहिलेलें नाहीं, याचें भान सोडून हीं सारीं पत्रें शिवाजीमहाराजांस लिहिलेलीं आहेत, असा भ्रम श्री. शं. श्री. देवांनीं त्या लेखांकाच्या तळटीपेंत दाखल केला आहे. 'राजश्री' हा शब्द एका व्यक्तीचा वाचक असेल तर वरील तिन्ही पत्रें संभाजीस लिहिलेलीं आहेत असा निष्कर्ष निघतो. ४३ व्या लेखांकांतील सारीं वचनें संभाजीराजे भेटीस आले असतां त्यांच्या कानावर घातलीं, असा श्री. देवांचा ग्रह श्री समर्थावतार ग्रंथाच्या पान ४७४–४७५ वर प्रगटलेला आहे. मूळ मजकूर पाहिल्यास हा ग्रह चुकीचा असल्याचें ध्यानांत येईल: 'दुर्मति संवत्सरीं (शके १६०३) पुष्य वदि नवमीस श्री कीं आपला संपूर्ण प्रसंग संनीधचि आहे ऐसें म्हणोनि ते समईं राजश्री यांसि कित्येक कृपापूर्वक बोलिलें वचनें' यांतून राजश्रीस (संभाजीस) अनुलक्षून समर्थ कृपावचनें बोलले असा अर्थ निघू शकतो. पुढें जी वचनमालिका ग्रथित केली आहे तिचा झोक प्रत्यक्ष संवादाचा नसून परोक्षपणाचा आहे. 'श्रीशिवराज कैलासवासी यांचे वंशपरंपरेसी राज्यभोग बहुत आहे' हें या वचनमालिकेंतलें पहिलें वाक्य परोक्षपणाला शोभणारें आहे. अशींच बाकीचीं वाक्यें आहेत. हीं वाक्यें संपल्यावर लेखक स्वतःविषयीं म्हणतो: 'ऐसें म्हणोनि मज आज्ञा दिल्ही.' श्री. देवांनीं 'राजास जावयास श्रीसमर्थांनीं आज्ञा दिली'-असा या वाक्याचा अर्थ केला आहे. जणूं काय संभाजी राजे स्वतः हीं कृपावचनें समोर बसून कागदावर उतरून घेत होते. ज्यानें लेखनाचें काम केलें त्याला जाण्याविषयीं आज्ञा झाली हा सदर वाक्याचा सरळ अर्थ लपण्यासारखा नाहीं. कारण या लेखकानें माघ वद्य अष्टमीच्या दिवशीं दोन प्रहरीं समर्थांनीं जे उद्गार काढले, ते शेवटीं जोडले आहेत.

कृपावचनांतलें तिसरें वचन 'पूर्वी राजश्रीस राजधर्म क्षात्रधर्म आखंड (साव) धान ऐसीं पत्रें पाठविलीं होतीं' असें आहे. 'अखंड सावधान' हें पत्र संभाजी

राजांस पाठविलेलें याविषयीं वाद करण्याला जागा नाहीं. संभाजी राजांस लिहिलेल्या पत्राबरोबर राजधर्म-क्षात्रधर्माचा निर्देश असल्यानें तीं सारीं पत्रें संभाजीकरितां लिहिलेलीं असें तात्पर्य स्वीकारण्याला अडचण नाहीं. राजधर्म-क्षात्रधर्म या पत्रांतील उपदेश संभाजीसाठीं होता असें मानल्यावर त्यांच्या आधारें कित्येकांनीं रचलेले समर्थांच्या शिवराजविषयक राजकारणाचे मनोरे ढासळून पडतात.

**सेवकधर्म** प्रकरणाचे दोन समास आहेत. त्यांतल्या दुसऱ्या समासाला ६४-व्या बाडांत 'राजकारण' असें नांव दिलेलें आहे. पहिल्या समासांत आज्ञाधारक सेवकाच्या गुणांमागून मालकाशीं शिरजोरी, विश्वासघात करणाऱ्या नोकराचें वर्णन आहे. तसाच विषय दुसऱ्या समासांत आहे. पण पहिल्या ओवीच्या दुसऱ्या चरणांत 'राजकारण' शब्द असल्यामुळें त्याला 'राजकारण' अशी संज्ञा एका बाडाच्या संग्राहकानें दिली. विचाराचा व भाषेचा खणखणीतपणा, आवेश हे समर्थांचे गुण या प्रकरणांत उत्तम प्रकारें उमटले आहेत.

**बाग** प्रकरणाच्या ओव्या २८ असें कांहीं पुस्तकांतून दिसतें. ५०२ या बाडांत त्याच्या ३१ ओव्या आहेत. शिवाय त्याला बनकटीनिरूपण हें नांव दिलें आहे. 'प्रसंग निघाला स्वभावें। बागेमधे काय लावावें। म्हणूनि घेतलीं नांवें। कांहीं येक' या प्रस्तावनेनंतर फळाफुलांचीं नांवें उच्चारलीं आहेत. शेर, निवडुंग, पांगारा, तरवड, वेत, कळक, भोस, बरु, वाळा, ऊस, ताडमाड, नारळ, पोफळ, कवट, अंजीर यासारख्या वनस्पतींचाहि विपुल उल्लेख आहे. साखरलिंबू, खजूर, तुतें, खरबुज, तरबुज, कलिंगड, अननस, दालचिनी, कबाबचिनी, पोपई इत्यादि पदार्थ समर्थांच्या माहितीचे होते. फुलांच्या माळेंत गुलाब दिसत नाहीं, ह्यावरून समर्थांच्या काळापर्यंत गुलाबाचा प्रसार महाराष्ट्रांत झाला नसावा अशी शंका येते. गुलखत (२०) हा शब्द पाहिल्यावर मात्र गुलकंदाचा भास होऊन गुलाबाचा समर्थांना परिचय असेल कीं काय ही कल्पना मनांत उचल घेते.

**कारखाने** प्रकरणाचा एक समास समजून समग्र ग्रंथांतून २४ ओव्या आढळतात. ६४ व ५०२ या बाडांत बारा बारा ओव्यांचे दोन समास अशी या प्रकरणाची एकदां व्यवस्था होती, असें म्हणणें प्राप्त आहे. यांत प्रथम विटांची लांबीरुंदी, तिची अव्यंग रचना, त्यांची भट्टी यांचें वर्णन असून मग या कामावर राबणारांच्या गुणां-

कडे लक्ष दिलें आहे. 'कामगाराला गमूं देऊं नये, त्याच्याकडून काम घेतांना त्रासूं नये, त्यांना कठिण शब्द बोलूं नये, दिवस उगवल्यावर त्याला कामावर घेऊं नये, म्हातारे किंवा अशक्त पोरें यांची कामासाठीं निवड करूं नये, सर्वांचा मुशाहिरा सारखा नसावा, त्यांना जेवणापुरतें बसूं द्यावें आणि जेवण आटपतांच कामास जुंपावें, मुशाहिऱ्यांत खोटें नाणें चुकून गेल्यास तें बदलून द्यावें, मुशाहिरा थकूं देऊं नये, हिशोब चोख असावा आणि तो लिहिण्याचा आळस नसावा,' याप्रमाणें कामगाराविषयींच्या सूचना संपवून कामास लागणाऱ्या हत्याराअवजारांची यादी जोडली आहे.

**इमारत** प्रकरणांत द्रव्य, पारपत्य (देखरेख), खबरदारी, सत्ता, सामर्थ्य या गोष्टींचा प्रथम निर्देश असून पुढें सुतार, लोहार, कुंभार, मांग, महार, चांभार या कामगारांचीं नांवें आहेत. इमारतीस लागणारे जिन्नस व इमारती यांची माहिती दिलेली आहे. समर्थांच्या सूक्ष्म अवलोकनाची, स्मरणशक्तीची व बारीक तपशील जिथल्या तिथें सांगण्याच्या दक्षतेची साक्ष हें प्रकरण पहातांनाहि पटते.

या प्रकरणांत महार, मांग, चांभार या लोकांचा उल्लेख पाहून समर्थांच्या कामगिरीमध्यें अस्पृश्यतानिवारणाचा रंग भरण्याचा यत्न क्वचित् दृष्टीस पडतो. लोहार, सुतार, कुंभार यांच्याबरोबर महार, मांग असल्यामुळें इमारतीच्या कामाकडील माणसांपैकींच महार-मांग होत, हें समजायला कठिण नाहीं. इमारतींच्या यादींतील 'घुमट मशीदी मनोहर' याप्रमाणें मुसलमानांच्या धार्मिक इमारतींचा निस्संकोच उल्लेख पाहून निर्गुण ध्यानांतील 'सोपी कलंदर फकीर' या समर्थवचनाचें स्मरण होणें स्वाभाविक आहे. त्यावरून समर्थांच्या धर्मदृष्टीची सहिष्णुता ध्यानांत येऊं शकते.

**आज्ञापत्र** या नांवाची एक १२ ओंव्यांची कविता श्री रा म दा स आणि रा म दा सी मासिकांतील सां प्र दा यि क वि वि ध वि ष य, प्रथम खंडामध्यें छापली आहे (पान १४१–४२). ह्याबद्दल महंतशिष्यांना हें आज्ञापत्र असावें अशी कल्पना आहे. कोणा शिष्यानें समर्थांच्या भेटीची उत्कंठा व्यक्त केली, तेव्हां उत्तरादाखल या कवितेची रचना झाली, असें तिसऱ्या ओवीवरून वाटतें. 'ऋणानुबंधें भेटी होईल । परस्परें समाचार कळेल । सहज वर्तमान निवळेल । ते प्रसंगीं ॥ ३' नंतर समुदाय करावा, ह्या संबंधांत आळस करूं नये, पोहणारानें बुडल्यास तारावें, विवेकी पुरुषानें मूर्खांना शहाणें करावें, आपल्याहून जो वरचढ (धिंग) असेल त्याच्याशीं प्रसंग करूं नये,

आपल्या आटोक्यांतला प्रसंग साधावा, सोयऱ्याधायऱ्यांचीं जीं मुलें तीक्ष्ण, सखोल बुद्धीचीं असतील त्यांच्याशीं मृदु शब्दांनीं बोलावें, त्यांची हालहवाल विचारावी, पाल्हाळाला कंटाळूं नये, त्यांचें दुःख ऐकून हलकें करावें, म्हणजे मित्रभाव उत्पन्न होतो, मैत्री योग्य असल्याची खात्री पटल्यावर त्यांना एकांतांत नेऊन देवाच्या भजनाचा उपदेश करावा; पूर्वीं देवाची उपेक्षा केल्यामुळें दरिद्रता आली, यासाठीं देवाला भजावें, हा मुद्दा त्यांच्या गळीं उतरवावा; असा उपदेश त्यांनीं मानल्यास जप सांगावा, नंतर त्यांना इकडे (आपल्याकडे) पाठवावे, पुढचा कार्यभाग आम्ही पाहून घेऊं, असा प्रस्तुत आज्ञापत्राचा गद्य सारांश आहे.

**रामदास फोडी हाका** या दहा ओव्यांच्या कवितेंत नेहमींचें तत्त्वज्ञान असून शेवटीं 'रामदास फोडी हाका । सोडा देहेबुद्धीचा धोका । साधुसंगें रघुनायेका । पाविजेल ॥ १० ' अशी हाक आहे (सांप्रदायिक विविध विषय, पान ३१३).

**रामदासाचा सारथी** (सांप्रदायिक विविध विषय, पान ३२१) ही ११ ओव्यांची कविता मारुतिचरित्रपर आहे. वैकुंठास जातांना रामानें आपल्या भविष्यकालीन भक्तांची जबाबदारी मारुतीकडे सोपविली ही कल्पना १० व्या ओवींत असून नंतर मारुतीला सारथी म्हटलें आहे. 'रामदासाचा सारथी । विघ्नें चळचळा कांपती । पावे संकटीं मारुती । भर्वशानें ॥ ११ ' अशी शेवटची ओवी आहे.

**महंती सुखाची नाहीं** (सांप्रदायिक विविध विषय, पान २४१) ही कविता ११ श्लोकांची आहे. लोकांचें उदंड दुःख ऐकून ऊर फुटतो (१), नाना विकारांचे लोक जो अन्याय करतात तो कानांनीं ऐकवत नाहीं, डोळयांनीं पहावत नाहीं (२), क्षमेपायीं ऊर दाटतो, बोलणें खुंटतें, तरी लोकांच्या मस्तींत फरक पडत नाहीं (३), शिकवायला जावें तर लोकांना वाईट वाटतें, अन्यायानें होणारा घात लोक ओळखीत नाहींत, ऐकण्याचा त्यांना त्रास होतो (४), लोक उद्धटपणानें वाटेल तें करतात (५–७), भलेपणासाठीं हें सर्व सोसावें लागतें, पण इष्ट परिणाम दिसत नाहीं (८), नेणत्याच्या संगतीचा शीण चालू असून जाणत्याच्या संगतीचा जणूं दुष्काळ पडला आहे (९), सज्जनांनीं काय करावें, लोक अनावर आहेत; त्यांना काय सांगावें हेंच कळेनासें झालें आहे (१०), 'सज्जनीं फारसी निष्ठा । देव त्यासीच वोळतो । अन्याय वर्ततो तो तो । भ्रष्ट होतो अनावरु ॥ ११ '.

**यथायोग्य घालावें वय** (सांप्रदायिक विविध विषय, खंड २, पान १४३) केव्हांतरी दोन मठांच्या शिष्यमंडळींत कलह माजला असतां त्याचा योग्य प्रकारें सुखदायक निर्णय झाल्यावेळीं लिहिलेली ही १२ ओव्यांची कविता आहे. या कवितेच्या १० व्या ओवींत सुंदर मठाचा निर्देश आहे, त्यावरून चाफळास सुंदर मठ नव्हता असें निर्विवाद मानण्याला आधार सांपडत नाहीं. सुरवातीस भक्तीच्या दृढत्वाचा गौरव आणि चांचल्याचा निषेध असून पुढें परस्परांतल्या संपूर्ण सहकाराचें वर्णन आहे. कलह होऊनि तुटला (९) अशी निस्सीम आनंदाची घटना सुंदरमठानें पाहिली (१०), दोन्ही मठ एक झाले, दोन्ही मठांचा व्यवहार एकाच पद्धतीनें होऊं लागला, त्या योगानें मननशील निवाले (११), 'भक्ती सकळासी आहे मान्य। आंतरनिष्ठ परम धन्य। दास म्हणे अनन्य। कोणासी असो ॥ १२'. देव कोणी असो, त्याची भक्ती हीच खरी, यावरून भिन्न देवांच्या उपासनेंतून कलह निघाला असावा, असा संशय येतो.

**पंचवटीच्या लोकांना पत्र.** टाकळी मठाच्या संग्रहांत हें पत्र सांपडलें व श्री. देवांनीं त्यांच्या सांप्रदायिक विविध विषयांतून शके १८३८ सालीं म्हणजे ३६ वर्षांमागें तें जगापुढें ठेवलें (पान १६६). पुनः त्यांनीं त्याचा श्रीसमर्थ चरित्र तृतीय खंड श्रीसमर्थ संप्रदाय या पुस्तकांत उद्धार केला आहे (पान ९९-१००). 'पंचवटीचे लोक रामाच्या कृपादृष्टीनें पावन झालेल्या भूमींत रहाणारे म्हणून अत्यंत भाग्यशाली आहेत. तुमच्यांतला मी एक रंक असून दूरदेशीं पडलों आहें (३). माझ्याबद्दल तुम्ही देवाजवळ करुणा भाकावी (४). माझ्या वतीनें तुम्ही देवाला विनवावें कीं मी अनाथ तर तूं दीनानाथ आहेस, मी पतित तर तूं पतितपावन आहेस, मी किंकर तर तूं करुणाकर आहेस, मी निराधार म्हणून तुझा आधार इच्छीत आहें. मी तुझा म्हणवितों, माझी चिंता तूं करावी (४-६). मी अवगुणी असलों तरी मी रामाचा एकनिष्ठ सेवक आहे. माझी देवासंबंधीं अनन्यनिष्ठा कधींहि भंगूं नये, असें देवाजवळ तुम्ही मागणें करा (७-८). माझा नमस्कार प्रत्यहीं देवाला पोंचविण्याची तसदी घ्यावी. मी कृष्णातीरवासी तुम्हां सर्व बालवृद्ध नरनारींना आणि कुमारकुमारी भक्तांना नमस्कार करतों (९-१०). समर्थांच्या मनोगतानुसार शुद्ध उपासना, विमलज्ञान, वीतराग, ब्राह्मण्यरक्षण इत्यादि पंचविध

कर्तव्यें ११ व्या ओवींत असून याप्रमाणें यत्नपूर्वक कराल तर 'सकळहि पावलें। म्हणे दासानुदास ॥ १२'.

'निराधार' शब्दाच्या आधारानें हें पत्र सन १६४४ ते १६४९ या दरम्यान केव्हांतरी लिहिलें गेलें असावें, असें अनुमान करण्यांत आलें आहे. तिसऱ्या ओवींतील 'मी पडिलों दुरि देसीं।' यांतील 'पडिलों' या शब्दावरील राजिकपर भाष्य पूर्वोक्त श्रीसमर्थ संप्रदाय पुस्तकांत पहायला सांपडतें (पान १०१). 'पडिलों' यांत वस्तुतः कसलाच गूढार्थ नाहीं. 'तुम्ही पुण्यास व मी तर पडलों दिल्लीस' अशा तऱ्हेचा पडलों शब्दाचा प्रयोग नेहमींच साध्या बोलण्यांत होत असतो. परंतु समर्थांचें 'राजिक' सिद्ध करूं पहाणारांना त्या शब्दांत समर्थांनीं शहाजी राजांशीं पुरश्चरणकाळीं मसुरास जाऊन रहाण्याचा संकेत ठरविला होता, असा इतिहास दिसतो. मसूरच्या जगदळे घराण्याची देशमुखी शहाजीराजांनीं सन १६३७ मध्यें अदिलशाहींत नोकरी पत्करल्यावर हस्तगत केली. समर्थांचा पुरश्चरणकाळ १६३२ मध्यें संपला. तेव्हां शहाजीराजे निजामशाहीचे नोकर होते. शहाजहान बादशहा निजामशाहीला चिरडून शहाजीला अदिलशाहीची नोकरी करायला लावील हें सन १६३२ नंतरचें सारें भविष्य समर्थ-शहाजींना त्या वर्षापूर्वीच कळलें होतें, असा त्या दोघांच्या भविष्यज्ञानाचा अद्भुत प्रकार इतिहासांत सहजासहजीं मिसळून जाण्यासारखा नाहीं. परंतु समर्थविषयक अंधश्रद्धा असले प्रकार ओळखायला आणि विचारांत घ्यायला तयार नसते. जगदळ्याच्या देशमुखी-प्रकरणांत समर्थ-शहाजींच्या पुरश्चरणकालीन संकेताचा मागमूसहि सांपडत नाहीं. त्या प्रकरणाचा समर्थांच्या कृष्णातीरनिवासाशीं संबंध जोडणें हें एक शुद्ध थोतांड आहे.

**सावधता** प्रकरणाबद्दल एकदां तें कुणाला तरी लिहिलेलें पत्र असावें, ही समजूत ६४ व्या बाडांत नमूद आहे. सामान्यतः या प्रकरणाच्या १२ ओव्या दृष्टीस पडतात. ३८४ व्या बाडांत हें २१ ओव्यांचें प्रकरण म्हटलें असून १२४० व्या बाडांत ११ च ओव्या आहेत पण या ११ ओव्यांच्या आधीं 'जळस्थळ काष्ठ पाषाण' अशा प्रारंभाच्या ११ ओव्या असून एकूण २२ ओव्यांना 'महंतलीळासिकवण नाम समास दहावा' असें म्हटलें आहे. ११ ओव्यांमुळें 'इपारतीचें बोलतां नये।' वगैरे मजकुराच्या प्रसिद्ध ओवीला थारा उरत नाहीं. या प्रकरणांतील कांहीं ओव्यांचें

राजधर्मांतील ओव्यांशीं साम्य आढळतें. कांहीं ओव्यांचें दासबोधांतील ओव्यांशीं साम्य आहे. २८४ व्या बाडाच्या अहवालांत 'जळ थळ काष्ठ पाषाण।' इत्यादि अकरा ओव्यांपैकीं ६,७,९ याप्रमाणें तीन ओव्या घेतल्या आहेत. त्यामध्यें महंत शब्द ठेवून महंताचीं कर्तव्यें सांगितलीं आहेत (श्रीरामदासी संशोधन, खंड १, पान ३२०) या कर्तव्याचा विस्तार सावधतेच्या ११ ओव्यांत असल्याच्या समजुतीनें त्याला 'महंतलीळासिकवण' हें नांव आधींच देण्यांत आलें होतें. ११ व्या ओवींतील 'राजकारण' शब्द महंताच्या कारभाराला अनुलक्षून आहे, राज्यकारभाराच्या संकेताचा नाहीं, हें निराळें सांगायला नको. २८४ वें बाड २२५ वर्षांचें जुनें तर १२४० वें बाड त्याहून आणखी ५० वर्षांनीं जुनें आहे—म्हणजे जवळजवळ र्थांच्या हयातींतलें आहे. त्यांतील समजुतीवर विश्वास ठेवणें हें केव्हांहि समंजसपणाचें गणलें जाईल.

समर्थांना वेळोवेळीं स्वानुभवानुसार किंवा प्रसंगानुसार कविता रचण्याची संवय होती हें वाचकांना कळलेलेंच आहे. तशी कांहीं कविता श्री. शं. श्री. देवांनीं इतस्ततः प्रसिद्ध केलेली आहे. श्रीरामदासांची कविता, प्रथमखण्ड या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत पान ४५–४६ वर १७ ओव्यांची एक कविता छापली आहे. 'परंतु येकवचनी देव येक। जेणें सोडिले देव अनेक। सेवाहीन मी सेवक। त्याचा म्हणवी ॥' असा त्या कवितेचा प्रारंभ आहे. प्रथम ११ ओव्यांत रामाचें चरित्र व त्या अनुषंगानें रामकृपेनें स्वतःला झालेला लाभ यांचें वर्णन आहे. रामानें अंगीकार केला, संकटांत राखलें, त्याच्या अन्नानें माझा पिंड वाढला (२), त्यानें माझे मनोरथ पूर्ण केले (४-५), माझी कीर्ति वाढविली (११), रामानें सुंदर मठांत वस्ती केली (१२), मला जवळ ठेवून सारा प्रांत पावन केला (१४), भय वाटण्याजोगें स्थळ असूनहि वैभव दिसूं लागलें (१५), जवळ रामवरदायिनी माता आहे (१७).

१५–१६ व्या ओवींतील वर्णनावरून चाफळास रामाचें मंदिर उभारलें गेल्यावर आपली आकांक्षा तृप्त झाल्याचें समाधान व्यक्त करण्यासाठीं समर्थांनीं ही कविता रचली असा ठोकताळा बसवितां येतो. शिवथरच्या घळीशीं या वर्णनाचा संबंध जोडतां येत नाहीं. वर्णनांतील स्थळांच्या खाणाखुणा चाफळच्या देखाव्याशीं अनेक

प्रकारें जुळतात. केवळ सुंदर मठाचा उल्लेख आहे व शिवथरच्या घळीला सुंदर मठ नांव असल्याचें गिरिधरस्वामी सांगतो किंवा एखाद्या शिवकालीन पत्रांत त्या नांवानें मठाचा उल्लेख आहे, म्हणून चाफळास सुंदर मठ नव्हता, असा सिद्धांत करण्याचें कारण नाहीं. शिवथरच्या घळींत रामाची स्थापना झाल्याची माहिती उपलब्ध नाहीं व या कवितेंत रामाच्या वस्तीचें माहात्म्य गाइलें आहे: सुंदर मठीं देव आपण। वास केला ॥ १२, गिरिकंदरीं सुंदर वन। सुंदर वाहाती जीवन। त्यामध्यें सुंदर भुवन। रघुनाथाचें ॥ १३. सुंदर पाहोन वास केला ॥ १४.

साधारणपणें जेवढीं मुळांत महत्त्वाचीं आहेत किंवा अर्वाचीन काळांतील समजुतींच्या आगंतुक कारणानें ज्यांना महत्त्व मिळालेलें आहे, अशा बहुतेक समर्थकृत कविताप्रकरणांचा वाचकांना परिचय करून दिला. त्यावरून सहज ध्यानांत येणारी पहिली गोष्ट म्हणजे समर्थांना स्वराज्याचा ध्यास लागलेला नव्हता, ही होय. प्रपंचत्यागाच्या वैराग्यानें ब्रह्माच्या निर्गुण अवस्थेंत माणसाला नेऊन सोडणारा आत्मनिवेदन भक्तीचा परमार्थ या एकाच विषयाचा उच्चार समर्थांची वाणी निरनिराळ्या रीतीनें जन्मभर करीत होती. त्यांच्या हृदयांत सायुज्यमुक्तीची तळमळ होती. चिरस्थायित्वानें चित्तांत अढळ बाणलेल्या या विषयाला सोडून त्यांनीं जें प्रसंगोचित वाङ्मय निर्माण केलें तें त्यांच्या संप्रदायांत गौण समजलें गेलें. परंतु आज त्यांतल्या कांहींला विलक्षण महत्त्व चढलें असून जे विचार मुळांत नाहींत ते येथें असल्याचें सिद्ध करावें असें ध्येय स्वीकारलेलीं माणसें हल्लीं भेटतात. या माणसांच्या प्रतिपादनानें सामान्य जिज्ञासूंची दिशाभूल होऊं नये म्हणून समर्थांचें शक्य तेवढें जास्तींत जास्त वाङ्मय येथें दृष्टीखालीं आणलें आहे आणि त्यांतील विषयांची स्थूलपणें ओळख होण्याइतका मजकूर प्रत्येक प्रकरणासंबंधांत सादर केलेला आहे. या प्रकरणांची ज्यांनीं पूर्वीं महाराष्ट्रियांना ओळख करून दिली त्यांतल्या कोणी एकानें मूळचें लिखाण लोकांपुढें ठेवलें असलें तरी त्यांनीं व इतर अनेकांनीं त्या लिखाणाविषयींच्या आपल्या कल्पना अशा भाषेनें त्या लिखाणाच्या आसपास फैलावून ठेवल्या आहेत कीं मूळ लिखाण पहाण्याची प्रवृत्ति क्षीण व्हावी आणि तत्संबंधीं आपल्या कल्पना लोकांत भक्कम रुजाव्या. अशा कल्पना स्वीकारतांना जर त्या कल्पनांचे ग्राहक मूळ ग्रंथाचें योग्य प्रकारें परिशीलन करतील तर एखाद्याच्या

व्यासंगाचा गवगवा, त्याचा एखाद्या पूर्वकीर्तीच्या संस्थेशीं किंवा परंपरेशीं असलेला दीर्घ संबंध, एखाद्याची समर्थवाङ्मयाच्या क्षेत्राबाहेरील ज्ञानाची किंवा इतर सार्वजनिक कामगिरी, एखाद्याचा सरकारांतील अधिकार अथवा लोकांतील बहुमान या सारख्या गोष्टींच्या वजनानें असे ग्राहक आपली व इतरांची दिशाभूल टाळतील.

• ४ •

येथें दिशाभूल कशी करतां येते याचीं कांहीं उदाहरणें सादर करायला हरकत नाहीं. १८ : ६ हा समास अफझुलखानाच्या वधप्रसंगीं लिहिला गेला, या कल्पनेला इ. स. १८७० मध्यें मुंबईंत छापल्या गेलेल्या हनुमंतस्वामीच्या बखरीखेरीज दुसरा एकहि आधार नसतां श्री. शं. श्री. देवांनीं १९२९ मध्यें 'समर्थांचें राजकारण' हा लेख लिहितांना एका ठिकाणीं पुढील तीन विधानें निःशंकपणें लिहून टाकलीं आहेत : १. बहुतेक समर्थचरित्रांत ही गोष्ट नमूद आहे; २. तशी परंपराहि आहे; ३. हीं चरित्रें आणि परंपरा खोटी मानण्याला कांहीं कारण नाहीं. यांतलें पहिलें विधान सपशेल खोटें आहे. एकाहि समर्थचरित्रांत ही गोष्ट नमूद नाहीं. फक्त १८७० सालच्या बखरींत ही गोष्ट होती. स्वतः श्री. देवांनीं प्रसिद्ध केलेल्या या बखरीच्या संशोधित आवृत्तींत अफजुलखानाचें नांव नसल्यानें हा पूर्वीच्या बखरीचा आधारहि नष्ट झाला. म्हणजे कोणत्याच समर्थचरित्रांत ही गोष्ट नाहीं, हा निष्कर्ष शिल्लक रहातो. दुसऱ्या विधानांतील 'परंपरा' हा शब्द निरर्थक आहे. मुळांत जी गोष्टच कुठें नमूद नाहीं तिला परंपरा असणार कशी ? चरित्रांत ही गोष्ट नाहीं, तेव्हां या गोष्टीपुरतें बोलावयाचें तर चरित्रांच्या खरेखोटेपणाचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. परंतु ज्यांना चरित्रें माहीत नाहींत त्यांची दिशाभूल हीं विधानें सहज करूं शकतात. १३ व्या दशकाचा ६ वा समास 'लघुबोध' हा समर्थांनीं शिवाजी-महाराजांना पहिल्या भेटीच्या वेळीं सांगितल्याची गोष्ट वादग्रस्त नसतां तिच्याकडे अर्वाचीन समर्थभक्त मुळींच लक्ष देत नाहींत, हें वरील प्रकाराबरोबर लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

श्री. ज. स. करंदीकरांनीं देवांच्या पुढें जाऊन हा समास मुळांत निराळा होता व दासबोधांत त्याचा समावेश करतांना त्याला वेगळें रूप देण्यांत आलें, अशी

माहिती त्या समासांत समर्थांनीं फेरफार केल्यावेळीं जातीनें हजर असल्याप्रमाणें 'शिवाजी निबंधावली १' मध्यें गंभीरपणानें सांगितली आहे. 'उदाहरणार्थ— शिवाजीला अफजल प्रसंगीं केलेल्या उपदेशाचीच छाटाछाट करून आणि त्यांतील विशेषनामांच्या जागीं सामान्यनामांच्या व सामान्य उपदेशाच्या कांहीं ओव्या शेवटीं जोडून उत्तम पुरुष लक्षण नांवाचा एक समास बनविला आहे' (पान १२७). १८:६ पुरतेंच श्री. करंदीकरांचें हें मत नसून ११, १५, १८, १९ या दशकांतील अकरा समासांवर त्यांनीं या मताचा शेरा मारला आहे. तेवढ्यानें समाधान होईना म्हणून त्यांनीं त्यांच्यापुढें 'इत्यादि' हा आधिक्यवाचक शब्द ठेवलाच आहे. समर्थांनीं एका वेळच्या उपदेशांत छाटाछाट केली, त्यामध्यें नव्या ओव्या जोडल्या, या मताला आधार काय असा जाब विचारला जाण्याची भीति नसल्यावर श्री. करंदीकरांनीं आपल्या मनोल्हरी कां आवराव्या ? त्यांचें हें मत सर्वथैव निराधार आहे व हें मत नमूद करतांना त्यांना प्रिय असलेलें समर्थांचें दासबोधांतील राजकारण सामान्य उपदेशाच्या श्रेणींत स्वतः आपणच आणून सोडलें, याचीहि जाणीव त्यांना राहिलेली नाहीं. दासबोधाच्या कोणत्याहि प्रतींत समासांची छाटाछाट केल्याचा दाखला सांपडत नाहीं. रामदासी संशोधनाच्या बाडांतूनहि छाटाछाटीनें किंवा नव्या ओव्यांच्या भरतीनें या समासांत फेरबदल केल्याचा पुरावा नाहीं.

१९२९ मध्यें दासबोधांतील 'राजकारण' या शब्दाच्या अर्थाचा आणि शिव-समर्थ भेटीच्या वर्षाचा वाद सुरू झाला तेव्हां, इ. स. १६४९ मध्यें जर या दोघांची भेट झाली असती तर इ. स. १६७२ सालीं कऱ्हाड टापूंतील अधिकाऱ्यांना शिवाजी महाराजांनीं चाफळ देवस्थानाच्या बंदोबस्तानिमित्त पाठविलेल्या पत्रांत 'रामदास गोसावी' यांतील रामदासामागें 'श्री'पद ठेवून महाराजांनीं आपल्या सद्गुरूचा मान खचित राखला असता, परंतु ज्या अर्थी तेथें 'श्री' नाहीं त्या अर्थी ही भेट १६७२ पूर्वीं झाली नव्हती असें समजणें भाग आहे, असा एक मुद्दा त्या पत्राच्या आधारें उपस्थित करण्यांत आला होता. त्याला प्रत्यक्ष वादाच्या वेळीं उत्तर न देतां श्री. देवांनीं 'रामदास गोसावी' यांतील गोसावी शब्दाचा अर्थ प्रतिपक्षानें विचारला अशी कल्पना करून घेऊन 'गोसावी' शब्दाची प्रतिष्ठा वादानंतर आठ वर्षांनीं कशीबशी गाइली आहे. श्रीसांप्रदायिक वृत्त चर्चा वगैरे खंड ७ वा

यांत लेखांक २३१ 'गोसावी ही सामान्य पदवी नव्हे' या नांवाच्या टिपणांत वाचकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे.

वाद चालू असतां श्री. देवांनीं मध्येंच एकदां अमेरिकन मराठी मिशनचे रे. डेमिंग यांचें नांव काढून डेमिंगसाहेबांचा आपल्या मताला (समर्थांच्या अवास्तव गौरवाला) पाठिंबा असल्याचें भासविलें. डेमिंगसाहेबांनीं 'रामदास आणि रामदासी' या विषयावर १९२८ सालीं एक इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. परंतु श्री. देवांनीं त्या अमेरिकन व्यक्तीच्या नांवानें जो हेतु साधण्याचा डाव टाकला तो 'रामदास आणि रामदासी' या पुस्तकांतील उताऱ्यापुढें चालणारा नव्हता. आपल्यावरील विश्वासामुळें लोक डेमिंगसाहेबांचें पुस्तक पहाण्याच्या उठाठेवींत न पडतां आपलें म्हणणें मुकाट्यानें खरें मानतील अशी श्री. देवांची कल्पना असल्यास ती अनाठायीं नव्हती. सामान्य समर्थप्रेमी माणसांना आपलें सांगणें पुरेसें आहे, अशी श्री. देवांना खात्री वाटण्यासारखीच महाराष्ट्रांतील जुन्या वाङ्मयाच्या अभ्यासाची व ज्ञानाची स्थिति आहे. सामान्य समर्थप्रेमी माणसांना डेमिंगसाहेबांचें म्हणणें श्री. देवांच्या मार्फतीनें खरें वाटलें तरी वाद घालणाऱ्या प्रतिपक्षानें श्री. देवांच्या शिफारसीवर कां विसंबावें ? त्यानें डेमिंगसाहेबांचा अभिप्राय सादर केला : 'The influence of Ramdas over Shivaji was primarily spiritual and only secondarily political. From the evidence at hand, it seems clear that Ramdas was not an important factor in Shivaji's political career; and therefore, to make such a claim is not only unsupported by the historical evidence but it is also unfair to Shivaji and the Svami' (पान ७१). 'रामदासांचा महाराजांवर प्रामुख्यानें पारमार्थिक स्वरूपाचा प्रभाव होता व राजकीय दृष्ट्या हा प्रभाव केवळ गौण स्वरूपाचा होता. रामदासांना महाराजांच्या राज्यसाधनांत महत्त्वाचें स्थान देतां येत नाहीं, असें उपलब्ध पुरावा पहातां स्वच्छ दिसणारें आहे. रामदासांना महाराजांच्या राज्यसाधनकार्यांत गोवणें म्हणजे दोघांच्या बाबतींत अन्याय घडतो' असा वरील इंग्रजी उताऱ्याचा भावार्थ आहे.

कै. लो. टिळकांच्या नांवाचा उपयोग हा लोकांची दिशाभूल करण्याचा प्रकार येथें निदर्शनास आणला पाहिजे. रामदासांनीं शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यनिर्माणास हातभार किंवा उपदेशाच्या रूपानें तोंडभार लावला असा अभिप्राय टिळकांच्या

गीतारहस्यांत कुठेंहि नाहीं. तथापि 'स्वराज्य मिळाल्यानंतर आपण गणितशास्त्राचे अध्यापक होऊं' असें टिळक बोलल्याची आख्यायिका लोकांना सांगून प्रतिपक्षाच्या मतावर हरताळ फासला जावा अशी खटपट श्री. देवांनीं वादप्रसंगीं करून पाहिली. उत्तम पुरुषानें आपल्यामागें देवाचें भजन चालू रहाण्याकरितां समुदाय उभारावा, त्याच्या द्वारें महोत्सव करावे, ही समर्थांची महत्त्वाकांक्षा जमेस धरून समुदायाची जूट, शिस्त व कार्यक्षमता टिकण्यासाठीं अशा समुदायाच्या नेत्यानें जें चातुर्य दाखविणें अवश्य त्या चातुर्याला समर्थांनीं राजकारण शब्द लावला आहे; यामुळें राजकारणाच्या आगेंमागें उपासना, भजन वगैरे कार्यांची गर्दी दिसते, असा राजकारणाचा अर्थ लावतांना युक्तिवाद पुढें आला. प्रतिपक्षाच्या या मतावर 'स्वराज्यलाभानंतर आपण गणिताचे अध्यापक होऊं' या टिळकांच्या आख्यायिकेची तोड श्री. देवांनीं काढली. 'स्वराज्यानंतर गणिताचें अध्यापन' या न्यायानें 'राजकारणानंतर उपासना-भजन' याची संगति श्री. देवांच्या मतें लावतां येते. टिळकांच्या स्वराज्यविषयक चळवळीबद्दल शंका नाहीं. समर्थांच्या 'राजकारण' शब्दाचा अर्थच जेथें संशयांत आहे तेथें त्यांनीं प्रत्यक्ष राजकारण केलें कीं न केलें या प्रश्नाचा खल करण्याचीच आवश्यकता नाहीं. टिळकांनीं स्वराज्यसाधनाचा उपदेश करतांना गणित अथवा तसल्याच शास्त्रांच्या अभ्यासाची महती त्या उपदेशांत केव्हांहि घुसडलेली नाहीं. समर्थांच्या उपदेशांत 'राजकारणा'भोंवतीं उपासना-भजनादि कार्यांचा वेढा पडलेला आढळतो. दोघांच्या चरित्रांतला व उपदेश-पद्धतींतला असा भेद लक्षांत ठेवल्यास स्वराज्यांत ज्याप्रमाणें टिळकांचें गणिताध्यापन त्याप्रमाणेंच समर्थांच्या राजकारणांतील उपासना-भजन समजावें या कल्पनेमध्यें कांहींच तथ्य उरत नाहीं. सकृद्दर्शनीं सामान्य जिज्ञासूच्या डोळ्यांत असल्या विधानांची धूळ मात्र चटकन् पडूं शकते.

मनाच्या श्लोकांत चातुर्य आहे, पण राजकारणाचें नांव नाहीं, म्हणून कोणी शंका काढल्यास श्री. देवांनीं त्यांची रचना स्वराज्यसिद्धीनंतर झाली असें एक उत्तर देऊन टाकलें आहे. या उत्तराला त्यांच्या मनोविकाराशिवाय दुसरा आधार नाहीं. आपल्याला जें वाटतें तेंच खरें व लोकांनीं तें तसेंच मानावें, या समजुतीच्या कारभाराला आधाराचा आगापीछा बघण्याचें कारण काय ? स्वराज्यस्थापना झाल्या-

मुळें राजकारणाचा विचार समर्थांच्या हृदयांतून गेला व उपदेश थांबला अशा अर्थाचीं देवांचीं वाक्यें असल्यानें ज्यांत तथोक्त राजकारणाचा गंध नसेल तें समर्थांचें सारें वाङ्मय स्वराज्यस्थापनेनंतरचें असा एक जणूं त्यांनीं दंडकच निर्माण केला आहे. या दंडकाची व दासबोधांतील ज्या दशकांमध्यें राजकारणाचा गंध नाहीं त्यांच्या काळाची संगति कशी लावायची ? लोक विश्वास ठेवतील या खात्रीनें मनसोक्त सांगत जावें, मग त्याला आधार असो वा नसो, अशा परिपाठाला संगतिविसंगतीचा धाक वाटूं नये हेंच स्वाभाविक आहे. सहाव्या दशकाच्या चौथ्या समासाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि समर्थवाङ्मयासंबंधांत कालाचा धरबंध सांपडणार नाहीं.

श्री. देवांप्रमाणेंच शिवसमर्थसंबंध व राजकारणाचा अर्थ या दुहेरी वादाच्या आखाड्यांत उतरलेले आणखी दोन गडी म्हणजे धुळ्याचे कै. भास्कर वामन भट आणि पुण्याचे श्री. ज. स. करंदीकर हे होत. याशिवाय आणखी दोन तीन जणांचीं नांवें सांगतां येतील, परंतु त्यांना मुद्दाम प्रसिद्धि देण्याइतक्या योग्यतेचे ते नाहींत. भट-करंदीकरांच्या प्रतिपादनाचें धोरण श्री. देवांच्याहून वेगळें असलें तरी अंतिम साध्य एकच आढळतें. म. सा. इ. साधनें खंड १५ तील कागदपत्रावरून मसूरच्या जगदळ्याची देशमुखी शहाजी महाराजांनीं समर्थांच्या पुरश्चरणकाळीं म्हणजे १६३२-पर्यंतच्या काळांत आपसांत ठरलेल्या संकेताप्रमाणें १६३७ मध्यें बळकावली, व त्या संकेताच्या सिद्धीसाठींच जगदळे कुटुंबांतील दोघांना शहाजीच्या हातीं मरावें लागलें, असा भटांचा दावा आहे. हा दावा खरा मानल्यास अहमदनगरची निजामशाही इ. स. १६३५ मध्यें साफ बुडणार, शहाजीराजांना आदिलशाहीची नोकरी पत्करावी लागणार, वगैरे भवितव्य १६३२ मध्यें किंवा त्यापूर्वीच शहाजी-समर्थांना निश्चित कळलेलें होतें, अशी अद्भुत कल्पना गृहीत करावी लागते व तशी ती गृहीत करणें सामान्य समंजसपणाला झुगारल्याविना शक्य नाहीं. भटांच्या या व असल्या इतर पुराव्यांचा परामर्श चित्रशाळेच्या श्रीसमर्थ-चरित्रांत केलेला आहे.

चित्रशाळेचें श्रीसमर्थ चरित्र पहातांच श्री. ज. स. करंदीकरांचा चित्तविक्षेप अनावर होऊन त्यांनीं १९५१ सालीं एका लंब्याचौड्या लेखानें आपल्या दिमतींतील 'सह्याद्रि' मासिकाचीं बरींच पानें चिथाडलीं. १९२९ नंतर समर्थांच्या तथोक्त राजकारणाची अब्रू बचावण्याकरितां श्री. करंदीकर या वादांत

शिरले. श्री. देव आणि कै. भट यांच्याहून निराळा असा करंदीकरांचा तृतीय पंथ आहे. श्री. करंदीकरांचा भर देवीचें एखादें स्तवन आणि circumstantial evidence–परिस्थितीचा पुरावा (म्हणजे स्वतःच्या सोईचा पुरावा) यावरच सर्वस्वीं आहे. परिस्थितीचा म्हणून कायदेशास्त्रानें जो पुरावा मान्य केला आहे, त्याला कांहीं मर्यादा आहेत. त्याला स्थळ, काळ, प्रसंग, व्यक्ति, वस्तु यांचीं बंधनें संभाळावीं लागतात व हा पुरावा अप्रत्यक्ष स्वरूपाचा असल्यानें तर हीं बंधनें अतिशय कसोशीनें संभाळावीं लागतात. श्री. करंदीकरांनीं आपल्या विवेचनांत या बंधनांची कदर बिल्कूल बाळगलेली नाहीं. या पुराव्याच्या शास्त्रीय कसोटीवर श्री. करंदीकरांचें विवेचन तपासायचें झाल्यास निष्कारण वेळ व जागा अडवावी लागेल. तथापि परिस्थितीच्या पुराव्याखेरीज त्यांनीं लोकांची या विषयांत दिशाभूल होण्याकरितां अंमलांत आणलेल्या कांहीं क्लृप्त्या थोडक्यांत सांगतां येण्याजोग्या आहेत.

जपाच्या मंत्रांत फेरबदल करणाऱ्या शिष्यांना समर्थ शिक्षा करीत असत हें सांगतांना समर्थांच्या चरित्रांत 'मंत्रभेद' हा शब्द आला आहे. जेथें तो शब्द उपयोगांत आणला तेथें जपमंत्राच्या शब्दांची फिरवाफिरव असा अर्थ स्पष्ट असतां, मंत्रभेद म्हणजे गुप्त कारस्थानांची वाच्यता करणारांना समर्थ शिक्षा देत होते, असें श्री. करंदीकरांनीं आपलें म्हणणें 'सह्याद्रीं'तील कागदखरावींत दाखल केलें आहे. हें म्हणणें सर्वथैव मुळाला सोडून आहे, इतकेंच नव्हे तर ज्या संदर्भांत त्यांनीं तें ओढून आणलें आहे त्या संदर्भाशीं तें मुळींच जुळणारें नाहीं. गिरिधरानें समर्थप्रतापांत अफझुलखानाला मारविल्याच्या विधानावर कागद डकवला. मंत्रभेद होईल, कारस्थान फुटेल, म्हणून कागद डकविला, असें श्री. करंदीकरांनीं म्हटलें आहे. एखादें कारस्थान सिद्धीस जाऊन सुमारें ४५ वर्षें उलटल्यावर त्याची हकीकत उघड सांगणें याला मंत्रभेद समजण्याइतके गिरिधरबुवा बावळे होते, कीं श्री. करंदीकर काविब्राज आहेत, याचा निर्णय वाचकांना सहज करतां येईल. समर्थप्रताप लिहिला गेला तेव्हां अफझलखानाच्या वधाला ६० वर्षांहून व शिव-समर्थांच्या अवतारसमाप्तीला ४० वर्षांहून अधिक वर्षें लोटलीं होतीं.

श्री. करंदीकरांचा 'सह्याद्रीं'तला हा लेख १९५१ च्या जुलईतला. त्यानंतर १९५२-च्या फेब्रुवारींत दासनवमीनिमित्त पुण्यास व्याख्यान देतांना त्यांनीं पुनः आपल्या

पूर्वीच्या वर्षांतील विचारांचा काथ्या कुटला व ता. २४ फेब्रुवारी १९५२ च्या 'केसरी'च्या अंकांतून त्याचें प्रदर्शन मांडलें. १९५१ मध्यें 'सह्याद्री'च्या द्वारें दासबोधाचा एकपंचमांश भाग राजकारणानें व्यापला आहे असें तावातावानें पुकारणारे श्री. करंदीकर १९५२ च्या फेब्रुवारींत तितक्याच आवेशानें बोलते झाले आहेत कीं दासबोधाचा एक अष्टमांश भाग राजकारणाचा आहे. १९५१ मधील ४० समासांच्या संख्येवरून माघार घेऊन १९५२ मध्यें श्री. करंदीकर २५ समासावर आले. त्यामुळें त्यांच्या मतांची प्रगति अंदाजण्याला हरकत नाहीं. त्यांनीं आपल्या मताचे पंचवीस समास कोणते हें निश्चितपणें दाखविण्याचें मात्र सफाईनें टाळलें आहे व दासबोधाबाहेरच्या वाङ्मयाची पुग्चुंडी वाचक–श्रोत्यांसमोर ठेवली आहे. ज्यांना दासबोधांतील राजकारणी समासांच्या संख्येबाबत हेलकावे घ्यावे लागतात, त्यांना असे हेलकावे चालण्यासाटीं जास्त छेडण्याऐवजीं मोकळे सोडणेंच बरें.

'प्रपंचीं जाणे राजकारण। परमार्थीं साकल्य विवरण। सर्वांमधें उत्तम गुण। त्याचा भोक्ता ॥ (१९:४:१७)' या ओवीला श्री. देवांनीं समर्थांचें राजकारण सिद्ध करणारा जणूं रामबाणच इतकें असामान्य महत्त्व दिलेलें आहे. 'राजकारण म्हणजे प्रपंचाचें श्रेष्ठ स्वरूप होय, असा बोध अनायासें या ओवीवरून होत आहे' (श्री समर्थ हृदय, पान ४०९). या ओवीबद्दल पुनः एकदां श्री. देवांनीं म्हटलें आहे: 'श्री समर्थांच्या अंतरंगाच्या ज्या हजारों खुणा त्यांच्या वाङ्मयांत आढळतात, त्यांपैकीं ही एक ओवी आहे. तिचा सरळ अर्थ असा : प्रप्रंचाचीं जीं अनेक अंगें आहेत, त्यांतील सर्वोत्तम अंग म्हणजे राजकारण होय...ज्यानें राजकारण केलें त्यानेंच खरा प्रपंच केला, इतका व्यापक बोध या ओवीवरून होत आहे...या ओवींत श्री समर्थ ध्वनित करीत आहेत कीं, राजकारण हें प्रपंचाचें मुख्य स्वरूप होय व तें भगवंताची विभूति आहे' (कित्ता, पान ४५८). पुढें राष्ट्राचा प्रप्रंच केला, राजकारण केलें हा सिद्धांत टाम झाल्याच्या विश्वासानें श्री. देव १९:९:२५ या ओवीच्या दोन चरणांकडे वळले आहेत : 'ऐसा पाहिजे कीं राजा। कैपक्षी परमार्थी ॥' शिवाजी राजा हा कैपक्षी परमार्थी राजा कल्पून श्री. देवांनीं 'महाराष्ट्र राज्य, मऱ्हाटे राज्य' हे शब्द ज्या ऐतिहासिक पत्रांतून आले आहेत, त्या पत्रांचे उतारे देण्याकडे आपला मोर्चा वळविला आहे.

वाचकांपुढें ‘प्रपंचीं जाणे राजकारण’ ही सगळी ओवी आहे. राजकारण म्हणजे प्रपंचाचें श्रेष्ठ स्वरूप असा अर्थ त्या तीन शब्दांतून अनायासें कोणत्या युक्तीनें निघतो, हें श्री. देवच जाणोत. ‘सर्वांमधें उत्तम गुण । त्याचा भोक्ता’ या चरणांतून हा अर्थ श्री. देवांनीं ओढून ताणून काढला आहे. सर्वांमध्यें हा शब्द केवळ प्रपंचार्थक नाहीं. गुण म्हणजे स्वरूप ही शब्दाचा अर्थ करण्याची एक नवी शिताफी आहे. समर्थांनीं प्रपंचाची उत्तम, मध्यम, अधम अशी वर्गवारी केली असती तर गुण म्हणजे स्वरूप या अनर्थाचेंहि स्वागत करतां आलें असतें. परंतु प्रपंचाविषयीं समर्थांच्या विचारसरणींत कुठेंहि आदर नसल्याचें दासबोधाच्या ज्ञात्यांना सांगायला नको. माणसें प्रपंचांत जन्मास येतात, प्रपंचांत वाढतात व स्वतःचा नवा प्रपंच वाढवितात, या स्थितीकडे लक्ष देऊन समर्थांनीं प्रपंच करण्याला अतिशय असंतोषानें संमति दिलेली आहे. प्रपंच करावा, पण त्याच्या मोहानें परमार्थाला विसरूं नये, असा त्यांच्या उपदेशाचा रोख दासबोधांत जिकडे तिकडे पहायला सांपडतो. तिसऱ्या दशकाचे पहिले पांच समास प्रपंचाच्या कथेकडे वेंचले आहेत व त्यांत प्रपंचाचें राजकारण हें श्रेष्ठ स्वरूप सांगण्याला समर्थांना भरपूर संधि होती. परंतु त्या संधीचा उपयोग न करतां समर्थांनीं शेवटीं ‘भगवंताला शरण जावें’ हें आपलें कायमचें मनोगत स्पष्ट केलें आहे.

११ : ३ व १२ : ९ हे दोन समास प्रपंचांतील दुःखांनीं गांजलेल्या माणसानें आपलें आयुष्य कसें सुधारावें, हा प्रश्न सोडविण्याकरितां लिहिलेले आहेत. ११ : ३-मध्यें सकाळीं उठल्यापासून माणसानें काय करावें, याचा पाढा वाचला आहे. पाठांतर, नामस्मरण, शौच, आचमन, मुखमार्जन, स्नान, संध्या, तर्पण, देवतार्चन, वैश्वदेव, फलाहार, संसारधंदा, आपल्या निर्वाहसाधनासंबंधांत खबरदारी, भोजन, भोजनोत्तर वाचन, चर्चा, एकान्तीं ग्रंथविवरण, अशी कितीतरी कर्तव्यांची माळ समर्थांनीं गुंफली आहे. हीं कर्तव्यें चोख बजावलीं तरच प्राणी शहाणा होतो’ असेंहि त्यांनीं सांगून टाकलें आहे. शहाणा होतो म्हणजे ‘सदेव’ होतो, हें कळण्यासाटीं ‘सदेव’पणाचें लक्षण नंतर सहा ओव्यांत स्पष्ट केलें आहे. या लक्षणाच्या ओव्यांत ‘प्रपंचीं पाहिजे सुवर्ण’ हें विधान आलें आहे. १२ : ९ मध्यें ११ : ३ सारखीच दिनचर्या रेखाटली असून तिच्यांत ‘सदेव’ (६) होण्याचें आश्वासन आहे. या

समासांत हरिकथाकर्तव्याचा विस्तार रामकथेच्या अनुरोधानें जास्त केलेला आहे. या दोन्ही समासांत 'राजकारण' या प्रपंचाच्या श्रेष्ठ स्वरूपाचा मागमूसहि सांपडत नाहीं. ज्या 'सदेव' शब्दानें प्रपंचांतून सुटण्याची दिशा सुचविली आहे त्या 'सदेवा'चीं लक्षणें १५ : ३ च्या ६ व्या व ७ व्या ओवींत आहेत. 'जेथें उदंड जाणीव' तें सदेवत्व, 'व्याप आटोप केल्यानें व धके चपेटे सोसल्यानें मनुष्य सदेव होतो' असा त्या ओव्यांचा अर्थ आहे. १५ : ३ मध्यें 'राजकारण' शब्द आहे (१४). नेमस्त कळेना वचन। नेमस्त नये राजकारण। उगे चि धरिती थोरपण। मूर्खपणें' या ओवींतलें राजकारण वचनाच्या (बोलण्याच्या) सोबतीनें आलें असल्या-मुळें त्याचा अर्थ 'प्रपंचाचें श्रेष्ठ स्वरूप' असा होत नाहीं. पुढें या समासांत शहाणे व्हावें म्हणून समर्थांचा आग्रहपूर्वक उपदेश आहे. शहाणपणा नसेल तर सांदीकोपऱ्यांत माणसाला पडून रहावें लागतें व त्यामुळें बायकादेखील शिव्या देतात. संपत्ति आवडते तर शहाणपणावांचून संपत्ति मिळणार नाहीं; पण शहाणपणासाठीं कष्ट करावे लागतात. कष्ट पडले तरी बेहत्तर, पण शहाणे व्हावें इत्यादि मजकूर आहे. १५ : ३ मधील संपत्तीचा 'प्रपंची पाहिजे सुवर्ण' या वचनाकडे संबंध लागतो.

'करंट्या सावध पाहीं। सदेव होसी॥ (१२ : ९ : ६)' या ओवींत करंटा व सदेव हे दोन शब्द एकत्र आले आहेत. १९ व्या दशकाचा ३ रा समास करंटलक्षणाचा असून त्या पुढचा सदेवलक्षणाचा आहे. 'जितके कांहीं उत्तम गुण। ते समर्थाचें लक्षण' अशी या समासाची शेवटची ओवी असून 'अवगुण तें करंटलक्षण। सहज चि जालें॥' असा तिचा उत्तरार्ध आहे. १६ व्या ओवींत 'उत्तम गुणविशीं रिते। ते प्राणी करंटे॥' असा त्या उत्तरार्धाचा भावार्थ आढळतो. या समासांत 'उत्तम गुण' हे शब्द एकूण सात वेळां आलेले आहेत. त्यांचा एकदां उच्चार झाला कीं, कांहीं उत्तम गुण दाखवायचे व पुनः जे मध्यंतरीं वर्णिले ते उत्तम गुण होते, असें पुनः श्रोत्याच्या मनावर ठसवायचें, हा प्रकार दासबोधांत पुष्कळ वेळां दृष्टीस पडतो. तोच प्रकार येथें अनुसरला आहे. या प्रकाराची खात्री पटण्याकरितां १२ : १० हा समास पहावा. तेथें 'उत्तम गुण स्वयें घ्यावे (३)' असें म्हटल्यावर १५ व्या ओवीपर्यंत त्या गुणांचें प्रवचन आहे व १५ व्या ओवींत 'ऐसा उत्तम गुणी विशेष। तयास म्हणावें पुरुष' याप्रमाणें गुणी पुरुषाची प्रशंसा गाइली आहे.

'प्रपंचीं जाणे राजकारण' या ओवीच्या उत्तरार्धातील ('सर्वांमध्यें उत्तम गुण। त्याचा भोक्ता ॥') उत्तम गुणाचा अर्थ पूर्वोक्त प्रकाराकडे लक्ष देऊनच करायला पाहिजे.

'प्रपंचीं जाणे राजकारण' या चरणाचा अर्थ प्रपंच यशस्वी होण्याकरितां लागणारें शहाणपण किंवा चातुर्य जो जाणतो (तो सदेव) असा होतो. प्रपंचाचा उत्तम गुण म्हणजे विशिष्ट स्वरूपाचें प्रपंच यशस्वी करणारें चातुर्य, हें ११ : ३ व १२ : ९ या समासांच्या विवेचनांत स्पष्ट झालें आहे. तेथें जीं कर्तव्यें सांगितलीं आहेत तीं योग्य प्रकारें (आळस, झोप, दुश्चितपण इत्यादि दोष झाडून झटकून) पार पाडणें हें या चातुर्याचें स्वरूप आहे. शौच, मुखमार्जन, स्नानसंध्या, देवतार्चन, फराळ, वैश्वदेव, भोजन हीं कर्तव्यें सोडून बाकीचीं बरींच कर्तव्यें चातुर्य व राजकारण या नांवाच्या समासांतूनहि सांपडतात. यामुळें प्रपंचाचें श्रेष्ठ स्वरूप किंवा अंग म्हणजे येथील 'राजकारण' ही कल्पना समर्थांच्या शिकवणीचा संदर्भ न सोडल्यास पूर्णपणें निराधार ठरते. प्रपंच सफळ करण्यास लागणारा उत्तम गुण कोणता तर राजकारण व राजकारण म्हणजे काय तर ११ : ३, १२ : ९ यांत किंवा अन्यत्र सुचविलेलीं व सांगितलेलीं नानाविध कर्तव्यें होत. यापेक्षां जो निराळा अर्थ समग्र दा स बो धांतील एका विधानाच्या द्वारें अतिगंभीरपणाच्या डौलानें व गौरवानें केला जातो तो त्याच्या त्याच्या श्रद्धेचा—समर्थांच्या अंतरंगांतला नव्हे—असें म्हणावें लागतें.

१९ : ९ मधील 'ऐसा पाहिजे कीं राजा। कैपक्षी परमार्थी' या विधानांतून काढलेला 'शिवाजी राजा व महाराष्ट्र राज्य' हा अर्थहि मागील विधानाच्या अर्थासारखाच अग्राह्य आहे. प्रस्तुत समासाचें नांव राजकारण असून त्यांत समुदाय राखण्याला अवश्य असणाऱ्या कर्तव्यांचा विचार सांगितलेला आहे. 'धर्माच्या, देवांच्या, ब्राह्मणांच्या, अनाथांच्या रक्षणार्थ महाराष्ट्रराज्याची स्थापना झाली पाहिजे अशी त्यांना (समर्थांना) चिंता लागली होती' (श्री स म र्थ हृ द य, पान ४५८) या प्रस्तावनेच्या भालदारी ललकारणीनें या 'कैपक्षी परमार्थी राजा'ची ओवी श्री. देवांनीं वाचकांसमोर सोडून दिली आहे. नंतर लागलीच मोठ्या समाधानानें म्हटलें आहे: 'परमेश्वरानें त्यांचें कोड पुरविलें!' (कित्ता) या ओवीचरणाच्या अर्थाबद्दल श्री. देवांनीं कसलीच मल्लिनाथी केलेली नाहीं. अर्थाची फोड न करतां त्यांनीं एकदम शके १६१८–१९ म्हणजे समर्थांच्या पश्चात् पंधरासोळा वर्षांनीं लिहिल्या

गेलेल्या कागदापत्रांकडे धाव मारली आहे. महाराष्ट्र-राज्याची स्थापना झाली पाहिजे ही समर्थांची चिंता सिद्ध करण्याकरितां त्या कागदपत्राच्या उताऱ्यांचा श्री. देवांना आधार घ्यावा लागला यावरून समर्थांच्या व त्यांच्या शिष्यांच्या वाङ्मयांत वरील चिंतेचा पाटपुरावा करणारीं वचनें नाहींत हें कळायला कठिण नाहीं. समग्र दासबोधांत समर्थांनीं स्वतःस लागलेल्या चिंतेचा उद्गार एकदांच व तोहि संदिग्ध शब्दांच्या द्वारें कां काढावा असाहि प्रश्न उद्भवतो. कारण भय, संकोच, संदेह हा समर्थांचा स्वभाव नाहीं. चिंताच असती तर तिची वाच्यता त्यांनीं वारंवार व ठासून केली असती. समर्थांना भक्तिपूर्वक परमार्थाच्या उद्धाराची व प्रसाराची जी चिंता वाटत होती ती त्यांच्या वाङ्मयांत सर्वत्र उत्कटपणें पसरलेली आहे. अर्वाचीन समर्थभक्तांनीं महाराष्ट्र-राज्य-स्थापनेची जी चिंता समर्थांच्या गळ्यांत नव्यानें बांधली आहे ती मुळांत समर्थांची नसल्यानें तिला त्यांचा वाङ्मयांत आधार सांपडूं नये हें सरळच आहे.

# सूची

अक्का – (शिष्यीण) १७
अखंडध्यान – [१४ वें दशक] २०९, [–१४ : ८ ध्यान, दंडक, वगैरे] २१६
अखंडयोग – २३७
अग्निनिरूपण – [१६ : ५] २३२
अजपानिरूपण – [१७ : ५ – २१६०० वेळां होणाऱ्या श्वासांचा जप] २४०-४१, २८१
अजामीळ – १०७
अंडज – १७४, १८३
अत्र (अत्तर) – २५८
अत्रि – १२१
अद्वैत – (निर्गुण शुद्ध कल्पना) १४२, (निरूपण) ३१२
अधोर्ध-निरूपण – (अध : ऊर्ध्व, गीतोक्त अश्वत्थ वृक्ष) २२५
अध्यात्म – (मायाब्रह्म वोळखावें) १३७
अध्यात्मसार – (कविता) ३२६, ३३८
अंतरत्याग – १२४
अंतर्देव – [१८ : ८ – अंतरात्म्याचें वर्णन] २५३
अंतरनिष्ठ – २२३, २३५, २४६
अंतरपरीक्षा – १९४
अंतरभ्रष्ट – २४६
अंतरभाव – (निदिध्यास, जिव्हाळा) ४२, (–वाङ्मय) ५३, १०९, ३९७
अंतरशृंगार – २५१, ३३२
अंतरवृत्ति – १४१
अंतर्हेत – (अंतस्थ हेतु) ३१७
अंतःकरण – १७२, १८२, (–विष्णु) १९१, २४३
अंतरात्मा – १५१, १८०, (–क्षेत्रज्ञ, क्षेत्रवासी, देही कूटस्थ) १८१ {–आकाश / मोठा चितारी} १८२, १८३, १८६, १८८, [–विवरण ११:८] १९०, २०२, २१६, [श्रेष्ठ– १५:३] २२१, (वडील—तो चेतल्यानें महिमा वाढतो) २२२, २२३, २२८, (बहुगुणी) २३४, २३५, २३७, (तत्त्वबीज) २३९, २४१, (सर्व देवांचें मूळ) २४६, २४७, २६०, २६३, २६४, २६५, २८८, २८९, (–अशाश्वताचा मुकुटमणि) २९०,

(स्त्री पुरुष नपुंसक नांवें हा सृष्टीचा आरंभ) २९२, ४०३
अनंतव्रत – १४८
अनु(नि)र्वाच्य – १२५, [६ : १०] १३४
अनुमाननिरसन – [९:५] १६६, [१७:४] २३९,
अप्रत्यय – (अन्याय) २०५
अप्रमत्त – (सावधान) ३०८
अफझ(झु)लखान – ५७, ५९, [१८:६ चा निराळा खुलासा] ६०, ६१, २५०, ३२०, ३३१, ३३२, ३३३, ३७९, अफजल्या – ३७९, अब्दुल्या – (नामक यवन) ६०, ६१
अभिमान – (करुणाष्टकें – ममत्व) १०१, (– विडंबन) १०२, (विश्व, तैजस, प्राज्ञ, प्रत्यगात्मा) २४४
अमरावती – १११
अर्चनभक्ति – [४:५] १०८
अर्धनारीनटेश्वर – २०३, २३७, २३९, २६७, २९१
अराजक (ता) – (देवाधर्मांचें) २१, १८४
अरे तर कारे – ३१२
अवतार – (दासबोधाचे) ५५, (देवळें, मूर्ति) २३७, (चरित्रें) २३८, (थोर सामर्थें बोलिजेती) २६६, २८८, २८९, ३२६, (विष्णूचे, धर्मस्थापनेचे नर) ३३३
अवतारी – (विवेकें बहुत पैसावले) २२१
अवधूतगीता – ८०, १४५
अव्याकृत – (मूळमाया) १८०, २०३
अवस्था – (जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या) २४४
अविद्या – १२२, (व्याख्या) १३२, १५१, (मूळमायेचा विस्तार) १५३, १५५
अविंध – १०२
अष्टधाप्रकृति – १५५, १८३, १९६, २४८, २९२
असच्छिष्य – ११६, ११८, २८०
असत्य – (माया, पाप) १८१, २५०
असद्गुरु – ११४, ११६, ११८
अस्मानी सुलतानी – २१
अहं – (ऐसी स्फूर्ति माया) १५३
अहंकार – (निश्चयाचा अभिमान) २४३, (वृत्ति) २७७, (मानवी) २९४
अहंता – (मूळमाया-पंचभूतात्मक सूक्ष्म वायु) १५५, (अभेदामाजीं वाढवी भेदा) १६३, २२७
अहंभाव – (मीपण देहबुद्धि) २८०
अहंस्फुरण – (मीपणाचें स्फुरण) २७६, (हें मायेचें आद्यस्थान) २८२, (प्रयत्न) ३१६

अहमात्मा – १२५, २९२
अज्ञान – १२२, (मी कोण ऐसें नेणिजे) १३८, (आकाशाचें शून्यत्व) १५४, १५६, १६८, (नेणें जीव – वासनात्मक जीव तो) १८३, (वैर वाढविणें) २१५, २४४, (म्हणिजे नेणणें) २६३, २९८
अज्ञान दशा – ४०१
आई – (निरपेक्ष ममता) ९८
आकाश – १५०, (–७ गुण) १५५, (सर्वव्यापकता) १६२, (ब्रह्म) १६६, १९७, (–अंतरात्मा) २०४, (–ब्रह्म) २०५, २२९, २४३, (– अंतरात्मा) २८९, (व ब्रह्म एकच) २९३
आठ देह – १५८, (–शरीरें) १९६, २९४
आठ सृष्टि – (कल्पनेच्या) १३१, २९२
आणा – १०१
आत्मदर्शन – [८ : ८] १५९
आत्मनिवेदन – १११, ११२, १२०, १२१, १२७, १२८, १५९, १६३, १७८, [१२ : ५ जुन्या दासबोधाचा सहावा] १९६, १९७, २०३, २१७, २४४, २५०, (जड, चंचळ, निश्चळ) २८२, ४०१
आत्मनिवेदनी क्रिया – ११२
आत्महत्या – ९२, २१०, ३२५
आत्महत्यारा – (आत्मघातकी) ४१, ९२, १२१, १५८, २२२, २७७
आत्मा – १३४, (अंतरात्मा) १८०-१८२, [विवरण १३ : ९ आत्म्याचें सुखदुःखभोक्तृत्व] २०८, [आत्मी-आत्मारामनिरूपण १६ : ८ – आत्म्याचा देहद्वारें खेळ] २३४, २३८
आत्मा-गुणनिरूपण – [२० : ६ – पृथ्वी, ८४ लक्ष योनी, याचा आत्म्याच्या अनुरोधानें विचार २० : ७ – जड, चंचल, निश्चलाचा विचार] २६५
आत्मानात्माविवेक – [१३ : १] २०३, २०६
आत्माराम – (ग्रंथ) ५२, ८८, १५४, (सकळां पाळी) २३६, २६४, ३४८, ३९९, (चें तात्पर्य) ४०१
आत्मारामस्वामी (एक्केहळ्ळीकर) ५२, ६३, ६४, १४०, ३५६
आदित्य – (नित्यवंदनाचें दैवत) १०९
आदिनाथ – १२१
आदिनारायण – (ब्रह्मांतील पहिलें चंचळ – संकल्पाचें स्फुरण – तेंच मूळ माया) २०४
आदिपुरुष – २५३
आदिलशाही – १४, १५
आदिशक्ति – २३७
आतषबाजी – २३२
आनंदमूर्ति – (ब्रह्मनाळकर) १८
आनंदवनभुवन – (वाङ्मय) ४४, ३७८

आनंदावभास – २४४
आप – १९७, [निरूपण – १६ : ४] २३२, २४३
आपोनारायण – (शतश्लोकी) २३२
आशंका – (सूक्ष्म) १५१, [९ : १ – ब्रह्माच्या विशेषणांचें स्पष्टीकरण] १६२
आसुरी संपत्ति – ९५
आळस – १४७, १५६, १८५, १९३, २००, २१०, २६१, २६२, २८०, ३१५, ३१७
आज्ञापत्र – (वाङ्मय) ४१६
ओव्या १४ शतकें – ३६९
औरंग्या – ३७९
इच्छा – १७४,१८०,२४४
इंद्र – १११,२२६
इमारत – (वाङ्मय) ४१६
इहलोक – (संचितार्थ) २५२
इहलोक-परलोक – १९५
ईश्वर – १५२,२०३, (देणें ईश्वराचें) २५१,२५४,३३३
ईश्वरभाव – (भ्रम) १७६
ईश्वराचा अंश – २९१,३३३
ईश्वरी पुरुष – १९८,२९१
उत्कट – (स्वीकारावें) २५८
उत्तम पुरुष – (त्याचीं लक्षणें) ९३, ९४,९६, (उत्तमः पुरुषस्त्वन्यः) १८१, [१२ : १०] २००, (भला-माहाभला – माहानुभाव) – २०१, [१८ : ६] २५०, २७०, २७२, (प्रकरण) २९७, ३२२
उत्तरगीता – ८०
उत्तरायण – १४८
उद्भिज – (वायूपासून) १७४
उद्धवसुत – ६२
उधार – (जन्मांतरीं होणार तें) १३४
उन्मन – (तुर्यारूपज्ञान) १४२,१८१
उन्मनी – १०८,१४१, (विज्ञान) १९५
उपदेश – [५:४] ११९, [११:९] १९०
उपनिषदें – ८०
उपाधिलक्षण – [१९ : ८ पारमार्थिक लोकोद्धाराचा उद्योग] २६०
उपासना – (ज्ञानाहून कनिष्ठ) १३१, १४७, (भ्रम) १७६, (व ज्ञान यांत भेद नाहीं) २६४
उभारणी – [सृष्टीची १३:३] २०४
उंबरज – १५
ऊर्ध्वगति – (विचारांची) २३९, (–गतीनें विचार) २६६
ऊर्ध्वमुख – १९९
ए(ये)कंकार – १२२, २४०, ३१०, ४०८
एकनाथ – ७९, ८०, १००, ११८, १४४, १८९, २३१, २३४, ३४३, ३५०

एकनाथी भागवत – ७९,११८,१४४
एकनाथी भावार्थ रामायण – २१३
एकवीससमासी – (दासबोध) ५३,५४, (ही दासबोधाची पहिली आवृत्ति) ५५, ६७, (जुना दासबोध) १०२, १०५, १०७, ११३, ११६, १२६, १४९, २१४, २१८, २४०, २५४, २७४, २८०, ३१३, ४०६
एकांत – २६०, २६६
एकांतलाभ – २५४
एकीकरण – (मराठ्यांचें) ३४६, ३४७
ऐतिहासिक प्रस्तावना – (राजवाडे लेखसंग्रह भा. १) ३४२
ऐतिहासिक वृत्त, चर्चा, वगैरे – (राजवाडे संशोधन मंडळ, धुळें) ३५१
ॐकार – १९६, २०४, २१२ ओंकार – १५३
ओनामा – १३०
ओवी (व्या) शतक – ११२, (११ वें) २५३, २७४
ओवी-सहा शिष्यांची – [१७:६:२०] २४१
कपटविद्या – (राक्षसांची) १७५
कपिल – (देवहूती) ८०
कर्कश – (क्रकल) २३३
करुणाष्टकें – (वगैरे) ६, ४४, ८७, १०१, १०२, १८२, २३१, २३३, ३०५
करंटपण – २००, (जेथें नाहीं उत्तम तें) २५७
करंटपरीक्षा – [१८:५] २४८,२७०, ३११, ३३२
करंटलक्षण – [१३:३] २५६, (अवगुण तें) २५७, २७०
करंटा – ९६, ११६, १२६, १६५, २१८, २५२, २७८
करंदीकर, श्री. ज. स. – ४२२,४२६, ४२७
कर्नाटक – १४,५९
कर्म – (ज्ञानोत्तर) २८३
कर्मनदी – १८९
कऱ्हाड – १२,३२०
कल्पना – (तिचा एक गुण) १३९, १४०,(जन्माचें मूळ तसेंच भक्तीचें फळ) १४२, (–शुद्ध) १४२
कल्प-प्रबोध – ३०८
कल्पांत – १७५,२३५
कल्याण – (समर्थशिष्य) १६, (गोसावी शिष्य) ६१, ६४, (स्वामी-गोष्ट) २११
कल्याणप्रत – [६:१० मध्यें ओव्यांची भरती] ६७, [७:१०] ८१,११६, १२६,१३५,१३६,१४९
कलियुग – (४७६० वर्षे = शक वर्ष १५८१) ५७,१२८,२१६
कवित्व – ४९, (–कला) २१२,२९९,

३५३,३५७
कविर्हरिरन्तरिक्षः – नृदेहमाद्यं – ८०
कहाणी [१३ : ५– सृष्टीच्या उत्पत्तीची]
२०४, २९६
कात्यायनी – २३३
कामत – (रामजी) ३५०, ३५१
कारण – १६६, (देह) २४४
कारखाना (ने) – (वाङ्मय) ४१५
काश्मीर – २७
काळवर्णन – [१२ : ८ – मूळमायेचा
अंश = काळ] १९८
कीर्तन – २९९, ३१३
कीर्तनभक्ति – [४ : २] १०६
कर्तव्य – (व दुःखध्वंसाचा मार्ग) ३४५
कुतुबशहा – ३२३
कुबडी (संकेत) – ३३९,३४०
कुविद्य – २७८
कुविद्या – ११७, २७०,
कुविद्येचा तमोगुण – ९१, (देवद्रोह –
निंदा – फोड) ९३, ९५, ९६
कूटकथा – २९६
कूर्म – २३३
केशवस्वामी – (भागानगरकर) १८
केसरी – ४२७
कृत्रिम – ३१७, (कपट) ३३५
कृष्ण – (दशावतारांतील) २१८
खंडेराव – (दैवत) ९८
खंडोबा – २४६
खेचर – (जीव) २२७
गर्भगीता – ८०
गर्भवास – ९७
गल्बला – गलबला – २०७, २२०,
(कांहीं गल्बला कांहीं निवळ, ऐसा
कंठित जावा काळ) २६०
गागापंडित – १४०
गांवकी – ९४
गिरिधर (स्वामी) – १७, ६२, ८७,
३३९, ३४०, ४२७
गीता–८१,८३,८४,९९,११०,१११,
(नानाशास्त्रं पठेल्लोकः शैवशाक्ता-
गमाद्या – पंचमान) ११९, १२७,
१२९, १३०,१८१, २०६, २२६,
२९०,३०८
गीतारहस्य – ४२४
गुंडगिरी – २६१
गुढें – (धावपळ) २२
गुण–(तम, रज, सत्त्व, शुद्धसत्त्व) २४४
गुणभूतनिरूपण – [१६ : १० – पंचभूतें
व त्रिगुण ] २३५
गुणमाया – १५३,१६७
गुणविकार – २३७
गुणसाम्य – २३७,२६७
गुणक्षोभिणी – १६६, (क्षोभ) १६७,
(क्षोभिणी) १९७, (निश्चळांतलें
चळण = वायु) २०४, २६७
गुरु – ११५, ११८, (– स्त्री व भ्रतार

शिष्य) २५८,२७०,(नीच यातीचा नसावा) २८५, २९९
गुरुगीता – ८०,८१,१४५,१४९
गुरुद्रोही – ४१,९१
गुरुनिश्चय – ११३
गुरुबाजी – ९६
गुरुलक्षग – ११३
गुरुशिष्य-लक्षण – ११७
गृहस्थाश्रम – २१५, ३५२
गोंदजी – ३२०
गोब्राह्मण – ३४९,३५०
गोब्राह्मणप्रतिपाल – ३४६, ३४८
गोमांसभक्षक – ३५०
गोरक्ष – १२१, २१२
गोरक्षग – ३५०
गोवध – ३५०
गोष्ट – (देहात्मयोगांतील जेवणाची) २०७
गोसावी – ४२३
गोहत्या – ३५१
गोहत्यारा – ९२
गौडविद्या – १७४, २७६
ग्रंथ – [व्याख्या ७ : ९] १४८
ग्रंथभावार्थ – ३३९
ग्रंथराजभावार्थ – ३३९, ३४०
ग्रंथान्वय – ३३९,३४०
ग्रामणी – २१६
घंटाकाश – १४२, १५९
घुमटमशीदी – ४१६
घोर – (मंद्रस्वर) २४१
चकमक – (विस्तव उत्पन्न करण्याचें साधन) २३२
चंचळ नदी – १८९
चंचळ लक्षण – [१५ : ५ – पंचभूतें – त्यांचा अन्योन्य विरोध] २२३
चत्वारजिनस – [२० : ५ – सृष्टीच्या चार घटक वर्गांचा विचार] २६५
चतुर्थमान – ८, २९०, ३७३
चतुर्दशब्रह्म – (७ वें दशक) १३६, [१४ ब्रह्में–७ : ३] १३९, १४०
चंद्रमा – १८२
चरेगांव – १५
चलन – (जाणीवेचें मूळ) १६७
चळण, वळण, प्रसारण – २४३
चळवळ – (अधिष्ठान भगवंताचें) २६४, २६५,
चळाचळनिरूपण – [१०:१० – सृष्टीची उत्पत्ति व अंतरात्म्याची महती] १८०
चांगदेव – ९०
चातुर्य – ५१, १८७, २०८, २१४, (अंतरंग) २१४, २१८, २१९, २५०,(बीज) २५१, २५५, २७०, २९९, (आणि वस्त्र यांची तुलना) ३०६, (बीज) ३०६, ३०८, ३११, (नाना) ३२१, ३२२,

३२८, (बीज) ३३२-३३, ३३४, ३३७
चांभार-शिष्य – ११५, २५८, २८५, ३३४
चामुंडा – २३३
चार आत्मे – १५९, २९५
चार खाणी – २९५, (जीवांचे चार प्रकार) २९६
चार देह – (विराट, हिरण्य, अव्याकृत, मूळप्रकृति) १६६, २४४
चार वाणी – १२०, १८३, २९५
चाळिशी – (चष्मा) १०३
चिदाकाश – १५९
चौदा पिढ्या – २२४
जगजीवन – [१७ : ७ – जीवनाचे चढ-उतार–] २४२
जगज्जोती – [अंतःकरण एक : १० : १] १७१, जगजोति – (वायूचा प्रकार, अनंत देवतांची जन्मभूमि) १७३, (पुरुष) १७९, (अवघ्या जगास वांचविती) १७९, (सर्वांतरात्मा) १८०, (सप्तसमासी) १८२, (समदर्शी) १८३, १९०, १९१, २२६, (जग्गजोति) २९१, ४०३
जगदांतर – १९४, २१९, २२३, २२६, २४१, २५५, २५६, ३०१
जगदाळे – ४१९, ४२६
जगन्नायेक – (जगा वर्तविता) २०६
जंगम – ३१
जंवर – (नांव) ३५०
जडत्व – (आकाश व वायु एकच) १५४
जदुनाथ सरकार – ३२३
जनक – १२१, १९९
जन्मदुःख – [निरूपण ३ : १] ९७
जन्मसावित्री – २१८
जनस्वभावनिरूपण – [१८ : ७] २५२
जनस्वभाव किंवा बहुधा गोसावी – ४१०
जनार्दन – (जनांतला) १९४
जनीं जनार्दन – २४८
जयरामस्वामी – (वडगांवकर) १८
जळचर – (जीव) २२७
जशास तसें – ३११, ३१२
जाखमाता – १०८, २८७
जागृति – १३५, २४४
जाणणें – (स्मरण) १६५
जाणता – (विष्णु) १७४, १८६, (देवाचा अंश) २४२, (उत्तमादि तीन प्रकार) ३१४, ३१५
जाणता-नेणता – (ब्रह्मदेव) १७४
जाणती कळा – १७२, १७३, १८२
जाणतेपणा – (वायूचा, ईश्वर) १७४, ३१४
जाणपण – ३१५
जाणपण-निरूपण – [९ : ४] १६४
जाणीव – (नेणीव) १६६, १७२, (नेणीव मिश्रण) १७२, (वायूंतली

हें ईश्वराचें लक्षण) १७९, (सत्त्व-गुण) २६४, (नेणीव – रजोगुण) २६४,२९४,३२६, (जाणीव कळा) १६८, २९१
जाणीव यंत्र – १६८
जादू – १७५
जादुगिरी – १३२
जारज – १७४, १८३
जिकडे जग तिकडे जगन्नायेक – २५९
जीव – (देव नव्हे) १५१, (अविद्या गुणें बोलिजे) १५२, (पुरुषांचा) २३४, (स्त्रीपुरुषांचा एक) २३८
जीवपण – (मी जीव हा संकल्प) १५७, २९८
जीवशिव – २०३
जीवात्मा – १५९
जीवी – (स्त्रीचा जीव) २३४, (स्त्रीचा चेतनांश) २७६
जेथील तेथें चि गोड – ३१३
जोगी – २४, ३१, ९८
जुनाट पुरुष – ३१७
झोटिंग – ३२, १०२, १७४, २८८
झोप – २८०, ३१५
झोल – (नांव) ३५०
टिळक (लोकमान्य) – ४२४
टोणपसिद्ध – [१७ : १० – विवेकहीन तो टोणपा – जो विचारी तो सिद्ध] २४४, २७०
टोणपा – ९६, (जेथें परीक्षेचा अभाव) २४५, २४८, २७८
डेमिंगसाहेब (रे.) – ४२४
डोमगांवचा पोथा – ६७, (एकवीस-समासी प्रत) ६८
तत्त्वनिरूपण – [१७ : ८ पंचीकरणाचा विषय] २४३
तत्त्वान्वय – (१६ व्या दशकाचें दुसरें नांव) २३०
तत्त्वें – (२८,३२,५० व ८२ यांचें गणित) २४४
तनुचतुष्टय – [१७ : ९ अवस्था, अभिमानादि चौकड्या] २४४
तळवळकर – (वामनराव) ५७
ताटस्थता – ताटस्थ्य – १४३,१४४
ताप – [आध्यात्मिक ३ : ६, आधिभौतिक ३ : ७, आधिदैविक ३ : ८] १०३, १०४
तुर्क (तुरुक) – ३०,११५,२८५,(गुरु) ३३३
तुर्की धर्म – २१५
तुर्या – (अवस्था) ४०, १२१, १४१, (रूपज्ञान) १४२, (स्मरण) २२७, २४४, २५३
तुळजाभवानी – २४६, २५१, ३२६
तुळजामाता – ३७५
तेज – (आकाश-वायूचा संघर्ष) १५३, (बुद्धि, उदान, नेत्र, चरण,

दर्शन) २४३
तें गे तेंचि – २०५
तैजस – २४४
त्रिगुण – १६६, २०४, (जाल्यांत-भूतांत आले) २३५
दत्त – २१२
दंडकध्यान – २१७
दंडकर्ते – ३१
दंडकार्य – ३२४
दशदेह – २९४
दक्षिणायन – १४८
दानव – २६५, २९१
दामाजी – ३४३, ३४६, ३४८
दावलमलक – ३०, ११५, २१५, ३३३
दासबोध – (नांवाचा खल) ५३, (७वें दशक) ५४ – ५५, (अवतार – ६ दशक – हा पहिला अवतार) ५५, (७ वें दशक हा दुसरा अवतार) ५५, (२० दशकी – हा एकवीस समासी जोडून चौथा अवतार) ५५, (रचनाकालाविषयीं तर्क) ५७, (१८ : ६ – नांवाची कथा) ५८, (समाप्ति शके १६०३, मार्गशीर्ष, डिसें. १६८०) ६१, (राजनीतीचे सात समास) ६२, (लेखन सज्जनगडावर झालें) ६२, (रचनेची कालगणना) ६३, (वैराग्यप्रकरणाची जलसमाधि) ६४, (समासांतील विषयान्तर, पुनरुक्तीची पाहणी) ६८-७०, (दशकांच्या संगतीची परीक्षा) ६९, (रचनेचा फेरविचार) ७४ - ७८, (स्वतंत्र समास रचल्याच्या खुणा) ७८ - ७९, (गीतेचे आधार) ८१ - ८३, (२० दशकी) १०७, १३५ - ३६, (उपसंहार) २६८, २७३, (गुलाम बनलेल्या लोकांसाठीं, राजवाडे) ३४४, (एकवीस समासी – जुना) ४०६
दास्यभक्ति – [४ : ७] १०९
दासविश्रामधाम – ५२, (दासबोधलेखनाचा वृत्तान्त) ६३, १४०, ३५६
दिनकरस्वामी – २, १६, ५८
दिनचर्या – १९९
दिनायतराव – १५, ३५५
दिव्य – २३२
' दीर्घ सूचना ' – १३, १८८, १९३, २४७, २५२, २५६
दुरात्मा – (म्हणजे दुरी आत्मा) २२८
दुश्चीत – ९६, [३ : ६ मोक्षमार्गीतील विघ्न] १०३-१०५, २००, २७०, २७८ (– पण) १५६, १८५, २८०
देऊळ – ( देवभक्तीचें केंद्र ) ११, (आकार, मूर्ति, व्यक्ति) २२३, (मूर्ति – अवतार) २३७, (व्याख्या) १२७, (कल्पनानिर्मित) १३०, (मानवाचें हीनत्व) १३२, (कल्पना-

रहित; चळणरहित) १५१, (मूळमायागुणें) १५२, (–अंतरात्मा) २२३, (द्यावें, देव शब्दावर कोटी) २५२, २६७, (मीमांसा) २८८, २८९
देवकारण – (प्रकरण) ३९–५१, ४०, (समर्थांचें ध्येय) ४०, ४१
देवदत्त – २३३
देवदर्शन – [८ : १ – देवाची बहुविधता] १५०
देवद्रोही – ४१, ९१, ३४९
देवदैत्य – ३१५
देवबलात्कार – [१७ : १ – देव माणसाला आपल्या भजनीं लावतो] २३६
देव, शं. श्री. – ५५, ५६, ५७, ६५, ६७, ६८ (दासबोधविषयक कल्पना) ६५, ७०, ७४, ४२२, ४२३, ४२४, ४२५, ४२६, ४२८, ४२९, ४३१
देवशोधन – (सहावें दशक) १२५, [६ : १] १२६, २८६
देह – ४६, (पराधीन) १९९, (इच्छेचे, शापाचे, बाजीगरीचे, वोडंबरीचे) २२७, (= देऊळ) २६८, (अस्वाधीनता) २७५, (मी) २७७
देह आशंका – [१०: २ – ब्रह्म-मायेसंबंधी विचार] १७२, [शोधन- १० : ३ – ब्रह्ममायाभूतादिकांचा विचार] १७३
देहदुर्लभनिरूपण – [१८ : ४ – देहाची उपयुक्तता] २४८
देहबुद्धि – १२५, १३१, (अहंकार) १३७, १४५, १५७, १८६, (देहाचें थोरपण) २७७, २८०, २८२
देहात्मनिरूपण – [१७ : ६ – देहद्वारा-आत्म्याचें भोक्तृत्व] २४१
देहान्त – [७ : १०] १४८, [निरूपण- ९ : ८ – पुनर्जन्माची मीमांसा] १६९
देहाभिमान – १२१, १२८, १३८, १५७, २२९
देहेमान्य – [१९ : ५ – देहाचा उपयोग व नाना देव] २५८
देहेक्षेत्र – [२० : ८ - देहरूपी क्षेत्राचा विचार] २६६
दृश्य – १२०, १२२, [निरसन – ६:८] १३२ (दृष्टीचें देखणें) २४५
दृश्य व ब्रह्म यांची तुलना – १७०
द्वैतनिरसन – [७ : ५] १४१
धन्य – (जो विवेके पवाडे) २२७
धर्म – (कर्तव्य व दुःखध्वंसाचा मार्ग) ३४५, (हिंदु) ३४५
धादान्त – २१७, २२८
धीट – २१२, ३५७
धीटपाठ – २१३, ३५७, ४०६
धुरीधरण – ३४६, ३४७, ३४८, ३४९

नकार – (शून्याचें लक्षण) १५६
नमस्कार – [वंदनभक्ति – ४:६] १०८
नर – (तोचि नारायण) २६५,२९६
नरकवास – ११७
नरदेह – ४६, ४८, [स्तवन १:१०] ९०, १०५, २६०, (निंदा) २७४, (प्रशंसा) २७५, (पापपुण्यसमता) २७६, (स्वाधीन) २७७
नरनारी – (शिवशक्ति) २३८
नवरसिक – ३५३, ४०२
नवरसिकनिषेध – २१४,३१२
नळे – २३३
नाना उपासना – [१६ : ९ – अंतरात्म्याचें वर्णन] २३५
नामरूप – १२७, १२८, (१३ वें दशक) २०२
नारद – १२१
नित्यनूतन – १९२,२१२,२१९, ३०५
निद्रा – १५६, (–मृत्यु) १७५,२४३, [–विलास – १८:९] २५३,२७०, (निरूपण) २८०
निर्गुण – १३९, (बहुगुण) २३५, (गुणातीत) २३५
निर्गुणकीर्तन – १०६
निर्गुणध्यान – (वाङ्मय) ३१, ४०४,
निर्द्वंद्व – (अंतरात्मा, पंचीकरण, प्रसारण) २२१, ३२६
निर्मळात्मा – १५९
निराकार – (सत्य) २०५
निरोध – (वायूचें आकाशांतील शांत अस्तित्व) १५४, (वायु) १६७, २४३
निवृत्ति – (द्वैताचें उच्चाटन) १४२, १९९, २८२
निवृत्तिराम – (ग्रंथ) ३४०
निश्चय – २८२
निःसंदेहनिरूपण – [९ : ३ – योगी, योगेश्वर] १६३
निःस्पृह – [वर्तणूक – ११:१०] १९१, [लक्षण – १४ : १ – निःस्पृहाचा वर्तनक्रम] २०९, (–सिकवण) २०९–[१८:३] २४७,२७०, २७१, २७२, (लक्षण, वर्तणूक, वगैरे) ३०६, (–दिग्विजय) ३०९, (वर्तणूक) ३१५,३२३, (व्याप) ३३५, ३३६, निःस्पृहव्याप – [१५ : २] २२०
नीच – (= मुसलमान) ९४, (त्याचें गुरुत्व) ११४,११५
नीच याती – २२, (–सांगात) ९३
नेणणें – (विस्मरण) १६५
नेणता – (–महेश) १७४, (–राक्षस) २४२, ३२५, ३३०
नेणतेपणा – १६५,२५६
नेणीव – १६७, (–तमोगुण रुद्र) १७२, २९४

नेता – (समुदायाचा) २९८,३१०
नेमकपण – ३०३
न्याय – (शाश्वत, अशाश्वत – अन्याय) २१९
पंचभूतें – ११०, १२०, १२७, (त्यांचा चिखल) १५१, (तमोगुणाचीं संतानें) १५४
पंचमान – ५३, ११२, ११७, ११९, १८२, २९०, २९१
पंचवटीच्या लोकांना पत्र – ४१८
पंचसमासी – ११२, २१४, ३१३, ४०१
पंचिकर्ण – (परमार्थी, प्रपंची-सुवर्ण) १८६, २२८
पंचीकरण – ११२, (योग) १८१, १८६, १९५, २९५, (पसारा) ३२५, ३२६, ३७२
पढतमूर्ख – ९१, ९६, ११६, ११७, २७०, २७८, २८३
पदपदान्तरें – (ग्रंथ) २७, ८८, १८२, २४६, २७४, ३९४
पनाळा गडीं – २३ (पन्हाळा) ३२०
परचक्र – (वाङ्मय) २१, (व्याख्या) २२, २४, ४८, ५०, ९९, १०४, ११५
परब्रह्म – (तें जें दृश्यातीत) १३३, (देहातीत) १६०
परदेशी – (शब्द) ३६३
परमार्थस्तवन – [१ : ९] ८९
परमेश्वराचे अंश – (सत्कीर्तीचे पुरुष, धर्मसंस्थापनेचा ह्व्यास तेथेंचि वसे) २३७
परवा – (कालवाचक सुंदर कोटी) १५४
परशुराम – ३८८
परा, पश्यंति – १८३, २४१, २४३, २९५, ३००
परमार्थबुडवण – १४७
पराशर – ८१
परिपाठ – १७९
परिभ्रमण – २६०
परीक्षिति – १४३, २८३
पशु – (विचार न पाहे तो) १८०
पांगारकर – (दासबोधाच्या कालाविषयीं कल्पना) ६६, ७०, ७३
पांडवगीता – ८०
पांडुरंग २४६
पादसेवन – [४ : ४] १०७, २८०
पारपत्य – (कारभार) ३१९
पाषाण – (माणसाहून महाभला) १५६
पिंड – (चार देह : स्थूल देह, सूक्ष्म देह कारण, महाकारण) १६६
पिंडब्रह्मांडऐक्य – १६५, (ब्रह्मांडांतील साहश्य) २९३
पिंडब्रह्मांडैक्याचें कोष्टक – २९४
पिंडोत्पत्ति [१५:९] २२८
पीर – ३०, ११५, ३३३

पुंडलीक – ८१
पुनर्जन्म – (त्या संबंधाच्या खोट्या आशा) १५८, २७९
पुरुष – १५८, (विचार पाहिल तो) १८०
पुरुष-प्रकृति – [१० : ९ – सृष्टीच्या उदयाचा विचार = शिवशक्ति, वायु-शक्ति, जाणीव, ईश्वर, मिळून अर्ध-नारीनटेश्वर] १७९
पूर्ण – (२० वें दशक) २६३
पूर्णापूर्ण – [२०:१ – ब्रह्म पूर्ण, बाकी अपूर्ण] २६३
पूर्वपक्ष – (म्हणिजे जालें) २२३
पूर्वारंभ – (वाङ्मय) ३९६
प्रकृति – (जगदाकार) १११, १२०, (दृश्य) १२७, १५८, १७९
प्रकृति-पुरुष – (हें जोडपें) २०४, २२६, (१७ वें दशक) २३६, २६७, २७६, २९१
प्रचीतनिरूपण – [१० : ८ – अनुमान टाळून प्रचीतीनें वागावें] १७८
प्रत्यय – (न्याय) २०५, ३०९, ३१६
प्रत्ययनिरूपण – [१२:२] १९३, २७०
प्रत्ययेविवरण – [ १३ : ७ – सृष्टीची व्यवस्था] २०६
प्रतापगड – ३३८
प्रतिमापूजा – (मूर्खांसाठीं) २५३
प्रपंचत्याग – परमार्थ – ३०८
प्रपंचीं जाणें राजकारण – ४२८
प्रबोध (कल्प) – शक्ति – २०१, २०२, ३०८, ३०९, ३२८
प्रभुदेसाई, दामाजी आपाजी – ३५०
प्रयत्न – ३३, (– साक्षेप) ३१४
प्रयत्नवाद – २७०
प्रळय – ११२, (पंचप्रलय) १७५, [१३ : ४ – सृष्टीचा] २०४
प्रल्हाद – ८१, १०६
प्रवृत्ति – (अधोमुख) १९९
प्रविविक्त – २४४
प्राकृत (भाषा) – (पराकृतु मराठी) ८९, (तारतम्य) ११९, १२१, १३७, (– हिणवणें बरें नव्हे) १४९
प्रारब्ध – ३३, १९३, २८३, २८४, (– त्याहून प्रयत्न श्रेष्ठ आहे) ३१५
प्रासादिक – २१२, २१३, ३५७
प्राज्ञ – २४४
प्रीति – (ती अंतरीं उठे अनायासें) १४७
पृथ्वी – १५०, १९७, [स्तवन – १६ : ३] २३१, (अस्थि, मांस, त्वचा, नाडी, रोम) २४३, २४५
फडनिस – २४९
फुट – (फुटकळ, स्फुट) १९५
बद्धलक्षण – [५ : ७] १२२
बद्रिकेदार – १११
बनशंकरी – (देवता) २४६

बहुजिनसी – (१८ वें दशक) २४५
बहुत – (गौरव) २१५, (बहुतीं कांहीं तरी सांपडे) २२५,(–मान्यप्रमाण) ३०२
बहुतजन – (शहाणे करून सोडावे) २६२
बहुदेवस्थान – [१८:१ अनेक देवतांची माहिती] २४६
बहुधाज्ञान – [५ : ५] ११९
बाजीगरी – १३२,१७५, १७६, २७६
बाजी घोरपडे – १५, ३५५
बाग – (प्रकरण) ४१५
बाण – २३३
बायकांच्या – हालअपेष्टा – (अधि-ताप) १०४
बाहेरमुद्रा – २२४, ३०२
बीजलक्षण – [९ : ४ – मनुष्यदेहाची उत्पत्ति] १७३
बुद्धि – १७२, (ब्रह्मा) १८२, (निश्चय) २४३,२९४
बुद्धिवाद – [१९:६ – महंताच्या कर्तव्याचा विचार] २५८, २९७, ३१६
ब्रह्म – (आकाशाचा दृष्टान्त) १४१, (वृथा आरोप) १४२, १६६
ब्रह्मगीता – ८०
ब्रह्मदेव – १७४, १७५, (विष्णूचा मुलगा – रजोगुणी – हावरा) २०४, (जाणते – नेणतेपणाचें मिश्रण) २९०, २९४
ब्रह्मनिरूपण – [६ : ४] १२८,[७ : २] १३८, [९ : २] १६२
ब्रह्मपावन–पावणें – [६:२] १२६
ब्रह्मभाव – (= अहंभावाचें निर्वाण) १३८
ब्राह्मण – (मंडळ्या) १८, (दुर्दशा) २९, ३०, (महिमा) ११३, ३५२
ब्राह्मण कोणास म्हणावें – १२९
ब्राह्मण्य रक्षावें आदरें – १०६
भक्त – (मंडळ्या) १८, (जो विभक्त नव्हे) ११०, ११२, १९०, (निरूपण) १९४, (त्याचें जीवन) २१५
भक्तलीलामृत – ६१
भक्ति – (म्हणजे विभक्ति नव्हे) ११२
भगवद्गीता – (श्रीमद्) ७९, ८०, १४८, १७९, ३०७, ३४३
भगवंत – (महत्तत्त्व, महद्भूत, विज्ञान) २२४
भजन – २६६, २८४
भजन तसा देव – ११०
भट, भा. वा. – ३४१, ४२६
भर्तृहरि – ९७
भला – (जो आपणचि कष्टत गेला)२६१
भव्य – (स्वीकारावें) २५८
भाग्यपुरुष – (जे समजले आणि वर्तले ते) २१५, (जेथें वडील अंतरात्मा चेतला तो) २२८

भागवतपुराण – ७९, ८०, ८१, ८३, ८४, १०६, १४३, १४५, १५८, २३१, २६८, २७६, २८३, ३०७, ३०८
भागवत, राजारामशास्त्री – ३४१, ३४५
भाव तैसा देव – १०५
भास – (मनाचें देखणें) २४५
भास्कर – (समर्थशिष्य) १५, १६
भिक्षा – २१०, [–निरूपण १४ : २] २१२, (गांव, घरें – माणसांची परीक्षा) २२५, ३०५
भीड – २१७, २२३, २५८, २८०
भीमस्वामी – ६१, (तंजावरकर) ६४
भूचर – (जीव) २२७
भूत – (वृक्षकाष्टाला समजणें) १७६, (पिशाच्च)१७९, (म्हणिजे जें निर्माण झालें) २२२, (म्हणिजे तितुकें झालें) २३५, (पिशाच्च) २६५, २८७, २८८
भूतकर्दम – १५५
भेदसमर्थन – (भेद ईश्वर करोन गेला) २४०, ४०८
भोग – (स्थूल, प्रविविक्त, आनंद, आनंदावभास) २४४, २९५
भोळा भाव – (अज्ञान) ३७, (उधाराचा उपाव) ३८, १६८, २८३ (अज्ञानाचा स्वभाव) २६७
भ्रमनिरूपण – [१० : ६] १७६, १८०
मजलस, मज्यालस, फड – २४९, २५४, २५६, (मजलिशी) २६२, २९७, २९९, ३१०, ३११, ३१२, ३१६, ३१७, ३३५
मन – (ही ईश्वराची विभूति) १३०, १४०, (संकल्प – विकल्पाचें मूळ) १४२, १८२, (करूं न करूं ऐसें वाटलें) २४३
मनजी देवजी – ३५०
मंत्रभेद – ४२७
मनबोध (मनाचे श्लोक) – ३८१, ४२५
मरण – (मीमांसा) २७८
मऱ्हाष्ट – मऱ्हाट – ठ – (ग्रंथी) ११९, (देश) ३३१, (धर्म) ३४१, ३४८, (राज्य) ३४८, (धर्म) ३५०, (याती) ३५०, ३५१, (धर्म) ३५१, ३५५, (राज्य) ३५५ (धर्म) ४१३
मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें – (खंड १, ६, १५ व १८) ३२०, ३४१, ३४३, ४२६
मराठा धर्म – ३४८, ३५१
मल्लविद्या – ३५२
महत्कृत्य – (व्याख्या) ३०२
महद्भूत – [अंतरात्मा महिमा १६ : ७] १८२, २३३, २९३
महदाकाश – १५९
महंत – १३, (समर्थकृत परीक्षा) ५४, [लक्षण – ११ : ६] १८८, (अंतरा-

त्म्याशीं सादृश्य) १९१, (मनोगत राखेल तो मोठा) २०९, २६०, २६२,२७०,२७१,२७२, (लक्षण) ३०७,३०९,३१६,३२२, ३२३, ३३४, ३३५
महंतलीळाशिकवण – (कविता) ३३०
महंती – २१२, (ओळखीच्या लोकांत नसावी) २५८, २५९, ३११, ३२२, ३३४, ३४०, (सुखाची नाहीं) ४१७
महाकारण – १६६,२०३, (देह) २४४
महाजन – (व्याख्या) १२८
महादेव – १११, (सिद्ध) १२१, १९८ २१२
महाभारत – (शांतिपर्व) ३२७
महामाया – १८०
महाराष्ट्रधर्म – (प्रकरण) ३४१, ३४५, ३४६,३४७,३४८,३४९,३५४
महाशब्द – (महाराष्ट्रधर्म) ३४५
महिम्न धाटीची शतश्लोकी – २३१, २३३
महीपति – (संतविजयकार) ६२
महेश – १५५, (नेणतेपणाचा पुतळा) २९०,
मळमळीत – (टाकावें) २५८,३१३
मात्रा – (अ उ म व अर्धमात्रा ईश्वर) २४४
माता (थोरवी) – २७७
मान – (ग्रंथविभाग) ५४, (–पंचक) १८२, १९२, २९०, ३७३
मानसपूजा – ४३, (वाङ्मय) – ४३, १०८,१०९, १३४, ३१८, ३२८, ४०५
माया – १११, १२८, (जादू) १३२, (आकाशांतल्या वायूसारखी) १४१, १४२,[आली कोठून ?सूक्ष्म आशंका ८ : २ – माया उद्भवते कशी] १५१, (अहं ऐसी स्फूर्ति) १५३, (प्रकृतिपुरुष) १५४,१६८, [निरूपण – १४ : १० भ्रमनिरूपणासारखें विवेचन] २१८,२३९,२८०
मायाजळ – १८९
मायादेवी – २३९
मायादेवीचें वोडंबर – १७५
माया नदी – १०५, १८९
मायाब्रह्मनिरूपण – [६ : ५] १२९
मायोद्भव – [६ : ३] १२७, (यालाच ज्ञानदशक म्हणतात) १४९, १६९, १७९
मारीच – १३२
मारुति – २,५,६,७, ८, १४, १०८, १०९,२४६
माहांपुरुष – २५७
माहांवाक्य – १२०
मितिकाक्षर – १३९
मिरपूड – २०७

मी – ११०, १११, १२१, (भ्रम – तूं भ्रम) १७६, (मी कोण?) २७३
मीन – १२१
मीपण – (वस्तु – ब्रह्म,) १३४, १३८, (निष्क्रियता) १४४, (दुष्परिणाम व बळ) १४५, १६३, १६५, १९५, २४४, (स्फुरण) २७६, २७७, २७८, २८०, २८१, २८३, २९८
मुक्त – (चार प्रकारचे – नित्य मुक्त, जीवन्मुक्त, विदेहमुक्त, स्तब्धता-तादस्थता – मुक्ति नव्हे) १४३, १४४, १४८, २७८, २७९, २८३
मुक्ति – [चार – ४ : १०] १११, २८२
मुक्तिक्षेत्र – ११२
मुखवस्त्र – ३३८, ३३९
मुधोजी – ३२०
मुमुक्षु – [लक्षण ५ : ८] १२२, २८६
मूर्ख – ९१, ९४, ९७, १००, १०३, ११५, १२२, (प्राकृताला न मानणारे) १४९, १५६, २७०, २७८, २८५, (परम) २९८
मूर्खपण – (सार-असार येक चि करावें) २४९
मूर्ति – (देवळें) २१७
मुळारंभ – ३१६
मुळीची जाणती कळा – १८२
मूळपुरुष – १५२, १८०, १९७
मूळप्रकृति – १८०
मूळमाया – १५२, (आकाशांत चंचल वायु तैशी) १५३, १६७, १८०, १९६, १९७, २३७, (चौथा देह) २३९, (महत्तत्त्व – त्रिगुणाचें गूढत्व) २६३, २६९
मेरु – १११, १५५
मेरुस्वामी (शिष्य) – १७
म्हैसमंगळु – ३६४
मोंबत्या (मेणबत्त्या) – २३३
मोरे – (चंद्रराव) ७, (पाडाव) ५९
मोक्ष – १२७, (तत्काळ) १५७, [लक्षण ८ : ७] १५७, १६०, २३८, २८१, २८२, (प्राप्ति) २८३
मृत्तिकापूजन – ३७, २८९
मृत्यु – [३ : ९ – सर्वभक्षकता] १०५, १७५
म्लेंच – २६, ३०, ३१, ४९, (दुर्जन वगैरे) २५१, ३३३
म्लेंच्छ – (संहार) ४४, २१६, २२०
यथायोग्य घालावें वय – (वाङ्मय) ४१८
यम – १०४, ३२५, (गीता) ८०, (दंड) १०५, (यातना) १२६
युक्ति – ३२६, ३३९
युगधर्म – [१४ : ७ – ब्राह्मणांची अवनति] २१५
येत्न – २७१, (तो देव जाणावा) ३१६
येत्ननिरूपण – [१९ : ७ – भक्ति प्रसाराचा उद्योग] २५९, २७१

येत्नसिकवण – [१२ : ९] १९९
योगवासिष्ठ – ८४,८५
योगी – १६३, (अखंड योग) २३७
योगेश्वर – १३३,१६३,१९१
योनि – (८४ लक्ष) २२७
रंगनाथ – (निगडीकर) १८, (मोगरीकर) ७९,८०
रजनीचर – (अभक्त) २९०
राजकारण – ५१, १६५, [११ : ५] १८६, १८७, १८८, १९४, २२०, २२२, २३४, २४७, २५१, २५५, (प्रपंचीं जाणे) २५७,२५८,२६०, [निरूपण – १९:९] २६०, २६१, २६२,२७१,(पॉलिटिक्सविषयक), २७१, ३०७, ३११, ३१६, ३१७, ३१८, ३१९, ३२१, ३२२, ३२३, ३२७, ३२८, ३३०, ३३२, ३३३, ३३५, ३३६, ३३७,३४०, (पॉलिटिक्स), ४०६,४१५,४२५
राजकी – ३१९, ३२०, ३२१, ३५०
राजदंड – ९८, १०४, १०५, ३२४
राजद्वार – २११, ३३१
राजधर्म – ३१९,(पॉलिटिक्स) ३२३, ३४५, ३५६, ४१२
राजनीति – ४८, ३२५, ३२६
राजवाडे लेखसंग्रह, भाग १–३४२
राजवाडे,वि.का. – ३४१, ३४४, ३४५ ३४७,३४८,३४९,३५१,३५४
राजा – (अंतरात्म्याशीं साम्य) ३२५, (खबरदार बरा) ३२६, (त्याचे गुण) ३२७
राजिक – ३२०, ३२१, ३३०, ३३९
रानडे, न्या. मू. – ३४१, ३४५,३४७
रामगंगा – ३७९
रामगीता – ८०
रामघळ – ५८, ५९, ६०
रामदास आणि रामदासी – (ग्रंथ)४२४
रामदास फोडी हांका – (वाङ्मय) ४१७
रामदासाचा सारथी – (वाङ्मय) ४१७
रामदासी संशोधन – १९४, ३३०
रामवरदायिनी – ४५, ३३८
रामायण – ४३, ५४, ३५०, ३६८
रावण – १३२
राक्षस – २७६
राक्षसी क्रिया – २०२
लघुकाव्यें – २९०, २९१
लघुबोध – [१३:६ – सृष्टीची उत्पत्ति, प्रत्यय, आत्मनिवेदन वगैरे] २०५
लक्ष्यांश – (न बोलतां जाणावा) २४५
लिंगदेह – १३३
लेखन-वाचन – २११, २९९
लेखनक्रिया – [१९:१] २५५, ३१४
लोकधाटी – १६६, १७३, ३०९
लोकालोक – १११
लौंदपण – १८६
वक्ता – १०६,१०७,२३९, (कर्तव्यें)

२५४, २९९, ३००, ३११
वधूवर – (शिवशक्ति) २३८
वनचर – (जीव) २२७
वंदनभक्ति – [४ : ६] १०८
वनिता – (उपाधि वाढविते ती) २३८
वर्णसंकर – १२८, २१०, २१६
वस्तु – (ब्रह्म) – १३४, १६२
वसिष्ठ – १२१
वाच्यांश – (वाचेनें बोलावा) २४५
वामदेव – १२१, १४३, २८३
वामन पंडित – ३४०
वायु – १५०, (मूळमायेचें चलन) १५३, (माया) १६६, १७९, (शक्ति) १७९, १९७, [स्तवन – १३:६] २३३, (मन–समान–त्वचा–हात–स्पर्श–रूप) २४३, (–प्रकृति) २९१ (त्यांतील जाणीव–पुरुष) २९१, (–व आत्मा यांतील तारतम्य) २९३
वार – (जेवणाचे) ३०५
वाराणसी – ११२
वाल्मीकस्तवन – [१६:१] २३०
वाल्मीकि – ८९, १०७, १२१
वासना – १६९, (वृत्ति) १७३
वासिष्ठसार – (योगवासिष्ठाची संक्षिप्त आवृत्ति) ७९, ८१, ८३, १४५
विकल्पनिरसन – [९ : ७] १६७
विठ्ठल – (समर्थांचा शिष्य) १५
विठोबा – ३४६, ३४७
विभक्त नव्हे तो भक्त – २८२
विपरीत ज्ञान – २१७, (म्हणिजे देखणें येकाचें येक) २६३
विमल (ळ) ब्रह्म – [७ : ४] १४०, (–निश्चळ आत्मनिवेदन) १९७, [२० : १० ब्रह्माच्या शुद्धस्वरूपाचें वर्णन] २६७, २९३
विमल लक्षण – [१२ : १] १९२
वियोगी – (योग नसेल तो) २३७
विरक्त – ९१, [२ : ९] ९५, २७०, २७२
विरक्ति – (जागृतीची किल्ली) १२२
विराट – २०३, २४४
विवरण – [१९ : २ चांगल्या गुणांचें विवरण] २५५, २९७
विवेक – (कर्तयासी वोळखावें) २०६, [१९ : १० महंताच्या व्यवहाराचा विवेक] २६२, ३१६ (श्रेष्ठतेचें साधन) ३२६
विवेकप्रळय – १७५, (जीवन्मुक्तावस्था) १७६, १८३, २९३
विवेकवैराग्य – (१२ वें दशक) १९२, [१२:४] १९६
विवेकहीन – (पशुसमान) १९९
विश्व – २४४,
विष्णु – १०८, १११, १५५, (= अंतःकरण) १६६, (धर्मस्थापक) १७४, १८२, १९१, (पहिला मुलगा–

सत्त्वगुणी) २०४, २३३, २६९, (अंतरात्मा) २९०, (सत्त्वगुण) २९०, २९४
विष्णुपुराण – २३१
विषयत्याग – [१२:७] १९७
विस्मरण (विसर)– २२६,२२७,२६८, २९१,४०३
विज्ञान – १६८, १८१, २०३, २१७, २२४, (चार देहांचें निरसन, तेंच परब्रह्म) २४४, २८२, ४०१
वेंटा आगरी – ३५०
वेणा, वेणुबाई – (शिष्यीण) १७,५४
वेताळ – ३२
वेष – (उत्तम पुरुषाचा) ३०५,३०७
वेषभूषा – (व्यर्थ) २१४
वैकुंठ – १११
वैधृति – ३०४
वैराग्य – (खरें भाग्य) १९८, (अंतरापासून, तेंच भाग्य) २१६, २८६
वैराग्यनिरूपण – [३ : १०] १०६
वैष्णव – २२०,४०३
वोडंबर – १४१
वोडंबरी – १३२, (विद्या–राक्षसाची) १७४,२७६
वृथापुष्ट – १३३
वृद्धेश्वर – (गांव) १६
व्यंकटेश – (एक देवता) २४६
व्यं(ए)कोजी – ३२३
व्यतिपात – ३०४
व्यास – ८९, १२१, १४३, १४५
शक्ति – २४४, ३२६, ३३८
शंकर – १०७, १०८, १११, ११२, (ब्रह्मदेवाचा मुलगा – तमोगुणी – रागीट – ज्ञानरहित) २०४
शंकर – पार्वती – ८०
श(प)डांगुळें – (आध्यात्मिक ताप) १०३
शतक – (ग्रंथविभाग) ५४
शत्रुघ्न – २
शब्द – १३९, (आकाशगुण) १६७, २४३
शरीरशृंगार – ३०६
शस्त्रविद्या – ३५२
शहाजी – ४१९,४२६
शहाणपण – (चातुर्य) २२२
शाइस्तेखान – ५९
शाक्त – ३३
शास्त्रधाटी – १६६
शारदा – (वर्णन) ४०, [–स्तवन १ : ३] ८८, १३६, २३४, २३६
शाश्वत-निरूपण – [१४ : ९ – सृष्टीची उत्पत्ति–सारासारविचार, वगैरे] २१७
शाश्वतब्रह्म – [१५ : ४– सृष्टीची घडामोड व शाश्वत ब्रह्म] २२२
शाहाणा – णे – (बहुतांस मानला) –

२२२
शाळिग्राम – २७, २८
शिकवण – (१९ वें दशक) २५५, ३११, ३३०
शिरगांव – ६१
शिव – (माया गुणें बोलिजे) १५२
शिवकालीन राजनीति – ३२३
शिवगीता – ८०, ८१
शिवचरित्र – साहित्य, खंड ७, खंड ९ – ३२०, ३५०
शिवछत्रपति – २५०
शिवथर – ७, १६, ५७, (दासबोध पूर्ण केला, हा ग्रह) ६१, ६४, ८७
शिवबा – (स्वामी संवाद) ५९
शिवराज – १६, २५०
शिवशक्ति – ३२, १७९, (– अहंपणाची जाणीव) १८०, २२६, [१७ : २ – स्त्रीपुरुष भेदाचें कारण] २३७, २६७, २७७
शिवाजी – १५, १६, १८, ३५, ४५, [दासबोधाशीं संबंध – १३:६ – लघुबोध सांगितला] ६१, ६२, २०३, २११, ३१९, ३२३, ३३०, ३३२, ३४१, ३४२, ३४३, ३४६, ३४८, ३४९, (त्यांस लिहिलेल्या पत्राची माहिती) ४११ (शिवाजी निबंधावली १) ४२२, ४२८
शिष्यलक्षण – [५:३] ११६
शिस्त – ३१०
शुक – १२१, १४३, २८३
शुद्धसत्त्व – २४४
शुद्धज्ञान – [५:६] ११९, २८६
शून्य – (अज्ञान) १५६
शून्यनिरसन – [८:१०] १६१
शौनिक – १२१
शृंगार – २१५
शृंगा(घा)रिक – (नवरसिक) २१३, (– निषेध) २१४, (निषेध – त्याग) ३१२-१३, ३५३, ४०२, ४०७
श्रवण – १४२, [७:८ – श्रवणाचीं फळें व श्रेष्ठता] १४७, २८०, २८१, ३१४, [निरूपण – १७:३ – अध्यात्मश्रवणाची महती] २३८
श्रवणभक्ति – [४ : १] १०६
श्रीकर्ता निरूपण – [१३ : ८ – सृष्टिकर्त्यांचें विवेचन] २०६, ३२३
श्रीरामदास आणि रामदासी मासिकांतील सांप्रदायिक वृत्त, चर्चा, वगैरे – (खंड) – ५७, ३३९, ४१६, ४२३
श्री रामदासकृत लघुकाव्यें – ३१२
श्रीरामदासांची कविता – (प्रथम खंड) ५, ३५, ४४, ५६, ८४, ८७, १०१, ३६०, ३८०, ४२० (खंड २) ११२, ११९, १२९, १३१, १८१, १८२, १८९, २०२, २१८, २२५, २३१, २६८, २७४, २९१, ३०४

श्रीरामदासीसंशोधन खंड १ – (फुट – १८ : ६) २५०, ३१९, ३२१, ३२६, ३३९,
श्रीसमर्थचरित्र–(चित्रशाळा) ४२६
श्रीसंप्रदायाचीं कागदपत्रें – भाग किंवा खंड १–२११, ४१४
श्रीसमर्थावतार – ४१०, ४१४
श्रीसमर्थ वाग्देवतामंदिर (धुळें) १९
श्रीसमर्थप्रताप – (ग्रंथ) १७, ५४, ५५,६२,८७,३४०,४२७
श्रीसमर्थ सांप्रदाय – ४१८
श्रीसमर्थ हृदय – ५५, ५६, ५७, ६४, ६५, ७०,८७,३८५, ४१०, ४३१
श्रीसमर्थांचीं लघुकाव्यें – भाग २– ३१, २९०, २९१
श्रोता – ८८,९६,१०७,२९९,३१२
श्रोता अवलक्षण – [१८:१०] २५४, २७०
षड्गुणेश्वर – २०४, २२६, ( निर्गुणांतील गुणविकार) २३७, २६७, २६९,४०३
षड्रिपु (कविता) – ३७१
सगुण – १३९, (चंचळपणें विकारलें) २३५,
सगुणध्यान –(वाङ्मय) ३४, ४०४
सगुणभजन – [उपयोग ६ : ७] १३१, [१०:७ गतज्ञात्यांच्या सामर्थ्याचा-खुलासा व भजनाचा आग्रह] १७७
संकल्प – १५७,१५८, (स्फुरण = वायु) २२६
संघटना – ३१२, ३३४, (चातुर्य) ३३५
सच्छिष्य – ११५, ११७, २८०
सज्जनगड – ७
संचार (उत्तम पुरुषाचा)–३०३,३०५
संशय – १२५, २८०
संस्कृत – (प्राकृत–तारतम्य) ११९, (प्राकृत = प्राकृताची तरफदारी) १३७
सटी – १७७
सत्कार्योत्तेजक सभा – १९, ३१, (हनुमंतस्वामीची बखर) ६०, ३२२
सत्य – (सुकृत) १८१, (स्वरूप)१८१, (निराकार आत्मा) २०५, (स्वरूप) २५०
सत्यलोक – १११
सत्य संकल्प – २६९
सत्त्वगुण – ४२, १०८, १६६, (जाणती कळा) १९१, २७०
सत्त्वगुणी – ९१, ९४, २७२
सत्त्वगुणें – (ईश्वराचा अंश) ९४
सत्संग – ११३, २८०, २८६
सद्गुरु [जेथें दिसती विशेष गुण। तें सद्गुरूचें अधिष्ठान – ४ : ६ : ९] १०८, (ब्राह्मणाहून श्रेष्ठ) ११३, ११७, ११८, (त्यांस नमन)

१३६, (सेवा) २८०, २८६
सद्विद्या [२ : ८]–२७०, ३११
सदेव–(उदंड जाणीव तो) २२१, २५५, २८९, ३२२
सदेवपण–(लक्षण) ४८, १८५, [१९:४] २५७
सनक–१२१
संदेहवारण–[९ : ९–ब्रह्मांत ब्रह्मांडाचा प्रादुर्भाव कसा हा संदेह] १७०
संन्यासी–(षड्विकारांचा त्यागी) २२९, ३५२
सप्ततिन्वय–(१६ वें दशक) २३०
सप्तशति–१४८
सप्तश्लोकी–(गीता) ८०
सप्तसमासी–(वाङ्मय)५३,५६,१४६, १८२, १९५, २३३, २६९, २९१, ४०३
स्फुट–(ओव्या)–३७१, (प्रकरणें) ३७४ (श्लोक) ३८०
सभा–[स्तवन–१ : ८] ८९, ९३, ९४, (मोहन) १०२, २९९, ३१०
संपत्ति–(आसुरी) ९५
संभाजी–३२३, ३४६, ३४८, (त्यास लिहिलेलें पत्र) ४१३,४१४,४१५
समर्थपदवी–२५४
समर्थलक्षण–(जितुके कांहीं उत्तमगुण) २५७, (सकळामध्यें प्रत्ययें ज्ञानी तो) २६४
समर्थांनीं दिनकरास अनुग्रह दिला–(फाल्गुन १५ शक १५७६) ५७-५८
समास–(ग्रंथविभाग) ५३
समीपता–१११, २८२
समुद्रेश्वर–(एक तीर्थस्थळ) ४४
समुदाय–९४, १८६, १९१, १९२, २०१, २४९, २५९, २६१, २६२, ३०७,(रक्षण) ३०७, ३१०, ३१६, ३१७, ३३०, ३३४, ३३६
सरस्वतीमंदिर–(मासिक) ३३७
सर्वसाक्षी–१२१
सर्वसाक्षिणी–(सर्वज्ञाता) १४१, (अवस्था) १९७
सर्वज्ञसंग–[१८:२ जाणत्याची संगति] २४६
सर्वात्मा–(सर्वां वर्ते तो अंतरात्मा) २०६
सर्वांतरात्मा–(सर्व लोकांचें अंतरअंतरात्मा) १८०
सलोकता–१११
सह्याद्रि–(मासिक) ४२७
साकार–(अनित्य) २०५
साधक–१२२, [५:९] १२३,२७०, २८१, २८६
साधनत्याग–(त्याचे अनर्थ) १४६
साधनप्रतिष्ठा–[७:७] १४४

सामान्य – (सकळांस जे मान्य) २२४
सायुज्यता – ( देवभक्ताचा अभेद ) १७९, सायुज्यपद – २८१, सायुज्य-मुक्ति – ४०,८८,१११, सायोज्य – १२७, सायोज्यता – १४३, (निर्गुणी जें अनन्यता) १८३, २८२, सायोज्य-प्राप्ति – ११९,
सार-विवेक – [११:४] १८६
सावध (धान)ता – (वाङ्मय) ३२९, ३३०, ४१९
साहित्य – १५२, (औचित्य) २१४
साहेब – ३२६
साक्षेप – (मूळ मायेमधील साक्षेप) २६४
सिकवण – [दिनचर्या ११:३] १८४, २७०, २७१, ३२२
सिद्ध – १२२, [लक्षण ५:१०] १२४, १२५, [८:९] १६०, २७०, २८१, २८२, २८३, २८६
सिद्धांत – २१७, (म्हणिजे निमाले २२३, (म्हणिजे शुद्ध येक) २६४
सिद्धांतनिरूपण – [११ : १] १८२, [१५:१० – निश्चळ चंचळादिकांचें विवरण] २२८
सिद्धावस्था – २८२, २८४, २८६
सीसदंड – १०९
सुंदरमठ – (शिवथर घळ – तेथें दास-बोध पुरा केला हा ग्रह) ६१
सुरत – ५९
सुरानस – २४९
सुषुप्ति – २२७, २४४
सूची – (दासबोधाची) ३२२
सूर्यकान्त – २८
सूर्यस्तवन – [१६ : २] २३०
सूक्ष्म – [नामाभिधान – २० : ३] २६३
सूक्ष्म आशंका – [८ : २] १५१
सूक्ष्म जीव – [१५ : ८ – सूक्ष्म जीवांची माहिती] २२७
सूक्ष्मनिरूपण [२० : ९ – देवाचा व देवाधिदेवांचा विचार] २६७
सूक्ष्म भूतें – [८ : ४] १५४
सेवकधर्म – ३२९, ३४३, ३५६, ४१५
सेवाधर्म – ३४२, ३४५
सोनें – (दसऱ्याचें) २१८
सोपी – (सूफी फकीर) ३१
सोमकान्त – २८
सोमयाग – २७
सोहं – २४१
सोहंभाव – १२८
स्तब्धता – (तटस्थता) १४४
स्त्री – ४१, (–व पशु एकाच श्रेणीचे) ९०, (पराधीन) २७७
स्त्री गुरु – (भ्रतार शिष्य) ३३४
स्त्रीधर्म – ३४५
स्त्रीपुरुष – २७६, (आकर्षण) २७७
स्थान – (नेत्र, कंठ, हृदय, मूर्धा) २४४, २९५

स्थिति – [९:१० – ब्रह्मानुभव] १७०, २८२
स्थूळ पंचभूतें – [८:५ – पंचभूतांचा दृश्य विस्तार] १५५
स्फूर्ति – (वाढे निरंतर सूर्यदर्शन घेतां) २३०
स्फूर्ति–स्फुरण – (निश्चळांतील चळण) १८०
स्मरण – (अभाव-मरण) १६८, २२६, (तुर्या) २२७, (निश्चळांतलें चैतन्य) २३७, (ब्रह्मांतलें स्फुरण तें देवाचें मूळ) २५८, २६८, (देव) २९१
स्मरणभक्ति – [४:३] १०७, ११२
स्मरणविस्मरण = मानव – २९१, ४०३
स्मार्त – २२०, २६८,
सृष्टि – [कथन – ६:६] १२९, [त्रिविध लक्षण – २०:२ – त्रिगुणानुसार सृष्टीचा विचार] २६३
सृष्टिविद्या – (ब्रह्मदेवाची) १७४
स्वगुणकीर्तन – १०६
स्वगुणपरीक्षा – [३:२ – ५] ९७, १००, १०१, १०३, ११५
स्वप्न – (= असद्ज्ञान – म्हणजे संसार) १३५, २४४
स्वयातीचा गुरु – ११४
स्वर – (सरिगमपधनि) २४१
स्वरूपज्ञान – (शुद्ध) १२१
स्वात्मबोध वाका – ३३९, ३४०
वानुभवदिनकर – (ग्रंथ) २, १६, ५७, ५८, ३४०
वेदज – १७४
हंसगीता – ८०, १४५
हठयोग – २४१
हनुमंतस्वामी – (बखर) १६, ५७, ५८, ५९, (अधिकृत) ६०, ६१, ६३, २०३, २५०, ३३२, ४२२
हरिदास – [१४:५ – कथेचे विषय, प्रसंग, हरिदास वगैरे] २१४
हरिसंकल्प – २४८, २६४, २६५, २६९, ४०३
हरिहर – (ब्रह्म) ११३, १२६, १२८, १३१
हवाई नळे – २३३
हवावी – २२४
हिंदुस्थान – ३७९
हिमाचल – १११
हिरण्यगर्भ – २०३, २४४
हीनविवेक – (असतें एक वाटतें एक) १९९
हेळवाक – ७
क्षेत्रपाळ – (भैरव) २४६
क्षत्रिय – २२६, ३५२
क्षात्रधर्म – ३४५, ३४८, ३४९, ३५५, ३५६, ४१२
क्षेत्रदेव – २८९

ज्ञान – १२६, १६८, (हा अंतरात्म्याचा प्रकाश) १८२, (उंचनीच ओळखावें) १८६, (=देव) २०३, (पदार्थांचें अधोगतिकारक) २३९, २४४, (म्हणजे जाणणें–विकाराचें वळले) २६३, २८२, (देव) २९०, २९८
ज्ञानदशक – ५६, ६५, (निर्देश) १२०, १२५, १६२
ज्ञानाचें लक्षण – ४०१
ज्ञानी – १६४, १७१
ज्ञानेश्वर – ८०, ९०, ९९, १००, ११०, १२५, १४०, १६०, १८९, ३४३, ३४७
ज्ञानेश्वरी – ८९, १०५, १११, ३४४
House of Shivaji – ३२३
Politics – ३१८, ३२४, ३२९, ३३१, ३३४
Rise of the Maratha Power – ३४७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७०९१
REFBK-0007911